काठ

मूळ कन्नड लेखक

डॉ. एस्. एल्. भैरप्पा

अनुवाद :

उमा वि. कुलकर्णी



काठ

मूळ कन्नड लेखक
डॉ. एस्. एल्. भैरप्पा

अनुवाद
उमा वि. कुलकर्णी

मेहता पब्लिशिंग हाऊस

चार शब्द

चोखंदळ मराठी वाचकांसाठी उपलब्ध होत असलेली डॉ. एस. एल. भैरप्पा यांची ही सहावी कादंबरी. या आधी या लेखकाच्या 'वंशवृक्ष', 'जा ओलांडुनी', 'पर्व', 'आवरण', 'मंद्र' यांसारख्या कादंबऱ्या मराठी वाचकांनी वाचल्या आहेत आणि विविध विषयांवरील या कादंबऱ्या त्यांना आवडल्याही आहेत.

डॉ. भैरप्पांची ही कादंबरी १९९१ साली कन्नडमध्ये 'अंचु' या नावाने प्रसिद्ध झाली. मूळ कन्नड भाषेतील ही कादंबरी केवळ दीड वर्षाच्या आत मराठी वाचकांसाठी उपलब्ध झाली आहे.

एका संपन्न, सुस्वरूप आणि सुविद्य स्त्रीच्या स्वभावाचे आणि परिस्थितीच्या मानसिक दडपणामुळे आत्महत्येसाठी प्रवृत्त होणाऱ्या तिच्या अंतर्मनाचे चित्रण यात आहे. स्त्रीच्या मनस्वीतेबरोबरच पुरुषमनाचाही वेध घेण्याच्या लेखकाच्या प्रयत्नामुळे ही केवळ मनोरुग्ण स्त्रीची आणि उमद्या, कर्तबगार पुरुषाची प्रेमकथा न राहता त्यापलीकडे जाऊन एक सृजनात्मक, मनोवेधी कादंबरी झाली आहे; हे लेखकाचे यश आहे.

बरीच वर्षे उपलब्ध नसलेली ही कादंबरी आता मेहता पब्लिशिंग हाऊसकडून पुन्हा वाचकांसाठी उपलब्ध होत आहे.

शेवटी महत्त्वाचे –

या कादंबरीच्या अनुवादाच्या वेळीही नेहमीप्रमाणेच श्री. विरुपाक्ष कुलकर्णी यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

सौ. उमा वि. कुलकर्णी

Contact : 020-24476924 / 24460313
Website :
www.mehtapublishinghouse.com
info@mehtapublishinghouse.com
production@mehtapublishinghouse.com
sales@mehtapublishinghouse.com

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, without the prior written consent of the publisher and the licence holder. please contact us at **Mehta Publishing House,** 1941, Madiwale Colony, Sadashiv Peth, Pune 30.

या पुस्तकातील लेखकाची मते, घटना, वर्णने ही त्या लेखकाची असून त्याच्याशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

अनुक्रम

काठ

नावाचा बोर्ड ऑफिसवर लटकवणाऱ्या वास्तुरचनाकाराचा सन्मान केवळ नव्या इमारतींची कामं करण्यातच आहे आणि जुन्या घरांची दुरुस्ती करण्यात काही अपमान आहे, या प्रकारच्या विचारांना सोमशेखरनं त्याच्या मनात कधीच थारा दिला नव्हता. त्यातही खरी गोष्ट म्हणजे, या आधी त्याच्याकडे कुणी जुन्या घराच्या दुरुस्तीचं काम आणलंही नव्हतं.

मैसूरमधली, गावाबाहेरच्या परिसरात ललितमहाल रस्त्यावरच्या अत्यंत विरळ वस्तीत असलेली जुनी बंगली! भलंमोठं कंपाउंड असलेलं, एकदा बांधल्यावर दुसऱ्यांदा कधीही रंगरंगोटीचा हात न फिरल्याची स्पष्ट लक्षणं दाखवणारं, मद्रासी छताचं बैठं घर. दारा-खिडक्यांच्या चौकटी, तसंच दारं आणि इतर बऱ्याच कामांसाठी वापरलेल्या सागवानी लाकडावरूनही त्या इमारतीच्या जुनेपणाची कल्पना येत होती. अलीकडच्या काळात एवढं सागवान कोण वापरणार म्हणा! वर मान केली, तर गळफास लावायला सोयीचं वाटावं असं पंधरा फूट उंचीवर असलेलं छत. या छताला मधोमध दोन-तीन भेगा पडल्या होत्या. पावसाळ्यात त्या भेगांमधून घरात पाणी उतरत होतं. कधी काळी अत्यंत आकर्षक असलेली तिथली गाऱ्याची जमीन गळलेल्या पावसाच्या पाण्यामुळे शेवाळल्यासारखी होऊन अत्यंत विरूप दिसत होती.

त्या घराच्या मालकिणीची, डॉ. अमृताची मोटारही जुनीच होती. उन्हा-पावसामुळे रंग उडून काळाप्रमाणे म्हातारी झालेली जुन्या काळची फियाट! पण तिच्या घराप्रमाणेच तिची गाडीही चांगलीच मजबूत होती.

अमृतानं चौकशी केली होती, "ह्या छताचं गळणं कसं थांबवता येईल? घराची रंगरंगोटीही करायची आहे. तुम्हीच ही दोन्ही कामं करून द्यायला हवीत. या दोन्हींचा मिळून किती खर्च येईल, याचा अंदाज द्याल?"

त्यानं सगळा हिशेब करून सांगितलं, "छताचा थोडा पापुद्रा फोडून काढावा लागेल. नंतर मुख्य काम करावं लागणार. नऊएक हजारापर्यंत हा खर्च जायला हरकत नाही. संपूर्ण घराचा पहिला रंग खरवडून दुसरा डिस्टेंपर लावायचा झाला, तर तीस हजार खर्च होतील."

हे ऐकून तिचा चेहरा कसानुसा झाला. "विचार करून सांगते" म्हणून ती निघून गेली. त्यानंतर ती त्याच्या ऑफिसकडे फिरकली नाही. नंतर एक दिवस संध्याकाळच्या वेळी येऊन ती संकोचून म्हणाली, "तूर्त रंगाचा विचार नकोच. छताच्या दुरुस्तीसाठी नऊ हजार खर्च करणं तूर्त मला जमणार नाही. यापेक्षा कमी खर्चात काहीतरी तात्पुरती व्यवस्था करणं शक्य आहे का? पावसाळा जवळ आलाय. पावसाळ्यात ते गळणारं पाणी पाहिलं की भीती वाटते, पण आता एवढा खर्च करायचा म्हणजे...." पुन्हा आपलं आर्थिक रडगाणं त्याला ऐकवण्याचा संकोच वाटून ती पुढं काही बोलली नाही.

तिची आर्थिक अडचण त्याच्याही लक्षात आली. त्याच्या व्यवसायात हे काही नवं नव्हतं. मिनिटभर विचार करून तो म्हणाला, "आणखी एक करता येईल. गळणाऱ्या जागेजवळची थोडी जागा मोकळी करून त्यात वितळलेलं डांबर भरायचं. अर्थात ही तात्पुरती व्यवस्था झाली. पुन्हा उन्हाळ्यात डांबर वितळून जाईल, पण पाच-सातशे रुपयांत काम होईल आणि

घरालाही डिस्टेंपरऐवजी प्रायमर देऊ. हजारात काम होईल.”

ती काही क्षण विचारात पडली. नंतर म्हणाली, “तूर्त फक्त डांबराचं तेवढं काम करून घेऊ. दोन-तीन महिन्यांनंतर प्रायमरचं बघू.”

एका मेस्त्रीला सोबत घेऊन सोमशेखर तिच्या घरी आला. स्वत: छतावर चढून, सगळी पाहणी करून, त्याला योग्य त्या सूचना देऊन तत्परतेनं त्यानं ते काम पूर्ण करून दिलं. कधी काळी ऐश्वर्यानं बहरलेला आणि आता उतरती कळा आलेला हा संसार असल्याचं त्याच्याही लक्षात आलं होतं. काम पूर्ण झाल्यावर तिनं आग्रह धरला, “किरकोळ काम असतानाही आपण स्वत: लक्ष घालून पूर्ण करून दिलं! आपली फी? कृपा करून सांगितलं तर बरं होईल.”

“काम मोठं असेल, तर फी किंवा परसेंटेजचा प्रश्न येतो. एवढ्याशा कामाचे काय घ्यायचे? काही नको. ” म्हणत तो तिथून निसटला.

सात आणि चार वर्षांच्या दोन मुलांची आई. गोल चेहरा, भरपूर उंची, सुंदर म्हणता येईल असं व्यक्तिमत्त्व. कॉलेजमध्ये कन्नड साहित्याची व्याख्याती. डॉक्टरेटनं सन्मानित झालेल्या बुद्धीची चमक दर्शवणारे तेजस्वी डोळे. संसाराची सगळी जबाबदारी तीच पेलत असल्याचं सोमशेखरच्या लक्षात आलं होतं. तिचे मिस्टर कुठं असतात, काय काम करतात या विषयी त्याला थोडं कुतूहल असलं, तरी तिनं कधीच तो विषय काढला नव्हता. त्यामुळे त्या संदर्भात सोमशेखरंनही काही विचारायचा प्रश्नच नव्हता. एकदा दुरुस्तीचं काम झाल्यावर नंतर कुठल्याही प्रकारचा संबंध राहायचीही शक्यता नाही, असा विचार करून त्यानंही आपण होऊन त्या विषयी विचारलं नव्हतं. तरीही अधूनमधून त्याला तिची आठवण येत राहिली. फक्त तिची नव्हे, तिच्या त्या घराचीही! वास्तुशास्त्राच्या दृष्टीनं विशेष असं काहीही नसलेल्या त्या घराची वरचेवर का आठवण यावी, याचाही त्यानं अनेकवार विचार केला. एक दिवस अचानक उलगडा झाला. इतर कुठलीही वैशिष्ट्यं नसलेल्या मद्रासी छताच्या त्या बैठ्या घराच्या पार्श्वभागी असलेली चामुंडी टेकडी फारशी हिरवळ नसलेल्या स्वत:च्या गूढ व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव या घरावर टाकत होती, असं त्याला तीव्रपणे वाटलं. गूढ निळ्या आकाशात घुसणारी ती टेकडी मनात वेगळीच भावना तयार करत असल्याचा अनुभव त्यानंही घेतला होता. ‘अशा भव्य दृश्याची पार्श्वभूमी लाभलेल्या या वास्तूला आणखी वैशिष्ट्यं कशाला हवीत?’

चामुंडी टेकडीच्या पायथ्याशी असलेला तो भव्य बंगला आठवत असताना सोमशेखरच्या मनात मुंबईचे नीरस दिवस तरळून गेल्याशिवाय राहत नसत. त्या सैताननगरीत स्वत:चं अस्तित्व असलेलं असं एकांडं उजाड घर आणि अशी विस्तीर्ण जागा शोधूनही सापडणं कठीण होतं, याची त्याला कल्पना होती. तिथल्या त्या पंधरा-वीस-पंचवीस मजली व्यक्तिमत्त्वहीन वास्तू! अशा गावात आर्किटेक्टची बुद्धी अमेरिकेतली अद्यावत सामग्री वापरून आणखी मजले कसे वाढवता येतील यासाठीच वापरली जायची.

मुंबईमधलं वास्तव्य आणि तिथली कामं यांचा पराकोटीचा कंटाळा आल्यामुळे मुंबईमधल्या दहा वर्षांच्या व्यवसायाची फिकीर न करता तो मैसूरला आला होता. अलीकडे मैसूरही पहिल्यासारखं राहिलं नसलं, तरी मान वर केली, तर विस्तीर्ण निळं आकाश दिसू शकतं हा अनुभव तो घेत होता. जुना कुक्कुरहळ्ळीचा तलाव तर तसाच होता. हिरवी झाडी कमी झाली

असली, तरी गावानं अजून चामुंडी टेकडीचा घास घेतला नव्हता. अशा या गावात छोटी-छोटी का होईना, पण स्वतंत्र व्यक्तिमत्त्वं असलेली घरं बांधता येतील अशी त्याची अपेक्षा होती.

या गावी येताना आपली आणखीही अपेक्षा पूर्ण होईल याची त्याला खात्री होती. सकाळी-संध्याकाळी मनात येईल तेव्हा एकट्यानं टेकडीवर चढून जाणं, तिथून सभोवताली नजर फिरवून ताठ उन्मत्ततेपेक्षा सौम्य नम्रतेनं नतमस्तक होऊन पसरलेलं मैसूर शहर नजरेत साठवून शरीरावरचा घाम सुकल्यावर निवान्तपणे पुन्हा माघारी येणं सहज शक्य होतं. लहानपणी मनावर ठसलेल्या लाल-शुभ्र मैसूर शहराच्या या विहंगम दृश्याच्या ओढीनं गावी आल्याआल्या तो अनेक वेळा हातातली सगळी कामं टाकून तिथं जात होता. आताही त्या दृश्याची त्याला आठवण झाली. पाठोपाठ वाटलं, 'यानंतर टेकडीवर जाईन तेव्हा ते पायथ्याशी असलेलं, नुकतंच दुरुस्त केलेलं घर बघायला पाहिजे.'

एक दिवस... त्या दिवशी सोमवार होता. संध्याकाळी चार वाजता ऑफिसमध्ये तिचा फोन आला, "तुमचा वेळ मी व्यर्थ घालवतेय याची मला कल्पना आहे; पण मलाही तुमच्या ऋणातून थोडं मुक्त झाल्यासारखं वाटेल. येत्या रविवारी संध्याकाळी तुम्ही आमच्या घरी चहा-फराळाला यायला पाहिजे. नाही म्हणू नका."

तिचा आवाज आणि निमंत्रण यामुळे त्याला थोडं समाधान वाटलं. त्याने कुठलीही फी न घेतल्यामुळे तिनं हे चहा-फराळाचं निमंत्रण दिल्याचं त्याच्या लक्षात आलं. नुकताच पावसाळ्याचा पहिला पाऊस पडून गेल्याचं त्याला आठवलं. दुरुस्तीच्या जागी पाणी गळलं नसल्यानं तिनं हे निमंत्रण दिलं असेल असंही वाटलं. त्यानं आपण होऊन विचारलं, "परवा पावसात घर गळलं? पाणी झिरपलं?"

"खरं संगायचं तर एवढ्याशा उपायानं पाणी झिरपायचं एवढं बंद होईल असं मला मुळीच वाटलं नव्हतं. एक थेंबही आत झिरपला नाही. तुमचे कसे आभार मानायचे हेच मला कळत नाही. रविवारी मात्र नक्की या. वाट बघते."

एकाएकी त्याला संकोच वाटला. तो म्हणाला, "कशाला उगाच त्रास घेता?" त्यानं कितीही टाळायचा प्रयत्न केला, तरी त्यानं यायला होकार देईपर्यंत तिनं फोन खाली ठेवला नाही.

रिसीव्हर ठेवताना त्यालाही आणखी सहा दिवसांनी तिच्या घरात, तिच्या पुढ्यात बसून तासभर गप्पा मारता येतील या विचारानं उल्हास वाटला. मनात एक प्रकारची उत्सुकता निर्माण झाली. फुरसतीच्या क्षणी तो याच विचारात रमत होता; पण बुधवारी संध्याकाळी त्याच्या मनात संकोच निर्माण झाला. काहीतरी निमित्त सांगून तिच्या घरी जाणं टाळलं पाहिजे असं वाटू लागलं. असं का वाटावं याचा त्यानं विचार केला, तरी त्यामागचं कारण त्याला समजलं नाही. 'रविवारचं निमंत्रण स्वीकारलं तर काय बिघडणार आहे?' या प्रश्नाचं त्याच्या मनानं समाधानकारक उत्तर दिलं नसलं, तरी तिच्या घरी जाऊ नये हा विचार मात्र प्रबळ होऊ लागला. दुसऱ्या दिवशीच त्याला एक निमित्तही मिळालं. विराजपेटेच्या बोमण्णा नावाच्या गृहस्थांचं त्यांच्या कॉफीच्या मळ्यात घर बंधायचं काम होतं. हा प्रस्ताव येताच त्यानं जाणूनबुजूनच साइटच्या पाहणीचं काम रविवारी ठरवलं. शनिवारी आपण येत असल्याचं

सांगून त्यानं बोमण्णंचा निरोप घेतला. त्याचबरोबर आपण कामाच्या संदर्भात परगावी जात असल्यामुळे रविवारी चहासाठी येत नसल्याचं कळवणारं एक कार्ड लिहून ते शनिवारी तिला पोहोचेल अशा रीतीनं त्यानं पोस्ट केलं. पण रविवारी कावेरी इस्टेटमध्ये बोमण्णांच्या घराची जागा, जमीन, पार्श्वभूमी वगैरे गोष्टींचं निरीक्षण करताना आणि नियोजित इमारतीची लांबी-रुंदी आखताना त्याच्या मनात येत होतं, 'तिनं एवढ्या विश्वासानं दिलेल्या निमंत्रणाचा अव्हेर करून मी काय साधलं? आज तिच्या घरी चहा घेऊन उद्या हे काम केलं असतं तर काय बिघडलं असतं?' या विचारासरशी त्याचं मन म्लान झालं. संध्याकाळी तिथून निघतानाही घड्याळाकडे लक्ष जाताच 'खरंतर या वेळी तिच्या घरी निवान्त गप्पा मारत बसलो असतो.' असं वाटल्याशिवाय राहिलं नाही.

मैसूरला परतूनही एक आठवडा झाला. कामाच्या बोजाखाली त्याला तिचा जवळजवळ विसर पडला होता. विराजपेटेतल्या कॉफीच्या मळ्यात उभारायच्या छोट्या, टुमदार घराच्या कल्पनेत तो पूर्णपणे बुडून गेला होता. सोमवारी दुपारी फोन वाजला. त्याचे सहायक नीळकंठप्पा जेवायला गेले होते. ते आल्यानंतर जेवायला जायची सोमशेखरची नेहमीची पद्धत होती.

त्यानं रिसीव्हर उचलताच पलीकडून तिनं विचारलं, "मिस्टर सोमशेखर?"

"होय, नमस्कार!"

"मी डॉक्टर अमृता बोलतेय. घराच्या दुरुस्तीचे पैसे आपण अजून नेले नाहीत. कसे पाठवू? मी स्वत: येऊन कॅश द्यायला पाहिजे की चेक पाठवला तर चालेल? आपण हिशेब करून ठेवलाय ना?"

"कसले पैसे? ते काही विशेष काम नव्हतं. एवढ्याशा कामाचे पैसे नकोत म्हणून त्याच वेळी मी तुम्हाला सांगितलं होतं." तो आश्चर्यचकित होऊन म्हणाला.

क्षणभर स्तब्धतेत गेला. ती पुढं म्हणाली, "हे पाहा, काम लहान असो वा मोठं असो, फी देणं माझं कर्तव्य आहे. मित्र असेल तर गोष्ट वेगळी."

"तर मग मला मित्र समजा मॅडम!"

"बोलवूनही कपभर कॉफी आणि घासभर खाणं सोबत न घेण्याइतका अहंकार असलेल्याबरोबर मैत्री कशी समजायची?"

स्वत:ला सावरत तो म्हणाला, "मला तातडीच्या कामासाठी अचानक जावं लागलं."

"होय, विराजपेटेला जावं लागलं; पण ते काम एखादा दिवस पुढं ढकलण्यासारखं होतं. तेही जाऊ द्या; पण हीच गोष्ट मला फोन करून सांगता आली असती की नाही? त्याऐवजी 'आपला काही संबंध नाही. यानंतर राहण्याचा प्रश्नच नाही.' अशा थाटात एक कार्ड पाठवून निघून गेलात, तर माणसानं समजायचं तरी काय?"

ती बोलायची थांबली. 'आपलं चुकलंच' या भावनेत तो पूर्णपणे बुडून गेला. काय उत्तर देऊन स्वत:ची सुटका करून घ्यावी हे त्याला सुचत नव्हतं. ती पलीकडे आपल्या उत्तराची वाट बघत आहे, या विचारानं तो पराकोटीचा अस्वस्थ झाला होता. पुढं तीच म्हणाली, "तुमचं कार्ड वाचताना मला काय वाटत राहिलं सांगू? मला वाटलं, प्रचंड आर्थिक अडचणींमध्ये मी सापडल्यामुळे माझ्या गळणाऱ्या घराची दुरुस्ती करायची ऐपत माझ्यात नाही... म्हणून तुम्ही मला मदत केलीये! मी कृतज्ञता दाखवण्यासाठी कॉफी प्यायला बोलावलं, तर नाकारून तुम्ही तिरस्कार दाखवताहात!"

"छे:! मॅडम, कृपा करून गैरसमज करून घेऊ नका. तसं काहीही माझ्या मनात नव्हतं. एक दिवस मी स्वत:हून तुमच्या घरी येईन. हवं तर जेवायलाच येईन. मग तर झालं की नाही?" त्यानं क्षमेच्या सुरात विचारलं.

"ठीक आहे. तर मग उद्या दुपारी एक वाजता जेवायला या. वाट बघते."

तिचं निमंत्रण त्यानं जास्त विचार न करता मान्य केलं. विराजपेटेच्या कामाचं निमित्त करून त्याने जाणूनबुजून तिच्या घरी जायचं टाळलं होतं, हे तिच्या लक्षात आल्याचं त्यालाही जाणवलं होतं. 'आपण असं करायला नको होतं.' असं त्याला तीव्रपणे वाटू लागलं. त्याच्या या वागण्यामुळे तो तिच्या आर्थिक परिस्थितीवर दया दाखवत असल्याचा गैरसमज तिनं करून घेतल्यामुळे तो मनोमन खजील झाला होता. आणखीही एक गोष्ट त्याला जाणवली. 'तिच्या आवाजात मनमोकळा स्नेह आहे. तो अकारण नाकारण्यात काय अर्थ आहे? या गावात आपल्याला तरी कोण मित्र आहे?' या विचारासरशी त्याचं मन हलकं झालं. एखाद्या ढगाप्रमाणे ते पिंजून संपूर्ण आकाश कापत असल्याचा त्याला अनुभव आला.

दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे तो तिच्या घरी जेवायला गेला. गावाबाहेर, विरळ वस्ती असलेल्या भागात चामुंडी टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या त्या जुन्या भव्य बंगल्याच्या दाराशी ती त्याची वाट बघत उभी होती. स्कूटर स्टँडवर चढवून हेल्मेट घेत तो दाराशी आला तेव्हा बाहेरच्या व्हरांड्यात लटकलेल्या जुन्या-पुराण्या घड्याळाचा एकचा टोला पडला. "या! आत या." म्हणत तिनं हसतमुखानं स्वागत केलं. तो आत आला. लाउंज म्हणता येईल अशा जागी ठेवलेल्या भल्यामोठ्या, पण जागोजागी फाटलेल्या सोफ्यावर तिनं त्याला बसायला सांगितलं.

"आज कॉलेज नाही?" त्यानं बोलायला सुरुवात केली.

"सकाळी साडेसात ते साडेअकरापर्यंत कॉलेज असतं. आमची आर्ट्स साइड ना! आमच्या कॉलेजची स्वतंत्र इमारत होईपर्यंत हे असंच चालणार. मी पावणेबाराच्या आत घरीही येऊन पोहोचते." तीही समोरच्या सोफ्यावर बसत म्हणाली.

"तुमचा विषय कन्नड साहित्य ना? मैसूरला असेपर्यंत मीही कन्नड कादंबऱ्या वाचत होतो. कविताही गुणगुणत होतो. मुंबईला गेल्यावर मात्र त्यात खंड पडला. तुम्ही अधूनमधून पुस्तकं वाचायला दिलीत, तर पुन्हा सुरू करेन. मी मुंबई सोडून इथं येण्यामागं एक कारण हेही होतं." त्यानं तोच विषय आणखी वाढवला.

अर्धा-एक तास मनमोकळ्या गप्पा झाल्यावर ती त्याला आत घेऊन गेली. भल्यामोठ्या जुन्या डायनिंग टेबलावर तिनं दोघांचीही ताटं मंडली होती. घरी आणखी कुणीच नव्हतं. 'दोन्ही मुलं शाळेत गेली असावीत.' सार-भात, भाजी आणि फ्रुटसॅलड असा बेत होता. आग्रह करकरून ती त्याला वाढत होती. त्यानं नको म्हणून आडवा हात धरला, तरी त्या हातावर वाढायची भीती दाखवत तिनं पुन्हा पुन्हा त्याची फ्रुटसॅलडची वाटी भरली.

जेवण झाल्यावर दोघंही बाहेर येऊन पुन्हा एकमेकांसमोरच्या सोफ्यांवर बसले. तिच्या वेणीतल्या जुईच्या गजऱ्याचा मंद सुगंध त्याच्या नाकाला वेढत होता. तिच्या लक्षात येणार नाही अशा रीतीनं त्यानं खोल श्वास घेत त्या सुगंधाचा आनंद घेतला. जुईचा वास तिला आवडतो, हे याआधीच त्याच्या लक्षात आल्याचं त्याला आठवलं. 'रंगाच्या बाबतीतही हिची आवड सौम्य दिसते. हिच्या अंगावरच्या साड्यांचे रंगही असेच सौम्य असतात. तमिळांचा लालबुंद किंवा पंजाब्यांचा भडक गुलबक्षी रंग हिला आवडणार नाही.' असंही त्याला वाटलं. फारसा मागचा-पुढचा विचार न करता त्यानं विचारलं, "मोगऱ्यापेक्षा तुम्हाला जुई आवडते असं दिसतंय. वास अधिक नाजूक असतो म्हणून?"

आपण माळत असलेल्या गजऱ्याविषयी तो एवढी आठवण ठेवत असल्याचं जाणवून तिचा चेहरा लाल झाला. त्याचं बोलणं मात्र सर्वसाधारण गप्पांप्रमाणेच होतं. तो पुढं म्हणाला, "घरं बांधण्याचा प्रस्ताव घेऊन माणसं येत असतात, त्यांच्यावरून अभिरुचीची थोडीफार कल्पना आहे म्हणून म्हणतोय मी. सुशिक्षित लोकांना फिके रंग आवडतात. नाजूक, सूक्ष्म सुगंधाची त्यांना आवड असते. इतरांचं तसं नसतं. त्यांना सगळंच तीव्र आणि भडक हवं असतं. वास, रंग, चव... सगळ्याच बाबतीत! नाक, डोळे, जीभ यांना एकदम झटका देणारी आवड असणं हे अशिक्षितांचं लक्षण! मघाशी जेवतानाही मला हा अनुभव आला. संपन्न अभिरुची असल्याशिवाय हे शक्य नाही."

त्यानं पुन्हा आपलं कौतुक केल्याचं ऐकून ती पुन्हा शरमून गेली. मनात कुठंतरी बरंही वाटलं. ती म्हणाली, "तुम्हालाही भडक रंग, उग्र सुगंध आणि झणझणीत चव आवडत नाही वाटतं! म्हणून तुम्हाला याचं विशेष वाटतंय!"

"म्हणजे आपली दोघांची वेव्हलेंग्थ जुळते म्हणायला हरकत नाही." तो मोठ्या उत्साहानं म्हणाला.

साडेचार वाजेपर्यंत त्यांच्या गप्पा चालल्या होत्या. त्या गप्पांच्या ओघात तो म्हणाला, "या तुमच्या घराला टेकडीची पार्श्वभूमी छान मिळाली आहे. भोवताली थोडीफार झाडं लावली आणि गेटपाशी जुईचा वेल लावला, तर घराला आणखी शोभा येईल. घराच्या जवळपास फुलझाडं असली की, वातावरण प्रसन्न राहतं. सरकारी नर्सरीत वेगवेगळी रोपं आणि बियाही मिळतील तुम्हाला. नुकताच पावसाळा सुरू होतोय. आता लावली, तर रोपंही लागतील."

तिलाही ही कल्पना मनापासून पटली. त्यामुळे त्याची सूचना मान्य करत ती म्हणाली, "मीही मलेनाडची – डोंगराळ भागातलीच आहे. इस्टेटवर वाढलेली आहे. हिरवी झाडं म्हणजे माझाही जीव की प्राण!"

त्याची निघायची वेळ झाल्यावर तिनं एका खोलीतून दोन कादंबऱ्या आणि एक-दोन काव्यसंग्रह आणून दिले आणि सांगितलं, “सावकाश आणून दिली तरी हरकत नाही. मला एवढ्यात ती लागणार नाहीत. ही वाचून झाल्यावर आणखीही देईन.”

कामाची गर्दी असल्यामुळे कादंबऱ्या वाचायला त्याला जमलं नाही, पण सवड मिळेल तेव्हा त्यानं चार-सहा कविता मात्र वाचून काढल्या. तिचं घर, मागची टेकडीची पार्श्वभूमी आणि सभोवतालचा परिसर या सगळ्याचा विचार करून शोभणारी रोपं, झाडं, बिया मिळवून त्यानं तिला आणून दिल्या. त्याच्या सूचनेप्रमाणे तिनं मोठ्या श्रद्धेने रोपं लावली. पोर्चवर जाळी चढवून त्यावर वाढणाऱ्या जुईच्या वेलाच्या फांद्या गुंतवताना आणि पाणी घालताना तिला आपल्या आवडी-निवडीशी असलेलं त्याच्या आवडी-निवडीचं साम्य आठवल्याशिवाय राहत नव्हतं.

त्या महिन्याभरात अशा विविध निमित्तांनी त्यांची परस्परांशी पंधरा वेळा तरी भेट झाली. दोन वेळा दोघंही तिच्या गाडीनं ढगांनी भरलेल्या चामुंडी टेकडीवर जाऊन आले. ढग, आकाश, हिरवळ, अथांग क्षितिज, कल्पना विस्तारणारं निरीक्षण यातून त्या दोघांमधला स्नेह बराच रुजला होता. या स्नेहामध्ये सलगीच्या पलीकडची वेगळीच भावना असल्याचा अनुभव येताच सोमशेखर गडबडून गेला. एवढं जवळ जाण्यात आपण चूक करत आहोत असं वाटून माघारी फिरायचा विचारही त्याच्या मनात प्रबळ होऊ लागला.

बोमण्णांचा कॉफी-फार्ममधला छोटा बंगला आणि मैसूरमधल्या आणखी एका घराचं काम यामध्ये त्याची बुद्धी गढून गेली असली, तरी मन मात्र तिच्यामध्ये अडकून पडल्याचा त्याला अनुभव येत होता. त्याहीपेक्षा जास्त प्रेम तिच्या मनात निर्माण झाल्याची ग्वाही त्याची बुद्धी देत होती. ती सत्य असल्याचा निर्वाळा त्याच्या मागच्या अनुभवांच्या आठवणींतून मिळत होता आणि त्या आठवणीच त्याला त्या मार्गात मागं खेचू पाहत होत्या. मन मात्र हे सारं नाकारून त्याच मधुर भावनेत गुंतून राहू पाहत होतं.

याचा परिणाम त्याच्या वागण्यावरही होत होता. तिला भेटायची इच्छा आतून उसळत असली, तरी प्रत्यक्ष पाऊल उचलताना मात्र तो माघार घेत होता. समोर फोन असला, तरी तिला फोन करायची त्याची तयारी नव्हती. प्रत्यक्ष स्कूटरवरून तिच्या घरीच का जाऊ नये असा मनानं हट्ट केला, तरी कारण न देता तो त्यात मोडता घालत होता.

त्या दिवशी दुपारी अडीच वाजता त्याच्या ऑफिसमधला फोन वाजला. तिचाच फोन! मनानं ग्वाही दिली. उल्हसित मनानं त्यानं रिसीव्हर उचलला.

त्याचा अंदाज खरा होता. ती म्हणाली, “हे पाहा, तुम्ही आपण होऊन आमच्या घरी यायचं जाणीवपूर्वक बंद केलंय हे मलाही समजलंय. विश्वास कधी मागून मिळत नाही आणि तसा मिळाला, तरी त्याला काही अर्थ नसतो. आता मी फोन केलाय तो वेगळ्याच कारणासाठी. आमच्या गेटपाशी आतल्या बाजूला आणि मागच्या दारापाशी कुत्र्यांची दोन जुनी घरं आहेत. तुम्हीही पाहिलीयेत ती. त्यांची दुरुस्ती करायचं काम आहे. गावाबाहेरचं मोठं घर, भोवताली झाडं-झुडपं... दोन लहान मुलांबरोबर एकटी राहते मी! रात्रीच्या वेळी झोप लागली असताना चोर-चिलटं आली, तर जाग येणं आवश्यक आहे म्हणून मी परवाच कुत्र्याची दोन पिल्लं

आणली आहेत. तुम्ही हे काम करून देणार असाल, तुमची इच्छा असेल, तर माझा फोन नंबर टिपून घ्या. जबरदस्ती म्हणून लिहून घेऊ नका.”

मधूनच लागट बोलून भांडण काढायची तिची पद्धत बघून तो अस्वस्थ झाला होता. तरीही तोडून टाकू नये म्हणून तो म्हणाला, “फोन नंबर आहे माझ्यापाशी. येतो मी अर्ध्या तासात.”

“थँक्स वगैरेचा औपचारिकपणा मी पाळणार नाही. आता तुमच्या घड्याळात अडीच... दोन एकतीस झाले आहेत ना?”

“होय.” म्हणत त्यानं रिसीव्हर खाली ठेवला. ‘एकंदरीत हे हट्टी आणि भांडखोर प्रकरण दिसतंय. पण एवढ्या दिवसांत कधी हा हट्टीपणा दिसून आला नव्हता. लागट बोलून भांडण काढायची वृत्तीही कधी दिसली नव्हती. जवळीक वाढेल तसे स्वभावाचे एकेक पैलू सामोरे येत आहेत. प्रेमामधलाच अत्यावश्यक अंश हा! तिच्या उत्साहाला मी उत्कट प्रतिसाद न दिल्यामुळे हताश भावनेतून निर्माण होणारा हा संताप तर नसेल? माझंही थोडं चुकलंच. एकदम सगळे संबंध तोडून मौन स्वीकारलं, तर तिनं तरी काय समजायचं?’ शांतपणे तिच्या वागण्याचा अर्थ लावत तो पुढचा विचार करू लागला.

‘इथून तिच्या घरी पोहोचायला बारा मिनिटं पुरेशी आहेत. आपण वेळेआधीच तिच्या घरी पोहोचलो, तर तिला निश्चितच आनंद होईल.’ साडेचारपर्यंत माघारी येत असल्याचं नीळकंठप्पांना सांगून त्यानं लगेच स्कूटर बाहेर काढली.

कुत्र्याच्या दोन्ही पिल्लांना बांधलेल्या साखळ्या हातात धरून गेटपाशी उभ्या असलेल्या अमृतानं त्याला खुणेनंच स्कूटर आत घ्यायला सांगितली. वयाच्या मानानं थोराड असलेली ती तिखट आल्सेशन कुत्र्याची पिल्लं जोरानं झेप घेत भुंकू लागली. तो आत आल्यावर तिनं गेट बंद केलं आणि कुत्र्यांना शांत करून, बांधून ठेवून ती आत आली. तो तिला म्हणाला, “सांगितलेल्या वेळेपेक्षा अर्धा तास लवकर आलोय.”

“मला ठाऊक होतं ते. म्हणूनच मी वेळेवर वाट बघत उभी होते.” मंद हसत विजयी मुद्रेनं ती म्हणाली. तो जवळ जाऊन कुत्र्याची पिल्लं पाहू लागला. चेहरे क्रूर असले, तरी ती लहान पिल्लं गोजिरवाणी दिसत होती. त्याला त्यांच्याविषयी प्रेम वाटलं, पण सवय नसताना हात लावला तर चावल्याशिवाय राहणार नाहीत हेही त्याला ठाऊक होतं.

पिल्लांना बांधून दोघंही लाउंजमध्ये आले. आता पिल्लांचं ओरडणं थांबलं होतं. तो सोफ्यावर नेहमीच्या जागेवर बसला. ती समोरच्या सोफ्याच्या लांबच्या टोकावर बसायला निघाली तेव्हा त्यानं सुचवलं, “इथंच बसा ना!”

“का? तिनं विचारलं.”

“जवळ बसलं, तर बोलायला सोयीचं होईल. उगाच मोठ्यानं बोलावं लागणार नाही.”

“बोलण्यासारखं आहे तरी काय?”

“म्हटलं तर डोंगराएवढं आहे.”

“– आणि नसेल तर?”

“पण....”

“मी ‘नाही’ असंच समजून चालले आहे.” म्हणत ती समोरच्या सोफ्यावरच बसली.

“इथं या. इकडं बसा बघू!” तो थोड्या जोरात म्हणाला.

“मला आज्ञा देऊ नका. माझ्यापुढं ते चालणार नाही!” ती ताडकन म्हणाली.

न राहवून तो उठला आणि सटकन त्यानं तिच्या दंडावर चापटी लगावली. तिची मान वर झाली. तिच्या डोळ्यांमध्ये संतापाचा अंगार फुलला होता. पुन्हा तिची मान खाली गेली. आपल्या हातून घडलेल्या त्या कृत्यामुळे तो शरमून गेला होता.

“सॉरी...” तो म्हणाला.

तिनं मान वर करून धगधगत्या दृष्टीनं त्याच्याकडे पाहिलं. तोही निश्चल होऊन पाहत राहिला. शांततेचा भंग करत तो पुनश्च म्हणाला, “सॉरी! क्षमा करा.”

क्षणार्धात तिचा हात उठला आणि वेगानं त्याच्या दंडावर बसला. तो तसाच अवाक होऊन उभा होता. तिचे डोळे पाण्यानं तुडुंब भरले होते. दुसऱ्याच क्षणी त्याच्या दंडावर मस्तक टेकवून ती हुंदके देऊन रडू लागली. त्यानं दुसऱ्या हातानं वेढून तिला गच्च धरून ठेवली.

त्याच्या शर्टाची बाही ओलीचिंब होईपर्यंत ती हुंदके देऊन रडत होती. हळूहळू ती शांत झाली. डोळे पुसून कोरडे करत ती म्हणाली, “तुम्ही ‘सॉरी... क्षमा करा’ म्हणालात म्हणून मला राग आला. यानंतर कधीही तसं म्हणायचं नाही!”

ती अजूनही त्याच्या कवेत होती. तिच्या पाठीवरून उतरलेल्या लांबसडक जाड वेणीच्या पेडांवर त्याची नजर खिळली होती. तिच्या वेणीतल्या जुईच्या गजऱ्याचा सुगंध त्याच्या नाकाला वेढून राहिला होता. कानापर्यंत येणारा तिचा मृदू, सुकुमार देह त्याच्या मनात एकरूप भाव निर्माण करत होता. या क्षणी एक शब्द जरी उच्चारला असता, तरी भरून आलेला भावनावेग फुटून जाईल म्हणून तोही मौनच होता.

थोड्या वेळानं शांत झाल्यावर हलकेच स्वत:ला त्याच्या मिठीतून सोडवून घेऊन ती स्वयंपाकघरात गेली. पाचेक मिनिटांत बाहेर आली तेव्हा तिचा चेहरा प्रसन्न होता. ती खोडकरपणे मंद हसत म्हणाली, “कुत्र्यांच्या घराचं दुरुस्तीचं ठरवायला बोलावलं, तर आमचे आर्किटेक्टसाहेब घराच्या मालकिणीशी गुंडगिरी करू लागले. तर मग कंप्लेंट कुठं करायची? ते जाऊ द्या. तुम्ही निदान टेप तरी आणलाय की नाही मोजमाप करायला?”

खिशातून टेप काढत तोही म्हणाला, “तो विसरून कसं चालेल? आमच्या संपूर्ण जीवनाचा

प्रश्न आहे.”

दुसऱ्याच दिवशी दुपारी दोन वाजता नीळकंठप्पा जेवायला गेल्यावर त्यानं तिचा नंबर फिरवला. तिनं रिसीव्हर उचलून ‘हॅलो’ म्हटलं.

“मी आहे. ओळख पटली? नाव सांगा बघू?”

“मी नाही संगणार? तुम्हीच सांगा.”

हे ऐकून तो सुखावला. ती पुढं म्हणाली, “काल फोन नंबर टिपून ठेवला होता वाटतं.”

“तसं नव्हे. तुम्ही घरात केव्हा असता हे मला ठाऊक नव्हतं. आताही तुम्ही कदाचित घरी नसाल, अशी माझी समजूत होती.”

“मग? निराशा झाली?”

“भांडखोर माणसांच्या हातात सापडल्यावर काय करणार?”

“आता यावर काहीच इलाज नाही. कारण सापडून कितीतरी दिवस झाले. आणि यानंतर सात जन्म यातून सुटका नाही. उगाच फोन करत बसण्यापेक्षा थेट इथं निघून या बघू!”

“नीळकंठप्पा जेवायला गेलेत. ते आल्यावर निघेन.”

“तर मग दोघांची पानं वाढून मी वाट पाहतेय. भूक आवरेनाशी झाली, तर भांडंभर लिंबू-पाणी घेईन. समजलं?”

तो तिच्या घरी पोहोचला. दोघं जेवायला बसले. फोनवरच्या थट्टामस्करीचा आता लवलेशही नव्हता. तो अस्वस्थ झाला. सार-भात, दही आणि भाजी जेवून, हात धुवून तो पुन्हा सोफ्यावर येऊन बसला. आतलं आवरून तीही बाहेर आली. तिनं विचारलं, “तुम्हाला इतर काम नसेल, तर आपण गाडीनं चामुंडी टेकडीवर जाऊ या? मुलांना आणायला अजून तीन तास आहेत.”

“आत्ता? या उन्हात?”

“टेकडीवर जायला संध्याकाळचं गार वारं किंवा रात्रीचं दुधासारखं चांदणंच कशाला पाहिजे? तुमच्या या सुखाच्या कल्पना मला मुळीच आवडत नाहीत.” ती पुढं म्हणाली, “मनात नसेल तर राहू द्या. तुम्हाला इथंही उकडत असेल, तर पंखा लावू काय?” म्हणत ती उठून रेग्युलेटरकडे वळली.

तिच्या बोलण्यामुळे अस्वस्थ झालेल्या सोमशेखरच्या चेहऱ्यावर मनातली अप्रसन्नता उमटली. हे लक्षात येऊन तीही संकोचून गेली. रेग्युलेटरवर दृष्टी रोखून तिनं काही क्षण त्याच्याकडे पाहायचं टाळलं. नंतर त्याच्याजवळ येऊन ती म्हणाली, “सॉरी! मला क्षमा करा.

तुम्ही मला पाहिजे तर मारा. माझं चुकलं. तुम्ही मला क्षमा मागायची संधी दिली नाहीत, तर मी मानही वर करू शकणार नाही! ”

तिच्या चेहऱ्यावर आपलं चुकल्याची भावना स्पष्ट दिसत होती. क्षमा-याचना स्पष्ट व्यक्त होत असलेली बघून त्याच्या चेहऱ्यावरची अप्रसन्नता नष्ट झाली. तो उठत म्हणाला, “चला, जाऊन येऊ या.”

“मी या उन्हातच का जाऊ या म्हणाले ठाऊक आहे? अशा उन्हात टेकडीवरून भोवताली पाहिलं की, एकूणएक सगळं उन्हात वितळतंय आणि काठ फुटून सगळीकडे पसरतंय असं वाटतं. त्यातही भरपूर उन्ह असेल, तर नीरवताही गोठल्यासारखी वाटते. तिन्ही संध्याकाळच्या किंवा रात्रीच्या चांदण्यातल्या दृश्यापेक्षा हे दृश्य कायम मनात घर करून राहतं. तुम्हाला कधी हा अनुभव आलाय की नाही कोण जाणे!”

त्यानंही आठवून पाहिलं. एकदा अशाच रणरणत्या उन्हात शिवगंगेवरून भोवताली बघताना आलेला अनुभव चुटपुटता आठवला. तिचं बोलणं पटून “खरंय! चला!” म्हणत तिच्या पाठीला स्पर्श करत तो निघाला. त्यांची गाडी बाहेर पडत असताना पिल्लं भुंकू लागली. गाडी गेटबाहेर आल्यावर त्यानं ते जड फाटक बंद केलं आणि डाव्या बाजूचं दार उघडून तो तिच्या शेजारी बसला. गाडी सुरू करता करता तिनं विचारलं, “तुम्ही ड्रायव्हिंग करता?”

“मुंबईमध्ये असताना करत होतो. आमच्या ऑफिसची कार होती. इथं आल्यावर मात्र स्टेअरिंग धरलं नाही हातात. तुमचं ड्रायव्हिंग मात्र अगदी स्मूथ आहे.”

त्याच्या तोंडून कौतुक ऐकून ती मंदपणे हसली आणि म्हणाली, “तुम्ही मला राग येऊ दिला नाही, तर माझं ड्रायव्हिंग स्मूथच राहील.”

गाडी घाट चढू लागली. तिचा चेहरा उत्साहानं निथळत होता. ती भरभरून बोलत होती. हातातलं स्टेअरिंग सांभाळत असतानाच त्याचं सभोवताली वेगवेगळ्या गोष्टींकडं लक्ष वेधत होती. मध्येच सांगत होती, “मी मलेनाडची. तिथल्या डोंगर-दऱ्यांपुढे आणि हिरव्यागार झाडीपुढं हे इथलं काहीच नाही. तरीही चढ चढण्यात आनंद आहेच! पाहिलंत? आपण किती वर येऊन पोहोचलो! या, इकडे डावीकडे पाहा. डावीकडे... तुम्ही उजवीकडे पाहताय....”

तो तिचं बोलणं ऐकत होता. तिच्या सूचनेप्रमाणे मान वळवत होता. बऱ्याच उंचावर गेल्यावर योग्य जागा बघून तिनं गाडी थांबवली. नंतर ती म्हणाली, “इथून डावीकडे बघा. आपण उंच उंच चढू लागतो तेव्हा खालचं दृश्य विशाल होऊ लागतं. आतून कुठलीतरी भावना आपल्याला खूप उंच उचलून धरते आहे असं वाटतं, नाही का? तुम्हाला नाही वाटत?”

बोलता बोलता गाडीचं इंजिन बंद करून, दार उघडून ती बाहेर पडली. तोही गाडीतून खाली उतरला. दोघंही थोड्या अंतरावर असलेल्या एका खडकावर उभं राहून समोर पसरलेला मैसूरचा पूर्वेकडचा भाग निवान्तपणे पाहू लागले. डोक्यावर सूर्य तळपत होता. त्याची किरणं भाजून काढत होती. तिला त्याची फिकीर दिसत नव्हती. ती समोरच्या विस्तीर्ण पठारावरच्या खडकांवरून उठणाऱ्या उन्हाच्या झळा एकटक बघत होती. एकाएकी ती म्हणाली, “या

उन्हाच्या झळांमुळे लवकरच हे खडक वितळून जातील असं नाही वाटत?"

"होय." तो म्हणाला.

"चलायचं?"

"चला." तो म्हणाला.

तिनं गाडी आणखी थोड्या अंतरावर नेली. एकाएकी गाडी थांबवून ती म्हणाली, "तिकडं बघा, मांत्रिकानं वेगवेगळ्या आकृती काढाव्यात असं दिसतंय ना हे दृश्य?"

भोवताली बघत तोही उत्साहानं म्हणाला, "होय! अगदी खरंय!"

"मी कितीतरी वेळा इथं येऊन गेले, पण असं कधीच जाणवलं नव्हतं." ती मनापासून म्हणाली. गाडीचं सुरू असलेलं इंजिन तिथली नीरवता भंग करत असल्याचं जाणवून तिनं तेही बंद केलं. कितीतरी वेळ ते दृश्य नजरेत साठवून तिनं पुन्हा गाडी सुरू केली. पुन्हा दोन्ही बाजूच्या बदलत्या दृश्यांकडे त्याचं लक्ष वेधत, लहान मुलीच्या उत्साहानं गप्पा मारत गाडी जात असतानाच थंडगार सावली असलेल्या झाडांच्या परिसरात ती आली; एकाएकी मौन झाली. तो म्हणाला, "इथं पाहा, किती गारवा होता."

तो काहीतरी न पटणारं सांगत आहे, असा तिचा चेहरा झाला. ती पुढं म्हणाली, "हे पाहा, तुम्हाला माझ्याबरोबर आमच्या कॉफीच्या मळ्यावर यायला हवं. तिथून जवळच जेनुकल नावाचा डोंगर आहे. आपण दोघांनी मिळून तो चढायचा. गाडीनं बिसिले घाट उतरून पुन्हा चढायचा. शृंगेरीच्या पलीकडे तुंगाचा डोंगर आहे. त्यावर चढून सगळीकडे बघायचं. मुळ्ळय्याच्या डोंगरावर चढायचं, केम्मणिन गुंडीवर जाऊन तिथंच आठ दिवस मुक्काम करायचा. तुम्ही खरोखरच याल माझ्याबरोबर?" गाडी थांबवत त्याच्याकडे पाहत तिनं मनापासून विचारलं.

आपला उजवा हात तिच्या डाव्या तळव्यावर ठेवत तोही उत्तरला, "हो. निश्चित येईन."

"पाहिलंत? एकच वेव्हलेंग्थ!" बोलता-बोलता तिनं जीभ चावली. तिनं गाडी थेट देवळापाशी नेऊन उभी केली. या वेळी देवळाचा दरवाजा बंद असणार, हे ठाऊक असलं, तरी तिनं तिथल्या दुकानातून फुलं, नारळ, उदबत्ती, हळद-कुंकू, फुलं वाहून पूजा केली. नारळ फोडला. उदबत्ती पेटवून ओवाळून ठेवली. भक्तिभावानं स्वत:भोवती प्रदक्षिणा घातल्यावर ती हात जोडून उभी राहिली. बराच वेळ ती तशीच हात जोडून उभी होती. नंतर तिनं चिमूटभर कुंकू घेऊन त्याच्या भुवयांमध्ये लावलं. त्यानंही डोळे मिटून तिला ते लावू दिलं. ती पुन्हा काही न समजून उभी राहिली. त्यालाही काही न कळल्यामुळे तोही मुकाट्यानं उभा राहिला होता. दोन मिनिटं, तीन-पाच मिनिटं असा किती वेळ गेला कोण जाणे?

एकाएकी तिचा चेहरा निखाऱ्यासारखा तप्त झाला आणि ती फाडकन म्हणाली, "छे:! आपण इथं आलो ते चुकलं!"

तो अस्वस्थ होऊन उभा राहिला. तिच्या मूडला एकाएकी काय झालं ते त्याला समजलं नाही. तीच पुढं म्हणाली, “चला निघू या. तुम्हाला तुमच्या ऑफिसमध्ये सोडते. तुमची स्कूटर आमच्या कंपाउंडमध्ये आहे ना? मग तिथं सोडते. स्कूटर घेऊन निघून जा.”

त्याची अस्वस्थता वाढली. तो म्हणाला, “काय झालं ते सांगितलं, तर चूक सुधारता येईल. उगाच संताप करून घेतला, तर काय समजणार?”

“कारणं सांगून, अर्ज देऊन ग्रँट मिळवायला मी काही भिक्षुक नाही.”

“तर मग मीही येणार नाही. जा तुम्ही. मी चालत येईन किंवा एखादी सिटी बस मिळेल.”

ती ताडताड निघून गेली. गाडी सुरू झाली, तरी तो जागचा हलला नाही. हळदी-कुंकू आणि पूजेच्या सामानाची टोपली तशीच पडून होती. फोडलेल्या नारळाचे तुकडे तसेच विखुरले होते.

तिच्या या विक्षिप्त वागण्याचा अर्थच त्याला समजत नव्हता. तिला एकाएकी त्याचा राग येतो आणि तो बघता-बघता आभाळाला पोहोचतो याचा त्यानं अनुभव घेतला होता. ‘अशा स्वभावाच्या व्यक्तीशी मैत्री सांभाळणं ही साधी गोष्ट नव्हे.’ असंही त्याच्या मनात येत होतं. पायऱ्यांवरून खाली उतरून खाली मैसूरला जावं असं त्याला वाटलं. आपले बूट तिच्या गाडीतच राहिल्याचं त्याला आठवलं. तरीही अनवाणी चालत जाऊन नीळकंठप्पांना स्कूटर आणायला पाठवून द्यायचं त्यानं ठरवलं; पण तरीही तो जागेवरून उठला नाही. कुठल्याशा अदृश्य शक्तीच्या तारांनी त्याला जखडून ठेवल्याचा अनुभव घेत तो तसाच बसून राहिला. जणू या तारा तोडून निघून गेलं असतं, तर सगळंच संपून गेलं असतं; पण अशा प्रकारे सारं तोडायला आतून कुणीतरी निकराचा विरोध करत असल्याचा त्याला अनुभव येत होता.

तो हळदी-कुंकवाची पुडी आणि फुला-फळांची टोपली असलेल्या जागी बसला. फुटलेल्या नारळावर माशा घोंघावत होत्या. त्यावर रुमाल पांघरून तो तसाच बसून राहिला.

असाच अर्धा तास गेला असावा.

ती तर निघून गेली होती. ‘आता आपण तरी इथं असं बसून काय करायचं?’ हा प्रश्न त्याला छळू लागला. तरीही उठून निघून जायचं मनोबल नष्ट झाल्याचा अनुभव त्याला येत होता. ‘असे कसे आपण या विचित्र परिस्थितीत सापडलो!’ असं वाटून त्याला स्वत:चा रागही येत होता. पँट घालून जमिनीवर एकाच बैठकीत बसून त्याची मान-पाठ अवघडून गेली होती. तरीही उठून निघून जायला त्याची क्रियाशक्ती त्याला साहाय्य करायला तयार नव्हती.

असाच आणखी काही वेळ गेला.

तिची गाडी माघारी आली. आता तिचा चेहरा पूर्ववत दिसत होता. त्याच्याजवळ येऊन ती म्हणाली, “कारण सांगितलं तर चूक समजेल. उगाच रागावून निघून गेलं तर काय समजणार हे तुमचं म्हणणं खरं आहे. मी शीघ्रकोपी आहे, हे तर एव्हाना तुम्ही जाणलंच आहे. एखादी गोष्ट सांगून-मागून मिळवण्यापेक्षा अंत:स्फुर्तीनं घडली, तरच त्यात आनंद आहे. खरं की नाही?”

ती आपण होऊन पुन्हा आली हे बघून त्याला नवं आश्वासन मिळाल्यासारखं झालं होतं. एवढा वेळ अनुभवलेली कासाविशी नष्ट झाल्यासारखं त्याला वाटलं. त्यानं विचारलं, "काय ते? सांगा तर!"

"मी तुमच्या कपाळावर कुंकू लावलं. तुम्हाला माझ्या कपाळावरही कुंकू लावायला सुचलं नाही?"

"सॉरी!" तो मनोमन शरमून गेला. त्यानं लगेच पुडीतलं चिमूटभर कुंकू तिच्या कपाळी लावलं. तिचा चेहरा लहान मुलीच्या प्रसन्नतेनं भरला होता. एका नव्या भावनेला साकार रूप लाभल्याचा अनुभव घेतानाच तो मनापासून म्हणाला, "सॉरी!"

"आता सॉरी म्हटलंत, तर मार बसेल."

ती हात उगारून म्हणाली. नंतर आवाज खाली आणून पुढे म्हणाली, "हे देऊळ आहे. सार्वजनिक जागा. चार लोक बघताहेत म्हणून तुमचा दंड आज वाचलाय!"

तिचं बोलणं ऐकून त्याचं मन आणखी हलकं झालं. दोघंही उठले. एकमेकांशी अक्षरही न बोलता तिथं विकायला असलेल्या शहाळ्यांच्या ढिगापाशी गेले. जीव थंडावला. पुन्हा गाडीकडे जाताना त्याचं लक्ष उजव्या हाताला फुलं विकत असलेल्या म्हातारीच्या टोपलीकडे गेलं. त्यात जुईचा गजरा दिसताच त्यानं हातभर लांबीचा गजरा विकत घेतला. तिचा चेहरा फुलून आला होता. त्याच्या हातातला गजरा तिनं प्रेमानं आपल्या हाती घेत म्हटलं, "अशी पाहिजे अंत:स्फूर्ती!"

ती गाडी सुरू करत असताना त्यानं तो गजरा तिच्या भरगच्च अंबाड्यावर माळला. काही क्षण ती डोळे मिटून तशीच बसून राहिली. एकदम ती म्हणाली, "आमचं घर दिसतंय त्या जागी जाऊ या?"

"मीही तेच म्हणणार होतो."

"खरं?" ती उत्सुकतेनं म्हणाली. दुसऱ्याच क्षणी तिनं थट्टा केली, "असं म्हटलं की, तुमचा वेव्हलेंग्थचा मुद्दा पटवून द्यायला सोपं जाईल तुम्हाला!"

ललितमहालाच्या दिशेला, टेकडीच्या उत्तरेला पूर्व-पश्चिम धावणाऱ्या रस्त्यावर तिनं एके ठिकाणी गाडी उभी केली. याच जागी यापूर्वीही आठ-दहा वेळा गाडी थांबवून ती आपलं घर पाहत राहिली होती. त्याआधीही कितीतरी वेळा येऊन समोर उत्तरेला पसरलेलं टुमदार मैसूर शहर, हिरवीगार शेतं, श्रीरंगपट्टण वगैरे पाहत उभं राहणं हा तिचा आवडता विरंगुळा होता. आपला एवढा जीव जडलेल्या या चामुंडी टेकडीच्या पायथ्याशी असलेलं आपलं वडिलोपार्जित घर बघून ती अभिमानानं फुलून येत होती.

गाडीतून उतरल्यावर तिनं गाडी लॉक केली. वळसा घेऊन त्याच्यापाशी येऊन म्हणाली, "तिथं... इथून तीसेक फुटांवर खालच्या बाजूला एक छान सपाट खडक आहे. इथून तो नीट दिसत नाही. त्या आंब्यांच्या झाडामागं... आपण तिथं जाऊ या? तिथून आमचं घर छान

व्यवस्थित दिसतं. बसायलाही फार छान जागा आहे ती.”

दोघंही दगड-काट्यांतून वाट करत, झुडपं-फांद्या बाजूला सारत उतरू लागले. खरोखरच ती छान जागा होती. आंब्यांच्या फांद्यांचं वरच्या बाजूला छतही छान झालं होतं. रस्त्याकडच्या बाजूला आपोआप आडोसा तयार झाला होता. तोही ती जागा पाहून उद्गारला, “वा! फारच छान जागा शोधून काढलीये तुम्ही!”

त्याच्या उजव्या हाताशी उभी राहत ती लहान मुलीच्या उत्साहानं म्हणाली, “आता इथून आमचं घर शोधा बघू? फक्त एक मिनिट वेळ देते. क्विक्!”

“तेच शोधतोय मीही... हं... ते पाहा तिथं.” त्यानं बोट करून दाखवलं.

“मला तुमची स्कूटर दिसते.” ती म्हणाली.

“माझ्यापेक्षा तुमची दृष्टी तीक्ष्ण असली, तरी एवढ्या उंचीवरून स्कूटर दिसणार नाही!” तिच्या चेहऱ्याकडे एकटक पाहत तो सावकाश म्हणाला, “आपण पुढच्या वेळी बायनाक्युलर आणू या. म्हणजे इथून तुमचं गेट उघडं राहिलंय की बंद केलंय यावरही नजर ठेवता येईल.”

ती त्या सपाट खडकावर बसली. तोही तिच्या शेजारी बसला. दोघांच्या दंडांचा एकमेकांना स्पर्श होत होता. जुईचा मंद नाजूक सुगंध त्याच्या नाकाशी लपंडाव खेळत होता. ते दोघं बसलेली जागा सोडली की, भोवताली ऊन रणरणत होतं. समोरचा उतार, त्यापुढे पसरलेला गाव आणि तो सगळाच भूप्रदेश त्या उन्हाच्या झळांमध्ये होरपळत होता. त्या दृश्यावर नजर खिळवून ती कितीतरी वेळ बसली होती. नंतर त्याच्याकडे वळून तिनं विचारलं, “उन्हाच्या झळांमध्ये सगळं जग वतिळत असताना तुम्हाला काय वाटतं?”

“यापेक्षा कितीतरी कडक ऊन मी पाहिलंय. नागपूर, औरंगाबाद, राजस्थान या ठिकाणी काम केलंय मी!”

“मी तुमचा अनुभव विचारला नाही. तुम्हाला काय वाटतं ते विचारतेय.”

“मन म्लानतेनं भरून जातं, असा माझा अनुभव आहे.”

“एक्झॅक्टली!” ती तत्काळ उद्गारली. आपला तळवा त्याच्या उजव्या मनगटावर ठेवून ती पुढं म्हणाली, “आपल्या मनातले विचारच दुसऱ्याच्या मनात येतात म्हटलं की, किती समाधान वाटतं म्हणून सांगू! एक प्रकारच्या सांत्वनानं मन भरून जातं. मला अशा वेळी काय वाटतं सांगू? हे सगळं जग, झाडं, वृक्ष, दरी, चंद्र, सूर्य, तारे, हे अथांग आकाश... सगळंकाही दु:खाच्या धगीत वितळून जातं आहे असं वाटतं.”

“हं! बुद्धाचा विचार हा!” तो चटकन म्हणाला.

त्याचं बोलणं ऐकून ती दुखावली. तिच्या आवाजातून ते व्यक्तही होत होतं, “बुद्धानं आधी सांगितलं म्हणून माझा अनुभव काही खोटा ठरत नाही. एवढा का तिरस्कार वाटतो तुम्हाला?”

“तिरस्कार? तसं नव्हे...” तिच्या हातातलं आपलं मनगट सोडवून घेऊन तिच्या हातावर हात ठेवत तो म्हणाला, “मला वाटलं, तुम्ही तत्त्वज्ञानासंबंधी बोलताहात. म्हणून म्हणालो मी.”

“मी कधीच इतरांच्या तत्त्वज्ञानाविषयी बोलत नाही. आजवर गाढा वेदान्त सांगणाऱ्या सगळ्यांना सामग्री म्हणून पुरेल एवढा दु:खाचा अनुभव माझ्यापाशी आहे!” आकाशाच्या शून्यातल्या धगीकडे अर्ध्या-उघड्या डोळ्यांनी बघत ती म्हणाली.

त्याच्या मनात तिच्याविषयी आणखी जवळीक वाटू लागली. त्याच भावनेत गुरफटत तोही त्याच आकाशात वितळणारा निळा रंग न्याहाळत बसला. तीही पूर्णपणे अंतर्मुख होऊन बसली होती. असाच काही वेळ गेल्यावर तिनं त्याच्या उजव्या हातावर आपला हात ठेवत म्हटलं, “मला वाटतं...”

“काय?”

“मला वाटतं, आपण दोघांनीही आपापल्या अंतरंगातलं सत्य एकमेकांना सांगायला पाहिजे. त्याशिवाय आपली मैत्री अशीच वाढू देणं योग्य नव्हे.”

“मला नीट समजलं नाही. अंतरंगातलं सत्य म्हणजे काय? आत्ता आपल्या मनात असलेली भावना?”

“ती आपल्या दोघांनाही ठाऊक आहे. त्याचा पुन्हा उच्चार करायची गरज नाही. एकमेकांपासून काहीही लपवून न ठेवता अंतर्मनातलं सगळं मोकळं करून सांगावं असं मला वाटतं. आधी मीच सांगते. आता मी म्हटलं, मोठमोठ्या वेदान्ताला सामग्री होईल एवढं दु:ख माझ्यापाशी आहे. ते सतत माझ्याबरोबर असणारं दु:ख हेच माझ्या अंतरंगातलं सत्य! जगण्यात काहीही अर्थ नाही. मरून गेलं, तर सगळ्या दु:खाचा अंत होईल असं कितीतरी वेळा वाटतं. म्हणजे केवळ विचाराच्या पातळीवरच वाटतं असं नाही. पूर्णपणे व्यापून टाकून खोल खेचणारी आणि बुडवून टाकणारी भावना!”

“पण असं का व्हावं?” त्याच्या आवाजात व्याकूळता भरून राहिली होती.

“ते मलाही ठाऊक नाही. शोधून पाहिलं तर काही किरकोळ कारणंही कदाचित सापडतील; पण तीही केवळ निमित्तंच! अर्थात त्या विषयी मी नंतर तुम्हाला सगळं संगेन, पण सगळं ऐकून ‘एवढी दु:खं जगात कितीतरी माणसांना असतात. तुम्ही ती एवढी का लावून घेता?’ असं म्हणून तुम्ही त्यांना क्षुल्लक लेखणार नाही, अशी हमी द्यायला हवी. ते जाऊ द्या. तुमच्या अंतरंगात खोलवर दडलेलं सत्य कोणतं?”

तो अंतर्मुख होऊन स्वत:कडे पाहण्यात गढून गेला. ‘अंतरंगातलं सत्य म्हणजे काय? शिक्षण? नोकरी? मुंबईमध्ये मित्राबरोबर केलेला स्वतंत्र व्यवसाय? की तिथला कंटाळा येऊन आपण मैसूरला निघून आलो ही घटना? पण यांसारख्या घटनांना किंवा घटनांच्या मालिकेला अंतरंगातलं सत्य कसं म्हणता येईल?’ विचारात दोलायमान झालेल्या सोमशेखरची दृष्टी समोरच्या दरीमध्ये दूरवर खिळली होती.

काही वेळ वाट बघून ती म्हणाली, “सांगायचं नसेल तर सांगू नका. कुठलीही गोष्ट जबरदस्तीनं होता कामा नये.”

त्याचा हात तिच्या नरम, उबदार पकडीत होता. तो म्हणाला, “मी विवाहित आहे. एक मूलही होतं. चार वर्षांपूर्वी बायको आणि मुलगा अकस्मात वारले.”

“मला ठाऊक आहे ते. हा सर्वसाधारण सगळ्यांनाच ठाऊक असलेला तपशील झाला.”

“कुणालाच ठाऊक नसलेली एक घटना माझ्या आयुष्यात आहे. माझा मित्र आणि बिझनेस पार्टनर शहालाही मी हे सांगितलेलं नाही. आता ते सांगावंसं वाटतं. मुंबईत असताना माझी एका स्त्रीशी मैत्री होती. माझी बायको जिवंत असतानाचे हे संबंध. आम्ही दोघं आठवड्यातून दोन वेळा पाच-सहा पाच-सहा तास एकान्तात काढत होतो. एकान्त म्हणजे घराची दारं-खिडक्या बंद करून निर्माण केलेला, मनमोकळा, देहसान्निध्यानं भरलेला एकान्त! अशा एकान्तात ती गझलांच्या ओळीच्या ओळी सांगून आपली प्रणय-भावना व्यक्त करीत होती. गझलांच्या कितीतरी मैफिली त्या वेळी आम्ही दोघांनी मिळून ऐकल्या. जीवन म्हणजे अशाच प्रणय-उन्मादाच्या लाटांवर तरंगत करायचा निरंतर प्रवास अशीच त्या वेळी माझी भावना होती. त्या दोन वर्षांमध्ये तिनं मला शारीरिक आणि मानसिक सुखात अखंड डुंबत ठेवलं. सुख म्हणजे मजा! त्यानंतर मात्र एकाएकी ते संबंध तुटून गेले.”

ही हकिकत ऐकत असताना आपल्या हातावरची तिची पकड घट्ट झाल्याचं त्याच्या लक्षात आलं नाही. एका अनाकलनीय भावनावेगात तो आपलं मन मोकळं करत होता.

“का?” शांत, परंतु भावनाहीन स्वरात तिनं विचारलं.

“एक दिवस संध्याकाळी सात-साडेसातच्या सुमारास मी त्यांच्या घरी गेलो होतो. पुढचा लोटलेला दरवाजा उघडून चप्पल काढत मी आत गेलो. ती संगीत शिकायची आणि रियाझसाठी तिच्याकडे साथीला तबलजी यायचा, हे मलाही ठाऊक होतं. आत गेलो तेव्हा तो तबलजी आणि ती एकमेकांच्या मिठीत होते. अर्थात फक्त मिठीत! व्हिस्कीचा वास आला. ते दृश्य पाहिलं आणि मी निघून आलो. त्या घटनेनंतर मी तिच्याकडं गेलो नाही आणि तिनंही माझ्याशी संपर्क साधायचा प्रयत्न केला नाही. तिनंही मला त्या वेळी पाहिलं होतं.”

“म्हणजे नाचवाली म्हणतात त्यांच्यापैकी होती ती?” हे विचारताना अमृतानं त्याचा हात पूर्णपणे सोडला होता.

“नाही. मद्रासी गृहिणी होती. असेल माझ्याच वयाची. म्हणजे त्या वेळी पस्तिशीच्या घरातली. अमेरिकेत तिचं शिक्षण झालं होतं. नवरा क्रेंद्र सरकारच्या नोकरीत खूप वरच्या हुद्यावर. तीन मुलांची आई होती ती. मुंबई कॉलेजमध्ये स्नातकोत्तर विभागात रीडर म्हणून नोकरीही करत होती.”

तिनं आणखी कुठलाही तपशील विचारला नाही. ती विचारेल त्या सगळ्या प्रश्नांना उत्तरं देऊन मन हलकं करायच्या मानसिक स्थितीत तो असला, तरी तिनं काहीही विचारलं नाही.

तिनं आपला हात सोडलेला बघून तिला त्याच्या विषयी नाराजी वाटली होती, हे त्याच्याही लक्षात आलं होतं. दोन आंब्यांखाली असलेल्या शांत नीरवतेपलीकडे असलेलं रणरणतं उन्ह दोघांना परस्परांपासून लांब नेत असल्याचा अनुभव घेत तो नि:शब्दपणे बसून राहिला. तीही त्याच्यापासून कित्येक कोस लांब असल्याप्रमाणे उन्हात बघत बसली होती. नि:शब्दतेचा भंग करत ती ताडकन उठून उभी राहिली आणि म्हणाली, "मी निघाले. यायचंय तर चला."

तो चकित झाला, वैतागला आणि म्हणाला, "तुम्हाला जायचं असेल, तर तुम्ही खुशाल जा."

तिनं धगधगत्या दृष्टीनं त्याच्याकडं पाहिलं. त्यानं तिच्याकडं पाहिलं नाही. तिची ती लायकीच नव्हती, असं वाटून तो जळणाऱ्या उन्हात एकटक पाहत राहिला. अर्ध्या क्षणात ती "बरं तर" म्हणत उठून उभी राहिली. अंबाड्यावरचा त्यानं माळलेला जुईचा गजरा तिनं दोन्ही हातांनी काढला आणि पलीकडच्या रणरणत्या उन्हात वितळू पाहत असलेल्या एका खडकावर भिरकावून दिला.

तो अवाक्षर बोलला नाही.

ती गर्रकन वळली आणि काटे-दगड-धोंडे-झुडपं कशाचीही फिकीर न करता ताडताड निघून गेली. चढ चढताना काट्यात अडकून साडी फाटल्याचा आवाज त्याच्या कानावर आला. गाडीचं दार धाडकन बंद करून गाडी निघून गेल्याचा आवाज त्याच्या कानावर आला, तरी त्यानं समोरच्या रणरणत्या दृश्यावरची नजर हलवली नाही.

'असली कसली बाई ही? हा काही फक्त संतापी स्वभाव नव्हे. यानंतर हिचं तोंडही बघता कामा नये. या असल्या स्त्रीकडं मी तरी कसा आकर्षित झालो?' त्याचं मन स्वत:ची निर्भर्त्सना करू लागलं. एकीकडं तो पराकोटीचा कष्टीही झाला. पाठोपाठ त्याला आठवलं – 'मी तर पहिल्यापासून हिच्यापासून दूर राहू पाहत होतो! तिनं आपण होऊन घरी बोलावलं म्हणून गेलो.' जुईचा गजरा तळपत्या उन्हात तापलेल्या दगडावर तिनं भिरकवल्याचं दृश्य आठवताच त्याच्या अंतर्मनात वेदनेची कळ उठली. काही वेळ तसाच गेल्यावर त्याच्या मनात प्रश्न उठला, 'तिनं तिरस्कार केला म्हणून आपल्याला दु:ख झालं? पण असं का व्हावं?' तो उत्तर शोधू लागला. बघता-बघता तिथं बसून राहणं अशक्य वाटावं एवढा कंटाळा त्याच्यावर चाल करून आला. इथून तिचं घर दिसत होतं. ती मघा दिसतेय म्हणून सांगत असलेली त्याची स्कूटर त्याच घराच्या कंपाउंडमध्ये होती. स्वत:चं मन ताळ्यावर आणत, झुडपं बाजूला सारत तो वर रस्त्यावर आला. तिथून रणरणत्या उन्हातून तीन-चार मैल चालत गेल्यावर त्याला गावात जाता येणार होतं. ऑफिसमध्ये गेल्यावर शक्य तितक्या लवकर आपली स्कूटर नीळकंठप्पांना पाठवून आणवून घ्यायचं ठरवल्यावर त्याला थोडं बरं वाटलं. सर्वांग भाजून काढणाऱ्या उन्हाच्या झळांमधून तो टेकडीच्या पायथ्याकडं जायला निघाला.

स्कूटर आणणाऱ्या नीळकंठप्पांनी सांगितलं, "सर, त्यांनी दोन कुत्र्याची पिल्लं पाळली आहेत. मला पाहताच ती अंगावर धावून आली. मॅडम आल्या आणि त्यांनी साखळी धरून मला स्कूटर न्यायला सांगितलं."

ती आणखी काही म्हणाली होती का, याची चौकशी करायचं त्याच्या मनात आलं होतं, तरी तो काही बोलला नाही. 'ती काही का म्हणेना, मला काय त्याचं!' – अशी मनाची समजूत घालत तो स्वत:ला कामात पूर्णपणे झोकून द्यायचा प्रयत्न करू लागला.

त्या रात्री त्याचा डोळ्याला डोळा लागला नाही. 'अशी घटना घडली असता मन अस्वस्थ होणं साहजिकच आहे.' असं मनाचं समाधान करत असतानाच अशा घटनेचा आपल्यावर एवढा परिणाम होऊ शकतो, याचं त्याला आश्चर्यही वाटत होतं. 'तिच्या घराच्या दुरुस्तीची कामं संपली. थोडाफार स्नेह वाढल्यामुळे थोड्याफार मनमोकळ्या गप्पा झाल्या असतील, पण एवढ्यावरून मी इतकं व्याकूळ व्हायचं कारण काय?' बुद्धीनं मनाची बरीच समजूत घालायचा प्रयत्न केला, तरी झोप त्याच्याकडं मुळीच फिरकली नाही.

दोन रात्री अशाच प्रकारे झोपेशिवाय गेल्या. तिसऱ्या दिवशी थोडा डोळा लागला. पहाटेपर्यंत गाढ झोप लागली. त्याच्या मनाला कितीतरी समाधान वाटलं. जाग आली तेव्हा मनही तरल झालं होतं. त्यानं स्वत:च्या मनाची समजूत घातली, 'तिनंच अंतरंगातलं सत्य सांगायचा आग्रह धरला. आजवर कधीही कुणालाही न सांगितलेलं आणि यानंतर कुणालाही समजायची शक्यता नसलेलं मी तरी तिला का सांगायला गेलो? पण खरं सांगायचं ठरवल्यावर हे लपवून ठेवणं म्हणजे फसवणूक ठरली नसती काय?' या प्रश्नानं त्याल थोडं बरं वाटलं असलं, तरी 'आजवर कुणालाच न सांगितलेली घटना तिला सांगायलाच पाहिजे असं आतून एवढ्या जोरात का आलं?' या प्रश्नानं तो स्वत:च आश्चर्यचकित झाला.

विराजपेटेच्या बोमण्णांच्या घराची योजना पक्की झाल्यात जमा होती. केवळ योजनाच नव्हे, संपूर्ण बांधकामाची जबाबदारी त्याच्यावर देण्यात आली होती. चामुंडी टेकडीवरून ती संतापानं निघून गेल्यावर आपल्या कामात मन गुंतवणं त्याला फारसं सोपं गेलं नव्हतं.

आठ-दहा दिवसांनंतर स्वत:ला सावरून पुन्हा आपल्या व्यवसायात गढून जाण्यात त्यानं बऱ्यापैकी यश मिळवलं. तरीही तिनं दर्शविलेल्या तिरस्काराचं दु:ख मनाच्या एका कोपऱ्यात ठसठसत होतं. रणरणत्या उन्हात अनवाणी चालत घरी येऊन वीस दिवस झाले होते. दुपारी दीड वाजता ऑफिसमधला त्याच्या टेबलावरचा फोन वाजला. रिसीव्हर उचलून तो "हॅलो" म्हणाला.

पलीकडून आवाज आला, "ही निर्लज्ज आहे, पुन्हा फोन करते असं समजू नका. तुम्ही का फोन केला नाही? माझा स्वभावच संतापी आहे आणि संतापाच्या भरात मला कसलाही विवेक राहत नाही, हे तुम्हाला ठाऊक नाही काय? तुम्ही नेहमी क्षमाशील राहायला पाहिजे, हे तुमच्या लक्षात आलं नाही काय?"

तिचा आवाज ऐकून हलकं झालेलं मन तिच्या बोलण्यामुळे पुन्हा संतापून उठलं. तो काहीच बोलला नाही. तिनं पुन्हा दोन-तीनदा "हॅलो" म्हटलं. त्यानं "एस् –" म्हटल्यावर ती पुढं म्हणाली, "तिथं कदाचित नीळकंठप्पा असतील. त्यामुळे तुम्हाला बोलणं शक्य नसेल; पण मला तुमच्याशी बोललंच पाहिजे. तुम्हाला आता घरी यायलाच पाहिजे. तुम्ही आला नाहीत, तर मी तुमच्या ऑफिसमध्ये येईन आणि सगळ्यांच्या समोर तुमचे पाय धरून बसेन. तुम्ही क्षमा करेपर्यंत मी सोडणार नाही. मग? येता ना? खूप खूप बोलायचंय. तुमची क्षमा

मागायचीये.”

ही नीळकंठप्पा जेवायला जायची वेळ होती, हे ठाऊक असूनही तिनं मुद्दाम या वेळी फोन केल्याचं त्यानं जाणलं होतं. त्यामुळे तो म्हणाला, “हे पाहा मॅडम, मी कामात आहे. हे ऑफिस आहे. इथं येऊन पाय धरायचा आणि सोडायचा सीन करायची गरज नाही. आता माझ्या मनात त्यातलं काहीही राहिलेलं नाही. गुडबाय!” म्हणत त्यानं रिसीव्हर ठेवून दिला; पण अर्ध्या मिनिटात पुन्हा रिंग वाजली. पुन्हा तीच बोलत होती, हे स्पष्ट होतं. बराच वेळ त्यानं घंटा वाजू दिली. रिसीव्हर उचलून ठेवायचा विचारही त्याच्या मनात आला; पण एकाएकी त्याचं मन वितळून पाणी-पाणी झालं. पुन्हा रिसीव्हर उचलून तो म्हणाला, “हॅलो!”

“मला शिक्षा करायचा तुम्हाला निश्चित अधिकार आहे, पण अशी उपेक्षा करू नका. तुम्ही इथं येईपर्यंत मी जेवणार नाही. जेवणच नव्हे, तुम्ही इथं येऊन माझी क्षमायाचना ऐकेपर्यंत मी पाणीही पिणार नाही. जिवाची मला कधीच काळजी नसते. तुम्हाला घाबरवण्यासाठी मी हे सांगत नाही. मनात जे आलं, ते सांगतेय मी!” एवढं सांगून तिनं रिसीव्हर ठेवून दिला.

त्यानं स्वत:ला आवरायचा प्रयत्न केला, तरी आपलं अंत:करण तळमळून गेल्याचा त्याला अनुभव आला. ‘यानंतर तिचा आणि आपला कसलाही संबंध नाही. त्यामुळे यानंतर तिच्या विषयी काही वाटायचाही प्रश्न नाही; पण तिला माझ्याशी बोलायचंय. तिला आपल्या विक्षिप्त वागण्याचा पश्चात्तापही झालाय. हे तिचं नाटक तर नसेल?’

नेहमीप्रमाणे नीळकंठप्पा जेवून आले. नंतर तो निघाला. त्याचा दुपारचा आहार म्हणजे दोन इडली किंवा दोन सँडविचेस, वर एक लोटाभर कॉफी. नेहमीच्या वेलकम हॉटेलला जाऊन यायचं ठरवून त्यानं स्कूटर बाहेर काढली. स्कूटरनं वेग घेताच तिला भेटून यावंसं त्याला प्रकर्षानं वाटलं. त्याची स्कूटर गावाबाहेरच्या ललितमहालाच्या दिशेने धावू लागली.

चामुंडी टेकडीचं निळसर हिरवं दर्शन होताच त्याचं मन हलकं झालं. ‘मनात कडवटपणा भरून त्यानंतर संबंध तोडण्यापेक्षा मैत्रीचे संबंध लाभले, तर जीवन सुसह्य होईल.’ असं त्याला वाटलं. आजवर त्यानं कुणाशीच असे संबंध तोडले नव्हते. अपवाद फक्त मुंबईच्या त्या स्त्रीचा! ‘आज तिची आठवणही किती परकी वाटते!’ असं त्याला वाटून गेलं.

उजव्या बाजूला टेकडी जवळ आली. वीस दिवसांपूर्वी तिच्याबरोबर बसलो होतो ती जागा इथून कशी दिसते, हे बघण्याचा मोह त्याच्या मनात निर्माण झाला. स्कूटर चालू असताना मान वळवून त्याने पाहिलं, तरी त्या जागेची ओळख त्याला पटली नाही. त्यानं स्कूटर थांबवून मान वर केली. तिथून दिसणाऱ्या रस्त्याच्या वीस-तीस फूट खालच्या बाजूला ती जागा असल्याचं जाणवून त्यानं पुन्हा त्या दृष्टीनं पाहिलं. आता मात्र हिरव्या झाडीनं लपलेली ती जागा तो ओळखू शकला. पाठोपाठ पुन्हा त्या दिवशीची सगळी घटना, तिचं बोलणं आणि विचित्र वागणं त्याला आठवलं. अजूनही इंजिन सुरू असलेली स्कूटर वळवून माघारी निघून जावंसं वाटू लागलं. पाठोपाठ वाटलं, ‘आज जाऊन आल्यावर या बाईशी बरा-वाईट कसलाही संपर्क ठेवायला नको.’

ती गेटपाशी उभी राहून त्याची वाट बघत होती. ‘म्हणजे आपण येणार या विषयी तिची

खात्री होती!' त्याप्रमाणे 'आपण आलो' या विचारानं त्याला संकोच वाटला. स्वत:ला हजार दूषणं देत असतानाच त्याचं तिच्याकडं लक्ष गेलं. ती रक्तहीन क्षीण आकृती पाहून त्याच्या मनात कणव निर्माण झाली. पाठोपाठ आणखीही एक गोष्ट त्याच्या लक्षात आली. गेटपाशी असलेलं कुत्र्याचं घर दुसऱ्या कुणाकडून तरी दुरुस्त करून घेण्यात आलं होतं. त्याचं मन दुखावल्याशिवाय राहिलं नाही. गेट बंद करून, त्याच्यापाशी येऊन, त्याचा हात धरून ती म्हणाली, "माझ्या शीघ्रकोपीपणाचं आणि अविचारीपणाचं प्रतीक म्हणून हे दुरुस्त केलेलं कुत्र्याचं घर मी राहू दिलंय. कितीतरी वेळा ते भुईसपाट करावंसं मनात येऊन गेलं, तरी मी ते केलेलं नाही. नाहीतरी केलेल्या चुकीची शिक्षा भोगायलाच पाहिजे ना!"

ती त्याला लाउंजमध्ये घेऊन गेली. तिथल्या सोफ्यावर त्याला बसवत स्वत: त्याच्या शेजारी बसून त्याचे दोन्ही हात हातात घेत ती म्हणाली, "माझा हट्टी स्वभाव तुम्हाला ठाऊक आहे. मी एका काँट्रॅक्टरला बोलावून, सिमेंट, सळया देऊन हे काम करून घेतलं. खरं सांगते, त्या वेळी मनात तुमच्याविषयी राग होता. राग ओसरल्यावर आता मात्र लाज वाटते. तुम्ही माझ्याकडे बघा बघू!'

तिनं त्याचा चेहरा स्वत:कडे वळवून घेतला. तिचे दोन्ही डोळे पाण्यानं तुडुंब भरले होते. त्यामुळे उजेडाचे किरण परावर्तित होत होते. पाठोपाठ ते अश्रू गालभर पसरले आणि तिचा चेहरा पांढऱ्या मातीच्या ओलसर गोळ्यासारखा होऊन गेला. त्यानं तिला जवळ घेऊन तिचा चेहरा छातीशी घट्ट धरला.

त्याच्या शेजारच्या खुर्चीवर बसून जेवताना तिनं आपण होऊन सांगितलं, "माझं चुकलं! मी तुमच्याशिवाय जगू शकणर नाही, ही जाणीव होऊन दहा दिवस झाले, पण एवढं वेड्यासारखं वागल्यावर पुन्हा आपण होऊन तुम्हाला बोलावण्याची शक्ती माझ्या अंगी तरी कुठून असणार? मनाला लागलेल्या टोचणीमुळे मी खरंतर मरूनच जायची. एका गोष्टीवर मात्र तुम्ही विश्वास ठेवा. मरणं म्हणजे माझ्या दृष्टीनं मुळीच कठीण नसलेली गोष्ट आहे. सगळ्या दु:खातून सुटका करणाऱ्या त्या मार्गाची मला पूर्ण कल्पना आहे. कधी ना कधी त्या मार्गावर झेप घेऊन मी सुटका करून घेईन. ते जाऊ द्या. गेले दहा दिवस मी जेवले नाही. भुकेनं जीव कासावीस झाला की, मूठभर पोहे भिजवून त्याला मीठ किंवा गूळही न लावता तशीच खात होते. वर एखादा कॉफीचा पेला. आज मात्र मनानं तुमच्याशी बोललंच पाहिजे असा हट्ट मांडलाय. म्हणून तुमच्यासाठी मी स्वयंपाक केलाय. तुम्ही आला नसता, तर हा सगळा स्वयंपाक... जाऊ द्या. तुम्हाला एवढ्या दिवसांत माझी एकदाही आठवण झाली नाही? या शनीनं सुरुवातीलाच आपला स्वभाव दाखवून दिला, असं वाटूनही आठवण झाली नाही?"

तो काहीच बोलला नाही. त्याचं लक्ष तिच्या बोलण्यातल्या 'मरण', 'सुटकेचा मार्ग' वगैरे मुद्यांवर केंद्रित झालं होतं. तिनं पुन्हा विचारलं, "तुम्हाला एकदाही माझी आठवण झाली नाही?"

त्यानंही तिला आपल्या मन:स्थितीविषयी सांगितलं. टेकडीवरून निघून आल्यानंतरची मनाची अस्वस्थता, कामात लक्ष एकाग्र न होणं, रात्र-रात्रभर झालेलं जागरण या विषयी ऐकत असताना तिचा चेहरा किंचित समाधानी दिसत होता.

जेवण झाल्यावर दोघंही पुन्हा लाउंजमध्ये सोफ्यावर येऊन बसले, तेव्हा त्याचे दोन्ही हात पकडून ती म्हणाली, “त्या दिवशी मी संतापून निघून आले. तुम्ही आपण होऊन एवढ्या प्रेमानं माळलेला गजरा मी फेकून दिला. त्या दिवसानंतर आजपर्यंत मी पुन्हा गजरा माळला नाही. तुम्ही आणून दिला, तर पुन्हा सुरुवात करीन की काय कोण जाणे! तुम्ही त्या दिवशी रणरणत्या उन्हात घरी कसे परतलात? तिकडं आणखी कुठलंही वाहन मिळत नाही, याचा विचार न करता तुम्हाला तिथंच सोडून मी निघून आले. त्या दिवशीचं माझं वागणं अति संतापामुळे घडलं, हे मी मान्य करते; पण त्यामागचं एखादं लहानसं का होईना, कारण असेल, हे तुम्हाला पटतं ना? मला एवढा राग का आला, याचा तुम्ही थोडातरी विचार केला काय?”

“आपलं प्रेम असलेल्या व्यक्तीचे दुसऱ्या कुणाशीतरी असे संबंध होते म्हटल्यावर राग येणं अगदी स्वाभाविक आहे. त्या व्यक्तीवरच्या आपल्या हक्काला यामुळे बाधा आली, असं वाटण्यातून आलेला हा राग असतो.” तो शांतपणे म्हणाला.

“तुमचं खरंय, पण केवळ एवढ्यासाठी मी एवढी संतापले नव्हते. तुम्ही काय सांगितलं ते आठवून पाहा. तुमच्या बोलण्यात मला स्वत:ची अवहेलना दिसली. आपापल्या अंतरंगातलं सत्य सांगून दृढ पायावर आपली मैत्री असावी, असं मला वाटलं होतं. त्यामुळे माझ्या मनात जे आलं ते मी सांगते. कदाचित माझे विचार चुकीचे असतील. तसं वाटलं, तर तुम्ही मला ते स्पष्टपणे सांगा. मी बोलतेय म्हणून तुम्हीही रागानं निघून जायचं नाही. तुम्ही निघून जाल म्हणून तुमचे हात असे पकडून बसलेय मी!” म्हणत तिनं त्याच्या हातावरची पकड आणखी घट्ट केली.

“नाही. सांगा तुम्ही. माझं काही चुकत असेल, तर मीही सुधारून घ्यायला तयार आहे.” तो शुद्ध अंत:करणानं म्हणाला.

“अंतरंगातलं सत्य म्हणून तुम्ही मुंबईच्या मैत्रिणीची हकिकत सांगितलीत. तिच्या सान्निध्यात जीवन म्हणजे प्रणयभावनेच्या लाटेवर निरंतर झुलत राहणं, असा अनुभवही घेतलात. त्या दोन वर्षांच्या कालावधीत तिनं तुम्हाला अखंड शारीरिक आणि भावनिक सुख दिलं. सुख म्हणजे मजा! नाही का? तुम्ही मला हे सांगितलं ना?”

“होय.” तो म्हणाला.

“नंतर तुम्ही सांगितलं ती विवाहित होती, गृहिणी होती, तीन मुलांची आई होती, पीएच.डी. घेऊन स्नातकोत्तर विभागात रीडर होती... वगैरे वगैरे. तुम्ही हा सगळा तपशील मला का सांगितला? मीही तशीच विवाहित, गृहिणी, दोन मुलांची आई, सुशिक्षित आहे. तिच्यासारखी मीही कॉलेजमध्ये शिकवते. माझे मिस्टर सरकारी नोकरीत वरच्या हुद्यावर आहेत. म्हणजे मीही तुमच्याशी अशा प्रकारचे संबंध ठेवावेत असं तुम्हाला सुचवायचं होतं! प्रणय-उन्मादात तुम्हाला डोलवणारी लाट मी व्हायला पाहिजे! मी तुम्हाला अखंड सुख म्हणजे मजा द्यावं अशी तुम्ही सूचना केली. आपल्या दोघांच्या संबंधातून तुम्हाला काय अपेक्षित आहे, ते तुम्ही स्पष्टपणे दाखवून दिलं. तुमच्याकडून मी उन्नत स्वरूपाच्या मैत्रीची जीव तोडून अपेक्षा करत असताना तुम्ही माझ्याकडून ही अपेक्षा करावी? सांगा, मला राग आला यात काय चुकलं? तुम्ही माळलेला गजरा माझ्या केसांमध्ये राहू नये असं वाटून मी तो फेकून दिला, यात माझं काय

चुकलं?”

हे बोलताना तिची दृष्टी त्याच्या चेहऱ्यावरचे फेरबदल तीक्ष्णपणे निरखत होती. त्याच्या चेहऱ्यावर, मानेवर, कपाळावर घामाचे सूक्ष्म बिंदू चमकू लागले होते. तो पूर्णपणे अंतर्मुख होऊन गेला होता. एक अक्षरही घशातून उमटू नये, स्वरयंत्रही कुठंतरी पडून गेलं असावं अशी त्याची स्थिती झाली होती.

तिनं पुन्हा पुन्हा तोच प्रश्न विचारला तेव्हा सगळी इच्छाशक्ती एकवटून तो म्हणाला, “देवाशपथ सांगतो, तसा कुठल्याही प्रकारचा विचार माझ्या मनात नव्हता. माझा तो उद्देश मुळीच नव्हता.”

“तुमचा तसा उद्देश नसेलही; पण तुमच्या अंतर्मनातलं सत्य तुमच्या बोलण्यातून व्यक्त झालं असेल. नाहीतर नेमकी तीच घटना तुम्ही का सांगितली? एखादी ताजमहालासारखी वास्तू उभारून जगप्रसिद्ध होण्याची इच्छा तुमच्या तोंडी का आली नाही? जाऊ दे. सांगा, तुमचा देवावर विश्वास आहे?”

“देव नावाच्या व्यक्ती किंवा शक्तीविषयी मला निश्चित असं काहीच ठाऊक नाही.” अवघडून प्रश्नातून सुटका करून घ्यायच्या दृष्टीनं या संधीचा फायदा करून घेत तो म्हणाला.

“आणि तरीही त्या देवाची शपथ घेऊन तुम्ही का सांगता?”

तिच्या या प्रश्नानं कुणीतरी घट्ट चिमटीत पकडून आपला श्वास घुसमटत आहे असं त्याला वाटू लागलं. केवळ सूक्ष्म स्वरूपात असलेल्या कपाळ आणि मानेवरच्या घामाचं मोठ्या थेंबात परावर्तन होऊन त्याचा ओघळ मानेवरून खाली ओघळला.

त्याचे दोन्ही हात सोडून ती उठली. आपल्या पदरानं तो घाम पुसत ती म्हणाली, “सोमू, तुम्हाला शब्दांत पकडण्यासाठी मी हे बोलत नाही. तुमच्याशिवाय मला कुणीही नाही! म्हणून आपले संबंध शुद्ध सत्यावर उभे राहवेत असं मला वाटतं. म्हणून मी तुम्हाला हे विचारलं. तुम्हीही मला हवे ते प्रश्न विचारायला हवेत.”

ती त्याच्या शेजारी बसली. त्याचं मस्तक ओढून आपल्या मांडीवर घेऊन ती म्हणाली, “संकोच वाटतो? तर मग संपलंच! राग येतो माझा? सोमू, मला तर तुम्हाला असं माझ्या बाळासारखं मांडीवर घेऊन थोपटून निजवावंसं वाटतं. माझ्या मांडीवर डोकं ठेवून तुम्ही माझ्याशी खूप बोलत राहावं. तुही नीट झोपा बघू! पाय सारखे करा.” म्हणत तिनं वाकून त्याच्या पायातले बूट काढले. पुन्हा त्याचा चेहरा पदरानं पुसून ती त्याच्याकडे पाहू लागली.

त्याच्या चेहऱ्यावर विश्वास आणि समाधान पसरलं होतं.

त्यानंतर नीळकंठप्पा जेवून आल्यावर तो रोज दुपारी तिच्या घरी जात होता. जेवणानंतर चार-साडेचार वाजेपर्यंत तिच्याशी गप्पा मारून पुन्हा ऑफिसमध्ये येत होता. रात्री आठ-साडेआठपर्यंत त्याचं काम चाले. रात्रीही त्यानं जेवायला घरी यावं म्हणून तिनं बराच आग्रह केला. तरी संकोचामुळे किंवा तिची दोन्ही मुलं घरात असताना आपल्या मनमोकळ्या गप्पा

होऊ शकणार नाहीत या विचारानं तो तिच्याकडे रात्री जेवायला जायचं टाळत होता. त्याऐवजी साडेआठनंतर वेलकम हॉटेलमध्ये जेवण करून जयलक्ष्मीपुरात असलेल्या आपल्या भाड्याच्या जागेत जाऊन झोपत होता.

दुपारच्या वेळी मात्र गावाबाहेरच्या विरळ वस्तीत असलेल्या, मोठ्या कंपाउंडमध्ये असलेल्या त्या मोठ्या घरात ते दोघंच असत. एकमेकांशी जवळीक वाढल्यामुळे एकमेकांच्या शेजारी खेटून बसणं, एकमेकांच्या मांडीवर डोकं ठेवून झोपणं भावनावेगात होत असे. एकमेकांच्या मिठीत विसावण्याचेही क्षण अधून-मधून येत. तिच्या उबदार मृदू मिठीत असताना त्याचे विकार चाळविल्याशिवाय राहत नसत, पण 'हिच्याशी शरीरसंबंधाचा विचारही करायचा नाही.' या निश्चयानं तो आपल्या भावना तिला जाणवणार नाहीत याची विशेष काळजी घेऊन गप्पा मारत असे. काही वेळा तिचाही आवाज मृदू होऊन विषय नकळत बदलत असे; पण तरीही ते दोघं स्पष्टपणे काहीही न बोलता स्वत:च आखलेल्या सीमारेषेचं पालन करायला धडपडत होते.

एक दिवस त्याच्या मिठीत विसावली असता तिनं विचारलं, "तुम्ही मुंबईच्या मैत्रिणीची हकिकत सांगितली ना? तुम्ही दोघं कुठं भेटत होता?"

तो कासावीस झाला. तिनं पुन्हा तोच प्रश्न विचारला तेव्हा म्हणाला, "आता तो विषय कशाला?"

"तुम्ही नाही म्हणालात तर नको. या संदर्भात तुम्हाला भरपूर मन:स्ताप भोगावा लागलाय ना? मला अजून शरम वाटते; पण तुम्हाला दोन वर्षं भरभरून सुख दिलेल्या व्यक्तीविषयी कृतज्ञता बाळगणं माझं कर्तव्य नाही काय? मी ज्याच्यावर प्रेम करते, त्याला त्यांनी केवढं सुख दिलंय! मनात अलीकडे ती कर्तव्यभावना कितीतरी वेळा दाटून येते. नाही सांगणार? तुम्ही मला अजूनही क्षमा केली नाही असं मी समजू?"

तरीही तो काही बोलला नाही.

एकटक त्याच्याकडे स्वच्छ नजरेनं बघत तिनं त्याच्या केसांमधून हात फिरवला. त्याला गच्च मिठी मारत ती म्हणाली, "खरंतर मला त्यांच्याविषयी मनापासून मत्सर वाटतो. माझ्यापेक्षा तुम्ही त्यांच्या अगदी जवळचे होऊन राहिला होता ना? तुम्ही कितीही लपवायचा प्रयत्न केला, तरी तो विषय निघताच तुमच्या नकळत तुमच्या डोळ्यांमध्ये किती आनंद चमकतो म्हणून सांगू! पाहा! आतासुद्धा तुम्हाला ते लपवायला जमलेलं नाही!"

"काय सांगायचं?" अखेर निरुपायानं त्यानं विचारलं.

"तुम्ही दोघं कुठं भेटत होता?"

"तिच्या मैत्रिणीच्या फ्लॅटवर. मैत्रीण सकाळी आठ ते संध्याकाळी साडेसहापर्यंत बँकेत जात होती. एका मोठ्या बँकेत मॅनेजरच्या हुद्यावर ती काम पाहत होती म्हणे. तिच्या फ्लॅटची डुप्लिकेट चावी हिच्याकडे होती. वीस मजली इमारतीमधल्या सोळाव्या मजल्यावरचा फ्लॅट.

लिफ्टनं वर जायचं. एकमेकांचा बिलकूल परिचय नसलेले, एकान्तानं भरलेले फ्लॅट्स. मी दोन वर्षं तिथं जात होतो, पण त्या काळात मला त्या मजल्यावर किंवा लिफ्टमध्ये एखादं चिटपाखरूही भेटलं नाही.”

“तुम्ही दोघं तिथं भेटता याची त्या चावी देणाऱ्या मैत्रिणीला कल्पना होती?”

“काही कल्पना नाही. कदाचित असावी. मी एकदा विचारलं तेव्हा ती म्हणाली, “मैत्रिणीनं मैत्रिणीची सोय केली म्हणून काय बिघडलं?” त्यानंतर मीही पुन्हा विचारलं नाही. मी कधीच तिच्या त्या बँकवाल्या मैत्रिणीला भेटलो नाही. तिनंही कधी तशी इच्छा व्यक्त केली नाही.”

“तुम्हा दोघांची ओळख कुठं झाली? नंतर असे संबंध केव्हा सुरू झाले?”

तिच्या या प्रश्नामुळे ती उलटतपासणी घेत आहे असं वाटून तो संकोचून गेला. अस्वस्थ होऊन तो म्हणाला, “जाऊ दे ना! आता कशाला हवाय तो घडून गेलेल्या घटनांचा तपशील?”

“तुम्हाला त्रास होत असेल, तर सांगू नका. तुमच्या जीवनाचा सगळा तपशील जाणून घ्यायची इच्छा आहे म्हणून विचारतेय.”

त्यानं तिच्याकडे पाहिलं. तिच्या चेहऱ्यावर आणि आवाजात प्रामाणिकपणा शिगोशीग भरला होता. तो पुढं सांगू लागला, “एका पार्टीमध्ये आमची पहिली भेट झाली. एक कल्पक आर्किटेक्ट म्हणून कुणीतरी माझी तिला ओळख करून दिल्यावर ती म्हणाली होती, “कल्पकतेची उणीव असलेल्या माणसाचा सहवास दोन मिनिटंही सहन करणं कठीण आहे. कल्पक माणसंच मला आवडतात!” तिनं फारच विचारपूर्वक मेकप केला होता. तेहेतिशीचं वय. डोळ्यांमध्ये खिळवून ठेवणारी मादकता. पार्टीमध्ये फारसं बोलणं झालं नाही. पार्टी म्हणजे – तुम्हालाही ठाऊक आहेच – ‘हॅलो! हॅलो’ करत भेटायला येणारी कितीतरी माणसं! तिला सगळ्यांशी ओळख करून घ्यायची भरपूर हौस दिसत होती. खूपच ॲक्टिव्ह होती ती! माझं कार्ड मी तिला दिलं होतं. पार्टीनंतरचा चौथा किंवा पाचवा दिवस असेल. तिनं ऑफिसमध्ये फोन केला, “ओळख आहे ना? त्या पार्टीत आपण भेटलो होतो... मी मिसेस....” वगैरे. लगेच तिनं विचारलं, “आज आपण भेटायचं? दुपारी तीन वाजता राजाभाई टॉवरपाशी. मी गुलाबी साडी नेसून येईन तुम्हाला ओळख पटावी म्हणून. तुम्ही मात्र मुद्दाम वेष पालटून आलात तरी मी ओळखेन” माझं ऑफिस म्हणजे पार्टनरशिपचं काम. साइटवर जायचं निमित्त काढून मी वेळेवर बाहेर पडलो.”

ती मन लावून त्याचं बोलणं ऐकत होती.

‘तिनं मंद हसत माझं स्वागत केलं. दोघंही चालू लागलो. दंडाला दंड घासत चालताना तिनं विचारलं, “मला पाहिल्यावर तुम्हाला काय वाटलं?” मी काय बोलणार? तीच पुढं म्हणाली, “काहीच वाटलं नाही? पहिल्या भेटीत काही वाटलं नाही, तर त्यानंतर कधीच काही वाटत नाही. मग आज कसे आलात तुम्ही?” विजयानं हसत ती म्हणाली, “तुम्ही किती हँडसम आहात, हे तुम्हाला ठाऊक आहे म्हणून एवढा ताठा वाटतं!” म्हणत माझा दंड लपेटत ती हसत राहिली. एका टॅक्सीला हात करून ती मला आपल्या घरी घेऊन गेली. घरात कुणीही नव्हतं.

एका सर्वस्वी अपरिचित स्त्रीबरोबर... एवढ्या सुशिक्षित स्त्रीबरोबर... एवढ्या कमी ओळखीत... असे संबंध येऊ शकतील, याची मला कल्पनाही करणं कठीण होतं."

तो मनापासून सगळा तपशील आठवून सांगत होता.

"त्यानंतर दोन दिवस आम्ही तिच्या घरीच भेटत होतो. "घरी नको. तुम्ही पुरुष आहात, एखादी सुरक्षित जागा शोधून काढा." असं तिनं मला सुचवलं. मी तरी कुठं म्हणून व्यवस्था करणार? मुंबईमधला हॉटेलचा खर्च किती म्हणून परवडेल? शिवाय हॉटेलमध्ये येणार नाही असा तिचाही हट्ट होता. या प्रकारात दोन आठवडे आम्ही भेटू शकलो नाही. शेवटी तिनंच मैत्रिणीच्या फ्लॅटची चावी मिळवून मला फोन केला. मी अधिक चौकशी केली, तेव्हा "अधिक तपशील कशाला हवा? बाई असून मीच तुमच्यापेक्षा जास्त रिसोर्सपुल आहे ना!" म्हणून विषय बदलून तिनं माझी थट्टाही केली."

अमृताच्या चेहऱ्यावर तन्मय भाव पसरले होते. डोळेही तो सांगत असलेल्या घटनांच्या तपशिलाची कल्पना करत होते, हे दिसत होतं. आता तिचे डोळे त्याच्या चेहऱ्यावर खिळून राहिले होते. तोही संकोच सोडून सरळ सगळी हकिकत सांगण्याइतका सावरला होता.

दोन-तीन मिनिटं त्याच तंद्रीत गेली. नंतर तिनं विचारलं, "ती खूप चतुर होती?"

"केवळ चतुरच नव्हे, पूर्णपणे बाह्य जगत् विसरून तन्मय होणं हा तिचा स्थायिभाव होता. "सोमू, तुझ्याजवळ एकदा आलेली स्त्री जन्मोजन्मी तुझी दासी होण्यासाठी प्रणयदेवतेची प्रार्थना करेल बघ!" यासारखं बरंचकाही मला उत्तेजित करणारं ती बोलत राहायची; पण परिस्थिती उलट होती. एकदा तिच्या सान्निध्यात आलेला कुठलाही पुरुष तिचा दासानुदास होऊन राहिलाच पाहिजे! प्रचंड कल्पनाविलासाची देणगी असलेली स्त्री ती! ती गझल फार छान गायची म्हणून सांगितलं ना! गझल म्हणजे उत्कट प्रणयाची गाणी. त्यातल्या प्रत्येक शब्दाचा अर्थ आणि अर्थाचा एकेक पदर उलगडून गायची कल्पनाशक्ती तिच्या प्रणयक्रीडेतूनही व्यक्त होत होती. तिचं संभाषणच गझल होऊन जाई. वास्तव जगाचं भान नाहीसं होऊन रतिमदनाचं असं वेगळंच विश्व ती उभं करत असे. प्रणय म्हणजे उत्कटता, प्रणय म्हणजे असा उन्माद, प्रणय म्हणजे हे असं सुख... याव्यतिरिक्त दुसरा कसलाही विचार करणं म्हणजे मूर्खपणाची परमावधी वाटावी, इतकं तिचं सान्निध्य प्रभावी होतं."

"तुम्ही त्यांच्यावर एवढं प्रेम करत होता?"

काही क्षण त्याचं मन तिच्या प्रश्नानं विश्लेषण करण्यात गढून गेलं. त्यानंतर तो शांतपणे म्हणाला, "त्याला प्रेम म्हणायचं की नाही, या विषयी मलाही समजत नाही. वेदान्ती आणि कवी म्हणतात, 'प्रेमामध्ये वेदना असते.' मीही वाचलंय ते. व्याकूळता हा प्रेमाचा आधार. व्याकूळता असेल तिथं मन कातर आणि दु:खी असलंच पाहिजे ना! पण आम्हा दोघांच्या समागमाला कधीही व्याकूळता किंवा दु:खाचा स्पर्श नव्हता. भेटलो की, त्यानंतरचे चार-पाच तास फक्त सुखात जात. पुन्हा तीन-चार दिवसांनी भेटायची खात्री असल्यामुळे त्या आनंदातच आम्ही एकमेकांचा निरोप घेत होतो. याच दिवसांत ती काही दिवसांकरता मद्रासला गेली होती. त्या वेळीही रतीची आशा जाणवत असली, तरी विरहाचं दु:ख आणि व्याकूळता जाणवली

नाही. तिनंही मद्रासहून तीन पत्रं लिहिली. त्यातही, 'प्रिया, लवकर येते आहे. तुझ्या दणकट पुरुषी मिठीत कुस्करून जायला माझा देह आतुर झालाय' हीच भावना व्यक्त होत होती."

त्याचं बोलणं लक्ष देऊन ऐकणारी अमृता आवेगानं उठून त्याच्यापाशी आली. त्याला सोफ्यावर झोपवून त्याचं शेवटचं वाक्य संपायच्या आधी ती त्याचं डोकं आपल्या छातीशी घट्ट कवटाळून बसली. तिचं मन त्याच्या अखेरच्या वाक्याआधीच्या दोन-तीन वाक्यांमध्येच गुंतून राहिलं होतं.

आवेगानं त्याचं मस्तक छातीशी घट्ट कवटाळून ती म्हणाली, "सोमू, किती छान सांगितलंस तू! मी साहित्याचा एवढा अभ्यास केलाय! पण प्रेमाचं मर्म उकलून दाखवणं तुझ्यासारखं मला जमलं नव्हतं. प्रेमात दु:ख असतं. व्याकूळता हाच प्रेमाचा आधार! व्याकूळतेत कातरता असते, सोमू! आपल्या प्रेमाला दु:खाची जोड निश्चित आहे! मी काही केवळ वेडी म्हणून तुझ्यावर रागवत नसते. तुला यायला दहा मिनिटं उशीर झाला की, माझ्या जिवाची तगमग सुरू होते. तू का आला नाहीस? रस्त्यात तुला काही झालं नसेल ना? एखाद्या वाहनाची ठोकर तर बसली नसेल? या विचारांमुळे जीव नुसता तडफडत राहतो. त्यातही इथं येताना प्राणिसंग्रहालयाजवळचं वळण फारच धोकादायक आहे! डावीकडून ट्रक-लॉऱ्या थेट अंगावरच येतात आणि तू समोरून उजवीकडून येत असतोस. 'देवा! हा अजून का आला नसेल...' म्हणून मी मिनिटभरात किती वेळा घड्याळ बघते ठाऊक आहे?"

तिच्या डोळ्यांमध्ये भरून आलेले अश्रू त्याच्या चेहऱ्यावर पडले. मुंबईच्या मैत्रिणीच्या आठवणीत गाढ बुडालेल्या सोमशेखरला त्या उष्ण स्पर्शासरशी तीव्रपणे जाणवलं, 'तिनं त्या दोन वर्षांमध्ये एकदाही आपली काळजी करत आपल्या जिवाच्या चिंतेनं व्याकूळ होऊन असे अश्रू ढाळले नाहीत.' पाठोपाठ त्याला वाटलं, 'जिच्या स्वभावात दु:ख आणि व्याकूळता यांना थाराच नाही, तिच्याशी अमृताशी तुलना करणं तरी योग्य आहे काय?'

थोड्या वेळानं तिनं त्याला विचारलं, "तुलाही माझी कधी काळजी वाटते? केवळ मला बरं वाटावं म्हणून तू खोटं बोलणार नाहीस, याची खात्री आहे म्हणून विचारते."

ती आपला उल्लेख एकेरी करत असल्याची त्याच्या मनानं नोंद घेतली होती. आताच्या आपल्या समीपच्या नात्यासाठी तेच योग्य असल्याची त्याच्या मनानं ग्वाही दिली. त्यावर फारसं लक्ष केंद्रित न करता तोही सांगू लागला, "गावाबाहेरची ही विरळ वस्ती, हाक मारली तरी ऐकू येणार नाही एवढ्या लांब-लांब असलेली घरं... अशा भागात दोन लहान मुलांना घेऊन तू कशी राहत असशील... हा विचार मनात आला की रात्र-रात्र मला झोप येत नाही!"

"खरं?"

"तुझी शपथ!"

"तर मग तू त्या क्षणी स्कूटरवरून इथं निघून ये. अशीच तुला मांडीवर घेऊन थोपटत राहीन. मग बघ कशी छान झोप येईल!"

हे सांगताना तिचे डोळे पुन्हा तुडुंब भरले होते.

नुसतं घरात बसून काय करायचं म्हणून ते दोघंही अलीकडे लवकर जेवण उरकून गाडीतून दोन-तीन तासांची रपेट मारून येत. घरदुरुस्तीच्या संदर्भात त्याला तिच्या नाजूक आर्थिक परिस्थितीची ओझरती कल्पना आली असल्यामुळे त्यानं दोन-तीन वेळा गाडीऐवजी आपल्या स्कूटरनं फिरून येण्याचा विचार मांडला. पहिल्यांदा तिनं कुठलाही आक्षेप घेतला नाही, तरी एवढ्या उघडपणे दोघांनी स्कूटरवरून भटकणं बरं दिसणार नाही, असं सांगून तिनं त्याला नकार दिला. एकदा गाडीत पेट्रोल घातल्यावर त्यानं पैसे देऊ केले तेव्हा त्या पेट्रोल भरणाऱ्या मुलाच्या समोरच ती म्हणाली, "सोमू, माझी आर्थिक परिस्थिती फारशी उत्तम नाही; पण म्हणून माझा असा अपमान करावासा तुला वाटतं तरी कसं?"

त्यानंतर त्या संदर्भात त्यानं अवाक्षरही उच्चारलं नाही.

चामुंडी टेकडी, तिरूमकूडलसंगम, वृंदावन अशा ठिकाणी झाडाच्या सावलीत दगडावर बसून भोवतालचं आकाश, ढग, हिरवळ पाहत ढगासारखं हलकं होऊन आकाशात तरंगत राहायचं आणि मधूनच परस्परांशी सुखदु:खाची देवाणघेवाण करणाऱ्या गप्पा मारायच्या, हा त्या दोघांच्याही आवडीचा विषय झाला होता. दोघांची मनंही अशा वेळी पिसासारखी हलकी होऊन जात.

याचा अर्थ दोघांच्या सान्निध्यातला प्रत्येक दिवस चित्तवृत्तींना केवळ मेजवानीचा ठरत होता असंही नव्हे. कितीतरी वेळा ती अकारण संतापत होती. त्यानं तिची समजूत घालायचा प्रयत्न करताच, तिचा संताप अधिक उफाळून तोच त्या संतापाच्या वावटळीत घेरला जात होता.

घरातून निघतानाच कधी ती संतापलेली असे. ते जाणून त्यानं बाहेर जायच्या विचाराला मुरड घालायचा प्रयत्न केला की, त्यावर ती म्हणे, "नाहीतरी तुला माझ्याबरोबर यायचं टाळण्यासाठी काहीतरी निमित्तच हवं असतं! माझ्या रागाचं त्यासाठी निमित्त करतोयस तू. असा छळ करून मारण्यापेक्षा सुऱ्यानं भोसकून का मला ठार करत नाहीस? तो निदान प्रामाणिकपणा तरी ठरेल."

तिच्या बोलण्यावर हतबुद्ध होऊन गप्प बसलं की, "मिस्टर सोमशेखर, कारमध्ये बसा, चला म्हणून सांगायला आरती घेऊन यायला पाहिजे का?" म्हणत ती त्याला आणखी कानकोंडा करत होती. तिचं हे आदरार्थी बहुवचनी संबोधन सुरू झालं म्हणजे तिचा संताप टिपेला पोहोचल्याचंच लक्षण असे. असा हा संताप किती काळ राहील याचा त्याला अंदाज करणंही अशक्य असे.

गाडी आठ-दहा मैल धावल्यावर केव्हातरी पुन्हा तिला वाचा फुटे, "का? अवाक्षरही न बोलता मला घुसमटून ठार मारायचा विचार आहे काय?"

एक दिवस तो म्हणाला, "तूच मौन स्वीकारून बसलीस. मी नव्हे." तिची एकटक दृष्टी त्याच्याकडे वळली. तोच तो म्हणाला, "कार ड्राइव्ह करतेस, रस्त्यावर लक्ष असू दे."

“का? मरायची भीती वाटते? भित्रट!”

“होय, वाटते. तुझ्यापासून दूर व्हायची भीती वाटते.”

“म्हणजे? मीपण मरायला पाहिजे? ठीकाय. आता दोघंही एकदम मरू असा ॲक्सिडेंट करते.” म्हणत तिनं गाडीचा वेग पराकोटीचा वाढवला. मनातली अस्वस्थता दडपून तोही वरकरणी शांत बसून राहिला. एकाएकी गाडीचा वेग कमी झाला आणि गाडी रस्त्याच्या कडेला थांबली. ती त्याच्या अगदी निकट जाऊन दोन्ही हातांनी वेढून म्हणाली, “सोमू, किती विश्वास आहे माझ्यावर तुझा!”

तिचा राग ओसरल्याचं त्याच्या लक्षात आलं आणि त्याला मनोमन हायसं झालं.

असे प्रसंग घडून गेल्यावर दोघं आणखी जवळ आल्याचा त्याला अनुभव येत होता. तिचाही हाच अनुभव होता. एकदा आपल्या संतापाचं समर्थन करत ती म्हणालीसुद्धा, “सोमू, हा माझा संताप म्हणजे काही नुसती धग नाही. आपल्याला आणखी जवळ आणणारी ऊब आहे ती!” तोही तिच्या या विधानाला त्वरित पाठिंबा देत होता.

एव्हाना उन्हाचे दिवस संपून पावसाळा सुरू झाला होता. आकाशाचा एकसुरी निरभ्रपणा नाहीसा होऊन त्यात ढग भरले होते. त्यांच्याकडे पाहत एकदा तो म्हणाला, “एकही ढग नसलेल्या आकाशातलं भगभगीत उन्ह किती त्रासदायक असतं!”

त्याचं म्हणणं मनोमन मान्य करतानाच तिनं प्रश्न केला, “तू हे मला सांगतोस? अरे, मलेनाडची आहे मी!”

चामुंडी टेकडीच्या शिखराला ढग वेढू लागले की, टेकडीला एक प्रकारचं गूढ व्यक्तिमत्त्व प्राप्त होई. अशा वेळी आपल्या कंपाउंडमधून ते दृश्य मौनपणे पाहत राहणं हाच त्या दोघांचा बोलका अनुभव असे.

एक दिवस दुपारच्या वेळी दोघंही ढगांनी वेढलेलं टेकडीचं गूढ रूप पाहताना ती अवचितपणे म्हणाली, “एक गझल लिहाविशी वाटते.”

“पण कन्नड भाषेच्या प्रकृतीला गझल पेलेल काय? त्यासाठी उर्दूच ठीक आहे.”

“आपल्या भाषेला तेवढी ताकद मिळवून देणं यावर त्या कवीची प्रतिभा ठरत असते ना? मी फार मोठी प्रतिभावंत कवयित्री आहे, असा माझा मुळीच दावा नाही; पण तो मूड किती छान असतो नाही? शिवाय तुझ्या त्या लाडक्या सखीची आठवणही येते. सोमू, अगदी खरं... खरं सांग हं! मला अजिबात हेवा वाटणार नाही. तुझ्या त्या गर्लफ्रेंडला तू कधीही पत्र लिहीत नाहीस? निदान क्षेमसमाचाराचं पत्र तरी?”

तिच्या चेहऱ्यावर खोडकरपणा स्पष्ट दिसत होता.

त्यानं विचारलं, “आता लिहू का?”

“मला बापडीला काय समजतंय त्यातलं? पुरुष एका वेळी किती चोरटी नाती ठेवतात, ते मला कसं ठाऊक असणार? चेष्टेचा सूर कायम ठेवून ती म्हणाली.

नंतर जेवतानाही तिचा तोच चेष्टेचा सूर होता. जेवणानंतर दिवाणावर एकमेकाला खेटून बसतानाही तिनं विचारलं, “सोमू, तू तुझ्या त्या मैत्रिणीची हकिकत सांगतिल्यावर मी फार क्रूरपणे वागले, म्हणून तू माझ्याशी एवढं अंतर राखून वागतोस ना? मन कितीही उचंबळलं, तरी त्यावर तू संयमाचं दडपण ठेवतोस. आपण इतके जवळ असतानाही तू साध्या चुंबनाचीही अपेक्षा... खरंतर मी बाईमाणूस! या काही स्त्रीनं आपण होऊन बोलायच्या गोष्टी नव्हेत; पण मला शिक्षा करायचाच तुझा हट्ट आहे ना?”

तो गडबडून गेला. तिच्या ओठांवर हात ठेवत तो म्हणाला, “छे:! काय बोलतेस हे?”

“मला राग आला की, मी भक्कन पेटते आणि माझी मीच राख होऊन जाते. तू मात्र राग आत दडपून मला असा कणाकणानं मारतोस.”

“माझ्यावर आरोप करून अपराधीपण लादल्याशिवाय तुला एक वाक्यही बोलता येत नाही काय? तुझ्याच हितासाठी मी माझं मन आवरण्यासाठी धडपडतोय! यात तुला कष्ट द्यायचा प्रश्नच कुठं आला?”

“पण तुझी धडपड बघून मला किती वाईट वाटतं, त्याचं तुला काहीच नाही काय?” म्हणत तिनं त्याचा चेहरा ओंजळीत घेऊन त्याच्या ओठांचं प्रदीर्घ चुंबन घेतलं. नंतर स्वत:च्या वागण्याची प्रचंड शरम वाटून तिनं आपला चेहरा त्याच्या छातीत दडवला. त्यानं तो वर करायचा प्रयत्न केला, तरी त्याच्या चेहऱ्याकडे बघायची तिला शरम वाटत होती. अखेर उसासत ती म्हणाली, “मला अशी निर्लज्ज केलीस ना? आता तरी तुला बरं वाटलं की नाही?”

तिच्या बोलण्याची पद्धत एव्हाना त्याच्या लक्षात आली होती. ही नुसती बोलायची पद्धत की स्वभाव, हे त्याला उमजलं नसलं, तरी एक त्याला निश्चित समजलं होतं. ‘संदर्भ कुठलाही असो, माझ्या मनात अपराधीपणाची भावना निर्माण होईल, असंच हिचं बोलणं असतं.’ त्यामुळे त्यानं मनोमन ठरवलं, ‘हिच्या बोलण्यातल्या तिरकसपणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून त्यामागचा मूळ अर्थ तेवढा लक्षात घ्यायचा.’ आता छातीशी चेहरा दडवलेल्या अमृताच्या कानाशी ओठ नेऊन तो म्हणाला, “शरीराचं आकर्षण असलेल्या प्रेमात पावित्र्य नसतं आणि प्रेमाशिवायच्या नात्यात माधुर्य आणि मार्दव राहत नाही.”

काही क्षण स्तब्ध मौनतेत गेले. नंतर ती म्हणाली, “म्हणजे आपल्या नात्यातलं माधुर्य आणि मार्दव नष्ट झालंय काय?” तिची नजर त्याच्या नजरेत रुतली होती. आवाजात तोच दोषारोप करणारा स्वर होता.

“काहीही बोललं तरी असाच माझ्यावर दोष ठेवतेस. मी आपला एक सर्वसाधारण विचार सांगितला, एवढंच” तो चिडून म्हणाला.

“सोमू, आपले संबंध या थराला येईपर्यंत तू का असा गप्प राहिलास? मला का अशी लांब

ठेवतोस? एकीकडे प्रेमाचं नाटक करता करता माझा तिरस्कार करतोस तू!”

“बस्स कर हे...” असह्य होऊन तो ओरडला.

“हवं तर तू रागाव किंवा मार, पण तुला माझं ऐकावंच लागेल.” त्याला घट्ट धरत ती म्हणाली.

तिच्या त्या आवेगपूर्ण मिठीला प्रतिसाद देण्याऐवजी स्वत:ला आवरत अंत:करणापासून तिच्या गालंवर ओठ ठेवत तो म्हणाला, “अमृता, मीही इथंच आहे आणि तूही कुठं जाणार नाहीस. तू माझी आहेस आणि मी तुझा, पण घाई नको. आजचा दिवस आपण थांबू या. केवळ तुला टाळण्यासाठी मी असं म्हणत नाही हे लक्षात घे. चल, आपण टेकडीवर जाऊन येऊ या कारनं.” म्हणत तो उठून उभा राहिला.

ती काही क्षण गप्प बसली. नंतर म्हणाली, “त्या दिवशी तू माळलेली वेणी मी कडकडीत उन्हात फेकून दिली. त्यानंतर तू मला कधीही गजरा आणला नाहीस. अजून तुझा राग गेला नाही माझ्यावरचा?” तिच्या बोलण्यात तिरकेपणाचा लवलेश नव्हता.

“खरोखरच मी रागावलो नाही.”

“तुझं बाह्य मन तुला ठाऊक असेल, पण तुझं अंतर्मन... ते फक्त मला ठाऊक आहे.” म्हणत ती उठली आणि म्हणाली, “ए वास्तुशिल्पी! आमच्या या घरी एक झोपाळा बसवायचा आहे. मग त्यावर आपण दोघांनी बसून झोके घ्यायचे. कधी मी तुला यावर झोपवून झोके देईन. मधल्या हॉलमध्ये. चालेल का? जुनं छत खूप उंच आहे. की मागच्या बाजूला एक वेलीचा मांडव घालून त्यात टंगायचा झोपाळा? विचार करून सांग.”

आता तिचा आवाज खूपच वेगळा होता.

संध्याकाळचे सात वाजले होते. तो आपल्या ऑफिसमध्ये कामात गुंतला होता. फोन वाजला. मुंबईचा पार्टनर नवीन शहा फोनवर बोलत होता, “अरे सोमभाय, एक अर्जंट प्रोग्रॅम ठरलाय. उद्या सकाळी सात वाजता बेंगळुरूला येऊन पोहोचणाऱ्या विमानानं इंदू, दिगंत आणि मी येत आहोत. एक टॅक्सी बुक करून तू एअरपोर्टवर ये. पाच दिवसांसाठी टॅक्सी बुक कर. इंदू आणि दिगंतनं बेंगळुरू पाहिलंय. त्यामुळे थेट श्रीरंगपट्टण, मैसूर, चामुंडी हिल, वृंदावन असं जायचं. जेवून कूर्ग, श्रवणबेळगोळ, बेलूर, हळेबिडु असं फिरू. २६ तारखेच्या फ्लाइटचं परतीचं रिझर्वेशन झालंय; आणि हे बघ, तूही आमच्याबरोबर हवास. तुला वेगळं भेटून गप्पा मारायला वेळच नाही. थोडं प्रोफेशनविषयीही डिस्कस करायचय. तुझी तिकडची सगळी कामं पोस्टपोन कर. इंदूचाही तुला निरोप आहे. काहीही कारण सांगू नकोस. एनी थिंग टू आस्क?”

खरंतर तोही नवीनशी संपर्क साधायच्या विचारात होताच. आतातर तोच येत होता. ‘इंदूबेनही चांगली स्त्री. पाच दिवस भटकताना त्यांच्याशी भरपूर गप्पा मारता येतील. दिगंतही आता चौदा वर्षांचा झाला असेल. भरपूर उंचही झाला असेल. किती? दोन वर्षं होतील त्याला भेटून.’

विचारांच्या प्रवाहात तो काही क्षण ओढला गेला. पाठोपाठ त्याला करायची कामं आठवली. पाच दिवसांच्या अनुपस्थितीत कुठली कामं व्हायला पाहिजेत याचा अंदाज घेऊन नीळकंठप्पांना त्याने त्यांचा तपशील सांगितला. दुसऱ्या दिवशी दुपारी जमलं तर येईन, असं सांगून पुढच्या चार दिवसांच्या अनुपस्थितीविषयी सांगून तो घाईनं घरी आला. चार-पाच दिवसांपुरते आवश्यक तेवढे कपडे बॅगेत भरून, मिळेल ती बस पकडून बेंगळुरूला जाण्यासाठी त्यानं स्टँडकडे धाव घेतली.

बस मैसूर स्टँडमधून बाहेर पडून बेंगळुरूच्या दिशेनं धावू लागली. बस मंड्यच्या जवळपास आल्यावर त्याच्या मनातली अमृतेची स्मृती वर आली. मनात आलं, 'तिला फोन करायला हवा होता. अमुक अमुक घडलं म्हणून मी या पाच दिवसांत परगावी जातोय.' असं कळवायला हवं होतं; पण त्याच्या मनानंच समर्थन दिलं, 'नीळकंठप्पांच्या समोर असा फोन करणं योग्य नाही. आपण दुपारी दोन-तीन तास ऑफिसबाहेर असतो हे त्यांना ठाऊक आहे; पण आपण त्या वेळी कुठं जातो याचा तपशील आपण कधी सांगितला नव्हता आणि त्यांनीही कधी विचारलं नव्हतं. तरी त्यांना काही संशय आलाच नसेल काय? यात कुणाला घाबरायचा प्रश्न नाही, पण उगाच फटकळ गप्पा मारायला कुणाला का संधी द्या? नाहीतरी उद्याचा दिवस आपण मैसूरमध्ये येणारच आहोत. त्या वेळी काहीतरी करता येईल.'

प्रत्यक्षात सगळी गावं फिरून, त्यांना विमानात बसवून, अखेरची बस धरून बेंगळुरूहून मैसूरला परतलेला सोमशेखर अतिशय दमला होता. घरी जाऊन कुलूप काढलं तेव्हा रात्रीचे साडेबारा वाजले होते. अंथरुणावर अंग टाकताच झोपेनं त्याला घेरलं. सकाळी जाग येताच मनात आलं, 'तिच्या घरी जायला पाहिजे.' पाठोपाठ आठवलं, 'आपण तिला फोन करून कळवलंही नाही.' तो कासावीस झाला. त्यानं ठरवलं, 'आधी तिला फोन करून घडलेली हकिकत सांगायला पाहिजे. दुपारी तिच्या घरी जाताना जुईचा गजरा न्यायला हवा.' सहा दिवसांपूर्वीचं तिचं बोलणं आठवून तिच्या आणखी निकट गेल्याच्या भावनेनं तो फुलून गेला. 'आता... या क्षणी स्कूटर घेऊन तिच्या घरी...' त्यानं घड्याळ पाहिलं. 'नाही. कॉलेजमध्ये गेली असेल. फोन करूनही काही फायदा नाही.' त्याचं मन निराश झालं.

तो ऑफिसमध्ये गेला. नीळकंठप्पांनी पाच दिवसांच्या कामाचा तपशील सांगितला. एका ठिकाणी त्यानं प्रत्यक्ष जाऊन येणं आवश्यक होतं. तिथं जाऊन आल्यावर साडेबारालाच नीळकंठप्पांना जेवायला पिटाळून त्यानं तिचा फोन नंबर फिरवला. तिनं रिसीव्हर उचलल्यावर त्यानं जे घडलं ते सगळं सविस्तरपणे तिला सांगितलं. ती काहीही प्रतिक्रिया न दर्शवता ऐकत होती. सगळं सांगून तो म्हणाला, "तुला राग आलाय हे ठाऊकाय मला; पण मी काही जाणूनबुजून तसं केलेलं नाही. मी आत्ता येऊ का?"

"तुमची यायची इच्छा नसताना मला का उगाच विचारता?" तिनं प्रतिप्रश्न केला.

"आता उगाच वाकड्यात शिरू नकोस. अर्ध्या तासात येतोच मी." म्हणत त्यानं फोन खाली ठेवला. मनात आलं, 'काहीही चूक नसताना चूक शोधून दोषारोप करणाऱ्याला किरकोळ का होईना, घडलेल्या चुकीसाठी क्षमा करण्याचा मोठेपणा कुठून असणार?' पण या विचाराला फारसं न गोंजारता तो जुईचा गजरा विकत घेऊन तिच्या घराकडे निघाला.

तो तिच्या घरापाशी पोहोचला तेव्हा ती दाराशी उभी नव्हती. त्यानं स्कूटरचं हँडल धरून गेट उघडलं तेव्हा सहा महिन्यांचं कुत्र्याचं पिल्लू भुंकू लागलं. तो आवाज ऐकून घराच्या मागच्या बाजूला गेटलगत असलेल्या कुत्र्याच्या घरातलं कुत्र्याचं पिल्लूही भुंकू लागलं. 'मी आल्याचं तिला समजलंय, तरी ती दार उघडायला आली नाही.' त्याला आल्या पावली निघून जावंसं वाटलं, पण पाठोपाठ वाटलं, 'राग आवरणं हे तिच्या कुवतीतलं नाही. मीही तसाच वागलो, तर माझ्यात आणि तिच्यात फरकच काय राहिला?' या विचारातच त्यानं दाराची बेल वाजवली. दार उघडलं नाही. ती दारापाशी उभी असल्याचं सावलीवरून दिसत होतं. त्यानं खिडकीतून पाहिलं. ती त्याच्याकडे पाहत होती, पण तिनं दार उघडलं नाही. त्यानं पुन्हा एकदा बेल वाजवली. खिडकीपाशी जाऊन म्हणाला, "दार उघड, दिसत नाही?" काचेतून आवाज आत गेला नाही, तरी ओठांच्या हालचालीनं तिला बोलणं समजावं या हेतूनं!

तिनं कडी काढली. दार लोटून तो आत गेला तेव्हा ती निश्चेष्ट बाहुलीसारखी उभी होती. स्वागताचं कुठलंही चिन्ह तिच्या चेहऱ्यावर उमटलं नव्हतं. ती पाऊलभरही हलली नाही. तिचा चेहरा आणि इतर अवतारावरून ती गेल्या पाच-सहा दिवसांत जेवली-झोपली नव्हती, हे स्पष्ट दिसत होतं. दाराला कडी घालून त्यानं तिला मिठीत घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ती स्वत:ला सोडवून घेऊन लांब उभी राहिली; पण त्यानं तिला न सोडता घट्ट धरून सांगितलं, "आडमुठेपणा करू नकोस. मी सांगतोय ते नीट ऐकून घे. माझ्या कंपनीचं नाव आहे ना 'शहा अँड शेखर' तो नवीन शहा आला होता. माझा मुंबईचा पार्टनर. म्हणून मला एकाएकी जावं लागलं."

"साहजिक आहे, मुंबईचे मित्र म्हटल्यावर आमची आठवण कशी राहील?" ती धुमसत म्हणाली.

"आठवण प्रत्येक क्षणी येत होती, पण फोन करायला मात्र जमलं नाही. तेच सांगतोय. परगावहून फोन करायचा म्हणजे तुझा नंबर, नाव सांगायला पाहिजे आणि नवीन सतत माझ्यासोबत असायचा." त्यानं तिच्या बोलण्यातील तिरकसपणाकडे मुद्दामच दुर्लक्ष करत सांगितलं.

ती स्वयंपाकघरात गेल्यावर तिच्यापाठोपाठ तोही तिथं गेला. त्याचा फोन आल्यानंतर फ्रीजबाहेर काढून ठेवलेली आमटी-भाजी तिनं गरम करायला ठेवली. कुकरची शिटी नुकतीच होऊन गेली होती. त्यानं विचारलं, "गेल्या पाच दिवसांत तू का जेवली नाहीस?"

"एवढं विचारण्याइतकी तरी माझी परिस्थिती समजली म्हणायची! थँक्स!" म्हणत तिनं फक्त त्याचं एकट्याचं पान वाढलं; पण त्यानं एकटं जेवायचं हट्टानं नाकारलं. अखेर एक ताटली घेऊन ती त्याच्या शेजारी जेवायला बसली.

काही घास पोटात गेल्यावर ती म्हणाली, "तुम्ही तुमची हकिकत सांगितली. आता इकडचंही सांगते. ऐका. त्या दिवशीचं सगळं बोलणं आठवतं? त्या रात्री मला झोप आली नाही. मन चित्र-विचित्र भावनेनं भरून गेलं होतं. एकीकडे ते खूप हळुवारही झालं होतं. त्या दिवशी पहाटे खूप लवकर उठून अंघोळ करून देवापुढे दिवा लावला. तुम्ही दुपारी याल म्हणून वाट पाहत राहिले. त्या दिवसाच्या माझ्या मन:स्थितीची तुम्हीच कल्पना करा. साडेबारा-पाऊण

वाजता तुम्ही यायच्या दिशेला एकटक पाहत गेटपाशी येऊन आतुरतेनं उभी राहिले. मान, डोळे भरून आले तरीही! मनात आतुरता आणि जसजसा वेळ जाऊ लागला तशी भीती दाटून राहिली होती. येताना वाटेत काही बरं-वाईट तर झालं नसेल? त्यात प्राणिसंग्रहालयालगतच्या वळणाची तर मला भयंकर भीती वाटते. कारमधून जाणं कितीतरी चांगलं. तिथं काही घडलं, तर आधी मशीनला मार बसतो. स्कूटरचं तसं नाही. तिथं आधी चालवणाऱ्याला मार बसतो. दोन तास अशाच मन:स्थितीत मी तुमची वाट पाहत होते. शेवटी न राहवून घरात आले आणि तुमच्या ऑफिसला फोन केला. नीळकंठप्पांनी सांगितलं, "मॅडम, ते गावात नाहीत, बेंगळुरूला गेलेत. पाच-सहा दिवसांनी येणार आहेत." "त्यांना आल्यावर निरोप द्या, फेन्सिंग घालायचंय." असा निरोप दिला, तरी आत कुणीतरी टोकदार भाला खुपसल्यासारखं झालं. स्वत:विषयी किती पराकोटीचा तिरस्कार वाटला ठाऊक आहे? तुम्हाला काय ठाऊक होणार म्हणा! मीच लोचट कुत्रीसारखी वागले. तुम्ही तर 'घाई नको' म्हणून सांगून सबुरीचा सल्ला देऊन निघून गेला होतात. मित्र येताच मला एक फोन करून निरोपही न देता तुम्ही निघून गेलात. मी कुत्री! कुत्रीसारखी तुमच्या वासावर आले. त्या कुत्रीपेक्षा तुच्छतेनं वागवलंत तुम्ही मला." बोलता बोलता तिचा कंठ दाटून आला. ती मोठ्यानं रडू लागली. तो घाबरला. डाव्या हातानं तिला थोपटून तिचं सांत्वन करत राहिला.

काही काळ तसाच गेला. ती पुन्हा म्हणाली, "आता समाधान करताहात. पण तेव्हा? कुत्रीहूनही हीन लेखून निघून गेलात तुम्ही.'

तिचं स्वत:ला कुत्री संबोधणं त्याला अस्वस्थ करत होतं. तो म्हणाला, "पण मी का आणि कुठं गेलो होतो ते सांगितलं ना?"

"आता सांगितलंत; पण त्या वेळी माझ्या मनात ती भावना निर्माण झाली हे काही खोटं नाही ना?"

"पण आता वस्तुस्थिती समजल्यानंतर त्या वेळी वाटलं ते भावनेच्या भरात, हे लक्षात आलं ना? मग पुन्हा का तेच तेच उगाळत राहतेस?"

"मी सांगितलं नाही, तर ते तुम्हाला कसं समजणार?"

"सत्याचा आधार नसलेली भावना समजून तरी काय होणार आहे?"

"माझ्या भावनांशी तुमचा काही संबंध नसेल, तर मला तुमच्याशी अवाक्षरही बोलायची इच्छा नाही." म्हणत ती ताडकन उठली आणि सिंकपाशी जाऊन हात धुवू लागली.

"काय हे तुझं बोलणं? तर मग माझंही जेवण संपलं." म्हणत तोही उठून सिंकमध्ये हात धुवू लागला. हात पुसत लाउंजमधल्या सोफ्यावर बसत असताना त्याच्या मनात येत होतं, 'असला कसला स्वभाव हिचा? हिच्या नादानं आपलीही कसली स्थिती झालीय ही!' त्याचं मन निश्चल होऊन गेलं होतं. गावाबाहेरच्या निर्जन जागेतलं ते घर कुणीतरी गळा आवळावं तसं नि:शब्द झालं होतं. घरात कुठंही तिचा वावर जाणवत नव्हता.

पंधरा-वीस मिनिटं अशा विचित्र स्तब्धतेत गेली. एकाएकी ती त्याच्या पुढ्यातच येऊन उभी राहिली आणि म्हणाली, “झाली का मला शिक्षा करून?”

त्यानं प्रश्नार्थक मुद्रेनं तिच्या चेहऱ्याकडे पाहिलं.

“जेवण निम्म्यावर का सोडलं?”

“तू का सोडलंस?”

“आता मी पुन्हा जेवायला बसले, तर तुम्ही बसाल?”

तो काहीच बोलला नाही. तिला काही उत्तर द्यायची त्याची मुळी इच्छा नव्हती. ती त्याच्याजवळ येऊन त्याला दोन्ही हातांनी वेढत म्हणाली, “सोमू, मी रागावले, तरी संयमानं वागण्याचा तू शब्द दिलायस ना? लक्षात आहे ना? चल!”

त्याचा दंड धरून तिनं त्याला बळेच जेवायच्या टेबलापाशी आणलं. पहिली दोन्ही उष्टी ताटं काढून त्या जागी तिनं एका ताटलीत कालवलेला दहीभात ठेवला होता. त्यावर एक चमचा होता. शेजारीच एका बोलमध्ये आईस्क्रीम ठेवलं होतं.

“त्या दिवशी तू येणार म्हणून मी आईस्क्रीम करून ठेवलं होतं. मुलांना देऊन उरलेलं तुझ्याबरोबर खायचं म्हणून डीपफ्रीजमध्ये ठेवलं होतं.” म्हणून तिनं त्याला बळेच खुर्चीवर बसवलं. तीही एक खुर्ची ओढून त्याच्या शेजारी बसली. दहीभाताचा एक चमचा त्याला भरवत आणि एक आपण खात तिनं दहीभात संपवला. त्यानं सोबत आणलेला जुईचा गजरा रुमालात गुंडाळून बाहेरच्या सोफ्यावर ठेवला होता. तिनंही ते पाहिलं होतं. दहीभात खाल्ल्यावर त्यानं तो गजरा आणून तिच्या वेणीत माळला.

ती खाली मान घालून स्तब्ध उभी होती. पुढं काय बोलावं हे न कळून तोही काही क्षण तसाच उभा होता. नंतर त्यानं तिचे दोन्ही दंड धरून म्हटलं, “अमृता, तुझी परवानगी नसेल, तर मी पुढं जाणार नाही.”

ती काही बोलली नाही. तो तिच्या संमतीची वाट बघत होता. काही क्षण स्तब्धतेत गेल्यावर त्यानं पुन्हा सांगितलं, “ऐकलंस ना? तुझ्या संमतीशिवाय मला काहीही नको.”

मान वर करून तिनं आपली संतापानं तीक्ष्ण झालेली दृष्टी एकवार त्याच्या चेहऱ्यावर फिरवली आणि पुन्हा दृष्टी जमिनीकडे वळवत ती म्हणाली, “परवानगी, संमती, होकार वगैरे करारांवर पावलं टाकत जाणाऱ्या माणसांशी मला कसलाच संबंध नको.”

अवाक्षर न बोलता त्यानं तिला मिठीत घट्ट आवळली आणि जवळजवळ उचलून तिला लाउंजमधल्या दिवाणावर नेऊन ठेवली. स्वत:चा संकोचाचा पापुद्रा दूर सारून, तिचा संकोच दूर करून तो उबदार ऐक्यात मग्न होऊन गेला. प्रथम सामिप्याची आतुरता आणि मूर्तिमंत साक्षात्काराच्या अतीव भावात बुडत असतानाही तिचं मौनपणे स्वत:ला संपूर्णपणे अर्पण करणं आणि त्याचा स्वीकार करणं हे अनुभवताना तो एक प्रकारच्या धन्यतेच्या भावनेत बुडून

राहिला होता. हा समागमाचा आनंद त्याच्याइतक्याच उत्कटपणे, नव्हे, त्याहून कितीतरी पटीनं ती घेत असल्याचं पाहून तो अधिक खुलत होता आणि तिला शांत करायचा प्रयत्न करत होता. आसमंतात जीवनातला परमोच्च आनंद थुई-थुई नाचत असताना आपण त्यात चिंब भिजत असल्याचा आनंद तिच्या सर्वांगातून उसळत होता. 'जीवन म्हणजे आनंद, अत्यानंद, परमानंद! इथं दु:खाला कणभरही प्रवेश नाही.' ही भावना तिच्यात नखशिखान्त भरून राहिली होती. अशा अद्भुत, उत्कट आनंदामध्ये मधूनच उमटणाऱ्या वेदनेलाही अपरिमित सुखाचं रूप देण्याची शक्ती असल्याचा आनंद ती सर्वांगानं घेत होती.

संपूर्ण जीवन आनंदात भिजवून स्वत: वितळून जावं अशा क्षणाला स्पर्श करत असतानाच तिच्या चेहऱ्यावर खोल गर्तेत कोसळत असलेले, पिळवटलेले भाव उमटले. मनाची एकाग्रता आणि अंतर्मुखता नष्ट होऊन त्यांची जागा अपराधित्व आणि तिरस्कारानं घेतली. तिच्यातला प्रत्येक बदल तितक्याच सूक्ष्मपणे जाणून घेऊन त्याचा अर्थ लागण्याआधी तो तिच्यापासून कितीतरी मैल दूर गेल्याचा त्याला अनुभव आला. घनदाट अंधारात हरवलेल्या अतिप्रिय व्यक्तीला शोधावं तशा त्यानं हलकेच हाका मारल्या, "अमृता! अमृता!"

पण ती तिथं नव्हती.

पुन्हा पुन्हा तिला हलवत, ती कुठं होती हे जाणून घ्यायचा आपल्याला हक्क आहे असं वाटून तो तिला हाक मारत राहिला. मधुमत्त भावनेत भिजलेल्या स्वरात त्याच्या हाकेला प्रतिसाद देण्याऐवजी तिरस्काराच्या तप्त ठिणग्या उडवत ती म्हणाली, "शांत झाली की नाही तुमची पाशवी वासना?"

या अचानक धक्क्यानं तो समूळ हादरून गेला. यातून स्वत:ला जेमतेम सावरायचा प्रयत्न करत असतानाच ती ताडकन उठली. त्याला लोटून जमिनीवर पडलेले कपडे खसकन ओढून घेत आपल्या बेडरूमच्या दिशेला धावली. धाडकन बेडरूमचा दरवाजा बंद झाला. आतून बोल्ट लावल्याचा आवाजही ऐकू आला. एकाएकी शांत घरातून आलेल्या या कर्कश्श आवाजामुळे बाहेरच्या दोन्ही गेटपाशी असलेली कुत्र्याची पिल्लं भुंकू लागली.

स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न करत तो कितीतरी वेळ दिवाणवर बसून होता. मनात आलं, 'किती रुक्ष बाई आहे ही!' स्वत:च्या अवस्थेच्या जाणिवेनं त्याला मेल्याहून मेल्यासारखं झालं. तो चटकन उठला. अंगावर कपडे चढवताना त्याला त्या क्षणी स्कूटर सुरू करून निघून जावंसं वाटलं. पुन्हा कधी त्या घरात पाऊलही न ठेवायचा त्यानं मनोमन निश्चय केला होता. 'ही कसली बाई म्हणायची? शुद्ध स्वार्थी स्त्री – पशूच! एका ताटात जेवत असताना आपलं पोट भरल्यावर साथीदाराची भूक भागली की नाही याचा विचार न करता समोरचं अन्न मातीत फेकून निघून जाणारी कजागीण ही!' सोफ्यापाशी असलेले मोजे-बूट चढवताना त्याच्या मनात आलं, 'रीत म्हणूनही 'येतो' म्हणून सांगायची लायकी नाही हिची! यानंतर तुझा-माझा संबंध नाही हेही सांगायची आवश्यकता नाही.'

बूट चढवून काही क्षण तो उद्विग्न होऊन बसला होता. तोच त्या नि:शब्दतेत वेढलेल्या घराच्या एका कोपऱ्यातून हुंदक्यांचा आवाज आला. तीच रडत असावी. बेडरूमच्या दाराशी जाऊन त्यानं कान दिला – 'होय. तीच रडतेय.' कुत्र्यांचा आवाज शांत झाल्यामुळे पसरलेल्या

गहिऱ्या शांततेत तिचे हुंदके अधिकच स्पष्ट ऐकू येत होते.

स्वत:ला आवरण्यात त्याला यश आलं आणि पाठोपाठ आठवलं, 'तिचा राग असाच एकाएकी भडकून आभाळाला भिडतो. डोळ्यांतून अश्रूंच्या रूपानं वाहून जातो आणि शांत होतो. आता ती रडतेय म्हणजे लवकरच तिचा राग शांत होईल. तिच्या रागाचं काही का कारण असेना. अकारण रागावणंही तिचा स्वभावच आहे म्हणा!' ती एवढी रडत असताना तिला टाकून निघून जाणं त्याला क्रूरपणाचं वाटलं. दार वाजवत त्यानं हाक मारली, "अमृता!"

आतल्या रडण्याचा जोर थोडा कमी झाला, पण तिनं उत्तर दिलं नाही. 'तिला आपला आवाज ऐकू आलाय हे नक्की." त्यानं पुन्हा हाक मारली, "अमृता, दार उघड."

आतून उत्तर आलं नाही.

"दार उघडलं नाहीस, तर मी इथंच उभा राहणार आहे. कितीही वेळ झाला तरी."

तरीही आवाज नव्हता.

तो तसाच कितीतरी वेळ उभा राहिला. पायांना रग लागली, तरी तसाच उभा होता. पाय चांगलेच ठणकू लागले, तरी एक खुर्ची ओढून त्यावर बसणंही टाळून तो उभाच राहिला.

एकाएकी दरवाजा उघडला गेला. ती दारात त्याची वाट रोखून उभी होती. आत नेलेले कपडे तिनं कसेबसे चढवले होते. विस्कटलेल्या केसांवरून तिनं कंगवा फिरवला नव्हता. कुंकवाचा फराटाही तसाच होता. मनावर महत्प्रयासानं ताबा मिळवलेल्या शांत स्वरात ती म्हणाली, "बूट घालून तयार झाल्यावर इथं थांबायची काहीही आवश्यकता नाही."

बूट घातले हे आपलं चुकलंच असं वाटून तो उगाच म्हणायचं म्हणून म्हणाला, "ऑफिसला उशीर झाला होता."

"तर मग निघून जायचं. कुणी ताटकळत थांबलं म्हणून मला काहीच फरक पडत नाही."

कुणीतरी थोबाडात मारावं तसं त्याला झालं, तरी त्यामुळे येणारा राग त्याला आला नाही. तसूभरही न हलता तो जागीच उभा होता. तिचा तर संपूर्ण देह संतापाच्या आधीन होता. काही क्षण स्तब्धतेत गेल्यावर ती त्याला म्हणाली, "मिस्टर सोमशेखर, मला तुमच्याशी एका गंभीर विषयावर बोलायचंय."

तो मुकाट्यानं ऐकत होता.

"तुम्हाला विवाहितेशी असला खेळ खेळायचा अनुभव आहे असं तुम्हीच सांगितलं होतं. जितका जास्त अनुभव तितकी माणसाची संवेदना बधिर होऊन जाते. तुम्ही माझ्याशी असे वागलात, तेव्हा यापुढे हिला नवऱ्यापुढे ताठ मानेनं उभं राहणं मी अशक्य करत आहे, या विचाराचा लवलेशही तुमच्या मनात आला नाही? तुम्ही मला तुमच्या त्या मुंबईत भेटलेल्या बाईच्या जातीतली समजलात काय?"

त्याचं नीतिधैर्य आणखी खचलं. आत कुठंतरी तिचं बोलणं बोचलं. 'खरंय तिचं.' त्याला स्वत:चाच पराकोटीचा तिरस्कार वाटला. त्यानं चौकटीचा आधार घेतला.

काही क्षण तसेच गेले. एकाएकी त्याला घडलेल्या घटनेचा सगळा तपशील क्रमवार आठवला. त्याचा आत्मविश्वास पुन्हा जागृत झाला. चौकटीचा आधार सोडून ताठ उभं राहत सरळ, पण ठामपणे तो म्हणाला, "अमृता, जे घडलंय त्याला दोघंही जबाबदार आहोत. मी तुला परोपरीनं तुझी संमती नसेल, तर मला काहीही नको म्हणून सांगितलं होतं. तुझा यात माझ्याइतकाच सहभाग होता. सहा दिवसांपूर्वी 'घाई नको' हे मी म्हटलं होतं; तू नव्हे."

"पण विवाहितेला प्रत्यक्ष नव्हे, मनानंही स्पर्श करू नये याची तुम्हाला जाणीव नको होती का?" तिनं पुन्हा त्याच्यावर आरोप केला.

आता मात्र त्याचा संयम संपला. तो ताडकन म्हणाला, "आपण विवाहित आहोत याची जाणीव तुला हवी होती, मला नव्हे."

ती स्तब्ध झाली. तिचा चेहरा लालबुंद झाला. डोक्यात सुईई आवाज होऊन उष्ण द्राव भरत असल्यासारखं होऊन तिला तोल राखून उभं राहणंही कठीण झालं. ती दारावर भार टाकून उभी राहिली. 'आपल्याला या जगात कुणीही नाही. आपला भार अंगावर घेणारं कुणी नाही.' तिचं मन एकाकीपणाच्या भावनेनं भरून गेलं होतं. तिच्या मिटलेल्या डोळ्यांसमोरचं शून्य मोठं-मोठं होत होतं. ती त्यात पूर्णपणे वितळून जात होती.

तिची ती अवस्था बघून तो चक्रावला. 'आपण काही जास्तच कठोर बोललो काय? पण नैतिकतेचा फास फेकून हिसडा देणाऱ्या तिच्या वागण्यापुढे दुसरा पर्याय तरी काय होता? शिवाय आपण तिला वस्तुस्थितीची फक्त जाणीव करून दिली, एवढंच!' तो तसाच उभा होता. स्कूटर घेऊन निघून जावंसं वाटलं; पण तसं करणं म्हणजे अनैतिक आरोपांचा स्वीकार करून पळून जाणं ठरलं असतं. त्याच्या मनात प्रचंड हट्ट निर्माण झाला आणि तो तसाच उभा राहिला.

एवढ्यात तिची मान वर झाली. दाराचा आधार सोडत ती ताठ उभी राहिली. आजवर कधीही न दिसलेला विचित्र भाव, धूसर दिव्याप्रमाणे उजेड बाहेर टाकण्याऐवजी आत शोषत असल्यासारखा दिसू लागला. दबलेल्या, पण दृढ आवाजात तिनं त्याला बजावलं, "आत याल तर याद राखा. खबरदार उंबरा ओलांडून आत आलात तर!"

दरवाजा तसाच उघडा ठेवून ती बेडरूममध्ये धावली. त्याला उभ्या जागेवरून तिथली भेगाळलेली, शेवाळलेली गाऱ्याची जमीन दिसत होती. खोलीच्या मध्यभागी भिंतीकडे उंच भाग ठेवलेला श्रीमंती थाटाचा जुना लाकडी पलंग होता. त्याच्या उशालगत असलेल्या शेल्फच्या छोट्या कप्प्यातून तिनं रिव्हॉल्वर बाहेर काढलं.

ते पाहताच त्याला बसलेला धक्का साधा नव्हता.

तिनं ते हातात घेताच ते हाताळण्यात ती सराईत होती, हे क्षणार्धात त्याच्या लक्षात आलं.

तिच्या हाताशी असं एखादं जीवघेणं हत्यार असू शकेल, हे त्याच्या ध्यानीमानीही नव्हतं. हातात सराईतपणे रिव्हॉल्वर घेऊन ती त्याच्या दिशेला येऊ लागली तेव्हा त्याचे हात-पाय गार पडले. आणखी दोन-तीन क्षणांत आपण या जगातून कायमचे नाहीसे होऊ हे स्वच्छ दिसत असल्यामुळे त्याच्या मणक्यातून एक थंडगार प्रवाह धावला. पटकन दार बंद करून, बाहेरची कडी घालून, स्कूटर घेऊन जीव वाचवायचा विचार मनात आला, तरी त्याची पावलं जमिनीला खिळून होती. आत कुठंतरी त्याच्या मनानं तशी परवानगी दिली नाही. कपाळ आणि मानेवरची घामाची धार कॉलरमधून आत गेल्याचं जाणवत असतानाच वाटत होतं, 'मी मेल्यामुळे काय फार मोठं होणार आहे?'

ती दृढ पावलांनी पुन्हा दारापाशी आली आणि त्याच्या चेहऱ्यावर दृष्टी खिळवून म्हणाली, "होय! मी हे विसरायला नको होतं! तुम्ही मला माझी लायकी दाखवून दिलीत! मला जगायचा अधिकार नाही याचीही तुम्ही मला जाणीव करून दिलीत! हे रिव्हॉल्वर आता माझी सुटका करेल. क्षणभरही न थांबता तुम्ही इथून निघून जा. नमस्कार! अखेरचा नमस्कार!" एवढं सांगून ती गर्रकन आत वळली आणि तिनं धाडकन दार ओढून आतून कडी घातली.

काही क्षणांपूर्णी त्याच्या कपाळ आणि मानेवर घामाचे ओघळ वाहिले होते. आता मात्र त्याचे आतले कपडेच नव्हे, तर अंगातला शर्टही घामानं थबथबला. सर्वांगाला मुंग्या आल्या. त्यानं अभावितपणे दरवाजा बडवायला सुरुवात केली. आतून शांततेशिवाय दुसरा कसलाही प्रतिसाद आला नाही. त्यानं पुन्हा दार वाजवून तिला हाक मारली, "अमृता, दार उघड! माझं चुकलं असेल, तर मला सांग. पुन्हा मी तसा वागणार नाही. दार उघड! शपथ आहे माझी."

आतून कुठलंही उत्तर ऐकू आलं नाही. त्याचा चढलेला आवाज आणि दरवाजाचा आवाज यामुळे दोन्ही कुत्री भुंकू लागली. त्यामुळे तो आणखी गडबडून गेला. गयावया करत तो तोंडाला येईल तशी विनवणी करत होता, "दार उघड अमृता! माझी शपथ आहे! देवाची शपथ! तुझी शपथ! हे बघ, तू जिवंत राहिलीस, तर आपण काहीतरी बोलू शकू. तुझ्या माघारी मीही जगणार नाही. लक्षात ठेव! ऐकू आलं ना?"

त्याचा आवाज आणखी चढला. कुत्री आणखी जोरानं भुंकू लागली. 'किती विचित्र परिस्थितीमध्ये अडकलो!' अशी भावना त्याच्या मनात दाटून राहिली होती. तो आपोआप ओरडायचा थांबला. पाठोपाठ कुत्र्यांनी भुंकणं आवरतं घेतलं. काही मिनिटांचं संपूर्ण मौन पसरलं. त्याला एकाएकी रडू फुटलं. 'आपला जिच्यावर जीव जडला आहे, जिनं काही क्षणांपूर्वीच आपल्या जीवनात जाई-जुईचा गंध भरला आहे, ती अमृता नावाची तरुणी आपलं सुकोमल शरीर रिव्हॉल्वरनं नष्ट करण्यासाठी आतुर झाली आहे!' या विचित्र वास्तव्यात त्याला त्याचा तिच्यावर जीव जडलाय म्हणजे काय हे प्रकर्षानं जाणवलं. 'देवा, तिच्या मनात विवेक जागू दे. ट्रिगर दाबायच्या क्षणी तिच्या मनात काहीतरी परिवर्तन होऊ दे. चेंबरमध्ये गोळीच नसू दे. अकस्मात तिचा नेम चुकून गोळी खिडकीबाहेर जाऊ दे!' तो मनोमन व्याकूळ होऊन प्रार्थना करू लागला. आपला देवावर विश्वास आहे की नाही हा बौद्धिक प्रश्न तिथं न राहता आतून श्रद्धेची भावना निर्माण होत होती.

ती भावना ओसरली. तो थोडा शांत झाला. आतून काय आवाज येतो इकडे त्यानं कान टवकारले. मृत्यूची नि:शब्दता सगळ्या घराला वेढून राहिल्याचं त्याला जाणवत होतं. आता

कुत्रीही भुंकत नव्हती. 'कुठल्याही क्षणी आतून गोळी सुटल्याचा आवाज येईल' या विचारानं तो अर्धमेला झाला होता. त्याला स्वत:च्या छातीची धडधड स्पष्ट ऐकू येत होती. एकेक क्षण चालला होता. त्यातल्या कुठल्याही क्षणी रिव्हॉल्वरचा आवाज... त्याला घड्याळाची प्रत्येक टिक टिक रिव्हॉल्वरच्या आवाजासारखी वाटू लागली.

एकाएकी त्याच्या मनात आणखी एक भीती उमटली. 'हिनं खरोखरच आता स्वत:ची हत्या केली, तर पोलीस मला पकडल्याशिवाय राहणार नाहीत. मी दररोज या वेळी इथं येतो हे शोधून काढणं त्यांना कठीण नाही. या क्षणी मी स्कूटर घेऊन निघून गेलो तरी माझ्यावर संशय येणार हे नक्की! मृत्यू गोळीमुळे झाला असला, तरी शवचिकित्सेत मृत्यूपूर्वी काही वेळ आलेल्या शरीरसंबंधाचे पुरावे सापडल्याशिवाय राहणार नाहीत! मी तिची अब्रू लुटल्यामुळे तिनं आत्महत्या केली अशी कथा रचून माझ्यावर केस करणं त्यांना सहज शक्य आहे. मग वर्तमानपत्रांमधून 'आर्किटेक्ट सोमशेखर यांना खुनाच्या आरोपाखाली अटक!', हातात बेड्या घातलेला फोटो! माझी ही अवस्था व्हावी म्हणूनच तिनं स्वत:वर गोळी झाडून घेतली तर? त्याऐवजी तिनं माझ्यावर सगळं रिव्हॉल्वर रिकामं केलं असतं, तरी बरं झालं असतं.' आता तिथून निघून जाणं अधिकच धोक्याचं होऊन बसलं होतं. त्यानं पुन्हा एकदा कळवळून हाक मारली, "अमृता... अमृता... दार उघड. माझी शपथ आहे. मी इथं वाट पाहतोय तुझी. दार उघड."

आतली नीरव शांतता तशीच होती. आता कुत्रीही भुंकली नाहीत. तो काही वेळ काहीच न सुचून देवाची मनोमन आळवणी करत राहिला. नंतर त्यानं हलकेच पायातले बूट काढून ठेवले. पावलांचा आवाज होणार नाही याची काळजी घेत पुढचा दरवाजा उघडून तो मागच्या बाजूनं तिच्या बेडरूमच्या खिडकीपाशी आला. 'चुकून खिडकीचा दरवाजा उघडा असेल, तर ती आता काय करतेय ते तरी दिसू शकेल किंवा आपल्याला बघून तिचं मनही कदाचित बदलेल.' पण तिथली खिडकी बंद होती. उन्हामुळे त्या बंद खिडकीच्या रंगाचे पापुद्रे पडून गेले होते.

तो गेले काही दिवस तिच्या घरी नियमितपणे येत असला, तरी तिनं त्याला कधीच तिच्या बेडरूममध्ये नेलं नव्हतं. तोही कधी गेला नव्हता आणि तशी इच्छाही सुचवली नव्हती. त्यानं बंद खिडकीतूनच आतला आवाज ऐकायचा प्रयत्न केला; पण काहीही ऐकू आलं नाही. बेडरूमला लागूनच असलेल्या बाथरूममधून काही आवाज ऐकू येतो का, ते त्यानं कान टवकारून पाहिलं. फार जवळ मात्र तो गेला नाही. 'आपण असं चोरून पाहत असल्याचं तिच्या लक्षात आलं, तर तिच्या मनात आपल्याविषयी तिरस्कार निर्माण होईल.' असं त्याला वाटलं. गुरगुरणाऱ्या कुत्र्यांकडं दुर्लक्ष करून तो पुन्हा पुढच्या दारानं आत जाऊन बेडरूमच्या दारापाशी गेला. पायात बूट चढवताना त्याच्या मनात धैर्य निर्माण झालं.

'तिला आत्महत्या करायची असती, तर एव्हाना तिनं रिव्हॉल्वर झाडल्याचा आवाज ऐकू आला असता. म्हणजे तिचा संतापाचा जोर उतरलाय. आता तेवढी भीती नाही.' काही वेळ तो तसाच उभा राहिला. पाय ठणकू लागल्यावर तिथंच जमिनीवर तो काही वेळ बसला. मग त्याला थोडं बरं वाटलं. मनही किंचित हलकं झालं.

आपल्या घरात रिव्हॉल्वर असल्याचं आजवर तिनं कधीच सांगितलं नव्हतं. त्यानं जेव्हा "गावाबाहेर विरळ लोकवस्ती असलेल्या या अवाढव्य बंगल्यात लहान मुलांना घेऊन तू

एकटीच कशी राहतेस?" म्हणून चौकशी केली होती, तेव्हा तिनं सांगितलं होतं, "मला नाही भीती वाटत!" कॉफी मळ्यात राहायची पहिल्यापासून सवय असल्यामुळे बंदूक, रिव्हॉल्वर हाताळायची तिला सवय असलेली दिसत होती. 'तरीही एवढ्या मोठ्या घरात मुलांना वेगळं झोपवून ती स्वत: एकटी झोपते. या मलेनाडच्या लोकांना असं एकटं राहायची सवय पहिल्यापासूनच असते म्हणा!'

मनात इतर विचारही येऊ लागले तशी भीती कमी होऊ लागली. छातीची धडधड आता पूर्ववत झाली होती. मनानं ग्वाही दिली, आता घाबरायचं कारण नाही. तरीही तो बेडरूमच्या दारातून हलला नाही.

काही वेळ अशा शांततेत गेल्यावर बेडरूममधून कसलासा आवाज ऐकू येऊ लागला. त्यानं कान टवकारले. बेडरूमलगतच्या बाथरूममधून तो आवाज ऐकू येत होता. सतत पडणाऱ्या पाण्याचा आवाज. अंहं- शॉवरचा आवाज! त्यानं पुन्हा बाहेरून जाऊन बेडरूमच्या खिडकीवर सावली पडणार नाही अशा सावधगिरीनं ऐकलं. होय. अंघोळ करतेय. आतल्या गरम पाण्याच्या वाफेनं खिडकीची काचही धूसर झाली होती. आता किंचितही घाबरायची गरज नाही असं वाटून तो पुन्हा पूर्ववत आपल्या जागेवर आला. ही काही तिची नेहमीची अंघोळीची वेळ नव्हे. सकाळी एकदा अंघोळ केल्यावर ती पुन्हा अंघोळ करत नाही. मग आज - अंग घामेजलं म्हणून ही या वेळी अंघोळ करतेय की, शरीरसंबंधाची किळस वाटून! या अंघोळीद्वारे ती आपल्या भावसंबंधांविषयी तिरस्कार दर्शवीत आहे असं त्याला वाटलं.

तो अजूनही तसाच उभा होता. अजूनही शॉवरचा आवाज ऐकू येत होता. एवढ्या पराकोटीच्या अपमानानंतर पुनश्च हिच्या दारात पाऊल ठेवायचं नाही असा त्यानं निश्चय केला. तरीही तो तसाच उभा होता.

पाण्याचा आवाज थांबला. बॉयलरमधलं पाणी संपलं असावं. काही क्षणानंतर आतला कुठलासा दरवाजा उघडल्याचा आवाज ऐकू आला. वॉर्डरोबचा असावा. तो तसाच उभा राहिला; पण आता आतल्या आवाजांकडे लक्ष देण्याची निकड राहिली नव्हती.

दहाएक मिनिटांनी ती धाडकन खोलीचा दरवाजा उघडून बाहेर आली. डोक्यावरचे केस अर्धवट ओलसर होते. अंगावर फिक्या पिवळ्या रंगाची इस्त्रीची साडी. स्वच्छ शुभ्र चेहरा. भुवयांमध्ये साडीला शोभणाऱ्या रंगाचं कुंकू. डाव्या हातात व्हॅनिटी बॅग- तिनं संतापानं त्याच्याकडे पाहिलं. तो तिच्या नजरेला नजर मिळवू शकला नाही. 'मी मुलांना आणायला चाललेय–' म्हणत ती बाहेर दाराकडे वळली. अवाक्षरही न उच्चारता त्यानंही पावलं उचलली. दार उघडून तो बाहेर पडला, गेट उघडलं आणि स्कूटर स्टार्ट करून मागं वळूनही न बघता त्यावर स्वार होऊन वेगात निघून गेला.

ही नरम मऊ गादी. उजव्या हाताच्या पकडीतल्या रिव्हॉल्वरच्या नळीचा, उजव्या कानशिलावरचा थंडगार गोलाकार स्पर्श. अजून ट्रिगरवरची तर्जनी तशीच

खिडक्यांची तावदानं बंद असल्यामुळे बाहेरचा आवाज आत यायचा प्रश्नच नव्हता. जरी किंचित आवाज आत आलाच असता, तर खिडकीपेक्षा दोन विती लांब असलेले जाड पडदे तो

अडवून शोषून घेऊ शकला असता. आत केवळ मृत्यूलाच शक्य असलेलं किण्ण मौन! 'मागे कितीतरी वेळा अंगावर चालून आलेली केवळ लहर नाही ही! या क्षणी, या वेळी मरण अटळ आहे. मरायलाच पाहिजे. जगायचं म्हणजे किती विचित्र हिंसा ही! शारीरिक वेदना सहन करता येईल. कॅन्सरची प्राणघातक वेदना कशी असते कोण जाणे? पण तीही सहन करणं शक्य आहे. पण ही वेदना... अचानकपणे अंतर्मनातल्या शून्यातून जन्म घेऊन गरगरत सगळीकडे किण्ण शून्य भरून टाकणारी यमयातना किती म्हणून भोगायची? आणि का? फक्त एक सेकंद! ट्रिगरवरचं बोट किंचित खेचायचं. बस्! कुठलीही वेदना न होता जीव जायची जागा ही कानशिलावरचीच! मग थेट कवटीला भोक पाडून आतल्या मेंदूचा चेंदामेंदा! दु:खाच्या जाणिवेनं कायमचा अंत! मग काही जाणवायचा प्रश्नच नाही. पोट, छाती, मान... अंऽहं! कुठंही गोळी झाडली, तरी वेदनातीत मृत्यू शक्य नाही. प्रत्यक्ष डॉक्टरांनीच गप्पा मारताना कानशिलावरच्या जागेचं वेदनातीत मृत्यूच्या दृष्टीनं स्थान सांगितलं आहे. आता उगाच जास्त वेळ का घालवायचा? जेवढा वेळ जाईल तेवढी वेदना अधिक. मरायच्या आधी... होय. विसरलेच. जग सोडून गेले तरी माझ्यापायी आणखी कुणालाही त्रास नको पोलिसांचा; पण किती वेळा तेच-तेच लिहायचं? नको. अशा वेळी आत्महत्येची वेळ आणि दिवस महत्त्वाचा!'

तिनं उठून पॅड घेतलं. तेही लांब नव्हतं. रिव्हॉल्वरच्याच कप्प्यात होतं. खरंतर उठायचीही गरज नव्हती. बसल्या जागेवरून वाकून ती लिहू लागली. जगायची किळस आल्यामुळे मी स्वत: माझ्या रिव्हॉल्वरने कानशिलावर गोळी झाडून दुपारी तीन... तिनं घड्याळ पाहिलं... तीन वाजून साडेतेरा मिनिटांनी... 'या कागदाखाली असेच आणखी कितीतरी कागद आहेत. किती? आता ते मोजून काय होणार आहे? तीच वाक्यरचना. सगळे आत्महत्या करताना लिहितात तसा व्यक्तिमत्त्वहीन मजकूर. नवा कागद लिहायचीसुद्धा गरज नाही. जुन्याच एखाद्या कागदावरची तारीख आणि वेळ बदलली की काम झालं! पण मी ही सगळी एकाच मजकुराची पत्रं का तशीच ठेवली आहेत? कुणाला पाहिजे मी गेल्या दहा वर्षांत कुठल्या कुठल्या दिवशी शून्य भावात गरगरत होते ते? दार उघडून पोलीस आत येतील तेव्हा त्यांच्या दृष्टीला लगेच पडेल. हो. कॉटवरची जागाच योग्य आहे. दरवाजा वाजवतोय. जीवनाशी बांधून ठेवणारा नैतिकतेचा धागा तोडून मला मरणं अनिवार्य करणाराच आता गयावया करतोय! पोलिसांचा ससेमिरा मागं लागेल म्हणून हा मला अमर्याद सुख देणारा...छे! मुळीच नाही... स्वत: सुख ओरबाडून घेणारा... नको हे पत्र लिहायला. मग पोलीस त्याला पकडून घेऊन जातील आणि योग्य ती शिक्षा करतील! हा नसता, तर मी अशी अनिवार्य मरणापाशी येऊन ठेपले नसते. शिक्षा व्हायलाच पाहिजे याला. कसा तोंड वेंगाडून विनवण्या करतोय! भेकड, लाचार! पण कुणालाही त्रास व्हायला नको. प्रेमाचं नाटक तर किती छान करतो! छे:! उगाच उशीर होतोय. अर्धा सेकंदही लागणार नाही ट्रिगर ओढायला; पण मृत्युपत्र न करता मेले की, नवऱ्यालाही बायकोच्या संपत्तीत वाटा मिळणार. नाहीतरी मुलं सज्ञान होईपर्यंत तोच पालक!

'विजयला अठरा तारखेला आठ पूर्ण होतील, विकास पाच वर्षांचा होईल. रक्त आटवून व्याज भरत राखलेला एवढा मोठा कॉफीचा मळा त्यांच्यासाठी कोण राखून ठेवील?'

एव्हाना ते उत्कट शून्य गरगरत नष्ट होऊन गेलं होतं. पुन्हा रिव्हॉल्वरला हात लावायची तिची इच्छा झाली नाही. 'आता आपण मरताना मुलांची जबाबदारी कुणावर टाकायची? सोमशेखरवर? छे:! अगदी अयोग्य माणूस. नैतिकतेचा धागा तोडून ट्रिगर ओढायची वेळ

आणणारा माणूस! नीच! पण पैशांच्या बाबतीत प्रामाणिक. पुन्हा दरवाजा वाजवतोय. या कुत्र्यांना मनातलं समजतंय की काय?

'अगदी मृत्युपत्र केलं नाही, तरी तोच मुलांना निश्चित सांभाळेल, शिक्षण देईल. मुलांचापण बापावर जीव आहे. हा त्यांना 'तुमची आई छिनाल होती' म्हणून सांगून सुखानं दुसरं लग्न करून... मुलंबाळं... रास्कल! पण हे म्हणायचा अधिकार काढून घेणारा नीच सोमशेखर... जेलमध्ये जाऊ दे त्याला. गेला वाटतं. पुन्हा शांत! नि:शब्द! कॅन्सरच्या वेदनेपेक्षा अधिक यमयातना. यमच आता सुटका करेल. एक इंजेक्शन टोचलं की, अर्ध्या मिनिटाच्या आत... तेवढं कशाला? ट्रिगर ओढला की, अर्धा सेकंद पुरेसा आहे. मग वेदनेचं स्विच बंद... निश्चित निघून गेलाय तो. एवढा आनंद भोगायला मिळाला!

'गालाची ठेवण, नाक, कपाळ, डोळे सगळ्या बाबतीत स्वत:चंच साम्य सांगतील अशी मुलं माझ्या पोटी जन्माला घालून निघून गेलाय. संपत्ती त्यांना मिळाली काय किंवा कुत्र्या-लांडग्यांनी खाल्ली काय, सारखंच! त्याला किंवा त्यांना काहीही मिळू नये असं काहीतरी करायला पाहिजे. वकिलांना भेटायला पाहिजे.

'देवा रे! तू आहेस हे खोटं नसेल, तर मला का या नरकयातना? आतड्यात लोखंडी काटे टोचून होणाऱ्या वेदना किती म्हणून भोगायच्या? देवा रे, तू नाहीस. कुणीच नाही. काहीच नाही. फक्त दु:ख आणि वेदना आहे. मारून मरायलाही न सोडणारी ही यमयातना! अंहं! नाही. डोळ्यांत पाणी आणायचं नाही. रडायचं नाही. तो बाहेर असेल. त्याला ऐकू जाता कामा नये. कुणाच्याही पुढ्यात रडायचं नाही. मन घट्ट! कुणाचीही सहानुभूती नको. प्रेम नको. ती फसवणूक... अंघोळ... शब्द नकोत. कासवासारखं आत, आत समाधिस्थ!'

एव्हाना त्याच्यासमोर उभं राहून मान वर करून बोलायची शक्ती नष्ट होऊन गेली होती. पुन्हा चाल करून येणाऱ्या शून्य भावनेच्या जाणिवेनं रडू फुटलं. 'तो दाराशी उभा असेल, तर त्याला ऐकू जाईल.' अशी भीती वाटून ती अंथरुणावर रिव्हॉल्वर ठेवून न्हाणीघरात गेली. आणखी-आणखी आतून रडू येत होतं. दोन्ही भिंतींचा आधार घेऊन ती हुंदके देत होती. हुंदके बाहेर ऐकू जाऊ नयेत म्हणून तिनं तोंडात टॉवेलचं टोक कोंबून ठेवलं. एकाएकी तिच्या मनात आपलं गलिच्छ शरीर स्वच्छ धुवायची इच्छा झाली. बॉयलरचे गरम-गार पाण्याचे नळ सुरू करून ती नेसत्या कपड्यांनिशी शॉवरखाली उभी राहिली. तिच्या केसांवर, अंगावर शॉवरचं पाणी पडू लागलं.

असा किती वेळ गेला याचं तिला भान नव्हतं. मनात एक प्रकारचा विश्वास उमटला. शरीरावरचं अमंगळ धुतलं जाऊन शरीर पुन्हा शुचिर्भूत होत असल्याच्या भावनेनं ती समाधानी झाली. भिजलेले कपडे काढून सतत स्रवणाऱ्या शॉवरखाली उभं असता अंतर्मुख होऊन आतलं भेडसावणारं शून्य निरखायचा प्रयत्न करताना यातना कमी झाल्याचं तिला जाणवू लागलं. केसांना शांपू, अंगाला साबण लावायचंही तिला भान नव्हतं. बॉयलरमधलं गरम पाणी संपून फक्त थंड पाणी येऊ लागलं तरीही ते तिच्या जाणिवेपर्यंत पोहोचलं नाही.

वरची पाण्याची टाकी रिकामी होऊन शॉवर बंद झाला. टॉवेलनं अंग आणि चेहरा पुसून ती बेडरूममध्ये आली. भिंतीवर नि:शब्दपणे चाललेल्या घड्याळाकडे तिचं लक्ष गेलं. ओह!

मुलांना शाळेतून आणायची वेळ टळून गेली होती. तिनं एका जाड टर्किश टॉवेलनं केस खसखसून पुसले, घाईघाईनं कपडे घातले. रिव्हॉल्वरला पूर्ववत लॉक केलं आणि आत्महत्या पत्रांच्या पॅडसह ते कॉटशेजारच्या कपाटात ठेवून कुलूप लावलं. चावी गळ्यातल्या साखळीत अडकवली आणि उंच टाचांच्या चपलांचा अधूनमधून भेगाळलेल्या गाऱ्याच्या जमिनीवर चटचट आवाज उठवत तिनं बेडरूमचा दरवाजा उघडला. तो अजूनही दारात उभा होता.

मनाच्या एका अनामिक कोपऱ्यात समाधान उमटलं, तरी दुसऱ्या बाजूला संताप जळफळला. तिरस्कार उसळला.

मागंही वळून न पाहता तो निघून गेला तेव्हा त्याच्यापाठोपाठ कार स्टार्ट करताना तिच्या मनात आलं – 'गेला तर जाऊ दे. माझं जीवन कुणावरही अवलंबून नाही. मला कुणाचीही गरज नाही.'

वृंदावन स्कूल आणि बालभवन बंद होऊन अर्धा तास झाला होता. शाळा बंद व्हायच्या वेळेपर्यंत पालकांनी मुलांना नेलं नाही, तर तिथं लगतच राहणाऱ्या शिक्षिका सुशीलम्मा त्यांना आपल्या घरी घेऊन जात.

आईची गाडी दिसताच छोटा विकास धावत आला आणि तिनं मागं वळून मागच्या दाराचं लॉक उघडण्यासाठी तो हँडल ओढू लागला. त्याच्यापाठोपाठ दप्तराचं ओझं पाठीवर घेतलेला विजय सावकाश आत चढला. सुशीलम्मांनी मुलांचे डबे तिच्याकडे देत मुलांना सुखरूप तुमच्या हवाली केलंय असं सुचवलं. गाडी निघाली. चेहऱ्यावर आनंद दर्शवत अमृतानं चौकशी केली, "आज काय-काय खेळली माझी लेकरं?"

तिच्या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजी विजयनं विचारलं, "अम्मा, या वेळी का डोक्यावरून अंघोळ केलीस तू?"

"सकाळीच न्हाले होते रे, पण तेल लावलं नव्हतं तेव्हा." ती उत्तरली.

"पण केस टोकाशी ओले आहेत."

"अरे हो! गणिताची काहीतरी अडचण आहे म्हणत होतास ना? आज मॅडमना विचारलंस की नाही?" तिनं विषयांतर केलं, पण खोटं बोलून लहान मुलाच्या हाती सापडल्याच्या भावनेनं ती अस्वस्थ झालीच.

घरी आल्यावर दोघांनाही उप्पीट-आईस्क्रीम खायला देऊन तिनं शाळेत काय-काय झालं याची चौकशी केली. अभ्यासात नवं काय शिकवलं ते विचारलं. नंतर मुलांना आणि कुत्र्याच्या दोन्ही पिल्लांना चेंडू टाकून खेळायला लावलं. अगदी सारख्या दिसणाऱ्या या पिल्लांवर मुलांचा भारी जीव होता. विक्रांत आणि विश्वास अशी त्यांची नावं ठेवली होती. ही नावं ठेवताना तिनं मुलांशी भरपूर चर्चा केली होती. विजयचा विक्रांत आणि विकासचा विश्वास हेही ठरवलं होतं.

गावाबाहेरच्या मोठ्या प्लॉटवर असलेल्या निर्जन प्रदेशानं वेढलेल्या या प्रदेशात राहताना येणाऱ्या गैरसोयींची तिला पुरेपूर कल्पना होती. स्वयंपाक आणि इतर कामासाठी येणाऱ्यांच्या

दृष्टीनं गैरसोयीची जागा. मुलांना बरोबरीच्या मुलांची सोबत-संगत नाही. शिवाय सुरक्षिततेच्या दृष्टीनंही हा धोक्याचा प्रदेश; पण भल्याथोरल्या कॉफी मळ्यामध्ये तिचं बालपण गेल्यामुळे तिला ही जागा निर्जन आहे असं जाणवतच नव्हतं. पुट्टम्मा नावाची एक बाई सकाळी आठ वाजता येऊन दोन्ही वेळचा स्वयंपाक करून ठेवत असे. शिवाय मुलांच्या डब्याची, मधल्या वेळेच्या खाण्याची जबाबदारीही तिच्याकडेच होती. आठवड्यातून एखाद्या दिवशी ती आठ दिवस पुरेल असा एखादा पदार्थ करून ठेवत होती. तिच्याबरोबर महादेवम्मा येऊन सर्व घराचा केर काढत होती. त्याचबरोबर फरशी पुसणं, बागेतला कचरा काढणं, झाडांना पाणी देणं वगैरे कामंही करत होती. घराची एक चावी पुट्टम्मापाशी असे. त्या दोघींच्या पगारामध्ये ती कधीही हयगय करत नसल्यामुळे दोघीही ठरलेल्या वेळी येऊन आपापली कामं करून जात. दोघीही, त्यातही पुट्टम्मा स्वभावत: प्रामाणिक होती.

अलीकडे अमृता एकलेपणाच्या प्रेमातच पडली होती. आकाशाला भिडणाऱ्या चामुंडी टेकडीच्या पार्श्वभूमीवर एकलेपणाचा दाट अनुभव देणारं हे घर सोडून आणखी कुठं जायची तिची इच्छाही नव्हती.

रात्री जेवण झाल्यावर लाउंजमधल्या दिवाणावर बसून मुलांना गोष्ट सांगणं, गोष्ट ऐकता ऐकता मांडीवर झोपी गेलेल्या मुलांना नंतर एकेक करून त्यांच्या स्वतंत्र खोलीतल्या पलंगावर झोपवणं हा तिचा रोजचा दिनक्रम होता. त्या दिवशीही नेहमीप्रमाणे दोन्ही मुलांची डोकी दोन मांड्यांवर घेऊन ती बसली होती. तिला खोल गर्तेत कोसळल्यासारखं होत होतं. 'जागा...हाच दिवाण....' मुलांना सांगायला एकही गोष्ट तिला सुचेनाशी झाली. खरंतर त्यांना इतरांनी रचलेल्या गोष्टी सांगतिल्या पाहिजेत, असंही नव्हतं. जुन्या गोष्टीही मुलं नव्या उत्साहानं ऐकत. एखादा पक्षी, झाड, डोंगर कल्पून त्यांच्या अनुभवांचं वर्णन ती सांगू लागली की, मुलंही त्यात रंगून जात. एखादा पक्षी चामुंडी टेकडीवरून कसा उडत चालला होता, त्याच्या दोन्ही पंखांवर विजय-विकास कसे बसले होते, मग त्या पक्ष्यानं श्रीरंगपट्टण, सोमनाथपूर, नंजनगुड, तलकाड सगळीकडे जाऊन येऊन संध्याकाळी कसं त्यांना चामुंडी टेकडीवर सोडलं वगैरे सांगताना उन्हातली, पावसातली, ढगांतली दृश्यं वर्णन करून सांगत ती तपशील भरत असे. पक्षी पुन्हा चामुंडी टेकडीवर येईपर्यंत मुलं गाढ झोपी गेलेली असत.

त्या दिवशी मात्र मुलं पेंगुळली असली, तरी तिला कुठलीही गोष्ट सुचत नव्हती. जितका प्रयत्न करावा तितकी बुद्धी थकून जात होती. 'या दिवाणाऐवजी आणखी कुठं बसलं तर? पण केवळ अशी जागा बदलून काय होणार आहे?' अखेर ती थकून म्हणाली, "विजू बाळ, आज तूच एक गोष्ट सांगशील? माझं डोकं फार दुखतंय आज."

"अंऽहं! तूच सांग. मला नको त्याची गोष्ट." विकास हट्ट करू लागला.

"तर मग तूच सांग."

"नाही. त्यानं सांगितली तर मी नाही ऐकणार." विजयनं हट्ट धरला. दोघांचीही समजूत काढायला तिलाच गोष्ट सांगणं आवश्यक होतं. अखेर मागं असंख्य वेळा सांगितलेल्या उडत्या घोड्याची गोष्ट ती सांगू लागली. थोड्या वेळातच विकासनं तक्रार केली, "अम्मा, आज तू छान गोष्ट सांगत नाहीस."

तरीही गोष्ट ऐकताना दोघंही झोपी गेले.

त्या रात्री अमृताच्या मनाची अस्वस्थता पराकोटीची वाढली होती. रात्री उशिरा... एक वाजल्यानंतर केव्हातरी झोपायची तिची नेहमीची सवय होऊन बसली होती. सोफ्यावर बसून वाचत राहणं, मुलांच्या कपड्यांना इस्त्री करणं किंवा एकलेपण कुरवाळत त्यातच बुडून जाणं याची तिला सवय झाली होती. कितीतरी वेळा रिव्हॉल्वरची नळी कानशिलावर किंवा छातीवर रोखून ती बसून राहत होती. अशा वेळी ती न विसरता मुलांच्या खोलीला कडी घालत होती. तिनं रिव्हॉल्वर स्वत:वर रोखून बसल्याचं विजय-विकासनं पाहिलं असतं, तर त्यांना पराकोटीचा धक्का बसला असता, याची तिला पूर्णपणे जाणीव होती; पण त्याच वेळी ट्रिगर ओढायची दुर्दम्य इच्छाही तिच्या मनावरचा पगडा ढिला करत नव्हती. गोळी झाडल्याशिवाय मनाला शांतता लाभणार नाही असं वाटून रोखलेल्या रिव्हॉल्वरच्या ट्रिगरवरचं बोट मात्र अकारण निश्चल होऊन जात होतं. 'आता आपल्या आयुष्यातले हे अखेरचे क्षण आहेत.' या विचारानं तिला अमर्याद रडू येई आणि पाठोपाठ उमटलेल्या 'मरण अनिवार्य आहे.' या विचारात ते रडू मिसळून जाऊन तिच्या मनात अनामिक भावनांचा हलकल्लोळ उडून जाई. 'मरणाचं दडपण निष्क्रिय करण्याची शक्ती आपल्या अंगी नाही.' हे जाणवून ती सुलभपणे मरण्याचा मार्ग शोधण्यात रमत होती. छातीपेक्षा कानशिलावर गोळी झाडली असती, तर किती कमी त्रास झाला असता, याचा तपशील आठवत-आठवत ती त्यातच गढून जात होती. मधूनच तिला रिव्हॉल्वरऐवजी धारदार चाकूचं आकर्षण वाटून त्याचं लखलखतं पातं हृदयाशी ठेवून ती तासन्तास पुतळ्यासारखी बसून राहत होती. मधूनच आत्महत्या-पत्रांचं पॅड हाती घेऊन त्या दिवसाची तारीख, वेळ नोंदवून त्याच त्याच मजकुराचं पत्र पुन्हा लिहीत होती. असंख्य वेळा लिहिलेल्या पत्राचा मजकूर आता ठरून गेला होता. तो लिहून त्यावर सही करायचं कामही अलीकडं पटकन होऊन जात होतं.

मुलांना त्यांच्या खोलीत झोपवून ती पुन्हा लाउंजमध्ये आली. तिथल्या सोफ्यावर किंवा दिवाणावर दोन-तीन तास बसून राहायची तिची नेहमीची सवय; पण आता मात्र तिला त्या दिवाणाची किळस आली. तिनं दिवाणावरचं आच्छादन ओरबाडून काढलं आणि न्हाणीघरात साबणाचं पाणी करून त्यात ते भिजवून आली. पुन्हा दिवाणावर नवं, स्वच्छ धुतलेलं आच्छादन अंथरून, त्यावर पूर्ववत कुशन्स ठेवून ती आपल्या बेडरूममध्ये गेली. हातात रिव्हॉल्वर घेऊन भिंतीलगतच्या सोफ्यावर बसताना तिला आपण खोल, खोल गर्तेत कोसळत असल्याची भावना होत होती. 'या क्षणी आपल्याला मरण आलं तर किती छान होईल!' या विचारात ती मग्न होऊन गेली, तरी ट्रिगरवरचं बोट सैलच होतं. 'का मला मरण येत नाही? आणखी किती वर्षं मी असंच तळमळत काढायची?' अशा विचारात मग्न होऊन ती रिव्हॉल्वर कुरवाळत समोरच्या भिंतीवर दृष्टी रोखून बसून राहिली.

असाच कितीतरी वेळ गेला. ती उठली. रिव्हॉल्वर नेहमीच्या जागी ठेवून ती बेडरूमबाहेर आली. मुलांच्या खोलीत गेली. भिंतीवरच्या दिव्याच्या उजेडात तिनं मुलांचे चेहरे टक लावून पाहिले. दोन वेगवेगळ्या पलंगांवर झोपलेल्या दोघांची कपाळं, नाकं, डोळे सगळं हुबेहूब त्याच्यासारखंच! 'माझ्यावर सूड घ्यायला जन्मलेत इतकं त्याच्याशी साम्य घेऊन! आधी या दोघांना मारून नंतर स्वत:वर रिव्हॉल्वर झाडलं तर?' पण हे अशक्य असल्याचं त्याही स्थितीत तिला तीव्रपणे जाणवून ती हताश झाली. 'त्यापेक्षा आधी त्याला गोळी घालून मग आपण

जीव दिला तर? हे शक्य आहे.' तिच्या अंतर्मनानं संमती दिली; पण यातही काही नवं नव्हतं. या आधी अनेक वेळा मनात आलेला हा विचार कृतीत उतरला नव्हता. या विचारासरशी तिचं मन अधिकच खचलं. 'हातून काहीही न घडणारी भेकड मी!' मुलांकडे टक लावून पाहता पाहता तिच्या मनात आलं, 'या गोजिरवाण्या मुलांना मारायचा विचार करणारी डाकीण मी! मृत्यू ही एकच शिक्षा मला योग्य आहे.' या विचारासरशी ती पुन्हा तिथून आपल्या बेडरूममध्ये येऊन रिव्हॉल्वर हातात घेऊन बसली.

काही वेळानं तिला वाटलं, 'किती अनिश्चित आहे माझं वागणं? मनाला दृढता म्हणायची ती नाहीच.' तिचं मन व्याकूळ झालं. तिला खूप रडावंसं वाटलं; पण तिनं हुंदका आवरला. खिडकीचा पडदा सारून पाहिलं, तर गडद अंधार होता. एकाएकी तिला चामुंडी टेकडीची आठवण झाली. 'इथंच घराच्या मागं मृत्यूच्या घनघोर सावलीसारखी ही टेकडी उभी आहे. आत्ताच्या आत्ता तिथं, त्या मरणाच्या सावलीत जायला पाहिजे.' ती ताडकन उठली. हातातलं रिव्हॉल्वर तसंच होतं. खोलीतला दिवाही लावलेलाच होता. बाहेरच्या गेटलगतच्या विक्रांतनं थोडी गुरगुर केली. मागील गेटजवळच्या विश्वासनं त्यात आपली गुरगुर मिसळली. त्यांना आपली ओळख देऊन तिनं गेट उघडलं, गॅरेज उघडून कार बाहेर काढली. पुन्हा गेट बंद करून तिनं आपली कार चामुंडी टेकडीकडे पळवायला सुरुवात केली.

सगळीकडे नि:शब्द शांतता पसरली होती. रस्त्यावरचे दिवे मागं पडले. अंधार दाट होऊ लागला. समोर मरण पसरावं तशी टेकडीची आकृती दिसत होती. कारच्या उजेडात समोरच्या रस्त्याचा चढ तेवढा दिसत होता. मैसूर शहर नजरेआड होईपर्यंत ती कार चालवत राहिली. नंतर कार थांबवून तिनं इंजिन आणि दिवे बंद केले आणि निश्चल बसून राहिली. अंधार आणि नि:शब्दतेत नखशिखान्त चिंब होत असताना तिला वाटलं, 'आज आपली मृत्यूची अपेक्षा निश्चित पूर्ण होणार!' सभोवतालचा परिसर तिला चंगलाच परिचित असला, तरी आता मात्र तो अंधारातलंच एक शून्य होऊन राहिला होता. त्यावर दृष्टी रोखून बसल्यावर एकीकडे समाधान होत होतं. तिनं पुन्हा गाडी वर चढवायला सुरुवात केली. भोवतालच्या नीरव शांततेचा भंग करणाऱ्या तिच्या गाडीच्या आवाजाचा तिला संताप येत होता. गर्द अंधारातला रस्ता भेगाळणाऱ्या गाडीच्या दिव्याचाही तिला राग येत होता. तरीही मन आवरत ती गाडी चालवत होती. आपलं घर दिसत असलेल्या जागेवर तिनं गाडी आणून थांबवली. इंजिन थांबवून, हातात रिव्हॉल्वर घेऊन ती बाहेर पडली. भोवताली घनदाट अंधार असला, तरी खाली मैसूर शहराच्या रस्त्यावरचे दिवे दिसत होते. ते पाहताना भोवतालचा अंधार अधिकच गडद वाटत होता. मान वर करून आकाशात पाहिलं की, दुर्बलपणे चमकणारी नक्षत्रं अंधाराची दुर्गम शांती स्थापत असल्यासारखी दिसत होती. घनघोर अंधार आणि एकटेपणा एवढंच जीवनातलं परमसत्य आहे, अशी भावना तिच्या मनात भरून आली. 'अशा उन्नत जागी उभं राहून कानशिलावर गोळी झाडून मरणं म्हणजे आत्म्याला स्थापन करणं.' असं वाटलं, तरी तिचा रिव्हॉल्वरचा हात उचलला गेला नाही.

ती तशीच कितीतरी वेळ उभी होती. एकाएकी तिची भिरभिरणारी नजर तिथून लांबवर दिसणाऱ्या घरावर स्थिर झाली. घराच्या बाजूला जळत असलेल्या दिव्याचा क्षीण प्रकाश! 'ते आपलं घर की आणखी कुणाचं?' ती टक लावून पाहत होती. काही क्षणांतच तिच्या मनात आलं, 'घरात फक्त दोन मुलंच आहेत. अचानक ती जागी होऊन रडत मला शोधू लागली तर?

मी घराबाहेर पडल्याचं एखाद्या चोरानं पाळत ठेवून पाहिलं असेल तर? घरात फक्त लहान मुलं...' या विचारासरशी तिच्या जिवाचा थरकाप उडाला. तिनं कारमधला दिवा लावून घड्याळ पाहिलं. दोन दहा झाले होते. आता ती अधीर झाली. वेगानं गाडी घेऊन घराकडे येताना 'रस्त्यात गाडी बंद पडली तर काय करायचं!' अशी भीतीही तिला वाटू लागली.

घरी येऊन गेट उघडताना कुत्री भुंकू लागली तेव्हा स्वत:ची ओळख देत तिनं गाडी गॅरेजमध्ये ठेवली. गेट आणि गॅरेजचं दार बंद करून घरात येईपर्यंत तिच्या जिवात जीव नव्हता. मुलांच्या खोलीत तिनं जाऊन पाहिलं. मुलं गाढ झोपली होती. आपल्या बेडरूममध्ये जाऊन रिव्हॉल्वर जागेवर ठेवून, नाइट गाउन चढवून ती अंथरुणावर पडली तेव्हा ती पराकोटीची थकली असली, तरी तिला लगेच झोप लागली नाही.

त्याच्या मनात नुसता हलकल्लोळ माजला होता. 'तिला मनातून बाहेर काढून मन शांत करायला पाहिजे. ' त्यानं तिला विसरून जायचा निर्णय घेतला, तेव्हा तिनं अंतरंगात शिरून किती खोलवर मुळं पसरवली होती याची त्याला कल्पना आली. तिच्या आठवणींची मुळं तोडणं म्हणजे स्वत:लाच नष्ट करणं होतं हे त्याच्या लक्षात आलं होतं. कुठल्याही स्वरूपाचा तिचा सहवास अत्यंत घातक असल्याचा इशारा तो आपल्या मनाला परोपरीनं देत असतानाच मनाचा एक कोपरा रात्रंदिवस, कामात असताना-नसताना, झोपताना-उठताना तिचंच चिंतन करण्यात गढून जात होता. त्याचा तसा स्त्रियांच्या संदर्भातला अनुभव मर्यादितच होता. 'देवा! यानंतर असा स्नेह नको!' त्याच्या काही अनुभवी मित्रांनी सांगितलं होतं, स्वत: पुढाकार घेणारी स्त्री ही अखेर पुरुषावरच दोषारोप करते. आपलं पातिव्रत्य गमावायला दुसरं कुणीतरी जबाबदार आहे असं मानण्यात त्या स्वत:च्या पापप्रज्ञेशी प्रतारणा करत असाव्यात. ' 'विवाहित स्त्रीला स्वप्नातही स्पर्श करू नये हे तुम्हाला समजायला हवं होतं.' म्हणत तिनं सगळ्याचं खापर माझ्यावर फोडलं तेही याचसाठी असावं.'

पण मुंबईमधल्या त्या स्त्रीनं मात्र दोघांमधल्या संबंधात नैतिकतेचा उच्चारही कधी केला नव्हता. आधी कुणी सुचवलं, कुणी पुढाकार घेतला वगैरे गोष्टींचाही तिनं कधी उच्चार केला नव्हता. दोघांच्या संबंधांतली आपली जबाबदारी पूर्णपणे स्वीकारत अप्रत्यक्षरीत्या 'तुझी जबाबदारी तू पाहा.' असंही सुचवलं होतं. 'आपलं सान्निध्य केवळ परस्परांना आनंद देण्यासाठीच' असंही तिनं स्पष्ट शब्दांत सांगितलं होतं आणि तशीच ती वागली होती. दोन वर्षांच्या त्या संबंधांत एक क्षणही कडवटपणाचा नव्हता.

त्याचं मन नकळत दोघींची तुलना करण्यात गढून जात होतं. 'आनंदाच्या परमोच्च क्षणी हिनं मला अपराधीपणाची भावना दिली! भीती दिली! छे:! काय कंगावखोर बाई म्हणायची ही! हिच्यापेक्षा ती कितीतरी पटीनं उत्तम होती.'

दोन-तीन दिवस त्याचं मन त्या दोघींची तुलना करता-करता थकून जात होतं. अखेर त्यानं कितीही विरोध केला होता, तरी एक गोष्ट त्याच्या मनात स्पष्ट होऊ लागली होती. त्या संबंधात काही खोलीच नव्हती. एकमेकांच्या सहवासात भरभरून सुख लुटल्यानंतर दूर जाताना कसलंही दु:ख, विरह मनाला जाणवत नव्हता. त्यानंतरही जाणवत होती ती शरीराची ओढ होती. हे त्याला स्पष्ट आठवत होतं. त्याउलट हिचं होतं. 'ही रागावते, संतापते, डिवचते, अपराधीपणाची टोचणी सतत जाणवावी असं क्रूरपणे बोलते, नैतिकदृष्ट्या पायदळी तुडवते.

तरीही या नात्यात विलक्षण गहिरेपणा आहे, एक प्रकारचं अनाकलनीय आकर्षण आहे; पण हे आकर्षण मृत्यूचं असावं तसं आहे. अत्यंत धोकादायक! त्याला केवळ वरवर नव्हे, समूळ उपटून नष्ट करायला पाहिजे.'

त्यानं त्यासाठी स्वत:शी निकराचा झगडा दिला. दोन-तीन दिवसांत स्वत:ला कामात बुडवलेल्या क्षणांमध्ये तरी तिची आठवण येऊ न देण्यात तो यशस्वी झाला; पण ही मन:स्थिती फार दिवस टिकू शकली नाही. त्याचा परिणाम त्याच्या व्यावसायिक गुणवत्तेवरही प्रतिकूल होऊ लागला. जर व्यवसायाची सुरुवात होतानाच असं घडू लागलं असतं, तर नेस्तनाबूत व्हायला फारसा वेळ लागला नसता, हे त्याला समजत असलं, तरी तिच्या आकर्षणातून त्याला सुटता येत नव्हतं. अनेक वेळा तो या आकर्षणाचं विश्लेषण करून पाहत होता. ही कसली 'विलक्षण ओढ म्हणायची? का मी हिच्याकडे एवढा आकर्षित झालो आहे? तिचा शीघ्रकोपी स्वभाव आणि लागट बोलणं सोडलं, तर तीही आपल्यासाठी तेवढीच तळमळते. आजवर आपल्यावर एवढा जीव कुणी जडवलाय? तिच्या मांडीवर डोकं ठेवून... अंऽहं तिनं माझं डोकं मांडीवर घेऊन केसांतून हात फिरवला की, अंतर्मनाच्या आत जो थंडावा लाभतो तो आणखी कुणी दिलाय? खूप लहानपणी आईच्या मांडीवर पडून केसांमधून तिचा हात फिरताना, अंगाई ऐकताना... होय... हिच्या मांडीवर डोकं ठेवतानाही तीच शांती मिळते हे नाकारण्यात अर्थ नाही.' या केवळ विचारासरशी त्याला त्या क्षणी त्याच पावली धावत जाऊन तिच्या मांडीवर डोकं ठेवून झोपायची उत्कट इच्छा होत होती; पण पुन्हा त्याची बुद्धी त्याला सावध करत होती, 'छे! नागाच्या फण्याच्या सावलीत बेडकाला लाभतो तसा आहे तिचा मृदू सांत्वना-स्पर्श!'

दिवसाची कामं कशीबशी आटोपून अंथरुणावर पडलं की, लगेच गाढ झोप लागे; पण एक-दोन तासांतच त्याला जाग येई. तिची आठवण नेहमी जाणिवेच्या पातळीवरही नसे; पण एकदा जाग आली की, काही केल्या झोप येत नसे. पहाटेच्या सुमारास पुन्हा डोळा लागे. मग ऑफिसला जायच्या वेळी धाडकन जाग येई. पहाटे डोळा लागला नाही की, संपूर्ण सकाळ पेंगुळलेल्या अवस्थेत जाई. जांभया देता देता जबड्याचे सांधे खिळखिळे होत. रात्री झोपायच्या वेळी झोपेची गोळी काही दिवसांसाठी घेऊन या समस्येतून सुटका करून घेणं शक्य होतं; पण असं करणं म्हणजे स्वत:चा पराभव मान्य केल्यासारखं होतं, असं त्याला वाटत होतं. कितीही मनस्ताप झाला तरी ही मानसिक दुर्बलता पोसायची त्याची तयारी नव्हती. 'जीवन म्हटलं की समस्या येणारच. या आधीही अशा समस्यांना आपण सामोरे गेलो आहोत. ही त्याहून कठीण समस्या नाही.'

यासारख्या विचारांनी त्याचा आत्मविश्वास पुन्हा उभारत होता. 'नाहीतरी आता मी चाळीस वर्षांचा आहे. अगदी आता लग्न करायचं ठरवलं, तरी करणं अशक्य नाही.' बायको गेल्याला चार वर्षं होऊन गेली होती, तरी दुसरं लग्न करायचा विचार त्याच्या मनात स्थिरावत नव्हता; पण त्यात काही अशक्य होतं असंही त्याला वाटत नव्हतं. 'नाहीतरी आपण आता मुंबईचा व्यवसाय सोडून मैसूरमध्ये नव्या व्यवसायात स्थिरावत आहोत ना? संसाराचं तरी काय फार वेगळं आहे?'

एकदा असाच मध्यरात्रीपासून जाग आल्यामुळे तो कूस बदलत अंथरुणावर पडला होता. पहाटे थोडी तरी झोप येईल या आशेत तो असतानाच खालच्या घरातल्या रेडिओवर

भक्तिसंगीत ओरडू लागलं. दूधवाला आल्याचं पायऱ्यांच्या आवाजांवरून समजलं. दुधाची पिशवी आत ठेवून तो बाथरूमला जाऊन आला. खालचं भक्तिसंगीत ऐकू येऊ नये म्हणून त्यानं खिडकी बंद केली आणि पुन्हा अंथरुणावर पडला. झोपेचा पत्ता नव्हता. 'रात्री झोप येण्यासाठी काहीतरी गंभीर विषयावर वाचन करायला पाहिजे.' या उपायातही तसं काही नवं नव्हतं. ती त्याची पूर्वीची सवय मध्यंतरी सुटली होती. आता पुन्हा तिला शरण जायचं त्यानं ठरवलं.

एवढ्यात कुणीतरी पायऱ्या चढून वर येत असल्याचं ऐकू आलं. 'पेपरवाला असेल, तर धाडधाड येऊन पेपर सारून निघून जातो; पण हा आवाज... साडी नेसलेल्या स्त्रीच्या चपलांचा आवाज... तीच तर आली नसेल ना?' या विचारासरशी त्याच्या आतून एक समाधान उमलून आलं. 'बाहेरचा दरवाजा लोटल्याचा आवाज... म्हणजे दुधाची पिशवी आत घेतल्यावर दरवाजा बंद करायचं राहून गेलं म्हणायचं. ' पाठोपाठ आवाज ऐकू आला, "मिस्टर सोमशेखर..."

होय. तिचाच आवाज होता. त्यानं उत्तर दिलं नाही.

तिनं आत येऊन कडी घातल्याचा आवाज आला. ती थेट आतच आली. एक अवाक्षरही न बोलता तिनं त्याच्या अंगावरचं पांघरूण ओढून काढलं आणि त्याचे दोन्ही पाय आपल्या हातांनी घट्ट धरले. त्यावर डोकंही दाबून धरलं. तिची पकड एवढी घट्ट होती की, त्याला पाऊल हलवणंही अशक्य झालं. त्याला राग आला. 'काय निर्लज्ज बाई आहे ही!' त्याला 'नको' किंवा 'काय करतेस हे! पाय सोड.' म्हणणंही शक्य झालं नाही आणि तिचं मस्तक अथवा हात दूर करणंही जमलं नाही. त्यानं हतबुद्ध होऊन डोळे मिटून घेतले. पावलांना होणारा तिच्या मस्तकाचा आणि केसांचा स्पर्श संपूर्ण मनाला व्यापून राहील, अशी भीती वाटून त्यानं डोळे उघडले आणि तसाच उताणा पडून राहिला. तिचे जड उष्ण नि:श्वास त्याच्या पावलांवर जाणवत होते. डोळ्यांची उघडझाप करताना तिच्या पापण्यांचे नरम केस त्याच्या पावलांना स्पर्श करत होते. काही क्षणांतच ते ओले होऊन ओल्या ब्रशप्रमाणे पावलांना संवेदना जाणवू लागली. त्यानंतर उष्ण अश्रूंनी त्याची पावलं चिंब झाली; पण मोठ्या हट्टानं तिनं हुंदका आवरला होता.

मन थोडं हलकं झाल्यावर स्वत:ला आवरत ती उठून त्याच्याशेजारी बसत म्हणाली, "सोमू, गेले दहा दिवस तुला एकदा भेटून असे पाय धरून क्षमा मागायची असं मी ठरवत होते, पण धैर्य होत नव्हतं. आधी दोन दिवस पराकोटीची शरम वाटत होती. विशिष्ट मर्यादेपर्यंत चूक केली असेल, तर क्षमा मागणं शक्य आहे; पण मी तुझ्यापुढे कशी येणार? पण ती काही फक्त शरम नव्हती, ते नैतिक भय होतं सोमू! अखेर काल रात्री मी मनाचा निश्चय केला. माझ्या सोमूच्या पुढ्यात उभं राहून चूक कबूल करायला मला का लाज वाटावी? माझ्या रक्षण-स्थानावर डोकं ठेवून निश्चिन्त व्हायची मला का भीती वाटावी? माझ्या सोमूला माझ्यावर संतापायचा निश्चित अधिकार आहे. त्यानं क्षमा केली नाही, तरी मी त्याच्यासमोर निर्भयपणे उभी राहीन. तो कदाचित मला दूर लोटून देईल, पायानं दूर लाथाडेल; पण त्याच्या छातीच्या पिंजऱ्याचा आश्रय घेऊन बसले, तर बाहेर काढणं त्यालाही अशक्य आहे. काल रात्री एवढं ठरवल्यावर किती शांत वाटलं म्हणून सांगू! तेवीस दिवसांनंतर... तू निघून आलास त्याला आज तेवीस दिवस झाले... ठाऊक आहे? तुझा चेहराच सांगतोय... तुला आठवत नाही. तेवीस रात्री मी झोपले नाही. उभं राहिलं की, जागरणामुळे डोकं गरगरत होतं. एकदा गेटपाशी

चक्कर येऊन पडलेदेखील. घरातही कुणी नव्हतं. पंधरा-वीस मिनिटांनी शुद्धीवर आले तेव्हा दोन्ही कुत्री हात-गळा वगैरे हुंगत चाटत होती; पण झोप काही आली नाही. तशीच पडून होते. सोमू येईल, माझी क्षमायाचना स्वीकारेल अशी स्वप्नं बघत! निदान फोन तरी करेल. दिवसा फोनची रिंग वाजली की, तुझाच फोन या खात्रीनं छातीची धडधड स्तब्ध होई. रिसीव्हर उचलला की, निराशा होई. शेवटी काल रात्री निश्चय केला आणि किती गाढ झोपले मी! तेवीस रात्रींची झोप एकाच वेळी चालून आली बघ! सकाळी उठले ती थेट इथं आले. तू मला कधीच इथं घेऊन आला नव्हतास. फक्त एकदा पत्ता सांगितला होतास. तेवढ्यावरून चौकशी करत तुझं घर शोधून काढलं."

नंतर ती काही क्षण त्याच्याकडे एकटक पाहत राहिली आणि म्हणाली, "बघ! एवढा वेळ मीच माझं सांगत बसले. गेल्या चोवीस रात्री तूही झोपला नाहीस, हे तर चेहऱ्यावरून स्पष्टच दिसतंय." म्हणत त्याच्या छातीवर आपला चेहरा दाबून ठेवत ती म्हणाली, "आता ही बघ मी तुझ्या छातीत शिरले! मला तिथून काढणं तुलाही जमणार नाही. हवं तेवढं रागव, हवं तर मार, लाथा हाण, पण पळवून मात्र लावता येणार नाही." म्हणता म्हणता ती विजयानं हसली आणि पाठोपाठ हुंदके देऊन रडू लागली.

एव्हाना त्याचा संताप, तिरस्कार, वैताग वितळून नष्ट झाला होता. त्याच्या हातांनी तिला वेढून छातीशी घट्ट कवटाळलं. 'हे उत्कट प्रेम! ही भावनेची तीव्रता! हा उबदारपणा आणखी कुठंही मिळणं शक्य नाही.' त्याच्या मनानं निर्वाळा दिला. ती भावनावेगानं आणखीही बोलू पाहत असताना त्यानं तिच्या ओठांवर हात ठेवला. त्याचा दुसरा हात तिच्या पाठीवरून फिरत होता.

ती बरीच शांत झाली होती. आपली स्निग्ध दृष्टी त्याच्या दृष्टीत मिसळत ती म्हणाली, "मुलांना शाळेत पोहोचवायला पाहिजे. आता मी निघते. दुपारी साडेबारा वाजता जेवायला ये. मी बारा वाजताच घरी येईन. त्या वेळी तू फोन कर."

त्याच्या मनातली अनिश्चितता त्याच्या डोळ्यांत उमटली. तिनं ती जाणली आणि म्हणाली, "तू आला नाहीस, तर मला क्षमा केली नाहीस असं समजेन. समजलं? आता उठू नकोस. तुला आता झोप आलीच पाहिजे. माझी आज्ञा आहे ही!" ती उठली आणि सरसर निघून गेली. दरवाजा ओढून घेतल्याचं, पायऱ्या उतरल्याचं आणि गाडी स्टार्ट करून निघून गेल्याचं त्यानं आवाजावरून जाणलं.

त्याच्या मनातली कडवट भावना, वैताग, आत्मावहेलना वगैरे भावना नष्ट होऊन त्यांची जागा अनामिक उत्साहानं घेतली होती. तिनं सांगितल्याप्रमाणे खरोखर झोप आली असती की काय कोण जाणे; पण मनात एवढा उत्साह भरला असता झोपणं शक्य नव्हतं. त्यानं लगेच अंघोळ उरकली. कॉफी करत बसायला कंटाळा आल्यामुळे नुसतं दूध पिऊन तो घराबाहेर पडला. हॉटेलमध्ये नाश्ता उरकून तो ऑफिसला गेला. बारा वाजता त्यानं तिच्या घरी फोन फिरवला. ती घरी येऊन पोहोचली होती.

तो तसाच तिच्या घरी जायला निघाला. दहा मिनिटांनी तो तिच्या घरापाशी आला तेव्हा ती गेटपाशी उभी राहून वाट पाहत होती. तेवीस दिवस तो न आल्यामुळे कुत्र्यांनी भुंकायला

सुरुवात केली.

दोघंही सोफ्यावर एकमेकांच्या मिठीत विसावले तेव्हा मध्ये घडून गेलेल्या घटनांविषयी अवाक्षर काढायचं नाही असं दोघांनीही मनोमन ठरवलं होतं. स्पर्शसान्निध्यातून मिळणाऱ्या शांतीपुढे शब्द थिटे पडतात हा अनुभव दोघंही घेत होते. आता तिला मिठीत घेताना तिच्या सुकलेल्या देहाची त्याला प्रकर्षानं जाणीव झाली. जे घडून गेलं होतं त्याचं दु:ख त्याच्यापेक्षा तिला अधिक जाळून गेलं होतं, हे त्याला स्पष्टपणे जाणवलं. पाठोपाठ उमटलेला 'याला जबाबदार कोण?' हा प्रश्नही आपोआप वितळून गेला. तिच्या सुकलेल्या देहावरून तो एखाद्या शिल्पकाराप्रमाणे हात फिरवू लागला. पाठ-मान-गळा-गाल यावरून फिरणाऱ्या त्याच्या हाताच्या स्पर्शातून मिळणारं सांत्वन आत आत साठवत ती डोळे मिटून बसून राहिली. नंतर तीच म्हणाली, "काहीही न खाता राहणं शक्य नव्हतं; पण गेल्या तेवीस दिवसांतलं हे माझं पहिलं जेवण म्हणून सांगितलं, तर त्यावर तुमचा विश्वास बसेल?"

"होय." म्हणून मान डोलवताना तो मनोमन शरमून गेला होता. इच्छा असो वा नसो, गेल्या तेवीस दिवसांत हॉटेलात जे समोर येत होतं ते तो खात होता. 'आपला देह तिच्यासारखा सुकला नाही.' हे त्याला जाणवत होतं.

जेवण झाल्यावर तो लाउंजवरच्या सोफ्यावर बसला. स्वयंपाकघरातलं सगळं आवरून ती बाहेर आली आणि त्याला म्हणाली, "आपण इथं नको बसायला. चल!" म्हणत ती त्याला हात धरून बेडरूमकडे घेऊन निघाली. दाराशी येताच तो थबकला. तिनं मागं वळून विचारलं, "का?"

उत्तर स्पष्ट असलं, तरी त्याचा उच्चार करणं म्हणजे दोघांनीही कष्टी होणं हे ठाऊक असल्यामुळे तो म्हणाला, "आपण लाउंजमध्येच बसू या."

"मी तुझ्यासाठी लुंगी आणलीय."

"इथंच घेऊन ये."

तिनं त्याच्याकडे डोळे वटारून पाहिलं. त्यानं तिच्याशी दृष्टी भिडवली नाही, तरी त्याचा निर्धार दृढ होता. ती म्हणाली, "व्वा! बोलणं-वागणं किती मृदू आहे! पण आतून किती कठोर आहेस! क्षमा करायलाही औदार्य पाहिजे!"

त्यानं तिच्याकडे पाहिलं.

"पुरे हे दृष्टियुद्ध! आत चल बघू!" म्हणत तिनं त्याला ओढतच आत नेलं. त्याला बळेच पलंगावर बसवून वॉर्डरोब उघडून त्यातली नवी लुंगी काढून घेतली. त्याला पुन्हा देवघरामध्ये ओढून नेऊन पंचपाळातली हळदीची चिमूट लुंगीच्या काठाला लावली आणि म्हणाली, "तुझा विश्वास असो वा नसो. देवाला नमस्कार कर. माझ्यासाठा."

त्यानं देवाला वाकून नमस्कार केला. त्याच्या कपाळावर चिमूटभर कुंकू लावून त्याला पुन्हा बेडरूमकडे नेत ती म्हणाली, "हं, आता नेस ही लुंगी."

त्याच्या दृढ मिठीत झोपली असता, ती त्याच्या कानात कुजबुजली, “माझी मानसिक तयारी अपुरी असल्यामुळे त्या वेळी तसं झालं. आता जा! जा! सगळं माझ्याच तोंडून वदवून घ्यायचा वाईट्टपणा नको करू! तू चांगला शहाणा मुलगा आहेस की नाही?”

त्याचं मन क्षणार्धात निथळून निघालं. प्रश्न-उत्तर, शंका-कुशंका यात न घोटाळता आणि तर्ककुतर्क आणि विचार-प्रतिविचार यात न अडकता दोघंही गाढ विश्वासानं एकमेकांत विरघळून गेले. अशी शांती, कुठल्याही प्रकारचं शल्य-वेदना-यातना शमवण्याची शक्ती स्त्रीसान्निध्यात असल्याच्या अपरिमित आश्चर्यात बुडून जावं असा तो घनगंभीर अनुभव होता. तेवीस दिवसांच्या उपवासामुळे तिच्या शरीराचा रसरशीत, मांसलपणा सुकून गेला असला, तरी मनाच्या मृदुतेनं तिच्या शरीराच्या मृदुतेचं रूप घेतलं होतं. करुणा, दैन्य, समर्पण, प्रीती आणि अधिकार या सर्व मंद्र-तार स्वरांमध्ये आधी ती वितळून गेली आणि तिनं त्यालाही वितळवलं.

त्या रात्री त्याला जेवून अंथरुणावर पडल्याचं तेवढंच आठवत होतं. सकाळी जाग आली तेव्हा घड्याळात नऊ वाजले होते. दाराशी दुधाची पिशवी पडली होती. वर्तमानपत्र दारातून आत सारलेलं होतं. अजूनही त्याच्या डोळ्यांत झोप होती. दुपारी बारा वाजता तो तिच्या घरी गेला तेव्हा ती हसत म्हणाली, “तू आधी लुंगी नेसून ये बघू. मला एवढी भूक लागलीय म्हणून सांगू! लवकर ये.”

जेवण झाल्यावर दोघंही अंथरुणावर झोपले तेव्हा ती म्हणाली, “खरोखरच तुझा मला एवढा राग आलाय म्हणून सांगू!”

“खोटं.”

“कशावरून?”

“तू मला एकवचनानं हाक मारलीस त्यावरून.”

“अस्सं! मला तुमचा इतका राग आलाय आणि तुम्ही मला त्याचं कारणही विचारत नाही?” म्हणत त्याच्याकडे ती पाठ करून झोपली.

त्यानं तिचा दंड धरून आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न केला; पण ती वळली नाही. तो तसाच तिच्या कानात कुजबुजला, “चुकलं माझं अमृता. का राग आला?”

“माझ्या रागाचं कारण तुम्ही आपणहून समजून घेत नाही म्हणून.” ती न वळता म्हणाली.

त्याला काहीच समजलं नाही. तो म्हणाला, “मी मूर्ख आहे. कबूल करतो. आता सांग.”

“मला मूर्खांशी कुठल्याही प्रकारचा संबंध ठेवायचा नाही.” ती आणखीनच उशीत तोंड लपवून म्हणाली. तो उठून बसला. पुन्हा पुन्हा त्यानं तिला विनवलं, तेव्हा ती अगदी हळू आवाजात म्हणाली, “आता आपण इतक्या जवळ आलो आहोत. ही कॉट खरंतर माझी आणि माझ्या नवऱ्याची आहे. आज ना उद्या त्याला हे समजणार नाही काय? समजलं तर काय करायचं? तुम्ही मला एका शब्दानं तरी तुझे-त्याचे संबंध कसे आहेत म्हणून विचारलं काय?”

तो कासावीस झाला. आताही आपण तिला असं काही विचारायला हवं होतं अशी त्याची मनाची खात्री नव्हती. तरी तिची नजर आपल्या चेहऱ्यावर खिळल्याच्या जाणिवेनं त्याला अपराध्यासारखं वाटलं. त्यानं क्षणभर थांबून मनातलंच बोलून दाखवलं, "चार-पाच वेळा तो प्रश्न जिभेच्या टोकापर्यंत आला होता; पण विचारलं नाही."

"का? का असं वाटलं तुम्हाला?"

"हा तुझा अगदी वैयक्तिक विषय आहे अमृता. तू आपण होऊन सांगितलंस तर गोष्ट वेगळी."

क्षणभर तिचे डोळे धगधगले; पण लगेच तिनं स्वत:ला आवरल्याचं त्याच्या लक्षात आलं. ती शांत स्वरात म्हणाली, "म्हणजे मला विशिष्ट कक्षेबाहेर ठेवायचा तुमचा विचार दिसतो! गरजेपुरतं जवळ यायचं आणि नंतर दोघांनी आपापलं बघून घ्यायचं. इतर सुख-दु:खं परस्परांशी वाटून घ्यायचा प्रश्नच नाही! खरं ना?"

"तसं नव्हे." तो अंतर्यामी आणखी विद्ध होत म्हणाला.

"तर मग कसं? तुम्हीच मला नीट समजावून सांगा.?" तिनं आग्रह धरला. त्याला यावर उत्तर सुचलं नाही. अपराधीपणाची भावना मात्र आणखी खोल रुजली. तिनं पुढं विचारलं, "तुमच्या त्या मुंबईच्या मैत्रिणीनं तुम्हाला हा प्रश्न कधीच विचारला नाही की तुम्ही विचारल्यानंतर "या बाबतीत फार खोल शिरण्याची गरज नाही." असं सांगून तिला शहाणं केलंत म्हणून एवढे सावधपणानं वागता?"

तिच्या बोलण्यामुळे झालेल्या तीव्र वेदना त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटल्या. तो म्हणाला, "हे बघ, तिच्याशी तुझी तुलना करायची माझी मुळीच इच्छा नाही. मला ते मुळीच आवडत नाही. तुम्हा दोघींमध्ये पराकोटीचा फरक आहे. तू यानंतर कधीही स्वत:ची तुलना तिच्याशी करून बोलू नकोस. तो विषय तू काढला नाहीस, तर फार बरं."

"सॉरी!" ती उद्गारली आणि उशीवर तोंड ठेवून पालथी झोपली. तोही तिला स्पर्श न करता मुकाट्यानं बसून राहिला. एकाएकी ती उठून बसली. त्याला दोन्ही हातानं वेढत त्याची समजूत घातल्याच्या स्वरात म्हणाली, "सोमू, मनातली सगळी मळमळ कुणापुढंतरी सांगावीशी वाटते. मला तरी जवळचं कोण आहे? तूच एकटा आहेस. त्यात तू 'हे वैयक्तिक आहे', 'ते पर्सनल आहे!' म्हणत मध्ये अंतर ठेवू लागलास तर मी कुठं जाऊ? मी माझी तिच्याशी तुलना करू नये म्हणतोस तू, पण तुझं वागणं तरी आम्हा दोघींमध्ये काही वेगळेपण आहे हे दाखवण्यासारखं कुठं असतं?"

"सॉरी! सांग, माझी चूक मला उमजली. मी ऐकतोय. सांग." तो मनापासून म्हणाला.

"याला रडून-भेकून आमंत्रण मिळवणं म्हणतात! तरीही सांगेन मी तुला सगळं. अं... स्वयंपाकघरात जाऊन दोन कप कॉफी करून आणशील?"

"हो-हो!' म्हणत तो उत्साहानं उठला. आपण तिच्या खूप जवळ गेल्याची भावना त्याला

जाणवली. स्नेह आणखी दाट झाल्याचं जाणवलं. त्यानं मनापासून विचार करून कॉफी-साखरेचं प्रमाण ठरवलं. ती किती वेळ मुरायला ठेवायची वगैरे विचार करून एका ट्रेमध्ये दोन कपबशांमध्ये कॉफी ओतून त्यातला एक थेंबही बशीत सांडू न देता तिच्या समोर ठेवली. तिनंही "व्वा!" म्हणत त्यातला एक घोट घेतला आणि उद्गारली, "काय सुरेख कॉफी झालीये म्हणून सांगू! मला आता तुझ्याकडं शिकायला पाहिजे कॉफी करायला!" ते ऐकून त्यालाही धन्य वाटलं!

दोघांचीही कॉफी पिऊन झाली. रिकाम्या कपांसह ट्रे समोरच्या सोफ्यापुढच्या टीपॉयवर ठेवल्यावर त्याच्या मांडीवर डोकं ठेवून ती म्हणाली, "माझ्या धाकट्या मुलाचा, विकासचा महिन्यापूर्वी चौथा वाढदिवस झाला. त्याच्या जन्माआधी म्हणजे चार वर्षं नऊ महिन्यांपूर्वी रंगनाथशी संबंध आला तो शेवटचा. त्यानंतर मी त्याला स्पर्श करू दिला नाही."

"का?"

"या 'का'चं उत्तर सांगायचं म्हणजे तुला सगळी पार्श्वभूमी सांगायला पाहिजे. त्याच्या विषयी मला काय वाटतं, ते सांगायला पाहिजे. म्हणूनच आधी कॉफी घेऊ या म्हटलं. आता सुरुवात कुठून करू मी?" अखेरचा प्रश्न तिनं स्वत:लाच विचारला.

"मी सहा वर्षांची असताना माझी आई वारली." ती पुढं सांगू लागली, "माझ्या वडलांनी त्यानंतर दुसरं लग्न केलं नाही. आज या घटनेकडं बघतानाही वेगळा अर्थ लागतो. आमची जमीन-जुमला, कॉफीचा मळा सगळी इस्टेट माझ्या आईच्या माहेरकडून आली आहे. ती आपल्या आई-वडलांची एकुलती एक मुलगी. माझे वडील अत्यंत हुशार आणि शिकलेले. त्या काळी बी. ए. पास झाले होते. शिवाय खूप देखणे होते. माझी आईही कुरूप नव्हती; पण रूपाच्या बाबतीत त्यांच्या मानानं डावीच म्हणायला पाहिजे. लग्न झाल्यावर माझ्या आजोबांनी वडलांना त्यांची सरकारी नोकरी सोडायला लावली आणि आपल्या भल्या-थोरल्या इस्टेटीची देखरेख करण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकली. ते आपल्या जावयाचा योग्य तो मान राखत असावेत असं वाटतं. कारण माझे वडीलही आजोबंना अत्यंत मानानं वागवत होते. माझी आई बारा वर्षांची असताना माझी आजी वारली म्हणे. ती आजोबांची दुसरी बायको. पहिली बायको मूल न होताच वारली होती. त्यामुळे त्यांनी दुसरं लग्न केलं होतं. दुसरी बायको वारली तेव्हा पुन्हा लग्न वगैरे करण्याचा अविवेक त्यांनी दाखवला नाही. मुलगी वयात आल्यावर आपल्या घरी राहील असा एक चांगला मुलगा शोधून तिचं लग्न लावून दिलं आणि सगळी जबाबदारी लेक-जावयावर टाकून मोकळे झाले. माझे वडीलही त्यांच्या अपेक्षेप्रमाणेच होते. आईचं लग्न होऊन दोन वर्षांत मी जन्मले. पुढे वर्षभरातच आजोबा वारले. त्यांच्या पोटात वरचेवर दुखायचं. ऑपरेशन झालं. गाठ होती म्हणतात. कॅन्सर असेल. त्यानंतरही आईला दोनदा दिवस राहिले; पण गर्भपात झाल्यानं मूल काही झालं नाही. आजोबांच्या मृत्यूनंतर पाच वर्षांनी आईही वारली. अप्पांनी त्यानंतर पुन्हा लग्न केलं नाही."

"त्या वेळी ते काय वयाचे होते?" तिच्या बोलण्यातलं अक्षरन् अक्षर टिपत असलेल्या सोमशेखरनं विचारलं.

"आईपेक्षा आठ वर्षांनी मोठे ते. आई गेली तेव्हा अठ्ठावीस वर्षांची होती आणि अप्पा

छत्तीस वर्षांचे होते.”

“तरीही लग्न का केलं नाही त्यांनी?”

“मीही यावर खूप विचार केला. त्यांच्या स्वभावात एक प्रकारचा अलिप्तपणा होता. एकदा संसार केला. पुन्हा का त्यात गुंतून पडायचं, अशीही त्यांची भावना असेल. माझ्यावर त्यांची बरीच माया होती. माझी आईही एवढ्या मोठ्या इस्टेटीची मालकीण असून त्यांच्याशी प्रेमानं आणि आदरानं वागत होती, हे कितीतरी नोकरांकडून आणि मोलकरणींकडून मीही ऐकलंय. कदाचित असं असेल, सगळी संपत्ती बायकोची. तिच्या मुलीला वाढवून सगळंकाही तिच्या हातात देणं त्यांना धर्माला धरून वाटलं असेल. हातातली सरकारी नोकरी सोडल्यावर त्यांना अर्थार्जनाचा कुठलाच मार्ग नव्हता. पुन्हा लग्न केलं असतं, तर त्या दुसऱ्या बायकोचं इथं काय स्थान राहिलं असतं? शिवाय कितीही चांगल्या घरातली बायको आणली असती, तरी तिला स्वार्थ सुचल्याशिवाय राहिला नसता काय? एकंदरीत अप्पांनी दुसरं लग्न केलं नाही. त्यांची धर्मबुद्धी आणि स्वार्थत्याग काही किरकोळ म्हणता येणार नाही.” बोलता बोलता तिचे डोळे पाण्यानं डबडबले. गळा दाटून आला. अस्पष्ट हुंदका आला. त्यानं तिच्या डोक्यावरून हलकेच हात फिरवला.

काही क्षण शांततेत गेले. मनाचा भावनावेग आवरत, डोळे पुसत ती पुढं सांगू लागली, “मुद्दाम मी धर्मबुद्धी हा शब्द वापरला. एवढ्या संपत्तीचा त्यांना हिशेब विचारणारं तरी कोण होतं? मीच! मला तेवढी अक्कल यायला मी तेवीस-चोवीस वर्षांची तरी व्हायला पाहिजे होतं. त्यानंतरही माझ्या नवऱ्यानं मला त्यासाठी पाठिंबा द्यायला पाहिजे होता. शिवाय सुमारे अठरा-वीस वर्षं त्यांच्या हातातच सगळे अधिकार असताना दुसऱ्या बायकोसाठी अठरा-वीस लाखंची वेगळी इस्टेट करणंही त्यांना अशक्य नव्हतं. तिच्या पोटी जन्मलेल्या मुलांशी ‘ही तुझी भावंडं’ असं लहानपणापासून सांगत मला भावनात्मकदृष्ट्या बांधून ठेवणं शक्य नव्हतं काय? पण त्यांनी तसं केलं नाही.” म्हणत तिनं कढ दाबत पुन:पुन्हा भरून येणारे डोळे टिपले.

त्याची दृष्टी तिच्या चेहऱ्यावर खिळली असली, तरी त्याचं मन तिच्या वडलांची आकृती डोळ्यांसमोर आणायचा प्रयत्न करत होतं. ती मध्येच उठली आणि टीपॉयवरचा कपबशांचा ट्रे स्वयंपाकघरात जाऊन ठेवून आली. येताना तिनं चेहराही धुतल्याचं त्याच्या लक्षात आलं. भावना अनावर होऊ लागल्या की, स्वत:ला एखाद्या कामात गुंतवून घेण्याची तिची सवय एव्हाना त्याला परिचित झाली होती. पुन्हा माघारी येऊन उशी भिंतीला टेकवून ठेवत त्यावर रेलून ती पुढं बोलू लागली, “आता तुला एक महत्त्वाचा प्रश्न विचारते हं! तुला काय वाटतं? कोण जास्त बलवान असतं? स्त्री की पुरुष?”

“काही बाबतीत निश्चितच स्त्री.” तो क्षणही न दवडता म्हणाला.

“हं! मला बरं वाटावं म्हणून सांगू नकोस तू! मला मनापासून काय वाटतं सांगू? उंची, शारीरिक शक्ती, शिकार करायचं कौशल्य यामध्ये त्या काळी पुरुष कदाचित श्रेष्ठ ठरेल, पण इतर कितीतरी बाबतीत पुरुष किती दुबळे असतात म्हणून सांगू! माझी आई वारल्यानंतरची परिस्थिती सांगते. तिथं घरात काम करणाऱ्या नोकरांची कमतरता नव्हती. स्वयंपाकपाणी बघणाऱ्यांची त्रुटी नव्हती. एवढ्या मोठ्या इस्टेटीची सहज आणि अत्यंत समर्थपणे व्यवस्था

पाहणारे अप्पा त्याच कॉफी इस्टेटमध्ये असलेल्या घराच्या व्यवस्थेत, त्याहीपेक्षा तिथल्या स्वयंपाकघराच्या व्यवस्थेत अगदी असहाय होऊन गेले होते. बहुतेक सगळे पुरुष असेच असतात. तूही असाच आहेस! नाहीतर इतकी वर्षं हॉटेलमधलं कदान्न खात का राहिला असतास?

"आमच्या अप्पांचा एक धाकटा भाऊ होता. सकलेशपूरला त्याचं एक किरकोळ दुकान होतं. डाळ-तांदूळ, बिडी-काडी यांसारख्या रोज लागणाऱ्या वस्तूंचं दुकान होतं. मॅट्रिक नापास. आमच्या अप्पांनीच त्याला ते दुकान सुरू करून दिलं होतं. त्याच्या कुटुंबाच्या चरितार्थाची त्यांनी अशी कायमची व्यवस्था केली. हे माझे काका काही नीच माणूस नव्हते आणि कुठल्याही परिस्थितीत नीतिमत्ता न सोडणारे धीरोदात्त माणूसही नव्हते. चारचौघांसारखा एक माणूस; पण त्यांची बायको – माझी काकू, जयलक्ष्मी तिचं नाव – भारी हुशार बाई हं! अतिशय डोकेबाज! कुणीही तिच्या वागण्यात अमुक एक चुकलं म्हणून बोट दाखवणं शक्य नाही. पण... फार सांगत नाही. अजून ती जिवंत आहे. कधी ना कधी तू तिला भेटशीलच म्हणा! ते जाऊ दे. आई जिवंत असताना ती आली की, आई तिचं सगळं व्यवस्थित करायची. किती केलं तरी जावा-जावा. त्यामुळे सगळं करूनही तिनं काकूला जिथं ठेवायचं तिथंच ठेवलं होतं. सकलेशपूरच्या संपत्तीची - जी काय किरकोळ वडिलोपार्जित संपत्ती होती, त्या संपत्तीची वाटणी करायच्या वेळी माझ्या आईनंच वडलांना सांगितलं, "आपल्याला देवानं भरपूर दिलंय, तुम्ही त्यातलं काहीही घेऊ नका." त्या वेळी काकूनंही 'किती मोठं मन तुमचं-' म्हणून परोपरीनं कौतुकही केलं म्हणे.

"आई वारल्याची बातमी समजताच ही माझी काकू लगेच धावत आली. आल्याआल्या मला घट्ट मिठी मारली. मिठी मारणं, डोक्यावरून हात फिरवणं, नि:श्वासानं मस्तक गरम करणं यांसारख्या शारीरिक क्रियांनी एखाद्याला भुलवणं शक्य आहे काय? आहे सोमू! समोर माझी आई मरून पडली होती, अप्पा आपल्याच दु:खात चूर होऊन गेले होते. पुढचं सगळं पार पाडायचं ओझंही त्यांच्याच डोक्यावर होतं. आणि मी? मरण म्हणजे काय हे समजत नव्हतं, आई वारली म्हणजे नेमकी काय हानी झाली हे कळत नव्हतं. नुसती आतल्या आत घुसमटत होते मी. अप्पांनी मला काही वेळ शेजारी बसवून घेतलं होतं. त्यानंतर ते पुढच्या तयारीच्या कामासाठी उठून गेले होते. मी एकटीच बसून होते.

"अशा वेळी काकू धावत आत आली आणि मला घट्ट मिठीत घेऊन आक्रोश करू लागली, "अक्का, या चिमण्या लेकरासाठी तरी का थांबला नाही तुम्ही? या जुईच्या कळीसारख्या कोवळ्या लेकीला माझ्या ओटीत टाकून तुम्हाला जाववलं कसं?" मला रडू येईल असं करण्यात तिला फारच लवकर यश मिळालं. आपल्या छातीशी मला घट्ट कवटाळत तिनं मला हुंदके देऊन रडायला भाग पाडलं. आपल्या सहा वर्षांच्या मुलीचं यानंतर कसं होईल या काळजीत बुडालेल्या अप्पांना हे दृश्य पाहून काय वाटलं असेल? ज्या देवानं आईला नेलं त्याच देवानं काकूच्या मनात मातृत्व निर्माण केलं, असंच वाटलं असेल ना?

"त्यानंतर काकूनं मला क्षणभरही मोकळं सोडलं नाही. प्रेताचे पुढचे सगळे संस्कार बघून "हे लेकरू सगळं आठवत कायम त्रास करून घेईल" म्हणत तिनं माझ्या तोंडावरून पदर पांघरत मला आत नेलं. माझी देहयष्टी अप्पांच्यावर गेल्यामुळे सहाव्या वर्षीही मी भरपूर उंच होते. त्यामुळे मला उचलून घेऊन फिरणं तसं अडचणीचं होतं. तरीही मला क्षणभरही खाली

उतरू न देता ती घरभर वावरत होती. एवढ्या मोठ्या इस्टेटीच्या मालकिणीचे शवसंस्कार आणि पुढचे सगळे धार्मिक विधी तिच्या इतमामाला शोभतील असे करायची सूचना देऊन ती पुढं म्हणत होती, "हे सगळं बघायचं देवानं माझ्या नशिबात वाढून का ठेवलं?" एकंदरीत फारच थोड्या अवधीत तिनं असं वातावरण निर्माण केलं की, केवळ अप्पाच नव्हे, तर आईच्याही अगदी निकटच्या नात्यातली माणसं म्हणू लागली, "जयलक्ष्मम्मा नसतील, तर रामस्वामींना या लेकराला सांभाळणं शक्यच नाही." सुरुवातीला सहज प्रेम निर्माण झालं नाही की, नंतर कितीही कारणं दाखवून ते निर्माण होऊ शकत नाही. घरात जमलेली सगळी माणसं, 'हीच तुझी आई आहे.' म्हणत होती. अशा वेळी माझ्या मनातल्या भावना सहजपणे बाहेर येऊच शकल्या नाहीत. काकूसारख्या बाईच्या सान्निध्यात आणि सहा वर्षांच्या मुलीच्या भावना अशा दडपणाखाली येणं शक्यही नव्हतं. समजली ना माझी त्या वेळची मानसिक परिस्थिती?"

मनातल्या मनात काकूचं पात्र रेखाटणाऱ्या सोमशेखरनं होकारार्थी मान हलवली. अमृताच्या व्यक्तिमत्त्वावरून तो तिच्या वडलांचं चित्रंही नजरेपुढं आणू पाहत होता. त्यानं विचारलं, "पुढं काय झालं?"

"तेच तर सांगतेय. वैकुंठागमन झाल्यावर तिनं अप्पांना सांगितलं, "अक्कांचं इथलं स्थान काही साधारण नव्हतं. चौदाव्या दिवशी केवळ आपल्याच नव्हे, भोवतालच्या इस्टेटीतल्या लोकांनाही जेवायला बोलवायला पाहिजे." ते ऐकून आमचे अप्पाही खूश झाले. त्यानंतरच्या दिवशी घडलेली गोष्ट. अप्पा दिवाणखान्यात बसले होते. तिथं मला उचलून घेऊन जाऊन ती म्हणाली, "अशुभ कार्यासाठी आलेल्यानं 'जाऊन येते' म्हणू नये असं शास्त्र आहे, पण मी घरातलीच असल्यामुळे हे शास्त्र मला लागू पडत नाही. या लेकराला मी अशीच टाकून गेले आणि स्वर्गातली अक्का स्वप्नात येऊन, "माझ्या लेकराला पोरकं करून कशी आलीस?" म्हणून खडसावू लागली तर मी काय उत्तर देऊ? जीव गेला तरी मी हिला सोडून जाणार नाही. हिला माझ्याबरोबर घेऊन जाते. अधूनमधून तिला इथं घेऊन येईन. तुम्हीही कामाच्या निमित्तानं सकलेशपूरला येत असता, तेव्हा येऊन लेकीला भेटून जा. तुम्हाला मात्र इथंच नोकरांच्या हातचं कदान्न खाऊन राहायला पाहिजे. मी अधूनमधून येऊन सगळं बघून जाईन. पण तिथलाही संसार मला बघायला पाहिजे ना! मी नसेन, तर तुमचे भाऊ दुकानाची देखरेख नीट करत नाहीत. घरातल्या लहान मुलांकडेही बघायला पाहिजे.'

क्षणार्धात अप्पा म्हणाले, – मी काकूच्या कडेवर बसून बघत होते. अजूनही आठवतंय मला – "जयम्मा, ही तर तुला सोडून क्षणभरही राहत नाही. इथलं बघायला तरी कोण आहे? तुम्ही सगळेच इथं या." काकूनं काही क्षण विचार केल्यासारखं दाखवलं आणि म्हणाली, "तुम्हालाही असं एकटं टाकून जायची माझी मुळीच इच्छा नाही; पण आपण परिस्थितीचा नीट विचार करायला पाहिजे. अक्का फक्त हिला माझ्या ओटीत घालून गेल्या आहेत. इथली संपत्ती अक्काचीच आहे. त्यानंतर हिची आहे. वारसाहक्कानं तुम्हाला मिळालं होतं ते सगळं मोठ्या मनानं तुम्ही तुमच्या भावालाच दिलंत. तुम्ही सुरू करून दिलेलं दुकान कसंबसं चालवून एक वेळ पेज पिऊन आम्ही दिवस काढत आहोत. ते बंद करून इथं येऊन राहायचं म्हणजे आपण निर्माण केलेला जगायचा मार्ग आपल्या हातानं बंद केल्यासारखं आहे. शिवाय अक्काच्या माहेरच्या इस्टेटीतलं अन्न गिळत राहिलो, तर लोक काय म्हणतील? माझ्या

ओटीत घातलेल्या या लेकराला शिकवून शहाणं करणं आणि एखाद्या राजकुमाराशी तिचं लग्न लावून देणं हा माझा धर्म आहे. इथं येऊन राहणं योग्य नाही. तुम्ही एवढे धर्माचं पालन करणारे आहात. यात काही खोटं असेल तर तुम्हीच सांगा!" यावर अप्पा काय बोलणार? भावजयीच्या धर्मनिष्ठेपुढे आदरानं नतमस्तक झाले ते!

"माझ्या आईनं मला तिच्या ओटीत टाकलं, हे वाक्य ती सतत सांगत होती. माझ्या आईनं तर मला कुणाच्याच ओटीत टाकलं नव्हतं. जीव जायच्या आधी तिला बोलताही येत नव्हतं. ती बेशुद्धच होती. ती वारल्यानंतर पाच-सहा तासांनी ही काकू तिथं येऊन पोहोचली होती. आता त्या सगळ्या घटनांचा क्रम आठवला की समजतंय. त्या वेळी एवढं खुलासेवार समजायचं वयही नव्हतं माझं. आमच्या अप्पांनाही हे समजलं नाही! आईवेगळ्या मुलीला संभाळायला काकूच आईच्या जागी आली, तेही कुठल्याही अपेक्षा न ठेवता! ती आपल्या मुलीवर प्रेम करत आहे, यावर त्यांनी चटकन विश्वास ठेवला.

"काकूबरोबर मी सकलेशपूरला गेले. तिथल्या शाळेत माझं नाव लावलं. आठवड्याभरातच अप्पा भेटायला आले. खतं, औषधं, जीप-लॉरीसाठी तेल, पेट्रोल वगैरे आणण्यासाठी त्यांना आठवड्यातून एकदा सकलेशपूरला यावंच लागे; पण त्या प्रत्येक वेळी ते भावाकडे जात नसत. आता ते आठवड्यातून दोन वेळा घराकडे येऊ लागले. मला भेटल्याशिवाय त्यांना अजिबात राहवत नसे. शिवाय नोकरांबरोबर राहायला तेही कंटाळत असावेत. नोकरांशी स्नेह ठेवणं कसं शक्य आहे? तसा स्नेह ठेवला असता, तर नंतर त्यांच्याकडून कामं कशी करवून घेणार? काकूचं मात्र काय सांगू मी? ते आले की, आवर्जून त्यांच्या आवडीचे दोन पदार्थ करून त्यांना. "तिथं नोकरांच्या हातचं जेवत एकटे राहता." म्हणत होती. अप्पाही तिच्या बोलण्यानं सुखावत होते. मधूनमधून इस्टेटीवर जाऊन ती मिरपूड, मसाले, कोरड्या चटण्या, सांबार मसाला, गोज्जु मसाला, सार मसाला करून ठेवत होती. स्वयंपाक्यांना सूचनाही देत होती. असे सहा महिने गेले असतील. एक दिवस अप्पा स्पष्टच म्हणाले, "जयम्मा, लोकांना म्हणायचं ते म्हणू दे. तुम्ही काही उगाच तिथं येत नाही. हिच्यासाठी मी तुम्हाला बोलावतोय. इथलं दुकानही नीट चाललेलं नाही. तुम्ही सगळेच तिकडं चला."

"अप्पांच्या तोंडून एवढं बोलावणं आपण होऊन येईल असं करणारी आमची ही काकू! थोडक्यात काय, काका-काकू आणि त्यांची मुले इस्टेटीवर येऊन राहू लागली आणि त्यांची मुलं तिथंच रुजू लागली. माझ्या बरोबरीचा जयराम, त्याची लहान बहीण लीला आणि कृष्णमूर्तीचा जन्म ते सगळे इस्टेटवर राहायला आल्यावर झाला. घरात कितीतरी अन्न शिजत होतं. त्यात पाच जणांची भर पडल्यानं काही फार बिघडत होतं असं नव्हे.

"पण काकू काही चार कामं करून जेवणखाण करून मुकाट्यानं राहायला तिथं आली नव्हती. ती आली होती सगळ्या इस्टेटीची मालकीण व्हायला! एवढ्या मोठ्या इस्टेटीच्या कामकाजात कारकून-मॅनेजर यावर काही प्रमाणात विश्वास ठेवावा लागतो. ते कितीही विश्वासू असले, तरी काही गोष्टींकडे कानाडोळा करावाच लागतो. अप्पांनाही हे ठाऊक असलं पाहिजे; पण काय चाव्या फिरल्या कोण जाणे? इथं येऊन सहा महिने व्हायच्या आत काकूनं प्रमुख कारकुनाच्या हिशेबातली एक चूक अप्पांच्या नजरेला आणून दिली. तो कारकून शरमून नोकरी सोडून निघून गेला. दोन मेस्त्रींनाही तिनं असंच पळवून लावलं. "अक्कांची इस्टेट ही! यानंतर आपल्या अमृताची होणार. ती चोराच्या तोंडी जाताना बघून मला कसं फक्त स्वयंपाक-पाणी

करत बसवेल? मी सगळीकडे फिरून लक्ष ठेवेन. तुम्हीही तुमच्या भावाला सांगा आळशीपणा टाकून जरा हलायला!" म्हणत ती हिशेब तपासू लागली. त्याचबरोबर मला आणि अप्पांना आवडीचं खाणं-पिणं आग्रहानं वाढून आम्ही खूश राहू याची काळजी घेत होती. मला आठवड्यातून एकदा भरपूर तेल लावून शिकेकाईनं चोळून, भरपूर पाण्यानं न्हाऊ घालत होती. प्रत्येक सणाला स्वत: सकलेशपूरला जाऊन माझ्यासाठी उत्तम परकर-पोलकं शिवत होती.

"अप्पांकडेही तिनं आपला मोर्चा वळवला होता. "उन्हानं तुमचे डोळे बघा कसे लालबुंद झालेत गुंजेसारखे." म्हणत त्यांच्या डोक्यावर एरंडेल तेल घालून घसाघसा चोळत होती आणि वर म्हणत होती, "पाहिलंत कसा फेस येतोय? ऊन बाधलं असेल तर असा फेस येतो." सुरुवातीला अप्पांना थोडं विचित्र वाटलं, तरी तेही सुखावत होते. आधी आपल्या नवऱ्याला सांगून अप्पांना गरम पाण्यानं न्हायला घालत होती. तीन-चार महिन्यांनी "तुम्हाला नीट पाणी घालता आलं असतं तर संसाराची ही कथा का झाली असती?" म्हणत काकांच्या हातातली तपेली ओढून स्वत:च अप्पांना न्हायला घालू लागली. काकांनाही तेवढंच काम वाचलं म्हणून आनंदच झाला.

"घरातले सगळे व्यवहार ती आधीपासूनच बघत होती. आता इस्टेटीचेही सगळे व्यवहार तिच्या हातात आले. तरीही ती भारी डोकेबाज म्हणायची. अप्पांना न विचारता ती काही करायची नाही. ते ती त्यांना बोलूनही दाखवायची. अप्पांच्या मनात जी भावना होती तिला धक्काही न लावता तिचे कारभार सुरू होते.

"लवकरच सगळे नोकर तिला पाहून थरथर कापू लागले. फक्त नोकरांचे पगार आणि इतर फालतू खर्चाचे हिशेब तेवढे कारकुनांच्या हाती लागत होते. मोठेमोठ खरेदी-विक्रीचे व्यवहार, जीप-ट्रक्सचे व्यवहार ती स्वत: पाहत होती. पुढची तूही कल्पना करू शकशील!" अमृता त्याच्याकडे वळून म्हणाली.

"खरंय! म्हणजे ती सगळ्यांच्या नकळत स्वत:चं डबोलं भरू लागली म्हणायची!" सगळी स्वच्छ कल्पना आल्यामुळे तो आपसूकच उद्गारला.

"तिनं नेमका कधी आणि कसा या उद्योगाला प्रारंभ केला आणि कोणकोणत्या मार्गानं ती पैसे काढत राहिली याचा मलाही निश्चित अंदाज नाही. तेव्हा मी अगदी लहान होते. आठ वर्षांनंतर म्हणजे मी चौदा वर्षांची असताना अप्पा वारले. त्या वेळीही तिनं मला मिठीत घेऊन समाधान केलं. दिवसकर्म संपल्यावर एक दिवस मला एकटीलाच एका खोलीत घेऊन म्हणाली, "तुला तुझ्या इस्टेटीची सगळी माहिती करून घ्यायला पाहिजे. उद्या असूयेपोटी तुला कुणी काहीही सांगेल. म्हणून आज मी तुला सांगते. अमृता वयात आल्यावर तिचं योग्य मुलाशी लग्न लावून दिल्याशिवाय इथून जायचं नाही, असं तुझ्या अप्पांनी डोळे मिटायच्या आधी वचन घेतलंय माझ्याकडून. आता तूही मोठी होत आहेस. लोकांचं काय, माय-लेकीतही भांडण लावतात."

"मला तरी आणखी कोण होतं? इस्टेट, धन, संपत्ती, पैसा या विषयी मला काय ठाऊक असणार? रेशमी, जरीची झगझगीत परकर-पोलकी, नव्या नव्या प्रकारचे सिंथेटिक कपडे, रुचकर खाणं-पिणं, "माझी लाडकी लेक, माझी थोरली लेक" म्हणून प्रेमाचं बोलणं

यापलीकडच्या गोष्टींची काय कल्पना येणार? त्या वेळी मी हायस्कूलमध्ये शिकत होते. नंतर मी हासनच्या कॉलेजमध्ये जाऊ लागले. काकूच्याच दूरच्या नात्याची एक बाई स्वयंपाकासाठी ठेवून आमच्यासाठी हासनला घर केलं. काकू आठवड्यातले तीन दिवस आमच्याबरोबर राहत होती! आणि उरलेल्या दिवशी इस्टेटीवर. रविवारी आम्ही सगळेच तिथं जात होतो. अभ्यासात मी पहिल्यापासूनच आघाडीवर होते. स्मरणशक्तीचं मला वरदानच होतं. त्यात काकूची ताकीद असे, "इतर मुलींबरोबर फार मिसळू नकोस, फिरू नकोस, अभ्यास कर." त्यामुळे अभ्यासही केला जायचा. शिवाय लायब्ररीची पुस्तकं आणून वाचत राहणे हा माझा आवडीचा छंद होता. हातात मिळालेल्या पुस्तकात कसलाही भेद न करता फडशा पाडायचा!

"मी बी.ए.च्या शेवटच्या वर्गात शिकत असताना काकूनं माझ्या लग्नाचा विचार करायला, निदान माझ्यापुढे बोलून दाखवायला सुरुवात केली, "तुझी आई असती तर एव्हाना तुला दोन मुलं झाली असती! तुझे अप्पा असते, तर तुझं लग्न करून मोकळे झाले असते. तुझे अप्पा तर मला सांगून गेलेत." म्हणत डोळे टिपत, मला गोंजारत तिने मला लग्नाला तयार व्हायला लावलं. नवरा कोण सांग बघू?"

"रंगनाथ"

"नाव बरोबर सांगितलंस. पण तो कोण असेल सांग बघू?"

"त्यांच्या भावाचा मुलगा?"

"नाही. तिचा सख्खा भाऊ. डोनेशन देऊन बी.ई. झालेला इंजिनिअर! अधून-मधून तो घरी यायचा. ही त्याचं तोंड फाटेपर्यंत कौतुक करायची. इतर वेळीही म्हणायची, "माझी लेक एवढी देखणी आहे, पण इस्टेटीच्या लोभापोटी तिचा हात मागणाऱ्याला मी नाही मुलगी देणार! त्याचं तिच्यावर प्रेम पाहिजे. 'तिची संपत्ती तिची तिलाच लखलाभ! मला त्यातला सुतळीचा तोडाही नको.' म्हणणारा मुलगा पाहिजे अमृतासाठी!" असं दोन वर्षं मला सतत सांगत होती. प्रत्यक्ष लग्नाचा विषय काढायच्या आधी सहा महिने तिनं म्हणायला सुरुवात केली, "आज-काल कुणाचं काहीही सांगता येत नाही. अगदी अपरिचित माणसाच्या हाती माझी फुलासारखी लेक द्यायची म्हणजे माझ्या जिवाचा अगदी थरकाप उडतोय!" म्हणत राहिली. नंतर म्हणू लागली, "रंगनाथ घरचाच मुलगा आहे. काही झालं तरी त्याचा कान पकडून सांगता येईल. तळहातावरच्या फोडाप्रमाणे संभाळायची आधीच अट घालता येईल. तुझी काही अट असेल तर तूही सांग." मला कुणाशी फारसा विचारविनिमय करायची संधी न देता साखरपुडा झाला आणि पाठोपाठ उन्हाळ्याच्या सुट्टीत लग्नही झालं. मला चार-चौघांमध्ये मिसळून वाढू दिलं असतं, तरच मी विचार करू शकणार ना?"

"म्हणजे सगळी इस्टेट आपल्या माहेरचीच केली तिनं." सोमशेखर उद्गारला.

"लग्न झालं तेव्हा मी वीस वर्षांची होते. बी.ए.चा निकाल लागला तेव्हा मला दिवस गेले होते. काकूला फार आनंद झाला होता. आपला माहेरचा वंश वाढतोय म्हणून असेल! बी.ए.ला मी संपूर्ण विद्यापीठात पहिली आले होते सोमू! तसं पाहिलं, तर लग्नानंतर मी विशेष अभ्यासही केला नव्हता. रिझल्ट समजल्यावर मी हासनला जाऊन प्राध्यापकांना भेटले. त्यांना

माझा फारच अभिमान वाटला होता. त्यांनी कळकळीनं सांगितलं, “तुझ्यासारख्या मुलीनं शिक्षण थांबवणं म्हणजे अन्यायच. आम्ही हवं तर तुझ्या घरी येऊन सांगू. मैसूरला जाऊन तू एम.ए. करायला हवंस.” त्या वेळी मी न शिकता घरी बसायची नुसती कल्पना करून पाहिली; पण ते मला अशक्य वाटलं. गर्भारपणाचा बाऊ न करता मी पुढं शिकायचा आग्रह धरला. मी हटणार नाही हे लक्षात येताच काकूनं मैसूरला घर करायचं ठरवलं. पाठोपाठ जयराम, लीला, कृष्णमूर्तीलाही मैसूरला आणायचं ठरवू लागली. मी होस्टेलवर राहायचा विचार मांडला; पण तिनं तो मान्य केला नाही. अखेर माझाही नाइलाज झाला. मी लगेच एम.ए.साठी अर्ज केला. एक सीटही मिळाली. हे घर आमच्या अप्पांनी पूर्वीच विकत घेतलं होतं. दसरा आणि रामनवमीच्या उत्सवाच्या वेळी ते सांगीताचे कार्यक्रम ऐकण्यासाठी इथं येत. अप्पांच्या मृत्यूनंतर काकूनं ते भाड्यानं दिलं होतं. भाडेकरू एकदम कसं घर रिकामं करतील? शिवाय त्या तिघांनाही शाळा-कॉलेजमध्ये जागा मिळाल्या नाहीत. सगळी व्यवस्था होईपर्यंत होस्टेलमध्ये राहते असं सांगून मी तिथून निघालेच.

“त्या वेळी रंगनाथ हेमावती धरणावर ज्युनिअर इंजिनिअर म्हणून नोकरीला होता. तो मला दबून असतो, हे मला त्या वेळपर्यंत समजलं होतं. होस्टेलमध्ये दोन महिने राहताना खऱ्या अर्थी स्वातंत्र्य, स्वत्व म्हणजे काय याचा अर्थ समजू लागला. तिथं मला श्वेता नावाची एक मैत्रीण मिळाली; आमच्या सकलेशपूर तालुक्यातीलच. तीही इस्टेट मालकाची मुलगी होती. गौरीचा सण आला. दोघीही सकलेशपूरपर्यंत बरोबरीनं आलो आणि तिथून ती तिच्या इस्टेटवर आणि मी आमच्या इस्टेटवर आले. सुट्टी संपल्यावरही दोघी तिथंच भेटलो आणि मैसूरला आलो. मला तेव्हा चौथा महिना होता. दोघीही साहित्याच्या विद्यार्थिनी. बस सुरू झाल्यावर गप्पा मारता मारता तिनं विचारलं, “पात्रांचं पुनर्मापन करायचं म्हणजे काय तुला ठाऊक आहे?” मला काहीच समजलं नाही म्हणून मी विचारलं, “कुठल्या संदर्भात तू हे विचारतेस?”

“ती खाकरून सांगू लागली, “हे बघ, जे माझ्या कानावर आलं ते सांगते ऐक. परवा घरी सहज गप्पा मारताना मी तुझा उल्लेख करून आम्ही दोघी कशा मैत्रिणी आहोत, कशा मिळून आलो वगैरे सांगत होते. दोन दिवस गेल्यानंतर आईनं सांगितलं, तुझी काकू तुझी प्रचंड प्रमाणात फसवणूक करते आहे. आमच्या इस्टेटीपासून आठेक मैलांवर त्यांनी एक साठ एकराचा आणि दुसरा पंचेचाळीस एकरांचा डाग विकत घेतलाय म्हणे. कॉफीचे मळे आहेत दोन्ही. जयराम आणि कृष्णमूर्ती अशा दोन मुलांच्या नावानं. त्या दोन्ही मळ्यांची किंमत सुमारे सव्वीस लाख रूपये एवढी आहे. दरिद्री माहेर असलेल्या या बयेनं हे कसं केलं असेल? शिवाय हासनच्या तल्लम वेंकटरमण शेट्टींच्या सराफी कट्टयांवरून तिनं वेळोवेळी भरपूर सोनंही विकत घेतलंय म्हणे. एव्हाना सात-आठ शेर तरी निश्चित घेतलं असेल. तू कुणाला सांगू नकोस मी बोलले म्हणून. तू फक्त समजून घे. आणखी एक गोष्ट आहे, तुझ्या मिस्टरांचं इंजिनिअरिंगचं शिक्षणही तुझ्या काकूनंच केलंय. डोनेशन देऊन सीट मिळवली आणि होस्टेलमध्ये ठेवून शिकवलं. तेही तुझ्या इस्टेटमधल्या पैशानंच!”

“बस अजूनही रानातल्या रस्त्यावरून धावत होती. माझी नजर आणि बरंचसं लक्ष बाहेरच्या हिरव्यागार निसर्गावर होतं. ‘दोन इस्टेटींचे सव्वीस लक्ष रुपये, सात-आठ शेर सोन्याचे किती होतील?’ भावासाठी दिलेलं डोनेशन, फी, होस्टेलचा खर्च सगळं ऐकतानासुद्धा मला एखाद्या अपरिचिताची कथा ऐकल्यासारखं वाटत होतं. त्यानंतर आम्ही दोघी कॉलेज,

युनिव्हर्सिटी, साहित्यात आज-काल दिसणारे प्रवाह, त्यात दिसणाऱ्या प्रवृत्ती यावर भरपूर बोललो. तिनं सांगितलेला तपशील फारच हळूहळू माझ्या मनात उतरला. तरीही ज्यावर आपण आजपर्यंत पूर्णपणे विश्वास ठेवला त्याचं पुनर्मापन करणं आणि त्यासंदर्भातले सगळे तपशील त्या दृष्टीनं तपासणं इतकंसं सोपं नव्हतं. त्यात चार महिने झालेले. एकीकडे एकटी राहायची भीती वाटत होती आणि क्लासमध्ये जायची लाज वाटत होती. शिवाय त्या अवस्थेत असताना आईची ममता भावनात्मकदृष्ट्याही अत्यंत आवश्यक वाटते ना! काकू मात्र अतिशय हुशार! एक दिवस ती रंगनाथला घेऊन मैसूरला आली. ही जागा अजून रिकामी झाली नव्हती. तिनं यादवगिरीत एक जागा भाड्यानं घेतली आणि म्हणाली, "गर्भारशी आणि पहिलटकरीण तू! मी नाही तुला एकटीला अशी होस्टेलमध्ये राहू द्यायची! आता तू बाळंत होईपर्यंत मी इथंच राहीन. अधूनमधून तिथलंही पाहून येईन. स्वयंपाकासाठी हासनहून पुट्टबायम्माला बोलावून घेते." तिला नकार देण्याची भावनात्मक शक्ती माझ्या अंगीही नव्हती. पहिलं गर्भारपण म्हणजे मनात सत्राशेसाठ काळज्या; पण तरीही त्या तिघांना जयरामला, लीलाला आणि कृष्णमूर्तीला कायमचं इथं ठेवून घ्यायला मी तयार नव्हते. त्यांच्या शिक्षणात उगाच अडथळा नको म्हटल्यावर ती त्यासाठी कबूल झाली. "मंत्र्यांचा वशिला लावून रंगनाथची मैसूरला बदली करून घेऊ या." असं तिनं ठरवल्यावर मला त्याविरुद्ध विचारसुद्धा करणं अशक्य होतं तेव्हा. रंगनाथची मैसूरला बदली झाली. विजय जन्मला. बारसं झालं. बाळंतपण छान झालं.

"इकडं एम.ए.लाही मला प्रथम वर्ग मिळाला. आणखी शिकणं, चर्चासत्रांमध्ये भाग घेणं, किरकोळ समीक्षात्मक लेख लिहिणं... इथल्या जीवनाचा परिणाम म्हणून मी एक वेगळीच व्यक्ती बनत चालले होते. रंगनाथ डोनेशन देऊन बी.ई. झाला असला, तरी जड बुद्धीचा असल्याचं फार लवकर माझ्या लक्षात आलं होतं. नवरा-बायकोचं नातं कसं असावं, बौद्धिक स्पंदन -प्रतिस्पंदन कसं पाहिजे, बौद्धिक संबंध वाढले नाहीत, तर भावनात्मक संबंधही कसे बधिर राहतील हे सगळं समजत होतं.

"विजय आठ महिन्यांचा होईपर्यंत काकू इथं राहिली. त्यानंतर लीलाचं लग्न करायचं होतं. बाळाचं सगळं आटोपून एम.ए.च्या दुसऱ्या वर्षाचा अभ्यास करणं मला त्रासाचं वाटत होतं. त्यामुळे अंगावर पाजायचं थांबताच काकू विजयला इस्टेटीवर घेऊन गेली. मलाही ते हवंच होतं. कामासाठी बाई असली, तरी रंगनाथ ऑफिसला जाताना घरचंही थोडं-फार बघत होता. तिनं खर्चासाठी इथल्या बँकेत पंचवीस हजार रुपये ठेवले होते. त्या वर्षी मी संपूर्ण विद्यापीठात पहिली आले. अभ्यास, चर्चासत्रं, भाषणं यात रमतारमता मी एम.ए.चा निकाल समजण्याआधीच डॉक्टरेट करायचं ठरवलं होतं. त्याप्रमाणे मी विषय ठरवून अभ्यासालाही सुरुवात केली होती. सोमू, दोन वर्षांत मी प्रबंध पूर्ण केला, ठाऊक आहे? पुढं तीन महिन्यांत निकाल समजला. प्रबंध विद्यापीठानं प्रसिद्ध करावा अशी परीक्षकांनी एकमतानं शिफारस केली होती!" तिच्या आवाजात उत्साह होता. डोळे चमकत होते.

तोही अभिमानानं फुलून जात तो म्हणाला, "होय? यातलं मला काहीच ठाऊक नव्हतं. तू खूप शिकलीस, एवढंच मी समजत होतो."

"ते जाऊ दे. काकूनं स्वत:च्या मुलांसाठी वेगळी इस्टेट केल्याचं मी विसरले नव्हते; पण मी तिला त्या विषयी काही विचारलंही नाही, पण लीलेचं लग्न झालं तेव्हा मात्र मला गप्प बसणं अशक्य झालं.

"लीलेचं सासर बेंगळुरूचं. काकू इथं येऊन मला सांगून गेली, "त्यांनी लग्न बेंगळुरूला करा म्हटलंय. मी जाऊन सगळी चौकशी करून येते. चांगलं घर आहे. मुलगा देखणा आहे. तीन मोठ-मोठ्या एजन्सीज त्यांच्याकडे आहेत."

"ते लग्न मी पाहिलं. अतिशय थाटामाटात झालं. लीला तर सोन्यानं एवढी मढली होती की, नवकोट नारायणाच्या मुलालाही एवढं सोनं देणं शक्य नाही! एका खोलीत तिला द्यायची स्टीलची भांडी पाहुण्यांच्या अपेक्षेप्रमाणे मांडून ठेवली होती. एक मोठं दुकानच होतं ते. याशिवाय पन्नास हजार वरदक्षिणा म्हणून दिले. खाणं-पिणं, सिल्कच्या साड्या, रिसेप्शन-मांडव, वाजंत्री, रोषणाई. प्रचंड खर्च झाल्याचं स्पष्ट दिसत होतं. लग्नघरात काकू माझ्याशी अत्यंत मायेनं वागत होती. पाहुण्यांना "ही माझी थोरली लेक!" म्हणून ओळख करून देत होती.

"लग्नघरात वावरताना मला श्वेतानं सांगितलेलं आठवत होतं. एवढंच नव्हे, तर पूर्ण लग्नाच्या बाबतीतच तिनं माझ्याशी कशी फसवणूक केली ते स्पष्टपणे दिसू लागलं.

"लीलेवर माझा कधीच राग नव्हता. उलट एकत्र वाढल्यामुळे प्रेमच होतं. तिचं चांगलं झालं म्हणून मला वाईट वाटायचा प्रश्न नव्हता; पण माझं मन आता तिच्याशी माझी तुलना करू लागलं. रूप, शिक्षण सर्वच बाबतीत मी तिच्यापेक्षा निश्चित उजवी होते आणि काकूनं माझं लग्न केलं, बेताची आर्थिक परिस्थिती, रूपाच्या बाबतीत जमीन-आसमानाचा फरक असलेल्या आणि मेरिट नसलेल्या आपल्या भावाशी! माझी सगळी संपत्ती आपल्या माहेरी जोडली आणि माझे लक्षावधी रुपये उडवून आपल्या मुलीला गडगंज घरी देऊन त्यांच्या संपत्तीचा उपभोग आपल्या मुलीला मिळेल असं केलं. लीला माझ्यापेक्षा फक्त दोन वर्षांनीच लहान होती. मग का तिचं लग्न रंगनाथशी लावून दिलं नाही? तसं केलं असतं, तर मुलगी गरीब घरी राहिली असती आणि भावालाही माझी संपत्ती मिळाली नसती! या कपटी बयेनं मला आतल्या आत भोसकलं होतं! लग्नघरात यातलं काहीही दाखवलं नाही तरी मी सुन्न झाले होते.

"बहिणीच्या घरच्या कार्यात रंगनाथ उपकार स्मरून राबत होता. मला माझं लग्न आठवलं. मला सोनं, चांदी, हिरे, मोत्यांचा मोह कधीही नव्हता. आताही नाही. अंगावर एकही दागिना नसला, तर लोकांचं लक्ष जातं म्हणून चार बांगड्या आणि कुड्या घालते एवढंच! माझ्या लग्नात मी सोनंनाणं मागितलं नाही आणि तिनं दिलं नाही. पहिल्यापासून एवढ्या मोठ्या इस्टेटीचे मालक असलेल्या माझ्या आजोबांनी आपल्या एकुलत्या एक मुलीला माझ्या आईला, तिच्या लग्नात काहीच दागिने घातले नसतील काय? आईच्या मृत्यूनंतर ते सगळे कुठं गेले? आईचे दागिने तरी माझ्या अंगावर लग्नाच्या वेळी घालायला नको होते काय? काकूनं कधीही आईच्या दागिन्यांचा विषय काढला नव्हता. मग दाखवायचा तर प्रश्नच नाही. ते सगळे दागिने कुठे गेले? आज त्यांची काय किंमत झाली असती?

"लग्न उरकल्यावर मुलाकडचे पाहुणे निघून गेले. कार्यालय रिकामं करायचं होतं. न थांबता कामाचं निमित्त करून मी मैसूरला निघून आले. रंगनाथ बहिणीला मदत करण्यासाठी तिथंच थांबला होता. आता मला श्वेतानं सांगितलेल्याची तीव्रतेनं आठवण झाली. काकूनं विकत घेतलेल्या इस्टेटीचा तपशील शोधायचा मी निश्चय केला. ओळखीच्या माणसाची टॅक्सी घेऊन मी एकटीच श्वेताच्या वडलांच्या इस्टेटीवर गेले. त्या वेळी तिचं लग्न झालं नव्हतं. ती घरीच

असेल हे ठाऊक होतं. एका खोलीत बसून मनातलं सगळं तिच्या पुढ्यात मोकळं केलं. नंतर तिनं ते सगळं आपल्या वडलांच्या कानावर घातलं. वीरप्पगौडा त्यांचं नाव. मी बसलेल्या खोलीत येऊन ते म्हणाले, "आमची श्वेता तुमच्याविषयी बरंचकाही सांगत असते. तुमचं अभ्यासातच खूप लक्ष असल्यामुळे व्यवहाराकडे दुर्लक्ष झालेलं दिसतं. तुमच्या काकूंनी कुठं काय विकत घेतलंय याचा तपशील आपल्याला रजिस्टर-ऑफिसमध्ये मिळवता येईल; पण तिथं व्यवहारातल्या खऱ्या रकमांची बहुतेक नोंद नसते. त्या जमिनी ज्यांनी विकल्या आहेत त्यांनीच सांगितलं, एका जमिनीसाठी पंधरा आणि दुसरीसाठी अकरा असा एकूण सव्वीस लाखांचा हा व्यवहार झालाय म्हणून. हवं तर सकलेशपूरला जाऊ या. रेकॉर्ड दाखवतो."

"श्वेता, तिचे वडील आणि मी त्याच टॅक्सीनं सकलेशपूरला गेलो. एक शंभराची नोट सारल्यावर तिथल्या कारकुनानं भल्यामोठ्या रजिस्टरातली नोंद दाखवली. त्यात दहा आणि सात लाखांचा व्यवहार दाखवला होता. दोन्ही व्यवहारंमध्ये एक वर्षाचं अंतर होतं. वीरप्पगौडांनी सगळा तपशील एका कागदावर टिपून घेतला आणि पुन्हा आम्ही श्वेताच्या घरी आलो.

"चहा-पाणी चाललं असता श्वेताची आई म्हणाली, "या बाईमाणसाची एवढी मोठी फसवणूक झाली आहे! यावर काहीच करता येणार नाही काय?"

"वीरप्पगौडा म्हणाले, "काय करणार? रजिस्टरमध्ये जेवढी नोंद सापडते तेवढंच कोर्टात सिद्ध करायचा प्रश्न आहे. शिवाय त्यांनी इस्टेटीच्या हिशेबामध्ये काय गोंधळ केले आहेत, खत-पाण्याच्या नावानं किती खर्च केलाय, कॉफीबोर्डाकडे केवढी कॉफी विकली आहे, त्या वर्षी काय दर होता वगैरे तपशील काढणं शक्य आहे. वकील हे सगळं करतील. तुमच्या आईच्या सोन्यानाण्याविषयी मला काहीच सिद्ध करता येणार नाही. एवढी मोठी इस्टेट खरेदी करण्यासाठी पैसा कुठून मिळाला हा मायनर मुलीच्या इस्टेटीच्या अधिकाराचा दुरुपयोग आहे म्हणून केस करता येईल. एक म्हणजे कोर्टाची कामं झटपट होणार नाहीत आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे थोरल्या बहिणीवर केस करायला तुमचे मिस्टर मान्यता देतील काय? याचा तुम्हा दोघांच्या संबंधावर काय परिणाम होईल याचा विचार करा."

"त्या रात्री मी आणि श्वेता एका खोलीतच झोपलो होतो. तिच्याशी मन मोकळं करून बोलताना मला आई वारल्यानंतर पहिल्यांदा मला मिठी मारून सांत्वन करण्याच्या प्रसंगापासून नंतर घडलेली प्रत्येक घटना आणि तिचं प्रत्येक वाक्य नव्या अर्थानं समजू लागलं. तिच्या प्रेमात सहज निर्व्याजता आहे की नाही, याचा मी कधी विचारच केला नव्हता. तीस-चाळीस लाख रुपयांच्या फसवणुकीबरोबरच माझ्याशी लग्न करायची लायकी नसलेल्या आपल्या भावाच्या हाती तिनं माझं जीवन सोपवलं ही वस्तुस्थिती प्रथमच स्पष्टपणे माझ्यासमोर उभी राहिली. परिस्थितीचं खरं गांभीर्य त्या वेळी मला समजलं. श्वेताही फार कष्टी झाली. माझा हात हातात घेऊन "खरंय. तुझे वडील असते तर...' वगैरे काही बोलली. यानंतरही मी सगळ्या नात्यांचा नीट विचार करून काय तो निर्णय घ्यायला पाहिजे, असं तिचं मत पडलं. तिच्या आईनं हळद-कुंकू लावून साडी-ब्लाऊजपीस देऊन मला निरोप दिला.

"मी मैसूरला परतले त्याच दिवशी रात्री रंगनाथ आला. त्या रात्री मी त्याच्यावर आगपाखड केली. पण काय आश्चर्य सांगू? सगळी हकिकत समजल्यावर कुणीही काय म्हणेल? तूच सांग

तुला काय वाटलं?"

"शुद्ध फसवणूक! अत्यंत हीन बुद्धीनं खेळलेला कुटील डाव हा!" सोमशेखर मनापासून उद्गारला.

"पण रंगनाथला आपल्या बहिणीच्या वागण्यात काहीच कपट दिसलं नाही. तो काय म्हणाला ठाऊक आहे? "तिनं तुला एवढं सांभाळलं, इस्टेट चोरापोरी जाणार नाही हे पाहिलं. आपल्या मुलांसाठीही केलं असेल थोडं-फार काहीतरी!" मला त्याचा पराकोटीचा तिरस्कार वाटला. याचाही त्यात फायदाच झाला होता ना! त्यानंतरचे दोन दिवस अबोल्यात गेले. नंतर दोन दिवसांनी तो आपण होऊन बोलायला आला, "तुझ्या आईच्या सोन्या-नाण्याची चौकशी करायला पाहिजे." म्हणू लागला. मीही अबोला सोडला. तीन दिवस भरपूर मन:स्ताप करून घेऊन मी पुन्हा टॅक्सीनं आमच्या इस्टेटवर गेले. काकू पुन्हा नाटकीपणानं भरपूर बोलली. "टॅक्सी झाली म्हणून काय झालं? किती जीवघेणा उकाडा हा!" म्हणत आपल्या पदरानं माझ्या कपाळावरचा घाम पुसायला आली.

"मला ते असह्य झालं आणि मी संतापानं म्हणाले, "काकू, आता हे नाटक बंद कर. पंधरा आणि अकरा लाखांच्या दोन जमिनी चोरून घेतल्यास ना! त्यासाठी पैसा कुठून आणलास? लीलाच्या लग्नाचा खर्च, तिचे दागिने, कुठून आले ते पैसे? माझ्या अन्नावर पोसलेल्या तुझ्या भावाचं माझ्याशी लग्न लावून देऊन माझी सगळी इस्टेट आपल्या माहेरी ओढलीस. आपल्या मुलीला श्रीमंत घरी दिलंस. तेही माझ्या पैशाच्या बळावर! अप्पांच्या माघारी केलेला आजपर्यंतचा इस्टेटीचा सगळा जमाखर्च बघायचाय मला!

"मध्ये दोन मिनिटं गेली असतील... छे:! अर्धं मिनिटच गेलं असेल-नसेल, तिनं स्वत:ला लगेच सावरलं. आहाहा! काय नाटकीपणा म्हणून सांगू! डोळ्यांत हुकमी पाणीही आणलं तिनं! म्हणाली, "पोटी जन्मलेल्या मुलीपेक्षा पोरक्या लेकरावर प्रेम करायला पाहिजे म्हणून परमेश्वराच्या पायाची शपथ घेऊन तुझ्यावर माया केली! तू हिशेब विचारलास यात काहीच चुकलं नाही. तुझ्या वतीनं देखरेख करायची, याच भावनेनं मी सगळं केलं आहे. मी केलेल्या चाकरीचं फळ म्हणून मी, तुझे काका, तुझी भावंडं, तुझा नवरा इथं गोळाभर अन्न खात आहोत. सकलेशपूरचं दुकान चाललं असतं, तर जेवढे पैसे आले असते त्याहून तांब्याचा एक फुटका पैसाही आम्ही जास्तीचा घेतला नाही. आईवेगळी मुलगी! तिच्या नवऱ्यानं आमचं ऐकून वागायला पाहिजे म्हणून मी रंगनाथला बळेच लग्नासाठी तयार केलं. नाहीतर त्याला मुलगी द्यायला कसली-कसली माणसं, तुमकूरचे डेप्युटी कमिशनर आले होते. ते स्थळ नाकारायला लावून तुझ्याशी लग्न करायला त्याला भाग पाडलं."

"प्रत्येक गोष्ट आपल्याला हवी तशी वळवून सांगायची बुद्धी तुझ्याकडं आहे हे मला ठाऊक आहे. तुझ्या भावाचं तुझ्या मुलीशी का नाही लग्न लावून दिलंस तू?" मी विचारलं.

"खरं ते सांगितलं, तर त्यात बुद्धीचा काय प्रश्न आला? माझ्या लेकीच्या संसारात काही अडचण आली, तर त्यासाठी मी कष्टी होईन, दु:ख भोगेन; पण तुझ्या वाट्याला असं काही दु:ख येऊ नये. मुलगा आपल्या हातातला असेल, तर तुला एक दिवसही कष्ट भोगावे लागणार नाहीत. तूच सांग, आजपर्यंत त्यानं कधी तुला वाईट शब्द उच्चारला की कधी दु:ख दिलं?"

“खरोखर सांगते सोमू, त्या क्षणी मी निरुत्तर झाले; पण तिचं सगळं बोलणं धडधडीत खोटं आहे म्हणून माझं अंतरंग ओरडून सांगत होतं. मी तिच्या तोंडावर थुंकले नाही एवढंच! त्याच पावली मी टॅक्सीतून निघून आले. तीही मला थांबवायच्या भानगडीत पडली नाही. भर दुपारी अडीच वाजता पुन्हा मैसूरला पोहोचले. संध्याकाळी रंगनाथला मात्र मी गावी जाऊन आल्याचं सांगितलं नाही.

“ही घटना होऊन आठवडा झाला असेल. एक दिवस दुपारी काकू मैसूरला आली. हातात एक लहान पिशवी होती. आल्या आल्या न्हाणीघरात जाऊन पाय धुवून आली. मला जवळ बोलावून म्हणाली, “माय-लेकी असोत किंवा आणखी कुणी असोत, मनात शंका आल्यावर दोघांमध्ये व्यवहार राहता कामा नये. फक्त प्रेम असावं. हा घे, वकिलांना विचारून एक कागद केलाय. कॉफी-बोर्ड, बँक सगळीकडे याच्या प्रती दिल्या आहेत. त्याचीच ही प्रत. “माझ्या दिराच्या मुलीच्या वतीने मी सुगूरची कॉफी इस्टेट पाहत होते. आता तिचं लग्न झालं असून स्वत: सगळा व्यवहार बघण्याइतकी ती मोठी झाली आहे. यानंतरचा समस्त व्यवहार ती पाहील.” म्हणून लिहून दिलंय त्यात. काल संध्याकाळी मी इस्टेटवरचं आमचं सामान – जी चार भांडी पोत्यात भरून ठेवली होती – सकलेशपूरला पाठवलंय. तिथं आमच्या घरी राहणाऱ्या शाळामास्तरांना रातोरात घराबाहेर काढलं. आजपासून इस्टेटीचे सगळे व्यवहार तू बघायचे. मी तिथं पायही टाकणार नाही; पण माझी लेक म्हणून माझी तुझ्यावरची माया अजूनही तशीच आहे. आता मला निघायला पाहिजे. घरी आलेलं कुणी उपाशीपोटी जाणं या घराच्या दृष्टीनं चांगलं नाही. भांडंभर दूध दे. देव तुझं आणि तुझ्या संसाराचं कल्याण करू दे.” म्हणत तिनं देवाला वाकून नमस्कार केला. स्वत:ला आणि मला कुंकू लावलं. नंतर थेट तशीच स्वयंपाकघरात गेली. भंड्यात दूध ओतून गटागटा पिऊन तरातरा निघून गेली. तिनं रिक्षा बाहेर उभीच केली होती.

“त्या क्षणी भावना-युद्धात तिनं माझा सपशेल पराभव केला होता; पण मीही तिच्यामागून धावून रिक्षा थांबवली नाही. संध्याकाळी रंगनाथ घरी येताच, मी त्याला घडलेली सगळी हकिकत सांगितली. आधी तो चकित झाला. दोन महिन्यांनी ती घटना मी पुन्हा आठवून पाहिली तेव्हा लक्षात आलं, रिक्षा घेऊन ती ऑफिसमध्ये जाऊन येऊनच पुढं गेली असावी. दोन दिवस गेले. तिच्याशी बोलून येतो म्हणून सांगत तो तीन दिवस सकलेशपूरला जाऊन आला. आल्यावर तो वेदान्तच बोलत होता, “यानंतर तिला इस्टेटची जबाबदारी द्यायला नको. किती केलं तरी ते आपलं सर्वस्व आहे. सरकारी नोकरीमुळे मीही वरचेवर जाऊन बघू शकणार नाही. तूच एखादा मॅनेजर पाहा. तुलाच वरचेवर फेऱ्या माराव्या लागतील. आपली इस्टेटवरची कार इथं आणून ठेवू या. सुट्टी असेल तेव्हा मीही जाऊन येईन.” वगैरे वगैरे. त्यानं ‘तू उलटलीस. उपकार विसरलीस’ यासारखा एक शब्दही उच्चारला नाही. मलाही थोडं बरं वाटलं.

“दुसऱ्या दिवशी मी पुन्हा टॅक्सीनं सकलेशपूरला गेले. बँकेत फक्त साठ हजार रुपये होते. बोर्डाचं चाळीस हजारांचं कर्ज होतं. श्वेताच्या इस्टेटवर गेले. काकूचा कागद दाखवला. त्यांनाही थोडं आश्चर्य वाटलं. तरीही ते म्हणाले, “बा◌ंईना पश्चात्ताप झाला म्हणायचा की काय? कदाचित तुम्ही कोर्ट-कचेरी करू नये म्हणूनही त्यांनी हा पवित्रा घेतला असावा. तुम्ही आता आधी एक मॅनेजर नेमायला पाहिजे. पाहिजे तर मी एखादा माणूस शोधून देईन. एक मात्र कायमचं लक्षात ठेवा. कितीही प्रामाणिक मॅनेजर असला, तरी थोडं खाल्ल्याशिवाय राहणार

नाही. तुम्ही अधून-मधून हिशेबात लक्ष घालायला पाहिजे. फ्लॉवरिंग सीझनला एखादी चक्कर मारायला पाहिजे. पिकिंगच्या वेळी इथंच थांबायला पाहिजे. वर्षभर मी तुम्हाला मध्येमध्ये आणखी काय करायचं त्याच्या सूचना देईन. म्हणजे त्याच्या खाण्यावर मर्यादा राहील. त्यानं कितीही खाल्लं, तरी वर्षाकाठी सगळा खर्च जाऊन तीन-चार लाख रुपये सहज शिल्लक राहतील."

"पाठोपाठ त्यांनी आणखीही एक सुचवलं, "तुम्ही स्वत: इस्टेटवर येऊन का राहत नाही? मॅनेजर असला, तरी रोज तुमची नजर फिरत राहील. मग मॅनेजरनं कितीही खायचं म्हटलं, तरी ते संपूर्ण जेवणातल्या एखाद्या शिताएवढंच राहील."

"मीही यावर खूप विचार केला. त्या वेळी माझं प्रबंधाचं काम संपत आलं होतं. तो पूर्ण करून इस्टेटवर राहावं, भरपूर पुस्तकं मागवून वाचत राहावं असंही एकीकडे वाटत होतं, पण मैसूरला राहायला आल्यापासून माझ्यातच फरक पडला होता. पुन्हा इस्टेटवर जाऊन राहायचा विचार फारसा पटला नाही. वीरप्पगौडांच्या माहितीचा मॅनेजर ठेवला, त्यांच्या सूचनेप्रमाणे सगळंकाही करत गेले तेव्हा त्या वर्षाच्या अखेरीस किती नफा मिळाला ठाऊक आहे?"

"तीन-चार लाख म्हणून त्यांनी सांगितलं होतं ना?"

"साडेतीन लाख! पण गेल्या वर्षाच्या दरामध्ये फरक पडला होता. रुपयाची किंमतही तेव्हा जास्त होती. म्हणजे काकूनं एवढ्या वर्षांत किती पैसा मारला असेल याची कल्पना कर. ते जाऊ दे. त्यातच आणखी एक घोळ झाला. मला पुन्हा दिवस राहिले. लग्न झाल्या झाल्या मी गर्भार राहिले म्हणून सांगितलं ना, त्या वेळीही माझ्या मनात नव्हतंच. शिकत असताना मला त्याची अडचण वाटत होती. रंगनाथनं तत्परतेनं "हवं तर ॲबॉर्शन करून घे." म्हणून सांगितलं; पण एकदा पोटात कोंब रूजल्यावर त्याची हत्या करायला मी तयार झाले नाही. एवढं मोठं पोट घेऊन वर्गात जाताना किती लाज वाटायची म्हणून सांगू! पण तरीही मी मूल होऊ दिलं; पण त्यानंतर मात्र मी त्याला सांगितलं, "झालं ते झालं. दोघंही अननुभवी होतो. यानंतर सावधगिरी बाळगायला पाहिजे. ती जबाबदारी तुमची. पुन्हा मी आपण होऊन म्हणेपर्यंत मूल नको." त्यानंतर तो सावध होता. मीही ती जबाबदारी त्याच्यावर सोपवून निश्चिन्तपणे राहत होते. मी इस्टेटीचं सगळं पाहायला सुरुवात केली आणि माझी पाळी चुकली. मी चकित झाले. तोही आपल्याला काहीच ठाऊक नसल्यासारखं दाखवत राहिला. डॉक्टरांकडे गेले. त्यांनी दोन आठवडे थांबायला सांगितलं. उलट्या सुरू झाल्याच होत्या. मी त्याला दोष दिला. तो म्हणाला, "काही वेळा उपाय अयशस्वी ठरतात. त्याला कोण काय करणार?" डॉक्टर म्हणाले, 'थोरला अडीच वर्षांचा आहे ना? दोन मुलांमध्ये तीन वर्षांचं अंतर राहील. योग्यच आहे. शिवाय लहान वयात बाळंतपण होणं तुमच्या दृष्टीनंही चांगलं.' अशा परिस्थितीत मी प्रबंध लिहून पूर्ण केला.

"तिसरा महिना चालला होता आणि एक दिवस मनात एक शंका आली. एव्हाना मला रंगनाथच्या व्यक्तिमत्त्वाची पूर्ण कल्पना आली होती. एका रात्री सोक्षमोक्ष लावायचं ठरवूनच "देवाची शपथ आहे, खरं काय ते सांगा." अशी सुरुवात केली. बहीण, तिची मुलं सगळ्यांची शपथ घ्यायला लावून म्हटलं, "मी नंतर डॉक्टरांशी व्यवस्थित बोलले. ते म्हणाले, "सावधगिरीची उपाययोजना फेल झालेली नाही. हे मुद्दाम घडवलेलं आहे." त्याला वैज्ञानिक पुरावाही आहे. आपण उद्या सकाळी डॉक्टरांकडे जाऊ या. नाहीतर मला खरं काय ते सांगा."

"मग?"

"त्याचा चेहरा काळाठिक्कर पडला. मी पुन्हा वेळ न दवडता म्हणाले, "देवाची, बहिणीची, मुलांची शपथ घेतलीय तुम्ही. त्यांच्या संसाराचं काही बरंवाईट झालं, तर त्याला तुम्ही जबाबदार!" मात्र बरोबर लागू पडली. लगेच बोलला पोपट! बहिणीच्या घरी तो गेला होता तेव्हा तिनं सांगितलं होतं, "असा हातावर हात ठेवून बसलास, तर ती तुला सोडून निघून जाईल. आणखी एक मूल होऊ दे. दोन मुलांच्या आईला नवऱ्याला सोडून जाणं सोपं नाही आणि मग तिच्याकडे कुणी ढुंकूनही बघणार नाही." नंतर त्यानं आपल्या वागण्याचं समर्थन केलं, "यात माझी काही चूक नाही. तुझ्यावरच्या प्रेमापोटी मी तसा वागलो." वगैरे. बस्स! त्यानंतर मी त्याला स्पर्श करू दिला नाही. त्याच्या झोपण्याची व्यवस्था त्याच दिवशी वेगळ्या खोलीत केली. नंतर दोन-तीन दिवस चूक केलेल्या कुत्र्यासारखा भोवताली घोटाळत राहिला. अंगचटीला यायची चिन्हं दिसली तेव्हा किचांळण्याची भीती घातली. "नवरा-बायको वेगवेगळे झोपतात म्हटल्यावर घरातले नोकर काय म्हणतील?" असाही प्रश्न त्यानं उपस्थित केला; पण मी त्याला दाद दिली नाही. शेवटी गेला शेपूट घालून!

"असेच साडेतीन महिने गेले. एक दिवस चन्नपट्टणला बदली झाली. म्हटलं, नोकरी करायची असेल, तर जायला पाहिजे. तो घरी असतानाही मी त्याच्याशी सरळ बोलणं टाकलंच होतं. त्यानं आपण होऊन बोलायला सुरुवात केली की, मी तिरस्कार दाखवत होते. आणखी वाकडे प्रश्न विचारून त्याला निरुत्तर करत होते. तो चन्नपट्टणला निघून गेला. अधून-मधून त्याची पत्रं येत होती. त्यात 'संसार म्हणजे सामंजस्य. एकमेकांना समजून घेणं' वगैरे उपदेशाचे डोसच असायचे. मी त्यापैकी एकाही पत्राला उत्तर लिहिलं नाही. आपण होऊन यायची त्याला भीती वाटत असावी. त्यामुळे तोही आला नाही. विकासच्या वेळी मी हट्टानं माझं बाळंतपण मैसूरला करून घेतलं. घरी स्वयंपाकासाठी बाई होत्याच. इस्टेटची कार घरात आणून ठेवली. पोटात दुखायला लागल्यावर स्वयंपाकीणबाईंना सोबत घेऊन मीच कार ड्राइव्ह करून नर्सिंग होममध्ये दाखल झाले. फुकटच्या प्रेमाच्या नाटकाशिवाय बाळंतपण झालं."

बोलता बोलता ती थांबली. तिनं हातातलं घड्याळ पाहिलं आणि म्हणाली, "ओह! पावणेपाच वाजले. सुशीलम्मांना मार्केटला जायचं होतं. आज मुलांना लवकर न्यायला सांगितलं होतं. आता मीच त्यांना मार्केटपर्यंत सोडून येईन; पण याच संदर्भातली आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगितल्याशिवाय थांबणं शक्य नाही."

तो पुढे ऐकू लागला.

"त्या वर्षीचं साडेतीन लाखांचं उत्पन्न बघून मी तर अभिमानानं फुलून गेले होते. त्या आनंदात मी काकूलाही मनोमन तिनं जे केलंय त्याचं पाप तिच्याबरोबर म्हणत क्षमा करायच्या मन:स्थितीत होते. एका वर्षीचा नफा खर्च करून हे जुनं घर पाडायचं आणि नवं बांधायचं असं मी ठरवलं होतं. यानंतर त्या दोघा भावंडांपासून लांब राहायचं आणि मुलांना मोठं करायचं, लिहिण्या-वाचण्यात अधिक लक्ष घालायचं असं मी ठरवलं होतं.

"असे तीन महिने गेले असतील. एक दिवस पोस्टानं एक रजिस्टर्ड पाकीट माझ्या

इस्टेटीपर्यंत जाऊन रिडायरेक्ट होऊन इथं आलं होतं. सकलेशपूरच्या बँकेनं पाठवलेला तो कागद वाचून मी अवाक होऊन गेले! त्या पत्रातला मजकूर होता –

तुमच्या इस्टेटवर काढलेल्या कर्जाचे मुद्दल आपण अजून दिलेले नाही. व्याज मात्र नियमितपणे देत आहात. या वर्षीचे पीक विकून हाती पैसे आल्यानंतरही गेल्या तीन महिन्यांत आपण व्याज भरलेले नाही. ही नोटीस पोहोचल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत तुम्ही तीन लाख बावीस हजार तीनशे पन्नास रुपये भरले नाहीत, तर आम्हाला तुमच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करून इस्टेट ताब्यात घ्यावी लागेल!

"पहिल्यांदा मी पत्र वाचलं तेव्हा मला आधी काहीच समजलं नाही. सकाळचे अकरा-साडेअकरा वाजले होते तेव्हा. हे कुठलं कर्ज? कुणी काढलं होतं? बँकेमध्ये गेल्याशिवाय यातलं काहीच समजणार नव्हतं. दिवस भरत आलेले. तशीच उठले, दुपारी दोन वाजता कार चालवत इस्टेटवर गेले. मॅनेजरनं जुनी कागदपत्रं बाहेर काढून पाहिली. आदल्या वर्षीही व्याज भरल्याची नोदं होती; पण कर्जाचा तपशील नव्हता. रात्री तिथंच मुक्काम केला आणि दुसऱ्या दिवशी सकाळी मॅनेजरला बरोबर घेऊन सकलेशपूरला आले. तिथं बँकेत सगळा खुलासा झाला. कॉफीच्या इस्टेटवर आधुनिक सुधारणा करायचं कारण देऊन काकूनं तीन वेळा कर्ज काढलं होतं. अप्पांनी मृत्यूपूर्वी 'पीक नष्ट झाल्यामुळे इस्टेटीच्या देखरेखीसाठी' असं कारण देऊन तीन लक्ष रुपयांचं कर्ज काढलं होतं. एकूण एकोणीस लक्ष रुपयांचं कर्ज डोक्यावर उभं होतं."

तो अवाक होऊन ऐकत होता.

"सगळं समजल्यावर आधी माझा स्वत:वरचा ताबाच सुटला. मी बँकेच्या मॅनेजरवर तुटून पडले. तो शांतपणे म्हणाला, "मॅडम, ही सार्वजनिक संस्था आहे. दिलेलं मुद्दल आणि व्याज वसूल करणं हे आमचं कामच आहे. यात तुमच्यावर काही अन्याय झाला असेल, तर तो ज्यांनी केलाय त्यांच्यावर कारवाई करा. मला या शाखेत येऊन चारच महिने झालेत." मलाच माझ्या वागण्याची लाज वाटली. मी त्याची क्षमा मागितली. काकूनं सकलेशपूरची जागा रिकामी करून घेतल्याचं सांगितलं होतं. त्या ठिकाणी जाऊन पाहिलं.

"जागा रिकामी करून घेतली होती; पण ती कृष्णमूर्तीच्या नावानं विकत घेतलेल्या इस्टेटवर राहत होती. त्याच पावली तिकडंही गेले. सोबत मॅनेजरला मात्र घेतलं नाही.

"मला बघताच काकू पूर्वीसारखीच धावत पुढं येत म्हणाली, "अय्यो पुट्टी! टेकलेली गर्भारशी! तूच गाडी चालवत आलीस? निरोप पाठवला असतास, तर किट्टण्णा आला असता तुला न्यायला. प्रवास करून किती सुकून गेलाय गं हा!" म्हणत तिनं विजयला कवटाळलं. तो तान्हा असताना तिनंच त्याला संभाळलं होतं. आजीला पाहताच त्याचाही चेहरा खुलला. त्याचा चेहरा आपल्या छातीशी धरत त्याच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाली, "येणारच होते मी मैसूरला. बाळंतपण म्हणजे काय साधी गोष्ट आहे? दुसरा जन्म तो बाईचा! एकटी काय करशील तू?"

"या भावनेच्या लोंढ्यातून स्वत:ला सावरत मी कोरडेपणे म्हटलं, "काकू, आता हे मायेचं

नाटक पुरे. व्याज भरलं नाही म्हणून बँकेची नोटीस आलीये. एकोणीस लाखांचं कर्ज आहे. हे कसं?"

"आधी आत येऊन दोन घास गरम-गरम जेव बघू! लेकराला मस्तपैकी सांजा करून देते. नंतर बोलू या." म्हणत ती हसली.

"ती दंड धरून घरात घेऊन जात असताना मी स्वत:ला सोडवून घेत म्हटलं, "मी या घराचा उंबरा ओलांडणार नाही. तू आधी माझ्या प्रश्नाचं उत्तर दे."

"तिच्या चेहऱ्यावर माया आणि संयम ओसंडत होता. ती म्हणाली, "उसळत्या रक्ताच्या वयाची तू! मीही संतापून कसं चालेल? तू हवं तर इथंच बैस. दोन मिनिटांत गरम-गरम डोसे घेऊन येते. तुला काय वाटलं? इस्टेट मॅनेजमेंट म्हणजे दर वर्षी आलेलं उत्पन्न बँकेत भरून सुखात राहायचं? एखाद्या वर्षी पावसापाण्याअभावी सगळं पीकच जळून जातं. कधी अतिवृष्टी होऊन हातातलं पीक जातं आणि कुठल्याही परिस्थितीत पिकावरचा, खत-औषधावरचा खर्च तर कमी करता येत नाही. नोकरांचे पगार द्यावेच लागतात. खर्च अंगावर आला की, कर्ज काढावं लागतं. नाहीतर काही वेळा जमीन विकावी लागते. थोडी वाट पाहा, तुलाही सगळे अनुभव येतीलच."

"ही इस्टेट विकत घ्यायला तुझ्याकडे कुठून पैसा आला?" मी विचारलं.

" "त्यासाठी मी किती ठिकाणचं कसं कर्ज काढलंय ते तुला काय ठाऊक? तू वयात आल्यावर तुझी इस्टेट ताब्यात ठेवणं न्यायाचं नाही. त्यानंतर तुझ्या भावंडांची काहीतरी व्यवस्था करायला नको काय? म्हणून कर्ज काढून ही व्यवस्था केली. योग्य पाऊस पडला, रोगराईत पिकं गेली नाहीत, योग्य दर मिळाला, तर जेवतील सुखानं दोन वेळा. नाहीतर एखाद्या हॉटेलात भांडी विसळून पोट भरतील. तुझा त्यांना चांगला आशीर्वाद असू दे. चल, डोसे खायला."

"मला तो सगळाच प्रकार अतिशय किळसवाणा वाटला. तिथं क्षणभर राहणंही अशक्य होऊन विजयला दरादरा ओढत, "थू:! निर्लज्जपणाचा कहर झाला!" म्हणत, पुन्हा गाडी चालवत आमच्या इस्टेटीवर आले. बँकेचं व्याज तर द्यायलाच हवं होतं ना! तिथं येऊन चेक लिहू लागले, तर मॅनेजर म्हणाला, "मॅडम, एकदम एवढी रक्कम दिलीत, तर खात्यावर काहीच राहणार नाही. इथं दर आठवड्यात मजुरी, पेट्रोल, खतं, औषधं वगैरे खर्च असतात. तेव्हा काय करायचं?"

" "त्याचं काय करायचं ते नंतर बघू या. आधी हे व्याज देऊन मोकळी होते." म्हणून चेकवर सही दिली. माझी मन:स्थिती जाणून माझा संताप, निराशा, दु:ख या सगळ्या भावनांना मार्ग दाखवून माझं समाधान करू शकेल अशी एकच व्यक्ती होती – श्वेताचे वडील! मी तशीच त्यांच्या इस्टेटीवर गेले, पण ते घरात नव्हते. आपल्या अमेरिकेतल्या मुलाला भेटायला ते सगळे गेले होते. अधिक चौकशी करता ते तिघंही आणखी तीन महिने तरी येणार नाहीत असं समजलं. काय करावं ते समजेना. तशी मैसूरला आले. किती दमणूक झाली होती म्हणून सांगू सोमू? भरलेली गर्भारशी, मनाला झालेला आघात आणि एवढा ड्रायव्हिंगचा ताण!

एक प्रकारची बेवारशासारखी माझी गत झाली होती. कुणाला सांगू? कुणाची मदत घेऊ?"

"रंगनाथला कळवलं नाहीस?"

"ते केवळ बहिणीच्या तुकड्यावर वाढलेलं कुत्रं आहे हे विसरून मी त्याला फोन केला. चन्नपट्टणहून तो लगेच धावत आला. त्याला सगळं सांगितलं. एकोणीस लाखांच्या कर्जाची कथा सांगितली आणि अगतिक होऊन विचारलं, "आता काय करायचं?"

"तो गहन विचारात बुडाल्यासारखं दाखवून खाली मान घालून बसून राहिला. मीच पुढं विचारलं, "तिनं एवढी फसवणूक केली आहे ते आता तरी तुमच्या लक्षात येतंय की नाही?"

"यावर तो म्हणाला, "खाल्लं असेल थोडं-फार. मध पिळून काढल्यावर हात चाटावा तसं. अतिवृष्टी-अनावृष्टीनं पिकांची हानी होते यात काय खोटं आहे? तुझ्या अप्पांनीही तीन लक्ष रुपयांचं कर्ज काढलं होतंच. त्यांनीही अन्याय केला असं म्हणायचंय का तुला?"

"माझ्या जिवाचा तडफडाट झाला. अप्पांचं उदाहरण दिल्यानं मी एकीकडे निरुत्तर झाले होते. अशा वेळी नवराही झालेल्या फसवणुकीचं समर्थन करत होता! म्हणजे बळी गेला होता तो फक्त माझ्या एकटीचाच!

"त्या रात्री तो इथेच राहिला. कुठल्या दवाखान्यात नाव घातलंस वगैरे चौकशी करत होता. नीट उत्तर न देता मी सांगितलं, "तू आणि तुझ्या बहिणीनं कपटानं आणि जबरदस्तीनं पेरलेला पिंड मी व्यवस्थित संभाळेन. काळजी करू नको." मार खाल्लेल्या कुत्र्यासारखा तो खाली मान घालून बसला. जाऊ दे. मुख्य गोष्टीकडे येते. मी कॉफीबोर्डाकडे गेले. त्यांनी मेंटेनन्ससाठी एक लाख रुपयांचं कर्ज मंजूर केलं. त्या कर्जामधून इस्टेटीचा खर्च चालवायचा आणि आलेलं उत्पन्न व्याजापोटी बँकेत भरत आले. इथं कॉलेजमधून मिळणाऱ्या पगारावर माझं आणि मुलांचं भागवते. म्हणूनच रंगकामाच्या खर्चाला कात्री लावली मी. ओह!" तिचं पुन्हा घड्याळाकडे लक्ष गेलं. "पाच-दहा!" म्हणत ती चटकन उठली.

"आता रंगनाथ चन्नपट्टणलाच असतात?"

"नाही. वर्षापूर्वी एकदा येऊन अप्पर कृष्णा प्रोजेक्टवर बदली झाल्याचं सांगत होता. आणखी चारशे मैल अंतर वाढलं. मी म्हटलं, "सरकारी चाकरी करायची म्हटलं की, बदली होणारच. मला सांगायची गरज नाही." गेला चेहरा पाडून."

बोलता बोलता नेसलेली साडी झटकून सारखी करत तिनं केसांवरून कंगवा फिरवला. कुलपाची चावी आणि पर्स घेऊन ती निघालीच. त्या अवधीत तोही कपडे बदलून तयार झाला होता. "उद्या बारा वाजता ये हं." म्हणत तिनं गेट उघडून कार सुरू केली. तोही स्कूटर स्टार्ट करून निघाला.

त्या दिवशी रात्री दहा वाजेपर्यंत तो कामात गुंतला होता. भर कामाच्या वेळातले चार तास ऑफिसबाहेर राहणं धंद्याच्या दृष्टीनं योग्य नव्हतं, हे त्याला समजत होतं. मुंबईत आठवड्यातून दोन दिवस तो बाहेर जात असला, तरी रात्री उशिरापर्यंत राहून तो काम पूर्ण करून जात होता.

आवश्यकतेनुसार रविवारची सुट्टी न घेताही कामं करत होता. शिवाय तो नसलेल्या वेळी तिथं ऑफिसमध्ये नवीन शहा असायचा. त्यामुळे कामाची खोटी होत नव्हती. इथं मात्र तसा तो एकटाच होता. 'दुपारी तिच्या घरी जाता कामा नये; पण त्याशिवाय दुसरी कुठली वेळ आहे सोयीची? मुलं घरात असतात हे विसरता कामा नये.' त्यातल्या त्यात त्याला एक उपाय सुचला, 'आठवड्याची सुट्टी रविवारऐवजी सोमवारी का ठेवू नये? गिऱ्हाईकांचीही सोय होईल आणि आपल्याला एक वर्किंग दिवस मोकळा मिळेल.'

रात्री उशिरा हॉटेलमधलं गार अन्न जेवून घराचं कुलूप उघडताना आपण तिच्या आणखी जवळ गेल्याची भावना त्याच्या मनात दाटून आली. 'किती कष्टी आहे ती!' या विचारानिशी तोही कष्टी झाला. मुंबईसारख्या महानगरात काम केल्यामुळे आर्थिक फायद्यासाठी सख्खी भावंडं आणि अगदी जवळच्या नातेवाइकांमध्येही काय-काय घडू शकतं हे त्यानं जवळून पाहिलं होतं. त्यामुळे अमृताच्या काकूचं वागणं त्याच्या दृष्टीनं फारसं धक्कादायक नव्हतं; पण हे सगळं अनुभवणाऱ्या अमृतानं काय भोगलं होतं, हेही त्याला पुरेपूर जाणवलं होतं. पैशाच्या लोभापायी तिचं मनाविरुद्ध लग्न लावलं गेलं होतं. एवढंच नव्हे, तर एक मूलही तिच्यावर तिच्या इच्छेविरुद्ध लादलं गेलं. 'हा केवळ नीचपणा नव्हे, फार मोठा अपराध आहे!'

त्याला लवकर झोप आली नाही. 'तीही आपल्या खोलीत एकटीच झोपली असेल.' या कल्पनेत बुडून जाऊन त्यानं झोपायचा प्रयत्न केला. 'तिला खरोखर प्रामाणिक स्नेहाची आवश्यकता आहे. मी तो स्नेह प्रामाणिकपणे देईन. मला तरी अप्रामाणिकपणे वागणं कुठं शक्य आहे?' थोड्याच वेळात त्याला गाढ झोप लागली.

दुसऱ्या दिवशी तो तिथं गेला तेव्हा ती विशेष आनंदात होती. त्याचा हात धरून तिनं त्याला ओढत बेडरूममध्ये नेलं. त्याचे बूट काढून त्याला बळेच कॉटवर बसवत ती म्हणाली, "मला, माझ्या अंतर्मनाला सत्य जाणून घ्यायची विशेष शक्ती आहे असं मी समजत होते आणि आज सकाळी ते खरं निघालं! मला किती आनंद झाला ठाऊकाय?"

ती खरोखरच उत्साह आणि आनंदाच्या लाटेवर नाचत होती. त्याच्यापाशी बसत त्याच आनंदात ती म्हणाली, "पण मी ते तुला आताच सांगणार नाही. कारण सांगितलं, तर तू एवढा चढून जाशील की, आकाशाकडे तोंड करून ताठ उभा राहशील. मग तुला मीही दिसायची नाही." म्हणत तिनं त्याचं डोकं बळेच वाकवून त्याच्या ओठांचं दीर्घ चुंबन घेतलं, "पाहिलंस? कसं वाकवते मी तुला! तुला वाकवायची ताकद आहे की नाही माझ्यात?"

त्याच्या दृष्टीत स्पष्ट होकार दिसत होता.

"त्यातही किती ताठा हा! तोंड उघडून सांगायला काय होतं? चल, जेवताना बोलू या." म्हणत तिनं त्याला लुंगीची घडी दिली.

दोन शेजारच्या खुर्च्यांवर बसून जेवताना ती सांगू लागली. "माझ्या कॉलेजमधल्या एक सहकारी आहेत. असतील पंचेचाळीस वर्षांच्या. जलजाक्षी त्यांचं नाव. फिजिक्सच्या लेक्चरर आहेत. तुझे कॉलेजमधले स्ट्रक्चर मास्टर पी.के.ए. आठवतात? त्यांची ही मुलगी."

“हो तर! फार उत्तम सर. मला तर त्यांनी परोपरीनं मदत केली आहे. त्यांच्या घरी मी वारानं जेवायला जात होतो!”

“होय? आणखी काय झालं सांग त्यांच्या घरी?”

“काय होणार? ते मला हवी ती पुस्तकं वाचायला द्यायचे. गोकुळाष्टमीच्या उत्सवात तर एवढे पदार्थ असायचे! अगदी चंगळ असायची!”

“एवढंच? मी तिथं घडलेली आणखी एक हकिकत सांगते ऐक. एकदा सर परगावी गेले होते. त्यांच्या माडीवरच्या स्टडीमध्ये तुला झोपायला सांगितलं होतं. तिथल्या शेल्फमधलं हवं ते पुस्तक काढून घ्यायचं तुला स्वातंत्र्य दिलं होतं. एकदा तू तिथलं एक पुस्तक ओढलंस आणि जुन्या फडक्यात गुंडाळलेली जड वस्तू जमिनीवर पडली. तू ती पुरचुंडी उचलून पाहिलीस. त्यात सोन्याचा चार पदरी हार होता. रात्री अकराच्या सुमारास ही घटना घडली असेल. त्यानंतर संपूर्ण रात्रभर तू जागा राहिलास. पहाटे सरांच्या पत्नींना तू वर स्टडीत बोलावून ‘पुस्तक घेताना हे सापडलं!’ म्हणून सांगितलंस.”

त्यालाही ही घटना आठवली. तो म्हणाला, “होय.”

तीच उत्साहानं पुढं सांगू लागली. “त्या वेळी तुला आठवड्यातून दोनदाही पोटभर जेवण मिळत नव्हतं. त्या काळी त्या हाराची किंमत पाच हजार रुपयांपेक्षा जास्त होती. तो हार तू त्या वेळी उचलला असतास, तर तुला कुणीही विचारणं शक्य नव्हतं. ते कुणालाही समजणं शक्य नव्हतं. तुझ्या सरांचा स्वभाव उदार. त्यांच्या बायकोनं आज ना उद्या मुलींच्या लग्नात लागतील म्हणून पै-पैसे साठवून तो बनवून घेतला होता. सरांची एक बहीण वरचेवर घरी येऊन दागिन्यांच्या पेट्या उलटसुलट करून, भावजयीनं नवं काय केलं ते पाहायची म्हणे. त्या दिवशी ती येणार म्हणून निरोप आला होता. म्हणून त्यांनी कुणालाही संशय येऊ नये म्हणून जुन्या पुस्तकांच्या पाठीमागे तो दडवून ठेवला होता. तू हार नेला असतास, तरी त्या कुणापुढंही बोलू शकल्या नसत्या. नणंदेनं हार चोरला या समजुतीत त्या राहिल्या असत्या. त्यांनी जलजाक्षीला तुझ्या प्रामाणिकपणाविषयी फार वेळा सांगितलं होतं म्हणे.”

“आज हा विषय का निघाला होता सांगू? त्यांना घर बांधावयाचं आहे. तेव्हा तुझा विषय निघाला. सगळं ऐकून त्या म्हणाल्या, “फारच प्रामाणिक माणूस! शिकत असतानाच त्यांचा हात एवढा शुद्ध होता!” म्हणत त्यांनी सगळी हकिकत सांगितली आणि तुझा फोन नंबर मागून घेतला. आता घराचं काम त्या तुझ्याकडेच सोपवतील. तुला मी नवं काम मिळवून दिलंय, त्यात मला किती कमिशन देणार?”

बघताबघता तिचा थट्टेखोर आवाज भावनेत बुडून गेला, “सोमू, मला किती अभिमान वाटतोय म्हणून सांगू? असा जन्मजात प्रामाणिक माणूस माझा मित्र आहे!”

त्याचं मन आपल्याला वेळोवेळी मदत करणाऱ्या आणि अन्न वाढणाऱ्या त्या दांपत्याच्या आठवणीत बुडून गेलं होतं.

जेवणानंतर दोघं परस्परांच्या मिठीत विसावले असता ती म्हणाली, “काल तुझ्याशी बोलले तेवढ्या स्पष्टपणे आणि सविस्तरपणे आणखी कुणाशीच बोलले नव्हते मी. सगळं मोकळेपणानं सांगावं इतकं विश्वासू आणि भावनात्मकदृष्ट्या मला काय म्हणायचंय ते नेमकेपणानं समजून घेणारं कुणी भेटलंही नव्हतं आजवर. आता श्वेताही लग्न करून अमेरिकेत राहते. ज्याच्याशी आपलं भावनात्मक तादात्म्य झालं आहे, अशी व्यक्ती एवढी विश्वासू म्हणून समजल्यावर नेमकं काय वाटलं ते कसं सांगू मी? माझ्या खांद्यावरचा भार कुणीतरी आपण होऊन स्वत:च्या खांद्यावर घ्यावा तसं वाटलं. आज जलजाक्षीनं ही हकिकत सांगितल्यापासून कधी एकदा तुला भेटेन असं झालं होतं मला!”

तिचं बोलणं ऐकताना त्याचं मनही सुखावत होतं, पण आपलं कौतुक करणाऱ्याला आणखी प्रोत्साहन देणं किंवा ते मुकाट्यानं ऐकत राहणं त्याला कसंतरी वाटलं. त्यानं लगेच विषय बदलला, “काल रात्रीपासून तुला एक प्रश्न विचारायचा आहे. रंगनाथांविषयी तुझ्या मनात तिरस्कार आहे आणि तूच सांगितलंस तो विकासच्या बारशाला आला होता म्हणून. त्याला का बोलावलंस तेव्हा?”

ती लगेच अंतर्मुख झाली. तिच्या चेहऱ्यावर संताप, उद्वेग आणि कळवळल्याची भावना उमटली. आपण हा प्रश्न विचारून तिचा आनंद नष्ट केल्याचं पाहून त्याला वाईट वाटलं, तरी या प्रश्नामुळे तिच्यात एवढा भावनात्मक बदल होईल हे त्याला काही ठाऊक नव्हतं. त्यामुळे तिच्या गालंवरच्या बटा मागं सारत तो म्हणाला, “तुला त्रास होत असेल, तर सांगू नकोस.”

पण तिनं स्वत:ला सावरलं आणि म्हणाली, “हीच माझी खरी समस्या आहे सोमू! रंगनाथ नजरेसमोर आला की, माझ्या सर्वांगाची नुसती आग होते. आणि काकू? काय सांगू तुला, रिव्हॉल्वरनं तिच्या त्या कपटी डोक्याच्या चिंधड्या उडवल्या, तर माझा जीव थोडासा शांत होईल! पण तरीही मध्येच माझं मन एवढं दुबळं होतं म्हणून सांगू! कदाचित परंपरागत संस्कारांचाही हा परिणाम असेल. बारशाच्या वेळी वाटलं, आई-वडील दोघंही आहेत, बाळाचाही आता जन्म झालाय. दोघांनी मिळून तो संस्कार करायला पाहिजे असं पराकोटीच्या तीव्रतेनं वाटलं. त्याला पत्र लिहिलं. त्याच्या बहिणीलाही पत्र लिहिलं. गर्भारपण आणि बाळंतपण यात सगळी मनाची शक्ती ओसरून गेली होती की काय कोण जाणे! एकटीच त्यांच्याशी किती झगडणार? कदाचित कुणी नवऱ्यानं टाकलेली म्हणू नये अशीही अपेक्षा असेल. पुण्यहवाचनाच्या आधी पुरोहितांनी ‘घरातल्या मोठ्यांना नमस्कार करा’ म्हटलं तेव्हा तिला आणि काकांना नमस्कारही करून आले! काकांना नमस्कार केल्याबद्दल आजही मला काही वाटत नाही, कारण त्यांची बुद्धी कपटी नाही. सगळे विधी झाल्यावर दुपारी वाटू लागलं, ‘का हे सगळं शास्त्र पाळत बसलेय मी? मी एकटीनं श्रद्धेनं देवापुढे दिवा लावून नामकरण केलं असतं, तर काय बिघडलं असतं? या दोघांनाही बोलावलंच नसतं, तर काय झालं असतं? अशी कशी विचित्र वागले मी? माझ्यात सुसंगतीच नाही. माझी बुद्धी अशी का माझ्या ताब्यातून निसटते?’

“बारशाला त्यांना बोलावल्यामुळे मला आणखी एका जीवघेण्या अनुभवाला सामोरं जावं लागलं. थोरला विजय आठ महिन्यांचा असल्यापासून तिच्याकडे राहिला होता. मी तिच्याकडून इस्टेटचे अधिकार काढून घेईपर्यंत तो तिच्याकडे राहिला होता. मला दुसऱ्यांदा दिवस जाईपर्यंत बाप-लेकांचेही संबंध होतेच. मध्ये चार वर्षं गेली तरी विजय वडलांना विसरला नव्हता. रंगनाथ

मधून-मधून इस्टेटीवर जाई तेव्हा त्यांची भेट होत असे. आजीवरही त्याचं प्रेम तसंच होतं. बारशाच्या वेळी ते दोघं आल्यावर अर्ध्या तासातच विजय आजीच्या मांडीवर चढून बसला. त्यानंतरही तो सगळा वेळ रंगनाथपाशीच रमला होता. त्या दोन दिवसांच्या वास्तव्यात तिनं पुन्हा दावा साधला. बारसं आटोपल्यावर दोघंही निघून गेले खरे; पण त्यानंतर एक दिवस विजयनं आजीला भेटायचा हट्ट धरला. त्यानं रडायलाच सुरुवात केली. मी त्याची परोपरीनं समजूत घालत म्हटलं, "आजी काय देते तुला माझ्यापेक्षा जास्त?"

"यावर तो काय म्हणाला ठाऊक आहे? "आजीचं माझ्यावर खरं प्रेम आहे. तिनंच मला संभाळलं. तुझं माझ्यावर प्रेमच नाही. अभ्यासात अडचण होते म्हणून तू मला बाळ असतानाच आजीकडे देऊन टाकलंस."

"या आधी एकदाही न उच्चारलेलं हे वाक्य त्याच्या तोंडून असं कसं आलं? कुणी भरवलं हे त्याच्या डोक्यात? मी बारशाच्या वेळी इतर कामात गढले असताना काकूनंच हे बीज त्याच्या डोक्यात भरवलं होतं हे स्पष्ट होतं. नंतर एक दिवस तो म्हणाला, "अप्पा कुठायत? तूच त्यांना येऊ नको म्हणून सांगितलंस! वाईट्ट आहेस तू!" माझ्या मनाला याहून तीक्ष्ण हत्यारानं खुपसणं शक्य आहे काय? तूच सांग सोमू!"

गंभीरपणे त्यानं मान हलवली.

"त्या क्षणी मला माझा मूर्खपणा समजला. आता त्याच्या मनात रूतलेल्या दोन भावना समूळ नष्ट करायच्या असतील, तर मला जाणीवपूर्वक परिश्रम घ्यावे लागतील. नाहीतर माझी मुलं माझी राहणार नाहीत, हे मला स्पष्टपणे उमजलं. त्यामुळे मुलं शाळेतून घरी आल्यापासून ती झोपेपर्यंत मी एक क्षणही त्यांच्यापासून दूर होत नाही. त्यांच्याशी गप्पा मारणं, खेळणं, थट्टा-मस्करी करणं, गोष्टी सांगणं, नवे कपडे आणणं, रोज नवे खाद्यपदार्थ करणं हे सगळं करताना कधीकधी वाटतं, माझ्या मुलांवर माया करतानासुद्धा मला तिच्याशी स्पर्धा करायची पाळी यावी? काही वेळा माझी मलाच लाज वाटते. असे लाड करत राहिले, तर मुलं बिघडण्याचीही भीती आहेच. एकदा धाकट्या विकासनंही विचारलं, "अम्मा, अप्पा आपल्याला का घेऊन जात नाहीत?" त्याच्या तोंडी हा प्रश्न का आला असेल?"

ती अंतर्मुख होऊन गेली. तिचा चेहरा उतरून गेला होता. नंतर ती स्वत:लाच सांगितल्यासारखं म्हणाली, "माझी मुलं मिळवण्यासाठी मी माझा सगळा वेळ नष्ट करते आहे. इतर अभ्यास, संशोधन, चिंतन... सगळंच बंद ठेवलं आहे.'

तो तिच्याकडे एकटक पाहत होता. एवढा वेळ सांगत असलेल्या बोलण्यापेक्षा ही दोन वाक्यं अधिक खोलातून आल्याचं त्याला प्रकर्षानं जाणवलं. अभावितपणे त्याचा सांत्वनाचा हात तिच्या पाठीवरून फिरला. काही क्षण ती तशीच अंतर्मुख होऊन बसली होती. एकाएकी चैतन्याचा संचार झाल्यासारखी होऊन ती म्हणाली, "कालचा सगळा दिवस मी माझी रडकथा सांगण्यात घालवला. ते जाऊ दे. तूही सगळं विसरून जा. माझ्या जीवनात पहिल्यांदा निर्व्याज प्रेम भरून तू माझा आत्मविश्वास वाढवला आहेस. आपल्या मीलनात आपल्या दोघांशिवाय तिसरा कुठलाही विषय येता कामा नये. मी दुसरा कुठला विषय काढला, तर तू मला थोबाडीत मारायला पाहिजेस आणि तू काढलास तर मी."

एखादं बटण दाबल्याप्रमाणे तिच्यामध्ये झालेलं हे परिवर्तन पेलून त्याप्रमाणे तत्काळ प्रतिक्रिया देणं कठीण झाल्यामुळे तो क्षणभर अस्वस्थ झाला. तरीही तिच्या मन:स्थितीचा विचार करत त्यानं स्वत:ला सावरून उत्कटपणे तिला आपल्या मिठीत घेतलं. त्याच्या मिठीत विरघळून जाणं हे जीवनाचं एकमेव ध्येय असल्याप्रमाणे ती त्याच्या बाहुपाशात विरघळून गेली होती. एवढा वेळ होत असलेली जिवाची तळमळ संपून एक प्रकारचा शांत-मधुर भाव तिच्या चेहऱ्यावर पसरला होता. आईनं निष्पाप लेकराला जवळ घ्यावं, तसं त्यानं तिला घेतलं होतं. त्याच्या आश्वासक मिठीत काही क्षणांतच ती गाढ झोपी गेली. त्यालाही झोप लागली.

दोघांनाही जाग आली तेव्हा साडेचार वाजले होते. तो घड्याळ बघत म्हणाला, "ओह! मुलांना आणायची वेळ झाली."

ती म्हणाली, "पण आज सुशीलम्मा घरातच आहेत. आणखी तासभर आपल्याला झोपता येईल. मी सहा वाजता जाईन. तुझ्या ऑफिसमध्ये कुणी आलं, तर नीळकंठप्पा त्यांना बसवून ठेवतील. यानंतर तुझ्या ऑफिसची वेळ सकाळी नऊ ते बारा आणि संध्याकाळी सहा ते नऊ असा बोर्डच लावून दे. आता मला सांग, डोळे मिटले, तर काय दिसतं तुला? कोण दिसतं?"

"अमृता!"

तो मनापासून उद्गारला.

"तू धडधडीत खोटं सांगितलंस, तरी किती छान वाटतं म्हणून सांगू! तू स्वभावत: प्रामाणिक आहेस म्हणून समजल्यापासून तर मला स्वर्गाचीही मातब्बरी वाटेनाशी झाली आहे." स्वत:च्या बोलण्याचा गाढ आस्वाद घेत असल्याप्रमाणे ती डोळे मिटून म्हणाली. तिची ती भावविभोर तंद्री त्यालाही जाणवली होती. आपल्या उच्छ्वासानं ती भंग पावणार नाही याची काळजी घेत तो तसाच स्तब्ध राहिला.

काही वेळ गेल्यावर ती म्हणाली, "सोमू, डोळे बंद केल्यावर अमृतेशिवाय आणखी कुणीच दिसत नाही, हे तुझं बोलणं मधापेक्षा गोड आहे, पण तूच सांगितलंस तशी मी दुसरी..."

तक्रार केल्यासारख्या या तिच्या बोलण्याचा स्वरही रूक्ष आणि तिरकस असल्याचं त्याला जाणवलं. एकीकडे भावनात्मकतेत बुडून स्वर्गीय आनंद लुटताना ती त्या सुखात कडवटपणा पिळून रसभंग करते असं वाटलं, तरी तो काही बोलला नाही. चेहऱ्यावर मात्र नाराजी उमटायची ती उमटलीच. लगेच ती म्हणाली, "वाईट वाटलं?"

"तसं काही नाही..." तो म्हणायचं म्हणून म्हणाला.

"तुला वाईट वाटावं म्हणून मी हे बोलतेय असं नाही. तू प्रामाणिक आहेस; पण तरीही मी काही तुझ्या जीवनातली एकमेव स्त्री नव्हे. माझ्या सान्निध्यात असताना मनात येणाऱ्या भावना अनुभवताना मनाचा एखादा कोपरा तुलना करण्यात गढून जाणं साहजिक आहे ना? नाही म्हणणं मात्र मानवी स्वभावाच्या अगदी विरुद्ध आहे."

खोटं सांगावंसं त्याला वाटलं नाही. शिवाय ते त्याला जमणं शक्यही नव्हतं. तो म्हणाला,

“हे बघ, आपल्या सहवासातली अनन्य खोली अद्वितीय आहे. तिची तुलना आणखी कुठंही करणं हीनपणाचं आहे. यानंतर कधीही तू असला प्रश्न विचारू नकोस.”

“तुझं बोलणं ऐकून मी किती पुलकित होते म्हणून सांगू? सहवासाची अनन्य खोली! साहित्याचं शिक्षण घेऊन दररोज त्यातच बुडून उठणाऱ्या माझ्यासारखीच्या हृदयापर्यंत या शब्दांचा अर्थ भिडणं सोपं नसतं! पण ती... मुंबईची... मैत्रीण म्हणू का?... तीही तुला पराकोटीचा आनंद देत होती ना? मधूनच गझलांच्या ओळी सांगून उन्मादाच्या लाटेवर नाचवत होती ना? त्या गझलांपुढे माझी कन्नड गाणी बेचवच म्हटली पाहिजेत! आणि आपल्या मीलनाच्या घटकेत मी इतर कुणाची कवनं आणतही नाही! अशा वेळी त्या सुखाची उंची माझ्या सान्निध्यात तुला कुठून सापडणार?”

“इतरांच्या शब्दांचा आधार न घेता केवळ मौनातून तू मनातलं सांगतेस ना, म्हणून मी अनन्य म्हटलं.”

“म्हणजे तुझ्या मनात तुलना चालतेच! मग खोटं का सांगतोस? नाही म्हणून?” तिनं त्याला पटकन शब्दांत पकडलं.

त्याला मनोमन संताप आला. ‘पातेलंभर रुचकर खीर तयार करून त्यात शेवटी झाडू फिरवल्यासारखं वागणं हिचं!’ पण तो काही बोलला नाही. पाठोपाठ वाटलं, ‘काहीही उत्तर दिलं नाही, तर तिचं बोलणं मान्य केल्यासारखं होईल. ’ तो म्हणाला, “शब्दानं शब्द वाढतो म्हणून मी गप्प बसतोय. तुझं बोलणं मला पटलंय म्हणून नव्हे.”

“होय? मीच शब्दाला शब्द वाढवतेय?” म्हणत त्याचा हात झटकून ती दोन हात लांब जाऊन झोपली. ‘अशी का वागते ही? त्याला उठून जावंसं वाटलं; पण तो जागचा हलला नाही. आपण असे का हिला चिकटून आहोत?’ मनात आलेल्या या विचारामुळे त्याला स्वत:चा राग आला. पण काहीही न दर्शवता, कुशीही न बदलता तो तसाच पडून राहिला. सगळं वातावरण जडशीळ होऊन गेलं होतं. आपल्याच छातीचे ठोके ऐकू यावेत एवढी शांतता पसरली होती. तो वेगही मंदावला आहे, असं त्याला वाटत होतं.

ती ताडकन उठली आणि पलंगाच्या काठावर बसून म्हणाली, “हे बघा, पुरुष कुठंही, कसाही वागू शकतो; पण स्त्रीचं तसं नसतं. रंगनाथच्या समोर मला ताठ मानेनं उभं राहता येऊ नये एवढं दुर्बल केलंस तू मला! समजलं?”

वेगळ्या विचारात गढून गेल्यामुळे आधी त्याला काहीच लक्षात आलं नाही. पण दुसऱ्या क्षणी समजलं. उत्तर आतून आलं होतं, तरी स्वत:ला सावरून काहीही न बोलता तो शांत राहिला. ती एकटक त्याच्याकडे पाहत राहिली. तोही दृष्टी न हलवता पाहत राहिला. त्याचा चेहरा शांत होता.

तो काहीच बोलत नसलेला बघून तिला आणखी राग आला. ती म्हणाली, “आलं लक्षात! माझ्याविषयी तुमच्या मनात पराकोटीचा तिरस्कार आहे. तुम्ही मला कुत्रीच मानता. मनात एवढा तिरस्कार असताना उगाच चेहऱ्यावर खोटा शांतपणा का दाखवता?”

“एवढी का रागावतेस माझ्यावर?” त्यानं शांतपणे विचारलं.

“होय! मी खोटारडी आहे? तुम्ही एकटेच सत्यवानाचे अवतार आहात! तोंडानं उच्चार केलात ना! तिथंच तुमचा अहंकार दिसतोय. नैतिक अहंकार!” म्हणत ती ताडकन उठली आणि न्हाणीघरात जाऊन तिनं दरवाजा बंद केला. बाहेर आल्या आल्या केस विचंरून, साडी बदलून व्हॅनिटी बॅग उचलली आणि चप्पल घालून ती चालू लागली.

अजूनही आपण अंथरुणावर आहोत याची त्याला लाज वाटली. तोही उठला. घाईनं कपडे चढवून हेल्मेट उचलून तिथून बाहेर पडला. काहीही न बोलता त्यानं स्कूटर स्टार्ट केली. तीही कारचा दरवाजा उघडून आत बसली.

आईची कार आली होती, तरी सुशीलम्मा आणि इतर मुलांबरोबर खेळण्यात रमलेल्या विजय-विकासची खेळ थांबवून निघायची मुळीच इच्छा नव्हती. आईची कार बघूनही त्यांनी तिकडं दुर्लक्ष केलं. अमृताच्या हृदयात कळ उठली. ती तशीच गाडीत बसून राहिली. सुशीलम्मांचं तिकडे लक्ष जाताच त्या मुलांना म्हणाल्या, “अरे! अम्मा आली बघ!”

तरीही मुलांचं खेळातलं लक्ष विचलित झालं नाही. सुशीलम्मा गाडीपाशी येऊन तिला म्हणाल्या, “त्यांचा खेळ संपेपर्यंत आत तरी या.”

उतरता उतरता ती म्हणाली, “तुमचं घर म्हटलं की, मुलांना आणखी काही नको असतं. शिक्षिका म्हणूनही भीती नाही.”

“ती नसावी असाच मॉडर्न विचार आहे ना!” म्हणत त्या कॉफी करायला आत वळल्या.

“कॉफी नको हं! आता येताना घेऊन आले. यानंतर कॉफी घेतली की, त्रास होतो.” तिनं सांगितलं. त्या थांबल्या आणि तिथंच गप्पा मारायला बसल्या.

बोलता बोलता सुशीलम्मा म्हणाल्या, “तुम्ही काहीही म्हणा, तुमच्या मुलांना सांभाळणं मुळीच कठीण नाही. मुलांमध्ये आई-वडलांचेच गुण येतात. खोडकरपणा करतात, पण दांडगेपणा नाही. शिवाय बुद्धी तर किती तीक्ष्ण आहे म्हणून सांगू!”

मुलांचं कौतुक ऐकून सुखावलेली अमृता म्हणाली, “ते सगळं ठीक आहे! पण योग्य शिक्षक नको का भेटायला? आमचं सुदैव म्हणून तुमच्यासारखे... अंहं तुम्ही भेटलात.”

“मुलं शांत असायला त्यांचे आई, वडील... त्यातही आई शांत असायला पाहिजे. माझ्या नणंदेची मुलगी तुमच्या कॉलेजमध्ये शिकते. ती सांगते ना! “प्रसन्नता म्हणजे आमच्या अमृता मॅडम! स्वत: प्रसन्न असतात आणि आम्हाला प्रसन्न ठेवतात. कुणी दंगा केला, चुकीची उत्तरं दिली, तरी त्या संतापत नाहीत. एवढा संयम आणखी कुठल्याही शिक्षकांमध्ये नाही.” ”

त्यांचं बोलणं ऐकताना तिच्याही नजरेसमोर कॉलेजचं वातावरण तरळून गेलं. आपल्या व्यवसाय-नैपुण्याविषयी तिला स्वत:चाच अभिमान वाटला.

थोड्या वेळानं बाहेर मुलांच्या टाळ्यांचा आवाज ऐकू आला. खेळ संपला असावा म्हणून तिनं बाहेर येऊन पाहिलं, तर मुलं पुढच्या खेळाला सुरुवात करत होती. पण सुशीलम्मांनी सांगितलं, "आता खेळ बंद! अम्मा वाट पाहतेय ना! पुन्हा उद्या खेळायचं."

खेळ थांबवून विजय-विकास कारकडे धावले. घरी येताना ती मुलांकडे रस्ताभर शाळेविषयी आणि त्यांच्या मित्रांविषयी चौकशी करीत होती. कुणी कुठली गोष्ट सांगितली ते विचारत होती. विजयचा मित्र राजीव आणि विकासचा मित्र भरत यांची विशेष चौकशी करताना त्यांचा उत्साह कायम राहील याची काळजी घेत होती. घरी पोहोचल्यावर पुटम्माकडून करवून घेतलेले रव्याचे लाडू देऊन ती सुशीलम्मांच्या घरी खेळत असलेल्या विशिष्ट खेळाची पद्धत आणि नियम विचारत होती. त्यांचं खाणं आटोपल्यावर परसातल्या मोकळ्या जागेत ती स्वत: त्यांच्याबरोबर खेळायला उभी राहिली. विजय म्हणाला, "अम्मा, नको. या खेळासाठी चौघंजण पाहिजेत."

"मी दोघांचे डाव खेळीन. चला!"

पण विजय हट्टीपणानं म्हणाला, "लहान मुलांचा खेळ आहे हा! मोठ्या माणसांना येत नाही खेळायला."

"मला तू शिकवून दे. नाहीतर उद्या मी तुमच्या सुशीलम्मा मॅडमना विचारीन. चल."

"नको. तुझ्याबरोबर खेळायला कंटाळा येतो." तो म्हणाला.

पोटची मुलं आपला तिरस्कार करताहेत हे बघून तिचं आतडं पिळवटून गेलं. तरीही चेहरा प्रसन्न ठेवायचा आटोकाट प्रयत्न करत तिनं धाकट्याला म्हटलं, "विकास, तू शिकव ना मला! माझं बाळ ते."

पण विकासला तो खेळच येत नव्हता. विजय आणि सुशीलम्मांचा थोरला चंद्रू खरं खेळत होते आणि तो आणि मॅडमची धाकटी मुलगी शीला त्यात लिबूं-टिबूं होते. त्यामुळे ती पुन्हा विजयलाच विचारू लागली. हा खेळ तिघांमध्येही कसा कसा खेळता येईल हे तिनं ठरवलं; पण मुलांनी त्याला मान्यता दिली नाही. नेहमीप्रमाणे बॅडमिंटन खेळायला बोलावलं, तरी मुलं आली नाहीत. उलट विजय म्हणाला, "इतक्या लांब गावाबाहेर कशाला घर केलंस? कुणी मित्र नाही, दोस्त नाही."

आता मात्र तिची सहनशक्ती संपली. ती आत लाउंजमध्ये निघून आली. अश्रू धावून आले, दृष्टी अंधूक झाली, तरी तिनं डोळे टिपले नाहीत. काही वेळ अश्रू ढाळल्यावर तिचं मन थोडं निवळलं. कुत्र्यांचं खाणं-फिरणं, मुलांचं जेवण-खाण करतानाही मन हताश असलं, तरी ती विषय शोधून गप्पा मारत होती. बुद्धी बधिर झाली असली, तरी नेहमीप्रमाणे तिनं मुलांना जवळ घेऊन चंद्र आणि समुद्रराजाची गोष्ट सांगितली. मुलांना पदोपदी वर्णनं हवी होती. ही इच्छा पूर्ण करताना तिला यमयातना होत होत्या.

असं व्हायची ही काही पहिली वेळ नव्हती. याआधीही शेकडो-हजारो वेळा असं घडलं होतं.

प्रत्येक वेळी त्या यातना भोगताना, या आधी कधी एवढ्या झाल्या नव्हत्या असं वाटत होतं. 'पण यातलं काहीही न दाखवू न देता मुलांना झोप येईपर्यंत गोष्ट लांबवत जायला पाहिजे. मुलं रमून जातील असे प्रसंगही त्यात घालायला पाहिजेत! हे कसलं शुष्क कर्तव्य म्हणायचं?'

समुद्रराजाची गोष्ट वाढवून सांगता सांगता मुलं झोपी गेली. त्यांच्या खोलीतला मोठा दिवा मालवून आणि नाइटलँप लावून ती लाउंजमध्ये आली. आत-बाहेर आकाशात सगळीकडे मौन पसरलं होतं. आत सगळं चूर चूर होऊन गेलं होतं. रडलं, तर आतलं दु:ख कमी झालं असतं, असं तिला वाटत होतं. तरी तिला ठाऊक होतं, आपल्या अपेक्षेप्रमाणे येण्याइतकं रडू करुणामयी नसतं. रडू आलं, तर ते आवरता येईल. पण हवं तेव्हा आणता येत नाही, हा तिचा अनुभव होता. 'हा कसला विचित्र स्वभाव म्हणायचा रडण्याचा? इतरांना रडण्याचा हा पैलू अनुभवाला येत असेल काय?' या विचारानं दु:खात बुडालेल्या मनाचा तिला काही क्षण विसर पडला; पण पुन्हा ते दु:ख मनावर चाल करून आलं. 'देवा रे! शारीरिक दु:ख कितीही तीव्र असलं, तरी सहन करता येईल; पण अंतर्मनातलं हे दु:ख किती असह्य असतं, ते तुला ठाऊक नाही काय? ती संतापानं पेटून उठली. त्या देव नावाच्या शक्तीला हा जाब विचारायला पाहिजे.'

एकाएकी ती उठली. ताडताड बेडरूममध्ये जाऊन तिनं रिव्हॉल्वर बाहेर काढलं. 'बस्स! आता देव नको आणि कुणी नको. केवळ ट्रिगर ओढला की, संपलं. यानंतर मी रडणार नाही. हे असह्य दु:ख भोगणार नाही.'

कानशिलावर रिव्हॉल्वर रोखून ती ड्रेसिंग टेबलपाशी आली. तिथला स्विच दाबताच भक्कन प्रकाश पडला. त्या उजेडात समोरच्या पन्नास वर्षांपूर्वीच्या जुन्या आरशात तिनं स्वत:चं प्रतिबिंब पाहिलं. मन दु:खातून सुटकेच्या मार्गाचं स्वागत करत असलं, तरी समोरचं प्रतिबिंब आत्मा गमावलेल्या प्रेतासारखं दिसत होतं. तो चेहरा अलिप्तपणे न्याहाळताना तिला तीव्रपणे जाणवलं, 'अंतर्बाह्य शून्य पसरलेलं असतं त्या वेळी मी मरूनच गेलेली असते म्हणायची! आणि तरीही मरायची एवढी का भीती? जीवनाचा अर्थ पूर्णपणे मृत झाला असतानस, मृत्यू हा एकमेव मार्ग असताना इतकं का हताश व्हावं?'

एकाएकी तिला नवं काहीतरी सुचल्यासारखं झालं. 'रिव्हॉल्वर कानशिलावर झाडण्यापेक्षा तोंडात झाडलं तर? ' मृत्यूला गिळंकृत करायच्या या कल्पनेचा तिला अभिमान वाटला. आरशात पाहतच तिनं नळी तोंडात धरली. आताही चेहऱ्यावर अभिमानापेक्षा प्रेतकळाच दिसत होती. तिचं तिलाच हे विचित्र वाटलं. तोंडातली नळी काढून ती ड्रेसिंग टेबलासमोरच्या खुर्चीत बसली. रिव्हॉल्वर उजव्या हातात तसंच होतं. कितीतरी वेळ तसाच गेला. ती उठून खिडकीपाशी आली आणि तिनं पडदा बाजूला करून बाहेर पाहिलं. बाहेर म्लान चांदणं पसरलं होतं. सगळं जग दु:खात बुडवून चंद्रही दु:खात बुडून गेला होता. 'या क्षणी बाहेर जायला पाहिजे. दु:खात बुडून दु:खानं निथळणाऱ्या जगात फिरायला पाहिजे.'

ती ताडकन उठली. कार, गॅरेज आणि घराच्या चाव्या घेऊन ती बाहेर पडली. फ्लडलाइट्स न लावता तिनं गाडी चामुंडी टेकडीकडे चालवायला सुरुवात केली. चांदण्याच्या दु:खात रस्ता काही अंतरापर्यंतच स्पष्ट दिसत होता. म्हणून ती दुसऱ्या गिअरमध्ये सावकाश गाडी चालवत होती. भोवताली पसरलेलं दु:खाचं तळं न डहुळता जसंच्या तसं स्तब्ध होतं. आडव्या-तिडव्या

पसरलेल्या मैसूर गावचे दिवे एकीकडे टाकून ती टेकडीच्या आग्नेय बाजूला आली तेव्हा ती दोनतृतीयांश टेकडी चढून आली होती. तिथं गाडी थांबवून ती गाडीबाहेर आली आणि समोर पसरलेली आकारहीन दरी पाहत उभी राहिली. जीव गेल्यानंतर दोन दिवसांनी होणारा शरीराचा आकार तिच्या डोळ्यांसमोर उभा राहिला. बघता बघता तो आकार समोरच्या आकारहीन दरीत आकारहीन होऊन पसरू लागला. आतलं दु:खही पसरू लागलं. 'देवा रे! हे दु:ख मी कसं सहन करू?

'ही जागा मोकळी आहे. कुणाला संशय यायची गरज नाही. माझ्याच गाडीतून इथंवर आले. गाडी इथंच असेल. लायसेन्स असलेलं रिव्हॉल्वरही इथंच असेल. चिठ्ठी लिहायची आवश्यकता नाही. त्या निर्जन भागातल्या घरात मात्र तसं नाही. गोळीच्या आवाजानं मुलं जागी होतील. खोलीकडे धावतील. आणि समोरचं बीभत्स दृश्य पाहून किंचाळतील. नंतर आयुष्यभर आईच्या आठवणीसरशी ते भयाण दृश्य त्यांना आठवत राहील. छे:! त्यापेक्षा ही जागा योग्य आहे.' या विचारापाठोपाठ रिव्हॉल्वर कॉटवर ठेवून आल्याचं आठवलं. तीव्र निराशा मनाला जाणवली. 'आत्ताच्या आत्ता रिव्हॉल्वर आणायला पाहिजे.' या विचारानं तिनं कार स्टार्ट केली. पाठोपाठ वाटलं, 'रिव्हॉल्वर कशाला पाहिजे? प्रत्येक डोंगरावर एखादा आत्महत्येचा पॉ◌ंइंट असतोच. या टेकडीवर तशी जागा कुठं आहे? ती सूर्यास्त बघायची जागा... पण ती देवळाच्या जवळ आहे. तिथं गेलं की, कुणीही हटकून चौकशी करेल.' तिला भीती वाटली. तिनं पुन्हा गाडी थांबवली. पुन्हा ती समोरचं दु:खी चांदणं पाहू लागली. हळूहळू तिची दृष्टी वर चंद्रावर गेली. चंद्राला पाहताना तिला त्याच्या विषयी विलक्षण आपुलकी वाटली. 'हाही माझ्यासारखाच एकटा आहे. संपूर्ण जीवनात मी जेवढं दु:ख सांडलं, तेवढं हा एका क्षणात सांडतो आहे.'

कितीतरी वेळ ती त्याच तंद्रीत उभी होती. तिच्या मानेला रग लागली, तशी तिनं मान खाली केली. 'कुठंतरी तशी जागा शोधून जायला पाहिजे. पण तिथं माणसं.....'

एकाएकी तिला आठवलं, 'रिव्हॉल्वर कॉटवरच आहे. मुलांपैकी कुणाला तरी जाग येऊन 'अम्मा' म्हणून लेकरू तिथं आलं आणि त्याच्या हाती...' भीतीनं तिच्या जिवाचा थरकाप उडाला. गाडीचे फ्लडलाइट्स लावून तिनं भरधाव वेगात गाडी सोडली. 'अजून किती लांब आहे घर?' ती घामेजून गेली होती. गेटबाहेर गाडी उभी करून ती गॅरेजमध्ये ठेवायच्या फंदात न पडता तिनं तशीच घरात धाव घेतली. बाहेरचं कुलूप काढून ती बेडरूममध्ये गेली. कॉटवर रिव्हॉल्वर तिची वाट पाहत होतं. तिनं घाईनं त्यातल्या गोळ्या काढल्या आणि कुलूप लावून ते पूर्ववत कपाटात बंदिस्त केलं. नंतर बाहेर येऊन तिनं गाडी गॅरेजमध्ये ठेवली. गॅरेज आणि गेट बंद करून ती लाउंजमध्ये जाऊन बसली तेव्हा कुठं तिला हायसं झालं. तरी छातीची धडधड तिला स्पष्ट ऐकू येत होती.

कितीतरी वेळ ती तशीच लाउंजमध्ये बसली होती. एकाएकी तिला मुलांना बघावंसं वाटलं. ती त्यांच्या बेडरूममध्ये गेली. लाल नाइट लँपच्या उजेडात त्यांचे चेहरे स्पष्ट दिसत नव्हते. तिनं मोठा दिवा लावला. मुलं जागी झाली नाहीत. तिलाही ते ठाऊक होतं. 'पण अचानक त्यांना जाग येऊन त्यांनी रिव्हॉल्वरला हात लावला असता तर?' या विचारासरशी पुन्हा तिच्या सर्वांगाचा थरकाप उडाला. वात्सल्यानं ती मुलांच्या चेहऱ्याकडे पाहत राहिली.

काही क्षणांत मनात एक टोचणी निर्माण झाली आणि बघता बघता ती आतडी पिळवटून टाकू लागली. 'या दोघांचेही चेहरे बरेचसे वडलांसारखे आहेत. ही मोठी होत जातील, तसं हे साम्य अधिकाधिक वाढत जाईल. अखेर ते तिघं एक होऊन जातील आणि मी बाहेरच फेकलेली राहीन! मुलांचं रूप घेऊनसुद्धा दुर्दैवानं दावा साधावा? या थोरल्याचा आजीवर जीव! धाकट्याला बापाची सारखी आठवण होत राहते. 'तू तुझ्या कॉलेजसाठी मला आजीकडे ठेवलंस!' या मुलांसाठीच मी शक्य तेवढं शिक्षण घेत होते.' दिवा बंद करून ती लाउंजमध्ये येऊन बसली.

आपण फसलो गेलोय हे समजलं तेव्हा तिला तिसरा महिना चालला होता. 'त्याच वेळी मनात आणलं असतं, तर त्या फसवणुकीचं फळ काढून टाकणं अशक्य नव्हतं. मी ताणून धरलं असतं तर डॉक्टरांना तरी काय करता आलं असतं? तेच योग्य झालं असतं. तेच रंगनाथ आणि त्याच्या बहिणीला योग्य उत्तर झालं असतं. मी असं केलं असतं, तर तिचा नूरच उतरला असता! नऊ महिने गर्भारपणाचं ओझं वाहाणं, बाळंतपणाची निष्क्रियता आणि त्यानंतर अंत नसलेला लालन-पालनाचा काळ! तो मी अध्ययन-संशोधनात खर्च केला असता तर! पण मी तसं का केलं नाही? का नाही काढून टाकला तो पिंड तेव्हाच? फसवणूक करणाऱ्याला दूर केलं, तरी का त्या फसवणुकीचं फळ भोगत राहिले? का?'

तिला आठवलं, 'जीव रुजू नये म्हणून सावधानता पाळणं ही वेगळी गोष्ट आहे, पण एकदा गर्भात रुजलेलं बीज... मग ती फसवणूक असो वा आणखी काही... उखडून नष्ट करणं म्हणजे... माझ्यावर अन्याय झालाय खरा. तो मी भोगायला पाहिजे. त्यातून सुटका करून घेण्यासाठी निष्पाप जीव नष्ट करायचा? नुसत्या विचारानंसुद्धा रडू फुटायचं त्या वेळी! यासाठी मान्यता दिली, तर मी कसली स्त्री म्हणायची? होय. असंच वाटलं होतं तेव्हा! हा जीव जपायला पाहिजे. याला जीव लावायला पाहिजे. किती जाणीवपूर्वक, मायेनं मी पोट कुरवाळत होते त्या वेळी! मन एक प्रकारच्या नैतिक औदार्यानं त्या वेळी निथळत होतं. कधी हाच मुलगा 'आपले अप्पा आपल्याला का घेऊन जात नाहीत?' म्हणून विचारेल हे आधीच ठाऊक असतं तर? तर हा पिंड उखडून टाकला असता?'

लाउंजमध्ये बसल्या बसल्या तिनं खिडकीतून बाहेर पाहिलं. दु:खाचं चांदणं अजून तसंच पसरत होतं. मनात पुन्हा तोच प्रश्न उठला. 'ठाऊक असतं, तर हा पिंड काढला असता?' तिला कुठलंही ठाम उत्तर सुचलं नाही. 'चांदणं मंद झालंय की आपल्याच डोळ्यांमध्ये पाण्याचा पापुद्रा आलाय?' कितीतरी वेळ ती तशीच बसली होती. झोपेचा पत्ता नव्हता. 'अशा कितीतरी रात्री झोपेशिवाय गेल्या आहेत. उगाच जीवनाचा नाश होतो आहे. उगाच हातात रिव्हॉल्वर घेऊन घामाचं तळं साचवते आहे.'

सगळे दरवाजे पुन्हा एकदा बघून आपल्या खोलीत जाण्याआधी तिला एकदा मुलांच्या खोलीत जावंसं वाटलं. ती तिची नेहमीची पद्धत होती; पण इच्छा फारशी तीव्र नव्हती. काही वेळापूर्वी आपण पाहून आल्याचंही आठवलं. 'आपण जाऊन पाहिलं काय किंवा न पाहिलं काय, मुलं आपल्यापुरती झोपली आहेत. अम्मा अधून-मधून आपण झोपलेले असतानाही येऊन बघून जात होती, हे त्यांना समजणार नाही आणि पुढंही आठवणार नाही.'

ती आपल्या पलंगावर जाऊन पडली. बाहेरचं चांदणं दिसेल असा पडदा बाजूला सारावा

असं तिला वाटलं, पण पुन्हा त्या दु:खी चंद्राचं दर्शनच नकोसं वाटलं. 'त्याचं दु:ख त्याला लखलाभ! घरदार नसलेला नतद्रष्ट चंद्र!' एकाएकी तिला वाटलं, 'यावर एक कविता का लिहू नये?' त्याच लयीत गुरफटलेल्या अवस्थेत ती कितीतरी वेळ होती, पण कवितेची ओळ साकार होऊ शकली नाही. झोपही आली नाही.

'नाहीतरी आपलं चुकलंच. आपण अध्ययन-अध्यापनात मन रमवायला पाहिजे होतं. अजून तरी काय बिघडलं? मुलं झोपल्यावर भरपूर वाचन करायला पाहिजे. वाचता वाचता आपोआप झोप आली तर उत्तम. नाही आली तरी हरकत नाही. या घरी राहायला येऊन एवढी वर्षं झाली, तरी आपण आपली अभ्यासिका नीट लावलीच नाही.' हे तिला तीव्रपणे जाणवलं. लाउंजलगतची खोली त्याच दृष्टीनं तिनं ठेवली होती. भिंतीमध्ये छतापर्यंत पुस्तकांसाठी शेल्फं होती. तीन-चार हजार ग्रंथ व्यवस्थित मावतील एवढी 'मोठाली शेल्फं आहेत. पुढं कधी व्यवस्थित पाऊस-पाणी होऊन चार पैसे हाताशी आले की, त्यांना काचेची दारं करायला पाहिजेत. आपल्याकडे असलेलीच पुस्तकं आपण नीट लावून ठेवली नाहीत. छे:! हा कसला रोगिष्टपणा!' म्हणून ती ताडकन उठली आणि बाहेर येऊन तिनं कितीतरी दिवसांत हात न लावलेलं त्या खालीचं कुलूप उघडलं. एक मोठा टॉवेल घेऊन तिथलं एकेक पुस्तक पुसून ठेवताना तिला वाटलं, 'एकदा कॉलेजमधल्या लायब्ररियनला घरी बोलावून सगळी पुस्तकं नीट वर्गवारी करून लावायला पाहिजेत. नंतरही विकत घेऊन ती पुस्तकं कुठं कशी ठेवायची ते विचारायला पाहिजे, म्हणजे नंतर गोंधळ होणार नाही.'

तिला एकाएकी सोमशेखरची आठवण झाली. 'मी इथं संपूर्ण तळमळतेय झोप नाही म्हणून! मृत्यूच्या टोकापर्यंत जाऊन त्याला स्पर्श करून येते आणि हा घरात घोरत पडला असेल. तरुण देहाकडून सुख तेवढं पाहिजे रास्कलला! प्रेम? काय हुशार आहे पण! एवढ्या दिवसांत त्यानं एकदाही 'माझं तुझ्यावर प्रेम आहे.' म्हणून सांगितलं काय? त्या बहीण-भावांच्या फसवणुकीला मी नकळत बळी पडले, पण याच्याबरोबर?'

पुस्तकं पुसायचं काम थांबवून एक जाड पुस्तक हातात घेऊन ती बेडरूममध्ये आली. अंथरुणावर पडून तिनं वाचायचा प्रयत्न केला, तरी बुद्धी साथ देईना; पण झोपही येईना. तिला आठवलं, 'रिव्हॉल्वरच्या चेंबरला कुलूप लावलंय. अपरात्री घरात चोर शिरला तर? तिनं कुलूप काढून गोळ्या भरून ठेवल्या.'

आता तिला खरोखर झोप येऊ पाहत होती, पण तिच्या मनात आलं, 'आता आपण गाढ झोपलो तर एवढ्यात पुट्टम्मा स्वयंपाकाला यायची वेळ होईल.' ती स्वत:ला जागं ठेवायचा प्रयत्न करू लागली. त्याच वेळी तिला सकाळच्या टपालातून मॅनेजरचं पत्र आल्याचं आठवलं. ते पत्र फोडून, त्यावर एकवार नजर फिरवून तिने ठेवून दिलं होतं. त्यानंतर दिवसभरात तिने पुन्हा ते वाचलं नव्हतं. मॅनेजरकडून आलेलं प्रत्येक पत्र लक्ष देऊन पूर्णपणे दोन-तीनदा वाचल्याशिवाय फाडायची तिला भीती वाटत होती. मॅनेजरकडून आलेलं पत्र वाचण्यासाठी ती कुठंही धावणारं मन आधी स्थिर करत होती. कारण त्यात कुठली ना कुठली समस्या, कर्ज, अडचण, तत्काळ पैसे भरायचं दडपण असंच काहीतरी असणार, याची तिला खात्री होती.

हेही पत्र तसंच होतं. तिनं पुन्हा एक आतील बातमी वाचली.

'...बोर्डामध्ये पैशाची कमतरता असल्यामुळे आणखी तीन महिने कुणालाही कर्ज मिळणार नाही, असे सांगितले आहे. आता आपल्या अकाउंटमध्ये असलेले सव्वा पंधरा हजार रुपये येत्या तीन महिन्यांच्या खर्चाच्या दृष्टीने अपुरे आहेत. सोसायटीमध्ये कर्ज मागणे एवढा एक मार्ग आता आहे. परवा मी सकलेशपूरच्या सोसायटीत चौकशी करून आलो. चेअरमनवर बरेच अवलंबून आहे. त्यासाठी मालकांनी येणे आवश्यक आहे. या महिन्याच्या अठरा तारखेनंतर चेअरमन गावात नाहीत असेही समजते. त्यामुळे आपण शक्य तितक्या लवकर येणे आवश्यक आहे...'

पत्र वाचताना तिचं मन विचारात गढून गेलं. 'जाणं आवश्यक आहे यात शंका नाही; पण जायचं म्हणजे पेट्रोललाच साडेतीनशे रुपये जाणार. बसनं गेलं, तरी सकलेशपूरहून पुढं इस्टेटपर्यंत टॅक्सीच हवी. येताना बसची वाट पाहणं आलं. ती मिळाली नाही की, रात्री मुक्काम करायला पाहिजे. म्हणजे सगळा खर्च तेवढाच! शिवाय त्रास होईल तो वेगळाच! छे:! कारच्या पेट्रोलचा खर्चही निघत नाही या दरिद्री इस्टेटीमधून! त्यापेक्षा ती विकून बँकेचं कर्ज फेडून मोकळं तरी व्हावं. नाहीतरी ती तारण म्हणून ठेवली आहेच. 'व्याज भरू शकत नाही. तुम्ही इस्टेटीचं हवं ते करा.' म्हणून बँकेला पत्र का लिहू नये?' या विचारानं तिला थोडं बरं वाटलं. तरी पाठोपाठ आठवलं, हा विचार काही आजच पहिल्यांदा आपल्याला सुचलेला नाही. पुन्हा थोडे दिवस कष्ट काढावे लागले तरी हरकत नाही. इस्टेट सांभाळली पाहिजे, हा विचार प्रबळ झाला.

पुन्हा झोप उडाली. सकलेशपूरच्या सोसायटीच्या चेअरमनपुढे दात विचकायचे, अशा असहाय परिस्थितीत अडकलेली स्त्री दात विचकत समोर बसली की, त्याच्या चेहऱ्यावर उमटणारे असभ्य विचार तिला कळत नव्हते असं नव्हे. पण ते बोलून दाखवायची त्याचीच काय, आणखी कुणाचीही छाती नव्हती, ते तिला निश्चित ठाऊक होतं.

आदल्या रात्री असं जागरण झाल्यावर दुसऱ्या दिवशी कॉलेजमध्ये जांभया, झोप, आळस, तोल जाणं हे सगळं होणं साहजिक होतं. त्यामुळे निरुत्साह वाटतो म्हणून घरात झोपून राहायचं म्हटलं, तरी झोप येत नव्हती. वर्गावर जाताना बुद्धी बधिर झाल्यासारखी वाटत होती. तिनं दोन-तीनदा स्ट्राँग कॉफी घेऊन तरतरीतपणा आणायचा प्रयत्न केला, तरी काही उपयोग होत नव्हता.

बारा वाजता ती घरी आली. येताना तिच्या डोक्यात एकच विचार होता, 'घरी गेल्यावर जेवायचं आणि छान ताणून द्यायची.' पण घरात पाऊल ठेवता ठेवता सोमूला त्या क्षणी पाहायची तिला इच्छा झाली. बघता बघता इच्छा तीव्र झाली. सव्वाबारा-साडेबारा ही त्याची यायची वेळ. कधी वीस-पंचवीस मिनिटं उशीर व्हायचा. तिनं घाईघाईनं हात-पाय धुतले. कुत्र्यांना खायला देऊन घरात मोकळं सोडलं. स्कूटरचा आवाज ऐकू येईल, असं तिला वाटलं. ती बेडरूममध्ये गेली. वॉर्डरोबवरची त्याच्या लुंगीची घडी तिने कॉटवर ठेवली. ठेवताना जाणवलं, 'धुवून इस्त्री करून ठेवायला हवी होती. हे काम कामाच्या बाईकडं देण्यासारखं नाही.' ती स्वत: ते करत होती. आपल्या सोमूची लुंगी म्हणून नव्हे, कामवालीच्या मनात नसते प्रश्न उठू नयेत याची सावधगिरी म्हणून!

‘अजून कसा सोमू आला नाही? कधीकधी त्याला उशीर होतो. पण आजच का व्हावा? ती गेटपाशी जाऊन उभी राहिली.’ विक्रांत तिला लाडात येऊन खेळायला बोलवत होता. तिची दृष्टी रस्त्याच्या त्या टोकापर्यंत धावून आली, तरी तिला एकही स्कूटर दिसली नाही. ‘असं उभं राहिलं तर लोकांना संशय येईल... येईना का आला तर... पण तशी संधी का द्यायची? पण इथं गावाबाहेर एकेक एकराच्या प्लॉटवर एकेक बंगला असलेल्या परिसरात कोण कशाला बघायला येईल?’ विचाराच्या आंदोलनात विक्रांतला शेकहँड देताना तिला तीव्रपणे वाटलं, ‘बारा चाळीस झाले. आता सोमू येणार नाही.

‘होय. काल तो रागावून गेलाय. अशी कशी मी विसरले? आपण एवढ्या अपेक्षेनं त्याची लुंगी काढून ठेवून दारात उभं राहून वाट पाहतोय...’ तिला स्वत:चाच राग आला. पुन:पुन्हा शेकहँडसाठी पुढचा पाय पुढं करणाऱ्या विक्रांतला दूर लोटून ती तरातरा घरात आली. लाउंजमध्ये सोफ्यावर बसताना ती हताश होऊन गेली होती. शरीराच्या पार्श्वभागाला लकवा मारल्यासारखं तिला वाटू लागलं.

सगळं नि:शब्द झालं होतं. झाडांची सुकलेली पानं नि:शब्द होऊन गेली होती. एवढ्या मोठ्या विटक्या घरातली हवा कुणीतरी व्हॅक्यूम क्लीनरनं काढून टाकावी असा अनुभव येत होता. हालचालींची जाणीवच नष्ट झाली होती. काळाचा प्रवाहच अंतर्बाह्य स्तब्ध झाल्याच्या अनुभवात ती गाडली जात होती. थोड्या अंतरावर उडणाऱ्या आणि पुन:पुन्हा जमिनीवर आपटणाऱ्या माशीची हालचाल डोळ्यांसमोर घडत असली, तरी ती आपल्यापासून शेकडो-हजारो मैलांवरील परग्रहावर चालली आहे अशा भावनेत ती बसली होती.

तिच्या दृष्टीनं काळ थांबलेल्या अवस्थेत किती वेळ गेला कोण जाणे. घरात शिरलेले विश्वास-विक्रांत तिच्या गुडघ्यांवर आपले पाय ठेवून तिला प्रेमानं चाटू लागले, तेव्हा तिला या जगाचं भान आलं. ती उठली. त्यांच्या गळ्यातले पट्टे धरून ती ओढू लागली तेव्हा ते तिला विरोध करू लागले. अखेर एकेकाला आत नेऊन त्यांच्या-त्यांच्या घरात बांधून पुन्हा सोफ्यावर येऊन बसेपर्यंत ती चांगलीच दमली होती. समोरच्या भिंतीवर वेगानं सेकंद काटा फिरणारं घड्याळ अडीच वाजल्याचं दाखवत होतं. ‘प्रेमाचं नाटक करतोय हा. खरं ते विचारल्यावर लगेच दूर झाला. नाहीतरी त्याला दूर व्हायला काहीतरी निमित्तच हवं होतं म्हणा! असला नाटक्या दूर गेला हेच बरं झालं.’ तिनं हे सभोवतालच्या निवान्त आणि नि:शब्द घराला आणि समोरच्या घड्याळाला मोठ्यानं सांगितलं.

स्वत:चा आवाज ऐकून ती स्वत:च पराकोटीची दचकली. ‘वेड्यासारखी एकटीच केवढ्या मोठ्यानं बोलतेय मी!’ ती मनोमन शरमून गेली.

स्वत:चं मन आवरून ती उठली. निश्चयानं तिनं स्वत:ला सिकंपाशी आणलं. हात स्वच्छ धुवून ती डायनिंग टेबलाच्या खुर्चीवर बसली. ‘आपलं जेवण ते आपलंच. त्यासाठी आणखी कुणाची वाट पाहायची गरज नाही. ’ या निश्चयानं ती जेवू लागली. चार-पाच घास खाताच तिचं तिलाच जाणवलं, ‘आपण जेवण्यापेक्षा समोरचं अन्न संपवायचं म्हणून गपागप खात आहोत.’ पुढचा घास तोंडात गेला नाही. तोंडात असलेला घासही बराच वेळ तोंडात घोळत राहिला. तो गिळायचा प्रयत्न केला, तर उलटी होईल असं वाटून तिनं तो घास सिकंमध्ये थुंकून टाकला. चूळ भरून ती पुन्हा ताटापुढे बसून राहिली.

कितीतरी वेळ तसाच गेला.

'रास्कल! मी अशी बसून राहीन हे ठाऊक आहे म्हणून मुद्दाम आला नाहीस. बायकांना त्रास होईल असं वागण्याचं त्या मुंबईच्या बाईशी खेळ खेळून शिकलास तू! फक्त ती एकटीच की आणखी किती बायका आहेत? पण माझ्याशी गाठ आहे लक्षात ठेव! प्रामाणिकपणाचा प्रचंड अहंकार आहे तुला. खरा बदमाश आहेस तू.'

समोरच्या अन्नातला कणही गिळवणार नाही हे जाणवून तिनं समोरची ताटली उचलली. अन्न उचलून फ्रीजमध्ये ठेवलं. टेबल पुसून ती बेडरूममधल्या अंथरुणावर पडली. निदान अर्धा तास तरी झोपून उठायला हवं होतं, पण मिटलेल्या पापण्यांच्या लालसरपणातून त्याचीच आकृती साकारत होती. 'थू:! याला भेटायच्या आधी किती सुखात होते मी! उगाच आपण यात पुढाकार घेऊन साध्या ओळखीचं स्नेहात रूपांतर केलं. आपण पुढाकार घेतल्यानं या रास्कलचं चांगलंच फावलं. म्हणून असा छळवाद मांडलाय माझा. मीच हे सगळे बंध तोडले की कळेल त्याला.'

या निश्चयानं कितीतरी वेळ तिचं मन स्थिर झालं होतं; पण तिचं घड्याळाकडे लक्ष गेलं तेव्हा आपण हा निश्चय करून जेमतेम तीन-चार मिनिटंच झाल्याचं तिच्या लक्षात आलं. घड्याळानंही छळवाद मांडल्याचं बघून ती संतापून गेली.

झोप येत नव्हती. रात्री काढून ठेवलेलं पुस्तक तिनं पुन्हा वाचायला घेतलं. दोन-तीन पानं वाचली, तरी एक शब्दही डोक्यात शिरत नाही हे लक्षात आलं. अभावितपणे तिचा हात रिसीव्हरवर गेला. नंबर फिरवत असतानाच वाटलं, ' 'कोण आहे?' म्हणून विचारलं तर काय उत्तर द्यायचं? मी उत्तर दिलं नाही तरी तो निश्चित ओळखेल. मी काही कुत्री नाही त्याच्याकडे आपण होऊन जायला! त्यालाच घरी येऊ दे. छान झडती घेईन.' तिनं केव्हाच रिसीव्हर ठेवून दिला होता.

एकाएकी ती उठली. तिनं रिव्हॉल्वर बाहेर काढलं. त्यावरून मायेनं हात फिरवताना काही ठिकाणी धूळ बसलेली दिसली. आपण रिव्हॉल्वर कधीही दिवसा बाहेर काढत नाही याची तीव्रपणे जाणीव होऊन ती पदराच्या टोकानं त्यावरची कोपऱ्यात अडकलेली धूळ पुसू लागली. नंतरही ते हातात घेऊन बसताना तिच्या मनात आलं, 'तशी हीही वेळ मोकळी! म्हणजे योग्य आहे. आवाज ऐकून मुलं धावत यायचा प्रश्न नाही आणि त्यांच्या मनावर आघात व्हायचाही प्रश्न नाही.' तोंड उघडून तिनं नळी तोंडात ठेवली. पोलादाची चव जिभेला जाणवून गेली. 'हे असंच इतके वेळा घडतंय, पण ट्रिगर का ओढत नाही मी? मृत्यूचं भय म्हणून? जीवनाविषयीचं प्रेम म्हणून? मुलांचा हा मोह आहे? की भोगत असलेलं दु:ख अजूनही अपुरं आहे?

'नाही. तिचं मन ठामपणे उत्तरलं. मला मृत्यूचं भय नाही. जीवनावर प्रेम नाही. मी मेले तरी तो नतद्रष्ट बाप मुलांना निश्चित सांभाळेल; पण तो कर्ज फेडून इस्टेट वाचवू शकणार नाही. त्यासाठी मी न मरता जगतेय ना! किती क्षुद्रपणा हा! छे:! ट्रिगर ओढायलाच पाहिजे.' तिनं मनात डोकावून आपली अखेरची इच्छा काय आहे ते पाहिलं. तशी कुठलीही इच्छा नाही.

कितीतरी वेळ ती तशीच होती. तोंडातली नळी लाळेनं ओली झाली. दातांना रग लागली. असह्य होऊन तिनं नळी बाहेर काढली. कुलूप फिरवून तिनं रिव्हॉल्वर कॉटवर फेकलं. तिला स्वत:चीच किळस आली. मळमळून उलटी होईलसं वाटलं. 'मरायचीही लायकी नसलेला देह हा!' पाठोपाठ काही क्षण वेदनाहीन निश्चलतेत गेले. ती ताडकन उठली आणि व्हॅनिटी बॅग हातात घेऊन पायात चप्पल चढवत भुंकणाऱ्या कुत्र्यांकडे दुर्लक्ष करून, सगळी दारं बंद करून कारमध्ये बसली. काही क्षणांतच तिची कार भरधाव वेगात टेकडी चढू लागली.

उन्हामुळे केवळ रस्ताच नव्हे, भोवतालचे दगडधोंडे आणि झाडं-झुडपंही स्पष्ट दिसत होती. उन्हामुळे डोळे दिपल्यासारखे होत होते. टेकडीला वळसा घालून ती वेगानं आपलं घर दिसायच्या जागी उभी राहिली. गाडीतून उतरून मध्ये येणारी झुडपं बाजूला सारत रानटी आंब्यानं सावली धरलेल्या काळ्या कातळावर ती येऊन बसली. जीव थोडा शांत झाला. खालच्या बाजूला घर दिसत होतं. ते पाहत असताना तिला आठवलं, 'त्या दिवशी त्याच्याबरोबर इथं आले होते. त्यानंतर आलेच नाही. त्यानं ती मुंबईची हकिकत इथंच सांगितली. त्यानं सांगितलं तेच योग्य झालं काय? छे! एवढ्या शांतपणे विचार करावा एवढी त्याची लायकीच नाही. जाऊ दे! मी तरी त्याच्यावर का संतापावं? काय नातं त्याचं माझ्याशी?'

कितीतरी वेळ ती तिथून दिसणारा आकाश-पृथ्वीचा संगम पाहत बसली. तिच्या मनात आपोआप एक पत्र आकार घेऊ लागलं. ' 'प्रिय...' नको. 'माझ्या प्रेमा...' छे:! काहीही भावना लिहिणं कठीणच! एवढ्या दिवसांत परस्परांना पत्र लिहायचा प्रश्नच आला नाही.' समोरच्या धरती-आकाशाच्या मीलनावर कागद कल्पून तिचं मन पत्र लिहू लागलं. आधीच्या दोन-तीन ओळी उमटेपर्यंत अडखळल्यासारखं झालं, तरी पाठोपाठ लहान कालव्यातून वेगानं पाणी वाहावं तशा वेगात भावना व्यक्त होऊ लागल्या.

'माझ्याही नकळत तुला दुखवायचे विचार मनात येऊन जातात. त्यानंतर मन त्याचंच समर्थन करण्यात गढून जातं. ज्यांचा खरोखर राग करायला पाहिजे त्यांच्यावर राग व्यक्त न करता मला निष्कलंक, प्रामाणिक प्रेम भरभरून देणाऱ्या तुझ्यावर मी तो राग काढते. हा केवळ अविवेकच नव्हे, कृतघ्नपणाही आहे. आपल्या नात्यात कृतज्ञतासुद्धा येता कामा नये. कारण कृतज्ञता म्हटली की, पाठोपाठ ऋणपूर्तीची भावना आलीच. आईच्या माघारी निर्व्याज प्रेमाचा कणही मिळाला नाही अशी दुर्दैवी मी! आईच्या प्रेमाचाच अव्याहत झरा मिळालाय या भ्रमात कितीतरी दिवस राहिले ना! परिणामी भ्रमनिरास झाल्यापासून जगातल्या निर्व्याज प्रेमावरचा माझा विश्वासच उडून गेलाय. तुझ्याशी एकरूप होईपर्यंत मला निखळ प्रेमाची कल्पनाही करणं अशक्य होतं असं सांगितलं तर तू विश्वास ठेवशील? ज्याचा मी भरपूर अभ्यास केला आणि इतरांनाही शिकवत राहिले, त्या साहित्यात येणारं प्रेमाचं वर्णन वाचताना मला नेहमीच प्रश्न पडे, बाकी जीवनाचं वस्तुनिष्ठ आणि वास्तववादी चित्रण करणारे आमचे मोठमोठे लेखक प्रेमाचा विषय निघाला की, एवढे का भ्रमात वावरतात? पण मात्र जाणवतं, कितीही प्रतिभावंत लेखक असला, तरी ही भावना व्यक्त करताना तो थिटाच ठरतो. तुझ्या सान्निध्यात ठणठणीत पाषाण असलेलं माझं रूक्ष जीवन रसरसलेलं उद्यान झालंय आणि ते उद्ध्वस्त करायचा अविवेकही माझ्या हातूनच घडतो आहे.'

कितीतरी वेळ ती मनात उमटलेला प्रत्येक विचार ती समोर आकाशाच्या कागदावर

उमटवत होती. उन्हं खाली गेली, तसं प्रतिक्षिप्त क्रियेनं तिची नजर घड्याळाकडे गेली. पाच वाजले होते. 'मुलांना आणायला पाहिजे.' ती तशीच चालत कारपाशी आली.

टेकडी उतरताना तिचं मन हलकं झालं होतं. 'आज आपण त्याच्या-आपल्या नात्याचा शोध घेतला.' आकाशात पूर्वेकडे तरंगत असलेल्या शुभ्र ढगासारखं तिचं मन हलकं झालं होतं. 'आत्ता तू इथं असायला हवा होताच सोमू. तुला माझ्या चेहऱ्यावरूनच माझं मन समजलं असतं. सोमू, लवकर ये. पक्षी होऊन उडत ये. मला घेऊन चल त्या शुभ्र ढगांवर. देवाशपथ, मी जड होणार नाही. माझी सगळी शक्ती तुझ्या पंखांना देईन. दोघंही त्या शुभ्र ढगांवर तरंगत राहू या.'

समोरून येणारी बस, तिच्या मागोमाग येणारा ट्रक आणि त्यामधून येणाऱ्या दोन गाड्या चुकवत ती सुशीलम्मांच्या घराकडे गेली.

कार उभी राहताच मुलं धावत येऊन कारमध्ये बसली. गाडीतून न उतरता सुशीलम्मांकडे प्रसन्न मुद्रेनं पाहत, स्मित करत ती मुलांसह घरी आली. विजयनं उत्साहानं आईकडून घराची चावी घेतली. गॅरेजमध्ये कार ठेवून, गॅरेजचा दरवाजा बंद करून गेट लावून ती येईपर्यंत विजयनं घराचा दरवाजा उघडला होता. विकासही त्याच्या पाठोपाठ!

तिनं घरात पाऊल टाकताच विजयनं विचारलं, "अम्मा, तुझ्या कॉटवर लुंगी आहे. अप्पा आले? आणि रिव्हॉल्वर का तिथं ठेवलंस? विकास त्याला हात लावत होता. मी त्याला अडवलं."

तिच्या छातीचा ठोका चुकलाच. घरात रिव्हॉल्वर असल्याचं मुलांना ठाऊक होतं. शिवाय आपण ते लॉक केल्याचं तिला स्पष्टपणे आठवत होतं. पण लुंगी? स्वत:ला सावरत तिनं शांतपणे विचारलं, "लुंगी? कुठली लुंगी म्हणतोस?"

"पांढरी. तुझ्या कॉटवर ठेवलीये ना! अप्पा आलेत?" त्यानं पुन्हा विचारलं.

त्यानं पुन्हा ते नाव काढू नये म्हणून चढ्या आवाजात रागावत ती म्हणाली, "इकडं आई एवढी मरमर मरतेय, तरी तुला सतत अप्पांचंच ध्यान! अम्मावर थोडं तरी प्रेम आहे की नाही तुमचं?"

आत जाऊन तिथली लुंगी आपण आताच पाहत असल्यासारखं दाखवून ती म्हणाली, "ही लुंगी? जुनी आहे ती. महादेवम्मा फरशी पुसायला फडकं मागत होती. तिला द्यायला पाहिजे म्हणून काढली बाहेर." म्हणत तिनं ती लुंगी मधोमध फाडली. आणखी दोन तुकडे करत चारही तुकडे विजयच्या हाती देत म्हणाली, "घे, यातले दोन फरशी पुसायला बादलीत ठेव आणि दोन स्वयंपाकघरात ठेव हात पुसायला."

तो ते तुकडे घेऊन जाताना ती मुद्दामच त्याला ऐकू येईल अशा आवाजात घुश्शातच म्हणाली, "कुणाचीही जुनी लुंगी नको आमच्या घरी! कुणीही आमची सुखं-दु:खं बघायला नको. मी समर्थ आहे तुम्हाला सांभाळायला! तुम्हाला जे काही हवं ते मी देईन!"

अम्मा संतापली असता आपण शांत राहायचं असतं हे विजयला कुणी सांगायची आवश्यकता नव्हती.

रात्री मुलांना जेवायला वाढून झोपवल्यावर पुन्हा तिची तळमळ सुरू झाली. 'विजय तसा मोकळ्या मनाचा नाही. त्याचं मन स्वच्छ झालं असेल काय? तो मोकळेपणानं बोलत नाही. मनात काहीतरी शिल्लक ठेवतो. लहान वयामुळे त्याला त्याचा नीट अर्थ समजत नाही आणि तो विसरूनही जात नाही. नंतर कितीतरी वर्षांनंतर ती घटना मनाच्या पृष्ठभागावर आली की, वेगळाच अर्थ लागतो. माझंही तसंच झालं नाही काय?'

ती मनोमन संकुचित होऊन गेली. मुलांपुढे खाली मान घालायची वेळ यावी या विचारानं ती घामेजून गेली. तिला स्वत:च्या अवस्थेची कीव आली. 'आता तो सात वर्षांचा आहे. आता त्याला कदाचित सगळं नीट कळणारही नाही. आणखी सात-आठ किंवा दहा वर्षांनी त्याला सगळं समजू लागेल. त्या वेळी तो आईची काय किंमत करेल? मृत्युदंडाची शिक्षा फर्मावेल तो! कशाला हवं हे जीवन? केव्हा ना केव्हा जीव द्यायलाच हवा. मग आत्ताच्या आत्ता का संपवू नये? अगदी शेवटच्या क्षणी हतबल करणारी ही कसली अवस्था? जगायची इच्छा आणि मरायचं धैर्य नाही. कसलं जीवन हे!'

खिडकीबाहेर पसरलेल्या शून्य चांदण्याकडे लक्ष जाताच ती उत्कटपणे उठली. शेजारी रिव्हॉल्वर ठेवून कार चालवण्याचा विचारही तिला उत्तेजित करून गेला. 'टेकडीवरच्या नीरव शांततेत आपणही शांत हाऊन जायचं.'

भुंकणाऱ्या कुत्र्यांकडे दुर्लक्ष करून फ्लडलाइट्स बंद करून तिनं गाडी टेकडीवरच्या नेहमीच्या जागी नेली. शून्य चांदण्यात समोरची दरी, दगड-धोंडे, झाडं-झुडपं यांचे आकार प्रेतासारखे पसरले होते. 'मृत्यूला गळामिठी घालायला याहून योग्य जागा कुठली असणार? मनोमन 'मला तुमच्यात सामावून घ्या. एक आकार द्या' ' अशी विनंती करत तिनं नळी तोंडात ठेवली. भोवतालचं चांदणं नष्ट होऊ लागलं. ट्रिगर ओढणं सहज शक्य आहे असं तिला आतून जाणवू लागलं. पाठोपाठ तीव्रपणे वाटलं, 'त्या आधी भरधाव वेगानं त्याच्या घरी जायला पाहिजे. गाढ झोपला असेल. त्याला गदागदा हलवून जागं करायला पाहिजे आणि सगळं रिव्हॉल्वर त्याच्या छातीवर रिकामं करायला पाहजे. ही लुंगी मला आणायला लावून ती विजयच्या नजरेला पडेल असं करणाऱ्याला हीच शिक्षा योग्य आहे. हा लोफर भेटला नसता, तर माझ्यापुरती मी सुखात राहिले असते.' तिचं खदखदणारं मन त्याच्या जयलक्ष्मीपूरच्या घरी जाऊन पोहोचलं. तोंडातली रिव्हॉल्वरची नळी बाहेर काढून लॉक करून ती कारमध्ये बसली. कार वळवून ती तितक्याच वेगानं टेकडी उतरू लागली. गाडी चंदण्याच्या प्रकाशातून बाहेर येऊन शहराच्या दिव्यांच्या प्रकाशात शिरली, तसं तिच्या मनातलं शून्य वितळत गेलं.

धन्वंतरी रस्त्यापाशी वळताना तिला आपण अविवेकीपणा करत आहोत असं वाटलं. ब्रेक लावून तिनं गाडीचा वेग कमी केला, पण त्याच जागी एक बंदूकधारी पोलीस उभा होता. 'तो जवळ येऊन चौकशी करू लागला तर? त्याला काहीतरी उत्तरही देता येईल; पण तरीही अशा अपरात्री अमृता नावाची प्राध्यापिका अमुक नंबरच्या कारमधून एकटी भटकत होती, ही बातमी इथल्या ठाण्यावरील पोलिसांच्या डोक्यात कायमची राहील.' या विचारासरशी तिनं गाडीचा वेग वाढवला. अखेर पेट्रोलपंपाकडे वळून देवराज अरस रस्त्यानं तिनं गाडी आपल्या घराकडे

घेतली.

भुंकणाऱ्या कुत्र्यांना स्वत:ची ओळख देऊन घरात शिरून दार बंद करताना तिच्या मनात आलं, 'गावाबाहेरच्या निर्जन प्रदेशातल्या घरात मुलांना एकटं टाकून रात्रीच्या वेळी असं फिरणं अगदी चुकीचं आहे. त्यांना अचानक जाग आली तर?' तिनं मनोमन निर्धार केला, 'यानंतर अपरात्री घराबाहेर पडायचं नाही; पण हा निर्धार पाळणं सोपं आहे काय? मुलांच्या खोलीत नजर टाकून ती आपल्या बेडरूममध्ये शिरली.' पुन्हा तिच्या मनानं निर्धाराचा उच्चार केला. 'मुलांची शपथ घेतली, तर निर्धार टिकेल; पण टिकला नाही तर? उगाच कशाला मुलांची शपथ? मनात शून्य भाव दाटून आल्याचं मला समजतं, त्यानंतर मी काय करते हे समजतं; पण त्यावर माझं काहीही चालत नाही. मृत्यूच्या सान्निध्यात राहायचं दडपण आतून दाटून येतं; पण तरीही एकदाही मेले नाही मी! का? मला न कळणारं कुठलं आकर्षण मला मरू देत नाही?' अंतर्मुख होऊन मनाचा कोपरान्कोपरा शोधताना तिचं मन तळमळून गेलं. 'यमयातना! हे असह्य आहे. जीव गेला, तरच यातून सुटका होईल.' आतून मळमळून आलं. एक उलटी झाली की, हलकं होईलसं वाटलं. आतली तळमळ हुंदक्याच्या रूपानं बाहेर पडायला धडपडू लागली. घशाशी अडकलेला उष्ण लोंढा डोळ्यांवाटे उसळून वाहू लागला. मुलांना ऐकू येऊ नये म्हणून तिनं तोंडात चादरीचा बोळा कोंबला आणि छाती फोडून बाहेर येऊ पाहणाऱ्या हुंदक्यांना वाट करून दिली. खूप रडू आलं. आणखी! आणखी!

हळूहळू रडू थांबलं. एक प्रकारची ग्लानी संपूर्ण शरीरभर पसरली. मेंदू बधिर झाला. उशीवर डोकं टेकलं. ती हळूहळू गाढ झोपेत बुडत गेली. दिवा तसाच जळत राहिला.

थोड्या वेळानं ती ताडकन उठून बसली. आपण कुठं आहोत हे न कळून ती गोंधळल्यासारखी झाली. काही क्षणांतच तिला पूर्ण भान आलं. अजून दिवा जळत होता. भिंतीवरच्या घड्याळात अडीच वाजले होते. तिनं उठून चूळ भरली. अश्रूंमुळे चिकट झालेले गाल धुतले. संपूर्ण चेहरा धुवून ती अंथरुणावर पडली तेव्हा तिचं मन हलकं झालं होतं. 'छानसं रडू आलं की, कसं हलकं वाटतं! पण मला हवं तेव्हा हे जळळं रडू येतच नाही. '

तिला गाढ झोप लागली. गाढ! अतिशय गाढ! जाग आली तेव्हा विजय तिचा दंड धरून हलवत होता, "अम्मा, पुट्टम्मा आल्या. बाहेरच्या दाराची चावी कुठं आहे?"

म्हणजे रात्री चावी आपण पर्समध्ये ठेवली वाटतं. उठता-उठता आलेल्या रात्रीच्या अभद्र आठवणीनं ती म्लान होऊन गेली.

'हिच्यापासून पूर्णपणे लांब गेल्याशिवाय आपण शांतपणे जगणं अशक्य आहे.' याची त्याला पुन्हा एकदा तीव्रपणे जाणीव झाली. 'माझ्या जीवनातला तपशील ही खोदून-खोदून विचारणार. त्यातल्या घटनांचा माझ्या ध्यानी-मनी नसलेला अर्थ आपली तीक्ष्ण बुद्धी वापरून शोधून काढणार. मला शब्दांत पकडणार, माझ्यावर उगाच काहीतरी आरोप करून मला अपराध्यासारखं वाटायला लावणार. छे:! अथांग प्रेमाप्रमाणेच तीव्र क्रौर्यही तिच्या स्वभावाचा एक भाग आहे. त्यातच आनंद मानण्याची हिची प्रवृत्ती आहे. अशा स्वभावाच्या स्त्रीशी संबंध ठेवून उगाच तळमळत राहण्यात काय अर्थ आहे? हिच्यासाठी मी ऑफिसची वेळ बदलली. गिऱ्हाईकांना भेटणं, विचारविनिमय करणं, प्रत्यक्ष कामाची पाहणी करणं सगळं सोडून पाच

वाजेपर्यंत तिच्या घरीच वेळ काढतोय. ही स्वतंत्र व्यवसाय करायची पद्धत नव्हे! दररोज असं घडू लागलं, तर नीळकंठप्पा काय म्हणतील? अशा संधीचा फायदा घेऊन त्यांनी स्वत:चं प्रस्थ वाढवलं, तर माझं नाव खराब व्हायला वेळ लागणार नाही.'

आतापर्यंत हे विचार कधी सुचले नव्हते असं नाही; पण प्रत्येक वेळी अमृताची ओढ त्यावर काही ना काही तोड काढत होती. 'पैसा म्हणजे काही जीवनाचं सर्वस्व नव्हे. व्यवसाय वाढवणं म्हणजे काही जीवनाचं साफल्य नव्हे. तिच्या सान्निध्यात जे समाधान मिळतं ते केवळ मैसूरच नव्हे, कर्नाटकातला सर्वश्रेष्ठ आर्किटेक्ट म्हणून नाव कमावल्यावर तरी मिळणार आहे काय?' वगैरे विचार एकापाठोपाठ एक मनात येत. आता मात्र इतके दिवस आपण व्यवसायाकडे केलेलं दुर्लक्ष अक्षम्य आहे असं त्याला वाटू लागलं. 'स्त्रीच्या नादी लागलं की, माणसाचं सर्वस्व नाश पावतं.' बाई-बाटलीच्या नादानं उत्कर्षाच्या परमोच्च बिंदूवर पोहोचलेले कसे भुईसपाट होतात, हे त्यानं मुंबईमध्ये पाहिलं होतं. 'या प्रकारात फक्त वेळ वाया जातो असं नाही. मनाची एकाग्रताही ढळते. मुंबईमध्ये ती... पण तिच्याशी दररोज भेट होत नव्हती. ऑफिसची कामं नवीन शहा पाहत असल्यामुळे धंद्यावर विपरीत परिणाम झाला नाही. शिवाय दोघींमध्ये एक स्पष्ट फरक आहे. त्या संबंधात केवळ उल्हास-आनंद होता. ही असली जीवघेणी गुंतवणूक नव्हती. त्यामुळे तिच्यापासून दूर झाल्यावर काही दिवस फसलो गेलो ही भावना, अहंकार दुखावल्याची भावना छळत राहिली हे खरं असलं, तरी असा पूर्णपणे कोसळून गेलो नव्हतो.

'हिचा स्वभाव वेगळा आहे. फार तीव्र भावना आहेत हिच्या. हिच्यापासून सुटका करून घेण्यासाठी संकल्पशक्ती एकवटली पाहिजे. तिच्याबरोबरची गोष्ट वेगळी होती. निरोप घेताना पुढच्या भेटीची वेळ ठरवून उत्साहातच निरोप घेतला जाई. कुठलंही दु:ख नव्हतं. विरहाचा ताप नव्हता आणि अश्रूंनी चिंब भिजलेला चेहराही नव्हता. तो संबंध म्हणून मधुर, उत्तेजनात्मक मधुपान होतं. हिच्याबरोबरचा हा संबंध मात्र हृदय, मन, बुद्धी... एवढंच नव्हे, शरीरातल्या प्रत्येक रक्तवाहिनीपर्यंत, प्रत्येक रक्ताच्या थेंबापर्यंत, शरीराच्या हाडाच्या सांगाड्यापर्यंत पोहोचवून वेदना देतो. सुटका करून घेण्यासाठी कितीही धडपडलं तरी सुटू देत नाही.'

दुसऱ्या दिवशी ऑफिसमध्ये आल्याआल्या तो नीळकंठप्पांना म्हणाला, "उद्यापासून मी माझं टाइमटेबल बदलणार आहे. दुपारी इथून जवळच एखाद्या हॉटेलमध्ये लंच घेऊन येईन. कुणाला अपॉइंटमेंट देताना लक्षात असू द्या. उगाच घरी जाऊन यायचं म्हणजे टाईम वेस्ट!"

नीळकंठप्पांनी आज्ञाधारकपणे मान हलवली.

याच संदर्भात त्याला आणखीही एक गोष्ट आठवली. ही रमाविलास रस्त्यावरची जागा त्याच्या ऑफिसच्या दृष्टीनं अगदी बेतास बेत होती. त्याची बसायची जागा, नीळकंठप्पांचं टेबल, कॉपी काढायचं मशीन सगळं एकाच हॉलमध्ये मांडून ठेवावं लागलं होतं. प्रायव्हसी नावाचा प्रकारच नसल्यामुळे गिऱ्हाइकांची काही वेळा पंचाईत होत होती. तोही अनेक वेळा वैतागून जात होता. कारण अनेकदा काहीही संबंध नसलेली माणसं त्याच्या कामात डोकावून जात होती. तो नव्या जागेच्या शोधात असतानाच त्याला त्याच्या एका गिऱ्हाइकाकडून नव्या जागेविषयी समजलं होतं.

देवराज अरस रस्त्यावरच्या इमारतीत दुकानांच्या वरच्या बाजूला सातशे चौरस फुटांची जागा त्याच्या मनात भरली होती. 'अत्याधुनिक पद्धतीनं तिचं अलंकरण करायचं, स्वतंत्र टॉयलेट, गिऱ्हाइकांना सुखावह होईल असं फर्निचर...' ही जागा सोडता कामा नये असा त्यानं निर्धार केला; पण किंमत अडीच लाख रुपये. पंधरा दिवसांच्या आत पैसे उभे करायला पाहिजेत. 'आपल्याकडचे एकूण एक सगळे काढले, तर दोन लाखांपर्यंत उभे राहू शकतील. शिवाय वरचं अत्याधुनिक पद्धतीचं अलंकरण म्हटलं की, वर पन्नास-साठ हजार तरी लागतील. म्हणजे लाखभर तरी हाताशी असावे लागणार....' त्याला नवीन शहाची आठवण झाली. 'एवढे जमले नाहीत, तरी निदान पन्नास हजार तरी निश्चित देईल तो....'

महिन्याभरात सगळे पैसे द्यायची बोली करून, पन्नास हजार देऊन त्यानं जागेचा व्यवहार निश्चित केला आणि दुसऱ्या दिवशीच बेंगळुरूला जाऊन तिथून मुंबईला जायला निघाला. कुणी चौकशी केली, तर आपण सहाव्या दिवशी येत असल्याचा त्यानं नीळकंठप्पांकडे निरोप ठेवला होता.

रेल्वे बेंगळुरूला पोहोचेपर्यंत तो मनोमन नव्या ऑफिसच्याच विचारात बुडला होता. 'स्वत:चं ऑफिस म्हटलं की, आपल्या मनाप्रमाणे नटवता येईल. अरेच्चा! रजिस्ट्रेशनचा खर्च विसरलोच होतो. नवीनकडे सव्वा लाख मागायला पाहिजेत. मुंबईचं साडेचारशे चौरस फुटाचं ऑफिसही किती सोयीचं आहे! हे ऑफिस आपण सुरेख सजवायला पाहिजे. नंतर एक दिवस हासन, मंडय, मैसूर, कोडगु, दक्षिण कन्नड या सगळ्या जिल्ह्यांतल्या कॉफी-प्लँटर्स, जमीनदार, काँट्रॅक्टर्स, इंजिनियर्स, नगरपालक सगळ्यांचे पत्ते मिळवून त्यांना निमंत्रण पाठवायला पाहिजे. एक जेवण द्यायला पाहिजे. त्यासाठी वेगळा दहा हजार रुपये खर्च झाला तरी हरकत नाही. नंतर दोन बी.ई. इंजिनियर्स कामासाठी ठेवायला पाहिजेत. आणखी लक्ष देऊन काम वाढवायला पाहिजे.'

रात्री बेंगळुरु स्टेशनवर मुंबईच्या गाडीत चढून आपल्या जागेवर तो झोपला. गाडी धावू लागली. बघता बघता मनातले सगळे विचार नाहीसे झाले. 'नवीन पैसे निश्चित देईल. चार-पाच जिल्ह्यांतच नव्हे, बेंगळुरूमध्येही कामं मिळवणं फारसं कठीण नाही. या सगळ्या धावपळीसाठी तीन महिन्यांच्या आत कार घेता येईल. त्यानंतर? त्यानंतर सुरू होईल मुंबईसारखंच धावपळीचं जीवन.' त्याला एकाएकी नवं ऑफिस नकोसं वाटलं. मैसूरमध्ये राहणंही नको. सरळ मुंबईला जायचं. नवीनबरोबर कामं करायची. हवा तेवढाच पैसा मिळवून निवान्त राहायचं.

मुंबईमधला 'तो' संबंध तोडल्यावर वैतागला होता, पण जीव असा अंधारून गेला नव्हता. अचानक संबंध जुळून आला आणि आपोआप तुटून गेला. एक प्रकारची उपेक्षा वाट्याला आल्याचं दु:ख झालं होतं, तरी लवकरच तो तिला विसरून गेला होता. ऽकदाचित त्या वेळी बायको जिवंत असल्यामुळे एवढी तीव्रता जाणवली नसेल. छे:! बायको हवीच. शॉक ॲबसॉर्बरसारखी! बाहेरचे धक्के, आशा-निराशा सहन करायला! आता तरी काय बिघडलं? नवीन आणि इंदूबेन नेहमीच आग्रह करतात. चाळीस वर्षं म्हणजे खरंतर पहिलं लग्न करायचं वय, असं नेहमीच इंदूबेन म्हणते. मी विवाहित असतो, तर अमृताशी संबंध वाढला नसता काय? तसं म्हणता येणार नाही. स्त्री-पुरुषाच्या आकर्षणाला कशाचा अडथळा वाटेल आणि काय पूरक होईल हे निश्चितपणे सांगणं शक्य आहे काय?'

गाडी धावत होती. खिडकीबाहेरचं उन्ह बघताना त्याला मुंबईच्या उन्हाच्या झळा आठवल्या. चपला बाहेर ठेवून आत जायची त्याची नेहमीची पद्धत. चोरटेपणानं आत जाऊन डोकावण्याची त्याची मुळीच इच्छा नव्हती. उघडा दरवाजा होता म्हणून आत शिरला. ऽतिच्या सांगीताच्या खोलीत तबला-तानपुऱ्याच्या मागं तबलजीच्या बाहुपाशात... त्याचा तो कळकट पायजमा... लाल थोबाड... दाढीची खुंटं... निर्बुद्ध चेहरा... तिनंही त्याला पाहिलं असणार. तबलजी मात्र तर्र होता. ती? रसभंग होईल एवढं तर निश्चित प्यायली नव्हती. तिथं राहणं अशक्य होतं!' चटकन मागं वळून चपला चढवून बाहेर निघून येणं एवढंच त्याला करता आलं.

'खूप वेळा मनात आलं, तिला जाब का विचारला नाही? 'हीच तुझी लायकी? हीच माझ्यावरची निष्ठा?' असं विचारलं असतं तर? पण त्यानं विचारलं नाही. त्या घटनेनंतर तो तिला भेटायलाही गेला नाही. ती? कदाचित तीही आली नसेल. मी जाब विचारेन म्हणून? का नाही विचारलं मी? किळस? निराशा? द्रोहाचं दु:ख? आज एकटा रेल्वेच्या डब्यात बसलो असताना या वेगवेगळ्या बाजू सुचताहेत. तिनं मात्र एवढ्या दिवसांत एकदाही, 'तू एकटाच माझ्या जीवनातला सखा!' असं सांगितलं नव्हतं. सुचवलंही नव्हतं. प्रत्येक भेटीत तिनं समागमाची उत्कट इच्छा परोपरीनं दाखवली होती. एकदा कधी तरी प्रणयक्रीडेत रंग भरण्यासाठी म्हणूनच तिनं विचारलं, 'शेखर, आणखी किती प्रेयसी आहेत?'

'यावर किती संतापलो होतो मी! 'मला समजतेस तरी काय?' म्हणून आरडाओरडाही केला होता.

'त्या वेळीही ती म्हणाली होती, 'त्यात एवढं रागवायला काय झालं? मला मुळीच मत्सर वाटणार नाही. अर्थात तुझ्या वागण्या-बोलण्यावरूनही तुला आणखी कुणी नाही हे समजतं म्हणा! त्याचा एकीकडे आनंद होतो आणि भीतीही वाटते.' '

आज तिचं बोलणं आठवताना त्याला डोक्यात प्रकाश पडल्यासारखं झालं. समोरच्या खिडकीच्या काचेत त्याला स्वत:चं आपोआप उघडलेलं तोंडही दिसलं. 'तिनं माझ्यावर त्याच वेळी अपरिपक्व म्हणून शिक्का मारला असेल. निष्ठा नसली की, भावनेचा भारही नसतो एवढंही ठाऊक नसलेला शतमूर्ख असंच तिनं माझ्याविषयी मत करून घेतलं असेल.'

रेल्वेच्या पोऱ्यानं आणून दिलेलं जेवण जेवताना अमृताची आठवण चौफेर धावून आली. 'अगदी अननुभवी, पहिल्यांदाच माझ्याकडून खऱ्या अर्थानं जागृत होत असलेली स्त्री! तिला मी मुंबईमधल्या संबंधाविषयी एवढ्यात का सांगितलं? सांगायला नको होतं की काय कोण जाणे. आता ते सहन न होऊन ती तळमळतेय. छे:! ही निष्ठाही नको आणि हा संबंधही नको!'

बाहेरच्या उन्हाच्या झळा, तापणारे दगड-धोंडे आणि रखरखणारं आकाश पाहत राहिलं की, एकलेपणा तीव्रपणे जाणवतो असा अनुभव असल्यामुळे तो पाय पसरून आडवा झाला. डोळे बंद करून झोपून राहिला, तशी मुंबई हळूहळू जवळ येत असल्यासारखं वाटू लागलं. 'नवीन, इंदूबेन, दिगंत! उद्या सकाळी मी त्यांच्याबरोबर असेन.' तंद्रीतच त्याला झोप लागली.

जाग आली तेव्हा आपणहून दूर जात असल्यासारखं त्याला जाणवलं. आणखीही चार-पाच दिवसांनी याच मार्गानं पुन्हा मैसूरला यायचं होतं, तरी आत्ता दूर जायचा विचार त्याला दु:खद

वाटला. 'आयुष्यात पहिल्यांदाच आपलं जन्मगाव सोडून लांब निघाल्यासारखं वाटतंय. एवढं काय आहे या गावात? एवढी वर्षं मुंबईमध्ये नाही का काढली? गर्दीचा अतिरेक वगळला, तर मुंबईमध्ये नसलेलं असं काय आहे या गावात? चार दिवसांसाठी गाव सोडताना एवढं का वाईट वाटावं? काय आहे असं? कुक्करहळ्ळीचा तलाव? चामुंडी टेकडी? ललितमहालाचा विस्तीर्ण माळ? गंगोत्री विद्यापीठाचा परिसर?' त्यानं एकेक उकलून पाहायला सुरुवात केल्यावर प्रत्येक वेळी मन तिच्या आठवणीत गुरफटून गेलं. तो चकित झाला. यापैकी काही ठिकाणी तर तो तिच्याबरोबर कधीही गेला नव्हता. 'तरी त्या जागाही तिच्याच आठवणीत गुरफटून जात आहेत. यालाच तत्त्वज्ञानी लोक 'भ्रांती' म्हणत नसतील?'

मन विचारात गुरफटून गेलं, तरी त्याला योग्य उत्तर सापडलं नाही. एक मात्र निश्चितपणे त्याच्या ध्यानात आलं होतं. 'मुंबईच्या आठवणीसरशी तिची आठवण येत नाही. फारतर तिच्या मैत्रिणीचा फ्लॅट पुसटपणे आठवतो... तेवढाच!'

सकाळचं विमान पकडून तो बेंगळुरूला आला आणि बसनं मैसूरला. थेट ऑफिसमध्ये गेल्यावर नीळकंठप्पांनी त्याला मधल्या दिवसांमधल्या परिस्थितीची कल्पना दिली. दोन चेक्सवर सह्या करून देण्याआधी तो हिशेब पाहण्यात गढून गेला असतानाच फोनची घंटा वाजली. हिशेबात खंड पडल्यामुळे तो वैतागला, तरी त्यानं फोन उचलून विचारलं, "हॅलो"

"सोमू, केव्हा आलास मुंबईहून?"

आवाज ऐकताच तो गडबडून गेला. मन भरून आलं. काहीच उत्तर सुचलं नाही. मन आपल्या गोंधळलेल्या अवस्थेचं समर्थन करत असतानाच ती म्हणाली, "हे बघ, तुझ्या शेजारी नीळकंठप्पा उभे आहेत. ते अजून जेवायला घरी गेले नाहीत. तुला प्रचंड राग आलाय. 'तू कोण मला विचारणार गाढवे' म्हणून ओरडावंसं वाटतंय. नाहीतर अवाक्षर न बोलता माझी फजिती करायचा तुझा विचार आहे; पण तू मख्खपणे नुसताच रिसीव्हर कानाला लावून बसलास, तर नीळकंठप्पा भलतेच अंदाज करतील. त्यामुळे निमूटपणे माझ्या प्रश्नांची उत्तरं दे बघू! मी तुला भेटायला येऊन गेले. मुंबईला गेलास म्हणून समजलं. नाक खुपसायची इच्छा नव्हती; पण काळजी वाटून पुढची चौकशी केली. तुझी देवराज अरस रस्त्यावरची नव्या ऑफिसची जागाही बघून आले. छान आहे. एकंदर साडेतीन लाखांचा खर्च अपेक्षित आहे म्हणे. तुझ्याकडे किती रुपये आहेत? मुंबईहून किती आणलेस? हे बघ, माझ्या आगाऊपणाला नीळकंठप्पांच्या समोर तरी तुला रागवता येणार नाही. हवं तर त्यासाठी घरी ये. हं, आता सांग. तुझ्या नवीन शहाकडून किती आणलेस?"

उत्तर देण्याखेरीज उपाय नव्हता. लवकर विषय संपवण्यासाठी तो म्हणाला, "लाख-सव्वा लाख."

"एवढा पैसा घेऊन रेल्वेनं आलास? सेफ्टीच्या दृष्टीनं विचारतेय."

"नाही, विमानानं आलो. शिवाय कॅश नाही. डी.डी. काढून आणलाय."

"डी.डी? म्हणजे काय असतं ते?" तिच्या आवाजात आश्चर्य भरलं होतं.

“उगाच नाटक करू नकोस. एवढे सगळे बँकेचे व्यवहार तूच पाहतेस.”

“थट्टा नव्हे रे! खरं तेच सांगतेय. चेक आणि ट्रान्स्फर या दोन गोष्टी सोडल्या, तर काहीच समजत नाही मला बँकेचं. काय असतं डी.डी. म्हणजे?”

त्यानं मुद्दामच सविस्तरपणे डिमांड ड्राफ्टची माहिती सांगितली.

“पाहिलंस सोमू? एवढी एरंडासारखी वाढले, तरी किती महामूर्ख आहे मी? तू आणलेला... कसला ड्राफ्ट म्हणायचा?... हां... डिमांड ड्राफ्ट... मला दाखवशील? बघायला पाहिजे एकदा. तो दिल्यावर लगेच सगळे पैसे मिळतात? तू परस्पर ऑफिसमध्ये गेलास म्हणजे तुझी स्कूटर तिथं नाही. तू रिक्षानं तडक इथं निघून ये बरं! की मी येऊ कार घेऊन न्यायला? मला मूर्खला दाखवल्याशिवाय डी.डी. बँकेत भरू नकोस हं! उद्या भरला, तरी सगळे पैसे एकदम मिळतील ना?”

“तशी सहा महिन्यांची वेळ असते. दोनपर्यंत येईन मी.” तो गोंधळलेल्या अवस्थेतच उत्तरला.

“बरं, मी तोवर जेवणार नाही.” म्हणत तिनं रिसीव्हर ठेवून दिला. महत्त्वाची कागदपत्रं आणि बिलं पाहून त्यानं काही ठिकाणी सह्या करायच्या होत्या त्या केल्या. एका घराच्या लोखंडाचाही हिशेब पाहून झाला. नीळकंठप्पा येईपर्यंत त्यानं आपण आखून ठेवलेला एक नकाशाही पुन्हा अभ्यासून त्यात काही सुधारणा केल्या. त्यानंतर तो तिथून बाहेर पडला.

रिक्षात बसून तिच्या घराच्या दिशेनं जाताना दोघांमधला ताण निवळून आपण पुन्हा तिच्या घरी जेवायला जात असल्याचा त्याला आनंद होत होता. आपल्याला कुठलंही उत्तर द्यायची संधी न देता यायला भाग पाडण्यातला तिचा चतुरपणा त्याला मोहवून गेला. ‘रास्कल!’ तो मनाशीच अत्यंत प्रेमानं उद्गारला. ‘हा रस्ता, हे प्राणिसंग्रहालयाजवळचं वळण, दूरवर दिसणारा ललितमहाल, उजवीकडची आकाशाशी संवाद करणारी चामुंडी टेकडी! किती दिवस झाले हे सगळं बघून?’ त्यानं आठवून पाहिलं. बरोबर आज तेरा दिवस झाले.

त्याच्या अपेक्षेप्रमाणे ती गेटपाशी उत्सुकतेनं त्याची वाट पाहत उभी होती. कानात लखलखणाऱ्या शुभ्र खड्यांच्या कुड्या आणि त्याहीपेक्षा अधिक तेजानं चमकणारा तिचा मृदू चेहरा! ‘तिच्यामध्ये क्रौर्य असणं केवळ अशक्य आहे.’ भुंकणाऱ्या कुत्र्यांना शांत करून दाराचा बोल्ट लावल्यालावल्या त्याला मिठी मारून त्याच्या छातीवर चेहरा ठेवून ती उसासली, “सोमू, आज तेरा वर्षं संपली.”

त्यालाही ते मनापासून पटलं. तिच्या केसांवरून हात फिरवत त्यानं तिच्याकडे पाहिलं, तेव्हा जेवण आणि झोप त्यागून ती सुकून गेल्याचं त्याला जाणवलं; पण तो त्या विषयी काहीच बोलला नाही. तीही काही बोलली नाही. तिनं त्याला बेसिनपाशी नेऊन हात धुवायला लावला. नंतर त्याला एका ताटात जेवायला वाढून तीही त्यातच जेवायला बसली. जेवण झाल्यावर त्याचा दंड धरून ती त्याला बेडरूममध्ये घेऊन गेली. त्याला कॉटवर बसवत तिनं विचारलं, “बघू, डी.डी. कसा असतो?” तिच्या डोळ्यांत बालसदृश उत्सुकता ओसंडत होती.

त्यानं ब्रीफकेस उघडून त्यातील प्लॅस्टिकच्या पाकिटात असलेला डिमांड ड्राफ्ट तिला काढून दाखवला. आश्चर्य आणि कुतूहलानं तिनं तो निरखून पाहिला आणि म्हणाली, "ओ हो! चेकसारखाच आहे हा! हां, थोडा फरक आहे इथं! दोन सह्या आहेत, मॅनेजर आणि अकाउंटंटच्या. किती मूर्ख मी! मला एवढंही ठाऊक नव्हतं बघ! ते प्लॅस्टिकचं पाकीट दे बघू!" म्हणत तिनं पाकिटात डी.डी. ठेवला आणि तो घेऊन ती दुसऱ्या खोलीत गेली. ती आली तेव्हा तिच्या हातात काहीच नव्हतं. नंतर त्याच्या शेजारी बसत तिनं विचारलं, "हा डी.डी. आपण ज्याचा त्याला परत पाठवला, तर बँकवाले त्यांना पैसे देतात ना?"

"हो..."

"तर मग..." म्हणत ती उठली. त्याच खोलीतल्या आपल्या टेबलावरचा एक कोरा कागद, पॅड, पेन त्याच्या हातात आणून देत म्हणाली, "आता यावर मी सांगते तो मजकूर लिही. 'प्रिय नवीन, मी विचारताच तू मला पैसे दिलेस, पण मी इथं येऊन पोहोचेपर्यंत एक चेक हाती आला. त्यामुळे मी डी.डी. माघारी पाठवत आहे. पुन्हा पैसे लागले, तर अवश्य लिहीन.' अथवा तुझ्या त्याच्या मैत्रीला कसं योग्य वाटेल तसं लिही. पण ते लिहून झाल्यावर माझ्याकडे दे. रजिस्टर्ड पोस्टानं पाठवून देईन."

ही असं काही करेल याची त्याला कणभरही शक्यता वाटली नव्हती. तिच्या आर्थिक परिस्थितीचीही त्याला पूर्णपणे कल्पना होती. 'अशा परिस्थितीत ही काय करू शकेल?' आपण बेसावधपणे एखाद्या सापळ्यात अडकल्यासारखं वाटून तो म्हणाला, "छे:! नको..." नाही म्हटलं तरी त्याचा स्वर रूक्ष झाला होता.

"का?" परिस्थिती संपूर्णपणे ताब्यात असलेल्या वकिलानं विचारावं तशा शांत स्वरात तिनं विचारलं.

"एवढ्या दूर जाऊन त्याच्याकडे शब्द टाकला. त्यानं तो झेलला. आता गावी येऊन असं पत्र लिहिलं, तर तो काय म्हणेल?"

"त्यानं काहीही म्हणू नये असं पत्र लिही म्हणूनच तुझ्या हातात लेटरपॅड दिलंय." ती म्हणाली.

"ते शक्य नाही."

"काय शक्य नाही? डी.डी. पाठवणं की माझ्याकडून पैसे घेणं?"

तिच्या प्रश्नाला स्पष्ट उत्तर देणं त्याला सुचलं नाही. तरीही पटकन विचार करत तो म्हणाला, "तुझ्या आर्थिक परिस्थितीची मला कल्पना आहे. या घराच्या दुरुस्ती आणि रंगरंगोटीसाठी मी तीस हजारांचा अंदाज दिला होता तेव्हा तू नको म्हटलं होतंस. त्यात इस्टेटीवरचं कर्ज आणि व्याज फेडताना तू किती वैतागली आहेस ते समजल्यापासून या बाबतीत मला काय करणं शक्य आहे या काळजीत मी आहे. अशा वेळी मला द्यायला तुझ्याकडे कुठं पैसा आहे?"

त्याच्या चेहऱ्यावर दृष्टी रोखून ती म्हणाली, “आपल्या दोघांमध्ये काहीही खोटेपणा नसावा, हे दोघांनीही मान्य केलंय. मला खरं सांग, तू मुंबईच्या पैशाला व्याज देणार आहेस की नाही?”

“हा व्यवहार आहे. त्यानं नको म्हटलं तरी मला दिलं पाहिजे.”

“तू पैशाची व्यवस्था करायला मुंबईला गेल्याचं कळल्यावर मला कसंतरी झालं. अशा वेळी माझा माझ्या सोमूला उपयोग नाही झाला, तर जगून काय फायदा? बँकेत चौकशी केली. हे घर गहाण ठेवून कर्ज द्यायला ते तयार झाले आहेत. त्याच दिवशी मी अर्ज देऊन आले. कालच त्यांनी कर्ज मंजूर झाल्याचं कळवलंय. तू नवीन शहाला जे व्याज देणार आहेस ते बँकेला दे. तू हे पैसे घेतलेच पाहिजेत. नाहीतर तू मनोमन आपला संबंध मानत नाहीस असंच मी समजेन.”

श्वासही घेता येऊ नये असा तो घुसमटला. तो तिच्याकडे पाहत होता. तिची दृष्टीही त्याच्या चेहऱ्यावर खिळली होती. चेहऱ्यावरची किंचित हालचालही तिची नजर टिपत होती. तो निर्धारानं म्हणाला, “प्रत्येक गोष्टीचा हट्ट धरायची तुला वाईट सवय आहे. प्रेम आणि व्यवहार एकमेकांत मिसळू नयेत. प्रेम हे शुद्धच राहिलं पाहिजे. तू हट्ट धरू नकोस. यानंतर आवश्यकता वाटेल तेव्हा सर्वप्रथम मी तुलाच विचारेन.”

काही क्षण शांततेत गेले. तिची तीक्ष्ण दृष्टी त्याच्या चेहऱ्यावर खिळलेलीच होती. नंतर ती ताडकन उठली. तरातरा खोलीबाहेर गेली. ती आली तेव्हा तिच्या हातात डी.डी.चं पाकीट होतं. प्रयत्नपूर्वक चेहरा शांत ठेवत ती तीव्रपणे म्हणाली, “हाता-पाया पडून प्रेम मिळत नाही. कुत्रीसारखा लोचटपणा केला, तर मैत्रीऐवजी तिरस्कारच वाट्याला येतो. आता मला स्पष्टपणे समजलं हे.”

त्यानं तिच्याकडे पाहिलं. तीही अशीच पाहत उभी होती. काही क्षण हे दृष्टियुद्ध चाललं. तिला एकाएकी आतून रडू फुटलं. तिनं ते आवरण्याचा आटोकाट प्रयत्न केला, तरी अनावर झालेलं रडू तिच्या चेहऱ्याच्या प्रत्येक स्नायूतून उमटलं. त्यातूनच तिच्या तोंडून शब्द उमटले, “तर मग माझ्या या जगण्याला काय अर्थ आहे? का रिव्हॉल्वर उडवून मी जीव देऊ नये?”

अश्रूंमध्ये भिजलेलं हे तिचं बोलणं हुंदक्यांनी तुकडे तुकडे करून जमिनीवर विखरून दिलं.

तो अवाक्षरही बोलला नाही. पॅड समोर ओढून त्यानं नवीनला पत्र लिहायला सुरुवात केली. मुंबईचे दिवस किती छान गेले हे लिहून त्यानं इंदूबेन, दिगंत आणि इतर मित्रांचं स्मरण केलं. अखेर इथंच पैशांची व्यवस्था झाली असून सोबत डी.डी. परत पाठवत असल्याचंही त्यानं लिहिलं. नव्या जागेच्या उद्घाटनासाठी इंदूबेन आणि दिगंतसह येण्याचं निमंत्रणही दिलं.

सही करून त्यानं पत्र तिच्या हातात दिलं. ती समोरच बसून होती. तिच्या हातातल्या एका मोठ्या कागदावर ब्ल्यू प्रिंट होती. डी.डी. आणि पत्र बाजूला ठेवून तिनं नकाशाचा कागद त्याच्यासमोर पसरला. ती म्हणाली, “एका अत्यंत प्रतिभावान आर्किटेक्टच्या ऑफिसचा नकाशा मी खूप डोकं लढवून तयार केला आहे. आता इथं मी आर्किटेक्ट आहे! यात काय बदल हवा, ते तू विचार करून सांग. त्याप्रमाणे बदल करून देईन. पण खोल्यांची रचना, फर्निचर, फाइल्स वगैरे ठेवायची शेल्फ वगैरे सगळं मी ठरवणार आहे. कुठं प्लायवूड

वापरायचं, कुठं अपारदर्शक काच वापरायची, सोफा कसला घ्यायचा, तो कुठं ठेवायचा... मी दुकानांत फिरून सगळं ठरवून आले.”

नकळत त्याचा चेहरा फुलून गेला. ‘किती कमी अवधीत तिनं केवढा विचार केलाय?’ तो मनोमन तिच्याशी एकरूप होऊन तिचं बोलणं ऐकू लागला.

ती पुढं सांगू लागली, “ही तुझी चेंबर एअरटाइट करायला पाहिजे. साउंडप्रूफ आणि वातानुकूलित. हे तुझं टेबल. इथं डावीकडे फोनची जागा. फोन वाजल्यावर आधी तू उचलायला पाहिजे. असिस्टंटने नव्हे! तू तुझ्या चेंबरमधून कुणाशीही बोलत असलास, तरी ते कुणालाही ऐकू जाता कामा नये. तू नसताना असिस्टंटनं फोन उचलायचा. समजलं?”

“हो.” तो उत्तरला.

“काय समजलं? शहाणाच आहेस!” त्याची थट्टा करत हसत तिनं भिंतीवरच्या घड्याळाकडे पाहिलं. “सव्वातीन वाजले. चल, बँकेत जाऊ या. पैसे ट्रान्स्फर करायला सांगू या. तसंच नवीन शहाचा डी.डी. परत पाठवू या. उद्या जागेच्या मालकांशी संपर्क साधून रजिस्टर करायची तारीख निश्चित कर. दुसऱ्याच दिवसापासून आतली कामं सुरू व्हायला पाहिजेत. मी रोज दोन वेळा तिथं जाऊन चौकशी करून येईन. समजलं ना? मी आर्किटेक्ट! किती पर्सेंटेज मला देणार?!”

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे ‘साडेबारा वाजता जेवायला ये’ म्हणून तिनं सांगितलं नाही; पण तो आला तेव्हा ती दोन ताटं वाढून वाट पाहत होती. दोघंही एकमेकांकडे बघून हसले. जेवताना तिनं विचारलं, “मुंबईला गेला होतास ना? मला काय आणलंस?”

“तुला? पुस्तकाच्या दुकानात गेलो होतो मी. काही चित्रकलेची, तत्त्वज्ञानावरची, मानसशास्त्र, कादंबरी-काव्यसंग्रह... तीसेक पुस्तकं विकत घेतली आहेत. येताना विमान-प्रवासात एवढं ओझं आणणं शक्य नव्हतं म्हणून ट्रकनं पाठवायला नवीनला सांगून आलोय. तूच ते पॅक सोडून पाहशील.”

“पुस्तकं निवडताना खरोखरच माझी आठवण झाली?”

“मुंबईच्या जवळ जाताना मन मैसूरकडे ओढू लागलं. मैसूर म्हणजे तू. नाहीतर मुंबईमध्ये राहिलो असतो. नवीनही म्हणत होता. इथंच राहा. भरपूर काम आहे म्हणून.”

“मग राहायचं तिथंच!”

“खरं सांग बघू!” तिच्या दृष्टीत दृष्टी मिसळून त्यानं विचारलं.

तिची दृष्टी त्याच्या पावलांकडे वळली आणि ती म्हणाली, “तुला आवडतं म्हणून कॉलेजहून आल्या आल्या मी एवढं भेंडीचं गोज्जु केलं. तू तर त्याला अजून बोटही लावलं नाहीस.”

त्याच्या नवीन ऑफिसची रचना, सुखसोयी, अलंकरण सगळं तिच्या इच्छेप्रमाणे चाललं

होतं. प्रत्येक वस्तूची गुणवत्ता, रंगसंगती, फर्निचरची जागा, सोफ्याची जागा, आत उजेड यायची जागा, दिव्याचं स्वरूप, त्यांच्या जागा प्रत्येक गोष्टीमध्ये ती स्वत: जातीनं लक्ष घालत होती. त्याच्या चेंबरचा तर प्रत्येक कोपरा कसा असला पाहिजे त्या विषयी तिचे निश्चित विचार ठरले होते. वायर कशी घ्यायची, हेही ती इलेक्ट्रिशियन्सना सांगत होती. त्याच्या व्हिजिटिंग कार्डचं डिझाईनही तिनं व्यवस्थित ठरवलं होतं. विकासच्या बारशाच्या वेळी जेवणाची जबाबदारी स्वीकारलेल्या सूर्यनारायणप्पा आणि धार्मिक विधी केलेल्या यज्ञेश जोईसांवर तिनं जबाबदारी टाकली होती. सकाळी गृहप्रवेशाचा धार्मिक विधी, दुपारी अगदी नजीकच्या लोकांना जेवण आणि रात्री व्यवहाराशी संबंधितांना भक्कम रिसेप्शन आणि पानसुपारी! जेवणाचा आणि रिसेप्शनचा मेनू ठरवतानाही तिनं खूप विचार केला होता.

सकाळी यज्ञेश जोईसांनी होमहवन आणि गृहपूजा केली तेव्हा ती तिथंच होती. नव्या वास्तूची यजमानीण असल्यासारखी उत्साहानं जोईसांना आणि सूर्यनाराणप्पाला काय हवं, काय नको ते पाहत उत्साहात वावरत होती. त्यांना तिनं केळी, चिकू, द्राक्षं आणि नारळ काढून दिले. सुगंधी सुपारी देणं, नैवेद्याचं ताट वाढून देणं, जोईसांना वस्त्र आणि दक्षिणा देणं, दारा-खिडक्यांना गजरे गुंफणं यात ती गढून गेलेली दिसत होती. दक्षिणा घेतल्यावर जोईस जायला निघाले. त्यांना तिथून आणखी कुठंतरी जायचं होतं. त्यांना सोडून येण्यासाठी ती कार घेऊन बाहेर पडली. सोमशेखर हे सगळं पाहत उभा होता. त्याला कल्पनाही करता आली नव्हती, एवढ्या समर्थपणे आणि आपुलकीनं तिच्या हालचाली चालल्या होत्या. मध्ये बोललं तर तिच्या कामात घोटाळा होईल म्हणून तो तिला डिस्टर्ब करू इच्छित नव्हता. एखाद्या स्त्रीच्या उपस्थितीमुळे अशा प्रकारच्या कार्यक्रमाची शोभा कशी वाढते, हेही तो अनुभवत होता.

जेवायची व्यवस्था साडेबारा वाजता करण्यात आली होती, पण अकरा वाजता जोईसांना पोहोचवायला म्हणून गेलेली अमृता साडेबारा वाजून गेले, तरी परतली नव्हती.

जेवण्यासाठी बोलावलेली माणसं एकेक करून येऊ लागली. सूर्यनारायणप्पाही कुणी सामान काढून देईपर्यंत अडून बसणाऱ्यांपैकी नव्हता. आलेल्यांशी हसतमुखानं स्वागत करून दोन-चार वाक्यं बोलून त्यांना मांडवात बसवायचं काम सोमशेखरचं होतं. आमंत्रितांची यादी करताना नीळकंठप्पाही असल्यामुळे नंतर सगळं नीळकंठप्पा बघून घेत होते; पण अमृताचा पत्ता नव्हता. 'कुठं अडकून पडली म्हणायची ही?' साडेबारा वाजून दहा मिनिटं झाली. एवढ्यात त्यानं सात-आठ वेळा रिस्टवॉच पाहिलं. त्याच वेळी नीळकंठप्पा जवळ येऊन म्हणाले, "एक पंगत भरेल एवढी माणसं जमली आहेत सर. उगीच का वेळ घालवायचा? आलेल्यांना जेवायला वाढू या. म्हणजे नंतर येतील त्यांच्यासाठी खुर्च्या रिकाम्या होतील."

काय सांगावं ते न समजून सोमशेखर गडबडला. आतापर्यंत या कार्यक्रमाच्या बाबतीतले सगळे निर्णय तिनंच घेतले होते. त्यामुळे स्वतंत्र निर्णय देण्याचं त्याला काही सुचलं नाही. 'आता आपण परवानगी दिली आणि पाच मिनिटांनी येऊन ती "अमुक व्हायचं होतं. का घाई केलीत?" म्हणाली तर?' त्यानं आणखी एकदा घड्याळात बघून सांगितलं, "आणखी पाच मिनिटं वाट बघू."

पण त्या पाच मिनिटांत आणखी दहा-पंधरा माणसं आली आणि सूर्यनारायणप्पानंही एक पंगत वाढायला सांगितली. त्याचाही नाइलाज झाला आणि तो प्रत्येक समूहाकडे जाऊन

जेवायची विनंती करू लागला. नीळकंठप्पा ठरल्याप्रमाणे सगळ्यांची नीट व्यवस्था होतेय की नाही ते पाहू लागले.

पंगत जेवायला बसली, तरी सोमशेखरचं सगळं लक्ष बाहेरच होतं. चार-पाच वेळा त्यानं बाहेर डोकावून कुठं कार दिसते का ते पाहिलं. जिना उतरून तिथल्या औषधाच्या दुकानातून तिच्या घरी फोन केला; पण कुणी उचलला नाही. ती शक्यताही नव्हती म्हणा! त्या वेळी घरात कोण असणार? डिरेक्टरीतला मुलांच्या शाळेचा नंबर फिरवून चौकशी केली तेव्हा मुलं तिथंच आहेत, त्यांच्या आई आल्या नाहीत असं उत्तर मिळालं. पुन्हा घरी फोन केला तरी कुणी उचलला नाही. 'कुठं गेली म्हणायचं ही? अशी कशी गेली? एका रिक्षात बसवून जोईसांना पाठवून द्यायचं. अशा घाईच्या वेळी हिनं का निघून जायचं?' तो चिडलाच. अस्वस्थही झाला.

जिना चढून वर येताना त्याच्या मनात आलं, 'घरात असून तिनं फोन उचलला नसेल काय? पण असं कशाला करेल ती? सगळं तिनंच पुढाकार घेऊन केलं. नाहीतर-नाहीतर मी एवढा थोरला पसारा मांडलाच नसता. गाडी घेऊन गेलीये. रस्त्यात काही बरं-वाईट तर घडलं नसेल? हे ट्रकवाले म्हणजे... छे:! ती अगदी सावधपणे आणि सफाईनं गाडी चालवते.' त्याच्या मनानंच समाधान केलं.

पहिली पंगत उठली. पानसुपारी देईपर्यंत दुसऱ्या पंगतीला पुरतील एवढी माणसं आली. त्यांना जेवायला बसवल्यानंतर नीळकंठप्पांनी जवळ येऊन विचारलं, "सर, मॅडम कुठं दिसत नाहीत. त्यांनी बायकांशी बोलून जेवायला बसवलं असतं, तर बरं झालं असतं."

जागेचं रजिस्ट्रेशन झाल्यापासून आतापर्यंत सगळं तिनंच ठरवलं होतं. तिनंच त्याला सगळ्या सूचना दिल्या होत्या. त्यामुळे त्यांचा प्रश्न अगदी स्वाभाविक होता. काय उत्तर द्यावं ते समजून तो म्हणाला, "कुणी गेस्ट येणार होते म्हणून आणायला जाणार होत्या." एवढ्यात आलेल्यांपैकी एकानं, "ब्यूटिफुल जागा आहे. काय काम झालंय आतलं! अभिनंदन!" म्हणत शेकहँड केल्यामुळे तो विषय आपोआपच मागं पडला.

दुसरी पंगत उरकत आली तेव्हा मात्र त्यानं नीळकंठप्पांना बोलावून सांगितलं, "बहुतेक सगळे आले ना? कुणी राहिलं तर बोलावून जेवायला बसवा. मी येतोच दहा मिनिटांत." म्हणत त्यानं स्कूटर बाहेर काढली. प्राणिसंग्रहालयाजवळच्या वळणापाशी येताना ती सतत मनात भरून राहिल्याची भावना त्याला तीव्रपणे जाणवली. जवळजवळ दररोज ती सांगत होती, "त्या वळणापाशी जाताना जपून जा. तू हॉर्न वाजवलास, तरी पलीकडच्यांना ऐकू येत नाही. कुणीही काटेकोर नियमांप्रमाणे डावीकडून येत नाही. जपून जा."

तिचा हा सावधगिरीचा इशारा त्याच्या अंतर्मनात इतक्या खोलवर बसला होता की, ती जागा अर्ध्या मैलावर असतानाच तो आपोआप सावध होत होता. ते वळण संपल्यावर वेग वाढवून तो तिच्या घरी पोहोचला तेव्हा गेटला कुलूप होतं. त्याला पाहताच कुत्री ओळख दाखवून भुंकली. त्यांना आपली ओळख देताना त्याचं मन 'ती कुठं गेली असेल?' या विचारात बुडून गेलं. 'कॉलेजमध्ये? पण कॉलेज अकरा वाजता संपतं.' त्याच बिल्डिंगमध्ये दुसरं कॉलेज सुरू होतं. सकाळी नाश्ता झाला असला, तरी आता त्याला भूक जाणवत होती. काय करावं ते त्याला सुचत नव्हतं. माघारी जायचा उत्साहही राहिला नव्हता. खिडकीतून आत डोकावू नये.

तसं करणं त्याला हीनपणाचं वाटलं.

त्याला घरी आपल्या निमंत्रणानुसार जेवायला आलेल्या पाहुण्यांची प्रकर्षानं आठवण झाली. त्यानं स्कूटर सुरू करताच कुत्री भुंकू लागली. रस्ताभर त्याला आठवत होतं. 'सकाळी मुलांना शाळेत सोडून ती थेट समारंभासाठी आली होती. कॉलेजमधून तिनं रजा काढली होती. या समारंभासाठी म्हणून मुद्दाम घेतलेली भारी सिल्कची साडी नेसून ती भरपूर उत्साहानं वावरत होती. होय. पण... आठवलं. होम चालला होता तेव्हा मात्र तिचा उत्साह कमी दिसत होता. चेहरा त्या वेळी विलक्षण गंभीर होता. असं का व्हावं?' त्याला उत्तर सुचलं नाही.

तो येऊन पोहोचला तेव्हा कितीतरी माणसं जेवून गेली होती. नीळकंठप्पा त्यांना निरोप देत होते. आता यानंतर कुणीही यायचं राहिलं नव्हतं. स्वयंपाकाची माणसं संध्याकाळच्या रिसेप्शनच्या तयारीला लागली होती. नीळकंठप्पांनी विचारलं, "सर, आपणही जेवण उरकू या?"

सोमशेखरला हा विचार मुळीच पटला नाही. 'अजून ती जेवली नाही. जेवायच्या वेळी मुलांना घेऊन यायचं असं आठवड्यापूर्वीच ठरलं होतं. आता मुलांना आणणं लांब राहिलं, ही स्वत:च कुठंतरी निघून गेली आहे! ती घरात नाही, म्हणजे ती जेवली नाही.' अशा परिस्थितीत तिनंच आयोजित केलेल्या जेवणातला कणही गिळणं अशक्य असल्याचा निर्वाळा त्याच्या मनानं दिला.

त्यानं सांगितलं, "तुम्ही जेवून घ्या. माझं पोट तितकंसं बरं नाही. म्हणून डॉक्टरांकडे जाऊन आलो. त्यांनी फक्त ताक घ्या म्हणून सांगितलं. तेवढं ग्लासभर ताक मला पाठवून द्या."

"आज शास्त्र म्हणून दोन घास गोड...."

"पण डॉक्टरांनी नको म्हणून सांगितलंय. रात्री बघू. बरं वाटलं, तर तेव्हा खाईन."

निरुपायानं नीळकंठप्पा त्याला ताक देऊन जेवायला बसले. दुसऱ्या पंक्तीला त्यांच्या घरातली बाकीची मंडळी जेवली होती. त्यानं नीळकंठप्पांना विशेष आग्रह करून वाढलं. तेवढ्याच श्रमानं थकून तो खुर्चीवर बसून राहिला.

संध्याकाळी पाच वाजता रिसेप्शनची माणसं यायला सुरुवात होणार होती. तिनं काही कॅसेट्स मंद आवाजात लावण्यासाठी निवडून ठेवल्या होत्या. तिनं त्याच्यासाठी मुद्दाम सूट शिवून ठेवला होता. नीळकंठप्पांसाठीही पँट-बुटशर्ट शिवला होता. तो त्यांना घालायला लावून स्वत: त्यानं नवा सूट चढवून आलेल्या पाहुण्यांचं आत्मविश्वासपूर्ण स्मितानं शेकहँड करत स्वागत करायचं, हेही तिनं ठरवून ठेवलं होतं. शिवाय निरोपाच्या वेळी सगळ्यांना गुलाबाचं फूल, नारळ आणि त्याबरोबर नव्या पत्त्याचं व्हिजिटिंग कार्ड असलेली प्लॅस्टिकची पिशवी द्यायची होती. व्यावसायिक समारंभातला हाच भाग महत्त्वाचा! आता ती तर नव्हतीच. 'सूट चढवून हसतमुखानं...' त्याचा सगळा उत्साहच ओसरून गेला होता. सगळीच जबाबदारी नीळकंठप्पांवर टाकून आपणही निघून जावं असं कितीही तीव्रपणे वाटलं, तरी तो एक

व्यावहारिक दृष्टीनं गुन्हा ठरला असता, हेही त्याला समजत होतं. नीळकंठप्पांना कपडे बदलून यायला सांगून तो स्वत:ही तिथून बाहेर पडला.

हँगरवरचा नवा सूट-शर्ट त्यानं हातात घेतला, तरी तो घालावंसं त्याला वाटलं नाही. वापरातलाच एखादा बरा दिसणारा शर्ट-पँट घालण्याच्या दृष्टीनं त्यानं पाहिलं, तर बरेच कपडे त्यानं स्वत:च लाँड्रीला दिले होते. शेवटी धोब्याकडचे कपडे आणून त्यातल्या त्यात बरा वाटणारा एक बुशशर्ट आणि पँट बदलून तो पुन्हा ऑफिसमध्ये गेला तेव्हा त्याचं मन 'कुणाला पाहिजे होतं हे नवं ऑफिस!' या विचारानं विटून गेलं होतं. वर चढण्याआधी त्यानं पुन्हा औषधाच्या दुकानातून फोन केला. कुणीही फोन उचलत नव्हतं. शाळेची वेळ संपून गेल्यामुळे तिथं फोन करायचा प्रश्नच नव्हता. रिसेप्शनचा कार्यक्रमही संपला. यायची सगळी मंडळी येऊन गेली असली, तरी बराच शिरा, उडीदवडे, सामोसे आणि फ्रूटसॅलड शिल्लक राहिलं होतं. त्यातलं कणभरही तोंडात न घालता सगळं अन्न नीळकंठप्पांना घरी न्यायला किंवा कामं केलेल्यांमध्ये वाटून टाकायला सांगून रिकाम्या पोटी तो घरी जायला निघाला. घरी पोहोचला तेव्हा दहा वाजून गेले होते. दिवसभर हसतमुखानं वावरणं, प्रत्येकाशी शेकहँड करणं, औपचारिक गप्पा मारणं, त्यात पोट भुकेमुळे खपाटीला गेलेलं! तो पराकोटीचा थकून गेला होता. त्याहून त्याला जाणवत होता तो एकटेपणा. दोन भांडी पाणी पिताना वाटत होतं, 'ती आपल्याला जाणूनबुजून एकटं टाकून गेली. ती आपल्या जीवनोल्हासाचा मूलस्रोत आहे. ती नसताना कितीही थाटमाट केला तरी व्यर्थ आहे!

'पण असं का वागली ती? तो पराकोटीचा संतापला. आपण नसताना हा जेवणार नाही. जेवू शकणार नाही हे तिला ठाऊक नाही काय? ठाऊक असूनही ही अशी वागली असेल काय? स्वत:चा पैसा ओतून, गेल्या दीड महिन्यामध्ये एका दिवसाचीही विश्रांती न घेता अंत:करण ओतून ती राबली आणि आताच अशी का...?' त्यानं पुन्हा एकदा फोन करायचा विचार केला; 'पण घरात फोन नाही. कुठून तरी फोन करत बसण्यापेक्षा प्रत्यक्ष का जाऊन येऊ नये?' शरीर थकलं असलं तरी तो उठला. घराला कुलूप लावून तो स्कूटर घेऊन बाहेर पडला तेव्हा सव्वा अकरा वाजले होते. रस्त्यावरचे दिवे असले, तरी आकाशातला अंधार गोठून गेला होता. त्यात मधूनच चमकणाऱ्या ताऱ्यांमुळे त्या अंधाराचा दाटपणा आणखी जाणवत होता. थंडगार वाऱ्यामुळे त्याला थोडं बरं वाटलं. उजवीकडे कुक्करहळ्ळीचं तळं मागं टाकून देवराज अरस रस्त्यावरच्या नव्या ऑफिससमोरून तो प्राणिसंग्रहालयाजवळच्या वळणापाशी आला तेव्हा त्याच्या स्कूटरचा वेग आपोआप कमी झाला. रात्रीची वेळ असल्यानं गर्दी नसली तरीही!

'किती निर्जन प्रदेश आहे हा? स्वत:चं घर आहे म्हणून असं एकटीनं राहणं अगदी अयोग्य आहे! तिचं घर फर्लांग दीड फर्लांग असताना त्याला कारचे दिवे दिसले. कंपाउंडमधून बाहेर पडणारी कार... होय. तिचंच घर ते.' त्यानं स्कूटरचा वेग कमी केला. कार वेगानं चालली होती. टेकडीच्या दिशेनं. त्यानंही वेग वाढवला. स्कूटरच्या उजेडात तिची जुनी फियाट कार दिसली. विटलेल्या साडीसारखा पिवळट रंग आणि तीच नंबरची पाटी. 'कुठं चाललीये ही? आणखी कुठं जाणार? टेकडीचाच रस्ता आहे हा. मुलांना सोबत घेऊन... अहं! अशा मध्यरात्री मुलांना गावाबाहेरच्या निर्जन घरात टाकून एकटीच निघालीये.' त्यानं आणखी वेग वाढवला. तिनं मागं वळून पाहिलं. स्कूटरकडे लक्ष जाऊन तिनं वेग वाढवला. 'तिला कदाचित ओळख

पटली नसेल.' कारच्या वेगापुढं स्कूटर मागं पडणं साहजिकच होतं.

पुढं ललितमहालापाशी रस्ते दुभंगले तेव्हा तो मुद्दामच डावीकडे वळला. ती टेकडीच्या रस्त्यानं थोडं अंतर पुढं गेल्यावर तो पुन्हा कारच्या मागोमाग गेला. त्याचं मन कुतूहलानं भरलं होतं. भूक आणि दमणुकीचा मागमूसही राहिला नव्हता. आता मात्र तिच्याशी चुकामूक होण्याचा संभव नव्हता. 'एव्हाना ती देवळापर्यंत पोहोचली असेल' असं मनात येत असतानाच 'डावीकडच्या एका वळणावर... होय... तिचीच कार! स्टिअरिंग धरून नुसतीच बसून राहिली आहे. इंजिन आणि सगळे दिवे बंद करून!'

ती इतक्या लवकर सापडली याबद्दल त्याच्या मनात आनंद, कृतज्ञतेची भावना दाटून आली. ती बसलेल्या दारापाशी स्कूटर नेऊन तिचं इंजिन बंद न करता त्यानं उद्विग्न स्वरात विचारलं, "काय हे? इथं एकटीच का आलीस? सकाळी जोईसांना पोहोचवायला म्हणून बाहेर पडलीस ती कुठं गेलीस?"

स्कूटरचा दिवा जळत होता. तिथल्या नीरव शांततेत लयबद्ध आवाज ऐकू येत होता. ती काही बोलली नाही. तिनं त्याच्याकडे मानही वळवली नाही. त्याच्या बोलण्यातलं अवाक्षरही ऐकू आलं नसावं तशी बसून होती. संपूर्ण वातावरणाशी कसलाही संबंध नसल्यासारखी! एखाद्या जडशीळ प्रतिमेसारखी!

त्यानं पुन्हा विचारलं, "असं एकटीनं अपरात्री इथं येणं धोक्याचं आहे. ठाऊक नाही?"

हे बोलणंही तिच्यापर्यंत पोहोचलं नसावं. काही क्षण वाट पाहून त्यानं स्कूटर थांबवली. ती स्टँडवर चढवून तो कारपाशी आला आणि खिडकीतून हात घालून त्यानं आतला दिवा लावला. त्या उजेडात तिच्या डाव्या हातापाशी असलेलं रिव्हॉल्वर दिसलं. तो पुन्हा म्हणाला, "हातात रिव्हॉल्वर असलं, तरीही या वेळी इथं एकटीनं येणं योग्य नाही."

तेही तिला ऐकू गेलं नाही. दिव्याच्या उजेडात तिचा चेहरा त्याला दिसला. मृतप्राय चेहरा! तिचा उजवा दंड धरून हलवत त्यानं हाक मारली, "अमृता, ए अमृता, ऐकू आलं का?"

तिनं सावकाश त्याच्याकडे चेहरा वळवला. दृष्टीही निर्जीव होती. ती म्हणाली, "रात्रीच्या वेळी एकटी स्त्री प्रवास करताना कुठलाही सभ्य पुरुष पाठलाग करत नाही. दुसरीकडे गेल्यासारखं दाखवून मागोमाग येत नाही. का आलात तुम्ही इथं?"

"तुला शोधत आलो."

ती पुन्हा काही बोलली नाही. चेहऱ्यावरचे भाव तसेच होते. तिनं मान वळवली. तिचं आदरार्थी संबोधन ऐकून तिच्या संतापाची त्याला कल्पना आली होती. सकाळपासूनच ती शून्य भावात बुडून गेली होती, हेही त्याच्या लक्षात आलं होतं. त्या शून्य भावाचा भेद करून आत प्रवेश करायचा निर्धार करून त्यानं विचारलं, "बोल ना! एवढ्या उशिरा इथं का आलीस?"

ती काहीही बोलली नाही. हात उचलून तिनं दिवा बंद केला. पुन्हा अंधार पसरला. त्यानं

पुन्हा विचारलं, “सांग, आधी मला उत्तर दे!”

“का? तुम्हाला काय अधिकार आहे?” अंधारात बोलायला सोपं असल्याप्रमाणे तिनं विचारलं.

“म्हणजे? प्रेमाचा अधिकार आहे. मी सोमू आहे.”

“मिस्टर सोमशेखर, आता या कल्पनेतल्या गप्पा पुरेत. तुमचा माझ्यावर कुठलाही हक्क नाही आणि माझा तुमच्यावर. वस्तुस्थिती समजून घ्यायला मागं-पुढं बघू नका. तुमचे डावपेच माझ्यापुढे चालणार नाहीत.”

“काय बोलतेस हे? आपण एकमेकांवर प्रेम करतोय, हे खोटं आहे?” त्यानं असहायपणे विचारलं.

“मी तुमच्यावर प्रेम करते हे तर खोटं आहे. आजवर मी त्या भ्रमात होते. आता भ्रमनिरास होऊन सत्य समजतंय. तुमची अजूनही भ्रमातच वावरायची इच्छा असेल, तर तुमची मर्जी! स्कूटर बाजूला घ्या, नाहीतर...” म्हणत तिनं इंजिन सुरू करून पुढचा फ्लडलाइट लावला.

त्याला कुणीतरी पायाखालची जमीन खेचून घ्यावी तसं झालं होतं. डोकं गरगरल्यासारखं होऊन त्यानं कारच्या खिडकीचा आधार घेतला. अखेर त्यानं तिथंच जमिनीवर बसकण मारली.

काही वेळ तसाच गेला. तिनं कारचं इंजिन बंद केलं होतं. दिवे विझले होते. उठून उभं राहावंसंही त्याला वाटेना. अंधारातूनच पुन्हा तिचा आवाज ऐकू आला, “सोमशेखर, वस्तुस्थिती जाणून घ्यायची मला काळजी नाही, पण सहानुभूती मिळवण्यासाठी असली नाटकं करणाऱ्यांची मात्र मला किळस येते.”

‘क्रौर्य एवढं निर्दय असू शकतं?’ तो प्रचंड संतापला. त्या भरातच उठून उभा राहत तो म्हणाला, “तोंड आहे म्हणून काहीही बडबडू नकोस. माझ्या हृदयात काय आहे ते जाणून घ्यायची लायकी नाही तुझी!”

“काय आहे त्यात?” तिनं उपेक्षित शांतपणे विचारलं.

“प्रेम! तुला कल्पनाही करणं अशक्य आहे एवढं प्रेम!”

“उत्तम!” थंडपणे एक शब्द उच्चारून ती पुन्हा शांत झाली. काही क्षण शांततेत गेले. त्यानंतर तिनं तेवढ्याच थंडपणे विचारलं, “ते सिद्ध करता येईल तुम्हाला?”

त्या प्रश्नानं त्याला काडीचा आधार मिळाल्यासारखंच झालं. तो म्हणाला, “सिद्ध करायचं म्हणजे काय? हृदय फाडून दाखवू मारुतीसारखं? मी थट्टा करत नाही आहे. कसं दाखवू मी?”

अंधारात काही क्षण पुन्हा शांततेत गेले. तो तिच्या उत्तराची वाट पाहत होता. अंधारातच ती

शांत आणि दृढ स्वरात म्हणाली, “त्यासाठी एक मार्ग आहे. त्यामुळे तुमचं बोलणं किती काल्पनिक आहे ते सिद्ध होईल.”

“काय?”

“तयारी आहे तुमची?”

“आहे. तुझी शपथ! तुझ्यापेक्षा अधिक जवळचं मला कुणीही नाही.” तो उत्कटतेनं म्हणाला.

तिनं आतला दिवा लावला. त्या उजेडात त्याचे डोळे दिपले. पण तिच्या डोळ्यांना अंधार आणि उजेडातला कुठला भेद जाणवला नसावा. आपल्या डाव्या हाताशी असलेलं रिव्हॉल्वर उचलून तिनं त्याच्याकडे देत सांगितलं, “हे घ्या. असा नेम धरा.” नळी तिच्या कानशिलावर टेकली होती. “आणखी काहीही करायची गरज नाही. फक्त ट्रिगर ओढा. बस्स!” म्हणत तिनं डोळे मिटून घेतले.

त्याचं सर्वांग घामानं थबथबलं. त्याच्या सर्वांगाला सूक्ष्म कंप सुटला. कॉलेजमध्ये एन.सी.सी.मध्ये असताना त्यानं बंदुकीबरोबरच एल.एम.जी. आणि आर.एम.जी. हाताळले होते. रिव्हॉल्वरच्या ट्रिगरला चुकून बोट लागलं, तरी गोळी उडेल हे त्याला ठाऊक होतं. त्यानं पटकन नळीचं तोंड आकाशाकडे केलं. काही क्षण स्तब्धतेत गेले. त्याच्याकडे न पाहता ती म्हणाली, “झालं सिद्ध करून?”

“तू मूर्खासारखी बडबडलीस म्हणून मी तसा वागणार नाही.” तो संतापानं म्हणाला.

“तुम्ही मूर्ख म्हटलं म्हणून कुणी मूर्ख ठरत नाही आणि तुमच्या सर्टिफिकेटनं कुणी शहाणं ठरत नाही. तुमचा शब्द तुम्हाला पाळता आला नाही. तुमचं प्रेम म्हणजे शुद्ध नाटक आहे. यावर आणखी एक पर्याय सांगते. ऐकाल?”

“काय? आधी सांग.”

“तुम्हाला पटलं तर अनुग्रह करा म्हणून मी काही भीक मागत नाही. तुमचं प्रेम सिद्ध करायची संधी देतेय.”

“काय ते सांग तरी!”

“रिव्हॉल्वरची नळी तुमच्या कानशिलावर ठेवून ट्रिगर ओढा. मागं कितीतरी वेळा प्रेमासाठी जीव देईन म्हणून सांगितलंय ना? ते तरी आता सिद्ध करून दाखवा.”

“हे शक्य आहे.” त्याला खरोखरच तिला मारण्यापेक्षा हा मार्ग सोपा वाटला.

“नुसतं शक्य आहे म्हणून सांगू नका. करून दाखवा.”

एव्हाना तो पूर्णपणे भानावर आला होता. तो म्हणाला, “दाखवलं तरी तुला त्याचं काय?”

“काही नाही. तुमचं प्रेम म्हणजे नाटक आहे. देखण्या, सुशिक्षित स्त्रीशी मजा मारताना – तेही कुठलीही जबाबदारी न घेता – स्फुरलेली भुक्कड कविता आहे, हेच मला दाखवून द्यायचं आहे.”

“मी जीव गमावल्यावरच तुझा माझ्या प्रेमाच्या सत्यतेवर विश्वास बसणार आहे? माझं प्रेम खरं आहे आणि ते मी स्वत: जगून आणि तुलाही जगायला लावून दाखवून देईन. या मरण्या-मारून घेण्याच्या मूर्खपणातून नव्हे. जर तुला मला ठार मारायचं असेल तर हे घे. मी कणभरही हलणार नाही.” म्हणत त्यानं तिच्या मांडीवर रिव्हॉल्वर ठेवलं आणि मूर्तीसारखा उभा राहिला.

“पण तुमची मरायची इच्छा कुठं आहे?” पुन्हा तिनं त्याच्यावर दोष लादला. पण आता तो पूर्णपणे सावध होता. तो म्हणाला, “खरं आहे. मला जगायचं आहे आणि तुझ्याबरोबर जगायचं आहे. मला मारायची तुझी इच्छा असेल, तर जरूर मार. पण थांब, त्या आधी एका कागदावर लिहून ठेवतो, माझ्या मृत्यूला मीच जबाबदार आहे म्हणून.”

“जगायची इच्छा असणाऱ्याला ठार मारण्याइतकी मी क्रूर नाही. तुम्ही मात्र मरायची इच्छा असताना मला मरू देत नाही. लोक कदाचित तुमच्या बोलण्याचं कौतुक करतील; पण माझं दु:ख, माझ्या बोलण्यातलं सत्य कुणालाही समजत नाही. तुमच्याइतका क्रूर माणूस सगळ्या जगात नाही. त्या बिचाऱ्या देवालाही तुमचा क्रूरपणा समजत नाही.” भावनावेगानं तिनं खिडकीवर कपाळ आपटलं. त्यानं तिला आवरण्यासाठी हात पुढं केले. पाठोपाठ त्याला तिच्या मांडीवर रिव्हॉल्वर असलेलं आठवलं. त्यानं रिव्हॉल्वरकडे हात नेला.

ती किंचाळली, “त्याला हात लावाल तर खबरदार!”

त्यानं दचकून हात मागं घेतला. तिनं चटकन दिवा बंद केला, इंजिन स्टार्ट करून गाडी मागं घेतली. तो घाबरून पाऊलभर मागं सरला. तिनं सराईतपणे त्या अंधारात गाडी मागं वळवली आणि रस्त्यावरून वेगात तिची गाडी टेकडीखाली धावू लागली. काही मिनिटांतच त्या मध्यरात्रीच्या नीरवतेतही ऐकू येणार नाही एवढ्या लांब कार निघून गेली होती.

‘इथून कुठं गेली म्हणायची ही? घरी? की आणखी कुठं?’ अधिक विचार करायची शक्ती आता त्याच्या मेंदूत राहिली नव्हती. स्वत:चा पुढं केलेला हातही दिसणार नाही असा अंधार सभोवताली पसरला होता. अशा मध्यरात्री रिव्हॉल्वर घेऊन ती निर्जन टेकडीवर आली होती. ‘इथं रिव्हॉल्वरचा आवाज तरी कुणाला ऐकू जाणार? फक्त भोवतालच्या पक्ष्यांना, किड्या-मुंग्यांना, ससे-सरड्यांना. असली कसली ही मरून जायची इच्छा?’ तिच्यासाठी त्याचा जीव तळमळून उठला. ‘आतातरी घरी जाऊन तिनं स्वत:वर....’ त्याचं मन भयभीत झालं. ‘नाही. ती घरात काही करणार नाही. मुलांना जाग येईल, ती घाबरतील वगैरे विचार नक्की तिच्या डोक्यात असणार. मग आणखी कुठंतरी... पण स्कूटरवरून तिला कुठं शोधायचं आणि ती सापडली तरी काय करणं शक्य आहे. जबरदस्तीनं रिव्हॉल्वर ओढून घ्यायचं म्हणजे त्यात धोका आहे. ती ज्या वेगानं गेली त्यावरून तिला स्कूटरवरून गाठणंही अशक्य आहे.’

एव्हाना त्याचे डोळे अंधाराला सरावले होते. रस्त्याच्या कडेला एक मोठा दगड दिसला. तो त्यावर जाऊन बसला. काही क्षणांनंतर त्याचा जीव थोडा सावरल्यासारखा झाला. शरीरानं सात-आठ वेळा श्वास ओढून घेतला. श्वासापाठोपाठ नि:श्वास सोडताना त्याला तिथं, त्या क्षणी कोसळून जीव जाईलसं वाटलं. त्यानं पुन्हा जाणीवपूर्वक श्वासोच्छवास केला. त्यानंतर तो निवान्तपणे विचार करू लागला; आठवू लागला. 'तिच्या हातातलं रिव्हॉल्वर काढून घेतलं, तरी अशा वेळी तिच्या व्यक्तिमत्त्वात प्रचंड अपकर्षणशक्ती भरलेली असते. मी काहीही बोललो, तरी ती माझा तिरस्कार करेल, माझा प्रत्येक शब्द खोटा आहे याच भावनेनं पाहत राहील. अंत:करणापासून उमटणाऱ्या प्रत्येक शब्दाचा वाकडा अर्थ लावून अवहेलना करेल. ती अवहेलना सहन करण्याची ताकद नसल्यामुळे कितीतरी वेळा मीही स्वत:च्या नजरेत हीन होऊन जातो.'

सभोवतालच्या निबिड अंधाराची त्याला भीती वाटली. 'अगदी वाघ-चित्ते नसले, तरी कोल्हे-लांडगे, साप-विंचू, घुबड-पाकोळ्या... अर्थात मरायला म्हणूनच बाहेर पडणारीला कसली भीती म्हणा! आतापर्यंत ती कुठं जिवंत असेल की... एक प्रकारची असहाय भावना दाटून येऊन त्याला रडू फुटलं. देवा! हे चामुंडीदेवी, तिला बुद्धी दे! तूच तिला आवर! तुझ्याशिवाय कुणीही तिला वाचवू शकणार नाही.' त्याचं असहाय मन निरुपाय होऊन प्रार्थना करू लागलं.

अशा असहाय मन:स्थितीत तो किती वेळ बसला होता कोण जाणे! त्याच्या डोळ्यांवर झापड येऊ लागली होती. त्याच वेळी दूरवर कुठंतरी वाहनाचा आवाज ऐकू आला. 'कार की जीप? टेकडीवरच्या राजेंद्रविलास हॉटेलात रात्री पार्टीसाठी आलेलं कुणी टेकडी उतरत असेल काय? वर वायरलेस क्रेंद्र आहे. तिथं कुणी जात असेल कदाचित. त्यांनी एवढ्या अपरात्री इथं काय करतोस म्हणून विचारलं तर काय सांगायचं? हवा खायला आलो म्हणून सांगता येईल; पण आता वाजले किती?' अंधारात घड्याळ दिसलं नाही आणि ताऱ्यांवरून वेळ ओळखण्याचाही त्याला अभ्यास नव्हता.

वाहन खालून वर येत असल्याचं आता त्याच्या आवाजावरून लक्षात आलं. 'कार? होय. वरच्या हॉटेलची असेल किंवा बेंगळुरूहून उशिरा आलेल्या प्रवाशंना नेणारी टॅक्सी असेल.' कार जवळ आली. फ्लडलाइट्समुळे भोवतालचा अंधार आणखी गडद झाला. फक्त डोळे मिटण्यापेक्षा चेहरा वळवण्याची इच्छा नसली, तरी तसं केल्यामुळे शंकेला वाव मिळेल म्हणून त्यानं चेहरा वळवला नाही.

कार भरधाव वेगानं आली आणि त्याच्या पुढ्यात गचकन थांबली. इंजिन बंद करून आतला दिवा लावला गेला, तेव्हा आतली व्यक्ती अमृता असल्याचं त्याला दिसलं. काहीही प्रतिक्रिया न दाखवता तो तसाच बसून राहिला. त्यानं तिच्याकडं पाहिलंही नाही.

ती गाडीचा दरवाजा उघडून बाहेर आली. त्याच्याजवळ येऊन तिनं त्याचा चेहरा आपल्या छातीशी घट्ट धरला. तो एखाद्या दगडी पुतळ्याप्रमाणे प्रतिक्रियाहीन होता. तिनं आपली मिठी आणखी दृढ केली. तिच्या धपापणाऱ्या छातीचे ठोके त्याच्या डोळ्यांना, कपाळाला आणि गालांना जाणवत होते. आपलं उबदार अंत:करण अभिषिक्त करण्यासाठी तिनं आपले उष्ण ओठ त्याच्या कपाळावर दाबून धरले. तिच्या डोळ्यांमधून वाहणारे गरम अश्रू त्याच्या

केसांमधून आत जाऊन डोकंही भिजू लागलं.

"सोमू, क्षमा कर, विसरून जा या म्हणण्याला काहीच अर्थ राहिला नाही. पण तू क्षमा केली नाहीस, तर देवही मला क्षमा करणार नाही, हे ठाऊक आहे मला. मी तर मला कधीच क्षमा करू शकणार नाही. दुपारचं जेवण, संध्याकाळचं रिसेप्शन! तू दिवसभरात अन्नाचा घासही खाल्ला नाहीस, हे मला ठाऊक आहे. नवा सूट घालण्याऐवजी तू जुना बुशशर्ट-पँट घातलीस तेही मी पाहिलंय. आता एक अक्षरही न बोलता स्कूटर घेऊन तू पुढं चल. मी तुझ्या पाठोपाठ येते. आज आपण दोघांनी सूर्यनारायणप्पाच्या हातचं नव्हे, माझ्या हातचं जेवायचं असा देवाचा संकल्प आहे, हे माझ्या लक्षात आलंय. घरी चल. दोघं मिळून जेवू या. त्यानंतर बोलू या. खूप बोलायचंय तुझ्याशी. तुझ्याशिवाय मी तरी कुणाला सांगणार माझ्यात साठलेलं दु:ख?"

तरीही अवाक्षर न बोलता तो तसाच निश्चल बसून होता.

"तुला पराकोटीचा राग येणं साहजिक आहे. पुन्हा आयुष्यात हिच्याशी अवाक्षर बोलणार नाही, असंही तू ठरवलं असशील; पण मीही दिवसभर उपाशी आहे. तू आला नाहीस, तर मी मरेपर्यंत उपवास सोडणार नाही. तसं कशाला? मरण्यासाठी उपवासापेक्षा रिव्हॉल्वर ठीक आहे. तू मला क्षमा करून माझ्याबरोबर आला नाहीस, तर रिव्हॉल्वरचा ट्रिगर ओढणं अगदी सोपं आहे."

पुन्हा काही क्षण शांततेत गेले. ती पुन्हा म्हणाली, "ऊठ आता. तुला कितीही राग आला, तरी तू तुझ्या अमृताला आत्महत्या करायला कधीच लावणार नाहीस. मला ठाऊक आहे ते." म्हणत तिनं त्याचा दंड धरून बळेच उठवलं. अवाक्षरही न बोलता तो उठला आणि त्यानं स्कूटर सुरू केली.

दरवाजा बंद करून घरात गेल्यावर ती त्याचा दंड धरत म्हणाली, "आधी तू तुझे कपडे बदल. तुझ्या कपड्यांना रस्त्यावरची धूळ, माती, गवताच्या काड्या लागल्या आहेत. येताना फ्लडलाइटच्या उजेडात ते दिसलं तेव्हा मला शरमेनं मरून जावंसं वाटलं. तू जमिनीवर कोसळलास आणि ते बघूनही मी तशीच बसून राहिले. तुला उठवायला पुढे झाले नाही. छे:! किती शरमेची गोष्ट! थांब, टॉवेल देते. हात-पाय-तोंड धुवून घे." म्हणत तिनं त्याला गेस्ट रूमच्या बाथरूमपाशी नेलं.

तो हात-पाय-तोंड धुवून स्वयंपाकघरात आला तेव्हा पहाटेचे सव्वा तीन वाजले होते. गॅस पेटवून ती त्यावर तुपात रवा भाजत होती. दुसऱ्या गॅसवर पाणी उकळत होतं.

"आता काही करत बसू नकोस. काही शिल्लक असेल, तर एकेक घास खाऊ या." तो म्हणाला.

"तसं सारं आहे. भात आहे, दही आहे; पण आज नव्या ऑफिसचा गृहशांतीचा दिवस आहे. दोघंही दिवसभरात जेवलो नाही. गोडही खायला पाहिजे. पाच मिनिटांत शिरा होईल. तोपर्यंत तू वेलदोडे सोलून त्यांची पूड करून देशील? काजू-बेदाणे मात्र घरात नाहीत."

मुलांना जाग येईल म्हणून तिनं स्वयंपाकघरातल्या लहान टेबलावरच दोन ताटल्या ठेवल्या. स्वयंपाकघराचं दार लोटून ती त्याच्या शेजारी बसून म्हणाली, “आधी शिरा खा. तू वेलदोड्याची पूड करून घातल्यावर चविष्ट झाला असेल.” तिनं चमचाभर शिरा त्याला भरवला. त्याची मन:स्थिती तिला साथ द्यायला तयार नव्हती. तरी त्यानंही तिला चमचाभर शिरा भरवला. त्यात फक्त कर्मकांडच राहिलं होतं, हे दोघांच्याही लक्षात आलं. त्यानंतर मात्र दोघंही आपापल्या ताटलीतलं अन्न जेवू लागले. शिरा खरोखरच रूचकर झाला होता. दोघांचीही दिवसभराची भूक शांत झाली. त्यानंतर दहीभात खाताना ती बोलू लागली, “मी एकाएकी का निघून गेले हा प्रश्न विचारावा असं तुला वाटलं नाही सोमू?”

“उत्तर ठाऊक असल्यावर पुन्हा विचारून तुला का त्रास द्यायचा?”

तो समजूत काढल्याच्या स्वरात म्हणाला.

“काय ठाऊक आहे तुला?”

“तू अधूनमधून शून्य भावात घेरली जातेस. एकाएकी रिती होऊन जातेस. संतापतेस. तूच या विषयी मला सांगितलं आहेस; पण मध्यरात्री घर-दार सोडून रिव्हॉल्वर घेऊन टेकडीवर जाणं म्हणजे... अमृता, माझी शपथ घेऊन सांग, यानंतर कधीही अशी जाणार नाही म्हणून! चोर-दरोडेखोर घुसल्याशिवाय रिव्हॉल्वरला हात लावणार नाही म्हणून शब्द दे. चल देवापुढे!’ तो भावनावेगानं म्हणाला.

तिनं हातानं त्याचा दंड वेढला. तिचा आवाज शुष्क होता. ती म्हणाली, “शून्यभाव वगैरे वेगळा तपशील ठीक आहे. देवापुढे शब्द द्यायचा वगैरे म्हणजे तुझी भावनाशीलताही दिसते; पण आज सकाळी मी तशी निघून गेले हे जाणून घेणं तुला आवश्यक वाटत नाही म्हणायचं!”

“उगाच काहीतरी म्हणू नकोस. तूच सांगितलंस शून्य भाव....”

त्याला अडवत ती म्हणाली, “अकस्मात, अचानक, काहीही कारण नसताना काहीही घडत नसतं सोमू! कारण जाणून घ्यायची तुमची इच्छा नाही. समजलं असलं, तरी मोकळ्या मनानं त्याचा स्वीकार करायला तुम्ही तयार नाही.”

“तुझ्यावर जे अन्याय झाले आहेत, ते तू विसरून जा अमृता. नाहीतर त्यांना क्षमा करून मोकळी हो. मनातलं ते सगळं काढून टाक.”

“मिस्टर सोमशेखर, तुम्हाला वस्तुस्थिती जाणूनच घ्यायची नाही, हे आता स्पष्ट झालंय. बस्स! आता उठा, हात धुवा. गेस्टरूममध्ये झोपणार की घरी जाणार?” तिनं ताटल्या उचलत विचारलं.

दिवसभराच्या दमणुकीनंतर चार घास पोटात गेल्यावर डोळ्यांवर झापड येऊन बुद्धी बधिर झाली होती. तो म्हणाला, “इथं झोपलं तर सकाळी मुलं अंकल इथं का झोपले म्हणून चौकशी करतील. उजाडताच स्वयंपाकाच्या आणि इतर कामाच्या बायाही येतील.”

“एवढी भीती वाटत असेल, तर या क्षणी चालू लागा. माझ्या प्रश्नाचं उत्तर तुम्ही अपरोक्षपणे सुचवलं आहे.” म्हणत ती ताडकन उठली. त्यानंही उठून हात धुतले आणि बाहेरच्या लाउंजवर आला. तिथल्या सोफ्यावर बसताना पाय पसरून गाढ झोपी जावं असं त्याला तीव्रपणे वाटत होतं; पण तसं केलं तर तिच्या रागात तेल ओतल्यासारखं होईल हेही त्याला समजत होतं. तो तसाच महत्प्रयासानं डोळे उघडे ठेवून बसला होता. जबड्यांचा सांधा निखळून जाईल अशा दहा-बारा जांभया आल्या. ती आपल्या बेडरूममध्ये निघून गेल्याचं त्याला समजलं. यानंतर आपण इथंच सोफ्यावर झोपायचं की स्कूटर सुरू करून निघून जायचं याचा स्पष्ट निर्धार करता न आल्यामुळे तो तसाच तिथं प्रयत्नपूर्वक जागा राहून बसून राहिला.

एवढ्यात ती तरातरा तिथं येऊन त्याला म्हणाली, “इथं बसून राहिलं, तर मुलांच्या भीतीनं मी मोठ्यानं बोलणार नाही म्हणून इथं बसलात हे मला ठाऊक आहे!”

तिचा सरळ आरोप ऐकताच तो म्हणाला, “तसं काही माझ्या मनात नाही. दमलो होतो म्हणून इथं सोफ्यावर बसलो.”

“तुम्ही काही एकटेच दमला नाहीत. संध्याकाळी मीही तीन-चार मैल चालले आहे. मीही संपूर्ण दिवस उपाशी आहे. तुम्ही जेवला नाही ही कदाचित माझी फोल समजूत असेल. वस्तुस्थिती वेगळीच असेल. मला त्यातलं काही जाणून घेण्याची आवश्यकता नाही.”

वाक्यं धारदार शस्त्रासारखी वापरून मर्मावर वार करायचा तिचा स्वभाव त्याला नवा नव्हता. यानंतर आपण काहीही बोललो, तरी ती हेच करणार हे जाणवून तो उठत म्हणाला, “चल, आत बसू या.”

दोघंही पुन्हा स्वयंपाकघरातल्या त्या खुर्च्यांवर बसले. तिनं उठून स्वयंपाकघराचा दरवाजा बंद केला आणि त्याच्या जवळ येऊन त्याला घट्ट धरत आवेगानं म्हणाली, “सोमू, तू थकून गेला आहेस, तुला झोप येतेय हे मलाही समजतंय; पण मी तरी कुणापुढे मन मोकळं करणार? सकाळी का अशी निघून गेलीस, कुठं गेलीस असं तू मला एका शब्दानंही विचारलं नाहीस. एवढी उदासीनता दाखवून तू गप्प बसलास, तर मला का राग येऊ नये?” वाद घालायला सोयीचं व्हावं म्हणून ती त्याच्या समोरच्या खुर्चीवर बसली.

“मी तुझी किती वाट पाहिली म्हणून सांगू? एक वाजता इथं फोन केला. पंगत जेवायला बसल्यावर इथंपर्यंत येऊन पाहून गेलो.” त्यानं सगळा तपशील सांगितला.

“सोमू, तुझं माझ्यावर फार प्रेम आहे ते मला ठाऊक आहे रे! नाहीतर माझं विक्षिप्तासारखं वागणं पाहून तू कधीच निघून गेला असतास. इथं माझं काय झालं ठाऊक आहे? दररोज मी तिथं सकाळ-संध्याकाळ येऊन रात्रीही तुझ्या ऑफिसचाच विचार करत होते. स्वागत-समारंभाचा तपशील ठरवताना इतर काही गोंधळ नको म्हणून विकासच्या बारशासाठी आलेल्या जोईसांना आणि सूर्यनारायणप्पांना सांगितलं. जोईसांची समजूत झाली पूजा माझ्या ऑफिसची आहे. त्यांचा तरी काय दोष? मी पुढाकार घेऊन धावपळ करत होते त्यामुळे त्यांची तशी समजूत झाली. सकाळी ते रिक्षानं ऑफिसमध्ये आले तेव्हा तू तिथं नव्हतास. मी त्यांना वर ऑफिसमध्ये घेऊन गेले. धार्मिक विधीसाठी केलेली सगळी तयारी त्यांना दाखवून काही

कमी नाही ना ते विचारलं.

"सगळं बघून ते म्हणाले, "सगळं ठीक आहे. सुरुवात करायची ना? बोलवा तुमच्या यजमानंना."

"काय वाटलं असेल मला ते ऐकून? या ऑफिसचा तू यजमान आणि मी यजमानीण हे अगदी खरंच आहे; पण त्यांना खरं सांगणं शक्य आहे काय? त्यांनी आवाहन केलेल्या अग्नीच्या पुढ्यात बसून जोडीनं पुढचे धार्मिक विधी करणं शक्य आहे काय? त्या अग्नीत तूप ओतणं शक्य आहे काय? नामकरणविधीच्या वेळी रंगनाथाच्या शेजारी मला बसवून याच जोईसांनी सगळे विधी करवले होते ना? मी स्वत:च्या भावना दाखवू न देता त्यांना म्हटलं, "आमच्या नातेवाइकांचं ऑफिस आहे हे. त्यांची बायको नाही. म्हणून तुम्हीच नीट लक्ष देऊन करा आणि प्रसाद द्या."

"पुढं काही न विचारता जोईसांनी पुढच्या विधींना सुरुवात केली. त्या मंत्रांमधून पुन्हा प्रश्न समोर येत होता. हा केवळ त्या विधीपुरता प्रश्नही नाही. जोईसांचा विधी तासा-दीड तासांत संपून जातो; पण त्यानंतर जेवायची माणसं येणार होती. संध्याकाळी तर माणसांच्या झुंडीच्या झुंडी येणार होत्या. त्यांच्यासमोर माझं स्थान काय होतं? त्यांनी विचारलं असतं, दिवसभर नवी रेशमी साडी नेसून आल्या-गेल्यांचं स्वागत करणारी बाई कोण? सोमशेखरांशी तिचं काय नातं? तर? हजारो डोळ्यांमध्ये उभ्या असलेल्या या प्रश्नाचं उत्तर काय? तू म्हणशील एखाद्या मैत्रिणीनं एवढं करू नये काय? पण आपण केवळ मित्र-मैत्रीण नाही आणि लोकही अशा केवळ स्नेहावर विश्वास ठेवत नाहीत.

"जोईसांनी तूप ओतून उठवलेल्या ज्वाळेमध्ये पाहताना माझ्या स्थानाचा प्रश्न मला पुन:पुन्हा घेरत होता. त्यात माझी ही दरिद्री स्मरणशक्ती! नामकरणाच्या होमावेळचेच मंत्र जोईस आताही म्हणत होते. ती आठवण होमाला येऊन भिडली. मी नामकरणाच्या वेळी रंगनाथाच्या शेजारी बसले असताना पहिल्यांदा तीव्रपणे फसवणूक झाल्याची भावना माझ्या मनात आली. या रंगनाथानं मला फसवून मूल लादलंय आणि मी त्याच्याबरोबरीनं होम करत होते... त्यापेक्षा कुठंतरी जाऊन रिव्हॉल्वरनं जीव... होय. ही भावनाही त्या क्षणीच माझ्या मनात सर्वप्रथम आली... म्हणजे त्या होमातही माझ्या अस्तित्वाला अर्थ नव्हता आणि आजच्या होमातही मला स्थान नव्हतं."

तो तिच्याकडे एकटक पाहत तिचं बोलणं लक्ष देऊन ऐकत होता. कुठंही स्थान नसलेल्या पिशाच्चासारखे तिचे डोळे दिसत होते. तिला काय सांगावं हे त्याला समजत नव्हतं. नि:शब्दपणे त्याच्याकडे पाहणाऱ्या अमृताच्या दृष्टीत दृष्टी मिसळणंही त्याला शक्य झालं नाही. तो म्हणाला, "जोईसांना रिक्षानं पाठवून द्यायचं सोडून ही का त्यांना पोहोचवायला गेली, या विचारानं पुढं तासभर मला काही सुचलं नाही."

"बाहेर पडायला ते निमित्त मिळालं एवढंच! नाहीतरी मी एकटी गाडी घेऊन तिथून बाहेर पडलेच असते. तिथून सरळ मी कुठं गेले असेन?"

"कुठं?"

“कन्नमवाडीच्या बांधावर. तिकीट घेऊन गाडी हॉटेलपाशी उभी केली. कावेरी मूर्तीकडून पायऱ्या चढून बांधावर गेले. आपल्याला आवरणाऱ्या भिंतीवर तिथलं पाणी उसळून कोसळत होतं. बांधापाशी पाण्याची खोली शंभर-सव्वाशे फूट तरी असेल. मी पाण्याकडे पाहत काही वेळ उभी राहिले. एवढ्या पाण्याची शक्ती थोपवणारी भिंत किती सामर्थ्यवान असेल! बघता-बघता मनात एक विचार जन्मला. समोरच्या कंबरभर उंचीच्या भिंतीवर चढून पाण्यात उडी मारायचं जबरदस्त आकर्षण मनात जन्मलं. जवळपास कुणीही नव्हतं. प्रचंड वेगानं उसळणाऱ्या लाटेनं गरागरा फिरवून अर्ध्या क्षणात भिंतीवर फेकून दिलं असतं; पण त्या आधीच नाका-तोंडात पाणी शिरून जीव निघून गेला असता. सगळं दु:ख नाहीसं झालं असतं. यानंतर कुठलं दु:ख राहिलं नसतं, वेदना राहिली नसती. रंध्रारंध्रांत पाणी भरून शरीर पाणीमय होऊन गेलं असतं. पाण्याला दु:ख नाही. विव्हळणं नाही. आनंदाची लाट व्हायचं आणि नाचत राहायचं. आधी धरणात, नंतर नदीच्या प्रवाहात, त्यानंतर समुद्रात... का होऊ नये मी अशी लाट? का या दु:खापासून स्वत:ची सुटका करून घेऊ नये?

“मी पुन्हा सभोवताली पाहिलं. लांबवर कुणीतरी दोघं होते; पण मी ठरवलं असतं, तर ते मला वाचवू शकणार नव्हते. येथे प्रयत्न अयशस्वी व्हायची सुतराम शक्यता नव्हती. तरीही मी का उडी मारली नाही? अजूनही माझ्या भेकडपणाचा मला तिरस्कार वाटतो. तशीच मी चालत राहिले. पलीकडच्या बाजूनं उतरायची जागा आहे. ठाऊक आहे?”

“होय.”

“तिथून विश्वेश्वरय्या कॅनॉलपाशी येऊन उभी राहिले. तूही ते स्थळ पाहिलं असशील. आत्महत्या करायला यापेक्षा योग्य जागा शोधूनही सापडणार नाही. केवळ जीव देण्यासाठी शेकडो मैलांचा प्रवास करून माणसं येतील एकदा पाहिल्यावर! तिथला तो पाण्याचा प्रचंड वेग, त्याची शक्ती खऱ्या अर्थानं आज... अंहं. आता उजाडायची वेळ झाली. काल दुपारी जाणवली.”

त्याच्या डोळ्यांसमोर त्या कॅनॉलमधून प्रचंड वेगानं उसळून बाहेर पडणाऱ्या पाण्याचं चित्र उभं राहिलं. शिकत असताना अभ्यासाचा एक भाग म्हणून त्यानं ती जागा पाहिली होती, तेव्हा त्याच्या प्राध्यापकांनी एका क्षणात किती क्यूसेक्स पाणी बाहेर पडतं याचा तपशीलही सांगितला होता. प्रचंड वेगानं घोंघावणाऱ्या या पाण्याकडे एकटक पाहत राहिलं, तर एकीकडे भीतीनं जीव गुदमरून जातो आणि दुसरीकडे विचित्र आकर्षणामुळे तिथलं पाऊल उचललं जात नाही, हा त्याचाही अनुभव होता.

त्यानं ते तिला विस्तारानं सांगितलं.

ते ऐकताना तिच्या मनात सहभावाचं समाधान निर्माण झालं. त्याचा उजवा हात घट्ट धरत ती म्हणाली, “हेच तुझ्या तोंडून ऐकताना मी एकटी नाही याचं किती समाधान वाटतं म्हणून सांगू! इतक्या दिवसांत तू मला हे कधीच का सांगितलं नाहीस? मी तिथं कितीतरी वेळा जाऊन आले आहे. त्या विचित्राकर्षणात गुरफटून तिथं निश्चल उभं राहणं हाच एक विलक्षण गाढ अनुभव असतो! केवळ कल्पनेनं तो अनुभवणं शक्य नाही. मृत्यूचं आकर्षण इतकं कलात्मक असू शकतं, हे मात्र मला काल समजलं. पण मग मी त्यात उडी घेऊन का पाणी-

पाणी झाले नाही?

“तेही सांगते. तुझ्यावरच्या रागापोटी मी निघून आले होते. एव्हाना दुपारचे दोन वाजले होते. मनात आलं, ‘आता तिथं काय चाललं असेल? दुसरी पंगत जेवायला बसली असेल. तू सगळ्यांना आग्रह करून वाढत असशील. भूक लागल्यावर घासभर शिरा किंवा हलवा मागून घेऊन खाल्ला असशील, लोटाभर सारात चमचाभर तूप घालून अधूनमधून घोट घेत असशील. अथवा सगळे जेवायला बसल्यावर तूही एका रिकाम्या ताटापुढे बसून जेवायला सुरुवात केली असशील.’

“या विचारासरशी किती राग आला म्हणून सांगू! इकडं माझं काहीही होवो, यात काहीच फरक पडत नाही. नवं ऑफिस, समारंभ, जेवणाच्या पंक्ती, रिसेप्शन काहीही थांबणार नाही.

“याच विचाराच्या तंद्रीत मी उभी होते. कुठल्याही क्षणी समोरच्या पाण्यात उडी घेणार होते, पण एवढ्यात पाठीमागून त्या आवाजातही ऐकू येऊन मोठ्यानं कुणीतरी म्हणालं, “ओ बाई, एकट्याच उभ्या आहात. तिकडची कार तुमची आहे काय?’

“मागं वळून पाहिलं तर एक दांडगा माणूस उभा होता. मिशा आणि केसाच्या कटवरून तो साध्या वेषातला पोलीस असावा असं वाटलं किंवा पहारेकरी असेल. मला राग आला. मीही किंचाळून सांगितलं, “तिकीट काढून आत आलेय मी. मला हवं तिथं उभं राहून पाहायचं स्वातंत्र्य आहे.”

“ “पण अशा जागी एकेकट्याला जाऊ देऊ नका अशी ऑर्डर आहे. तुम्ही पाहिजे तेवढा वेळ उभ्या राहा. मीही इथंच थांबणार.” म्हणत तो दोन-तीन हात अंतरावर उभा राहिला. एक अपरिचित माणूस एवढ्या जवळ आपल्यावर करडी नजर ठेवून आहे म्हटल्यावर भावना आपल्या राहणं शक्य आहे काय? मी तरातरा तिथून निघाले आणि वृंदावन गार्डन ओलांडून गाडी घेऊन तिथून बाहेर पडले.

“पण जाणार कुठं? पावणे तीन वाजले होते. एकाएकी आठवलं, मुलांना अंकलच्या ऑफिसमध्ये जेवायला जायचंय म्हणून सांगून दुपारचा जेवायचा डबाही दिला नव्हता. बिचारी भुकेनं व्याकूळ झाली असणार होती. एवढा वेळ वाट बघून सुशीलम्मांनी त्यांना दोन घास वाढलेही असण्याची शक्यता होती; पण मी किती पापी म्हणायची, डोकं आपटून घ्यावं एवढा पश्चात्ताप झाला मला. वेगानं गाडी घेऊन त्यांच्या शाळेपाशी आले.

“सुशीलम्मांनी त्यांना जेवायला वाढलं होतं. शाळा सुटायची वेळही झाली होती. ती सुटताच धावत आलेल्या विजयनं विचारलं, “अम्मा, सुशीलम्मांनी आज ‘उद्याने-वने’ म्हणून एक नवा धडा शिकवला. त्यात वृंदावन गार्डनही आहे. त्यांनी चित्र दाखवलं. आम्हाला तिथं घेऊन जाशील? आत्ता?”

“नाही म्हणणं मला शक्य झालं नाही. कॉलेजच्या कामामुळे यायला उशीर झाला असं म्हणत मी सुशीलम्मा आणि त्यांच्या मुलांनाही वृंदावन गार्डनला चलायला सांगितलं. त्याही तयार झाल्या. तिथंच मुलांचे हात-पाय धुवून केस विंचरले आणि पुन्हा त्याच रस्त्यानं

कन्नमवाडीला निघाले.

"चारही मुलांचा आनंद ऊतू चालला होता. सुशीलम्माही मुलांत मूल होऊन रमणाऱ्या. पॉपकॉर्न, चॉकलेट वगैरे मुलांना घेऊन दिलं. पोटाचं निमित्त सांगून मी मात्र फक्त कॉफी घेतली. दुपारी उसळलेली आत्महत्येची उत्कटता आता ओसरली असली, तरी ती भावना कमी झाली नव्हती. तरीही खोट्या उत्साहानं मुलांबरोबर खिदळत राहणं, सुशीलम्मांबरोबर सहज सुखदु:खाच्या गप्पा मारणं आवश्यक होतं. पायात तर उभं राहायचीही शक्ती नव्हती आणि मनात इच्छाही नव्हती. किती विचित्र हिंसा ही!

"सात वाजता दिवे लागताच मुलं चेकाळल्यासारखी झाली. लाल पाणी, हिरवं पाणी, निळं पाणी म्हणून ओंजळीत पाणी घेऊन ती धावत होती! नाचत होती! मीही त्यांच्या आनंदात सगळं विसरून गेले.

"आठ वाजल्यावर दिवे बंद झाले. तिथून बाहेर पडून सुशीलम्मा आणि त्यांच्या मुलांना त्यांच्या घरी सोडलं. विजय-विकासला घेऊन मी घरी परतले तेव्हा कुत्रीही उपासमारीनं कळवळली होती. मला रडूच आलं. त्यांना आणि मुलांना खाऊ घातलं. मुलं झोपली. एकाएकी पुन्हा सगळं रिकामं-रिकामं होऊन गेलं. उत्साह दूरच राहिला. जगण्यातच अर्थ नाही असं वाटू लागलं. उगाच सगळ्या जगावर भार होऊन मी का जगावं? पुन्हा रिव्हॉल्वरनं जीव देण्याची इच्छा झाली; पण घरात नको. रक्ताच्या थारोळ्यात पडलेलं आईचं प्रेत... मी रिव्हॉल्वर घेऊन कारमध्ये बसले. गेटबाहेर गाडी काढत असताना तुझी स्कूटर दिसली. तुझा किती राग आला म्हणून सांगू! दुपारी बांधापाशी येऊन अडथळा करणाऱ्या पोलिसावरचा रागही त्यात मिसळून सरळ तुझ्यावरच रिव्हॉल्वर उडवावं असं वाटलं, पण गाडी न थांबवता मी तशीच निघाले."

बाहेर कावळ्यांचं ओरडणं ऐकू आलं. बाहेर पाहिलं, तेव्हा उजाडत होतं. तिची हकिकत ऐकत असलेल्या सोमशेखरचं मन दु:खानं भरून गेलं होतं. तीही मौनपणे बसून होती. अखेर तीच भानावर येऊन म्हणाली, "स्वयंपाकासाठी आज पुट्टम्मा लवकर येणार आहे. मुलांनाही तयार करून शाळेत पोहोचवायला पाहिजे. तूही घरी जाऊन थोडी झोप काढ."

घरी येऊन अंथरुणावर पडल्यानंतरही त्याला झोप लागली नाही. डोळे मिटले की, टेकडीवर दरीपाशी रिव्हॉल्वर घेऊन जीव द्यायला निघालेली तिची आकृती दिसत होती. 'हे कुठल्याही रात्री घडू शकेल.' यापूर्वीही तिनं जीव देण्याची इच्छा अधूनमधून प्रबल होते हे सांगितलं होतं; पण त्याची खरी तीव्रता त्याला काल कळली होती. 'कुठल्याही क्षणी रिव्हॉल्वर उडवून....' तो त्या विचारासरशी अंतर्बाह्य थरकापला. 'रक्ताच्या थारोळ्यात पडलेला तिचा सुकुमार देह....' त्याचं घड्याळाकडे लक्ष गेलं. सात वाजले होते. 'अमृता मुलांना शाळेसाठी तयार करत असेल. रात्री झोप झाली नाही म्हणून वैतागत असेल. असू दे. जीव देण्यापेक्षा हे चालेल. दहा वाजेपर्यंत या कामाची बाई घरात असते. एवढ्या मोठ्या घराचा केर, पुसणं, आवरणं, धुणं-भांडी, झाडंना पाणी घालणं, केर काढणं... बाराच्या आत महादेवम्मा जाणं शक्यच नाही.' आपण कॉलेजमधून आल्यावर ती घरी जाते म्हणून अमृतानंही त्याला सांगितलं होतं. या विचाराचा आधार वाटून त्याचा डोळा लागला.

साडेदहा वाजता तो उठला. अंघोळ करून ऑफिसमध्ये गेला तेव्हा नीळकंठप्पा जुन्या

ऑफिसमधली पुस्तकं, फाइल्स, डुप्लिकेटर, टाइपरायटर, नकाशा काढण्याचं मोठं, उतरतं टेबल वगैरे नव्या ऑफिसात हलवायच्या गडबडीत होते. जवळच्या हॉटेलमध्ये नाश्ता करून आल्यावर तोही त्यांना मदत करू लागला. सगळं सामान ऑफिसमध्ये पोहोचल्यावर त्यांना "उद्यापासून सामान व्यवस्थित लावू या. मी जेवून येईपर्यंत लक्ष ठेवा." असं सांगून तो तिच्या घरी निघाला. स्कूटर चालवतानाही त्याची मनोमन प्रार्थना सुरू होती, "देवा, ती सुखरूप असू दे."

प्राणिसंग्रहालयाजवळचं वळण मागं पडल्यावर पुन्हा वेग वाढवून तो तिच्या घरी पोहोचला. स्कूटरचा आवाज ऐकून पुढच्या गेटजवळचा विक्रांत भुंकला. त्याला मागच्या गेटपाशी असलेल्या विश्वासनं साथ दिली. गेटला कुलूप लावलं नव्हतं; पण घराचा पुढचा दरवाजा मात्र बंद होता. 'ती घरात असती, तर स्कूटरच्या आवाजानं किंवा कुत्र्यांचं भुंकणं ऐकून बाहेर आली असती. अजून कॉलेजमधून आली नाही की काय? की...'

त्याच्या छातीत धडधडू लागलं. आत फक्त बोल्ट लावलेला दिसत होता. 'छे:! तसं काही घडलं नसेल. रात्रभर जागरण झालंय. कदाचित डुलकी लागली असेल.' तो काही क्षण तसाच उभा राहिला. घराला वळसा घालून तिच्या झोपायच्या खोलीतही त्यानं डोकावून पाहिलं.

तिथल्या खिडकीचा दरवाजा उघडा होता. वर पंखा गरगरत होता. त्या खाली कॉटवर ती गाढ झोपी गेली होती. अत्यंत मृदू असा चेहऱ्याचा डावा भाग त्याला दिसला. मंदपणे छातीवरचा पदर वर-खाली होत होता. त्याच्या मनात तिच्याविषयी अदम्य माया दाटून आली. एकटक पाहता-पाहता वाटलं, 'नको, तिच्या अंतर्मनाला काहीतरी जाणवून एकाएकी जाग येईल.' चाहूल लागू न देता तो माघारी वळला. गेट उघडून स्कूटर तशीच ओढत गेटबाहेर आला आणि पुन्हा गेट बंद करून सुमारे शंभर फूट नेल्यावर त्यानं स्कूटर सुरू केली.

हॉटेलमध्ये दोन प्लेट पुरी-भाजी खाऊन आणि कॉफी पिऊन तो नव्या ऑफिसमध्ये आला. पुस्तकं आणि फायली लावत असताना टेलिफोन खात्याची माणसं येऊन टेलिफोनचं कनेक्शन लावून गेली. तिनं सांगितल्याप्रमाणेच तेही काम झालं होतं. तिथून बाहेर आवाज ऐकू जात नव्हता; पण तिचा निद्रिस्त निरागस चेहरा आठवून तिला झोपेतून उठवणं नको वाटलं. त्यानं स्वत:ला बळेच हुणसूरच्या तंबाकू-शेतकऱ्याच्या घराचा नकाशा काढण्यात गुंतवलं.

संध्याकाळी आठ वाजता नीळकंठप्पा निघून गेल्यावर त्यानं तिला फोन केला. तेव्हा ती फारशा उत्साहानं बोलली नाही. समोर मुलं असावीत हे त्याच्या लक्षात आलं. त्यानं आपण दुपारी येऊन गेल्याचं तिला सांगितलं आणि मनापासून म्हणाला, 'ऽतुला कधी एकदा भेटेन असं वाटतंय. आता येऊ?"

"या यायचं तर!" ती उत्तरली. 'तिचा आवाज भावनारहित होता का?'

"तसं नव्हे... या वेळी घरात मुलं असतात ना!" त्यानं खुलासा केला.

"तशी भीती वाटत असेल तर येऊ नका."

कुणीतरी बेसावध असताना तोंडात भडकवावी तसं त्याला झालं. 'सकाळपासून दिवसभर हिची काळजी करून फोन केला, तर हे उत्तर हिचं!' रिसीव्हर ठेवून द्यायची इच्छा झाली, तरी त्यानं ठेवला नाही. ती आणखी काय बोलते ते पाहत राहिला. तीही गप्पच होती. अखेर त्यानंच विचारलं, "मला भीती वाटायचा यात प्रश्नच नाही. घरात मुलं आहेत. वेळ रात्रीची आहे. अशा वेळी मी यायचं नाही असं आपलं ठरलं होतं ना? म्हणून विचारलं मी."

"माझ्या घरी मला हवं त्यांना जेवायला बोलवायचं स्वातंत्र्य निश्चित आहे."

"येतो अर्ध्या तासात." म्हणत त्यानं रिसीव्हर ठेवून दिला.

ऑफिसला कुलूप लावून तो बाजारात गेला. दोन-तीन दुकानं शोधून त्यानं जुईचा गजरा विकत घेतला. एका उत्तम मिठाईच्या दुकानातून त्यानं साध्या, दुकानाचा शिक्का नसलेल्या प्लॅस्टिकच्या पिशवीत जिलेबी आणि बदामी हलवा बांधून घेतला आणि तो तिच्या घराकडे निघाला. घराच्या दुरुस्तीची कामं चालली होती तेव्हा त्यानं बऱ्याच वेळा तिच्या मुलांना पाहिलं होतं. स्नेहानं त्यांच्याशी भरपूर मोकळ्या गप्पा मारल्या होत्या. मध्यंतरी तिच्याबरोबरचा स्नेह वाढला तसं काही काळ दोघंही मुलांबरोबर चोरटेपणानं वागले होते. मध्यंतरी दोन-तीन वेळा त्यांना सुट्टी असताना तो मुद्दाम अचानक आल्यासारखा येऊन त्यांच्याशी खेळून-जेवून तिच्याशी थोडा वेळ गप्पा मारून गेला होता.

आता तो घरी पोहोचला तेव्हा मुलं दारात उभी होती. त्यांनीच दरवाजा उघडला. तीही पुढं झाली. गेल्यागेल्या तो म्हणाला, "काल तुम्ही जेवायला आला नाही? मुलांनाही पाठवलं नाही? मी वाट बघून वैतागून गेलो अगदी!"

"आमच्या विजय-विकासनंही विचारलं; पण काय सांगू, काल आमच्या कॉलेजमध्ये अचानक स्ट्राईक झाला. त्यात प्रिन्सिपॉल गावात नव्हते. अरेच्चा! गृहप्रवेशाचा खाऊ आणलात का? मेनू काय होता?" म्हणत त्याच्या हातातली पुडकी तिनं काढून घेतली आणि तिथंच कोपरे उघडून म्हणाली, "अरे व्वा! बदामी हलवा! आमच्या विजयण्णाचा जीव की प्राण आणि जिलेबी विकासचा! कशाला आमच्यासाठी तुम्ही एवढे कष्ट घेतलेत? आम्ही तिघं जेवायला आलो नाहीत, तरी आठ दिवस पुरेल एवढं आणून दिलंत! तुमचा मुलांवर भारी जीव हं! पाहिलंत का? मला अंबोडी आवडते हे त्यांना ठाऊकच नाही आणि त्यांनी करवलीही नाही. मला राग नाही का येणार?" म्हणत ती स्वयंपाकघरात गेली. एकेका प्लेटमध्ये थोडं-थोडं वाढून चमच्यांसह तिनं मुलांना आणून दिलं. जेवण झालं असलं, तरी मुलं आनंदानं खाऊ लागली.

"हे पाहा, काल आम्हाला तुमच्याकडे जेवायला यायला जमलं नाही. तुम्ही मात्र आता जेवण करून चला हं." तिनं मुलांसमोरच त्याला आग्रह केला.

मुलांच्या पुढ्यात तिच्या चेहऱ्यावरून हसू आणि मोकळेपणा दिसत होता; पण त्यांना त्यांच्या खोलीत नेऊन गोष्ट सांगून झोपवून माघारी आली तेव्हा ती गंभीर होती.

आदल्या दिवशीप्रमाणे दोघंही स्वयंपाकघरातल्या टेबलावरच जेवायला बसले. ती सार

वाढत असताना तो म्हणाला, “तू आधीही सांगत होतीस; पण एवढं दडपण वाटतं, याची मला कल्पना नव्हती.”

स्वत:च्या वाटीत सार वाढून घेत ती म्हणाली, “खरंय! जे भोगतात त्यांनाच समजणार! लोकांना त्याची काय पर्वा?”

थोबाडीत बसावी तसा चेहरा करून तो बसला. ‘आपल्या यातना एक आहेत, आपलं दु:ख एक आहे म्हणून सांगायला जावं, तर अशी हुडत् करून दूर लोटते!’ तो काही न बोलता जेवू लागला. शून्य मौन पसरलं. तिनंही अवाक्षर उच्चारलं नाही. खालच्या मानेनंच त्यानं भात संपवला.

“संपलं?” तिनं विचारलं.

काहीही न उमजून त्यानं मान वर करून तिच्याकडे पाहिलं. तिनं खुलासा केला, “सार-भात संपल्याचं दिसायला मला डोळे आहेत. मी विचारलं, तुमचं सांत्वनाचं नाटक संपलं का?”

“नाटक? हे नाटक वाटतंय तुला?” तो चांगलाच दुखावला गेला.

“नाटक की आणखी काय कुणास ठाऊक? पण बोलताय हे तर खरं!”

तिचा कशावर रोख होता हेच त्याला समजेना. हृदयाच्या आत जाणवलेलं व्यक्त करायचं एक साधन म्हणजे बोलणं. ते नाकारून प्रेम व्यक्त कसं करायचं? तो मनोमन व्याकूळ झाला तरी काही बोलला नाही. त्याच्या उत्तराची अपेक्षा करून ती म्हणाली, ऽ‘तुम्ही उत्तर द्याल अशी अपेक्षा करणारी मीच मूर्ख आहे! अंहं. तुम्ही स्पष्टपणे उत्तर सुचवलंय.”

तरीही त्याला काही समजलं नाही. ‘तू’चं ‘तुम्ही’ झालं होतं, त्या अर्थी मनोमन ती दुखावली होती, एवढं त्याला समजलं, तरी बाकी काहीच त्याला समजलं नाही. एकदा वाटलं, ‘विचारावं, काय सुचवलंय मी?’ पण त्यानं विचारलं नाही. कारण तिनं पुन्हा भडकावल्यासारखं उत्तर दिलं असतं.

‘आपण तिला घाबरत आहोत.’ हे त्याला प्रथमच एवढ्या प्रकर्षानं जाणवलं. काही न बोलता तो प्लेटमधला दहीभात संपवत होता. मनातली भीती आणि तिची प्रतिक्रिया यांची फिकीर न करता तो म्हणाला, “मी का आलोय ठाऊक आहे? तुझं रिव्हॉल्वर चोरायला.”

तिनं मान वर करून पाहिलं तेव्हा तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट तिरस्कार दिसत होता. पण चेहरा प्रसन्न ठेवत ती म्हणाली, “गावाबाहेर दोन लहान मुलांना घेऊन मी एकटी राहते म्हणून मला रिव्हॉल्वर दिलंय.”

“ते फक्त स्वरक्षणासाठी असतं, तर मला काळजी वाटली नसती.”

“काळजी वाटते? तर मग तुम्ही इथंच राहा. मग रात्रीची भीती नाही. मी रिव्हॉल्वर लायसेन्स परत करेन.”

“राहीन की!” अशक्य असलेल्या कल्पनांचा उच्चार करताना आनंद वाटतो म्हणून तो म्हणाला.

“खरं?” अगदी आतल्या गाभ्यातून तिचा प्रश्न आला असला, तरी तो व्यक्त होताना जाब विचारल्यासारखाच होता.

तो गप्प बसला. तिनं पुन्हा विचारलं, “का? गप्प का बसलात?”

तरीही तो बोलला नाही. ती म्हणाली, “मला या नायकिणीच्या हजार मुरक्यांचा कंटाळा आलाय. बोला.”

“ज्याचा व्यवहारात काहीही उपयोग नाही, तसला मार्ग शोधण्यापेक्षा जे शक्य आहे त्याचा विचार करायला पाहिजे. मी गंभीरपणे सांगतोय हे.”

“मीही गंभीरपणे ऐकतेय. जे व्यवहारात उतरवता येणं शक्य आहे अशाच उपायाची मलाही अपेक्षा आहे.”

“रात्रीसाठी एक गुरखा नेमायची कल्पना कशी आहे? पोलीस स्टेशनमध्ये त्याचं नाव रजिस्टर करायचं. हवं तर त्यांनाच त्याची नेमणूक करू दे. महिन्याला अमुक इतका पगार द्यायचा.”

“तुम्हीच का दररोज गेटपाशी उभे राहून राखण करत नाही? महिन्याला पाचशेच नव्हे, सहाशे रुपये देईन.” तिच्या स्वरात तिरस्कार भरला होता.

“माझा पदोपदी असा अपमान करायचा तुझा हेतू असेल तर...” म्हणत तो उठून उभा राहिला.

“तुम्हीही नीट गप्पा मारत न जेवता बडबड केलीत, तर माझाही अपमान होतोय हे लक्षात ठेवा.” तीही उठत तेवढ्याच तीव्रपणे म्हणाली.

“मला नीट बोलायला शिकवतेस? स्वत:चा हीनपणा माझ्यावर लादू नकोस.”

तिनं आपल्या तीक्ष्ण दृष्टीनं भोसकत त्याच्याकडे पाहिलं. त्यानंही तिची दृष्टी भिरकाटल्यासारखं रोखून पाहिलं. तिचा उजवा हात उगारला गेला आणि क्षणार्धात तो फाडकन त्याच्या गालावर आदळला. दहीभातानं लडबडलेली तिची चार बोटं गालावर बसलेल्या जागी चुरचुरू लागलं. तिच्या दंडावरची त्याची पकड क्षणभर घट्ट आवळली गेली; पण त्यानं क्षणार्धात स्वत:ला सावरलं. दृष्टी वळवून तिचा दंड सोडून तो बेसिनपाशी आला. गालावरची दहीभाताची बोटं लाल उमटत असल्याचं समोरच्या आरशात दिसत होतं. पाण्यानं गालावरचं खरकटं धुवून खिशातल्या रुमालानं त्यानं हात आणि गाल पुसले. लाउंजमध्ये येऊन स्कूटरची चावी घेऊन तो तडक बाहेर पडला. मागंही वळून न बघता त्यानं स्कूटरचा वेग वाढवला.

कुक्करहळ्ळी तलावाच्या बाजूला त्यानं स्कूटर उभी केली आणि तलावाच्या काठानं तो फर्लांगभर चालून गेला. अखेर तिथल्या एका दगडी बाकावर बसून राहिला. आकाशात घनदाट काळोख पसरला असला, तरी तलावाच्या काठानं असलेल्या दिव्यांमुळे बऱ्यापैकी उजेड होता. पलीकडचं मानस गंगोत्री विद्यापीठाचं आवार आणि हुणसूर रस्त्यावरच्या दिव्यांमुळे पाण्याचं अस्तित्व जाणवत होतं. काहीही विचार न करता, काहीही न आठवता, कसलीही तुलना न करता तो बाकाच्या पाठीला टेकून बसत असतानाच शिट्टी आणि बुटांचा आवाज ऐकू आला. तलावालगतच्या रस्त्यावर टॉर्चचा उजेड फिरला. तलावाचा पहारेकरी. तो जवळ येताच सोमशेखरनं त्याला सांगितलं, "भाऊ, ती तिकडची स्कूटर माझी आहे. माझं नाव सोमशेखर. ऑफिसचा पत्ता देवराज अरस रस्ता. राहायला जयलक्ष्मीपुरात आहे. जीव द्यायचा मुळीच विचार नाही. आता तुम्ही जा."

"पर राच्याला सोडाचं न्हाय म्हणून ऑर्डर हाय राव!" त्यानं सौम्यपणे आक्षेप घेतला.

"हे पाहा, मी काही जीव द्यायला आलो नाही की बरोबर कुणी छोकरी आणली नाही. तू पाहिजे तर नजर ठेव. कुणीही मला इथं शोधत येणार नाही. समजलं? जा. उद्या सकाळी कॉफी प्या." म्हणत त्यानं टॉर्चच्या उजेडात त्याच्या हातात दोन रुपये सारले.

"तसं न्हाय, चोर हायेत, चिलटं हायेत. त्यात तुमची स्कूटर हाय."

"तू लक्ष ठेव." असं सांगून पिटाळल्यावर तो शिट्टी वाजवून निघून गेला.

तो गेल्यावर सोमशेखर पुन्हा अंतर्मुख होऊन विचार करू लागला. 'मी इथं, या गावात का आलो?' हा प्रश्न पुन:पुन्हा त्याच्या मनात घिरट्या घालत होता. 'तिथल्या यांत्रिक जीवनाचा उबग येऊन इथं आलो आणि कसल्या विचित्र परिस्थितीत सापडलो मी! गिऱ्हाइकांशी केवळ सौजन्यशीलपणे न वागता फार जवळ गेल्याबद्दलची ही शिक्षा आहे. तिनं पुढाकार घेतला. घेतला असेल; पण मी का लाळ घोटत गेलो तिच्या मागे? त्या लोचटपणाचीच ही शिक्षा! तिला दोष देण्यात काहीच अर्थ नाही.' घडलेल्या प्रसंगाची नैतिक जबाबदारी स्वत:कडे घेताना त्यानं डाव्या हातानं गालाचा दुखरा भाग कुरवाळला. 'स्स! अजून चुरचुरतंय. निश्चित लाल वळ उठले असतील. आरशात पाहिलं, तर दिसतील. एवढा अपमान, एवढी शरम, आरशात काय बघायची! मनाला चटके बसले ना?' त्याचं मन तीव्र आत्मावहेलनेमध्ये बुडून गेलं होतं.

'मी तरी तिच्याकडे एवढा का आकर्षित झालो? देखणं रूप, सुशिक्षित, मन आनंदित होईल असं बोलणं-वागणं. शिवाय स्त्री म्हणून पुरुषाला असलेलं मूलभूत आकर्षणही त्यात आहेच; पण ही कुठं एवढी रूपवती लागून गेली आहे? मुंबईच्या त्या मदनमस्त रूपवतीशी तुलना केली, तर हिची काय लायकी? अमेरिकेत शिक्षण घेतलेली, देशोदेशींचा समृद्ध अनुभव आणि मुंबईच्या उच्चभ्रू समाजातलं वावरणं! तिच्याशी या रानातल्या, कॉफीच्या मळ्यात जन्मून वाढलेल्या, मैसूर-हासन यापलीकडचं जग न बघितलेल्या हिची तुलना तरी करण्यात काय अर्थ आहे? तरीही कसलं विचित्र आकर्षण म्हणायचं? ते नातं आणि हेही संबंध! छे:! यांचीही तुलना होणं शक्य नाही. ही बया अत्यंत गर्विष्ठ आहे. तिच्यामध्ये भोगलालसा भरपूर असली, तरी एवढा गर्विष्ठपणा नव्हता.' पुन:पुन्हा त्याचं मन तुलनेत गढून जात होतं.

त्याला स्वत:च्या या तुलना करत बसण्याचा कंटाळा आला. इतर सगळे तपशील गळून पडले आणि मनात एकच विचार दृढ झाला. 'मला माझ्या अपराधांची शिक्षा झाली आहे!' एव्हाना त्याला शरीराची थकावटही जाणवू लागली होती. 'सकाळी जेमतेम दोन तास झोप मिळाली; पण तीही गाढ नव्हती.' अंगातली सगळी कसकस दूर करण्यासाठी त्यानं अंग मोडून चांगला आळस दिला आणि स्कूटरच्या दिशेनं चालू लागला. चालता-चालता मध्येच पायांतल्या सगळ्या शिरा मृतप्राय झाल्यासारखं होऊन पुढचं पाऊन टाकणंही त्याला अशक्य झालं. क्षणभर तो घाबरला. 'काय झालं हे? लकवा मारला म्हणायचा की काय?' त्यानं दंड, पाय, मान, कान, डोळ्यांना हात लावून पाहिला. डावा गाल पुन्हा कुरवाळताना त्याच्या पायात पुन्हा शक्ती संचारली. तो पुढे पावलं टाकू लागला.

वर अंधार, डावीकडे पसरलेलं पाणी! रस्त्याच्या सुरुवातीला ठेवलेली स्कूटर सुरू करून त्यानं त्या उजेडात घड्याळ पाहिलं. बारा पंचेचाळीस. 'अजून जागा असेल तो. नसला तरी उठेल. अंथरुणाशेजारीच फोन आहे. फार तर अवेळी फोन केल्याबद्दल सॉरी म्हटलं की झालं!'

त्याची स्कूटर वेगानं देवराज अरस रस्त्यावरच्या नव्या ऑफिसच्या दिशेनं धावू लागली. कुलूप उघडून आपल्या चेंबरमध्ये जाऊन त्यानं फोन-नंबर फिरवला. नंबर त्याच्या लक्षात होता. त्यासाठी डायरी बघायची आवश्यकता नव्हती.

दुसरी घंटा होण्याआधीच पलीकडला रिसीव्हर उचलला गेला आणि चिरपरिचित आवाज ऐकू आला, "हॅलो!"

"नवीनभाई, झोप लागली होती?"

"नुकताच दिवा बंद करत होतो. माझं पत्र मिळालं ना? नवसारीत नवी फॅक्टरी, टेक्स्टाईल फॅक्टरी उभारायचं काम मिळालंय. तुझ्या नव्या ऑफिसच्या उद्घाटनाला यायला जमलं नाही. सॉरी. कार्यक्रम छान झाला ना?"

"छान झाला. मी इथं एक चूक केलीये. तूच ती दुरुस्त करायला पाहिजेस.'

"तू प्रोफेशनमधली चूक कधीच करणार नाहीस, हे मला ठाऊक आहे. व्यवहारात काहीतरी घोळ केला असशील. काय ते सांग."

"तुझ्याकडून घेतलेला डी.डी. परत करायला नको होता. त्या वेळी ज्यांनी पैसे दिले त्यांना अर्जंट हवे आहेत. लगेच एक लाख बेचाळीस हजार रुपये हवे आहेत. व्यवस्था होऊ शकेल काय?"

"तुझ्या बँकेचं नाव आणि अकाउंट नंबर सांग. उद्या सकाळी टेलेक्स मेसेजनं जमा होतील असं बघतो. आता घरी फोन घे लवकर. तिथली सगळी कामं स्थगित ठेवून दोन आठवड्यांसाठी मुंबईला यायला जमेल काय? फॅक्टरीच्या प्रिलिमनरीज मी संपवल्या आहेत. तू आल्यावर दोघं मिळून फायनल कॅल्क्युलेशन्स करता येतील. तुझ्याबरोबर कामं करायची सवय आहे ना! त्यामुळे सोपं जातं. येण्या-जाण्याचं विमान-तिकीट, जेवणखाण-राहणं आणि

सगळ्या कामाचे वेगळे वीस हजार देईन. काम मात्र भरपूर आहे. रात्रीचा दिवस करायला पाहिजे. केव्हा येशील ते उद्या दिवसभरात इंदूला सांगून ठेव. हं, बँकेचं नाव, अकाउंट नंबर. एक लक्ष बेचाळीस हजार ना?"

नवीननं विचारलेली माहिती सांगून त्यानं रिसीव्हर खाली ठेवल्यावर तिच्या प्रभावातून मोकळं झाल्याचा त्याला अनुभव आला. या मुक्तीची भावना अनुभवत तो काही वेळ नव्या खुर्चीवर बसून राहिला. नंतर ऑफिसला कुलूप लावून स्कूटरनं जयलक्ष्मीपूरमधल्या आपल्या घरी गेला.

कपडे बदलून, खिडकी उघडून झोपताना एक मात्र सारखं मनात येत होतं. आपण तिला उलटून मारलं नाही हेच योग्य झालं. या विचारातच दोन-तीन मिनिटांत त्याला गाढ झोप लागली.

सकाळी सात वाजता जाग आली तेव्हा संपूर्ण नसली, तरी पुरेशी झोप झाल्याची भावना जाणवत होती. उत्साहानं उठावंसं वाटत नव्हतं. आळसावून जांभई देताना एकाएकी त्याच्या मनात आलं, 'आपण निघून आल्यावर तिने काय केलं असेल? एखाद्या गुलामाला मारावं तसं... गुलामालाही मारणं रानटीपणाचं आहे. आजच्या दिवसांत कुणीही असा मार खाऊन गप्प बसणं शक्य नाही.'

काही वेळ स्वत:कडे अलिप्तपणे पाहत असताना त्याला वाटलं, 'तिला वाईट वाटावं अशी माझी इच्छा आहे. हा लंपटपणा योग्य नव्हे. तिला दु:ख होवो, खेद होवो, ती स्वत:चं काहीही बरं-वाईट करून घेऊ दे. मला काय त्याचं?' 'बरं-वाईट'या शब्दांनी तो चांगलाच दचकला. घाबरलाही. 'मार खाल्लेल्यापेक्षा मारणाऱ्याला अधिक दु:ख होतं. हो; पण ती व्यक्ती तेवढ्या तरल मनाची असेल तर! ही तशी आहे काय? हुशार मात्र भरपूर आहे! स्मरणशक्ती प्रचंड आहे. मागं कधीतरी एकदा स्क्रू-ड्रायव्हरनं काम करताना माझ्या नखाला एवढंसं लागून थेंबभर रक्त आलं होतं, तेव्हा तिचे डोळे पाण्यानं तुडुंब भरले होते. केवढी धावपळ करून तिनं त्याला औषध लावलं! मला किंचितही दुखत नसताना पंधरा-वीस मिनिटं त्या बोटावर फुंकर मारत बसली होती.

'पण मग काही वेळा संपूर्ण दिवसभर विनाकारण टोचून बोलून मला रक्तबंबाळ का करते ही? किती क्रूर असतो तिचा हल्ला! एकीकडे भरभरून प्रेम दाखवायचं आणि मध्येच असं वागायचं. या सापळ्यातून बाहेर पडायलाच पाहिजे. पाहिजे म्हणजे काय? आता बाहेर पडलोय मी. म्हणूनच तिच्या वागण्याचा नीट अर्थही लावू शकतो.' तो स्वत:वरच खूश झाला.

दाढी झाल्यावर अंघोळीचं पाणी सोडताना मनात येत होतं. 'काल रात्री रिव्हॉल्वर घेऊन ती पुन्हा...' आत्महत्या करण्याची इच्छा पराकोटीची प्रबळ होते तेव्हा केवळ स्वत:वरच नव्हे, सगळ्या जगावरच संताप येतो असं कधीतरी तिनं सांगितल्याचं त्याला आठवलं. 'काल रात्री तिनं खरोखरच गोळी उडवून...' त्याचं सर्वांग सूक्ष्मपणे कंप पावलं. मनात अपार सहानुभूती भरली, पण चेहऱ्याला साबण लावून गरम पाण्यानं धुताना मात्र गालावर आगडोंब उसळला. मनात सहानुभूतीच्या जागी संताप भरला. 'तसं काही घडलं असेल, तर एव्हाना पोलिसांच्या चौकशीला सुरुवातही झाली असेल. काल रात्री मी तिथं होतो... मुलं झोपी गेल्यानंतरही

होतो... मुलंच सांगतील हे. तिच्या आत्महत्येशी माझा संबंध जोडून... पोलीस कुठल्याही घटनेवर कशीही कथा रचू शकतील. मग? माझी काय गत?' त्याचा देह नखशिखान्त थरकापला. त्यानं घड्याळ पाहिलं. 'पावणे नऊ. तसं घडलं असतं, तर एवढ्या वेळात ते इथं आले असते किंवा आता कुठल्याही क्षणी येतील.' तो मनोमन घाबरला. नीळकंठप्पा नुकतेच आले होते. आपल्या चेंबरमध्ये जाऊन रिसीव्हर उचलल्यावर तो कुठला नंबर फिरवायचा या विचारानं क्षणभर गडबडला. 'घरात ती स्वयंपाकाची आणि इतर कामाची बाई असेल. "अम्मा घरात नाहीत. कॉलेजला गेल्या आहेत." एवढं उत्तर मिळालं, तरी आपला प्रश्न मिटणार आहे. पण तीच फोनवर आली तर? तिला आपल्या आवाजाची ओळख पटली तर? नको. यानंतर तिच्याशी कुठल्याही प्रकारचा संबंध नको. त्यापेक्षा...' त्यानं तिच्या कॉलेजचा फोन नंबर फिरवला. त्याला लगेच उत्तर मिळालं, "मॅडम आल्या आहेत, क्लासवर गेल्या आहेत." तुम्ही कोण म्हणून विचारलं, तर गॅरेजवाला म्हणून सांगायचं त्यानं ठरवलं होतं; पण तो प्रश्नच आला नाही.

पण जेव्हा नीळकंठप्पांना सांगून तो नाश्ता करायला ऑफिसमधून बाहेर पडला तेव्हा त्याला स्वत:ची अपरिमित शरम वाटत होती. तिच्या जिवाची काळजी न वाटता स्वत:चं काय होईल या विचारानं त्यानं सगळी धावपळ केली होती. हा केवळ भेकडपणा नव्हे, क्षुद्रपणा होता!

ऑफिसमध्ये आल्यावर नीळकंठप्पांबरोबर एका एस्टिमेटची चर्चा करत असताना बँक मॅनेजरचा फोन आला, "मुंबईहून तुमच्या खात्यावर टेलेक्स मेसेजनं एक लक्ष बेचाळीस हजार रुपये जमा झाले आहेत. काही अर्जन्सी असल्याशिवाय टेलेक्स केला नसेल. म्हणून आता लगेच फोन केला."

"आता आलो तर पैसे मिळतील काय?"

"शुअर! का नाही?"

लगेच येतो असं नीळकंठप्पांना सांगून तो उठला. तिच्या बँकेचा बाकी तपशील आणि नंबर त्याला ठाऊक होता. तो एका कागदावर टिपून त्यानं पैसे तिच्या खात्यावर जमा करायला सांगितले. तिच्या बँक मॅनेजरांनाही त्यानं तिच्याकडून पैसे घेतल्याचं ठाऊक होतंच.

तिथून ऑफिसला परतताना त्याला नवीननं सांगितलेली गोष्ट आठवली. ऑफिसमध्ये गेल्या गेल्या त्यानं नीळकंठप्पांना सांगितलं, "मी अर्जंट कन्सल्टेशनच्या कामासाठी दोन आठवडे मुंबईला जातोय. उद्या सकाळची फ्लाइट मिळते काय ते बघा! आणि आजच्या आज मी करायची कामं झाली पाहिजेत. तुम्ही त्याची लिस्ट करा. आपण संपवून टाकू."

नंतरही दिवसभर घाईनं कामं उरकताना त्याला वाटत होतं, 'तिचं कर्ज फिटलं. मैसूरमधून योग्य वेळी बाहेर पडतोय. नवीनची कृपा!'

खरकटा हात त्याच्या गालावर आदळताच ती भानावर आली. 'काय करेल आज तो?' पुढचा दरवाजा उघडून तो निघून गेल्याचं स्कूटरच्या आवाजावरून समजलं, तरी ती तशीच

बसून राहिली. 'स्कूटर डावीकडे! म्हणजे हा मैसूर गावात गेला. पाठोपाठ धावत गेले असते, तर त्याला अडवता आलं असतं. पण त्यानंतर? भांडण-वाद-संवाद?' पण उठून धावत जाऊन त्याला अडविण्याइतकी शक्ती तिच्या शरीरात नव्हती.

तो जाऊन बराच वेळ झाल्यावर कितीतरी वेळानं ती सावकाश उठली. दार बंद करून आत येऊन अंथरुणावर पडली तेव्हा तिला हलकं हलकं वाटत होतं. हलकं की रिकामं? काही का असेना, त्यात आत्महत्येकडे लोटणारा शून्य भाव निश्चित नव्हता.

'आता तो परत येणार नाही. त्याच्या दाराशी जाऊन आसवांनी त्याच्या पावलांवर अभिषेक केला, तरी तो येणार नाही. म्हणून हा रितेपणा? यानंतर मीही त्याच्याकडे जाणार नाही. हा देह वाकवून त्याचे पायही धरणार नाही. त्याच्यासमोर अश्रू ढाळणार नाही.' तिचं मन स्थिर झाल्यासारखं होऊन तिला झोप आली.

पहाटे लवकर चार वाजताच जाग आली तेव्हा मनात भरलेलं रिकामेपण! काहीतरी गमावल्याची भावना. 'छे:! यानंतर तो कधीही येणार नाही. यानंतर हा संबंध कायमचा तुटला म्हणायचा.' तिच्या हृदयात कळ उठली.

'मी तरी अशी का वागले? का मारलं? उष्ट्या हातानं, तेही थोबाडीत! संतापानं! मी का मारलं हे मलाच ठाऊक नाही असं म्हणणं म्हणजे खोटेपणा आहे. त्याला दूर केलं हेच बरं झालं.' तिनं स्वत:चं समाधान केलं. 'हा प्रामाणिक आहे. खोटं बोलणार नाही; पण त्याचा हा अतिहिशेबीपणा! नकोच.' तिनं स्वत:ला पटवलं. 'काल रात्री आपल्याला अशी कशी झोप लागली? ती खरंतर शून्य भाव भरून यायची वेळ! त्यात परवा सकाळपासून दिवसभर भरून राहिलेली ही भावना अशी कशी अदृश्य झाली? काल दुपारी एवढी ढाराढूर झोप काढली. संध्याकाळी मुलं असतानाही मरणाचं आकर्षण होतं. काल रात्रीच्या त्या प्रसंगानंतर ती जास्त व्हायला हवी होती; पण त्याऐवजी केवढी गाढ झोप आली!

'याचा अर्थ काय? त्याच्या स्नेहामुळे माझी मरण्याची भावना तीव्र होत होती? नाही. त्याची ओळख व्हायच्या आधीही ती होतीच. एवढीच तीव्र होती. नवीन ओळख झाली. ओळख दृढ होत गेली तेव्हा ती भावनाही कमी झाली होती. अलीकडे मात्र आजवर कधीही नव्हती एवढी ती भावना तीव्र होत होती. काल त्याला गमावल्याचं दु:ख, रिकामेपण ते मी कसंबसं सहन करू शकेन. पण तो शून्य भाव, ती आत्महत्येची प्रचंड इच्छा त्यातून सुटले तरी खूप झालं.'

सकाळी लवकर उठून अंघोळ केल्यावर बागेतल्या झाडांची फुलं वेचून ती देवघरात गेली. देवापुढे हात जोडताना तिच्या मनातला निश्चय आणखी दृढ झाला. मनात आलं, 'मला जगण्यासाठी आणखी कुणाचीही गरज नाही. या दोन्ही मुलांना मोठं करेन. आणखी काय पाहिजे जगायला?' त्याच भावनेनं मुलांच्या खोलीत जाऊन तिनं मुलांना मायेनं कुरवाळत जागं केलं, '... चला... उठायचं की नाही? उशीर होईल ना शाळेला... ऊठ विकास...'

त्या दिवशी कॉलेजमध्येही तिनं मन लावून शिकवलं. घरी आल्यावर आपल्या पुस्तकांमध्ये वेळ काढला आणि त्यातल्या न वाचलेल्या पुस्तकांची तिनं एक यादी तयार केली. त्यानंतर एक पुस्तक हातात घेऊन लाउंजमध्ये बसून संध्याकाळपर्यंत वाचून काढलं. वेळेवर निघून

मुलांना घरी घेऊन आली. त्यांचं खाणं आटोपलं.

त्यांना त्यांच्या खोलीत झोपवून बाहेर येताना आणखी एक विचार तिच्या मनात आला. 'काल रात्री खरकट्या हातानं मार खाऊन गेला. आज दिवसभरात त्यानं फोनही केला नाही.' पाठोपाठ प्रश्न उठला. 'फोन त्यानं करायला हवा होता की हात उगारलेल्यानं? दूर झालो ते उत्तमच झालंय; पण माझ्याकडून एवढा कडवटपणा यायला नको होता. माझं कितीही खरं असलं, तरी मारायला नको होतं. मी चुकले, असं कबूल करायला हवं होतं. ते उद्या फोन करून सांगता येईल. तेवढी नैतिक शक्ती माझ्याकडे निश्चित आहे. त्याच्या घरी फोन असता, तर आत्तासुद्धा फोन केला असता मी. घरी फोन घे म्हणून कितीतरी वेळा सांगितलं तरी ऐकलं नाही. म्हणाला, "रात्री आठ वाजेपर्यंत तर ऑफिसमध्येच असतो. घरी कशाला पाहिजे? उगाच डबल खर्च." माझं ऐकलं नाही. न ऐकेना! मला काय करायचंय? ती उपेक्षेनंच पुस्तक हातात घेऊन झोपली.

मध्ये केव्हातरी तिनं मान वर करून पाहिलं तेव्हा पावणे अकरा वाजले होते. 'बरोबर चोवीस तासांपूर्वी मी त्याला उष्ट्या हातानं... काहीही असो, असं एखाद्याला प्रत्यक्ष मारणं म्हणजे केवळ क्रौर्य नव्हे, त्याहीपेक्षा खालची पातळी ती! चावायला येणारं कुत्रं, शिंगं उगारून येणारं जनावर कुणालाच असं मारू नये.' तिनं स्वत:चा उजवा हात उघडून आपली बोटं पाहिली. डाव्या हातानं ती दाबून पाहिली. 'कठीण आहेत की नरम? छे:! तो प्रश्नच येत नाही. यानंतर कधीही कुणालाही असं मारणार नाही. रानटीपणानं वागणार नाही.

'पण या आधी तरी मी कुणाला मारलं होतं? आणि मी चिडून मारलंही असेल, पण त्यानं संयम राखून का विचारलं नाही, का मारलंस म्हणून? खरं प्रेम असेल, तर संयमही असतो. याचं प्रेम खरं नाही. सगळा वरवरचा देखावा आहे. पुढं कधी संधी मिळाली, तर हा प्रश्न नक्की विचारेन मी. शिवाय फोनही त्यानंच करायला हवा होता.' या निर्णयावर ती आली. त्यानंतर कितीतरी वेळ आपण होऊन फोन करून घरी आलेल्या आणि 'तुझं मन मला समजलं नाही' म्हणून गयावया करणाऱ्या सोमूचं चित्र रंगवण्यात ती गढून गेली. दिवा या स्वप्नात अडथळा आणतो म्हणून तिनं स्विचही बंद केला. थोड्याच वेळात ती झोपी गेली.

ती सकाळी उठली तेव्हा 'आज कुठल्याही परिस्थितीत त्याच्याशी संपर्क साधायला पाहिजे. फोनवरून का होईना, त्याच्याशी बोलायला पाहिजे.' ही भावना प्रबळ झाली होती. 'आत्ता, या क्षणीही धावत गेलं तर... घरी गाढ झोपला असेल.' पण मुलांना उठवून शाळेत पोहोचवायचं काम होतं. शाळेत पोहोचवून आल्या-आल्या कॉलेजची वेळ झाली होती. कॉलेजमधून घरी येताना वाटलं, 'आता परस्पर ऑफिसमध्ये का जाऊ नये? चेंबर साउंडप्रूफ आहे.' पण मनात भीती वाटू लागली. 'एवढी का भीती वाटावी? काय करेल तो? फार फार तर, तुम्ही कोण? इथं का आलात? गेट आऊट! म्हणेल. नाहीतर नव्या खुर्चीवरून उठून येऊन मी मारलं त्यापेक्षाही जोरात, मेंदू हलेल इतक्या जोरात एक ठेवून देईल. मग माझं सगळं दु:ख हलकं होऊन जाईल.' नुसत्या विचारानंही तिला हलकं वाटलं. 'क्षणभर गालाची आग होईल. दहा मिनिटं, अर्धा तास, एक तास, फार तर दोन दिवस सूज राहील. राहू दे. त्यामुळे जे समाधान मिळणार आहे ते कल्पनेच्याही पलीकडचं आहे. हो, असंच करावं.' आता तिला छान सुचलं. 'त्याच्या चेंबरचा दरवाजा लोटून आत जायचं. खुर्चीजवळ जायचं आणि गाल पुढं करून सांगायचं, "अवाक्षर बोलू नकोस. तुझा उजवा हात उचल आणि माझ्या थोबाडीत मार. फक्त

एकदा नव्हे, मनाचं समाधान होईपर्यंत! तुझ्या नव्हे, माझ्या मनाचं! फाड्! एकावर एक बसली पाहिजे. तूही बोलू नकोस. मी तर ब्र काढणार नाही.” ’

या विचारावर ती स्वत:च इतकी खूश झाली की, तिनं गाडीचा वेग कमीही केला. पण... ‘नाही. तो मारणार नाही. त्याचा पाषाणासारखा स्वभाव मला ठाऊक आहे. अत्यंत निष्ठुर आहे तो. मला पाहताच सगळा संयम एकवटून तो पाषाणासारखा उभा राहील. मी कितीही बोलले-रागावले तरी एक अक्षरही उलटून न बोलणारा तो, हात उगारणं कसं शक्य आहे? अगदी मूलत: क्रूर आहे तो! आता मी त्याच्यापुढे गेले आणि त्यानं थोबाडीत न मारता, अवाक्षरही न बोलून पराकोटीचा तिरस्कार दाखवला तर?’ ती मनोमन घाबरून गेली. त्याच्या ऑफिसकडे जायचा विचार रहित करून, शेजारच्या बोळात वळून तिनं गाडी आपल्या घराकडे नेली.

कुत्र्यांना खायला देऊन त्यांना मोकळं सोडून ती लाउंजमधल्या सोफ्यावर बसून राहिली. भूक जाणवत होती; पण वाढून घ्यायची शक्ती कुणीतरी काढून घेतली होती. जेवून काय करायचं? नाही जेवलं तर काय होणार आहे? यासारखे प्रश्न मनात निर्माण करून त्यांच्याशी वाद घालायची इच्छाही राहिली नव्हती. सोफ्यावर अंग टाकून काही वेळ ती पडून राहिली. डोळे मिटून पडून राहिली. मनात निश्चय उमटला. बघता बघता तो दृढही झाला.

‘आज त्याला फोन करेन आणि इथं यायला भाग पाडेन. अमृता आहे मी! मला त्याच्या अंत:श्रृतींची पूर्ण माहिती आहे. त्या कशा छेडायच्या हे मला कुणी शिकवायची गरज नाही.’

ती निश्चयानं उठली. घड्याळ पाहिलं तेव्हा पावणेदोन वाजले होते. ‘जेवण करून तो ऑफिसमध्ये आला असेल.’ ती घाईनं बेडरूममध्ये गेली. नंबर फिरवताना मन उत्सुक झालं होतं. ‘आता त्याचा आवाज कानावर येईल, हॅलो, मी फक्त ‘मी’ म्हणून गप्प राहीन. मग त्यालाच काहीतरी बोलावं लागेल. काय बोलेल तो? कसा बोलेल? काहीही बोलला तरी त्याच्याच शब्दांत पकडेन’. आणि आत्मविश्वास नखशिखान्त भरला असतानाच पलीकडून आवाज आला, “हॅलो, शेखर अँड शहा आर्किटेक्ट!”

आवाज नीळकंठप्पांचा होता.

बसलेल्या धक्क्यातून स्वत:ला सावरत तिनं विचारलं, “मिस्टर सोमशेखर आहेत का?” तिचा आत्मविश्वास निम्म्यावर आला होता.

नीळकंठप्पांनी तिचा आवाज तत्काळ ओळखला. नव्या ऑफिसच्या संदर्भात त्यांचं बऱ्याच वेळा फोनवर बोलणं झालं होतं. त्यांनी लगेच सांगितलं, “ते मुंबईला गेलेत मॅडम!”

“केव्हा? आणि असे अचानक?”

“त्यांच्या पार्टनरचा फोन आला होता. एका मोठ्या कामाच्या कन्सल्टेशनसाठी गेलेत. काल बेंगळुरूला गेले आणि आज सकाळी प्लेननं मुंबईला गेले. पंधरा दिवसांनी येतील. तुम्ही त्या दिवशी जेवायला नव्हता मॅडम. संध्याकाळीही का आला नाहीत?”

शेवटच्या प्रश्नाचा तिला राग आला. ‘काय हा आगाऊपणा!’ असं वाटलं, तरी ते दाखवून न

देता ती म्हणाली, “घरी पाहुणे आले. अर्जंट काम होतं. त्यांना हॉस्पिटलमध्ये न्यायचं होतं. कार्यक्रम छान झाला म्हणून मिस्टर सोमशेखरांनी सांगितलं. तुमची एवढी मदत असल्यावर सगळं नीट झाल्याशिवाय कसं राहील? यायला दोन आठवडे लागतील?”

“होय मॅडम.”

“बरंय. ठेवते. थँक्स!” म्हणत तिनं रिसीव्हर ठेवला तेव्हा तिचं मन धुरकट होऊन गेलं होतं.

‘पार्टनरनं फोन केला म्हणे! कधी केला होता? माझ्यावरच्या रागापोटी वैतागून निघून गेलाय हा. कन्सल्टेशन म्हणे! अशी...अशी बाई आहे, तिनं थोबाडीत मारली. आता काय करू म्हणून मित्राला कन्सल्ट करायला गेलाय! माहिताय याचं अर्जंट काम! मित्र तरी काय सांगणार? “असली बाई असेल, तर तिच्या नादी अजिबात लागू नकोस.” असंच सांगणार ना? मग हा माझ्या जीव द्यायच्या उत्कट इच्छेविषयी सांगेल. मग तो म्हणेल, “ही उत्तम संधी आहे. ती मुळीच सोडू नकोस. याच संधीचा वापर करून तिच्याशी असलेले संबंध मुळापासून तोडून मोकळा हो. नसत्या लफड्यात सापडू नकोस.” किती केलं तरी यशस्वी, व्यवहारचतुर बिझनेसवाला आहे नवीन शहा!

‘एक मात्र नक्की, दोन आठवड्यांनी जेव्हा तो मैसूरला येईल तेव्हा तो सोमू राहिलेला नसेल.’

तिच्या पोटात आगीचा डोंब उसळल्यासारखं झालं. ती उठून स्वयंपाकघरात गेली. एका ताटलीत थोडा भात वाढून घेतला. इतर तोंडी लावण्याची झाकणंही उघडून न पाहता निम्म्या भातावर आमटी आणि निम्म्यावर दही घेऊन बेडरूममधल्या सोफ्यावर बसून चमच्यानं खाऊ लागली. ‘मला भूक लागली, तर माझ्या पोटात जाळ उठतो, भगभगतं, डोळ्यांसमोर अंधारी येते. इतरांना काय? सगळे आपापलं सुख शोधत असतात. प्रत्येकाचा आपापल्या सुखाचा शोध!’

शेवटच्या वाक्यापाशी तिचं मन घोटाळलं. त्यापाठोपाठ मुंबईच्या यौवनेची आठवण धावून आली. तिच्याबरोबर दोन आठवडे सुखात राहायला, तर गेला नसेल? या विचारानंतर एकही घास घशाखाली उतरेना. ताटली टिपॉयवर ठेवून ती बसून राहिली. पोटात आगीचा डोंब उसळला. कुणीतरी पेट्रोल ओतून पेटती काडी टाकावी तसा भडका उडाला.

‘आता समजली त्याची लायकी! अशा माणसाच्या हाती सर्वस्व सोपवणारी मीच खरी महामूर्ख!’ डोळ्यांतले संतापाचे अश्रू भातात पडले.

त्या रात्री तिला झोप लागली नाही. संतापाच्या लाटेपाठोपाठ आत्मावलोकनाची लाट. ‘कुठं फसले मी ही? तिचं नाव काय? त्यानं कधीही तिच्या नावाचा उच्चार केला नाही. त्याला आदर म्हणायचा की आणखी काय? एकदा माघारी निघून आल्यावर त्यानं पुन्हा संबंध ठेवले नाहीत म्हणे. केवळ सुखासाठी दोघं भेटत होते म्हणून सांगत होता. त्या तीन-चार तासांतला एक क्षणही ती वाया घालवायची नाही म्हणे! त्या सुखाचा एकेक पदर उलगडून रसास्वादाच्या विविध पद्धतींचा अनुभव देणारी गुरू म्हणे ती! तिचा विषय निघाला की, त्याच्या दृष्टीत

सुखस्मृती तरळून जातात. तो कितीही कंटाळलेला असो, तिचा विषय निघताच मनात निर्माण होणाऱ्या भावना लपवणं त्याला शक्य नसतं.

'आणि या विषयातलं मला काय कळतंय, ढेकळं? साहित्यात दिसणाऱ्या अप्रत्यक्ष वर्णनातून मिळणाऱ्या अर्धवट ज्ञानापर्यंत माझी अक्कल सीमित होती. कधी मनात काही भावना झाली, तरी लाज, शरम यात गुरफटून राहत होते मी. त्यानं पुढाकार घेऊन मला शिकवण्याची गरज होती. मध्येच बर्फासारखी थंडगार होऊन जाणारी मी. त्याच्याही उल्हासावर त्यामुळे पाणी पडलं नसेल काय? सुखाच्या परमोच्च बिंदूला पोहोचल्यावरही त्यात मग्न न होता एकाएकी मनात शून्य भाव भरून मरणाची अपेक्षा तीव्र झाली होती. माझ्यातला हा फरक त्याही क्षणी त्याच्या अतिसूक्ष्म मनाला जाणवून त्यानं विचारलं होतं, "अमृता, का अशी झालीस गं? तुझ्या डोळ्यांमध्ये तिरस्कार का?" अशाच सुखाच्या वेळी "अजून नाही भागली तुमची पशुलालसा?" असं विचारूनही त्याला दु:ख दिलंय.' तिच्या डोळ्यांसमोर त्याचा त्या वेळचा अतीव दु:ख आणि तीव्र निराशा यांनी भरलेला चेहरा आठवताच मी त्याला साजेशी नाही या विचारानं तिचं मन संकोचून गेलं. 'पुरुष स्त्रीकडून नेमकी कशाची अपेक्षा करतो? काय दिलं असता स्त्री त्याला कायमचं बांधून ठेवू शकेल? सुख-समाधान, शांती, आत्मविश्वासाची भावना? तिच्या तुलनेनं मी काहीच दिलं नाही.' हा विचार तिचं मन कुरतडू लागला.

'म्हणूनच हा मला सोडून मुंबईला गेलाय तिच्या मागं! जुने तुटलेले संबंध पुन्हा जोडायला! त्यालाही स्वत:चं सुख शोधायचा अधिकार नाही काय?' तिनं वास्तवतेला सामोरं जायचा प्रयत्न केला; पण कूस बदलताना तिला वाटलं, 'फक्त स्वत:चं सुख शोधणं एवढाच याचा उद्देश?' तिच्या मनात पुन्हा संताप भरला. 'असल्या पुरुषाशी संबंध ठेवायची माझी मुळीच इच्छा नाही. संबंध तुटला हेच चांगलं झालं. अशा माणसाची आठवण काढणं म्हणजे हीनपणा!' अशा विचारानं मनाचं समाधान करत असतानाच मनात तळमळ निर्माण झाली. पोटातलं ढवळून यावं तशी तळमळ! आतून जोरात रडू येऊ लागलं. त्यामागचं कारण मात्र समजत नव्हतं. कितीही आवरलं, तरी एक हुंदका बाहेर पडला. तिलाच तो ऐकू आला. मुलांना ऐकू येऊ नये म्हणून तिनं तोंडात पदराचा बोळा कोंबला; पण तरीही आतून रडू उसळत होतं. घसा-हिरड्यांचा बांधच नव्हे, छातीच्या बरगड्या मोडून पडतील असं वाटणारं रडू आलं. त्यातून पावलांचा आवाज ऐकू आल्यामुळे तिनं मान वर करून पाहिलं. विजय आत येत होता. तिच्याजवळ येऊन त्यानं विचारलं, "अम्मा, का रडतेस गं?"

'का रडतोय आपण?' तिला आता उत्तर समजलं असलं, तरी ते त्याला सांगणं शक्य नव्हतं. म्हणून तिनं सांगितलं, "का कोण जाणे, पोटात एवढं दुखतंय म्हणून सांगू!"

"मग डॉक्टर अंकलना फोन कर ना!" त्यानं सुचवलं.

"या अवेळी कशाला त्यांना त्रास द्यायचा? त्यांनी एक गोळी दिली होती, ती घेतलीये. आता दुखणं हळूहळू कमीही होतंय. तू झोप जा बाळ."

तरीही तो गेला नाही. काही वेळानं तिनं बळेच चेहरा थोडा हसरा केला आणि म्हणाली, "आता खूपच बरं वाटतंय बघ! कॉलेजमध्ये पार्टी म्हणून समोसा दिला होता. तो खाल्ल्यावर

काहीतरी झालं बघ. यानंतर नाही खाणार. तू झोप चल. मी झोपवते. विकास एकटाच आहे ना?" म्हणत ती त्याच्या खोलीत गेली आणि त्याला पुन्हा झोप लागेपर्यंत थोपटत राहिली.

तिला रडू का आलं होतं, हे तिला आता चांगलंच समजलं होतं. 'अशा माणसाच्या नादानं सर्वस्व गमावलं मी. किती पापी मी!' यात रंगनाथची मिरासदारी संपल्याचं दु:ख नव्हतं. 'मंगळसूत्र बांधलेल्या नवऱ्यापासून दूर राहून मी स्वत:ला शुद्ध राखलं होतं. स्वत:चा मान राखून राहिले होते. एकदा ती शुद्धता गमावली, तो मान घालवला, तर काय राहिलं? ही असली माणसं त्याच वासावर भटकत असतीलही; पण मी कशी त्याला फशी पडले? तेही आपण होऊन. मी आपण होऊन पुढाकार घेतला. छे! देवा, मला जगायचा अधिकार नाही. देवा, तुझ्यापुढे उभं राहायचा, दिवा लावायचाही अधिकार नाही. का जगावं माझ्यासारख्या क्षुद्र जंतूनं? तिला रिव्हॉल्वरची आठवण झाली. 'आज, या क्षणी सगळं संपवायला पाहिजे. जगण्यासाठी चोरटं कारणही शोधायची गरज नाही. आज सगळं संपवलं नाही, तर देवही क्षमा करणार नाही. पण घरात नको. अशा शांत वेळी रिव्हॉल्वरचा आवाज ऐकून मुलं खोलीबाहेर येतील आणि आईची अवस्था बघून त्यांना जो धक्का बसेल त्यातून संपूर्ण जीवनभर ती सावरली जाणार नाहीत. टेकडी, तिथला अंधार, हा खरोखरच शेवटचा दिवस!' तिनं लेटरपॅड काढलं. आपल्या मृत्यूला आपणच जबाबदार असल्याचं चिरपरिचित वाक्य लिहून सही, तारीख, वेळ घालून, पॅड अंथरुणावर ठेवून ती बाहेर पडण्यासाठी उठून उभी राहिली. 'विजय गाढ झोपला असेल काय? त्याला जाग आली तर?' ती पुन्हा बेडरूममध्ये आली. रिव्हॉल्वर शेजारी ठेवून खिडकीचा पडदा सारून कितीतरी वेळ समोरच्या अंधाराकडे आणि त्यापलीकडे असणाऱ्या, अंधाराचंच घनरूप असलेल्या टेकडीकडे पाहत राहिली. केव्हातरी सोफ्यावर बसल्या-बसल्या तिला झोपही लागली.

सकाळी जाग आली. रात्री मनात आलेल्या विचारांची तिला स्वत:लाच लाज वाटली. 'छे! तो त्यातला नाही. त्याला माझा राग आला, तर माझ्यापासून दूर होईल; पण एकदा सोडल्यावर तो पुन्हा तिच्या मागं तिला शोधत जाणार नाही. त्याला तिचा विषयही काढलेला आवडत नाही. काढला की, अप्रसन्न होऊन लगेच दूर होतो. अशा तऱ्हेनं दूर झालेले एवढ्या वर्षांनंतर पुन्हा जवळ कसे येतील? खरोखरच नवीन शहाला गरज पडली असेल म्हणून त्यानं बोलावून घेतलं असेल.' या विचारासरशी तिचं मन हलकं होऊन गेलं आणि 'मी रात्रभर कसा विचार करत होते!' तिला स्वत:चा तिरस्कारही वाटला.

मुलांना शाळेत सोडल्यानंतर ती कॉलेजमध्ये गेली. त्या दिवशी लागोपाठ तीन लेक्चर्स होती. ती तिनं उत्साहानं घेतली. त्यानंतर प्रिन्सिपॉलबाईंनी ठेवलेली मीटिंग संपवून कारनं घरी परतताना तिच्या मनात आलं, 'नीळकंठप्पांकडून मुंबईचा नंबर घेऊन फोन का करू नये? काही बोलायचं नाही. तुझी खुशाली विचारण्यासाठी फोन केला म्हणून सांगायचं. जवळपास कुणी असलं, तरी तो कन्नडमधून बोलू शकेल. इकडून मी हवं तेवढं बोलू शकेन. आज तीन दिवस झाले. त्याचा रागही ओसरला असेल. तुझी क्षमा मागायला फोन केला म्हणून सांगितलं, तर कठोर राहणं शक्यच नाही त्याला. माझ्याविषयी त्याच्या भावना किती हळुवार आहेत, हे मला ठाऊक नाही काय?'

घरी पोहोचल्यावर तिनं गेटपाशी बांधलेल्या टपालाच्या पेटीत पोस्टानं टाकलेली पत्रं काढून घेतली आणि पुन्हा पेटीला कुलूप लावून गाडी सावलीत उभी करून ती आत आली. एक

इस्टेटीवरून आणि दुसरं बँकेचं पत्र होतं. तिनं आधी इस्टेट मॅनेजरचं पत्र फोडून वाचलं. यंदाचा पाऊस, पीक-पाणी, खतं वगैरे सगळा तपशील कळवून शेवटी त्यानं लिहिलं होतं,

> 'तुम्ही शक्य तितक्या लवकर येऊन जावे ही विनंती. काही निर्णय घेणे अगत्याचे आहे. मला मैसूरला येणे अशक्य नाही, पण आपण आलात तर सगळीच कामे एकत्रितपणे होतील. सोसायटीकडून कर्जफेडीचा तगादा आला आहे.'

'खरोखरच एकदा जाऊन यायला पाहिजे. या शनिवारी जाऊन रविवारी संध्याकाळपर्यंत माघारी येणं शक्य आहे.' विचाराच्या तंद्रीत तिनं दुसरं पाकीट फोडलं आणि ती आश्चर्यचकित झाली. बँकेनं पत्रानं कळवलं होतं, '... तारखेला तुमच्या खात्यावर एक लाख बेचाळीस हजार रुपये जमा झाले आहेत.' सोबतच्या छापील फॉर्मवरून 'लोकल कलेक्शन'मधून जमा झाल्याचं समजत होतं. लोकल कलेक्शनमध्ये एवढे पैसे कुठून असायला? पाठोपाठ संशय आला, 'यानं तर हे पैसे भरले नसतील? हो, आकडाही तेच सांगतोय. त्यानं माझ्याकडून एक लाख चाळीस हजार घेतले होते. हं, म्हणजे त्यानं व्याजही भरलंय म्हणायचं! शेकडा सतराप्रमाणे व्याज!' ती आतल्या आत कोसळून गेली होती. तशीच ती आपल्या बेडरूममध्ये गेली आणि बँकेत फोन केल्यावर सगळा खुलासा झाला. उत्तर आलं, "... तुमचे आर्किटेक्ट मिस्टर सोमशेखर यांनी त्यांच्या बँकेतून ट्रान्स्फर केले आहेत मॅडम. त्या बँकेच्या मॅनेजरांनी मुद्दाम ऑर्डर पाठवली."

"मी गावात नव्हते. आता तुमची ॲड्रेसस्लिप मिळाली. म्हणून चौकशी केली. थँक्स!" म्हणत तिनं पाठोपाठ सोमशेखरच्या बँकेतही फोन केला. गेल्या महिन्यात केलेल्या व्यवहाराच्या वेळी तिथल्या मॅनेजरशी तिची ओळख झाली होती. त्या वेळी त्या मॅनेजरनं तिच्याकडे डिपॉझिटही मागितलं होतं. अर्थात त्या वेळी स्वत:ची परिस्थिती आठवून तिला हसूही आलं होतं. तिनं आता त्यांना फोन करून विचारलं, "मिस्टर सोमशेखर परगावी गेले आहेत. त्यांच्या खात्यातली मोठी रक्कम आपण माझ्या खात्यावर जमा केली आहे. मी त्यांच्या ऑफिसचं काम बघत होते हे आपल्याला ठाऊक आहेच. प्लीज हे पैसे कुठून आले ते सांगाल काय? इथं रजिस्टरमध्ये नोंद करायचीये म्हणून विचारलं."

"आमच्या मुंबईच्या बँकेतून टेलेक्स मेसेज आला दहा वाजता. त्या वेळी ते गावात होते मॅडम. मी त्यांना फोन केला तेव्हा त्यांनीच ते तुमच्या खात्यावर ट्रान्स्फर करायला सांगितले. तुमची अडचण होऊ नये म्हणून आम्ही लगेच पाठविले. पाठवले म्हणून काय झालं? आपण एक चेक लिहून पुन्हा आमच्याकडे द्या पाठवून. आता आमचे व्याजाचे दरही चांगले आहेत." म्हणत ते बराच वेळ व्यावसायिक हसत राहिले.

"मिस्टर सोमशेखरांनी सगळं फारच वेगानं केलेलं दिसतंय." म्हणत फोन ठेवताना तिच्या मनात सगळ्या गोष्टी स्पष्ट झाल्या होत्या.

'खरकट्या हातानं मी मारल्याबरोबर तो इथून बाहेर पडला. इथून थेट घरी गेला की ऑफिसमध्ये गेला कोण जाणे! हिचं कर्ज नको म्हणून ऑफिसमधून मुंबईला फोन करून टेलेक्स मेसेज पाठवून पैसे मागवून घेतले आहेत आणि इथली बँक उघडताक्षणी कर्जमुक्त झालाय! आणि आता मुंबईला गेलाय तो याच व्यवहारासाठी!' तिला प्रचंड संताप आला.

त्याच खरकट्या हातानं आणखी चार-सहा वेळा फाड-फाड मारावंसं वाटलं.

कपडे बदलून कुत्र्यांना फिरायला सोडल्यावर ती आपलं जेवण ताटलीत वाढून घेऊन जेवायला बसली. टेबलापाशी बसून भात कालवताना तिची नजर स्वत:च्या खरकट्या हातावर खिळली. 'तिरस्कारानं मला दूर लोटलंय त्यानं. कधीही जवळ येणार नाही एवढ्या लांब लोटलंय.' विजेचा झटका बसावा तसं तिचं मन बधिर झालं. विचारशक्ती गोठून गेली.

कितीतरी वेळानं ती भानावर आली तेव्हा तिच्या उजव्या हाताची खरकटी बोटं आखडल्यासारखी झाली होती. उठून ताटली खरकट्या भंड्यात ठेवून तिनं हात बराच वेळ नळाखाली भिजवून व्यवस्थित धुतला आणि ती आपल्या बेडरूममध्ये आली. अंथरुणावर पडताना मनानं निर्वाळा दिला. 'एक संबंध कायमचा संपून गेला. त्यानं तो संपवला आहे. काहीही असलं, तरी हेही सहन करून जगता यायला पाहिजे. नाहीतर मरता यायला पाहिजे. दुसरा उपाय नाही. नाही? का नाही? मी जन्मल्यापासून हाच टिकोजीराव होता काय? मग आता हा नाही म्हणून मी का मरावं? मी मरावं म्हणून तो निघून गेलाय. पण मी मरणार नाही. जगेन! शंभर वर्षं जगेन!'

ती ताडकन उठून स्वयंपाकघरात गेली. ताटलीत रोजच्यापेक्षा जास्त भात वाढून घेतला. त्यातल्या निम्म्या भातावर आमटी आणि निम्म्यावर दही घेऊन तिनं उभ्या उभ्याच भात संपवला आणि हात धुवून पुन्हा बेडरूममध्ये आली. तिथं बसणं किंवा झोपणं तिला बरं वाटेना. बाहेर येऊन तिनं गॅरेजमधला टिकाव आणि फावडा बाहेर काढला आणि पदर बांधून ती बागेत काम करू लागली. कितीही केलं तरी संपणार नाही एवढं काम समोर दिसत असल्यानं तिला बरं वाटलं. 'महादेवम्माच्या नवऱ्याला सांगून प्राणिसंग्रहालयातलं खत आणायला पाहिजे. प्रत्येक रोपाच्या मुळाशी ते घालायला पाहिजे. दररोज पाइपनं रोपांना पाणी पाजायला पाहिजे.'

साडेचार वाजेपर्यंत ती बागेतच काही ना काही करत होती. नंतर घामानं भिजलेले कपडे बदलून, वेगळी साडी नेसून कुत्र्यांना त्यांच्या जागी बांधल्यावर ती मुलांना गाडीनं घरी घेऊन आली. त्यांचं खाणं-पिणं, घराच्या मागच्या बाजूला त्यांच्याशी शटलकॉकनं खेळणं, जेवण, गोष्ट... रात्री तिला अंथरुणावर पडल्या पडल्या गाढ झोप लागली. अगदी छान गाढ झोप!

रात्री दोन वाजता ती जागी झाली. धाडकन नव्हे, सावकाश, शांत झोपेतून जागं व्हावं तशी जाग आली. दंड-हात-मंड्या चांगलेच दुखत होते. 'रोज काम करत राहिलं, तर दुखणार नाहीत. प्रकृतीच्या दृष्टीनंही चांगलं.' पुन्हा तिचं मन त्यानं केलेल्या व्यवहाराकडे धावलं.

'मी त्याला कॅश आणून देते म्हणत होते; पण त्यानं चेकनं पैसे घेतले. त्यातही लाख रुपयांचा चेक होता. इतर पैसे मीच वेळोवेळी लागतील तसे खर्च केले. त्यासाठी कुठलीही चिठ्ठी-चपाटी नाही की कुठला पुरावा नाही. त्या लाख रुपयांच्या संदर्भात कुठले कागदपत्र केले नव्हते. कोर्टात गेले, तरी हे पैसे वसूल होणं शक्य नव्हतं. पण त्यानं तसं केलेलं नाही. घर बँकेत तारण म्हणून ठेवताना आलेला रजिस्ट्रेशनचा खर्चही त्यानं फेडला आहे. मी खरकट्या हातानं मारल्याचा राग धरून संबंध तोडताना त्याला हे पैसे दंड म्हणून स्वत:कडे ठेवणं सहज शक्य होतं. त्यानं तसं केलं नाही. पैसे दिले आणि संबंध पूर्णपणे तोडले.'

तिला जलजानं सांगितलेली त्याच्या विद्यार्थी दशेतली घटना आठवली. दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असताना ज्यानं एवढा वजनदार हार परत केला, तो आता तरी आणखी कसा वागणार? मनात एकीकडे त्याच्या वागण्याचं अप्रूप वाटत असतानाच संताप दाटून आला, 'सोमू, तू मुळीच सौम्य नाहीस. भयानक आहेस तू! मग तिथं प्रेम, मार्दवता कुठून असणार?'

पाठोपाठ रंगनाथची आठवण झाली. 'एकूण बेचाळीस लाखांची फसवणूक! इंजिनियर रंगनाथची लाचखोर म्हणून ख्याती आहे म्हणे! त्यानं प्रत्यक्ष मागायचीही गरज नाही. अमुक टक्के रुपये आपोआप त्याच्याकडे पोहोचते होतात.'

रंगनाथच्या आठवणीपाठोपाठ म्लान मनात शून्य भाव भरू लागला. रिव्हॉल्वर बाहेर काढावंसं वाटू लगलं.

सकाळी आठ ते रात्री आठपर्यंत कामात बुडून गेलेल्या सोमशेखरला 'शहा अँड शेखर' कंपनीच्या तेराव्या मजल्याच्या खिडकीतून बाहेर पाहण्याइतकीही सवड नव्हती. बारा वर्षं या गावात असं राबल्याचं आठवताच पुन्हा या गावी का येऊ नये, असं अनेकदा त्याच्या मनात येऊन गेलं होतं. नवीनही इथं आल्यापासून तीन-चारदा म्हणाला होता, "सोमूभाय, तू इथून गेलास तेच चुकलं बघ. निघून ये इथं. दोघं मिळून पुन्हा बिझनेस करू या."

स्वत: सोमशेखरच्या मनातलं मैसूरचं आकर्षणही एकाएकी ओसरून गेलं होतं. एकदा काम करायचं म्हटल्यावर मुंबई काय आणि मैसूर काय! मुंबई सोडताना मनात आलेले सगळे विचार एका विशिष्ट मर्यादेतच खरे आहेत, असंही समर्थन त्याला सुचत होतं; पण पाठोपाठ हेही समजत होतं, 'केवळ तिच्यापायी मैसूरला मूळ धरू पाहणारा आपला व्यवसाय उपटून पुन्हा मुंबईला येणं हे चंचलपणाचं लक्षण आहे. व्यवसायात हे चालणार नाही. शक्य तितक्या लवकर नवसारीच्या फॅक्टरीचं प्रमुख काम संपवून मैसूरला जायला पाहिजे.' हा त्याचा निर्णय ढळला नव्हता. तो दररोज रात्री आठ वाजता फोन करून नीळकंठप्पांकडून मैसूरमधल्या कामांची चौकशी करून त्यांना आवश्यक त्या सूचना देत होता. गिऱ्हाइकांना आपण यायचा दिवस कळवून त्यांना समाधानी ठेवायला सांगत होता.

मधूनच अमृताची आठवण त्याच्या मनाला व्यापून टाकत होती. इथं आल्यावर नवसारीला जाणं-येणं, फॅक्टरीची पाहणी करून उपस्थित होणाऱ्या प्राथमिक कल्पना जाणून घेऊन पुढच्या कामाला लागणं यामध्ये चार दिवस गेल्यानंतर त्याचा तिच्यावरचा संताप आणि तिरस्कार ओसरला होता आणि तिच्या वागण्याचा शांत चित्तानं अर्थ लावला पाहिजे असं त्याला वाटू लागलं होतं.

कारणाशिवाय संतापणं, अकारण टोमणे मारणं, टोचून बोलणं यात त्याच्या दृष्टीनं नवं काही नव्हतं. प्रत्यक्ष हात उगारून थोबाडीत मारणं हे त्याचंच पुढचं रूप. 'अशी का वागते ही? जीवनात तिच्यावर अन्याय झालाय, तिची फार मोठ्या प्रमाणात फसवणूक झाली आहे. तीस-चाळीस लाखांनी फसलं जाणं ही काही साधी गोष्ट नाही. ज्याच्याशी संपूर्ण आयुष्य विश्वासानं काढायचं तो नवराही तिच्या फसवणुकीला जबाबदार आहे. हे सगळं असह्य होऊन तिच्या मनात आत्महत्या करण्याची प्रवृत्ती जन्मली आहे. त्यामुळे अनावर संताप येतो हेही कबूल; पण माझ्यावर सतत संतापत राहणं, खरकट्या हातानं थोबाडीत मारणं हा कुठला न्याय

झाला? ज्यांनी तिच्यावर हा अन्याय केलाय त्यांच्यावर तिला हवं तर संतापू दे, मारू दे, रिव्हॉल्वरनं गोळ्या घालू दे. हवं तर कायद्याची मदत घेऊन त्या काकूवर कोर्टात केस करू दे. उलट ही सगळी हकिकत एकदा कधीतरी एखादी गोष्ट सांगावी तशी सांगितली तेवढंच. त्यानंतर ती त्या कुणाचाही उल्लेखसुद्धा करत नाही की राग दर्शवत नाही. सगळा संताप-तडफडाट माझ्यावरच! माझ्या निस्सीम प्रेमाची तिच्याकडून ही परतफेड!'

वरचेवर हेच विचार मनात येऊन तो पुन्हा एकाच निर्णयापाशी येत होता, 'तिच्यापासून लांब राहणंच उत्तम! शाळेतल्या मुलांसारखं तिची बोलणी खाणं नको आणि मार खाणंही नको.'

तरीही मन मात्र तिच्या आठवणींनी भरून राहत होतं.

एका संध्याकाळी तो नवीनच्या घरी जेवायला गेला होता. बाहेर कामासाठी गेलेला नवीन अजून परतला नव्हता. इंदूबेननं बोलता बोलता विचारलं, "सोमूभाई, गेल्या वर्षी आम्ही निलगिरीकुर्गला आलो होतो तेव्हा मी तुम्हाला लग्नाचं विचारलं होतं, का त्यात लक्ष घातलं नाही?"

काही उत्तर न देता तो मंद हसला.

"चांगले प्रतिभावान आर्किटेक्ट आहात, बिझनेसमध्ये सेटल होत आहात. अलीकडे कितीतरी जण या वयात पहिलं लग्न करत असतात. वर्तमानपत्रात मॅट्रिमोनियलमध्ये जाहिरात द्या किंवा तिथं आलेल्या जाहिरातींना उत्तर लिहा. हवं तर आम्ही तुमच्यासाठी पत्रव्यवहार करू. संध्याकाळी दमूनभागून घरी गेल्यावर स्वत:चा म्हणून संसार नसेल, तर मिळवायचं तरी कशासाठी?"

नवीन आणि दिगंत घरी आल्यावर चौघंही जेवायला बसले. त्याही वेळी तिनं पुन्हा तो विषय काढला, "सोमूभाईंना म्हटलं, लग्न का केलं नाही? मी म्हणते, तुम्ही तरी आपल्या मित्रासाठी का मुलगी पाहत नाही? सोमूभाई, तुमच्या बेंगळुरूकडची रविवारची वर्तमानपत्रं इकडं मला पाठवून द्या. मी त्यातल्या निवडक स्थळांशी पत्रव्यवहार करेन."

नवीनही म्हणाला, "आर्किटेक्ट किंवा सिव्हिल लाइनची मुलगी बघ. म्हणजे तुझ्याबरोबरीनं कामही करेल."

इंदूबेन म्हणाली, "तुमच्या मित्राला काय म्हणायचंय लक्षात आलं ना? हल्ली मुली बऱ्या वागणुकीच्या नसतात. त्यामुळे तिला स्वत:च्या ऑफिसमध्ये ठेवायचं आणि पगार न देता! नवीन शहा किती बिझनेस-माइंडेड आहेत ते पाहिलंत ना? मी आणलेली दोन लाख कॅश आणि शंभर तोळे सोनं पुरेसं नाही म्हणून ते अलीकडे तक्रार करताहेत. चोवीस तास घरी राहून गरम ताजा नाश्ता, चहा, गरमागरम जेवण वाढतेय. तेवढं यांना पुरत नाही. आता म्हणताहेत, ऑफिसमध्ये जा, डुप्लिकेट कर, टाइप कर! घरच्या कामातच मी गाडली गेलेय. मी नाही तुमच्या ऑफिसमध्ये राबणार!"

सगळं संभाषण सोमशेखर कुठल्याही प्रतिक्रियेशिवाय ऐकत होता. पहिली पत्नी वारल्यानंतर वर्षभरातच इंदूबेन त्याला दुसरं लग्न कर म्हणत होती. आजचं तिचं बोलणं नवं मुळीच नव्हतं. बाहेर ऑफिसमध्ये नोकरी करणाऱ्या मुलींविषयीचं तिचं मतही जुनंच होतं. त्यानं काही विशेष न बोलता जेवण संपवलं आणि जवळच असलेल्या हॉटेलमधल्या आपल्या खोलीवर जाऊन झोपला.

इंदूबेनचं एक वाक्य मात्र त्यालाही नाकारता येण्यासारखं नव्हतं. 'संध्याकाळी कामं संपवून घरी गेल्यावर स्वत:चा संसार नसेल, तर एवढं राबून मिळवायचं कशासाठी? नवीनचं कर्ज फेडण्यात एखादं वर्ष जाईल. फारफार तर दीड वर्ष. त्यानंतर जास्तीचं मिळवून करायचं काय?' संध्याकाळी हॉटेलमध्ये जेवून घराचं कुलूप काढताना येणारा वैताग त्याला अपरिचित नव्हता. 'लग्न ही एक बेडीच! भावना उसळलेली असो वा वठून गेलेली असो, नंतर राहतं ते केवळ कर्तव्याचं ओझं!' दिवसभर काम केल्यामुळे याच विचाराच्या तंद्रीत लगेच झोप लागली. शिवाय दुसऱ्या दिवशी नवसारीलाही जाऊन यायचं होतं.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आठ वाजता ऑफिसमध्ये तो कामं उरकायच्या गडबडीत होता. पूर्वीपासून याच ऑफिसमध्ये काम करणारा ड्राफ्टस्मन दिघे त्याच्या सूचनेनुसार नकाशा तयार करत होता. तोच फोन वाजला, "सर, तुमचा फोन. लांबचा कॉल दिसतोय"

"नीळकंठप्पांचा काही कामांच्या संदर्भातला अर्जंट फोन दिसतोय." असं मनाशी म्हणत सोमशेखर आतल्या चेंबरमध्ये जाऊन रिसीव्हर उचलत म्हणाला, "हॅलो, मी सोमशेखर."

यावर कानावर पडलेल्या आवाजानं तो अवाक झाला. त्या अपरिचित आश्चर्यात त्याचाही नकळत प्रसन्न भाव मिसळून गेला होता.

"सोमू, नीळकंठप्पांकडून तुझा फोन नंबर मिळाला. रात्री नऊ वाजेपर्यंत काम करत असतोस, त्यामुळे भेटशील म्हणाले ते. तुझ्यापाशी आणखी कुणी नाही ना? तसं असेल, तर तू कन्नडमध्ये बोल. मी बेडरूमचं दार बंद करून बोलतेय. ऐकू येतंय ना? 'हं' म्हण. नाहीतर मी कशी बोलू? तुझा राग अजून ओसरला नाही. सोमू, सोमू, माझ्या बाळा! 'हं' म्हण एकदाच! तुला एक वाक्य सांगायचंय म्हणून तळमळतेय इथं. पण तू 'हं' म्हणेपर्यंत मी कसं बोलू? शहाणा ना तू? 'हं' म्हण माझ्या बछड्या!"

"हं." अखेर तो म्हणालाच.

"क्षमा मागायची लायकीही मी पूर्वीच गमावली आहे. ही माझी काही पहिली चूक नव्हे. तरीही तू मला माफ केलं आहेस, हे मला ठाऊक आहे सोमू! तू काही फार उच्च माणूस आहेस म्हणून नव्हे. तुझं प्रेम तेवढं मोठं आहे! केवढाही संताप पचवण्याची ताकद आहे त्यात. म्हणून मी अशी बोलतेय, बालिश मुलीसारखी! तू केव्हा येणार आहेस? बेंगळुरूला येऊन मी तुझी वाट पाहीन."

त्याला काय बोलावं हेच सुचत नव्हतं.

तीच पुढं म्हणाली, “तू फार कामात आहेस, हे मला ठाऊक आहे. एवढ्या घाईत काय सांगायचं म्हणून तू गोंधळून गेलायस ना? जेव्हा ठरेल तेव्हा फोन कर. नाहीतर मी करू का? केव्हा करू? तू एकटा असायची वेळ कोणती? मी दररोज फोन केला, तर तुझ्या नवीन शहाला संशय येईल म्हणून घाबरू नकोस. गिऱ्हाईक आहे, घर बांधतेय म्हणून सांग. ठेवू? बाय म्हण. तू बाय म्हणेपर्यंत मी रिसीव्हर ठेवणार नाही.”

अखेर त्यानं ‘बाय’ म्हटल्यावरच तिनं रिसीव्हर खाली ठेवला.

त्यानंतर अर्धा तास काम करून हॉटेलमध्ये जेवताना त्याला स्वत:मध्ये झालेला बदल जाणवून आश्चर्य वाटलं. तिच्याविषयीचा संताप आणि तिरस्कार पूर्णपणे नष्ट होऊन त्या जागी तिच्याविषयीची सहानुभूती भरून राहिली होती. ‘तिच्या वागण्यामागचं कारण तेवढंच तीव्र असलं पाहिजे. नाहीतर खरकटा हात उगारणं, तेही माझ्यावर, कसं शक्य आहे? किती कोमल स्वभाव आहे तिचा! मुंगीलाही न दुखावणारा! तिचा उबदार मृदू देह, चेहरा, हात, दंड, त्वचा! आतलं मनही तेवढंच मृदू आहे. मोगऱ्यासारखं. अंहं जुईच्या कळीसारखं!’ ती मधूनच अशी का वागते ते जाणून घ्यायची उत्कट इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली आणि त्या क्षणी आपलं मन पिसासारखं हलकं झाल्याचं त्याला जाणवलं. समोरची खिडकी, त्यातून दिसणाऱ्या रंगहीन सिमेंटच्या भिंती, गढूळ वातावरण, माणसांचा कलकलाट नष्ट होऊन आपण एखाद्या उत्तुंग पर्वतावर उभं राहून ढगांना स्पर्श करत असल्याचा त्याला अनुभव आला. हट्ट आणि संताप या माणसाला रसातळाला नेणाऱ्या भावनांपासून सुटका करून घेऊन आकाशात विहरत राहावंसं त्याला वाटू लागलं. दुसऱ्या दिवशी त्यानं आपण होऊन तिला फोन केला.

मुंबईहून निघायच्या आदल्या दिवशी त्यानं फोन करून सांगितलं, “प्लेननं बंगळूरला येतोय. तिथून मैसूरला. ठीक साडेअकराच्या सुमारास मी घरी येतोय.”

ती बेंगळुरूला एअरपोर्टवर गाडी घेऊन जायच्या तयारीत होती; पण तोच म्हणाला, “... तसं नको. मुलांच्या रात्रीच्या सोबतीचा प्रश्न आहे. त्यापेक्षा... हं... मैसूरच्या बसस्टँडवर वाट पाहा.” तिच्यासह बेंगळुरू-मैसूर प्रवास करायचा विचार कितीही उत्साहवर्धक असला, तरी तिच्या आजच्या आर्थिक परिस्थितीत हा खर्चाचा बोजा अनावश्यक होता, हेही त्याला समजत होतं.

मैसूर बसस्टँडमध्ये बस शिरत असतानाच त्यानं तिची कार पाहिली. तोही खिडकीकडेला बसल्यामुळे तिला लगेच दिसला. बस-स्टँडवर त्यानं जुईचा गजरा बांधून घेतला होता. गेल्या भेटीतल्या कडवट आठवणी परस्परांना न दर्शवता दोघंही तिच्या घराकडे निघाले. त्याची सूटकेस गाडीच्या डिकीत ठेवली होती. घराचं कुलूप काढून आत पाऊल टाकताच एकमेकांच्या उत्कट मिठीत बद्ध होता-होता जेव्हा दोघांच्याही तोंडून ‘... तुझ्याशिवाय जगणं शक्य नाही.’ हा उद्गार एकाच वेळी निघाला तेव्हा दोघांचेही चेहरे उजळून निघाले. तिचा चेहरा फिकुटल्याचं त्याच्या लक्षात येऊन तो लटक्या रागानं म्हणाला, “आजपासून नीट जेवली नाहीस, तर लाथ हाणतो की नाही बघ!”

तिची नजर अभिमानानं भरून गेली. तिनं केलेला साखरभात, सूप, फ्रूटसॅलड दोघांनी एका ताटात वाढून घेऊन परस्परांना भरवलं, आग्रह करून वाढलं. दोघंही भरपूर जेवले. जेवताना तो

मुंबईमधली कामं, मैसूरची कामं, दोन्हीमधला फरक या विषयी भरपूर बोलत होता.

कुत्र्यांना खायला देऊन त्यांना मोकळं सोडून ती आत आली. उत्कटपणे दोघंही अंथरुणात शिरले. काही वेळातच त्याला जाणवलेली गोष्ट म्हणजे तिच्यामधला संकोच कमी होऊन सक्रिय प्रतिसाद देण्याइतकी ती धीट झाली होती. या अचानक परिवर्तनामुळे आधी सुखावलेल्या सोमशेखरला हा तिचा सहज-स्वभाव नव्हे, हेही जाणवलं. लज्जेनं अर्धोन्मीलित असलेल्या पापण्यांमध्ये मार्दवता आणि गाढ-गहन भावना बंदिस्त करून ठेवणारी अमृता तिथं नव्हतीच.

त्याच्या सूक्ष्म संवेदनेला हा बदल अति रूक्ष वाटला. तिच्या कानापाशी ओठ नेऊन त्यानं विचारलं, "किती बदललीस अमृता?"

"बदलले? मला नाही ठाऊक." आश्चर्य व्यक्त करत ती म्हणाली.

"सगळं स्पष्टपणे उच्चार करून सांगायला पाहिजे असं नाही. त्यात काही चुकीचं आहे असं नव्हे, पण तुझा तो स्वभाव नाही. खरं की नाही? का बरं?"

ती काही बोलली नाही, पण सावध होऊन तिनं स्वत:ला संकुचित करून घेतलं. त्यानं पुन्हा कारण विचारलं. तेव्हा ती शरमेनं मेल्याहून मेल्यासारखी झाली होती. तरी ती कशीबशी म्हणाली, "नुकताच मुंबईहून आलास ना! मैसूर बेचव वाटू नये तुला."

त्याला काहीच उलगडा झाला नाही. त्यानं विचारलं, "म्हणजे काय? मला समजलं नाही. जरा स्पष्ट करून सांग."

"सगळं स्पष्टपणे उच्चार करून सांगायला पाहिजे असं नाही." तिनं त्याचंच वाक्य त्याला ऐकवलं.

काही क्षण गेल्यावर त्याला अर्थ उलगडला. तिच्या गालावर लटक्या रागानं चापटी मारत तो उद्गारला, "ए कपिबुद्धी! मी मुंबईला कुठल्या कामासाठी गेलो होतो ते नीळकंठप्पांनी तुला सांगितलं नाही? रात्री तू मुंबईला फोन केलास तेव्हा मी ऑफिसमध्येच होतो. तरीही तुला संशय वाटतो?"

पापण्या न उचलता ती खालच्या स्वरात म्हणाली, "क्षमा कर सोमू! मित्रानं कामासाठी तुला ताबडतोब बोलावून घेतलं आणि तू त्या कामासाठी गेलास, हे मला नंतर म्हणजे सहा दिवसांनी समजलं. जाऊ दे. ते सगळं आता आठवून ही भेट का विषमय करायची?"

"पण खरं ते समजायला पाहिजे. सांग." त्यानं आग्रह धरला.

"मी दुसऱ्या दिवशी ऑफिसमध्ये फोन केला तेव्हा तू बेंगळुरूला आणि तिथून मुंबईला जाणार आहेस एवढं नीळकंठप्पांनी सांगितलं. त्या वेळी मला तू टेलेक्सनं पैसे मागवून माझ्या खात्यावर भरल्याचं ठाऊक नव्हतं. माझा तुझ्यावरचा रागही शांत झाला नव्हता. तू मुंबईला कशासाठी गेला असशील? सतत डोकेदुखी आणि वेदना देणाऱ्या या मैसूरच्या राक्षसिणीपेक्षा

एक क्षणही वाया न घालवता सुखाचा वर्षाव करणारी जुनी मैत्रीणच चांगली, असा विचार करून जुनी मैत्री नवी करण्यासाठीच तू गेला असशील अशी माझी खात्री होती. तिच्या उल्लेखानं तुझ्या नजरेत ती चमक क्षणार्धात दिसून जाते. ती पाहताना मला मत्सर वाटत नाही असं म्हणणं म्हणजे खोटेपणा आहे; पण मी मुंबईला तुझ्याशी फोनवर बोलले त्यानंतर माझ्या मनात आलं, जे मी तुला देण्यात अपुरी पडले ते तिनं तुला भरभरून दिलंय! याबाबतीत ती जिंकली आहे आणि मी मात्र पूर्णपणे हरले आहे. निदान अशा आनंदाच्या क्षणी तरी तिला गुरू मानून तुला का अधिक सुखी करू नये? सांग ना, यात काय चुकलं माझं?"

त्याचं मन विचारात गढून गेलं. 'मुंबईमधल्या त्या अनुभवात केवळ आनंद होता, दु:खाला थारा नव्हता हे खरंच; पण त्याचबरोबर तिथं इतर कुठल्याही भाव-भावनांना प्रवेश नव्हता. तिथं स्त्री-पुरुष संबंधाचा हेतू अगदी स्पष्ट होता. तोच तिचा मनोधर्म होता.'

"अमू, मला त्या विषयी बोलायला आवडत नाही हे तुला ठाऊक आहे. ते संबंध तुटून कितीतरी दिवस लोटलेत. मी तिला विसरून गेलो, तरी तू विसरायला तयार नाहीस. का हे? तुम्हा दोघींची तुलना करणंही अगदी चुकीचं आहे. त्या संबंधाच्या बाबतीतही मी चुकीची भावना करून घेतली होती. कुणाचाही तिरस्कार करावा असं मला वाटत नाही."

"मीही तिरस्कार करण्यासाठी तिची माझ्याशी तुलना करत नाही. उलट माझ्यापेक्षा ती उत्तम मैत्रीण होती म्हणून तिला गुरू...."

"तुला माझ्यातच विरोधाभास दिसेल. मला तिचा तिरस्कार करायची इच्छा नाही आणि त्याचबरोबर तू स्वत:ची तिच्याशी तुलना करणंही मला आवडत नाही. मला कुणी श्रेष्ठ आणि कुणी कनिष्ठ असंही सुचवायचं नाही; पण तू कुणाशीही तुलनेत सापडणार नाहीस आणि तू नेहमी तसंच राहिलं पाहिजेस." त्यानं तिच्या भोवतीची मिठी घट्ट केली.

"केवळ शरीरसुख वगळता तुमच्या भेटींमध्ये आणखी कुठलीही भावना नसायची? स्नेह, एकमेकाला मदत करणं, मन मोकळं करणं."

"तसा कधी प्रश्नच आला नाही. एकदा असेच एकमेकांच्या सहवासात पाच-सहा तास काढल्यानंतर दोघंही तिथून निघताना एक गोष्ट तिच्या लक्षात आली. बँकेत जायचं ठरवूनही ती नंतर विसरून गेली होती. टॅक्सी करून घरी जाण्यापुरतेही तिच्याकडे पैसे नव्हते. ती संकोचून गेली होती. मी शंभर रुपये तिच्या हातात दिले. "एवढे नको." म्हणत तिनं त्यातले फक्त पंचवीस रुपये घेतले. मी किती म्हटलं तरी तिनं तेवढेच पैसे घेतले. आमच्या पुढच्या भेटीत तिनं आधी पंचवीस रुपये काढून माझ्या हातात दिले. मला वाईट वाटलं, "एवढा का कठोरपणा? मी तुझा कुणीच नाही?" यावर ती म्हणाली, "कुणीच नसतास, तर का आले असते मी? पण म्हणून मी तुझ्याकडून पैसे घेतले, तर त्याचा काय अर्थ होईल? तू पैसे घेतले नाहीस, तर मी तुला हात लावायला देणार नाही." त्या दिवशी मला तिच्या वागण्याचं वाईट वाटलं, पण नंतर विचार केल्यावर मला तिच्या त्या गुणाचा आदर वाटला."

एवढं सांगून तो गप्प बसला. एकीकडे त्याचं मन विचार करत होतं, 'मला स्त्रीकडून काय हवंय? तिच्या सान्निध्यात हा प्रश्नच उपस्थित होत नव्हता; पण हिच्या सान्निध्यात मात्र तो

प्रश्न वरचेवर उभा राहतो. कुठल्याही स्त्रीशिवाय सुखासमाधानानं राहणं अशक्यच आहे काय?'

तीही विचारात मग्न होती. ती एकदम म्हणाली, "एकीकडे तू तिचा विसर पडलाय, तिची आठवण काढू नकोस असं म्हणतोस; पण तुझ्या मनात मला तिच्याइतकी जागा नाही, ही वस्तुस्थिती आहे."

तिच्या त्या थेट आरोपानं तो सटपटून गेला. त्याचा चेहरा कष्टी झाला. त्यानं दु:खानं विचारलं, "काय म्हणतेस हे?"

"तिनं तुला पंचवीस रुपये परत केले. 'नाहीतर हात लावू देणार नाही' असं सांगून. तूही तसलाच! टेलेक्स मेसेजनं मुंबईहून पैसे मागवून घेतलेस, माझे पैसे परत करण्यासाठी! 'नाहीतर हिच्या-माझ्या संबंधाचा काय अर्थ होईल?' हा प्रश्न तुझ्याही मनात येऊन गेलाय! त्या प्रश्नाचं मूळ ती आहे. अमृताला केवळ अमृता समजून तू तिचं मन कधीच जाणून घेतलं नाहीस. एक बोलले तर राग येईल तुला."

एव्हाना तिची उत्कटता ओसरून एकमेकांच्या शरीराचं ओझं जाणवू लागलं. तसं दोघंही परस्परांच्या शेजारी झोपले. दोघांमधलं अंतर क्षणाक्षणाला वाढत चाललं होतं. मनातली अप्रसन्नता लपवून ठेवणं त्याला शक्य झालं नाही. त्यानं तसा प्रयत्नही केला नाही. काही क्षण मौनपणे सरल्यावर ती आपण होऊन त्याच्याजवळ सरकत म्हणाली, "तुझंच म्हणणं खरं आहे सोमू! मी वेगळी आणि ती वेगळीच! या आपल्या भेटीतला एकही क्षण न गमावता तुला भरभरून आनंद द्यायचा असं किती ठरवलं होतं मी; पण दु:खाच्या एकाही कणाशिवाय फक्त सुखाचा वर्षाव करायची शक्ती मला नाही आणि ज्याला देता येत नाही त्याला घ्यायचीही शक्ती नसते. मला क्षमा कर!" तिनं आपले उष्ण ओठ त्याच्या दोन्ही डोळ्यांवर टेकवले. तिला प्रतिसाद देण्याची भावना किंवा सौजन्य मात्र त्याच्यामध्ये राहिलं नव्हतं. 'कुठलंही बोलणं अत्यंत कडवटपणापर्यंत घेऊन जाते ही! कसं आणि कधी हेच कळत नाही.'

"तुला राग आला सोमू? अशा वेळी बोलणं वाढवू नये हे ठाऊक आहे रे; पण त्या-त्या संदर्भात तेव्हाच बोलून मोकळं होणं चांगलं. नाही का?"

तिचं बोलणं मध्येच तोडत तो म्हणाला, "पण तू संदर्भ नसतानाही कितीही क्रूर आणि कडवट बोलू शकतेस."

तिनं आपली तप्त दृष्टी त्याच्यावर रोखली. त्यानं तिकडं लक्ष न देता आपले पेंगुळल्यासारखे झालेले डोळे झाकले. त्या बंद डोळ्यांकडे काही क्षण पाहत राहून ती म्हणाली, "बोलणंही नकोसं वाटण्याइतका तुम्हाला तिरस्कार वाटत असेल, तर तुमची मर्जी!" म्हणत तिनं त्याच्याकडे पाठ केली. तोही मुकाट्यानं पडून राहिला. तिची समजूत घालणं किंवा तिला बळेच स्वत:कडे वळवणं, आपल्या कुठल्या वागण्यामुळे ती आणखी दुखावली जाईल याची कल्पना करत त्यानुसार वागणं अशक्य होऊन तो काहीही बोलला नाही.

काही वेळ तसाच गेला. ती ताडकन उठून बसली. पांघरुणाआड दडलेल्या नग्न देहाची

पराकोटीची शरम आणि संताप वाटून तिनं कॉटच्या शेजारी जमिनीवर पडलेले आपले कपडे उचलले.

कपडे करून ती पुन्हा कॉटपाशी येऊन कडेला बसली. प्रत्येक शब्द विचारपूर्वक उच्चारून ती म्हणाली, "तूच सांगतोस दोघींमध्ये फरक आहे. बँकेत जायला वेळ मिळाला नाही म्हणून टॅक्सीसाठी घेतलेले पैसे तिनं तुला परत केले. टेलेक्सनं पैसे मागवून मला तू दिलेस त्यामागचं कारण वेगळं असंच तुला म्हणायचंय ना? त्यात खरकट्या हातानं थोबाडीत मारण्यासारखं काही नव्हतं. असंच तू म्हणतोस ना? खरं सांग."

'पुन:पुन्हा तेच बोलायचा माझा स्वभाव नाही.' असं वाक्य त्याच्या जिभेच्या टोकावर आलं होतं, तरी त्यानं ते आवरलं. तिनं कपडे केल्यानंतर आपण अशा अवस्थेत राहणं त्यालाही केवळ शरमेचं नव्हे, हीनपणाचं वाटत होतं. मनात निकटभाव भरला असता दोघांचा अहंपणा नष्ट झाल्यावर जी अवस्था आनंददायी होती, तीच अवस्था अहंकार जागृत होऊन मनं दूर झाल्यानंतर विलक्षण चमत्कारिक वाटत होती.

तीच पुढं म्हणाली, "मी थोबाडीत मारली म्हणून माझ्याबरोबरचे कसलेही संबंध नकोत असंच तुला म्हणायचंय ना?"

तिचं बोलणं निम्म्यावर अडवत तो म्हणाला, "हे बघ, मी काहीही बोललो नाही. तूच काहीतरी कल्पना करतेस आणि तूच बोलतेस."

"सोमशेखर, आता उगाच वाद घालून आपली विद्वत्ता दाखवू नका. तुमच्या मनात काहीही नव्हतंच, असं तुम्ही सिद्ध करू शकणार नाही. मनात काही नसतं, तर तुम्ही टेलेक्सनं पैसे का मागवले? ते आल्या आल्या दहा मिनिटंही जाऊ न देता माझ्या खात्यावर का जमा केले? माझ्या प्रश्नांचं समाधान तुमची काल्पनिक उत्तरं करू शकणार नाहीत. शेवटी सत्य माझ्याकडेच आहे. तेही जाऊ द्या. तुम्हाला मारल्याची चूक तुम्हाला आभाळाएवढी वाटली! पण आजवर कधीही कुणाशीही असं न वागलेली सुशिक्षित बाई अशी का वागली असेल याचा तुम्ही विचार केलात काय? त्यामागचं कारण समजून घ्यायचा कधी प्रयत्न केलात? मी एवढी वर्षं नोकरी करते, राहते तिकडं कुठंही चौकशी करा. संयम गमावून वेडीवाकडी उत्तरं दिल्याचं एखादं उदाहरण जरी तुम्ही दाखवून दिलंत, तर नाक कापून देईन मी! मग मी तुमच्यावरच का रागावते, राग अनावर होऊन खरकटा हात उगारते? कारण तुम्हालाही ठाऊक आहे; पण ते दाखवू न देता मला लांब ठेवून छळायचं, हा खेळ आहे तुमचा!" अखेरचं वाक्य उच्चारताना तिचा गळा भरून आला होता; पण रडलं तर त्यात अपमान आहे या भावनेनं ती थांबली.

कितीतरी क्षण खोलीत शांतता पसरली होती. तिची दृष्टी फिरणाऱ्या पंख्यावर खिळली होती. काही वेळानं ती बोलू लागली, "विकासच्या नामकरणाच्या विधीच्या वेळी मला तिथं स्थान नाही ही भावना मनात आली. या रंगनाथशी माझा हा कसला संबंध म्हणायचा! त्याला मी का बोलावून घेतलं, या सगळ्या शास्त्रविधीमध्ये माझं स्थान काय हे प्रश्न मनात निर्माण झाले. पाहुण्यांची जेवणं व्हायची असल्यामुळे मला तिथून किंचितही हलता आलं नव्हतं. त्याच दिवशी पहिल्यांदा मी रिव्हॉल्वर घेऊन जीव देण्याची दुर्दम्य इच्छा होऊन टेकडीवर गेले होते.

“तुमच्या ऑफिसच्या वास्तुशांतीचा विधी होत असतानाही माझ्या मनात तोच प्रश्न निर्माण झाला. इथं माझं स्थान काय? त्या दिवशी मी जीव देण्यासाठी कन्नमवाडीला गेले, रात्री चामुंडी टेकडीवर गेले तेव्हा तुम्हीच तिथं आलात. त्यानंतर तुम्ही माझी समजूत काढण्यासाठी कितीतरी गोष्टी सांगितल्यात, पण... ‘तुझं स्थान इथं आहे. त्या रंगनाथला सोडून दे. आजच जोईसांना बोलावून एखाद्या देवळात जाऊन आपण लग्न करू या. मला जागा नाही, स्थान नाही असं का तू समजतेस?’ हे तुमच्या तोंडून बाहेर पडलं? निदान मनात तरी उमटलं काय? त्यानंतर रात्री घरी आलात. ‘रिव्हॉल्वर उचलून न्यायला आलोय. घर राखायला गुरखा ठेवू या’ हेच बोलत राहिलात. तब्बल चौदा तास विचार करून तुम्ही हा उपाय शोधून काढलात! याचा अर्थ आणखी काय होतो? त्या मुंबईच्या स्त्रीशी होते तसेच संबंध तुम्हाला हवे आहेत. त्याहून अधिक भावना, ममता, कर्तव्य कुठलीच बंधनं तुम्हाला नको आहेत. हेच तुम्ही पुन:पुन्हा मला सुचवत राहिलात! एक निश्चित. तुम्ही शांत स्वभावाचे, पराकोटीचे हिशेबी, उबदार मृदू भावनेचा अभाव असलेले, केवळ सुखाच्या शोधात असलेले पुरुष आहात, हे मला समजलेलं आहे. मला तुमच्यासारखं प्रत्येक बाबतीत तोलून-मापून वागता-बोलता येत नाही. त्या वेळी मला राग आला होता. हात खरकटा होता. उठून, हात धुवून नंतर मारण्याइतका हिशेबीपणा माझ्या स्वभावाला पटणार नाही. पाहिजे तर हात उगारला म्हणून मी क्षमा मागते.”

तो अवाक झाला होता. तिच्या मनात अशी अपेक्षा असेल, हे त्याच्या डोक्यातही नव्हतं. त्याच्याही मनात लग्नाचा विचार कधीही स्पष्टपणे आला नव्हता. तेच तिला सांगण्यासाठी तो म्हणाला, “अमृता, खरोखरच लग्नाचा विचार मला सुचला नाही. सुचला असता तर....”

त्याचं वाक्य निम्म्यावर तोडून ती म्हणाली, “मिस्टर सोमशेखर, आता ते विसरा! तुमच्या मनात आपण होऊन न आलेल्या तुमच्या प्रस्तावाला होकार देण्याइतकी मी काही भिकारीण नाही. यानंतर तुम्ही माझे पाय धरून विनवलंत, तरी मी तुमच्याशी लग्न करणार नाही. तुम्हाला हवं आहे ते केवळ माझं शरीर! पैसाही खर्च न करता मिळणाऱ्या रूपवान विदुषीचा पुकटचा भोग! पण माझी केवळ तुमची मैत्रीण किंवा वेश्या व्हायची तयारी नाही. मलाही माझा म्हणून अभिमान निश्चित आहे. कपडे करा. तुमची सूटकेस गाडीच्या डिकीमध्ये आहे. पाहिजे तर रिक्षा मिळेपर्यंत मी तुम्हाला सोडून येईन. आणखी पाच मिनिटांच्या आत निघा तुम्ही. थोडी जरी शरम शिल्लक असेल, तर यावर तुम्ही अवाक्षर उच्चारणार नाही.”

ती व्हॅनिटी बॅग आणि गाडी, घराच्या चाव्या घेऊन ती खोलीबाहेर पडली. गाडी सुरू झाल्याचा आवाज ऐकू आला तसा तो स्वत:ला सावरत धडपडत उठला. पटकन कपडे चढवत, केसांवरून कंगवा फिरवत, बूट नुसतेच पायात अडकवून तो बाहेर आला. तिनं गाडी गॅरेजमधून काढून रस्त्यावर घेतली होती. त्याच वेळी समोरून एक रिक्षा आली. गावाबाहेरच्या या परिसरात रिक्षा मिळणं विशेषच होतं. तिनं हात करून रिक्षा थांबवली. डिकीतली सूटकेस उचलून तो रिक्षात चढला. रिक्षा गावाच्या दिशेनं निघाली. त्यानं तिच्याकडे पाहिलं नाही. तिनंही त्याच्याकडे पाहिलं नाही.

‘तिच्या बोलण्याचा मथितार्थ आपल्याला का समजला नाही?’ या विचारात तो गढून गेला होता. ‘एखादा अर्थ सुचला नाही याचाच अर्थ आपली प्रवृत्ती, मन आणि बुद्धी त्यासाठी अनुकूल नसेल. तिच्या अंतर्मनाचा वेध घेण्यात अयशस्वी ठरलेल्या आपल्या अंतर्मनाच्या प्रवृत्ती कुठल्या?’ या आत्मविश्लेषणात तो गढून गेला होता.

चार-पाच दिवस त्याच विचारात गेल्यावर एक गोष्ट त्याच्या मनाशी निर्विवादपणे स्पष्ट झाली, 'माझं तिच्यावर खरोखरच प्रेम आहे. तिच्याकडून निरंतरपणे शांती-समाधान मिळणार नाही हे ठाऊक असूनही! केवळ मिळवणं म्हणजे प्रेम नव्हे. मिळवण्यापेक्षा अधिक देणं हा प्रेमाचा प्रमुख गुण आहे. ती सुखात राहावी म्हणून मी काहीही करेन.

'लग्न?

'तिला हवं असेल, तर लग्नही करेन.' त्याच्या मनानं ग्वाही दिली. त्याला स्वत:ला लग्न करण्यात आणि न करण्यात विशेष असं काही वाटलं नाही. बायको हयात होती तेव्हा ती आवड-नावड ओळखून स्वयंपाक करत होती. मळलेले कपडे शोधून ते धुवत होता. इस्त्री करून ठेवत होती. कुठल्याही बाबतीत तिचा कसलाच हट्ट नव्हता. मला भरपूर कंपनी का देत नाही, म्हणून कधी तक्रार करत नव्हती. दिसायलाही चांगली होती. ती वारली तेव्हा दु:खही झालं होतं; पण त्यानंतर आणखी एक लग्न करून बायको आणावी असंही कधी तीव्रपणे वाटलं नव्हतं. 'तिचं प्रेम विसरणं अशक्य आहे, तिच्या जागी दुसऱ्या कुणाला आणणं शक्य नाही यासारखंही भावनात्मक कारण त्यामागे मुळीच नव्हतं. लग्न झालं. वैवाहिक जीवन होतं. ते संपलं. बस्स! पुन्हा ते हवंसं वाटत नाही. मित्रांनी लग्न कर म्हणून कितीतरी आग्रह केला, पण तिकडं लक्ष द्यावंसं वाटलं नाही. लग्नाचं मनात असतं, तर कदाचित... नाही, निश्चित हिच्याशीच लग्न करायचा विचार सुचला असता.'

या विचारात एक दिवस गेल्यावर त्याला वाटू लागलं, 'हेही काही तितकंसं खरं नाही. या आधी मी कुठल्याही स्त्रीवर 'हिच्याशिवाय मी जगू शकणार नाही.' असं वाटण्याइतकं प्रेमच केलं नाही; पण अमृताचं तसं नाही. इथं काहीतरी वेगळ्या प्रकारचे बंध आहेत. तिनं मला खरकट्या हातानं थोबाडीत मारली. तिरस्कारपूर्ण बोलण्याचा भडिमार सतत सुरूच असतो. सतत खोचक बोलून ती मला शाळेतल्या चूक केलेल्या मुलाच्या अवस्थेला आणून ठेवते. असं आणखी कोणी माझ्याबरोबर वागलं असतं, तर मी या जन्मात त्याचं तोंड पाहिलं नसतं. मग एवढं सगळं घडल्यावर मी पुन्हा तिच्याकडे का जात होतो? मन का तिकडेच वळतं?

'यालाच प्रेम म्हणायचं? आत्माभिमान मातीमोल करून टाकणारी दुर्बलता म्हणजे प्रेम?' त्याला काहीच समजेनासं झालं.

'मी टेलेक्स मेसेजने पैसे मागवून तिला दिल्यामुळे ती दु:खी झाली आहे; पण तिला दु:ख द्यायचं म्हणून मी एवढ्या घाईने पैसे फेडलेले नाहीत. पैसे परत करेपर्यंत तिचा संताप आणि तिरस्कार सहन करणं मला अशक्य होतं, हे तिला कसं समजत नाही? आता पैशाचं मिंधेपण नाही. त्यामुळे ती जे उलटसुलट बोलेल, ते सहन करणं शक्य आहे, असंच वाटत होतं; पण प्रेमापायी अभिमान गमावणं इतकं अत्यावश्यक असतं काय? की ही खरी प्रेमभावनाच नव्हे म्हणायची? हे केवळ दोन अहंकारांचं आकर्षण आणि अपकर्षण तर नसेल? कदाचित हे जे आकर्षण किंवा अपकर्षण आहे, ते फार दिवस टिकणारही नाही. एकत्र आलेल्या सुखाच्या कुठल्याही क्षणी कुत्सितपणा, तिरस्कार दाखवून मला धारेवर धरते! 'थोडा जरी आत्माभिमान शिल्लक असेल तर अवाक्षर न बोलता निघून जा.' म्हणून सांगण्याइतक्या थरालाही पोहोचते! स्वत: मान गमावून हिची मनधरणी करत राहण्याला काय अर्थ आहे?'

त्याला मुंबईहून, तिच्या घरून येऊन आठ दिवस झाले होते. दिवसभर काम करून, रात्रीचं जेवण उरकून तो रात्री दहा वाजता घरी आला तेव्हा पोस्टानं आलेलं एक पाकीट दाराशी पडलं होतं. तिचं पत्र असल्याचं अक्षरावरून समजत होतं. पाकिटावर लाल शाईनं 'खासगी' असं लिहून त्याखाली रेघ मारली होती. तिचं हस्ताक्षर पाहताच त्याचं मन उत्सुक झालं होतं. आठवडाभरात तिच्याकडून काहीच समजलं नव्हतं. तिनं फोनही केलेला नव्हता. संबंध पूर्णपणे तुटले होते, हे दिसत असतानाच मनात येत होतं, 'चूक तिची आहे. तिनं फोन का करू नये?'

कपडे न बदलता कॉटवर बसून त्यानं पाकीट फोडलं. दोन पत्रं होती. तिच्या लेटरहेडवर लिहिलेली पत्रं. आदल्या दिवसाच्या तारखेचं वरचं पत्र त्यानं घाईघाईनं वाचलं. कुठलाही मायना नसलेलं ते पत्र असं होतं,

> '... तुम्हाला मी पत्र लिहावं असं आता काही राहिलं नाही. पण माझ्यावाटचं कर्तव्य करण्यासाठी मी हे पत्र लिहीत आहे. सोबतचं पत्र वाचल्यावर सगळा खुलासा होईल.
>
> आपल्या नाते-संबंधाविषयी मी खूप विचार केला. हा संबंध वाढण्याआधी मला अधून-मधून शून्य भाव घेरत होता. मरण्याची इच्छा तीव्र होत होती. त्या भावनेच्या बीजस्थानी तुम्ही नाही हे निश्चित! आपली ओळख झाल्यावर काही दिवस ही भावना कमी झाली होती; पण संबंध वाढत गेले तशी भावनेची तीव्रता आणि प्रमाण यात वाढ होत गेली. आता तर त्याशिवाय दुसरं काहीही मला सुचेनासं झालं आहे. प्रेम, उत्साह, मार्दवता वगैरे कुठलीच भावना माझ्यामध्ये राहिलेली नाही. हे पत्र मी तुमच्यावर दोष लादण्यासाठी लिहिलेलं नाही. याला तुम्ही जबाबदार आहात, असंही मला म्हणायचं नाही; पण आपल्या संबंधाचा परिणाम काय होतोय ते मी लिहिलं आहे, त्यामुळे हा संबंध तोडणं अत्यावश्यक आहे.
>
> कितीतरी प्रसंग मी माझ्या वागणुकीनं कडू केले आहेत. माझ्या वागण्यातला प्रत्येक क्षण, बोलण्यातला प्रत्येक शब्द, प्रत्येक तपशील मला व्यवस्थित आठवतो. मी तशा जाणीवहीन अवस्थेत कधीच नसते. माझी चूक काळानुसार कदाचित तुम्ही विसरून जाल; पण त्यातला एकही क्षण माझ्या आठवणीतून निसटला जात नाही. त्यावरची तुमची प्रतिक्रिया, तुमचं मौन, चेहऱ्यावरील भाव हा तपशीलही माझ्या मनात खोलवर कोरलेला असतो. त्या दिवशी मी तुम्हाला लागट बोलले आणि बाहेर जाऊन गाडी सुरू केली. त्या वेळी तुम्हीही दाराशी आलेली रिक्षा पकडून निघून गेलात. त्या वेळी तुम्ही 'तू काहीही म्हण, तुला अक्कल नाही म्हणून तू काहीही बडबडतेस. हे माझंही घर आहे. मला बाहेर जा म्हणायचा तुला काही अधिकार नाही.' असं का म्हणाला नाही?
>
> आत्महत्या केलीच पाहिजे असा काही माझा हट्ट नाही; पण एकदा त्या मन:स्थितीत गेल्यावर आत्महत्येची इच्छा आवरणंही शक्य नसतं. कधी मी रिव्हॉल्वरचा ट्रिगर ओढेन हे मला ठाऊक नाही. त्या आधी पोलिसांसाठी

पत्र लिहून ठेवायला मी विसरणार नाही. पण न जाणो, त्यासाठीही मला वेळ मिळाला नाही तर किंवा मी लिहिलेलं पत्र पोलिसांच्या हाती सापडलं नाही तर किंवा त्यांनी ते केवळ त्रास देण्यासाठी नष्ट केलं तर तुम्हाला उपद्रव होणार आहे. तुम्ही आमच्या घरी येत-जात असता, मी तुमच्या ऑफिसचं इंटिरियर डेकोरेशन स्वत: उभं राहून करवून घेतलं आहे, हे कितीतरी लोकांना ठाऊक आहे. त्यामुळे पोलीस सर्वप्रथम तुमच्यावर आरोप करणे सहज शक्य आहे. सोबतचं पत्र तुम्ही जपून ठेवावं आणि आवश्यकतेनुसार त्याचा वापर करावा.

या पत्राखाली तिनं सही केली नव्हती किंवा इतर काही समारोपाचा मजकूरही लिहिला नव्हता. दुसरं पत्र मात्र त्याला संबोधित करून लिहिलं होतं. उजव्या कोपऱ्यात, 'डॉ. सी. आर. अमृता, एम.ए., पीएच.डी." आणि त्याखाली तिचा पत्ता छापला होता. फोन नंबरही छापला होता. त्याखाली तिनं तारीख लिहून पत्राला सुरुवात केली होती,

'श्री. सोमशेखर यांना विश्वासपूर्वक नमस्कार!

परवा तुम्ही घरी आलात त्या वेळी ज्या मनमोकळ्या गप्पा झाल्या त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. मी असे लिहिणे म्हणजे औपचारिकपणा ठरेल, हे मलाही ठाऊक आहे; पण उपकाराचे स्मरणही आवश्यक आहे ना? काही गोष्टी मला तुमच्यासमोर बसून सांगणे किंवा फोनवर बोलणे जमणार नाही असे वाटते. म्हणून मी हे पत्र लिहीत आहे.

मी अधूनमधून शून्य भावाने घेरली जाते आणि मनात आत्महत्या करण्याची इच्छा प्रबल होते, हे मी तुमच्याशिवाय कुणालाही सांगितले नाही. शिवाय ही गोष्टही काही फारशा कौतुकानं कुणाला सांगण्यासारखी नाही. तुम्हीही ती आणखी कुणाला सांगणार नाही या विषयी माझी खात्री आहे.

माझी सगळी हकिकत तुम्ही मोठ्या संयमाने ऐकून घेतलीत आणि सांत्वन करताना पुन्हा कधीही आत्महत्येचा विचार करणार नाही अशी देवाची शपथ घेण्याचाही आग्रह धरलात. तुम्ही मला माझ्याकडे असलेलं रिव्हॉल्वर विकायचाही सल्ला दिलात. रिव्हॉल्वर पोलिसांकडे जमा करून त्याऐवजी पोलीस-ऑफिसमध्ये रजिस्टर्ड वेलेला गुरखा राखणीसाठी नेमण्याचा तुमचा विचार योग्य आहे, असे मलाही विचाराअंती पटले आहे; पण त्याचबरोबर आणखीही एक म्हणजे जीव देण्यासाठी केवळ रिव्हॉल्वरच पाहिजे असे नाही. त्याशिवाय कितीतरी मार्ग आहेत.

त्या दिवशी बोलताना एक गोष्ट बोलायची राहून गेली. तीन आठवड्यांपूर्वी तुम्ही माझे सगळे पैसे माझ्या खात्यावर भरले आहेत हे समजले. मी त्याच वेळी आपल्याला फोन करायचा प्रयत्न केला; पण त्या वेळी आपण मुंबईला कामाला गेल्याचे समजले. आता पुन्हा मनापासून सांगते, माझ्या

बँकेचे कर्ज एवढ्या घाईने फेडण्याची काहीही गरज नव्हती.

कळावे,
आपली विश्वासू,
सी.आर. अमृता

पत्राखाली कुठल्याही न्यायाधीशानं मान्य केली पाहिजे अशी स्पष्ट सही केली होती. पत्रातील सहजपणा आणि नेमकेपणा वाचून त्यानं नकळत मान डोलावली. त्यानं दोन्ही पत्रं पाकिटात ठेवून कपडे बदलले. अंथरुणावर पडत त्यानं बेडस्विच बंद केला. अंधारातही कॉटवर उशीखाली ठेवलेलं तिचं पत्र त्यानं एकदा चाचपलं. 'मला विद्ध करण्यासाठी तिनं ते पत्र लिहिलंय. 'मी मेले तरी तुला त्रास व्हायला नको. पोलिसांकडून त्रास होईल एवढीच तुला भीती आहे ना? जा, या पत्राद्वारे मी तुला अभय देते.' अशा भावनेनं लिहिलेलं आहे हे पत्र. माझी काहीही चूक नसताना अप्रत्यक्षरीत्या ती माझ्यावर लादणं, हा तर तिचा स्वभावच आहे. मला घराबाहेर काढून वर 'तू का थांबला नाहीस हे माझं घर आहे असं म्हणून?' म्हणून मलाच जाब विचारतेय! व्वा! साहित्याचा अभ्यास केलाय ना! वाक्यांचे आणि शब्दांचे हवे तसे खेळ करणं तिला काय कठीण? स्वत: शिकलेल्या आणि शिकवत असलेल्या साहित्यावर अन्याय करतेय ही.' विचाराच्या तंद्रीत काही वेळानं त्याला गाढ झोप लागली.

पण मध्यरात्रीनंतर केव्हा तरी तो टक्क जागा झाला. घड्याळात पाहिलं तर तीन वाजले होते. स्विच बंद करून तो पुन्हा झोपला. 'सकाळी सात वाजेपर्यंत झोप झाली नाही, तर व्यवसायासाठी आवश्यक असलेला तरतरीतपणा राहणार नाही.' हे त्याला समजत होतं. कामाच्या वेळात चेहरा लटकलेला, जांभया देणं, डुलक्या काढणं याची त्याला विलक्षण चीड होती. काही झालं तरी आता झोपणं आवश्यक होतं. त्या हट्टापायी त्यानं योगशास्त्रात सांगितलेल्या चित्तवृत्ती-निरोध-स्थिती आणायचा प्रयत्न केला; पण त्याचा प्रयत्न जेवढा तीव्र होता तेवढी त्याच्या मनाची चंचलताही वाढली. कितीतरी वेळानं त्यानं घड्याळ पाहिलं, तेव्हा फक्त पावणेचार वाजले हाते. लघवीला जाऊन येऊन पुन्हा अंथरुणावर पडताना त्याच्या मनात आलं, 'आता ती काय करत असेल?' मनानं 'गाढ झोपली असेल.' हे उत्तर दिलं नाही. इथं फोन असता, तर या क्षणी फोन करून विचारता आलं असतं. आता ती हातात रिव्हॉल्वर घेऊन सोफ्यावर बसून राहिली असेल किंवा गाडी घेऊन चामुंडी टेकडीवरच्या त्या दरीच्या तोंडाशी उभी राहून मरणाचा विचार करत असेल. फोन नाही. स्कूटरवरून जाऊन प्रत्यक्षच बघून यावं काय? स्कूटरच्या आवाजानं तिला जाग... अंऽहं... जागीच असेल ती! कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज ऐकून ती दरवाजा उघडेल. पण ती घरात असेल तर! नाहीतर थेट टेकडीवर गेलं, तर तिथं तिची कार निश्चित असेल.'

पण उठून कपडे करून स्कूटर काढायचा उत्साह त्याला वाटला नाही. उगाच काही वेळ तो कूस बदलत राहिला. पुन्हा एकदा लघवीला जाऊन येऊन झोपला तेव्हा मच्छरदाणीत डास शिरला होता. कानाशी गुणगुण चालली होती. त्याला मारलं नसतं, तर झोप आली नसती, याची खात्री होऊन त्यानं दिवा लावला. डास दिसला. हळूच उठून त्यानं फटकन टाळी मारून डास मारला. 'व्वा! काय हे साहस!' त्यानं स्वत:ची चेष्टा केली. आता पुन्हा झोप येण्याची शक्यता आणखी कमी झाली. त्यानं उशीखालचं तिचं पत्र पुन्हा वाचायला घेतलं. 'तिच्या मनात भरून राहणाऱ्या शून्य भावाचं मूळ मी निश्चित नाही तरीही हा संबंध तोडणं अत्यावश्यक

आहे, असं तिनं लिहिलंय.'

त्याचं मन सुमारे दीड वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या भावसंबंधांवर केंद्रित झालं. सगळा तपशील मनात तरळून गेला. 'प्रत्येक वेळी हे भावसंबंध वाढवण्यात तिनंच पुढाकार घेतला आहे. मला यातलं काहीही नको होतं असं नव्हे, पण प्रत्येक वेळी तीच पुढं होती.' त्याची दृष्टी दिव्याच्या उजेडात मच्छरदाणीच्या जाळीवर खिळली होती. समोरच्या भिंतीवर जाळीची सावली पडल्यामुळे सगळं जगच जाळं आहे या भावनेनं त्याला गुरफटल्यासारखं होऊन तो गोंधळून जात होता. 'तिनं हे भावसंबंध पुढाकार घेऊन का वाढवले असतील? सुरुवातीला त्यामुळे ही भावना कमी झाल्यामुळे तिनं हा पुढाकर घेतला असेल काय? पण त्यावर पूर्णपणे मात करणं शक्य नाही हे लक्षात आल्यावर तिची पराकोटीची निराशा झाली असावी. तिला हा संबंधच प्रयोजनशून्य वाटला असावा; पण याला कसला संबंध म्हणायचा? ती माझी कोण? मी तिचा कोण?' त्याला हा प्रश्न आकर्षक वाटला. भिंतीवरच्या जाळीच्या सावलीशी या प्रश्नाचा निकटचा संबंध असावा अशी भावना त्याच्या मनात दाटून आली. 'असा पारमार्थिक प्रश्न दोन पुरुषांच्या बाबतीत किंवा दोन दगडंच्या बाबतीत कसा मंडता येईल?' या प्रश्नानं त्याचं त्यालाच हसू आलं. त्यानं पुढे पत्र वाचायला सुरुवात केली.

' 'मी जाणार नाही. हे माझं घर आहे.' असं मी म्हणायला हवं होतं असं लिहिलंय तिनं. केवळ माझ्यावर दोषारोप करायचा म्हणून तिनं असं लिहिलंय की, तिला खरोखरच असं म्हणायचं होतं? तसं असेल, तर मी का तसं म्हणालो नाही?' त्यानं डोकं खाजवलं. 'सुचलं नाही हेच खरं! एखादी गोष्ट किंवा विचार का सुचला, यामागची कारणमीमंसा कदाचित शोधता येईल. पण एखादा विचार करणं म्हणजे कापूस पिंजून तो वाऱ्यावर सोडून देणं. हाती काहीही लागणार नाही.'

जांभया येत होत्या. झोप मात्र लागत नव्हती.

सकाळी साडेसहाला डुलकी लागली आणि लगेच अर्ध्या तासात जाग आली. दिवा तसाच जळत होता. पत्राचा हात तसाच छातीवर राहिला होता. जाग आल्यावर त्यानं पुन्हा एकदा दोन्ही पत्रांवर नजर फिरवली तेव्हा मनात येत होतं, 'खरोखरच आपल्या मृत्यूनंतर याला त्रास होऊ नये याच विचारानं तिनं हे पत्र का लिहिलेलं असू नये?'

तो सकाळी साडेनऊ वाजता ऑफिसमध्ये पोहोचला तेव्हा एक गृहस्थ त्याची वाट पाहत बसले होते. चाळिशीच्या घरातले ते गृहस्थ अमेरिकेत सर्जन होते. त्यांच्या पत्नीही परदेशात प्रसूतितज्ज्ञ म्हणून काम करत होत्या. भारतात येऊन मैसूरमध्ये स्वत:चं एक अत्याधुनिक नर्सिंग होम काढायचा त्यांचा विचार होता. लक्ष्मीपूरमध्ये असलेलं आपल्या मालकीचं जुनं घर पाडून त्या जागी अद्ययावत नर्सिंग होम आणि तिथंच मागच्या बाजूला स्वत:च्या राहण्यासाठी सर्व सुखसोयींनी सुसज्ज असं टुमदार घर उभारायचं त्या पतिपत्नींचं स्वप्न होतं. ते साकार करण्याच्या दृष्टीनं त्या दोघांनी भरपूर विचार करून दोन्ही इमारतींचा आपापल्या आवश्यकतांनुसार कच्चा नकाशा तयार केला होता. डॉक्टर राममूर्ती आता महिन्याच्या रजेवर भारतात आले होते. महिन्याच्या आत प्लॅन तयार करून दिला असता, तर तो कॉर्पोरेशनकडून पास करून घेण्याची जबाबदारी स्वीकारायला ते तयार होते. दोन ऑपरेशन थिएटर्स, दोन रुग्णपरीक्षेच्या खोल्या, दोन बाळंतपणाच्या खोल्या, तीस वॉर्ड्स, दोन निरीक्षणकक्ष, वाहनांची

जागा, रोग्यांसाठी लिफ्टची जागा, कॉरिडॉरची रुंदी या सर्व बारीक-सारीक गोष्टींचा विचार करून त्यांनी सुसज्ज इमारतीची कल्पना त्याच्यासमोर विस्तारानं मांडली. प्रत्येक खोली कशी अपेक्षित आहे हे समजावं म्हणून त्यांनी अमेरिकेतल्या वास्तूंच्या फोटोंची मोठी चळतच आणली होती. इमारतीचा दर्शनी भाग कसा असावा, त्या विषयीही अत्यंत आकर्षक फोटो आणले होते. विद्युत्व्यवस्थेविषयीही त्यांचं ज्ञान बऱ्यापैकी दिसत होतं. त्या देशात उपलब्ध असलेल्या सोयी त्यांना या इमारतीतही अपेक्षित होत्या. त्यांना वास्तुशास्त्राच्या परिभाषेचंही ज्ञान दिसत होतं.

त्यांनी सांगितलं, "आम्ही पतिपत्नींनी हा नकाशा आमच्या अनुभवानुसार आणि अपेक्षेनुसार आखला आहे; पण या विषयाचं सखोल ज्ञान नसल्यानं हे सगळं काल्पनिकच आहे. इथं मिळणाऱ्या सामानाच्या गुण-दोषांची मला कल्पना नाही. मी कार घेऊन आलोय. आधी जागा बघायला चला. मला इथं दुसरं कुठलंही काम नाही. तुम्ही म्हणाल, तर सतत तुमच्या ऑफिसमध्ये बसून राहीन किंवा फोन नंबर देऊन ठेवतो. जेव्हा आवश्यकता असेल, तेव्हा मला बोलावून घ्या. आठवड्यातच कच्चा प्लॅन तयार करून द्या. कॉर्पोरेशनकडून मंजुरी घेऊ या. मी निघायच्या आत फायनल प्लॅन तयार करून त्यातल्या तपशिलात वेळोवेळी अधिकाधिक सुधारणा करत जाऊ या."

सोमशेखर त्यांच्याबरोबर जागा पाहून आला. दोनशे बाय दोनशेचा मोठा प्लॉट होता. कंपाउंडच्या कडेला कडुलिंब आणि आंब्याचे वृक्ष होते. त्या वृक्षांना हात न लावता काम करायचं यावर दोघांचंही एकमत झालं.

दोघंही पुन्हा ऑफिसमध्ये येऊन बसले तेव्हा राममूर्ती म्हणाले, "हे काम घेऊन मी तुमच्याकडे कसा आलो ते आता सांगतो. तुम्ही जलजाच्या घराचं काम केलंत ना? ती माझी चुलत बहीण. शिवाय तिची मामेबहीण, ती माझी बायको. तिनं सांगितलं, "मिस्टर सोमशेखरांकडे काम सोपव आणि निर्धास्त राहा. मुख्य म्हणजे माणूस प्रामाणिक आहे. तुझ्या एका नव्या पैशाचाही ते अपव्यय करणार नाहीत." तिच्याच घरी उतरलोय मी. तीच येणार होती माझ्याबरोबर, पण कॉलेज होतं म्हणून नाही आली. कदाचित बारा वाजता येईल. आणखी एक विनंती आहे. कॉंट्रॅक्टर वगैरे ठरवायचंही तुम्हीच बघाल काय? त्याच्यावर लक्ष देणं, त्याला वेळोवेळी पैसे देणं सगळी जबाबदारी तुमचीच! या सगळ्यासह तुम्हाला किती टक्के द्यायचे?"

"जलजा मॅडम बोलल्या असतील ना, चार टक्के."

"ही मोठी जबाबदारी आहे आणि गुणवत्तेच्या बाबतीत मला किंचितही हयगय नको. पैशाची जबाबदारीही तुमच्यावर आहे. जलजा तुम्हाला हवे तसे पैसे सही करून देईल. मी सहा टक्के देईन. कारण या माझ्या कामाची गुणवत्ता अतिशय महत्त्वाची आहे. इमारतीचं काम सुरू असताना तीन वेळा मी येऊन जाईन. अधूनमधून आपण परस्परांशी सविस्तर पत्रव्यवहार ठेवू. मी अधूनमधून फोनही करेन. तशी आवश्यकता भासल्यास तुम्हीही मला कलेक्ट-कॉल करायला हरकत नाही."

त्यांच्याशी बोलता-बोलता या इमारतीनं त्याच्या बुद्धिकल्पनेला व्यापून टाकलं होतं. त्यांनी

करून आणलेला कच्चा प्लॅनही कल्पनेला आव्हान देणारा होता. इतर फोटोही नव्या कल्पना सुचायला मदत करणारे होते. पैशासाठी गुणवत्तेत तडजोड करायचा त्यांचा दृष्टिकोन नव्हता आणि भरमसाट अलंकरणाच्या नावाखाली गिऱ्हाइकाला पुकट खर्चात टाकायचा त्याचा स्वभाव नव्हता. कामाची तृप्ती आणि त्याचबरोबरच कीर्ती मिळवून देणारं हे काम असल्याचं स्पष्टच दिसत होतं. 'हे काम घेतल्यावर... अंऽहं... आताच नीळकंठप्पांच्या कामाचा बोजा उरकला जाणार नाही इतका वाढलाय. हे काम सुरू केल्यावर वेळ न दवडता पूर्ण करायला पाहिजे. एक अकाउंटंटही नेमायला पाहिजे.'

नव्या कामाची जबाबदारी घेऊन तीन आठवडे झाले होते. महिन्याच्या सुट्टीवर आलेल्या राममूर्तींचा कुठलाही वेळ विनाकारण गमावण्यात अर्थ नव्हता. त्याशिवाय हातात असलेली कामंही संपवायला हवी होती. राममूर्ती दररोज सकाळ-संध्याकाळ त्याच्या ऑफिसवर येत होते. नंतरची आर्थिक जबाबदारी अंगावर घेणाऱ्या जलजालाही प्रत्येक चर्चेच्या वेळी येऊन जाण्याविषयी सोमशेखरनं आवर्जन सांगितल्यामुळे तीही येत होती. या सर्व कामांच्या वाढलेल्या प्रमाणामुळे रात्री दहाच्या आत त्याला आणि त्याच्या सहकाऱ्यांना ऑफिस बंद करणं शक्य नव्हतं. त्यांनी रविवारची सुट्टी घ्यायचंही सोडून दिलं होतं. आणखी एक आठवडा असंच काम करून डॉक्टर राममूर्ती अमेरिकेला निघून गेल्यानंतर कामाचा ताण पूर्ववत करणं शक्य होतं.

दुसऱ्या दिवशी दुपारी एक वाजता अमृताचा फोन आला. संध्याकाळी आठ वाजता जलजाबरोबर येतो म्हणून सांगून राममूर्ती नुकतेच घरी परतले होते. नीळकंठप्पा आणि नव्यानंच नोकरीला लागलेले नंजुंडगौडा बाहेरच्या खोलीत काम करत होते. त्यामुळे त्याच्या चेंबरमध्ये कुणीही नव्हतं.

"ओळखलंत? आश्चर्य वाटलं असेल ना?" तिचा आवाज ऐकू आला.

तो चकित झाला. गडबडून जाऊन तो म्हणाला, "म्हणजे काय?"

प्रचंड कामाचा ताण मनावर असताना, राममूर्तींसारख्या प्रत्येक गोष्टीचा अर्थ तपशिलात शिरून जाणून घेणाऱ्या गिऱ्हाइकाच्या उपस्थितीत कामाव्यतिरिक्त मन आणखी कुठंही जाणं शक्य नव्हतं. तिनंही ती दोन पत्रं लिहिल्यानंतर पुन्हा संपर्क साधला नव्हता. 'आपले संबंध तोडणं अत्यावश्यक आहे.' म्हणून तिनं लिहिलेलं वाक्य मधूनच त्याच्या अंतर्मनात घोटाळत होतं. त्यावर त्याने एखादी ओळ लिहिली नव्हती किंवा फोन केला नव्हता हे आठवून त्याला पुढं काय बोलायचं ते सुचेनासं झालं होतं. 'तिच्या मनात आज त्या संबंधाचं कोणतं स्वरूप शिल्लक आहे? जर तो संबंध शिल्लक नसता, तर तिनं हा फोन का केला असता?' या सर्व प्रश्नांनी घेरल्यामुळे तो मौन राहिला. फोनही त्याचा मौनाचा हुंकार आळवत होता.

ते मौन मोडत तिचा आवाज आला, "तुमची बोलायची इच्छा नसेल, तर मी फोन ठेवते."

"छे:! छे:! तसं नका करू."

"आदरार्थी संबोधनानं आपण मनानं दूर झालो आहोत, हेच तुम्हाला दाखवून द्यायचं आहे

ना? त्यापेक्षा फोन ठेवून द्या. तो मार्ग अधिक उत्तम!" ती तीव्रपणे म्हणाली.

"तसं नाही. कामाचं प्रमाण एवढं वाढलंय...."

"तुमच्यासमोर कुणी बसलंय?" हे विचारताना तिच्या स्वरातली तीव्रता थोडी कमी झाल्यासारखी वाटली.

"नाही."

"तुम्ही कृपा करून घरी येऊन जाल काय? तिथंच जेवता जेवता बोलता येईल."

"आत्ता?"

"होय. आत्ता."

"पण उन्ह एवढं आहे! कामही फार आहे आज. तीन वाजता काँट्रॅक्टरला बोलावलंय. कामं संपायला रात्रीचे दहा वाजतात. हा सगळा आठवडा अशाच कामात जाणार आहे."

"ठाऊक आहे मला ते. अमेरिकेचे डॉक्टर राममूर्ती माघारी जायच्या आत सगळ्या फॉर्म्यालिटीज संपवायच्या आहेत; पण आठवडाभर थांबणं शक्य असतं, तर मीही त्रास दिला नसता. यावर मर्जी तुमची!"

"संबोधनाची जी काही एक पद्धत असेल, ती नेहमी तशीच राहायला पाहिजे." तो एकदम म्हणाला. ती त्यावर काही बोलली नाही. तिनं रिसीव्हर जागेवर ठेवून दिला. नंतर हातात रिसीव्हर ठेवून बसण्यात काही अर्थ नाही हे समजूनही तो तसाच बसून राहिला. 'तिचा स्वभावच असा आहे. भक्कन पेटून उठायचं आणि भिरकाटल्यासारखं तुसडेपणानं बोलायचं. शब्द, आवाजाची फेक यांच्या साहाय्यानं मी अपराधीपणाच्या भावनेत पार बुडून जाईन असं करायचं.'

रिसीव्हर जागेवर ठेवून त्यानं घड्याळ पाहिलं. एक वाजून बारा मिनिटं. 'का भेटून येऊ नये?' तो उठला. एअरकंडिशनर आणि दिव्याचं स्विच बंद करून तो चेंबरबाहेर आला. त्यानं नीळकंठप्पांना सांगितलं, "तीन वाजता काँट्रॅक्टर नागराज यायचे आहेत. आपण चेक करून ठेवलेले त्यांचे रेट्स त्यांना पाहायला द्या. कदाचित मला यायला दहा-पंधरा मिनिटं उशीर होईल."

स्कूटर सुरू करून निघताना त्याच्या लक्षात आलं, 'गेल्या बावीस दिवसांत आज पहिल्यांदा दुपारच्या वेळी जेवायला म्हणून बाहेर निघालोय. हार्डिंग सर्कल, प्राणिसंग्रहालयाकडचं वळण... तिथून पुढचा थेट रस्ता... आपण रस्ता विसरलो की काय!' असंही त्याला क्षणभर वाटून गेलं. 'रिक्षानं तिच्या घरी निघून आलो त्याला... अं.. तीस दिवस होताहेत. कितीही निश्चय केला, तरी तिचा एक फोन आल्याबरोबर हातातलं काम टाकून तिच्याकडे धावतोय मी!' प्राणिसंग्रहालयाजवळच्या वळणापाशी त्याच्या स्कूटरचा वेग आपोआप कमी झाला. वळण मागं पडल्यावर पुन्हा वेग वाढवत स्कूटर चालवताना समोर चामुंडी टेकडी दिसली आणि

पुन्हा एकदा महिना होऊन गेल्याचं त्याला प्रकर्षानं जाणवलं.

ती गेटपाशी उभी नव्हती. घराचा पुढचा दरवाजाही बंदच होता. बेल दाबल्यानंतर मिनिटभरानं तिनं दरवाजा उघडला. आपण त्याची वाट पाहत असल्याचं न दाखवण्याचा तिचा प्रयत्न होता. आत येऊन पायातले पंप शूज कोपऱ्यात ठेवत तो लाउंजमधल्या सोफ्यावर बसला. तीही दरवाजा बंद करून मिनिटभरानं समोरच्या सोफ्यावर बसली. तो तिच्या चेहऱ्याकडे पाहू लागला. तिची ओझरती नजर त्याच्या चेहऱ्यावरून फिरली. दोन मिनिटं त्याच शांततेत गेली. दोघांनाही काय बोलावं हे सुचत नव्हतं.

काही क्षणांनी ती उठून आत गेली. तो बसल्या जागीच बसून होता. पाच मिनिटांनी ती लाउंजच्या दाराशी येऊन म्हणाली, "एक-पन्नास झाले. तीन वाजता तुम्हाला ऑफिसमध्ये हजर राहायचं असेल, तर पावणेतीन वाजता निघायला पाहिजे."

तो काहीच बोलला नाही.

"ऑफिसमध्ये एवढं अर्जंट काम ताटकळत असेल, तर तुम्ही लगेच निघू शकता. एवढ्या उन्हाचा तुम्हाला इथं यायचा फेरा पडला त्याबद्दल सॉरी!" ती म्हणाली.

'आठवडाभर थांबता येण्यासारखं असतं, तर तुम्हाला त्रास दिला नसता.' म्हणाली होती ती. 'काहीतरी तेवढं महत्त्वाचं काम असल्याशिवाय ही असं म्हणणार नाही. पण विषय कसा काढायचा?' तो तिच्याकडे मूकपणे पाहत राहिला. तिची दृष्टी त्याच्या चेहऱ्यावर खिळली होती. मिनिटभरानं ती म्हणाली, "तीन लाख मिळवून देणारं नर्सिंग होमचं काम चाललंय! तुमचं सगळं लक्ष तिकडेच आहे. तुम्ही निघावं हे उत्तम!" म्हणत ती बेडरूममध्ये जायला निघाली.

त्याला आश्चर्य वाटलं. 'एवढा सगळा तपशील तिनं कुठून मिळवला असेल? जलजानं सांगितलं असेल. त्या वेळी हिच्या शिफारशीमुळे जलजाच्या घराचं काम मिळालं होतं. तिच्याकडूनच इमारतीचा एकूण अंदाज आणि त्यातली माझी टक्केवारी वगैरे ठाऊक झाली असेल.'

बेडरूमच्या खोलीला कडी घातली नव्हती. दार लोटून तो आत गेला. ती कॉटवर झोपली होती. त्यानं तिच्याजवळ जाऊन तिला मिठीत लपेटून घेतलं, तरी ती कुठलाही प्रतिसाद न देता तशीच ओंडक्यासारखी पडून राहिली होती. तिला सर्वांगालिंगनात बद्ध करत त्यानं तिला विचारलं, "बोलत का नाहीस तू?"

तिचा पारा उतरला नाही. तिनं रागातच विचारलं, "घरात आल्या आल्या कुठं गेलं होतं हे प्रेम?"

"तू मला बेल दाबून वाट पाहायला का लावलीस?" त्यानंही प्रतिप्रश्न केला.

"मला काय ठाऊक, बडे साहेब येतील म्हणून?"

“अस्सं! एकदा हेच वाक्य माझ्याकडे बघून सांग बघू!” तिचा चेहरा बळेच आपल्याकडे वळवत तो म्हणाला.

तिनं दाताखाली ओठ घट्ट दाबून ठेवला. त्यानं पुन्हा विचारलं, “अगदी खरं सांगायचं हं!”

आता मात्र ती मोकळेपणानं हसली. त्यानं तिच्यावरची नजर तशीच रोखलेली ठेवली. तिच्या हसण्यामागं दडलेला गाढ विषाद त्याच्या लक्षात आला होता.

त्यानं पुढं काही विचारण्याआधी ती उठत म्हणाली, “चल, जेवू या. अगदी असह्य भूक लागलीय मला!”

जेवणाच्या टेबलावर दोन ताटल्या ठेवल्या होत्या. ती म्हणाली, “बडे साहेब घाईघाईनं जेवायला येतील म्हणून मी ताटं अगदी तयार ठेवली होती. मी आधी दार का उघडलं नाही म्हणून राग आलाय ना? मग स्वयंपाक करायला एक सवत आणू काय?”

ती ताटात भाजी वाढत होती. तो काहीही न बोलता तसाच बसून राहिला. तीच म्हणाली, “मौनं संमती सूचकं! तुझीही हीच इच्छा दिसतेय! माझ्यापेक्षा चांगली, न भांडणारी, शांत स्वभावाची. केवळ सकलेशपूर, मैसूर पाहिलेली नव्हे, मद्रास-मुंबईचा अनुभव असलेली स्मार्ट सवत! खरं की नाही?”

‘ही थट्टा करतेय की लागट बोलतेय? पण त्यातच दु:ख ओथंबल्यासारखं का वाटतं?’

आपली खुर्ची तिच्याशेजारी ओढून घेत तिचा दंड वेढत त्यानं लहान मुलाला विश्वासात घेतल्याच्या मायेनं विचारावं तसं विचारलं, “अमू, काहीतरी सांगायचंय तुला. किती वेळ दाबून ठेवणार आहेस? आधी सांग. नंतर आपण जेवू या.”

तिनं त्याच्याकडे पाहिलं. दृष्टीत दृष्टी मिसळली, तरी तिच्या चेहऱ्यावर कुठलीच प्रतिक्रिया दिसली नाही. क्षणार्धात तिचे शुष्क आणि निस्तेज डोळे पाण्यानं तुडुंब भरले. दाट पापण्यांमधून कुठल्याही क्षणी थेंब बाहेर पडेल असं वाटत असतानाच तिनं त्याच्या छातीवर डोकं ठेवून हुंदके द्यायला सुरुवात केली. तो तिचं मस्तक कुरवाळत राहिला. कितीतरी वेळ तिचा सगळा देह हुंदक्यांनी हिंदकळत होता. त्यानं तिला विचारलं, “काय झालं अमू? मला सांग सगळं. आता मी आलोय ना?” पण तरीही ती न बोलता हुंदके देऊन रडत राहिली.

हळूहळू तिच्या भावनेचा आवेग कमी झाला. त्याच्या मिठीतून दूर होत ती म्हणाली, “दोघंही आधी जेवू या. नाहीतर जेवण निम्मंच राहील.”

जेवण झाल्यानंतर हात धुवून त्याला लाउंजमधल्या सोफ्यावर बसवत ती म्हणाली, “मी स्पष्टपणेच सांगते ऐक. त्याशिवाय समजून घ्यायची शक्ती तुझ्यात नाही.” पुन्हा तिचं दु:ख दाटून आलं. स्वत:ला आवरून ती म्हणाली, “मी आधी जेवण करायचा का आग्रह केला ठाऊक आहे? मी उपाशी राहू शकते; पण पोटातल्या भ्रूणाला उपाशी ठेवणं म्हणजे पाप ठरणार नाही का?”

तिचं बोलणं त्याच्यापर्यंत पोहोचायला थोडा वेळ लागला. एका नव्या समस्येत सापडून त्याचं मन भ्रमून गेलं. तिची त्याच्या चेहऱ्यावर रोखलेली नजर शोध घेत होती. त्याचं अंतर्मन समजल्याप्रमाणे ती सावकाश म्हणाली, "वीस-पंचवीस दिवसांपूर्वीच मला संशय आला. माझं पत्र पोहोचलं ना? त्यानंतरच ते पत्र मी लिहिलं तुला. तू माझ्याशी लग्न करणार नाहीस, हे तर मला निश्चित समजलं होतं. तुझी लग्नाची इच्छा नाही आणि माझी ही अवस्था! रिव्हॉल्वर उडवण्याखेरीज दुसरा कुठला मार्ग? तुला यापासून कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये, म्हणून तुला पत्र लिहिलं. नीट जपून ठेवलंस ना?"

या प्रश्नानं ती त्याला आणखी खाली खेचत चालली होती, हे त्याच्या लक्षात आलं. काय उत्तर द्यावं हे त्याला समजेना. तो चाचरत म्हणाला, "जपून... तसं जपून नव्हे, ठेवलंय इतर पत्रांमध्ये. कामाच्या बाईनं टाकलं नसेल तर..."

"हीच माझ्या पत्राची किंमत?" तिचा तीक्ष्ण प्रश्न कानावर आदळला.

"हे बघ, उगाच काहीतरी प्रश्न उपस्थित करून तू वितंडवाद घालू नकोस. त्यानंतर काय झालं? त्याच वेळी मला का कळवलं नाहीस? फोन का केला नाहीस?"

"ते पत्र मिळाल्यावर तू का फोन नाही केलास? का नाही धावत आलास?"

"हे बघ वादासाठी वाद घालत राहण्यानं यातून काहीच मार्ग निघणार नाही. आधी सांग सगळं."

"तुझ्यावर दोष लादून मला बोलता येईल, पण त्या-त्या विशिष्ट वेळी, विशिष्ट परिस्थितीत माझ्या मनात काय आलं ते तुला सांगते. मी तरी सगळं आणखी कुणाला सांगणार? मनातला आनंद तुला सांगायचा आणि राग-दु:ख दडवून ठेवायचं, हा खोटेपणा नाही काय?"

"खरंय!"

"मी दोन्ही बाजूनं वाद घालते असं तू म्हणतोस. तुझ्याशी बोलताबोलता त्यातून वाद आणि शेवटी कडवटपणा निर्माण होतो हे मला ठाऊक आहे. यात तुझी चूक नाही. मीच तशी बोलत जाते. तुझा तुझ्या बोलण्यावर संयम आहे. हवं तेवढं बोलून मध्येच थांबण्याइतकं तुझं स्वत:वर नियंत्रण आहे. तुझं व्यक्तिमत्त्व मात्र बुद्धिप्रधान आहे. त्यामुळे तुझ्या वागणुकीत येणारा सावधपणा... त्यामुळे माझा राग वाढत जातो."

"मीही तुझ्यासारखाच वागलो तर काय परिस्थिती होईल याचा विचार केलास कधी?" त्यानं मध्येच विचारलं.

"माझ्यासारखं म्हणजे रागानं असं म्हणायचं तुला? म्हणजे मी संतापी आणि तू शांत? तुझ्या बोलण्यात धारदार सुरी दडलेली असते. माझं बोलणं खटकत असेल, पण त्याची धार बोथट असते. खरं की नाही?"

"ते असू दे- तुझ्या मनात काय-काय भावना आल्या ते सांग बघू आधी!' त्यानं संभाषण

पुन्हा मुख्य विषयाकडे आणलं.

“माझी ही अवस्था आणि तू लग्न करायला तयार नाहीस. अशा वेळी आपल्याकडच्या बायका काय करतात? रॉकेल, पाणी, आत्महत्येसाठी दोर! आता वेगळ्या कुठल्या कारणाचीही गरज नव्हती. रिव्हॉल्वर तर हाताशीच होतं. म्हणून तुला पत्र लिहिलं. तुझ्याकडून एखादं-दोन ओळींचं का होईना, पत्र येईल म्हणून मी वाट पाहत राहिले. दररोज उत्सुकतेनं पत्राची पेटी उघडून पाहत होते. फोनची रिंग वाजली की, नक्की तुझाच फोन म्हणून स्वत:शीच पैज लावत रिसीव्हर उचलत होते. कुठल्याही कारणांनी कुत्री भुंकली, तरी तूच आलास म्हणून खिडकीतून पाहत होते. पण तू आला नाहीस. तुझी चूक नाही. मी तुला स्पष्टपणे निघून जा म्हणून सांगितलं होतं. हा संबंध तोडणं अत्यावश्यक आहे म्हणून पत्रही लिहिलं होतं. पण यावर तू ‘हे माझं घर आहे. मला जा म्हणायचा तुला अधिकार नाही!’ किंवा संबंध तोडायच्या गोष्टी करतेस? जीभ कापून हातात देईन!’ असं काहीच बोलला नाहीस. किंवा तसं पत्रही लिहिलं नाहीस.

“त्यानंतर एक आठवडा गेला. एक नवीन भावना मनात रुजू लागली. आपल्यात एक नवा जीव रुजून वाढू लागलाय. आपण दोघंही एवढे सावध असताना, न जुमानता तो रुजलाय! मला माझा जीव संपवण्याचा अधिकार आहे; पण या नव्या जिवाचा? माझा, पण माझा नसलेला जीव. हा जीव वाचवण्याची जबाबदारी माझी आहे. जर अशा वेळी मी मला मारलं, तर तो देवही मला कधी क्षमा करणार नाही. हातात रिव्हॉल्वर असलं, तरी ते कानशिलावर किंवा तोंडात ठेवायची इच्छा होईना. हे पोटात असेपर्यंत आत्महत्या करणं अशक्य आहे, हे निश्चित झालं. जगायला एक कारण मिळालं; पण एकीकडे मला स्वत:चाच तिरस्कारही वाटत होता. या जिवाकडे मी जगण्याचं एक निमित्त म्हणू पाहतेय ना! पण एक दिवस या जिवावर एकाएकी केवढं प्रेम जन्मलं सोमू! ओह! एवढं प्रेम मी आजवर कधीही, कुणाविषयीही अगदी विजय-विकासच्या वेळीही अनुभवलं नव्हतं. का सांग पाहू? सांग ना! तुझ्याकडून ऐकायचंय मला.”

“हे आपलं बाळ. आपल्या दोघांच्या प्रेमाचं फळ!”

“-सोमू -सोमू! तुझं माझ्यावर नक्की प्रेम आहे. मला तू समजून घेतोस हीच त्याची ओळख! त्या वेळी तू संतापून निघून गेल्यावर हे समजल्यावर क्षणभर वाटलं, तुला निरोप द्यावा, हे असं आहे. तुझा राग सोडून तू निघून ये. अशा परिस्थितीत गर्भारशीला तिच्या अत्यंत प्रिय अशा प्रियकरानं लांब ठेवणं योग्य नव्हे; पण मी ठरवलं, आपण सर्वसाधारण गर्भवतीच्या असहायतेत सापडायचं नाही. मी कुणाच्याही पाया पडणार नाही. माझ्या गर्भारपणाची जबाबदारी माझी आहे. ही माझी समस्या आहे. ती माझी मी सोडवेन. मी योग्य केलं की नाही?”

काही क्षण स्तब्धतेत गेले. तिनं त्याला विचारलं, “माझ्या मनात काय येत होतं ते मी सांगितलं. तू?”

“मी सकाळी आठ ते रात्री दहा वाजेपर्यंत सतत कामात बुडून गेलो होतो.”

“म्हणजे अमूची आठवण येत नव्हती म्हणायची.”

“तसं नव्हे. मनातल्या सूक्ष्मातिसूक्ष्म भावना जाणून घेण्यासाठी जे व्यवधान लागतं ते द्यायला वेळ नव्हता.” त्यानं रिस्टवॉच पाहिलं. सव्वातीन वाजले होते. “आता तीन वाजता कॉंट्रॅक्टरांबरोबर मीटिंग ठरली आहे. मी रात्री दहा वाजेपर्यंत येईन. दोघं जेवू या आणि पहाटेपर्यंत बोलत बसू या.” म्हणत तिचं ओझरतं चुंबन घेत तो उठला.

“निघायलाच पाहिजे? म्हणजे तुझ्या दृष्टीनं तीन लाख रुपये मिळवून देणारा व्यवसायच महत्त्वाचा ठरला.” ती असमाधानानं म्हणाली.

“प्रश्न केवळ पैशाचा नाही हा. एखाद्या कामाची जबाबदारी अंगावर घेतल्यावर त्यांच्या वेळेची आणि पैशाची काळजी घेणं हा माझ्या व्यवसायाचा धर्म आहे. रात्री येतो ना!” त्याचा आवाज असमाधानानं भरला होता.

“हा तुझा धर्मिष्टपणाचा अहंकार जोपर्यंत कमी होत नाही तोपर्यंत माझा तुझ्यावर कसा विश्वास बसेल?”

यानंतरचा तिचा वाद म्हणजे दही वाळत घालून भांडण काढण्याचाच प्रकार असल्याचं जाणवून त्यानं बोलणं वाढवलं नाही. ती बाहेरपर्यंत पोहोचवण्याची वाट न बघता, “गेट लावून घे.” एवढं सांगून त्यानं वेगानं स्कूटर सुरू केली.

तो निघून गेल्यावर तिच्या संतापाचा अग्नी धगधगत राहिला. गेट बंद करण्यासाठीही ती उठली नाही. कितीतरी वेळ ती तशीच सोफ्यावर बसून राहिली.

तिचं घड्याळाकडे लक्ष गेलं तेव्हा तीन वाजून चाळीस मिनिटं झाली होती. ‘एव्हाना तो आपल्या एअरकंडिशन्ड ऑफिसमध्ये जाऊन पोहोचला असेल. जलजाच्या भावाशी पै-पैशाचा हिशेब चालला असेल. त्याला आत्ताच्या आत्ता फोन करून, ‘रात्री यायची आवश्यकता नाही’ म्हणून सांगावं; पण चेंबर बंदिस्त असल्यामुळे इतरांनाही बोलणं कदाचित ऐकू जाईल. तिथं जलजा असली आणि तिनं आवाज ओळखला तर? रात्री येतो, एकत्र जेवू या. पहाटेपर्यंत गप्पा मारू या म्हणे! काय बोलायचं राहिलंय अशा माणसाबरोबर?’ ती वैतागलेल्या अवस्थेतच गेट बंद करून आपल्या खोलीत जाऊन झोपली.

आपल्या वातानुकूलित चेंबरमध्ये बसून सोमशेखर कॉंट्रॅक्टरशी, त्यानंतर आलेल्या डॉक्टर राममूर्ती आणि जलजाबरोबर पैशांचा हिशेब आणि तपशिलाची चर्चा करत होता. मध्येच चार वेगवेगळ्या दुकानांमधून लोखंड, काच, प्लायवुड यांच्या किमतींची चौकशी करताना त्याचं मन नेहमीप्रमाणे त्यात शंभर टक्के गुंतलेलं नव्हतं. सोबत असलेले नीळकंठप्पा नीट लक्ष देऊन सावधपणे मधूनच आवश्यक गोष्टींची आठवण करून देत असल्यामुळे काम चाललं होतं एवढंच! त्याचं मन अंतर्यामी वेगळ्याच भावनेत मग्न होऊन गेलं होतं.

आता ती आणि मी फार जवळ आलो आहोत. ती संतापाच्या भरात काहीही बोलली असती, तरी परस्परसंबंधांवर त्याचा काहीही परिणाम होणार नाही इतकी भावसंबंधांतली

दृढता त्याला जाणवत होती, तरी त्याचबरोबर या क्षणी या संबंधात एक पेच निर्माण झाल्याचंही त्याला जाणवत होतं. त्याच्या मनात काळजी निर्माण झाली.

'प्रेमात स्त्री-पुरुष एकत्र आल्यावर स्त्री गर्भवती राहणं यात अस्वाभाविक असं काहीच नाही. बेताचा जीवनानुभव, हातात पैसा नाही आणि बाहेर कुठं जायचं स्वातंत्र्य नाही अशा अवस्थेतल्या मुला-मुलींच्या दृष्टीनं ही जीवनातून उठवणारी समस्या असली, तरी ही निस्तरता न येण्याएवढी काही मोठी समस्या नव्हे.' बौद्धिक पातळीवर हे विवेचन पटलं असलं, तरी आत कुठंतरी त्याचाही जीव हलला होता. त्या दिवशीचा बहुतेक व्यवहार नीळकंठप्पांवर सोडून तो बसून राहिला होता. मध्ये दोन वेळा चहा आणि बिस्किटं मागवून त्यांनी सतत कामं केल्यामुळे संध्याकाळी साडेआठपर्यंत बरंच काम उरकलं. काँट्रॅक्टर निश्चित ठरला. काही फिटिंग्ज बेंगळुरूहून मार्केट रेटनं आणायचं, असंही ठरवण्यात आलं.

सगळे निघून गेल्यावर त्यानं नंजुंडेगौडा आणि नीळकंठप्पांना दुसरे दिवशी लवकर येऊन करारपत्र टाइप करायला सांगून तो तिथून स्कूटर घेऊन बाहेर पडला. आधी बाजारात जाऊन त्यानं जुईचा गजरा शोधला, पण तो न मिळाल्यामुळे नाइलाजानं त्यानं मोगऱ्याचा गजरा विकत घेतला आणि तिच्या घराकडे स्कूटर पळवली.

तो घरी पोहोचला तेव्हा मुलं जागीच होती. त्याला पाहताच विकास 'अंकल' म्हणत धावला. थोरला विजय मात्र लांबूनच 'हॅलो' म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर थोडी अस्वस्थता दिसत होती. त्याला पाहताच अमृतानं स्वागत केलं, "ओह! इस्टेटमधल्या कामगारांच्या घराच्या प्लॅनविषयी मी पूर्णपणे विसरून गेले होते! बसा. जलजाक्षी मॅडम सांगत होत्या. तुमचं रात्री दहा वाजेपर्यंत काम चालतं म्हणे! त्यांच्या भावाचं काम काय म्हणतंय? आता माझ्या कामासाठी तुम्हाला उशिरा फेरा पडला. सॉरी!"

तिचं हे बोलणं साडेआठ वर्षांच्या विजयसाठी होतं, हे त्याच्याही लक्षात आलं होतं.

"आलेच हं एक मिनिटात. मुलांना सकाळी शाळेसाठी लवकर उठावं लागतं. त्यांना झोपवून येते." म्हणत ती मुलांबरोबर त्यांच्या खोलीत गेली.

पंधरा-वीस मिनिटांनी बाहेर आली आणि "चल, जेवता-जेवता प्लॅन बघू या." म्हणत त्याला स्वयंपाकघरात घेऊन आली. सिंकमध्ये हात, चेहरा धुवून तो टेबलापाशी असलेल्या खुर्चीवर बसला तेव्हा ती त्याला हलकेच म्हणाली, "आत्ता विजय म्हणत होता, अंकलनी मोगऱ्याची फुलं आणली आहेत. ते घरात आल्यावर वास आला."

तिच्या बोलण्यात सावधगिरीचा इशारा होता. 'आपण गजरा आणून चूक केली.' या अपराधीपणाच्या भावनेत तो काही क्षण अवघडून गेला.

त्यानंतर जेवतानाही ती म्हणाली, "मला विजयचा संशय येतो. त्याला कुणीतरी काहीतरी भरवून दिलंय की काय काही समजत नाही. एवढा लहान मुलगा हा! तू तर त्याच्याशी नेहमीच व्यवस्थित वागतोस. मग त्यानं का अशी नाराजी दाखवावी?"

“का? काही बोलला का तो?”

‘काही बोलला नाही. तरीही मनात रुखरुख वाटते. मुलांचं मन आधी आईलाच समजतं ना! ते जाऊ दे. तू सांग.”

“काय सांगू? कशाच्या बाबतीत म्हणतेस तू?”

ती अवाक्षर बोलली नाही, तरी संताप चढत असल्याचं त्याला जाणवलं. पाठोपाठ तिचा प्रश्नही त्याच्या ध्यानात आला. स्वत:ला सावरत त्यानं खुलासा केला, “तू अनपेक्षितपणे विचारलंस ना, म्हणून माझा गोंधळ झाला. या संदर्भात तू जो निर्णय घेशील, तो मला पूर्णपणे मान्य आहे.”

क्षणभर तिनं कुठलीही प्रतिक्रिया न दर्शवता पुढ्यातलं जेवायला सुरुवात केली. नंतर म्हणाली, “रात्री दहा वाजता येतो. पहाटेपर्यंत बोलू या म्हणालास तू. बोलायचं म्हणजे चर्चा करू या असंच तुला म्हणायचंय ना?”

“आपण दोघांनी मिळूनच सगळ्या बाजूंचा विचार करून निर्णय नको घ्यायला?” त्यानं शांतपणे विचारलं.

काही क्षण पुन्हा शांततेत गेले. नंतर ती म्हणाली, “सगळ्या बाजूंचा विचार करून दोघांनी निर्णय घ्यायचा! दुपारी बातमी समजल्या-समजल्या तू उंच उडी मारून ‘अमू, हे माझं बाळ आहे! काहीही झालं तरी आपण याला मोठं करायला पाहिजे. यानंतर तू अजिबात उपाशी राहता कामा नये! त्याच्या पोषणात तू हयगय केलीस, तर थोबाडीत ठेवून देईन.’ एवढं म्हटलं असतंस, तरी पुरेसं होतं. रात्री दहा ते पहाटेपर्यंत सत्राशेसाठ दृष्टिकोन मांडून त्यातला एक निर्णय घेण्यासारखं आहे तरी काय यात? चर्चा करायची, अनुकूल-अनानुकूल पाहायचं, फायदा-तोटा पाहायचा! अरे, प्रेम असतं, तर त्याच क्षणी उसळून आलं असतं. ते नाही म्हणूनच तू चर्चेचा प्रस्ताव मांडलास! आतासुद्धा मी विषय काढल्यावर तू ‘कशाच्या बाबतीत?’ म्हणून प्रश्न विचारून या संदर्भातली उपेक्षाच दाखवली आहेस. नंतरही निर्णयाची सगळी जबाबदारी माझ्या एकटीवर टाकून तू नामानिराळा झालास!”

तिनं संतापाच्या भरात मंडलेले मुद्दे खोडून काढणं त्याला शक्य झालं नाही. ‘खरंच, का मी तसं म्हणालो नाही? का त्या जिवाची जबाबदारी माझी आहे असं माझ्या तोंडून आलं नाही? शरीराचा हिस्सा बनलेल्या भ्रूणाविषयी स्त्री ज्या सहजतेनं तादात्म्य पावते ते पुरुषाला अशक्य असतं काय? कदाचित काही पुरुष तसे असतीलही; पण माझा स्वभाव तसा नाही. जे मूलत: स्वभावात नाही, जे आतून आपण होऊन जमत नाही ते दाखवण्यासाठी यक्षगानातल्या पात्रासारखी तीन हात उडी मारायची?

‘ती माझ्या चेहऱ्यावरचा बारीकसारीक फेरबदल पाहते आहे. तिला आता काहीतरी उत्तर दिलंच पाहिजे.’

क्षणभर थांबून तो म्हणाला, “अमू, हे माझं बाळ आहे. त्याला मोठं करायला पाहिजे. तू

जेवलेल्या अन्नातूनच त्याचं पोषण व्हायचं आहे. त्यामुळे तू क्षणभरही रिकाम्या पोटी राहता कामा नये वगैरे वगैरे सगळं सांगणं सोपं आहे. साहित्य हा तुझा प्रांत आहे. तू संभाषणाचं सुरेख जाळं निर्माण करू शकशील; पण माझं तसं नाही. कल्पना कितीही सुरेख असली, तरी जोपर्यंत ती लोखंडी खांब, सिमेंट, विटा यांच्या आधारानं वास्तवात उभी राहू शकत नाही तोपर्यंत मी तिला शून्य किंमत देतो. शिवाय आणखी एक गोष्ट. माझी ही कल्पना केवळ माझी असून चालत नाही. घराचा यजमान, गृहिणी, मुलं-बाळं, घरी अधूनमधून येणारे पाहुणे, मित्रमंडळी सगळ्यांच्या मनात असलेली कल्पना उभारण्याची माझी प्रामाणिक धडपड असते. तूच सांग, हे ठेवायचं म्हटल्यावर काय काय परिणाम होतील? आज तू आणि रंगनाथ दूर राहत असला, तरी ही परिस्थिती समजल्यावर तो मुकाट्यानं गप्प राहील काय? तुझी काकू काय करेल? नुकतंच तू विजयविषयी सांगत होतीस. त्याच्यामध्ये घडत असलेल्या बदलावर याचा काय परिणाम होईल? तू त्याला ही नवी परिस्थिती कशी समजावून देणार आहेस? विकासला काय सांगशील? तुझ्या कॉलेजमध्ये ज्यांच्याबरोबर तुला दररोज काम करायचं आहे त्यांच्या प्रतिक्रियेचं काय? या सगळ्या प्रश्नांचा नीट विचार नको का करायला? माझं म्हणशील तर...” समोरच्या ताटलीत खरकटा हात धुऊन तो हात तिच्या ओटीपोटावर ठेवत त्यानं सांगितलं, “याची शपथ घेऊन सांगतो, सगळ्या जगापुढं मी याचं पितृत्व मान्य करायला तयार आहे. माझ्या दृष्टीनं यात कुठलीही समस्या नाही. म्हणूनच मी तुझ्यावर माझा कुठलाही विचार न लादता सांगितलं, तुला जो निर्णय घ्यायचा असेल तो घे. मला तो मान्य आहे. तुला सगळ्या प्रश्नांना तोंड द्यायचं आहे. तुझ्या सगळ्या सुखदु:खाचा मी भागीदार आहे म्हणून जे ठरवायचं ते दोघं मिळून ठरवू या म्हणालो मी. यात माझं काय चुकलं?”

संतापाच्या तिरीमिरीनं ती लालबुंद झाली. त्याचा उजवा हात तिच्या पोटावर होता. त्याच्या थोबाडीत देण्यासाठी तिनं हात उगारला, पण मग स्वत:ला आवरलं. संयमानं आवाज न चढवता ती म्हणाली, “व्वा! वकिली बोलणं झालं हे! वेगळ्या शब्दांत ‘गर्भपात करून घे. दुसरा मार्ग नाही.’ हेच सांगितलंत ना तुम्ही? माझी भावना तुम्ही कधीच जाणून घेतली नाही. स्त्रीची भावना कुठल्याही पुरुषाला कधीच समजत नाही हेच खरं! वास्तव व्यवहार सोडून तुमची भावना कधीही आत झिरपत नाही.” हे बोलताना तिचा आवाज चिंब झाला होता.

पावलांच्या आवाजानं दोघंही चांगलेच दचकले. दोघांच्याही माना वळल्या. विजय झोपायच्या खोलीतून स्वयंपाकघराकडे येत होता. डोळ्यांवर अजूनही झोपेचा अंमल असला तरी डोळे टक्क उघडे होते. त्यानं पटकन हात मागं घेतला. तीही चांगलीच दचकली होती, पण क्षणार्धात स्वत:ला सावरत ती “हे काय? बाळाला झोप नाही आली?” म्हणत उठून त्याच्याकडे जाऊन तिनं त्याला जवळ घेतलं. त्याला तहान लागली होती. ती म्हणाली, “पाहिलंस? मैसूरपाकचा परिणाम हा! कुणीच खायला नको यानंतर. माझ्या पोटात तर त्यानं इतक्या कळा आल्या म्हणून सांगू? अंकलनी पोट दाबून दिलं. स्स! अजून दुखतंय.” म्हणत तिनं विजयचा हातही आपल्या पोटावर ठेवला. नंतर “जळळं ते बेसन! स्स... हाय!” म्हणतच तिनं हात धुऊन विजयला पाण्याचा ग्लास दिला. त्याचं पाणी पिऊन झाल्यावर “चल, मी तुला झोपवते.” म्हणत त्याच्या पाठीवर हात ठेवून त्याला त्याच्या झोपायच्या खोलीत घेऊन गेली.

या प्रसंगानं सोमशेखर दिङ्मूढ होऊन गेला होता. अशा बिकट प्रसंगी तिनं दाखवलेल्या प्रसंगावधानानं तो चकित होऊन गेला होता. ती सुमारे दहा मिनिटांनी आत आली. आल्या

आल्या त्याला हलक्या आवाजात म्हणाली, “तो झोपी गेला तेव्हा तू घरात होतास. त्याचं अंतर्मन झोपेतही या विषयी सावध होतं वाटतं! त्यामुळे त्याला जाग आलीये. आता तू जा. तुझी स्कूटर गेल्याचा आवाज ऐकेपर्यंत तो गाढ झोपणार नाही. उद्या दुपारी मात्र नक्की ये. दोन तास तरी सवड काढ. खूप बोलायचंय.”

मोगऱ्याचा गजरा तिला द्यायचा त्याला विसर पडला होता. लाउंजमधलं हेल्मेट उचलताना ते त्याच्या लक्षात आलं. गजरा तिच्या केसांत माळून नि:शब्दपणे तो तिथून बाहेर पडला. बाहेरच्या नीरव शांततेवर स्कूटरच्या आवाजानं अत्याचार होत आहेत, असं त्याला तीव्रपणे वाटलं. या वेळी पायी चालत घरी गेलो तर डोक्यातले कितीतरी विचार अधिक स्पष्ट होतील, असं वाटलं.

घरी आल्यावर मच्छरदाणीत शिरतानाही तो विचारात गढला होता. स्त्रीची भावना पुरुषाला समजत नाही म्हणाली ती. त्याला पूर्वीचीही एक घटना राहून राहून आठवत होती. लग्नानंतर त्याच्या बायकोचा तीन महिन्यांचा गर्भपात झाला म्हणून किती रडली होती ती! नंतरही कितीतरी दिवस ती त्या आठवणीनं रडत राहायची. ‘एकदा मी वैतागून “एवढं रडायला काय झालं?” म्हटलं तेव्हा तीही हेच म्हणाली होती, “बायकांचं दु:ख तुम्हाला कसं कळणार?” ’

‘तिच्या पोटात वाढणारं भ्रूण तिच्या तनामनाचा एक भाग होऊन जातं म्हणूनच तिचं मन त्याच्याशी एवढं तादात्म्य होत असावं. शिवाय हिच्या बाबतीत तर ते हिच्या-माझ्या प्रेमतादात्म्याचं मूर्तरूप!’ पण आठवणींचं आणखी विश्लेषण करताना पुन:पुन्हा वाटत राहिलं, ‘ती म्हणते तेच खरं. पुरुष किती केलं तरी भ्रूणाशी एवढ्या प्रमाणात तादात्म्य पावलेला नसतो.’

कितीतरी वेळ तो जागाच होता. अशा परिस्थितीमध्ये काय करावं हे त्याला सुचत नव्हतं. त्याला मुंबईमध्ये घडलेलाही एक प्रसंग आठवला. एकदा सुखाची लयलूट करताना त्यानं विचारलं होतं, “आपण इतक्या वेळा भेटत असतो. तुला दिवस राहिले तर?”

तिनं त्याची टर उडवत विचारलं होतं, “तसं झालं तर तू माझ्याशी लग्न करशील?”

“आपण लग्न केलं की, तुझं विद्यापीठ गेलं आणि माझी नोकरी गेली म्हणायची! मग दोघांना दोन वेळा अन्नही मिळणार नाही.”

“लग्न झालं की, ही उत्कटता चोवीस तास, तीन दिवस, बारा महिन्यांत संपून जाईल. प्रेमी म्हणून राहिलो, तरच ती शिल्लक राहील.”

‘मला तिचं बोलणं पटलं नव्हतं. दोघांची सोबत असल्यावर म्हातारपणापर्यंत एवढ्याच उत्कटतेनं जीवनाचा आनंद घेऊ, असं मला वाटत होतं. ती पुढं म्हणाली, “तिसरी मुलगी झाल्यावर मी ऑपरेशन करून घेतलं आहे. त्यामुळे आता ती भीती नाही.”

‘तिनं तिच्या जीवनातली पूर्वी घडलेली एक घटनाही सांगितली होती,

“लग्न होऊन एक वर्ष झालं होतं. नवरा शिक्षणासाठी एक वर्षभर कॅनडाला गेला होता. मी

मुंबईमध्ये एम.एस्सी. करत होते. तेव्हा एक मित्र भेटला. मैत्री वाढली. त्यातूनच दिवस राहिले. काय करणार?" शेवटचा प्रश्न विचारताना तिनं माझ्या चेहऱ्यावर नजर खिळवली होती.

'सगळा भार माझ्यावर पडल्यासारखा मी चिंताक्रांत होऊन गेलो. ती मनापासून हसली आणि म्हणाली, "मित्रही असाच घाबरून गेला होता. अविवाहित आणि अननुभवी होता तो. मीच हसले आणि त्याला सांगितलं, घाबरू नकोस. मी स्त्री आहे. याची जबाबदारी माझी. नंतर मी एकटीच डॉक्टरांकडे गेले आणि दोनशे रुपये देऊन मोकळी झाले." वर माझ्या चेहऱ्याकडे पाहत ती म्हणाली, "आता तुझा चेहरा कसा सुटका झाल्यासारखा दिसतोय म्हणून सांगू! अरे, हे सगळे बायकांचे प्रश्न आहेत. ते त्यांनीच निस्तरायला पाहिजेत. उगाच पुरुषांवर ती जबाबदारी टाकून त्यांच्या मनाला त्रास होईल असं वागणं योग्य नव्हे. मी कधीही अशी क्रूरपणे वागले नाही. एकदा माझ्या नवऱ्याकडूनही चूक झाली होती. त्या वेळी "तुझ्यामुळे हे असं झालंय. बट डोंट वरी. मी डॉक्टरांना भेटते." सगळं संपल्यावर त्याला ऑफिसमध्ये फोन केला. "डिअर, काम झालं. तुला मात्र आठवड्याचा उपवास."

'दोघींची तुलना करणं योग्य नव्हे, असं मनानं कितीही बजावलं, तरी तुलना थांबत नव्हती. त्या संबंधात एवढी सांद्रता नव्हती, नैवेद्य-भाव नव्हता; पण त्याचबरोबर चिंता, दु:ख, वेदना आणि काळजीही नव्हती.'

विचाराच्या तंद्रीत उशिरा केव्हातरी त्याला झोप लागली.

तो सकाळी लवकर ऑफिसमध्ये गेला. डॉक्टर राममूर्तींना नीळकंठप्पांची सोबत करून देऊन कामासाठी बाहेर पाठवून दिलं. त्या दिवशी प्रत्यक्ष राममूर्तींना करायची कामं संपण्यासारखी होती. त्यानंतरच्या कामांसाठी त्यांची प्रत्यक्ष आवश्यकता नव्हती. दुसरे दिवशी ते बेंगळुरूला जाणार होते. चार दिवसांसाठी त्यंचं तिथं काही काम होतं. म्हणून त्या रात्री त्यांनी सोमशेखरला जेवायला बोलावलं होतं. बारापर्यंत काम केल्यानंतर तीन वाजता येत असल्याचं नीळकंठप्पांना सांगून तो स्कूटर घेऊन निघाला. मार्केटमध्ये तीन-चार दुकानं हिंडून त्यानं जुईचा गजरा मिळवला. तिच्या घराच्या दिशेनं स्कूटर पळवताना 'काय निर्णय घ्यायचा?' या प्रश्नापेक्षा 'आज ती कशी वागेल?' हाच प्रश्न तीव्रपणे जाणवत होता. 'एक अनपेक्षित परिस्थिती निर्माण झाली आहे आणि ती निवारण्याचं पूर्ण स्वातंत्र्य मला नाही. पूर्ण कसलं? न्यायानं जे मिळायला पाहिजे तेवढं निम्मं स्वातंत्र्यही नाही. तिला जसं वाटतं, जे तिला न्यायाचं वाटतं तसं ती वागते.'

गेटपाशी स्कूटर पूर्णपणे बंद न करता गेट उघडून त्यानं स्कूटर आत घेतली आणि तो पुन्हा गेट बंद करून आला. ती दरवाजात चेहऱ्यावर हसू आणून उभी होती. जुईचा गजरा तिच्या केसात माळून त्यानं तिच्या ओठांवर ओठ टेकवले. हात-पाय धुऊन तो आत येण्याआधी तिनं टेबलावर दोघांचीही पानं वाढली होती. आपल्या खुर्चीवर बसून कोशिंबीर खात संभाषण सुरू करायचं म्हणून त्यानं विचारलं, "रात्री नंतर विजय केव्हा झोपला?"

ती काहीच बोलली नाही. तिच्या चेहऱ्यावर कठीण मौन थिजलं होतं. नंतर तिनं विचारलं, "आधी सार वाढू की आमटी?"

“काहीही चालेल.” तो म्हणाला.

मान वर करून धिक्कारलेल्या दृष्टीनं त्याच्याकडे पाहत तिनं पुन्हा विचारलं, “आता इथं तुमची हुशारी दाखवायची गरज नाही. सांगा काय वाढू?”

तो दुखावला गेला, तरीही संयम राखून म्हणाला, “यात हुशारी दाखवायचा प्रश्नच कुठं आला? तुला जे आधी खायचंय, तेच मलाही वाढ म्हणजे झालं.”

“म्हणजे तू ठरवशील ते मी ऐकणार. मला कुठलीही जबाबदारी घ्यायची नाही. असंच म्हणायचंय ना तुम्हाला?”

“एक वाटी आमटी वाढ. सारही प्यायचंय मला. दोन्ही भाताबरोबर खाल्लं की जास्त होईल. तीन वाजता पुन्हा कामासाठी बसायचंय.”

“हं! तुम्ही कामाची माणसं! आम्ही रिकामटेकडे!” म्हणत तिनं आमटी वाढली. तिचा चेहरा संतापानं तसाच फुलला होता. दोघांचाही आमटी-भात संपत आला होता. त्या वेळी तिनं एकदम विचारलं, “आल्या आल्या विजय नीट झोपला की नाही म्हणून चौकशी करत होतास. तो झोपला नसता, तर तू त्याला झोपवणार होतास काय?”

अवाक्षरही न बोलता तो खालच्या मानेनं तोंडात घास घोळवत राहिला. तिनं पुन्हा विचारलं, “का? घशाखाली जात नाही?”

या प्रश्नातही त्याला दोन अर्थ दिसले. तरी तो काही बोलला नाही. तिनं पुन्हा विचारलं, “विजयचा प्रश्न का काढलात?”

“उगाच. सहज विचारायचं म्हणून विचारलं. चुकलं असेल, तर सॉरी.”

त्याच्या ‘सॉरी, चुकलं’ या शब्दांनी तिचा संताप पराकोटीला पोहोचला. “हे पाहा! तुम्ही मला संतापायला लावता आणि मी त्यावर काहीतरी प्रतिक्रिया दाखवली की, जन्मभर ‘खरकट्या हातानं थोबाडीत मारली!’ म्हणून दोष देता. ही शकुनी-बुद्धी तुम्ही सोडून दिलीत, तर मला थोडीफार मन:शांती मिळेल.”

“सॉरी.”

“पुन्हा तेच. पुन्हा मला राग....”

“पण माझं चुकलं म्हणायला आणखी काय शब्द आहे? ते आणखी कसं व्यक्त करता येईल? तू भाषा-साहित्याचा अभ्यास केलायस ना? तूच मला समजावून सांग.” तो संयमानं म्हणाला. बोलणं सुरू होण्याआधीच पारा चढल्याचं त्याला जाणवलं होतं.

“अतिशहाण्या लोकांना शब्दांशिवाय इतर कुठलेही मार्ग ठाऊकच नसतात.” ती तिरकेपणानं म्हणाली.

हे ऐकताच तो खुर्चीवरून उठून चटकन तिच्या पायाशी वाकला. तिनं वेगानं आपले पाय मागं घेतले.

तरी त्यानं तिची पावलं धरलीच. तिनं संतापानं त्याला दूर लोटलं. या धडपडीत त्याच्या हाताचा कोपरा टेबलावर आदळून त्याच्या चेहऱ्यावर वेदना उमटली. त्याच वेळी तिनं आरोप केला, "काहीही खुसपट काढून आज भांडायचंय, असं ठरवून आलात वाटतं तुम्ही!"

तो असहाय होऊन गेला.

काही न बोलता ती आणखी भात वाढायला आली. त्यानं हात आडवा घालत सांगितलं, "पुरे."

"का?" तिनं शाळेतल्या चूक केलेल्या विद्यार्थ्याला जाब विचारावा तसं विचारलं.

"सांगितलं ना, ऑफिसमध्ये गेल्यावर कामं आहेत. उद्या राममूर्ती बेंगळुरूला जाताहेत."

त्याचं उत्तर शंभर टक्के खोटं आहे अशा मुद्रेनं ती बसून राहिली होती. त्यानंही मौन स्वीकारलं. पुन्हा भात पूर्ववत भांड्यात ठेवत ती म्हणाली, "मला तुमच्या वागण्याचा हेतू स्पष्टपणे समजला आहे. तुम्ही जेवला नाही की, मी जेवणार नाही. मग पोटातलं बाळ पोटातच मरून जाईल. तुमची सुटका होईल. हीच तुमची इच्छा आहे."

त्याच्या संयमाला आता मात्र तडा गेला. तो म्हणाला, "बोलायला जीभ आहे म्हणून काहीही बोलू नकोस."

"स्वत:चा खोटेपणा माझ्यावर का लादता?"

'मी काय खोटेपणा केला?'

'हे बाळ पोटातच मरू दे अशी तुमची इच्छा नाही? हा गर्भ गळून जाऊ दे, म्हणून तुम्ही देवाला नवस नाही बोलत? खरं सांगा...'

'माझा देवावर पूर्ण विश्वास नाही, त्यातही नवस बोलायचा आणि तो देवानं मंजूर करायचा या प्रकारावर विश्वास नाही हे तुलाही चांगलं ठाऊक आहे.'

'म्हणजे विश्वास असता तर नवस बोलला असता हे तुम्ही मान्य करताहात! आता विश्वास नाही तरीही नवस बोलताय...'

'तुझ्याशी या विषयावर अवाक्षर बोलायची माझी इच्छा नाही. पण म्हणून मी गप्प राहिलो तर 'माझं पटलं म्हणून गप्प बसलात' म्हणशील म्हणून सांगतोय... हे शुद्ध खोटं आहे.'

'एवढंच नव्हे... हिचं पोट पाडताना हीही मरू दे म्हणून तुम्ही गावच्या मारम्माला नवस बोलला आहात! तुमच्या अंतर्मनाला विचारा म्हणजे सत्य काय ते तुम्हालाच उमजेल...'

सगळं प्रकरण असह्य होऊन त्यानं कानांवर हात ठेवले. काही क्षण ती बोलली नाही. नंतर म्हणाली, 'काढ ते हात!' तिच्या आवाजात स्पष्ट आज्ञा होती.

त्यानं हात काढले नाहीत.

'काढ ते हात...' ती जोरात म्हणाली. तरी तो अविचल राहिला.

'मी सांगते... हात काढ...' तिनं शेवटची ताकीद द्यावी तसं सांगितलं. तरीही तो तसाच राहिला. आता काय करावं... काय केलं तर तिची प्रतिक्रिया काय होईल वगैरे विचार त्याला गुरफटून टाकत असतानाच तिनं त्याचे दोन्ही हात कानांवरून ओढून काढले. पाठोपाठ तिचा उजवा खरकटा हात त्याच्या गालावर आदळला. एकाएकी त्यानं कुठलीही प्रतिक्रिया न दाखवता घडेल त्याला तोंड द्यायचा निर्णय घेतला. काही क्षण त्याच्यावर जळती दृष्टी रोखून तिनं त्याच्या प्रतिक्रियेची प्रतीक्षा केली आणि म्हणाली, 'येशू ख्रिस्ताच्या नीतिपाठाचं सोंग मला चांगलंच समजतंय! या गालावर मारलं तर तो गाल पुढं करायचं नाटक करतोस?'

त्याच्या मनात निर्माण झालेली प्रतिक्रिया आणखी स्पष्ट होऊन तो तिला शांत स्वरात म्हणाला, 'मला त्यातलं काही ठाऊक नाही. ख्रिस्तानं तो उपदेश शत्रूच्या संदर्भात सांगितला होता; पण तू काही शत्रू नाहीस. त्यामुळे यात काहीच मोठेपणा नाही.'

काही क्षण ती त्याच्याकडे दृष्टी रोखून राहिली. नंतर 'बोलण्यातलं शहाणपण तुझं...' म्हणत तिनं पुन्हा त्याच्या उजव्या गालावर मारलं. तरी तो गप्पच राहिला. पुन्हा हात उगारून तिनं एकदा या गालावर आणि एकदा त्या गालावर मारायला सुरुवात केली. एकेका गालावर सात-आठ वेळा मार बसले तरी तो जागचा हलला नाही. त्यानं कुठलीही प्रतिक्रिया दाखवली नाही. संतापाला मार्ग न सापडल्यासारखी ती उठून उभी राहिली. टेबलावरचं साराचं पातेलं तिनं त्याच्या डोक्यावर उपडं केलं. पाठोपाठ कालवलेला दही-भातही त्याच्या डोक्यावर ओतला आणि धपाधप पावलं टाकत ती मुलांच्या बेडरूममध्ये निघून गेली.

मनानं निग्रह केल्याप्रमाणे एवढा वेळ तो कुठलीही प्रतिक्रिया न दाखवता अविचलपणे बसून राहिला होता. डोक्यावर सांडलेल्या साराचा ओघळ डोळ्यांत जाऊन डोळे चुरचुरू लागले तसा तो उठून न्हाणीघरात गेला. घड्याळ काढून ठेवत त्यानं आधी डोकं नळाखाली धरलं. नंतर चेहरा, डोळे धुतले. अजून डोळ्यांची आग होत होती. डाळ शिजतानाच घातलेलं तेल, फोडणीचं तेल आणि दह्याचा ओशटपणा केसांना माखला होता. किलकिल्या डोळ्यांनी बघत, हाताने चाचपडत त्यानं शिकेकाईचा डबा शोधला. न्हाणीघराचा दरवाजा बंद करून त्यानं शिकेकाईनं घासून अंघोळ केली. लुंगी, बनियन सार आणि दह्यानं माखून गेले होते. साबणाची पावडर घालून त्यानं कपडे भिजवून ठेवले. घासून, डाग काढून पुन्हा साबणाच्या पाण्यात तसेच भिजवून ठेवून टॉवेलनं अंग-डोकं पुसलं आणि तोच टॉवेल कमरेला गुंडाळून तो बाहेर आला. तिची कुठंच चाहूल ऐकू येत नव्हती. तिच्या बेडरूममध्ये त्याची शर्ट-पँट होती. ते कपडे अंगावर चढवून त्याने केस विंचरले, बूट चढवले. दोन वाजले होते. त्याला अजूनही पाऊण तास वेळ होता; पण आता त्याला काहीच अर्थ नव्हता. बेडरूममध्ये ती भिंतीकडे तोंड करून झोपली होती. तिला "अमू, उशीर होतोय. दरवाजा बंद करून घे." म्हणून सांगतानाही त्याचा आवाज शांत होता.

तिचं घर दोन फर्लांग मागे पडल्यावर मात्र त्याचा सगळा संयम ढासळून गेला. दृष्टी धूसर झाल्यानं स्कूटर चालवणं अशक्य झालं. ब्रेक लावून रस्त्याच्या डाव्या हाताला एका झाडाखाली स्कूटर उभी करताना त्याच्या डोळ्यांमधून पाणी ओघळू लागलं. एवढंच नव्हे, पाठोपाठ हुंदकेही येऊ लागले. लोकांचा कमी वावर असलेल्या या गावाबाहेरच्या रस्त्यावर कुणीतरी चुकून भेटेल आणि चौकशी करेल याची तमा न बाळगता त्यानं काही क्षण मन मोकळं केलं. मुक्तपणे रडल्यानंतर त्यानं खिशातल्या रुमालानं डोळे पुसले. पुन्हा पुढचा रस्ता स्पष्ट दिसू लागला. पुन्हा स्कूटर सुरू करून निघताना तलावाच्या काठच्या दगडी बाकावर त्याला बसावंसं वाटलं. स्कूटर वळवून त्यानं झाडाची सावली असलेल्या दगडी बाकापाशी स्कूटर थांबवली. त्याचं मन निश्चल होऊन गेलं होतं. भोवतालचं वातावरण आणि समोरच्या तलावातल्या अंगुळभर उंचीच्या लाटाही निश्चल झाल्या होत्या.

घड्याळात पाहिलं तेव्हा पावणेतीन वाजले होते. एवढ्या अवधीत दोन्ही गाल चुरचुरत असल्याचा त्याला अनुभव येत होता. त्यानं उठून स्कूटरच्या आरशात पाहिलं. दोन्ही गाल लालबुंद होऊन त्यावर वळ उठले होते. असं तोंड घेऊन ऑफिसमध्ये जाणं योग्य नव्हे असं वाटलं. 'रात्रीचं जेवणही काहीतरी निमित्त सांगून चुकवता आलं तर बरं.' कुठल्यातरी हॉटेलमध्ये जेवायचा त्यांचा विचार होता. 'त्या वेळेपर्यंत हे वळ मावळणं शक्य नाही. उलट सूज जास्तच पसरली जाईल. चेहऱ्यावर भरपूर स्नो चोपडून त्यावर पावडरीचा पातळ थर दिला तर? पण कधी नव्हे ते पावडर लावल्याचं पाहून त्यांचा काय ग्रह होईल? त्यापेक्षा राममूर्तींनाच फोन करून 'तातडीच्या कामासाठी परगावी जातोय, सॉरी' म्हणून सांगितलं तर? पण व्यवसायाच्या दृष्टीनं पाहता हे जेवण महत्त्वाचं आहे. आपण कितीही सचोटीनं काम केलं, तरी अशा प्रकारच्या जेवणाच्या वेळीच स्नेह आणि मोकळेपणा वाढतो. आतापर्यंतच्या भेटींमध्ये व्यवहाराव्यतिरिक्त इतर काही विषयच निघाले नाहीत. त्यामुळे जाणं आवश्यक आहे आणि राममूर्ती स्वत: तज्ज्ञ डॉक्टर असल्यामुळे स्नो-पावडरीला ते बळी पडणार नाहीत.' काहीही करून हे जेवण चुकवायचं नाही अशा निष्कर्षापर्यंत येऊन त्यानं एका हॉटेलमधून ऑफिसला फोन केला, "माझं डोकं जबरदस्त दुखतंय. जाम सर्दीही झालीये. आता ऑफिसमध्ये येत नाही. संध्याकाळी सात वाजता येईन. राममूर्ती थोडेफार लवकर आले, तर त्यांना बसायला सांगा."

खरंतर शेवटच्या वाक्याची आवश्यकता नव्हती. कारण तसं राममूर्ती उशिरा येणं शक्य नव्हतं. तसंच ते लवकर येणंही शक्य नव्हतं.

तो सरळ आपल्या घरी आला. घरात पडलेलं एक जुनं क्रीम गालांवर लावून तो अंथरुणावर पडला. कुशीवर वळलं की, गालाला उशी घासून अधिकच आग होत होती. उताणं झोपून त्यानं डोळे मिटले. एकाएकी तीव्रपणे बायकोची आठवण धावून आली. मेलेल्या व्यक्तीची आठवण करून गळे काढणं व्यक्तिश: त्याला आवडत नसल्यामुळे आजपर्यंत आलेल्या आठवणी तो जाणूनबुजून दुसरीकडे वळवत होता. तिला जाऊनही सहा वर्षं होऊन गेली होती. आताशा तिची आठवण त्याला फारशी येत नव्हती; पण आता मात्र तिचं साकार रूप त्याच्या दृष्टीपुढे येऊन उभं राहिलं. तिचा स्वभाव पराकोटीचा शांत होता. तिला क्वचितच राग येई. त्या रागाचं स्वरूपही अगदी सौम्य असे. असा राक्षसीपणा तर तिच्या बाबतीत शक्यच नव्हता. एकंदर व्यक्तिमत्त्वात तरतरीतपणा थोडा कमी असला, तरी अतिशय शांत

आणि संयमी स्वभाव. शेल्फात पुस्तकांबरोबरीनं ठेवून दिलेला दोघांचा फोटो त्याला आठवला. उठून त्यानं तो बाहेर काढला. तिच्या फोटोकडे पाहताना पुन्हा वाटलं, 'ही कुणावरही कधीही हात उगारणं अशक्य आहे. एकदा मुंबईमध्ये फ्लॅटच्या खालच्या बाजूला रस्त्यावर दोन कामगारांची मारामारी पाहून कशी रडवेली होऊन मला बोलवायला आली होती!'

काही क्षण टक लावून तिचा फोटो पाहून त्यानं तो पुन्हा जागेवर ठेवून दिला. फॅन लावून कपडे बदलून अंथरुणावर उताणं झोपताना डोळे मिटताक्षणी मनात आलं, 'हा विचित्र राक्षसीपणा हिच्या मूळ स्वभावाचाच एक भाग आहे की....'

पाठोपाठ त्याच्या आणखीही एक गोष्ट मनात आली. 'मी कितीही शांतपणानं आणि संयमानं वागलो, तरी तिचं मन दुखावलं गेलं आहे हे निश्चित! राक्षशिणीसारखं मारून वर सार, दहीभात ओतल्यावर तिला दु:ख होईल की नाही?' त्यानं घड्याळात पाहिलं. चार वाजले होते. 'आता तिची मन:स्थिती कशी असेल? अमू स्वभावानं शांत नाही हे खरं असलं, तरी तिची संवेदना सूक्ष्मातिसूक्ष्म आहेत. बुद्धी उत्तम आहे. विश्लेषणशक्ती जबरदस्त आहे. माझ्यापेक्षा ती जास्त वेदनांनी तळमळत असेल. घरी फोन असता, तर किती बरं झालं असतं!

'बाहेर जाऊन कुठल्यातरी दुकानातून तिच्या घरी फोन करावा काय? पण तिचा मूड... अजूनही तसाच असेल तर? नकोच. हिचा स्वभावही किती विचित्र आहे! ती एक चूक करते. तिला त्याचा मनापासून पश्चात्ताप होतो; पण नंतर पुन्हा तीच ती चूक आणखी मोठ्या प्रमाणात करते! मी जितका शांत राहतो तितका तिला राग अनावर होतो. मी रागावलो तर काय होईल? या विचाराशी तो विचारमग्न झाला. आरडाओरडा करणं, दमदाटी, कुजकं बोलणं... नाटक म्हणून हे सगळं करता येईल; पण खरंखुरं संतापणं शक्य नाही.' असं त्याला वाटलं. त्यात नाटक म्हटलं की, मर्यादा आल्या. 'म्हणजे तिच्या संतापाच्या तोडीस तोड असा आपला संताप होणार नाही.' त्याला कुठलाही मार्ग सुचेनासा झाला होता. 'मी तिच्याकडे जाणं बंद केलं तर? ते तर आता ठरल्यासारखंच आहे; पण त्या आधी उपस्थित झालेला तिच्या गर्भारपणाचा प्रश्न सोडवायलाच पाहिजे ना!'

तो तसाच उताणा पडून राहिला. एक लहानशी डुलकी लागून तो पंधरा मिनिटांनी जागा झाला. नंतरही कुशीवर न वळता उताणाच पडून राहिला. पावणेसात वाजता तो उठला. साबण न लावता फक्त थंड पाण्यानं त्यानं गाल आणि चेहरा धुतला. तिच्या घरी नुसत्याच धुतलेल्या केसांना त्यानं थोडं तेल लावलं आणि केस विंचरले. चेहऱ्याला एकदम लक्षात येणार नाही असा स्नो-पावडरचा पातळ थर लावून आरशात पाहिलं, तरी चेहऱ्यावरचा फरक दिसत होता. त्याला आणखी एक उपाय सुचला. त्याने लांबलचक मफलर कान-गळा झाकेल अशा तऱ्हेनं गुंडाळून घेतला आणि "थंडी वाजतेय. जपावं लागतं. सायनसचा त्रास आहे ना!" असं सांगायचंही ठरवलं. धोब्याकडून आलेला एक शर्ट आणि पँट चढवून स्कूटरवरून तो ठरल्याप्रमाणे ऑफिसमध्ये हजर झाला. राममूर्तींनी काही विचारण्यापूर्वीच ठरलेला खुलासा देऊन मोकळा झाला. त्यामुळे नंतर राममूर्तींनी काही विचारलं नाही. 'कदाचित अमेरिकेत गेल्यावर भारतीय अतिचौकसपणा त्यागल्याचा परिणामही असावा.' असं त्याला वाटलं. त्यांच्या कारमध्ये बसल्यावर त्यांनी सांगितलं, "चामुंडी हिलवरच्या हॉटेलमध्ये टेबल रिझर्व ठेवायला फोन केलाय. तिथं जाऊ या."

"... ओ यस्!" तो उद्गारला.

तिच्या घरासमोरून कार जाताना त्याचं मन पिळवटल्यासारखं झालं. गाडी टेकडी चढत असतानाही तो मनोमन सैरभैर होऊन गेला होता.

राममूर्ती मात्र उत्साहात होते. अमेरिकेतला आपला व्यवसाय, तिथलं बाकीचं जीवन, कितीही पैसा मिळाला, तरी दोघांनाही तिथं जाणवणारी एकाकीपणाची भावना, वयात येत असलेल्या मुलांवर होत असलेले तिथल्या सामाजिक परिस्थितीचे संस्कार या सगळ्याविषयी ते भरभरून मोकळेपणानं बोलत होते. तिथं पोहोचल्यावर दोघांनीही जेवणाआधी ड्रिंक्स घेत दोन तास काढले. सोमशेखर 'नाही' म्हणत नसला, तरी त्याला त्यात फारसा रस नव्हता. डॉक्टरही काही पट्टीचे पिणारे नव्हते. तरीही त्या अवधीत दोघांचा मूड तरल होऊन दोघंही नेहमीपेक्षा जास्तच जेवले. त्यानंतरही दोघं गप्पा मारत बसले होते.

साडेअकरा वाजून गेल्यावर मात्र दोघंही उठले आणि गप्पा मारत गाडीनं टेकडी उतरू लागले. दोनेक मैल खाली उतरल्यावर सामोऱ्या येणाऱ्या दरीपाशी एक गाडी उभी असल्याचं आधी त्यानं पाहिलं. गाडीचा वरचा भाग दिसताच त्यानं तिची गाडी ओळखली. 'ती इथं आलीये, रिव्हॉल्वर हातात घेऊन!' त्याच्या छातीत धडधडू लागलं. एवढ्यात त्या गाडीचे फ्लडलाइट्स लावले गेले. गाडी चालवणाऱ्या राममूर्तींचे डोळे त्यामुळे दिपून गेले. त्यांनी गडबडीनं आपल्या गाडीचे दिवे बंद करून तिच्या गाडीच्या फ्लडलाइट्सच्या उजेडात गाडी पुढे नेली. पुन्हा गाडीचे दिवे लावून वेग वाढवताना ते त्रासून जाऊन म्हणाले, "काय हे? समोरच्या ड्रायव्हरला त्रास होईल याची थोडी तरी काळजी भारतीय ड्रायव्हर्सनी घ्यायला काय होतं?"

पण तिनं तसं का केलं होतं, हे सोमशेखरला ठाऊक होतं. स्वत:चं अस्तित्व समोरच्या गाडीतल्या माणसांच्या लक्षात येऊ नये म्हणून ती तशी वागली होती. इथंच थांबून तिच्याशी बोलावंसं वाटलं, तरी त्यानंतर राममूर्तींना काही प्रश्नांची उत्तरं द्यावी लागतील हे त्याला समजत होतं. तिथं उतरणं म्हणजे त्या दोघांची ओळख करून देणं आलं असतं. 'नंतर जलजाक्षीपर्यंत बातमी जाईल. नकोच.'

त्याला त्याच्या ऑफिसपाशी सोडून "लेट झाला, सॉरी. पण मला तुमची कंपनी खूप आवडली." वगैरे बोलून राममूर्ती पुढं जलजाक्षीच्या घराकडे निघून गेले. ते दिसेनासे होताच स्कूटर सुरू करून तो भरधाव वेगानं निघाला. देवराज रस्ता, हार्डिंग्ज सर्कल, प्राणिसंग्रहालयाकडचं वळण ओलांडत असताना त्याला येणाऱ्या एका गाडीचा उजेड दिसला. त्यानं स्कूटरचा वेग कमी केला. समोरची वेगानं येणारी गाडीही त्याच्याजवळ गचकन थांबली. पाठोपाठ हाकही ऐकू आली, "सोमू!"

ती त्याला शोधत तिथंपर्यंत आली होती, या विचारानं नकळत त्याचं मन फुलून आलं. तीच त्याला म्हणाली, "तू जयलक्ष्मीपूरच्या घराकडे चल. मीही तिकडंच येते."

त्यानं स्कूटर वळवली आणि घराकडे पळवली. तीही त्याच्या पाठोपाठ सावकाश आली. तिनं रस्त्यावर गाडी उभी केली. त्यानं स्कूटर गॅरेजमध्ये जागेवर ठेवली. वाहनांना कुलपं लावून दोघंही जिना चढू लागले.

घरात गेल्या गेल्या ती उत्साहानं सांगू लागली, “त्याचं काय झालं, वरून येणाऱ्या कारचा उजेड पाहिला. अशा अवेळी एकटी बाई आलीये हे दिसू नये म्हणूल मी फ्लडलाईट लावला. तुमच्या गाडीचा दिवा बंद झाल्यावर तू आणि तुझं अमेरिकेचं गिऱ्हाईक दिसलं.” त्याचा दंड धरत ती म्हणाली, “सोमू, तू दिसल्यावर मला जगायलाच पाहिजे असं वाटलं. तुला भेटायची इच्छा एवढी की, तशीच इकडं आले. तर तू... सोमू... तू मला भेटायला धाव घेत होतास... सोमू... माझा सोमू...” ती भावविवश होऊन गेली होती.

तिच्या चेहऱ्याकडे टक लावून पाहताना त्याची नजर आपल्या दंडावर असलेल्या तिच्या हातांकडे गेली. हातांकडे बांगड्या नव्हत्या. घड्याळही नव्हतं. मनगटापासून कोपरापर्यंतचे तिचे हात रक्ताळले होते. ओरखडे दिसत होते. दोरखंडाच्या जाडीचे वळही उमटले होते. त्यानं विचारलं, “काय हे?”

“कुठं काय?” काहीही समजलं नसल्यासारखं दाखवत तिनं विचारलं.

“दोन्ही हातांना या जखमा कसल्या?”

“या जखमा होय,” एखादी साधी घटना सांगावी तसं ती म्हणाली, “तुझ्या चुकीची शिक्षा ही.”

“म्हणजे काय?”

“लाज वाटते, पण तरीही सांगायचं टाळणार नाही. दुपारी माझ्या राक्षसी वागण्यासाठी तू मला पेकाटात चार लाथा मारल्या असत्यास, तर छान झालं असतं. माझं समाधान झालं असतं; पण तू तसा वागला नाहीस, वागू शकणारही नाहीस. मग तुझ्यावर उठलेल्या या हातांना शिक्षा कशी होणार? म्हणून मीच त्यांना शिक्षा केली. तू गेल्यावर तासाभरानं! नक्की सांगू, चार वाजता.”

त्या वेळी आपणही तिची आठवण काढत होतो हे आठवून त्यानं विचारलं, “पण कशानं मारलंस?”

“कुत्र्यांना बंधायच्या साखळीनं. मला अगदी स्पष्ट आठवतंय, तुझ्या प्रत्येक गालावर मी सात-सात प्रहार केले. बुद्धीवर राक्षशीण स्वार असली, तरी स्मरणशक्ती मंद होत नाही. उलट जास्त तीव्र होऊन जाते. म्हणून मी प्रत्येक हातावर चौदा या हिशेबानं त्यांना शिक्षा दिली.” तिच्या चेहऱ्यावर न्यायदानाचा विजय दिसत होता.

त्यानं पटकन घड्याळात पाहिलं, पाऊण वाजला होता. त्यानं तत्परतेनं विचारलं, “कुत्रं बांधायची लोखंडी साखळी... रक्त वाहतंय... कातडं सोललंय तीस-चाळीस ठिकाणचं. दोन्ही हातच सोलपटून निघालेत. तू अँटिटिटॅनसचं इंजेक्शन घेतलंस? चल, आत्ताच्या आत्ता. माझ्या ओळखीचे डॉक्टर आहेत. त्यांचं घर आणि दवाखाना एकत्रच आहे. त्यांना उठवून इंजेक्शन घेऊन येऊ या.”

“छे:! तुझी अमू अशी मरणार नाही. मरायची शक्तीच नाही तिच्यामध्ये. मला मारायची

शक्ती टिटॅनसमध्येही नाही. मी तुझ्याशी बोलायला आले. डॉक्टरकडे जाण्यासाठी नाही." तिनं विरोध केला.

पण त्यानं काही एक न ऐकता तिला जवळजवळ ओढतच बाहेर काढून डॉक्टरांकडे घेऊन गेला. त्यांना "ह्या माझ्या ओळखीच्या मॅडम आहेत. कपांऊडच्या कामासाठी आणलेलं तारांचं भेंडोळं हातांवर पडून एवढं लागलंय." असं सांगितलं. डॉक्टरांनीही फारसा विचार न करता इंजेक्शन दिलं. जखमा लवकर भरून येण्यासाठी आणखी एक इंजेक्शन, गोळ्या, जखमांना लावण्यासाठी मलमही दिलं. त्यांनी पैसे मागितले नसतानाही त्यानं त्यांच्या हाती पन्नासची नोट दिली आणि अवेळी जागं केल्याबद्दल क्षमा मागून तिच्याबरोबर निघाला.

येताना ती म्हणाली, "बराच हुशार आहेस हं! झाली तेवढी शिक्षा तुला कमी वाटली म्हणून ही इंजेक्शन घ्यायला लावलीस ना? समजलं मला ते."

त्याच्या घरी कॉटवर बसल्यावर ती म्हणाली, "टेकडीवर गाडीत मी तुला मफलरसह पाहिलं. तेव्हाच तू तो का गुंडाळलास हे माझ्या लक्षात आलं. जीव द्यायची शक्ती नाही म्हणून लाज वाटते माझी मलाच!"

तिनं त्याच्या गळ्याभोवती आणि कानांभोवती गुंडाळलेला मफलर काढला. गालांवरचे वळ मावळत चालले असले, तरी सूज भरपूर होती. ते पाहत ती म्हणाली, "लोखंडी साखळीला टिटॅनसच्या विषाचा संसर्ग आहे. ही बोटं छाटून टाकली तर!" म्हणत तिनं हाताची बोटं पलंगाच्या काठावर जोरात आपटली.

"छे:! काय हा तुझा वेडेपणा." म्हणत त्यानं तिच्या गालावर थप्पड मारत तिची दुखावलेली बोटं आपल्या हातात धरली.

तिनं आपली विद्ध नजर त्याच्यावर रोखली आणि म्हणाली, "तुला माझा राग आलाय, पण मारायची शक्ती तुझ्यामध्ये नाही. कितीही संतापानं उठलेला तुझा हात माझ्या गालावर कसा बसतो ठाऊक आहे? तीन महिन्यांच्या तान्हुल्याला आईनं चापटी मारावी तसा! किती गोजिरवाणा स्पर्श!" म्हणत तिनं आपला चेहरा त्याच्या छातीशी दाबून धरला. त्याचा हात तिच्या पाठीवरून फिरला. तिचाही हात त्याच्या पाठीवरून फिरू लागला. तोच हात त्याच्या छातीवरूनही फिरला. स्पर्शामध्ये अडथळा आणणारी त्याच्या शर्टची बटणं ती काढू लागली.

त्याला तिच्या भावनेचा अर्थ समजला होता. पण एवढं सगळं घडून गेलं असताना, मनात भावनांचा हलकल्लोळ उसळला असताना, त्यानं तिचे दोन्ही हात हातांत घेत म्हटलं, "नको अमू, आज नको."

त्याच्या उघड्या छातीवर मस्तक घुसळत ती उसासली, "अजून क्षमा नाही केलीस? मनापासून क्षमा केलीस म्हणजे... अजूनही तुला मी राक्षशीणच वाटते सोमू? ही माझी अमू आहे. म्हण ना, मग."

'हिचं हे नेहमीचंच आहे. शब्दांत पकडायचं, सापळ्यात अडकवायचं, पेचात पकडायचं!'

तरीही तिच्या चलाख, लाडिक बोलण्यानं त्याच्या मनात उत्साह भरून राहिला. मनातल्या कडवट आठवणी, खेद-विषाद नष्ट झाले. गाल आणि हातांच्या वेदनांची आठवणही होऊ नये अशा उत्कटतेनं दोघांनाही घेरलं.

निघताना तिनं घड्याळ पाहिलं. साडेचार वाजले होते. "दुपारी ये. भरपूर बोलायचंय. पण फक्त गप्पा हं." म्हणत ती तिथून बाहेर पडली.

मुलांना शाळेत पोहोचवून घरी आल्यावर तिनं कॉलेजमध्ये फोन करून रजा मांडायला सांगितली. महादेवम्मा आणि पुट्टम्माला उठवू नका म्हणून सांगून ती आपल्या खोलीत जाऊन गाढ झोपली. जाग आली तेव्हा साडेबारा वाजले होते. कामवाल्यांनी जाताना दार ओढून घेतलं होतं. तिनं घाईघाईनं अंघोळ उरकली आणि जेवणाची तयारी करत असतानाच तो आला.

जेवताना तिनं सांगितलं, "रात्री काय झालं ठाऊक आहे? परवासारखी रात्री विजयला जाग आली. जाग येऊन तो माझ्या खोलीत आला तेव्हा तिथं मी नव्हते. नंतर स्वयंपाकघर, लाउंज, गेस्टरूम, लायब्ररी... सगळीकडे त्यानं मला शोधलं. घराला बाहेरून कुलूप लावलेलं पाहून तो आणखी घाबरून गेला. न झोपता तसाच अंथरुणावर पडून होता. मी घरी जाऊन पोहोचले तेव्हा चार पंचेचाळीस झाले होते. गाडीचा आवाज ऐकताच तो धावत आला. मला बघताच त्याला रडू आलं. त्यानं रडत विचारलं, "एवढ्या रात्री कुठं गेली होतीस?"

"अरे शूर मुला! असं रडायचं असतं काय?" मी थट्टा करत म्हणाले, "हात फारच दुखायला लागला. ताबडतोब इंजेक्शन घेतलं नाही तर धनुर्वात होऊन मरेन अशी भीती वाटली. म्हणून दवाखाना शोधून इंजेक्शन्स, गोळ्या, मलम सगळं घेऊन आले. म्हणून यायला मला उशीर झाला." नंतर पुन्हा झोपवलं त्याला."

"हातांवरच्या जखमा त्यानं संध्याकाळी पाहिल्या होत्या?"

"होय. मागच्या कुंपणाची निसटलेली तार सरळ करायला दोन्ही हातानं ओढत होते. तेव्हा त्यावर पडून लागलं म्हणून त्याला सांगितलं होतं. त्यावर त्याचा विश्वासही बसला होता. त्याला हळूहळू मध्यरात्री जागं होऊन आईला शोधायची सवय होऊ पाहतेय. हे कसंतरी चुकवायला पाहिजे." ती विचारमग्न होऊन विचार करत होती.

जेवण झाल्यावर दोघंही तिच्या बेडरूममध्ये गेले. अंथरुणावर झोपताना कुशीवर वळताना गाल उशीवर घासणार नाही याची काळजी तो घेत होता. ती तर फक्त उताणीच झोपू शकत होती. दोन्ही हातांचा कुठलाही भाग अंथरुणाला किंवा कपड्याला लागला की, तिला जीवघेण्या वेदना होत होत्या. डॉक्टरांकडे जाऊन जखमांना नीट मलमपट्टी करून घ्यायला तिची तयारी नव्हती.

बोलता बोलता ती म्हणाली, "कालपर्यंत मी तुला सोमू म्हणत होते. तसं म्हणताना अंत:करणातली अत्यंत निकटभावना व्यक्त करत असल्याचा मला अनुभव येत होता; पण आज पहाटेपासून मला काय वाटतंय सांगू? तुला 'माझ्या पिल्ला', 'माझ्या बछड्या' म्हणून हाक मारली तरच माझ्या मनातली तुझ्याविषयीची भावना व्यक्त होईल असं वाटतंय."

बोलताना तिनं हातानं असलेल्या वेदनांकडे दुर्लक्ष करून कुशीवर वळून त्याला पिल्लासारखं छातीशी धरलं. त्याच्या डोक्यावरून पदर घालून त्याचं मस्तक कुरवाळताना ती विजय-विकासला म्हणत असलेल्या अंगाई गीताच्या ओळी गुणगुणू लागली.

कल्पना करणं केवळ अशक्य अशा विलक्षण भावनेत बुडालेल्या सोमशेखरने डोळे मिटून घेतले आणि मनात उमटणाऱ्या भावनांच्या कारंजात पूर्ण चिंब होऊन गेला.

स्वत:लाच बजावत असल्यासारखं ती बोलू लागली, "आई नसल्याची कल्पनाही करू न शकणाऱ्या अश्राप बाळासारखा झाला होता तुझा चेहरा माझ्या हातचा मार खाताना! तू विरोध केला नाहीस. 'तू कोण मला मारणारी' म्हणून सवाल केला नाहीस. माझ्या पुढून तिरस्कार दर्शवत निघूनही गेला नाहीस. मी तुला एवढी मारत राहिले आणि 'कितीही मारलंस तरी तू माझीच आहेस' या भावनेनं बेदम मारणाऱ्या आईलाच मिठी मारणाऱ्या मुलासारखा झाला तुझा चेहरा! राक्षशिणीसारखी सतत तुला मारत राहिले आणि त्यावर सार-दहीभात ओतला मी! बाळा, खरोखरच मी काल चांडाळिणीसारखी वागले. तुला ते सहन करताना किती यातना झाल्या असतील! पण म्हणून मला हे तान्हं बाळ मिळालं. नाहीतर तू केवळ सोमूच राहिला असताच. सोमू म्हणजे दूर, चंद्रासारखा लंब राहणारा, आकर्षक, हाती न सापडणारा, स्वप्नातल्या खेळासारखा! पण हे माझं बाळ तसं नाही. सतत माझ्या मंडीवर, नाहीतर जवळपास घोटाळत राहणारं बाळ! हात सोडला तरी पदर धरून मागं मागं फिरणारं बाळ."

आजवर कधीही न अनुभवलेली अपूर्व भावना अनुभवत तो गुंगून गेला. तिचं मनही यानंतर कधीही शून्यभाव आपल्याला घेरणं शक्य नाही या विश्वासात बुडून गेलं होतं. कितीतरी वेळ दोघंही अविचलपणे राहिले होते. नंतर तिनं भानावर येत विचारलं, "तुला किती वाजता जायचं आहे?"

"राममूर्ती बेंगळुरूला गेले आहेत. सोमवारी ते येतील. त्यानंतर तासभर काम आहे. तेवढं झालं की संपलं. त्याच रात्री निघून ते मंगळवारच्या सकाळच्या फ्लाइटनं मुंबई आणि तिथून अमेरिकेला जाणार आहेत."

"हे बघ, कामाची खोटी करू नकोस तू. माझ्यामुळे नुकसान झालं, तर ते मला सहन व्हायचं नाही. सकाळी झोप मिळाली तुला?"

"तू गेल्यावर झोप लागली, ती दहा वाजताच जाग आली." म्हणताना त्याला रात्रीची आठवण झाली. तिलाही ते जाणवलं.

नंतर ती त्याला म्हणाली, "तुला कितीतरी सांगायचं आहे. मी तरी आणखी कुणाला सांगणार? आता निर्माण झालेल्या या परिस्थितीवर मी खूप विचार केला. मी विचार केला असं म्हणण्यापेक्षा मनात खूप विचार आले, असं म्हणायला पाहिजे. गर्भपात म्हणजे माझा जीवच बाहेर काढणं आहे. त्याऐवजी मरून जाणं सोपं आहे. पण हा गर्भ ठेवणंही सोपं नाही. रंगनाथची बहीण ब्रह्मास्त्रासारखा वापर करेल याचा. रंगनाथ काहीही करू शकणार नाही. फार तर व्यभिचाराचा आरोप करून घटस्फोट मागेल. मीही आनंदानं देईन; पण ही दोन्ही मुलं त्याकडे कसं बघतील हा खरा मोठा प्रश्न आहे. मुलंही अगदी अजाण वयाची नाहीत. हा

साठेआठ वर्षांच आणि तो पाच वर्षांचा. थोरल्याचं मनोमन बापावर प्रेमही आहे. या बाळाला ते दोघं दूर लोटू लागले तर? सोमू, सगळा विचार करून मी गर्भपाताचा निर्णय घेतला आहे.”s

“केव्हा ठरवलंस हे?” त्यानं तिच्या दंडावर हात ठेवून विचारलं.

“काल. हातांना शिक्षा देऊन शांत झाल्यावर.”

“शांत झाल्यावर? मग तरीही काल रात्री का टेकडीवर गेली होतीस?”

“माझ्या मनाची विचित्र अवस्था काय सांगू मी? पोटात हे असताना आत्महत्या करणं मला शक्य नव्हतं; पण एकदा गर्भपात करायचं ठरवल्यावर मनात आलं, ‘नाहीतरी यानंतर या गर्भाची हत्या होणारच आहे. मग माझी मी हत्या केली तर काय बिघडलं?’ काल शून्यभाव भरून राहिला त्याला एकच कारण नाही. तुझ्याशी मी एवढ्या क्रूरपणे वागले. ते पाप वाहून जगणं मला शक्य नाही असं वाटत राहिलं. रिव्हॉल्वर रोखून ट्रिगर ओढणं ही तशी साधी क्रिया; पण त्यासाठी मनाची तयारी होणं तितकंसं सोपं नाही. तिथंच जीव तळमळत राहतो. पण काल मनात तळमळीला जागाच नव्हती. किती सहजपणे मी तिथं कार नेऊन उभी केली होती! कालच्याइतकी ट्रिगर ओढण्यासाठी अनुकूल मन:स्थिती या आधी कधीच झाली नव्हती.

“मी कार उभी केली आणि तिथल्या प्रशांत वातावरणात गाडीचा आवाज ऐकू येऊ लागला. आधी चढणारं वाहन की उतरणारं हे लक्षात आलं नाही. थोड्या वेळातच राममूर्तींची गाडी खाली आली. त्यांनी फ्लडलाइट्स विझवले नसते, तर गाडीतला मफलर गुंडाळलेला तू मला दिसला नसतास; पण या अचानक घडलेल्या घटनेमुळे माझ्या मनातला मरणाचा विचार मात्र नष्ट झाला. एका क्षणात मनात काय आलं सांगू? मनात आलं, ‘मी खरोखरच मरून गेले; रोगराईनं नव्हे, अपघातानं नव्हे, आत्महत्या करून मरून गेले, तर तुझ्यावर काय परिणाम होईल? पोलिसांच्या दृष्टीनं नव्हे. तसं काही होऊ नये याची मी पूर्ण काळजी घेतली होती; पण मी आत्महत्या करून मरून गेले तर हा शांतपणे जगू शकेल काय? याला आणखी कोण आहे जिव्हाळ्याचं? माझ्याशिवाय कोण याची काळजी घेईल?’ लगेच मी गाडी सुरू केली.”

काही क्षण ती तशीच राहिली आणि लहर फिरल्यासारखं म्हणाली, “एक मात्र खरं आहे. एक चांगली देखणी मुलगी बघून तुझं लग्न लावून देईपर्यंत तरी मला आत्महत्या करायचं स्वातंत्र्य नाही. हा तू मला दिलेला वर आहे की शाप म्हणायचा हा?” तिनं त्याचं नाक चिमटीत धरून दुखण्याइतकं दाबलं.

आणखी एक गोष्ट आठवून ती गंभीरपणे सांगू लागली, “हे गर्भारपण म्हणजे तुझी चूक नाही. दोन मुलांची आई आहे मीही. तूही काही अननुभवी नाहीस. आपण दोघंही पुरेसे सावध होतो. तरीही काही वेळा दोघंही बेभान होत होतो! पण माझा तुझ्यावर किती राग होता म्हणून सांगू? जे घडलं त्याला तूच एकटा जबाबदार आहेस, असं मला वाटत होतं. बुद्धीला सगळा तपशील समजत असला, तरी मनाची अवस्था काय होती, ते सांगितलं मी. यानंतर पुन्हा आपण त्या अन्योन्य भावनेनं परस्परांच्या जवळ येणं अशक्य आहे, असं मला वाटत होतं. तूही त्यानंतर कधीही ती भावना व्यक्त केली नाहीस. कसा करशील? सतत मी राक्षशिणीसारखी वागतेय ना!

“काल रात्री तू मला डॉक्टरांकडे नेऊन औषध-इंजेक्शन दिलीस, त्या वेळी मनात आलं, गर्भपात अटळ आहे. त्यामुळे मी सतत संतापत राहणं आणि तुझ्या मनातली अपराधीपणाची भावना वाढवत राहणं योग्य नव्हे. आत्ता या क्षणी त्या भावना नष्ट करून पुन्हा ‘अमू-सोमू’ होऊन राहायला पाहिजे. म्हणूनच तुझ्या चुरचुरणाऱ्या गालांची आणि माझ्या ठणकणाऱ्या हातांची पर्वा न करता मी आणि हा मुलगा तर त्याचीच वाट पाहत होता वाटतं!” म्हणत तिनं त्याच्या गालावर हलकेच थप्पड मारली. पाठोपाठ तिच्या डोळ्यांत वेदना उमटल्या आणि ती उद्गारली, “सॉरी! सॉरी! मी अगदी विसरले होते बछड्या!” असं म्हणत तिनं त्याच्या गालावर हळुवार फुंकर घालत विचारलं, “आता कमी झालं? गेलं? ‘हं’ म्हण. नाहीतर पुन्हा मारेन हं!” पुन्हा काहीतरी आठवत ती म्हणाली, “हिडिंबा भीमाला असाच त्रास देत असेल बघ! भीम झाला म्हणून काय झालं? तिच्या अघोरी प्रेमाला घाबरून एका वर्षातच गेला तो पळून! पण तरीही तो तिला आयुष्यात कधीही विसरला नसेल. त्या प्रेमाची खोली सर्वसामान्य शांत स्वभावाच्या स्त्रीच्या प्रेमामध्ये आढळणार नाही. खरं की नाही? मी आपलं माझं मत सांगितलं हं! तुझा तौलनिक अभ्यासही आहे! तू सांग यात काय खरं ते. पण मी काही तुला चावले नाही, ओरबाडलं नाही, कान फाडले नाहीत, बोटं मोडली नाहीत. फक्त मारलंय तेवढंच!”

आता कुठं तिचं त्याच्या चेहऱ्याकडे लक्ष गेलं. त्याचा चेहरा विमनस्क दिसत होता. ती त्याला म्हणाली, “कुठं गेलं तुझं मन? असल्या राक्षशिणीच्या हाती सापडून हाल हाल होण्यापेक्षा द्रौपदीचं चौघांमध्ये वाटलेलं प्रेमच पुरेसं आहे, असा विचार करतोस वाटतं?”

तिचं शेवटचं बोलणं त्याच्या मुळीच कानात शिरलं नव्हतं. आपल्या उजव्या हातात तिचा हात घट्ट धरत तो म्हणाला, “अमू, मी सांगतोय ते लक्ष देऊन ऐक. गंभीरपणे सांगतोय मी. तूही लगेच काही बोलू नकोस. विचार करून नंतर उत्तर दे.”

तो मनापासून बोलत असल्याचं तिच्या अंतर्मनाला जाणवलं. त्याच्या हातावरची आपली पकड घट्ट करत ती त्याचं बोलणं ऐकू लागली.

तिचा चेहरा एकटक पाहत तो म्हणाला, “तू रंगनाथ आणि त्याच्या बहिणीला विसरून जा. विजय-विकासच्या मनाचा गोंधळ होणं स्वाभाविक आहे. तिकडं आपण दोघंही शांतपणे, संयमानं आणि जागरूकपणे लक्ष देऊ या. ते दोघंही माझेच आहेत. मी त्यांच्यामध्ये भेद करणार नाही. आपण हे बाळही ठेवू या. वाढवू या. हा माझा निर्णय! तू माझं ऐक. यावर विचार कर.”

ती गंभीर झाली. तिची पकड आणखी घट्ट झाली. मौनपणे तिनं त्याच्याकडे पाहिलं. काही क्षणांतच तिचे डोळे अश्रूंनी तुडुंब भरले; पण ती रडली नाही. तशीच त्याच्याकडे पाहत म्हणाली, “मला सगळं समजतंय रे! बाळांची मनं आईला आधी समजतात. फार विचार केलाय मी यावर. यानंतर आता एकच राहिलं. हे मैसूर गाव लहान आहे. इथं कुठल्याही डॉक्टरांकडे गेलं, तरी कुठूनतरी ओळखीचा संदर्भ निघणं अपरिहार्य आहे. तू बेंगळुरूला कुणीतरी डॉक्टर ठरव. मी दोन-तीन दिवसांसाठी मुलांची काहीतरी व्यवस्था करते. रजेचंही बघायलं हवं. आणखीही एक सांगितलं, तर अति-भावुकपणा म्हणून हेटाळणी करू नकोस.”

“काय?”

“आणखी एखादा आठवडा जाऊ दे. नाहीतरी आता ते जाणारच आहे. जेवढे दिवस शक्य आहे तेवढे दिवस तरी मला त्याचा सहवास मिळू दे आणि तू मला एक भारीपैकी रेशमी साडी आणायला हवीस. मग ती नेसून आपण तिरुमकूडलसंगम, तलकाड आणि श्रीरंगपट्टणमध्ये भरपूर भटकायचं. तेव्हा तू माझे खूप फोटो काढायला हवेस! मग अगदी जख्ख म्हातारी झाल्यानंतरही तुझं बाळ पोटात असताना मी कशी दिसत होते, ते मी कौतुकानं पाहत राहीन.”

तो संतापानं म्हणाला, “काहीतरी बडबडू नकोस. बाळच ठेवून घेऊ या, वाढवू या म्हटलं तर फोटोंचं काय काढतेस?”

“माझं ऐक म्हटलं ना! तुला माझ्यापेक्षा जास्त समजतंय असं समजू नकोस!” तिच्या आवाजात संताप डोकावत होता.

एक दिवस बेंगळुरूमध्ये मुक्काम करून सगळं संपवून दोघंही परतीच्या प्रवासासाठी रेल्वेच्या प्रथम वर्गाच्या डब्यात बसले. इतर दोन प्रवासी उत्तर भारतातले असल्यामुळे परस्परांशी मोकळेपणानं कन्नडमध्ये बोलणं सहज शक्य होतं. तरीही ती अवाक्षर न बोलता बसून होती. नर्सिंग होममधून डिसचार्ज मिळाल्यावर एक दिवस हॉटेलमध्ये विश्रांती घ्यायची त्याची सूचना तिनं तिरस्कारानं धिक्कारली होती. परीक्षेच्या कामाचं निमित्त सांगून, परगावी जात असल्याचं सांगून तिनं मुलांची सुशीलम्मांच्या घरी सोय केली होती. दिवस-रात्र घरी राहून घर राखायची जबाबदारी महादेवम्मा आणि तिच्या नवऱ्याकडे दिली होती. त्यामुळेच आणखी दोन दिवस हॉटेलमध्ये थांबून पुन्हा डॉक्टरांना प्रकृती दाखवून, औषधोपचारात आवश्यक ते बदल करून, मैसूरला परतायची सूचना त्यानं केली होती; तरीही तिनं ती नाकारली होती.

रेल्वे सुरू झाल्यावर तो तिला म्हणाला, “तू बसून राहू नकोस. झोप बघू! मी इकडे सरकतो.”

“कुणीही माझ्यावर भूतदया दाखवायची गरज नाही.” ती चटकन म्हणाली.

त्याचं समोरच्या प्रवासी जोडप्याकडं लक्ष गेलं. ‘त्यांना भाषा समजायचा प्रश्न नसला, तरी हिचा चेहरा आणि आवाज यामुळे हे भंगलेलं जोडपं असावं असं त्यांना निश्चित वाटलं असेल.’ गाडी सुरू झाल्यानंतरही ती खिडकीतून बाहेर बघत बसली होती. त्यालाही काय करावं ते न सुचल्यामुळे एका स्टेशनवरच्या स्टॉलवर मिळालेलं नियतकालिक तो वाचत बसला.

काही मिनिटांनी ती म्हणाली, “मी दुसऱ्या केबिनमध्ये जाऊन बसू का?”

त्यानं नियतकालिक बंद करून ठेवलं आणि तोही मुकाट्यानं बसून राहिला. ती पुन्हा खिडकीबाहेर पाहत बसली. मधल्या एका स्टेशनवर गाडी थांबली तेव्हा समोरच्या जोडप्यातल्या पुरुषानं खालच्या बाकावर एक बेडशीट आणि उशी ठेवून बायकोच्या झोपण्याची व्यवस्था केली आणि तो स्वत: बर्थवर जाऊन झोपला. गाडी सुरू झाल्यावर त्या दोघांनाही गाढ झोप लागली. तो पुन्हा म्हणाला, “तू झोप.”

“मी बसून राहिले म्हणून तुमच्या पोटात का आग पडतेय?” तिचा आवाज चढला नसला,

तरी त्यात तप्त लोखंडाचा दाह होता.

"तसं नव्हे. तुझी अवस्था..." मार खाल्लेल्या मुलासारखा तो पुटपुटला. त्याची मान खाली गेली होती. काही क्षण ती यावर काही बोलली नाही. नंतर तीव्रपणे म्हणाली, "माझी अवस्था... तुम्हाला हसू येतंय नाही काय? तिरस्कार वाटत असेल म्हणून हिणवताय मला!"

यावर संतापणं, समजावून सांगणं किंवा उलट उत्तर देणं म्हणजे आगीत तेल ओतणं, हे समजत असल्यामुळे तो आणखी असहाय होऊन गेला. मुकाट्यानं बसणं एवढंच त्याला करता येण्यासारखं असल्यामुळे तो खाली मान घालून बसून राहिला. तिची खिडकीबाहेरची नजर हलली नव्हती. कितीतरी वेळानं तिची नजर त्याच्याकडे गेली. त्या वेळीही तो तसाच बसला होता. ती ताडकन उठली आणि केबिनचा दरवाजा बंद करून तरातरा निघून गेली. ती शौचालयाकडे गेली असावी, असा विचार करून तो तसाच बसून राहिला. नंतर त्याच्या मनात आलं, 'इथं आपल्याबरोबर बसण्याऐवजी दुसरीकडे कुठंतरी बसावं म्हणून तर ती गेली नसेल?' हे मात्र त्याला थोडं विचित्र वाटलं. ती कुठं बसली होती हे पाहून येणं त्याचं कर्तव्य होतं, असंही त्याला वाटलं.

तो उठला आणि झोपलेल्या जोडप्याला जाग येणार नाही, अशा प्रकारे केबिनचं दार बंद करून बाहेर आला. तिन्ही केबिन्सच्या पलीकडे असलेला रेल्वेचा दरवाजा उघडून ती दारात उभी होती. गाडीचा वेग आणि वाऱ्याचा वेग यामुळे तिचे केस, पदर आणि साडीच्या निऱ्या वेड्यासारख्या फडफडत होत्या. तिनं दाराचं हँडल धरलं असलं तरी, गाडीनं अचानक वळण घेतलं असतं, तर तोल जाऊन पडणं आणि देहाचा चेंदामेंदा होणं अपरिहार्य होतं. त्याच्या छातीचे ठोके जवळजवळ थांबलेच. सावकाश तिच्या जवळ जात तो तिला म्हणाला, "इथं का अशी उभी राहिलीस? हात निसटला तर?"

गाडीच्या आवाजात त्याचं बोलणं तिच्या कानावर गेलं की नाही कोण जाणे? त्याच्याकडे न पाहता ती म्हणाली, "माझ्यापुरती मी इथं राहीन म्हटलं, तर इथंही तुम्ही का आलात?"

"तुला एकटीला राहायचं असेल, तर तू केबिनमध्ये जा. इथं मी राहतो. तुला इथंच उभं राहायचं असेल, तर दार बंद करून उभी राहा. मी जातो केबिनमध्ये."

"मला हवं असेल तिथं उभं राहायला मी स्वतंत्र आहे. शरम असेल, तर निघून जा."

"हे बघ, तू दरवाजा बंद करून उभी राहीपर्यंत मी जाणार नाही." त्यानं हट्टानं आवाज चढवून सांगितलं. तिनं त्याच्याकडे धगधगत्या नजरेनं पाहिलं. तो तसाच उभा होता. धाडकन दरवाजा लोटून ती ताडताड केबिनकडे निघून गेली. तो दाराशी उभा राहिला.

चन्नपट्टण आलं आणि गेलं. गाडीनं चांगलाच वेग घेतला. ती केबिनचा दरवाजा उघडून त्याच्याकडे आली. तिनं काहीही वाद घालायचा प्रयत्न केला, तरी आपण संयमानं वागायचा निग्रह करून तो तिच्याकडे पाहू लागला. तिच्या हातात शंभरच्या नोटांचं एक पुडकं होतं. ते त्याच्या हातात देत ती म्हणाली, "घ्या हे."

“काय हे?” चकित होऊन त्यानं विचारलं.

“मैसूरहून निघाल्यापासून आजपर्यंत झालेला सगळा खर्च. हजार आहेत. कमी असतील तर सांगा. पुन्हा देईन.”

आलेला संताप कसाबसा आवरत तो म्हणाला, “हे पैसे मी तुझ्याकडून घ्यायची आवश्यकता नाही. तेवढे पैसे माझ्याकडे होते. अजूनही आहेत.”

“तुम्ही भरपूर बिझनेस असलेले आर्किटेक्ट आहात ते ठाऊक आहे मला! पण ट्रीटमेंट हा माझा खासगी मामला आहे. माझ्यापायी आणखी कुणी परक्यानं खर्च करावा, हे मला मान्य नाही.”

“मी कुणी परका नाही. मीही त्या परिस्थितीचा एक भाग आहे म्हणून खर्च केलाय मी.” त्यानं ठामपणे सांगितलं.

तिनं एकदा त्याच्याकडे तडफडाट झाल्याच्या दृष्टीनं पाहिलं आणि कंप पावत असलेले ओठ दाबत ती म्हणाली, “तुम्ही पैसे घेणार की नाही? का मी फेकून देऊ?”

“पैसे हवेत उडवण्याइतकी तुझी श्रीमंती आहे. ही रक्कम तर य:कश्चित आहे. तुझे पैसे आहेत. त्याचं काय करायचं हा तुझा प्रश्न आहे.”

“माझे पैसे?” तिचा आवाज कापत होता. तिनं पुन्हा विचारलं, “शेवटचं विचारतेय.”

“मी घेणार नाही.” त्याचं ठाम उत्तर कानावर पडताक्षणी तिनं खिडकीतून पैसे बाहेर भिरकावून दिले. काही नोटा इतस्तत: उडाल्याचं त्यानंही पाहिलं. त्याच्याकडे वळून न पाहता पुन्हा केबिनमध्ये जात तिनं दार बंद करून घेतलं.

धावणाऱ्या गाडीच्या खिडकीतून पिसाट वारं आत घुसत होतं. या प्रवासाचा किंवा हॉस्पिटलचा खर्च कुणी द्यायचा यावर त्या दोघांचं कधी बोलणं झालं नव्हतं. त्यावर चर्चा करायची गरज होती, असं त्याला कधीच वाटलं नव्हतं. आता संतापाच्या भरात तो विषय तिनं काढणं हेच त्याला विद्ध झाल्याचा अनुभव देणारं होतं. ‘तिचं हे वागणं! मनात शून्य भाव भरून राहिला की, तिच्याकडून असं वागणं, असं बोलणं होतं हे खरं.’ पण तो तिच्या मनात नसलेलं काही घडवू शकणार नव्हता. ‘हे फक्त क्रौर्य नाही. ही त्यापलीकडची विनाशशक्ती आहे.’

काही वेळानं ती पुन्हा केबिनबाहेर आली. याही वेळी हातात नोटा होत्याच. हुकूम सुनावत असल्यासारखी नोटा पुढं करून ती म्हणाली, “हे दोन हजार आहेत. घेता की नाही? नाहीतर खिडकीतून पैसेच नव्हे मीही उडी मारेन.” म्हणत ती दार उघडून उभी राहिली. बाहेरचा वाऱ्याचा वेग त्या दोघांवर येऊन आदळला. त्याच्या डोळ्यांसमोर काही क्षणांपूर्वीची नोटा फेकून देणारी तिची आकृती उभी राहिली. गाडीचा वेग प्रचंड वाढला होता. बाहेरची झाडं-दगड-धोंडे सगळ्यांचे आकार नष्ट करत गाडी धावत होती. खरोखरच तिनं तसं काही केलं असतं, तर क्षणार्धात देहाचा लोळा-गोळा....

“घेणार की नाही?” तिनं निर्वाणीचं विचारलं.

“पण एवढा खर्च झालेला नाही.”

“मला खर्चातला प्रत्येक तपशील ठाऊक आहे. तुम्ही दोन दिवसांकाठी आपला व्यवसाय बंद करून आला आहात. म्हणून जास्त पैसे दिले. तुम्हाला फक्त दोन सेकंद देतेय.”

त्यानं पटकन तिच्या हातातले पैसे घेतले. ती पुन्हा केबिनमध्ये जाऊन दार बंद करून बसली.

हातातलं नोटांचं बंडल फेकून द्यावं, तिच्याप्रमाणेच ते खिडकीबाहेर फेकावं असं त्यालाही तीव्रपणे वाटलं. ‘पण ते इथून फेकण्याऐवजी तिच्या पुढच्या खिडकीतून फेकले तर तिला दिसतील. नाहीतर असं करावं, आता ते सहप्रवासी गाढ झोपले असतील. केबिनमध्ये जाऊन तिला पैसे दाखवून “हे बघ, तुझ्याकडून मला दोन हजार रुपये मिळाले आहेत. हिशेब संपला. आता हे माझे पैसे आहेत. ते मी फेकून देतो.” असं सांगून ते खिडकीतून फेकले पाहिजेत.’

काही वेळानं त्याचं डोकं शांत झालं. ‘ती एक अहंकारी आहे. तिचा अहंकार वेळोवेळी धुमसत असतो. म्हणून मी माझा अहंकार जाणूनबुजून चेतवणं शहाणपणाचं आहे काय?’

मद्दूर आलं. त्यानं उतरून खिडकीपाशी जाऊन तिला विचारलं, “शहाळी आहेत. आणून देऊ?” पण ती काहीच बोलली नाही.

पुन्हा गाडी सुरू झाली. मंडय, पांडवपूर, श्रीरंगपूरही मागं पडलं. लगोलग चामुंडी टेकडी दिसू लागली. सगळ्या मैसूरनगरचा गुरुत्वमध्य आपल्या ताठ्यात असल्याच्या रुबाबात ती उभी होती. केबिनमधलं जोडपं आपलं सामान घेऊन डब्याच्या दारापाशी येऊन उभं राहिलं. ‘आता ती केबिनमध्ये एकटी आहे. तिथं जाऊन उगाच का तिला आणखी संतापायला लावायचं.’ या विचारानं तो तिथंच उभा राहिला; पण पाठोपाठ वर ठेवलेल्या जड सूटकेसची त्याला आठवण झाली. काही दिवस डॉक्टरांनी तिला जड उचलायची मनाई केल्याचं आठवून तो केबिनमध्ये गेला. ती खिडकीबाहेरच बघत होती. कुठंतरी दूरवर दृष्टी रोखून ती स्वत:लाच सांगावं तसं सांगत होती, “ते पोटात असेपर्यंत ट्रिगर ओढणं अशक्य होतं. आता मला वाचवायची शक्ती कुणातच नाही.”

तिला वेगळ्या रिक्षात बसवून घरी पाठवल्यावर तोही सूटकेस घेऊन ऑफिसमध्ये गेला. रात्री नऊपर्यंत सगळी कामं उरकून शेजारच्या हॉटेलात जेवून तो घरी परतला. मच्छरदाणी सोडून तो अंथरुणावर पडला. झोप आली नाही. फक्त जांभया येत होत्या. हरल्याची भावना त्याच्या मनाला व्यापून राहिली होती. ‘तिचा अकारण राग सहन करण्यात नवं काही नाही. काही वेळानंतर विचार केल्यावर त्या रागामागचं कारण समजतं. अशा वेळी ती आपली मर्यादा आहे; पण काही वेळा तिला संतापायला एक जागा पाहिजे म्हणून ती माझ्यावर आगपाखड करते. तरीही नेहमीच मी तरी किती तिची आगपाखड सहन करू?’ तिच्या सान्निध्यात सहन कराव्या लागणाऱ्या मनोवेदनांमध्ये ‘प्रेम असतं तिथंच राग व्यक्त होतो’ वगैरे विचार तो विसरून जात होता.

‘तिनं हजार रुपये वाऱ्यावर उडवले आणि दोन हजार मला घेणं भाग पाडलं. तिच्या दृष्टीनं दोन्ही सारखंच! मला त्या दोन्ही घटनांमधून होणारं दु:खही सारखंच! मला दु:ख देण्यासाठी म्हणूनच ती मुद्दाम तशी वागली. मी त्यातला काहीही खर्च करू नये. एवढंच नव्हे, त्या दिवसांमध्ये झालेलं माझं नुकसानही मी घेतलं पाहिजे म्हणे! यात प्रेम या शब्दाला आणि त्यामागच्या भावनेला काय अर्थ राहतो?

‘छे:! ही दुर्बलता मला उपयोगाची नाही. दूर जायला पाहिजे तिच्यापासून. असा कसा हा हिचा स्वभाव? भ्रूणहत्येचा निर्णय तिनं एकटीनंच घेतला आणि ते पोटात असेपर्यंत नवी साडी नेसून मला भावनात्मकदृष्ट्या गोंजारतही राहिली. बेंगळुरूला जायचा दिवस तिनंच ठरवला. त्या दिवसापासून एकाएकी मौन होऊन गेली. सगळं संपल्यावर पुन्हा शून्य भावनेत गुरफटून गेली. नर्सिंग होममधून बाहेर पडल्याबरोबर एवढा वेळ साठलेला राग गरळ ओकल्यागत माझ्यावर ओतू लागली. यात माझी चूक काय? मी तर तिला उलट ते राहू दे म्हणून सांगितलं होतं. हिच्या वागण्यात कसलाही मेळ नाही.’ थोड्या वेळात त्याला झोप लागली.

पण अर्ध्या तासात त्याला पुन्हा जाग आली. त्यानं घड्याळ पाहिलं. बारा वाजले होते. भोवतालच्या अंधारानं घुसमटल्यासारखं होऊन त्याला जाग आली. जाग येताक्षणी त्याच्या मनात आलं, ‘या क्षणी काय करत असेल ती? नाही. झोपलेली नाही हे निश्चित!’ पाठोपाठ त्याला आठवलं, ‘ते पोटात असेपर्यंत ट्रिगर ओढणं शक्य नव्हतं. आता मला वाचवायची शक्ती....’ पाठोपाठ तिरीमिरीसरशी तिनं वाऱ्यावर उडवलेल्या नोटा नजरेसमोर आल्या. ‘मी पैसे घेतले नसते तर तिनं स्वत:लाही बाहेर झोकून द्यायला कमी केलं नसतं. छे:!’ तो वेगानं मच्छरदाणीबाहेर आला. दिवा लावून अंगावर कपडे चढवेपर्यंत मनात आलं, ‘आधी कुठूनतरी... हं... ऑफिसमधून तिच्या घरी फोन करायला पाहिजे.’ अपरात्री शेजाऱ्यांची झोप मोडायला नको म्हणून दार उघडून त्यानं स्कूटर रस्त्यावर आणून सुरू केली.

देवराज अरस रस्त्यावर गस्त घालणाऱ्या गुरख्याला स्वत:ची ओळख देत तो ऑफिसमध्ये गेला. दिवा लावून त्यानं फोनचा नंबर फिरवला. ‘पलीकडे रिंग वाजतेय. कुठल्याही क्षणी ती रिसीव्हर उचलेल.’

रिंग वाजत होती. कुणीही फोन उचलत नव्हतं. ‘ही गाडी घेऊन टेकडीवर गेली असेल काय? की ट्रिगर ओढून तिनं स्वत:ला त्या शून्यात झोकून दिलं असेल? सुशीलम्मांच्या घरातून मुलांना सोबत न घेता ती एकटीच घरी गेली होती.’ रिसीव्हर घेतलेला त्याचा हात थरथरू लागला. मनाच्या अज्ञात कोपऱ्यातून उद्गार निघाला, ‘देवा रे! अजून रिंग होतेय... की ती वेदनाशामक गोळ्या खाऊन झोपल्यामुळे गाढ निद्रेत असेल?... तसंच असू दे...’ त्यानं मनोमन प्रार्थना केली. ‘पण याची खात्री करून घ्यायला पाहिजे. तिच्या घरी जाऊन.’

पलीकडचा रिसीव्हर उचलला गेला. पाठोपाठ आवाज आला, “...हॅलो...” तो उत्तरला, “...मी..” पुढं काय बोलावं ते त्याला कळेना. तिनंही अवाक्षर उच्चारलं नाही. त्यानं धैर्य एकवटून विचारलं, “फार गाढ झोप आली होती?”

काहीच उत्तर आलं नाही.

“ऐकू येतंय ना, अमू? मी बोलतोय. निदान हं तरी म्हण.”

“हं...”

तेवढाच धागा पकडून तो म्हणाला, “झोप येईना. तुला भेटावंसं वाटलं म्हणून घरातून बाहेर पडलो, पण मुलांना जाग येईल म्हणून घरी न येता ऑफिसमधून फोन केला. ऐकू येतंय ना? हॅलो!”

पलीकडे पुन्हा नि:शब्दता पसरली.

“ए, ऐकलंस ना? बोल काहीतरी.”

“मला ऐकवायचा तुमचा हट्ट असेल, तर मला ऐकावंच लागेल.” ती तुटकपणे म्हणाली.

पण आख्खं एक वाक्य कानावर आल्यामुळे त्यानं संभाषण सुरू ठेवत विचारलं, “फोन का लवकर घेतला नाहीस? झोप आली होती.”

पुन्हा नि:शब्दता.

“अमू... झोप आली होती का? अशा वेळी दिलेल्या औषधांमध्ये झोपेचं औषधही असतंच.”

“म्हणूनच मी औषध घेतलं नाही.” ती उत्तरली.

त्याला राग आला, “औषध घेतलं नाहीस आणि आणखी काही होऊन बसलं म्हणजे?”

“हे पाहा, तुम्हाला ठाऊक असलेलंच माझ्या तोंडून वदवायच्या तुमच्या नाटकाचा वैताग आलाय मला. कृपा करून हे क्रौर्य थांबवा. हवं तर पाया पडते तुमच्या.”

तिचं हे धिक्कार केल्यासारखं बोलणं ऐकून तो विव्हल होऊन गेला. शिवाय आता काय करावं हा प्रश्न तसाच होता. त्यानं संभाषणाचा धागा तुटू न देता विचारलं, “जागीच होतीस, तर फोन न घेता काय करत होतीस एवढा वेळ?”

“ते विचारायचा अधिकार कुणालाही नाही.”

“इतर कुणाला नसेल. मला आहे.”

“तुमच्या या भ्रमाला मी जबाबदार नाही.” तिनं सपकन त्याचं बोलणं कापून काढलं.

“भ्रमात तू आहेस. मला ठाऊक आहे. तुलाही ते ठाऊक आहे. पण तू खोटं बोलतेस.” तिला इतर काही बोलायची संधी न देता तो अधिकारानं रागावून म्हणाला

पुन्हा पलीकडचा रिसीव्हर मौन झाला. आपलं बोलणं योग्य जागी पोहोचलंय याची त्याला

खात्री वाटली. तिला थोडा वेळ देण्यासाठी तोही गप्प राहिला.

एकाएकी रिसीव्हरमधून एक वेगळाच आवाज ऐकू येऊ लागला. 'त्याचा सगळा जीव कानात गोळा झाला. कसला आवाज हा?' उलगडा होत नव्हता. आधी अस्पष्ट असलेला आवाज स्पष्टपणे ऐकू येऊ लागला. 'होय. ती रडतेय. भरभरून रडतेय. कुठंतरी लाटा उठाव्यात तसा त्यांचा आवाज ऐकू येतोय. आधी तिनं आपल्यापासून दडवण्याचा प्रयत्न केला, तरी आता ती मुक्तपणे रडतेय. तिच्या हातातला रिसीव्हरही त्यामुळे हिंदकळतोय. त्यावर हात न ठेवता ती मुक्तपणे रडते आहे. त्याचाच हा आवाज. खोल विवरातून बाहेर येण्यासाठी धडपडणाऱ्या वावटळीसारखा!'

"अमू!" त्यानं असहायपणे तिला साद घातली. तिनं स्वत:ला आवरायचा एक निष्फळ प्रयत्न केला. त्यानं पुन्हा एकदा हाक मारली, "अमू, ऐकू आलं ना?"

त्या हाकेसरशी विवराच्या तळाशी घुसमटणाऱ्या वावटळीला मार्ग सापडला आणि ती मोठ्यानं रडू लागली. कितीतरी वेळ ती न आवरता रडत राहिली. हुंदके आणि आवाजात चढ-उतार होऊन मुक्त रडू कोसळत होतं. मध्येच तिचा श्वास कोंडल्यासारखा होऊन आवाजच बंद झाला. तेव्हा तो असहायपणे ओरडला, "अमू, अमू, इथं ऐकं."

रडून रडून मन हलकं झाल्यावर तीच म्हणाली, "माझा सोमू! माझ्या बछड्या, तू मला वाचवलंस! शेवटचा निग्रह करून मी रिव्हॉल्वर घेऊन निघाले होते. मनाचा असा निग्रह आजपर्यंत कधीही झाला नव्हता. अगदी निघायच्या वेळी फोन वाजला. एवढा राग आला म्हणून सांगू! तुझाच फोन याची खात्री होती, म्हणून फोन उचलला नाही. पण तूही काही कमी हट्टी नाहीस. मी रिसीव्हर उचलेपर्यंत तूही सोडलं नाहीस."

त्याचं मन केवळ हलकंच झालं नाही, त्यात एक प्रकारची धन्यतेची भावनाही भरून राहिली. 'कुणी रिसीव्हर उचलत नाही म्हणून आपण रिसीव्हर ठेवून स्कूटरवरून तिच्या घरी पोहोचेपर्यंत ती टेकडीवर गेली असती. मग नंतर...?

'आपण फोन केला हेच चांगलं झालं.' आज पहिल्यांदा फोन करायचं कसं सुचलं याचंही त्याला आश्चर्य वाटलं. तिनं पुढं विचारलं, "माझ्या पिल्ला, तुला एक विचारू? मी तुझ्याबरोबर जेवढ्या क्रूरपणे वागले, तेवढी कुणाशीही वागले नाही. अगदी शत्रूशीही! तरीही का तू माझ्यावर एवढं प्रेम करतोस? खरं सांग."

तो मनापासून म्हणाला, "मलाही ते ठाऊक नाही. त्याशिवाय मला जगता येणार नाही असं दिसतं."

"सोमू, आता जगावंसं वाटतंय बघ तुझं बोलणं ऐकून! तू खोटं बोलत नाहीस. केवळ मला बरं वाटावं म्हणून तू खोटं बोलणार नाहीस. एक जीव वाचणार असेल, तर खोटं बोलणं चुकीचं नाही, असा उदात्त हेतूही कदाचित तुझ्या मनात असेल; पण माझं तुझ्यावर खरोखर प्रेम आहे."

तिनं आपल्या प्रेमाचा संशय घेतलेला पाहून त्याला कुणीतरी गळा आवळावा तसं दु:ख झालं. तिच्या बोलण्याचा धिक्कार करण्याचीही इच्छा मरून गेली. तो काहीच बोलला नाही. काही क्षण तसे गेल्यावर तीच म्हणाली, "तुला राग आलाय. प्रेमाचा संशय घेतल्यावर राग येणंही साहजिकच आहे. पण प्रेम केल्याशिवाय जगता येणं अशक्य आहे असं तू म्हणालास. त्यावर मी विश्वास ठेवणं अशक्य आहे. अजूनही तू माझ्यावर का प्रेम करतोस ठाऊक आहे?"

"का?"

"आकर्षण वाटलं, शरीरसंबंध आला. तू मूलत: बांधीलकी मानणारा माणूस आहेस. शिवाय तुझ्या स्वभावात करूणा आणि भूतदया भरली आहे. त्यामुळे ती न दाखवता राहणं... त्यातही कालचा प्रसंग येऊन गेल्यानंतर... तुला शक्य नाही. म्हणूनच मी कशीही वागले, कितीही अपमान केला तरी तू सहन करतोस. फोनही त्याचसाठी केलास ना?"

त्याला राग आला, "मनात येईल ते भुंकू नकोस."

"रागावलास? फार आनंद होतोय मला. तुझा माझ्यावर रागवायचा अधिकार आहे, हे त्यावरून दिसतं; पण म्हणून माझं बोलणं खोटं ठरत नाही. आपल्या मनातल्या खोटेपणावर कुणी बोट ठेवलं की, राग येणं साहजिक आहे."

"म्हणजे तू माझ्यावर प्रेम करत नाहीस, हे तू मान्य करतेस?"

"उघडच आहे. प्रेम करणारं कुणीही आत्महत्या करायला जात नाही. मरणाचं अपरिमित आकर्षण मनाला खेचत असताना तुझ्यावर प्रेम आहे असं का खोटं सांगू मी? खरं सांग, तू खोटं बोलतोस असं मला म्हणायचं नाही. तू स्वत:चं निरीक्षण करून उत्तर दे. प्रेम म्हणजे काय तुला ठाऊक आहे? माझ्यावर आहे ते तुझं प्रेम आहे काय? तसं असेल, तर तू माझ्यावर का प्रेम करतोस? या सगळ्या प्रश्नांचा तू कधी विचार केला आहेस काय?"

एकदा तर्काच्या जंगलात शिरलं की, रक्त-मांस-स्नायू सोलून मूळ प्राणाचा शोध घेण्याची हिची अघोरी पद्धत त्याला अपरिचित नव्हती. तो म्हणाला, "कारण सापडत नाही म्हणून तर्क खोटा ठरत नाही. तू नंतर विचार कर हवं तर."

पुन्हा काही क्षण शांततेत गेले. नंतर ती म्हणाली, "हे बघ, तुझी लुंगी-शर्ट-बनियन माझ्या सूटकेसमध्ये आले आहेत. माझा परकर, दोन साड्या आणि ब्लाऊज तुझ्या सूटकेसमध्ये असणार. तूच कपडे भरले आहेत ना? तुझी चूक आहे. दुपारी येताना घेऊन ये."

"मी दुपारी येणार नाही." तो म्हणाला.

"तुला राग आलाय. आता तू तिथंच ऑफिसमध्ये थांब. आता मी तिकडं येईन आणि तुझे पाय धरून क्षमा मागेन आणि तुझ्या खिशातले दोन हजार रुपये काढून घेईन."

ती खरोखरच येईल म्हणून तो घाबरला. 'गुरख्यानं मला स्कूटर ठेवताना पाहिलंय. आता तिची गाडी पाहिली तर...' तो चटकन म्हणाला, "आता घराबाहेर पडू नकोस. मीच येईन."

“आता तू येऊ नकोस. मी अगदी छान आहे. तू भेटलास ना... पैसे वाऱ्यावर उडवले त्याची इतकी शरम वाटते म्हणून सांगू! पण ते जाऊ दे. उद्या पैसे घेऊन ये हं. माझ्या हातात देऊ नकोस. देवापुढे ठेव. मीही देवापुढे चूक मान्य करून घेईन. जा आता. झोप तू.”

“तू औषध मात्र घे!”

“जशी आज्ञा!”

स्कूटरवरून मध्यरात्री घराकडे परतताना त्याच्या मनात येत होतं, ‘दहा हजार भरले की, लगेच फोन मिळू शकतो. घरात फोन घ्यायला पाहिजे. रात्री झोपायच्या आधी तिच्याशी थोडं बोलता येईल. तिलाही सांगायचं, ‘तुला वाटेल तेव्हा रात्री-अपरात्री मला फोन कर.’ त्याला हा विचार मनापासून पटला. यासाठी पैसे कुठले घ्यायचे तेही त्यानं ठरवलं. स्कूटर गॅरेजमध्ये ठेवताना ‘आपण अवेळी शेजाऱ्या-पाजाऱ्यांना जाग आणतोय.’ या विचारानं त्याला संकोचल्यासारखं झालं. कपडे बदलून अंथरुणावर पडल्यावरही त्याला झोप लागली नाही. तो प्रसंग टळल्याचा आनंद असला, तरी हे काही खरं नव्हतं, हेही त्याला समजत होतं. ‘आता ती औषध घेऊन झोपी गेली असेल, पण उद्या... परवा... प्रत्येक रात्री तिला कोण वाचवणार? दर रात्री तिच्या घरी... तिची मुलं? हे योग्य नाही, हे नक्की! पण त्या जगण्यातच काही अर्थ राहणार नाही. वर्षाकाठी आठ-दहा इमारती उभ्या करणं जीवनाच्या उपजीविकेचं साधन असलं, तरी त्यात काहीही गंमत राहणार नाही. ती असेल, तरच जगण्यात गंमत आहे. नाहीतर कशातच काही अर्थ राहणार नाही. असा कसा मी या प्रेमात इतका खोल रुतलो? ती म्हणाली तसं माझं हे प्रेम म्हणजे तिच्या असहाय परिस्थितीविषयी वाटणारी अनुकंपा आहे?’ तो स्वत:च्या भावनांकडे अधिक विश्लेषणात्मक दृष्टीनं पाहू लागला.

‘यातलं काहीही खोटं नाही, पण फक्त एवढंच नाही. त्यापेक्षाही एका वेगळ्या शक्तीनं आम्हाला जखडलं आहे. कुठली शक्ती ही? प्रेम हे त्याचं एक नाव असेल; पण केवळ नावाचा उच्चार केल्यानं वस्तू समजत नाही.’

रात्र संपत आली. तिला कसं वाचवायचं, हा प्रश्न अजून सुटला नव्हता. झोपेचा पत्ता नव्हता. ‘थोडीतरी झोप मिळायला पाहिजे. नाहीतर दिवसभर ऑफिसमध्ये बसून राहणंही शक्य नाही, हेही समजत होतं.’ त्यानं खिडक्या बंद करून पडदे ओढले आणि फॅन लावून बळेच डोळे मिटले. डोक्यात मात्र टेलिफोन, ऑफिसला जायला पाहिजे हेच घोळत होते.

> ‘बाळा, माझ्या बाळा! तुला माझं बाळ म्हणायचा अधिकार मी गमावला आहे. आता तू कुठं असशील? मला ठाऊक नाही. अधिकार गमावलेल्या माझ्यासारख्या दुर्दैवी व्यक्तीला ते ठाऊक तरी कसं असणार? हे पत्र नव्हे. मनातलं तुला पोहोचवण्याचा दुसरा मार्गच नसल्यामुळे लिहीत आहे. हा वेडेपणा आहे, हे समजत असूनही लिहीत आहे. मन मोकळं केलं नाही, तर जगणंही शक्य नाही. लिहून झाल्यावर मी स्वत: ते पत्र तुला आणून देईन. मी स्वत: तुला आणून देणार आहे. त्या विषयी लिहिण्यापेक्षा तोंडी का सांगू नये असं तुला वाटेल; पण तुझ्यापुढं उभं राहून सांगायचं म्हटलं, तर लाज शरम, अपमान यामुळे तोंडातून शब्द फुटणार नाही. तू माझं बाळ आहेस, हे मला ठाऊक आहे.

तुझ्या रूपाची मला कल्पना नाही. ते रूप स्पष्ट होण्याआधीच तुला मी ठार मारलं. तू मुलगा की मुलगी हेही न कळण्याआधीच्या अवस्थेत असताना मी तुला मारलं. तरी तू माझं पत्र वाचशील? तुला ठार मारून मी बेंगळुरूहून आले. तुझ्या थोरल्या भावांच्या आठवणींनं मला पाप केल्याची भावना अधिकच व्यापून राहिली. तुझा भाऊ विकास, त्याचा जन्म माझ्या फसवणुकीतून झाला. आपण केलेली फसवणूक माझ्या लक्षात येऊ नये म्हणून त्या भावंडांनी कट करून त्याला जन्म द्यायला भाग पाडलं. त्या वेळीही त्याला नष्ट करून त्यांचा कट पूर्णपणे मोडून काढायची माझी तीव्र इच्छा होती; पण त्याच वेळी वाटलं, 'शिक्षा करायची, ती निरपराध बाळाला का करायची?' त्या दोघांना करायला पाहिजे. बाळा, तू तर अशा कुठल्याही फसवणुकीतून जन्मला नव्हतास! उलट सावधगिरीचा पूर्णत: विसर पडावा अशा उत्कट क्षणी तू साकारलास. तुझ्या वडलांनीही तुला जगवायचा, मोठं करायचा आग्रह धरला. पण मी घाबरले रे! तुझी भावंडं तुझ्याशी कशी वागतील? नातेवाईक तुझा पाणउतारा करतील अशी भीती वाटली मला. आई या नात्यानं तुझं रक्षण करायची शक्ती माझ्यात नव्हती. मी खुनी आहे. मला क्षमा करशील? खून केल्यावर क्षमा कुणाकडे मागायची? तू जिथं आहेस तिथं येऊनच मला तुझी माफी मागायची आहे. तू मला इथून निघून तुझ्याकडे यायची शक्ती दे. दोन तासांपूर्वी मी सगळी शक्ती एकवटली होती, पण तुझे वडीलच त्यामध्ये आले. पुरुषाला बायको पाहिजे आणि स्त्रीला मूल. नवरा त्यासाठी एक साधन. तुझ्या आणि माझ्यामध्ये येणाऱ्या त्याचा खून करायची इच्छा प्रबळ होत आहे. तुझ्या या नतद्रष्ट आईला तू क्षमा करशील काय? तुला ठार करण्याआधी डॉक्टरांनी मला बेशुद्ध केलं होतं. त्याच वेळी मी मेले असते, तर आपण दोघंही एकत्र राहिलो असतो. मग हे दु:खही राहिलं नसतं.'

औषधाचा प्रभाव वाढत गेला आणि ती पेनचं टोपण न लावता झोपी गेली.

उजाडल्यावर आपण खिडकीतून फेकून दिलेल्या हजार रुपयांची आठवण येऊन ती खिन्न झाली. हातातल्या चार बांगड्यांपैकी एक बांगडी साडेतीन हजार रुपयांना विकून उभ्या केलेल्या पैशांपैकी हजार रुपये असे वाऱ्यावर उडवल्याचं आठवताच, डोकं भिंतीवर आपटावं एवढं तिला पश्चात्ताप झाला. सगळं आवरून मुलांना शाळेत पोहोचवायला उशीर झाला. त्यांना शाळेत पोहोचवल्यावर तिला एक प्रकारचा रितेपणा जाणवू लागला. त्या दिवशीची रजा घेतली असली, तरी कॉलेजमध्ये जावंसं वाटू लागलं. एका दिवसाची रजाही वाचेल असं मनात आलं. ती घाईनं तयार होऊन कॉलेजला गेली.

ती कॉलेजला गेली तेव्हा थोडा उशीरच झाला होता. आता तिचा कुठला पीरियड होता, हे तिच्या लक्षात नव्हतं. तिनं टाइम-टेबलवरून नजर फिरवली. थोडी तयारी करणं आवश्यक होतं. त्या दिवशीची रजा रद्द केल्याचा अर्ज लिहून देऊन ती लेक्चरच्या तयारीला लागली.

प्रिन्सिपॉलबाई बोलावत असल्याचा निरोप घेऊन प्यून आल्यावर ती पुस्तक मिटून त्यांच्या ऑफिसमध्ये निघाली. जिना चढून वर जाताच चामुंडी टेकडी समोर येऊन उभी राहिली. तिकडे पाहतच ती प्रिन्सिपॉलबाईंच्या खोलीत गेली.

पन्नाशीच्या घरातल्या, सोनेरी फ्रेमचा चष्मा आणि रुंद काठाची रेशमी साडी नेसलेल्या प्रिन्सिपॉलबाईंचा चेहरा प्रसन्न नव्हता. तिनं त्यांना अभिवादन केलं आणि त्यांच्यासमोरच्या अडीच बाय बारा फूट टेबलाभोवती असलेल्या सोळा खुर्च्यांपैकी त्यांच्याजवळच्या खुर्चीवर बसली. बाईंनी बेल वाजवून प्यूनला आत बोलावून घेतलं आणि आत कुणालाही न सोडण्याची सूचना दिली. परिस्थिती गंभीर असून एखाद्या अप्रिय विषयावर त्यांना बोलायचं होतं, याची तिला कल्पना आली.

तिच्याकडे वळून त्यांनी मुद्यालाच हात घातला, "तुम्ही चार दिवसांच्या सी.एल.साठी अर्ज लिहून दिलात, पण तुमच्या खात्यावर तेवढी सी.एल. आहे की नाही, ते तुम्ही त्याआधी बघायला नको काय? तेरापैकी बारा सी.एल. संपल्यात तुमच्या! ऑफिसमध्ये कुणी काही पाहिलं नाही. त्यात आणखी एक सी.एल.चा अर्ज फेकून निघून गेलात तुम्ही."

बेसावध असताना कुणीतरी थोबाडीत मारावं तसं झालं तिला! 'या वर्षभरात आपण खूप वेळा सी.एल... होय. रात्री झोप नाही म्हणून, सकाळी कॉलेजला जाणं शक्य नाही म्हणून, सोमूच्या ऑफिसच्या अलंकरणासाठी वेळोवेळी सुट्टी काढली होती. दोन-तीन वेळा अचानक इस्टेटीवर जाताना... खरंय. बारा दिवसांची रजा संपून जाणं सहज शक्य आहे.' ती म्हणाली, "सॉरी मॅडम, या तीन दिवसांसाठी मेडिकल लीव्ह घालेन. खरोखरच मला बरं नव्हतं."

"डॉक्टर अमृता, सी.एल. नाही म्हणून मेडिकल घालायची आणि मेडिकल नाही म्हणून सी.एल. टाकायची. तीही नाही म्हणून बिनपगारी रजा मागायची. हे काही योग्य नाही. मेडिकल रजा हवी असेल, तर खरोखरीच आजारी पडायला हवं. तसं डॉक्टरचं सर्टिफिकेट आणायला हवं. खरं सर्टिफिकेट!"

"म्हणजे मी खोटं सांगत्येय?" डिवचल्यासारखं होऊन तिनं विचारलं.

"मी खरं-खोटं करत नाही. काय पाहिजे ते सांगतेय. ऑलराइट! काय होतंय तुम्हाला?" त्यांनी स्पष्टच विचारलं. त्यांचा हा प्रश्न जाब विचारल्यासारखा होता. खोटं सांगितलं, तरी सत्य जाणून घ्यायची शक्ती माझ्या अनुभवकक्षेला आहे हे त्यातून स्पष्टपणे जाणवत होतं.

ती घामानं निथळून गेली. काहीही न सुचून ती उत्तरली, "ते पर्सनल आहे मॅडम."

मॅडम भडकून म्हणाल्या, "हे बघा, मला कुणाच्याही पर्सनल बाबतीत डोकं घालायची इच्छा नाही, पण एक गोष्ट तुम्हीही विसरता कामा नये. रजा हा काही तुमचा हक्क नव्हे. पोर्शन कुठपर्यंत आलाय, उरलेला किती दिवसांत संपवणं शक्य आहे या सगळ्या गोष्टींचा विचार करून रजा मंजूर करायचा अधिकार प्रिन्सिपॉलना आहे. तुम्हाला कदाचित या नोकरीची आवश्यकता नसेल, पण दरमहा पगार देणारं कॉलेज त्या प्रमाणात तुमच्याकडून कामाची अपेक्षा करतं हे लक्षात ठेवा. तुमच्यासारखे कितीतरी एम.ए., पीएच.डी. झालेले नोकरी नाही म्हणून धडपडत असतात. हे पाहा, तुम्हाला निष्ठेनं काम करणं शक्य असेल तर करा, नाहीतर मानानं राजीनामा देऊन मोकळ्या व्हा. मी मुद्दाम सांगत्येय हे तुम्हाला. नोकरी प्यूनची असो अथवा आणखी कसली असो, माणसाला आत्माभिमान असला पाहिजे. तो कामावरच्या निष्ठेवरून व्यक्त झाला पाहिजे."

संपूर्ण नोकरीमध्ये पहिल्यांदाच वरिष्ठांकडून ही लागट बोलणी ऐकताना ती कोलमडून गेली होती. संदर्भ वेगळा असता, तर त्याच पावली तिनं त्यांना उलट उत्तरं ऐकवली असती; पण आता मात्र ती बधिर होऊन गेली होती. मॅडमनी शेजारची फाईल घेऊन चाळायला सुरुवात केली आणि नंतर मान वर करत त्यांनी तिला सांगितलं, "ठीक आहे. निघा. मेडिकल लीव्हचाच अर्ज द्या पाठवून."

ती उठली आणि नमस्कार वगैरे न करता सुटका झाल्यासारखी तिथून बाहेर पडली. लगेच वर्गावर जाणं अशक्य वाटून ती खुर्चीत कोसळली. त्यात आपण लेक्चरची तयारीही न केल्याचं तिला आठवलं. पाऊण तास काहीतरी बडबडत मुलांना गुंगवून ठेवणं अशक्य नसलं, तरी हा काही प्रामाणिकपणा नाही, ही टोचणी तिला बोचू लागली. पाठोपाठ तिला आठवलं, 'गेले काही दिवस मी अशीच वागतेय. कुणी तशी तक्रार केली असेल काय?'

घरी परतत असताना मनात पुन:पुन्हा येत होतं, 'ही बाई आज एवढं का बोलली असेल? मीही 'ते पर्सनल आहे.' म्हणून त्यांना तोडायला नको होतं; पण तिचा तो प्रश्न इतक्या अचानकपणे आला की, मी त्या दृष्टीनं बेसावध होते. शिवाय त्या वेळी तिचा चेहरा खुनाचा तपास करणाऱ्या पोलिसासारखा झाला होता. तिला काही समजलं असेल काय? पण कसं समजेल? कोण सांगणार? की बायकांच्या नजरेतून सुटू नये अशी माझी अवस्था होती? मी आणि सोमू वरचेवर भेटतो, त्याची स्कूटर दुपारच्या वेळी आमच्या दारात असते, हे काही जणांनी ओळखलं असेल काय? हिलाही सगळं ठाऊक असल्यामुळे माझ्या 'पर्सनल' या शब्दामुळे ती संतापली असेल काय?'

कुत्र्यांना खाऊ घालून मोकळं सोडताना तिच्या मनात आलं, 'तिच्या वागण्यामागं आणखीही एक कारण आहे. ती प्रिन्सिपॉल असून बसनं कॉलेजला येते आणि मी कारनं! ती पोटदुखीही इथं व्यक्त झाली असेल.'

पण एकीकडे मनात बाह्य तपशील आठवत राहिला, तरी तिचं मन त्यातला मूळ अर्थ नाकारू शकत नव्हतं. 'माझ्या कॉलेजला जाण्यात नियमितपणा राहिला नाही, अवांतर वाचन सोडून दिलंय, संशोधनाचा तर लवलेशही नाही. ही कर्तव्यच्युती नाहीतर दुसरं काय?' तिचं मन संकोचून गेलं. 'स्वत:च्या भावनांमध्ये गुरफटून रात्ररात्र जागी राहते मी. कॉलेजमधून आल्यानंतरचा वेळ सोमूची वाट बघण्यात आणि तो आल्यानंतर त्याच्याशी वाद घालण्यात खर्च करते.' तिच्या मनात खेद भरून राहिला होता.

दोघांची ताटं वाढून तिनं अन्न टेबलावर मांडलं आणि घड्याळ पाहिलं. 'तीन दिवस गावात नसल्यामुळे, त्याला ऑफिसमध्ये भरपूर काम दिसतंय.' तिला राग आला. 'तो स्वत:च्या कामात कर्तव्यनिष्ठ आहे. त्याला माझ्यापेक्षा कामाचीच अधिक बांधीलकी वाटते. मी मात्र कर्तव्यभ्रष्ट आहे. कर्तव्यापेक्षाही त्याला अधिक महत्त्व देते.' हळूहळू तिचं मन संतापानं भरून गेलं. कितीतरी वेळ ती टेबलापाशी खाली मान घालून बसून राहिली.

एवढ्यात फोनची रिंग वाजू लागली. 'त्याचाच फोन. जेवायला येणार नाही म्हणून सांगायला फोन केलाय.' तिनं रिसीव्हरला हात लावला नाही. वीस-पंचवीस वेळा एखाद्या निर्जन बेटावर असावी तशी फोनची घंटा वाजत राहिली. नंतर शांत झाली. रिंग वाजायची

थांबल्यावर तिला मनापासून वाईट वाटलं. रिसीव्हर उचलला असता, तर त्याचा आवाज तरी ऐकायला मिळाला असता. पाठोपाठ रागही आला. 'स्वत: यायचं सोडून फोन का करावा यानं?'

पुन्हा फोनची रिंग वाजल्यावर मात्र वेळ न गमावता ती तिकडे धावली. घाईनं उठून जाताना बसलेली खुर्ची मागं पडल्याचंही तिच्या लक्षात आलं नाही. तिनं रिसीव्हर उचलताच पलीकडून त्यानं रागानं विचारलं, "एवढा वेळ फोन का उचलला नाहीस?"

"मला एवढा वेळ वाट बघायला लावून आता फक्त फोन का करतोस?"

"इथं घरी फोन मिळतोय. लगेच फोन देताहेत. कागदपत्रं भरणं वगैरे सोपस्कार संपले आहेत. आता घरी निघालोय. लाइन ओढून फोन फिक्स करेपर्यंत मला तिथंच राहावं लागेल."

आता तिला सगळ्याचा नेमका अर्थ समजला. ती उत्साहात म्हणाली, "नंबर समजला? सांग. नाहीतर रात्री दहा वाजता फोन कर. आता तू काय खाल्लंस?"

"अजून काही नाही."

"मग मीही खाणार नाही."

"फोनवाल्या माणसांना काहीतरी देऊन मीही खाऊन घेईन. तू लगेच जेव आणि औषध घे." एवढं सांगून त्यानं रिसीव्हर ठेवला. पोटात चार घास ढकलून औषध घेऊन ती झोपली. तिचं मन अजून कोमजलेलंच होतं. 'स्वत:च्या रजेच्या बाबतीत एवढी बेफिकीर असलेल्या माझ्यासारखीला कसली कर्तव्यनिष्ठा असणार म्हणा! तिचं मन स्वत:ची अवहेलना करत होतं. दिवसेंदिवस आपण उत्तम प्राध्यापिका म्हणून स्थिरावण्याऐवजी जेवढ्यास तेवढं वाचून वर वर शिकवतोय. छे:! हीन जीवन माझं!' मनातला स्वत:विषयीचा धिक्कार आणखी तीव्र झाला. 'जीवनातल्या प्रत्येक बाजूवर हार. फक्त हार! कुठेही यश म्हणून नाही.'

रात्री मुलांना जेवायला वाढून झोपवत असताना तिनं घड्याळाकडे पाहिलं. साडेनऊ. 'तो दहा वाजता फोन करेल; पण फोनचं काम पूर्ण झालं असेल काय? एखादी वायर किंवा खिळा नाही म्हणून कदाचित उद्यापर्यंत हे काम शिल्लक ठेवतील. तसं काही झालं, तर तो ऑफिसमधून फोन करून कळवेल.' स्वत:लाच समजावत ती दुसऱ्या दिवशीच्या लेक्चरचं एक पुस्तक हातात घेऊन बसली. मन पुन:पुन्हा फोनकडे वळत होतं. मध्येच तिच्या मनात आलं, 'आपला फोन बिघडला नाही ना?' रिसीव्हर उचलून डायल टोन ऐकून तिनं तो पुन्हा जागेवर ठेवला.

साडेदहा वाजले. पावणे अकरा... दहा पन्नास झाले. तरी रिंग वाजली नाही. 'याचा अर्थ घरी फोन आला नाही म्हणायचा काय? पण ते कळवण्याइतका सेन्सही नाही याला! हा फक्त सेन्सचा प्रश्न नाही. ही उपेक्षा आहे. मी वाट पाहतेय औषधाची गोळी न घेता. नंतर हा शंभर कारणं सांगत बसेल.' संताप तिच्यावर दहा मार्गांनी चाल करून येत होता. 'आता मी औषध घेईन. पंधरा-वीस मिनिटांत मला गाढ झोप येईल. मग फोनची रिंग कितीही वेळा झाली तरी

ऐकूच येणार नाही. छान अद्दल घडेल याला!' त्याला शिक्षा व्हावी म्हणून तिनं रिसीव्हर काढून ठेवला. जेमतेम दोन मिनिटं झाली असतील. 'त्यानं फोन करून पाहिला असेल आणि माझा फोन बिघडलाय अशी कल्पना करून....' नंतर तिनं एकाएकी त्याच्या ऑफिसचा नंबर मिळवला. 'रिंग होतेय. या वेळी चुकून काही कामासाठी तो तिथं गेला असेल तर... नाही. या वेळी तो तिथं नसतो. की असून मुद्दाम उचलत नसेल? तसं नाही करणार तो. तो काही माझ्यासारखा विक्षिप्त नाही. तो ऑफिसमध्ये या वेळी असेलच कसा?' मनाची उलटतपासणी घेत तिनं रिसीव्हर ठेवला.

कितीतरी वेळानं फोनची रिंग वाजली. तिनं घड्याळात पाहिलं. बारा दहा. क्षणभर ती रिसीव्हर उचलावा की उचलू नये या विचारात पडली. 'त्यानंही 'झोपली असेल...' असा विचार करून प्रयत्न सोडून दिला तर?' या विचारानं घाबरी होऊन तिनं रिसीव्हर उचलून 'हॅलो' म्हटलं.

"मी घरातून बोलतोय. नंबर लिहून घे."

कधीपासून काढून ठेवलेल्या पॅडवर तिनं उतावळेपणानं नंबर लिहून घेतला आणि नंतर म्हणाली, "एवढा का उशीर केलास? मी इथं कुत्रीसारखी वाट बघत असते, ते ठाऊक नाही तुला." तिचा संताप उसळून आला होता.

पण त्याचं तिकडं लक्ष नव्हतं. तो सांगू लागला, "आज काय झालं ठाऊक आहे? फोनचं कनेक्शन जोडून दिल्यावर मी ऑफिसमध्ये आलो. एका पिलर-कॉलमचं डिझाइन करून देणं आवश्यक वाटत होतं. त्याच वेळी कॉंट्रॅक्टरनं तक्रार केली होती. कामगारांचे पगार फुकट जाताहेत. नाहीतर ते वेगळी कामं बघून निघून जातील. नंतर कामगार मिळणार नाहीत वगैरे वगैरे. त्यात मंगळवारीपण बेंगळुरूला गेलो होतो ना? आज दुपारी तो ऑफिसमध्ये वाट बघत बसला होता. मी फोनच्या गडबडीत धावपळ करत असल्यामुळे त्याच्या हाती लागलोच नव्हतो. मी ऑफिसमध्ये दिसताच त्यानं आवाज चढवला. त्याला कसाबसा शांत करून मी त्याचं काम करायला घेतलं. त्यासाठी साइटवर जाऊन येणं आवश्यक होतं. पुन्हा ऑफिसमध्ये येऊन कामं संपवायला अकरा-दहा झाले."

"म्हणजे माझ्यामुळे तुला तुझ्या व्यवसायाकडे लक्ष देणं जमलं नाही म्हणायचं! तीन दिवस तुझ्याबरोबर बेंगळुरूला वाया गेले, आज तुझ्याकरता फोन बसवण्यात सगळा वेळ गेला असंच म्हणायचंय ना तुम्हाला? माझ्यामुळेच आज रात्री अकरा वाजेपर्यंत काम करावं लागलं ना?"

"तसं कुठं म्हणालो मी? फोन करायला का उशीर झाला म्हणून तू विचारलंस, त्याचं खरं काय ते उत्तर दिलं मी." दुखावल्यामुळे त्याचा स्वर दुर्बल झाला होता.

पण तिचं तिकडं लक्ष नव्हतं. ती म्हणाली, "हे पाहा, मी असं म्हणालो आणि तसं म्हणालो नाही असा वाद घालून तुम्हाला सुटका करून घेता येणार नाही. तुमच्या बोलण्यातलं मर्म न समजण्याइतकी मी मूर्ख नाही. 'मला या गोष्टी सांगायला येऊ नका."

"ते जाऊ दे. तू कशी आहेस? औषध घेतलंस?"

“मी संतापलेली असताना शांतपणे वागून स्वत:चा मोठेपणा दाखवायची नाटकं करू नका. अवहेलनेचा हा सूक्ष्म प्रकार आहे, हे मला ठाऊक आहे. काय अर्थ तुमच्या या बोलण्याचा? ‘औषध घेतलंस काय म्हणे?’ त्या औषधात झोपेचा गुण आहे. ते घेतल्यावर मला झोप येणार. ‘मुकाट्यानं पडून राहा. वटवट पुरे.’ असंच म्हणायचंय ना तुम्हाला? तुम्ही रागानं सरळ शब्दांत हे सांगितलं असतंत, तर आनंद झाला असता मला! पण गोड बोलण्यानं गळा कापायची कला! काकूपेक्षा कणभरही कमी नाही तुमच्यात. पाया पडते. सोडून द्या ही नाटकं!”

तो अवाक होऊन गेला होता. त्याच्या उत्तराची वाट पाहत असलेल्या अमृताला तोही स्वत:चा अपमान वाटला. ती पुढं म्हणाली, “बोलायची इच्छा नसेल, तर तसं तोंड उघडून स्पष्ट सांगा किंवा फोन ठेवून द्या. समोरासमोरची नाटकं कमी वाटतात म्हणून आता फोनवरही नाटकं करता? त्यासाठी घरी फोन घेतलात?” तिनं संतापानं रिसीव्हर त्याच्या जागी आदळला.

तो पूर्णपणे घामेजून गेला होता. आदल्या रात्री क्षणभरही झोप मिळाली नव्हती. संपूर्ण दिवसभर टेलिफोन, ऑफिस, त्यासाठी दहा हजार रुपये गोळा करणं आणि संध्याकाळपासून आतापर्यंत कॉंट्रॅक्टरबरोबर काम यात धावपळ झाली होती. घरी आल्यावर अंघोळ करून मस्त ताणून द्यावी असं वाटत असतानाच टेलिफोनची सुरुवात तिच्यापासून करायची असं ठरवून बुटाची लेसही न सोडता त्यानं तिला फोन केला होता. ती कितीही संतापली, तरी आपण संयम ठेवूनच राहायचं या निश्चयानं तो वागला असला, तरी शरीराची दमणूक वाढल्याचं त्याच्या लक्षात येत होतं. तिला पुन्हा फोन करणं शक्य होतं; पण तसं केलं तर तिच्या संतापात तेल ओतल्यासारखं झालं असतं, हेही त्याला समजत होतं.

पायांतले बूट-मोजे काढून ठेवून, कपडे उतरवून तो न्हाणीघरात गेला. दोन बादल्या पाणी घेऊन अंघोळ केली. बाहेर येईपर्यंत आणखी थकला आला असला, तरी अंगावरचा घामाचा चिकटपणा गेल्यामुळे त्याला बरं वाटत होतं. ‘आता एक मस्त झोप काढायला पाहिजे, आणखी काहीही नका.’ असं वाटत असलं तरी पोटात भूक जाणवत होती. दुपारी कॉंट्रॅक्टरबरोबरचं काम संपण्याआधी हॉटेल्स बंद झाल्यामुळे त्याला जेवण मिळालं नव्हतं. घरात कॉर्नफ्लेक्स आणि दुधाची पावडर असल्याचं आठवलं. पोटात काहीतरी घासभर गेल्याशिवाय गाढ झोप लागणार नाही हे जाणवून तो स्वयंपाकघरात जाण्यासाठी उठला.

त्याच वेळी फोनची रिंग वाजली. ‘तीच. या वेळी आणखी कोण फोन करणार? आणि हा नंबर तरी इतरांना कुठं ठाऊक आहे?’ रिसीव्हर उचलताच पलीकडून आवाज आला, “मी रिसीव्हर ठेवला म्हणून राग आला?”

“नाही.” तो शांत स्वरात म्हणाला.

“पण मी म्हणते, माणसाला राग आला, तर तो कबूल का करू नये?”

तो पुन्हा शांतपणे म्हणाला, “पण राग आला नसताना उगाच खोटं का सांगायचं राग आला म्हणून?”

“तुझा हा संयम पाहिला की, मला तुझं कौतुक वाटतं आणि संतापही येतो. संयमानं वागून माझा राग कमी करता येईल असं तुला वाटतं? अशी तुझी समजूत असेल तर ऐक. त्यामुळे माझा संताप अधिक वाढतो. राग आला असता रागच सामोरा आला की, किती समाधान वाटतं. नाहीतर निराशा पराकोटीला पोहोचते. कृपा करून तू हे समजून घे.”

“बरं!”

“बरं म्हणजे काय? शांत, धीरोदात्त, मोठा माणूस व्हावं असा मोठाच अहंकार आहे तुझ्या मनात. मला पराकोटीचा संताप येतो या तुझ्या अहंकाराचा! मला आणखी हीन म्हणून दाखवून द्यायचा तुझ्या अंतर्मनातला हेतू आहे. खरं की नाही? तूच विचार करून सांग.”

त्याला तिच्या बोलण्याचा अर्थच कळत नव्हता. ‘घासभर पोटात ढकलून थंडपणे झोपावं.’ तिनं पुन्हा आग्रह धरला, “सांग. विचार कर.”

“तेच करतोय.” तो म्हणाला, “तुझा प्रश्न खूपच गहन आहे. याचं उत्तर एवढ्या पटकन देणं शक्य नाही.” त्याला कडकडून जांभई येत होती, ‘पण तिच्या लक्षात नाही आलं, तर हा आपल्या बोलण्याकडे दुर्लक्ष करतोय असाच ती ग्रह करून घेणार.’ त्यानं रिसीव्हरवर हात ठेवून जांभई दिली आणि नंतर विचारलं, “कॉलेजमध्ये जाऊन आलीस?”

“आता का हा प्रश्न विचारलास?” तिनं संशयानं विचारलं.

“विश्रांती घेतलीस की नाही हे मला जाणून घ्यायचं होतं म्हणून.”

“गेले होते. तिथं काय झालं...” म्हणत तिनं प्रिन्सिपॉलबा◌ंइंबरोबर जे बोलणं झालं होतं ते त्याला सांगितलं आणि विचारलं, “तुला काय वाटतं?”

“नोकरीतच नव्हे, खासगी व्यवसायातही असे अनुभव येत असतात. तू ही घटना मनाला लावून घेऊ नकोस. अर्जंट गावी जावं लागलं, तिथं आजारी पडले असं सांगून फॅमिली डॉक्टरकडून एक सर्टिफिकेट घे आणि मेडिकल लीव्हचा अर्ज दे.”

“किती सुलभ मार्ग सांगितलास? व्वा! मी इथं किती मनस्ताप सहन करतेय ते तुला कसं समजणार? मला तर वाटतं, या क्षणी राजीनामा खरडून तिच्या तोंडावर फेकावा.”

“हे बघ, मला न विचारता घाईनं काहीही करू नकोस. ही नोकरी केवळ तुला दोन वेळा अन्न देते असं नव्हे. मुलांना शिकवणं-स्वत: शिकणं, स्वत:चंही ज्ञान वाढतं यात.”

“पण मी नीट शिकवत नाही आणि माझं ज्ञानही वाढत नाहीये.”

“ही एक तात्पुरती अवस्था आहे. तू असं कर. औषध घेऊन झोपी जा. हळूहळू सगळं ठीक होईल.”

“का? तू कंटाळलास? सुटका करून घ्यायला असं सांगतोयस? खरं सांग.”

“खरं तेच सांगतोय मी! तू दिवसातून तीन वेळा औषध घेणं आवश्यक आहे. रात्रीचं औषधही जेवल्यानंतर अर्ध्या तासानं घ्यायला पाहिजे. आता किती वाजले ते पाहिलंस काय? दोन वाजायला पाच मिनिटं आहेत. असा औषध घ्यायला तीन-चार तास उशीर केलास, तर गुण कसा येईल? आता औषध घे. उद्या बोलू या. तुझ्या फॅमिली डॉक्टरांकडून सर्टिफिकेट घे.”

“म्हणजे मी खोटं सर्टिफिकेट घेऊ?”

“खऱ्या-खोट्याचं आपण नंतर बघू. आधी औषध घे.” तो बोलायचा थांबला, पण त्यानं रिसीव्हर ठेवला नाही. त्याने त्या वेळी रिसीव्हर ठेवून दिला असता, तर तो ती अपमान समजण्याची शक्यता नव्हे, खात्री होती; पण ती थांबायला तयार नव्हती. “पण मी खोटं का सांगावं?” ती बोलतच राहिली. अखेर तिनं रिसीव्हर ठेवल्यावर तो उठून स्वयंपाकघरात गेला आणि घासभर कॉर्नफ्लेक्स खाऊन अंथरुणावर पडला. ‘सकाळी नऊ वाजता काँट्रॅक्टर ऑफिसवर येणार आहेत. तेवढ्यात काम उरकून ठेवायला पाहिजे. निदान दोन तास तरी झोप काढायला पाहिजे. सकाळी सात वाजता ऑफिसमध्ये जाऊन कामाला लागलं, तरच नऊ वाजेपर्यंत काम आटोक्यात येईल. त्यानंतर दहा-पंधरा-मिनिटं वेळ काढणं कठीण नाही.’ याच विचाराच्या तंद्रीत तो गाढ झोपी गेला.

सकाळी जाग येऊन त्यानं घड्याळात पाहिलं, ‘साडेदहा!’ तो दचकलाच. जेमतेम दात घासून कपडे चढवून तो ऑफिसकडे धावला. तो ऑफिसमध्ये पोहोचला तेव्हा अकरा वाजत आले होते. चेहऱ्यावर व्यावसायिक हसू आणत त्यानं सांगितलं, “रात्री साडेअकरापर्यंत काम केलं. आता अगदी थोडं शिल्लक राहिलंय.”

काँट्रॅक्टरही व्यावसायिक संयमानं म्हणाले, “पावणेनऊ वाजता इथं आलो. दहा वाजेपर्यंत तुमची वाट पाहिली. मग यांना बोलावून घेतलं आहे. तुम्हाला जे काही बोलायचंय ते त्यांच्याशी बोला.”

प्रकरण पूर्णपणे बिघडल्याचं त्याच्या लक्षात आलं. आता सॉरी वगैरेनं काही भागणार नव्हतं, हे त्याला समजत होतं. त्यात घराचे मालक राजशेखर म्हणाले, “काम एकेक दिवस पुढं गेलं की, किती नुकसान होतंय ते काँट्रॅक्टर साहेबांनी आकडेवारीनं दाखवून दिलंय. आजही काम झालं नाही. होणारं नुकसान कुणी सहन करायचं? त्यांनी, मी की तुम्ही भरून देणार? सगळे जण काही आर्किटेक्ट नेमूनच घर बांधतात असंही नाही. म्हटलं असू दे. तुम्ही मोठी माणसं... मुंबईची! आमचा आम्हाला हिशेब चुकता करा आणि तुम्हीही मोकळे व्हा. आम्हालाही मोकळं करा.”

यावर काहीही युक्तिवाद करायची त्याला शरम वाटली. संपूर्ण व्यावसायिक जीवनात त्याच्यावर कधी असा प्रसंग आला नव्हता. ‘त्यांचं नुकसान होत असताना त्यांचा संयम ढळणं शक्य आहे.’ आता यातून बरं काहीच निष्पन्न होणार नाही हे जाणवून तो म्हणाला, “आजवरच्या कामाचं तुमचं मला तीन हजार रुपये येणं आहे. माझ्यामुळे पंधरा दिवसांचा कामगारांचा पगार फुकट गेला म्हणालात ना? म्हणजे सुमारे अडीच हजार रुपये झाले. यानंतर तुम्ही मला काही देऊ नका, मीही काही देणार नाही. माझी चूक झाली. क्षमा करा. आपण एका व्यवसायातले आहोत. कडवटपणा नको. तुमच्या घराची वास्तुशांत असेल, त्या दिवशी

जरूर कळवा. मी निश्चित येऊन तोंड गोड करून जाईन.” म्हणत त्यानं हात जोडले, “सॉरी! मी निघू? थोडं काम आहे.” म्हणत तो तिथून बाहेर पडला.

त्या दोघांनाही त्याचं वागणं अनपेक्षित वाटलं.

घडलेल्या प्रकाराबद्दल त्यालाही वाटलं, ‘आपण वागणुकीच्या सफाईमुळे व्यवहार सांभाळला असला, तरी चूक माझीच आहे.’ कॉफी पिऊन तो ऑफिसवर आला तेव्हा ते दोघंही निघून गेले होते. तो आपल्या चेंबरमध्ये बसून राहिला होता. दुसरं कुठलं काम हातात घ्यायची इच्छा होत नव्हती. मुकाट्यानं बसून राहण्यापेक्षा त्याला ऑफिसबाहेर पडावंसं वाटलं. ‘कितीतरी दिवस झाले, नियमितपणे मी ऑफिसमध्येही बसत नाही.’ हे केवळ एक काम हातातून गेल्याचं नुकसान नाही, हेही त्याला समजत होतं. ‘बारा-तेरा हजार रुपयेही गेले. व्यवहारात असं वागलं, तर व्यवसाय मूळ कसा धरणार, वाढणार कसा?’

न राहवून तो स्कूटर घेऊन बाहेर पडला. फारसा विचार न करता एक रस्ता धरून तीन-चार किलोमीटर स्कूटर पळवल्यावर रस्त्यालगतच्या एका मोठ्या पिंपळाच्या सावलीत मुकाट्यानं बसून राहिला. आपली परिस्थिती त्याला एखाद्या जवळच्या मित्राला सांगाविशी वाटली. पाठोपाठ आठवलं, ‘या गावात माझा कुणीही जवळचा मित्र नाही. तसा एकूणच नवीन शहा एकटाच मित्र आहे म्हणा! पण त्याला अशा प्रकारच्या सूक्ष्म भावनांचे नातेसंबंध समजत नाहीत. तो ते मानतही नाही. केवळ व्यवहाराशी संबंधित सल्ला आणि सूचना मात्र तो अत्यंत काटेकोरपणे आणि प्रामाणिकपणे देऊ शकतो.’

पाठोपाठ त्यानं ठरवलं, ‘हातून निघून गेलेला व्यवहार आणि तीन हजार रुपयांचं नुकसान या विषयी तिला मात्र चुकूनही सांगता कामा नये.

‘तिच्या कानावर या गोष्टी गेल्या, तर ही जबाबदारी स्वत:कडे घेऊन ती आणखी खचून जाईल.’

आणखीही आठवलं, ‘तिनं दिलेले दोन हजार रुपये पुन्हा घ्यायला ती आपण होऊन तयार झाली आहे. फोनसाठी पैसे भरताना नंजप्पानं आठ हजार कर्जाऊ दिले आणि उरलेले तिचे वापरले. आता काहीतरी करून तिचे पैसे द्यायला हवेत. ते शंभराच्या नोटांच्या स्वरूपातच असले पाहिजेत. त्या नोटाही नव्या हव्यात.’ हे पैसे कसे उभे करावेत याचा विचार करत त्यानं स्कूटर सुरू केली.

त्याच्या घरी फोन आल्यापासून ती त्याच्यावर पराकोटीची अवलंबून राहू लागली होती. रात्री मुलांना झोप लागली की, तिचे कान टवकारले जात. सतत फोनची रिंग वाजली का, याच मन:स्थितीत ती राहत होती. एक मिनिटभरही ती आपल्या बेडरूमच्या बाहेर जायला तयार नसे. दार बंद करून गप्पा मारल्या असत्या, तर कुणालाही ऐकू जायचा प्रश्नच नव्हता. रात्री साडेअकरा ही त्याच्या फोनची वेळ होती. कामावरून घरी गेल्यावर कपडे बदलून निवान्त गप्पा मारण्यासाठी त्याला ही वेळ सोयीची होती. पण त्यातही तिला वाटे, ‘त्या आधी दहाच्या सुमारास दहा-पंधरा मिनिटं बोलून त्यानंतर साडेअकरा वाजता निवान्तपणे का फोन करू नये? पण दहा म्हणजे त्याची हॉटेलमध्ये जेवायची वेळ. त्यानं त्याऐवजी इथंच जेवायला का येऊ

नये? काय बिघडेल तो आला तर? मुलांना तरी का घाबरायचं?' तिला स्वत:ला तसं सुचवायचं धैर्य नव्हतं. पण मनात मात्र येत होतं, 'त्यानं का म्हणू नये, "अमू, रात्री कामं संपल्यावर मी इथंच येईन. इथंच जेवेन. नंतर खूप गप्पा मारू. नाहीतरी आपण जवळचे मित्र आहोत हे मुलांना ठाऊकच आहे. यानंतर त्यांना आणखीही काही समजणार आहेच. आपण कुणाला का घाबरायचं?" त्यालाही हे संबंध जेवढ्यास तेवढे ठेवायचे आहेत म्हणून तो असा वागतो.'

कधीतरी क्वचित बोलताना ती स्वत: फुलत जाई आणि आपल्या संभाषण-चातुर्यानं त्यालाही प्रफुल्लित करे; पण असे प्रसंग अगदी क्वचित असत.

बहुतेक वेळा ती शब्दानं शब्द वाढवत जाई. त्याच्या प्रत्येक शब्दाचा किंवा वाक्याचा कीस काढू लागली की, प्रत्येक शब्द त्याला रक्तबंबाळ करे. मग दुसऱ्या दिवशी आदल्या दिवशीचं आपलं वागणं-बोलणं आठवून ती स्वत: घायाळ होऊन जाई. आपण आपल्या मनाप्रमाणे वागू शकत नाही. आपल्यावर एक वेगळीच अगम्य प्रेरणा नियंत्रण ठेवत असते या निर्णयापर्यंतही ती येऊन पोहोचली होती.

कधीकधी ती त्याच्याविषयीच्या मृदू भावनेनं व्याकूळ होई. 'मी चांगल्या मूडमध्ये असले तर तो मनापासून साथ देतो. मी त्याच्यावर दोषारोप करत राहिले, तर तो ते सगळं हलाहल पचवणाऱ्या शंकराच्या गंभीरतेनं सहन करतो.' या विचारात ती फारच कमी वेळ राहत असे. पाठोपाठ तिच्या मनात येई, 'संतापाचा त्याला पराकोटीचा तिरस्कार वाटतो. म्हणूनच तो प्रतिक्रिया दाखवत नाही.' या विचारानं ती त्याच्यावर अधिकच चिडत होती.

काहीही असलं, तरी त्याच्या घरी फोन आल्यामुळे आपल्यात घडलेला एक बदल तिच्या ज्या दिवशी लक्षात आला त्या दिवशी ती संतापानं तिरमिरली होती. 'जेवण झाल्यावर मी लोचटासारखी त्याच्या फोनची वाट बघत बसते. कितीतरी रात्री शून्य भावनेनं घेरून हातात रिव्हॉल्वर घेऊन बसते. टेकडीवर जाण्यासाठी गाडीच्या चाव्या घेऊन उभी राहते, पण त्या वेळी मनात येतं, फोन आला आणि मी नसले तर? आणि त्यानंतर मी फोनची वाट बघत राहते. माझ्या मरणाच्या स्वातंत्र्यावर यानं फोननं बंधन घातलं आहे. दारुड्यानं दारूचा दासानुदास व्हावं तशी मी या यंत्राची दासी होऊन बसले आहे! मी तरी अशी का होऊन बसले आहे? फोन आला म्हणून काय होईल? रिंग वाजेल, वाजेल आणि नंतर तो मुकाट्यानं रिसीव्हर ठेवून गप्प बसेल.

'नाही. तो रिसीव्हर ठेवून मुकाट्यानं बसणार नाही. रिसीव्हर उचलला नाही त्या अर्थी ही टेकडीवर गेली असेल म्हणत तो स्कूटरवरून भयानक वेगानं इथं येईल. रात्रीच्या गावाबाहेरच्या नि:शब्द वातावरणात फोनची रिंग सतत होत राहिली की, मुलांना जाग येईल आणि मी घरात नाही हे त्यांना समजेल. मग? त्यापेक्षा रिसीव्हर काढून ठेवला, तर शांतता भंग व्हायचा प्रश्नच येणार नाही; पण एवढा वेळ माझा फोन एंगेज्ड असायची शक्यताच नाही. म्हणजे मी रिसीव्हर उचलून ठेवलाय हे त्याला लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. तो तत्काळ निघून येईल. म्हणजे यानं माझ्यावर पाळत ठेवण्यासाठी घरी फोन घेतलाय! माझ्यावर हेरगिरी! रास्कल!'

एक दिवस हीच भावना प्रबल झाल्यावर रात्री सव्वाअकरा वाजता तिनं नंबर फिरवला. तिचा आवाज ऐकून आनंदित झालेला सोमशेखर म्हणाला, "तू फोन केलास? आपण होऊन?

मला किती बरं वाटलं म्हणून सांगू अमू!”

“हे बरं वाटलं वगैरे राहू द्या. मी एक प्रश्न स्पष्ट विचारते. त्याचं खरं उत्तर प्रामाणिकपणे द्याल काय?”

“मी कुणाशीही अप्रामाणिकपणे बोलत नाही. त्यात तुझ्याशी तर अशक्यच आहे. सांग काय ते?”

“म्हणजे तुम्ही प्रामाणिक आणि मी खोटारडी, असं तुम्हाला म्हणायचंय?”

“तूही प्रामाणिक आहेस, हे मला ठाऊक आहे. असं कसं माझ्या मनात येईल?”

“शब्दांचा स्वर्ग उभारण्यात तुम्ही हार मानणारे नाही. ते जाऊ द्या. तुम्ही घरात फोन का घेतलात सांगा.”

“मला माझ्या अमूशी हवं तेव्हा बोलता यावं आणि माझ्या अमूला तिच्या सोमूशी वाटेल तेव्हा गप्पा मारता याव्यात म्हणून.”

“तुम्ही अप्रामाणिक आहात याला याहून दुसऱ्या कुठल्या पुराव्याची गरज आहे? रास्कल, लोफर आहात तुम्ही.” म्हणत तिनं रिसीव्हर ठेवून दिला. तिला आतून रडू येऊ लागलं. स्त्रियांना वश करून घेऊन फसवणं हाच एकमेव स्वभाव असलेल्या नराधमाच्या तावडीत आपण सापडलो असून यातून आपली सुटका होणं अशक्य आहे या असहाय भावनेत ती बुडून गेली होती. ‘या क्षणी रिव्हॉल्वर घेऊन घराबाहेर पडायला पाहिजे.’ रिव्हॉल्वर काढून ठेवून, पायात चपला अडकवून, रिव्हॉल्वर घेऊन ती दारापाशी आली तेव्हा तिला तीव्रपणे आठवलं, ‘त्याच्या घरी फोन आल्यापासून मी अशी रात्री टेकडीवर गेलेच नाही. रात्रीच्या नि:शब्दतेपासून वंचित केलंय मला या रास्कलनं! पण मी का वंचित व्हावं? आज, आत्ता मी तिथं जाईन. एवढंच नव्हे, तोंडात रिव्हॉल्वरची नळी ठेवून ट्रिगर ओढेन. कोण अडवणार आहे मला? एवढी शक्ती आहे कुणामध्ये? कुणाला आहे एवढा अधिकार? मी कुणाचीही दासी नाही.’

ती बाहेरच्या गेटपाशी गेली तेव्हा मनात आलं, ‘मी जोरात फोन ठेवला हे लक्षात येऊन तो पुन:पुन्हा फोन करत असेल. मी मुद्दाम रिसीव्हर उचलून ठेवल्याचं लक्षात आल्यानंतर तो स्वत:च निघून आला तर?’ ही शक्यता लक्षात येताच तिला शरमल्यासारखं वाटलं. पाठोपाठ मनात आलं, ‘शरमून जावं असं मी काय केलंय? घाबरायचं काहीही कारण नाही. टेलिफोन नीट जागेवर ठेवेन. त्यानं फोन केला, तरी त्याच्याशी नीट बोलेन. फोनचा रिसीव्हर शांतपणे जागेवर ठेवेन. म्हणजे त्याला काहीही समजणार नाही. तो इकडं फिरकू नये असा बंदोबस्त केल्याशिवाय मी घराबाहेर पडणार नाही.’

ती पुन्हा सगळी दारं बंद करून आत आली. रिसीव्हर जागेवर ठेवला आणि त्याकडे बघत बसली. दोन-तीन-चार सेकंद गेले, पण घंटा वाजली नाही. त्यानं फोन केला नाही. ‘रागावला असेल? यानंतर हिला कधीही फोन करायचा नाही म्हणून त्यानं निश्चय तर केला नसेल? तर मग... तिला एकाएकी सगळं गमावल्यासारखं वाटू लागलं. छे:! मी राग आवरायला हवा होता.

यानंतर मी असं वागता कामा नये, पण या आधी मी तरी आणखी कुणाशी अशी वागत होते? फक्त याच्याशी... यालाही माझ्या वागण्याचा राग येऊ लागला, तर इतरांमध्ये आणि याच्यामध्ये फरकच काय राहिला?'

तोच फोनची रिंग वाजली. तिनं धडधडत्या हृदयानं रिसीव्हर उचलला.

त्यानं शांत स्वरात, पण अधिकारवाणीनं विचारलं, "किती वेळ रिसीव्हर उचलून ठेवला होतास?"

"माझी मर्जी!" ती उत्तरली.

"मग आता का जागेवर ठेवलास?"

"तीही माझी मर्जी."

"पण मर्जी असायला आणि नसायला काही कारण नको का?"

"तीही माझी मर्जी." म्हणताना तिला आपल्या बोलण्याचं मनापासून हसू आलं. ते त्याला ऐकू गेलं. तो प्रसन्नपणे म्हणाला, "हे मात्र आपल्या मर्जीला उतरलं हं!"

त्यानंतर मात्र तासभर दोघांच्या गप्पा चालल्या होत्या. अशा मन:स्थितीत असताना तिला विषयांची मुळीच कमतरता भासत नव्हती. थट्टा-मस्करी आणि शृंगाराला बहर आला होता.

दुसऱ्या दिवशी तिचं मन अपराधीपणाच्या भावनेनं भरून गेलं. बेंगळुरूहून येऊन महिना-दीड महिना झाला होता. या अवधीतही तो दुपारी अधून-मधून जेवायला येत होता. दोघं भरपूर गप्पा मारत होते. एका अंथरुणावर विश्रांतीही घेत होते; पण दोघंही परस्परांशी विशिष्ट अंतर राखूनच होते. मध्यंतरी घडून गेलेल्या घटनेमुळे तिच्या मनात प्रचंड पापप्रज्ञा खदखदत होती. त्यानं एक-दोनदा सहजच तिच्या हातावर हात ठेवला तेव्हा ती संतापानं पेटून उठली होती. नंतरही त्याची आठवण काढून तिनं त्याला कामुक पशू म्हणून हिणवलं होतं. प्रत्यक्ष बोलताना आणि फोनवरही तिनं त्याच्यावर भ्रूणहत्येचं पाप लादून त्याचा पाणउतारा केला होता. एकदा दुपारी त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बघून तिनं त्यावर एवढे दोषारोप केले होते की, त्याचा चेहरा काळाठिक्कर पडला होता. तिच्या लागट बोलण्यानं त्याच्या डोळ्यांत पाणी उभं राहिलं होतं आणि तो मान वर करायचं विसरूनच गेला होता. ते सगळं क्रमाक्रमानं आठवताना तिला स्वत:च्या क्रूरपणाचा तिरस्कार वाटू लागला. तिचं मन तिला हिणवू लागलं, 'माझ्याऐवजी त्यानं एखाद्या केरवारे करणाऱ्या बाईला ठेवून घेतलं असतं, तर तिनं त्याला माझ्यापेक्षा कितीतरी आनंद दिला असता. तेवढंही द्यायची शक्ती नसलेली मी किती नतद्रष्ट म्हणायची!' तिनं याच विचाराच्या तंद्रीत स्वत:च्या गालफडात मारून घेतलं. कॉलेजमध्ये शिकवतानाही ती त्यातच गुरफटली होती. शिकवणं निकृष्ट दर्जाचं झाल्याचा तिला अनुभव आला. 'छे:! नोकरी करायचीही आपली कुवत नाही.'

कॉलेजमधून घरी येताना तिला जाणवलं, 'आज सकाळपासून आपल्या मनात एक मधुर भावना नकळत जन्मली आहे.' तिला तीव्रपणे वाटू लागलं, 'ही गाडी अशीच त्याच्या

ऑफिसवर घेऊन जावं आणि त्याला घेऊनच घरी जावं.' पण तिनं स्वत:ला आवरलं. घरी आल्यावर तिनं त्याला फोन केला. फोनवर तो भेटला. तिनं त्याला सांगितलं, "आत्ताच्या आत्ता निघून ये. तुझ्याशी खूप खूप छान छान बोलायचंय."

"येतो अर्ध्या तासात."

"पाव तासात का येत नाहीस?" तिनं मनापासून विचारलं.

कुत्र्यांना खायला घालून तिनं घाईघाईनं हात-पाय-तोंड धुतले, चेहऱ्यावरून पावडरचा पफ फिरवला, वेगळी चांगली साडी नेसली, वेणीत बागेतलं एक गुलाबाचं फूलही माळलं. टेबलावर जेवण मांडून ताटल्याही ठेवल्या. रिस्टवॉचमधल्या सेकंदकाट्याची हालचाल पाहत तिनं काही वेळ काढला. त्यानं आत पाऊल ठेवताच त्याला ती म्हणाली, "तब्बल पाच मिनिटं उशीर झाला! शिक्षा काय ठाऊक आहे?"

तिच्या चेहऱ्यावरील भाव, बदललेली साडी, विशिष्ट नजर त्याला वेगळी जाणवली, तरी भावनेचा नेमकेपणा त्याच्या लक्षात आला नाही. लाउंजमध्ये बूट आणि हेल्मेट काढून ठेवताना तो म्हणाला, "काय उन्ह आहे बाहेर!"

कपडे बदलून लुंगी गुंडाळून तो आला तेव्हा ती स्वत: त्याच्या पायावर पाणी ओतायला उभी राहिली. त्याला गंमत वाटली. तीच म्हणाली, "यजमानांचे पाय धुवून पाद्यपूजा केली नाही, तर त्यांना राग नाही का यायचा?"

"गरिबाचा राग आणि दाढंचा अंत!"

त्यानं उत्तर म्हणून म्हण सांगितली. तो अजूनही तिच्या मूडशी एकरूप झाला नव्हता हे बघून ती निराश झाली. आपण थोबाडीत मारल्याचं आठवून हा आपल्याला टोमणा मारतोय असं आठवून तिला त्याचा रागही आला; पण त्याची तीव्रता मर्यादित होती. 'उलट याला माझ्या मूडशी खेचून नाही आणलं, तर मी अमृता नव्हे.' अशाच हट्टानं ती घेरली गेली.

तिनं हट्टानं त्याचे पाय पुसले. नंतर एकाच ताटलीत दोघांचंही अन्न वाढून घेतलं. त्यातला एक घास कालवून त्याच्या तोंडात घालताना ती हसत म्हणाली, "तुला स्वत:च्या हातानं भरवावंसं वाटतंय. पण याचा वेगळा अर्थ नाही हं घ्यायचा."

आता तिचा मूड त्याच्या लक्षात आला. त्याच्या लक्षात आल्याचं तिलाही समजलं. यानंतरची जबाबदारी त्याच्यावर सोपवल्यासारखी ती सलज्ज होऊन त्याची नजर चुकवत बसून राहिली. तिनं अधांतरी सोडलेला स्वर उचलून अंतऱ्याला सुरुवात करणं त्याला पराकोटीचं कठीण गेलं. मध्यंतरी घडलेल्या गर्भपाताला आणि त्या आधीच्या सगळ्या घटनांना तो एकटाच जबाबदार होता, या अर्थाचे तिनं त्याच्यावर अनेकदा स्पष्ट आरोप केले होते. त्यात बेंगळुरूहून परतल्यानंतर तर ती या प्रकाराकडे एखादं नीच कृत्य म्हणूनच पाहत होती. तिनं त्याची अक्षरश: शेकडो वेळा कामुक पशू म्हणून त्याची निर्भर्त्सना केली होती. त्याकडे कसंबसं दुर्लक्ष करून त्यानं तिच्याशी सरळ संबंध ठेवले होते. आता तर हळूहळू तो त्यानं

स्वत:चा स्वभावच बनवून घेतला होता. आता तिच्या या भावनांना प्रतिसाद द्यायचा म्हणजे...

चेहऱ्यावर यातलं काहीही न दाखवू देता त्यानंही तिच्या तोंडात कालवलेला घास घातला. त्याच वातावरणात जेवणं संपली. तो हात धुऊन अंथरुणावर येऊन पडला. स्वयंपाकघरातलं बाकीचं आवरून तीही तिथं आली. त्या वेळेपर्यंत त्याच्या मनात विविध विचार आणि भावभावनांचा कल्लोळ उसळला होता, पण त्यातलं काहीही दाखवून न देण्यासाठी त्याची मनोमन धडपड चालली होती. कुठल्याही प्रकारे मनाला आवर घालता येईल, पण या क्षणी तिच्या भावनांना प्रतिसाद देण्यासाठी आत पराकोटीच्या परिवर्तनाची आवश्यकता होती. 'आता तिला साथ दिली नाही तर ती पुन्हा शून्य भावनेत गुरफटून त्या वेदनेत विव्हल होऊन जाईल. ती वेदना संतापाच्या रूपात माझ्यावरच कोसळेल.'

त्याच्या दृष्टीनं तिच्या संतापाला तोंड देणं ही काही फार मोठी गोष्ट नव्हती. त्याला त्याची सवयही झाली होती; पण त्यामुळे होणारा मनस्तापही कमी नव्हता. 'कोण सुखासुखी त्या मनस्तापाला निमंत्रण देईल? हेही जाऊ दे; पण ती शून्यभावनेत घेरली जाऊन ज्या वेदनांमध्ये तळमळत राहते ते पाहणं मात्र अशक्य आहे. आता तिला साथ देण्यात मी अयशस्वी झालो, तर ती यालाच तिरस्कार समजेल. त्यामुळे कितीही कठोर असलं, तरी आता या क्षणी तिला प्रतिसाद देणं अत्यावश्यक आहे.

'एखादा आघात सहन करणं सोपं आहे; पण अशा तऱ्हेनं स्वत:च्या मनाविरुद्ध क्रियात्मक प्रतिस्पंदन कठीण आहे.' हेही जाणवत असल्यामुळे त्याच्या मनावरचं दडपण वाढत होतं.

आत आल्या आल्या तिनं तिथल्या आरामखुर्चीवर अंग टाकलं. उठून बसून त्यानं तिच्याकडे हात पुढं केला. प्रतिसाद देत तो हात हातात घेण्याऐवजी ती निरुत्साहानं खाली मान घालून बसून राहिली. त्यानं तिला बळेच जवळ ओढून घेतलं तेव्हा मान वर करून ती म्हणाली, "तुझ्या मनात नसेल तर नको."

"असं का म्हणतेस?" तो दुखावला गेला.

"मला समजतंय सोमू! या बाबतीत मी तुला किती दुखवलंय, कशी वागलेय हे मला ठाऊक नाही काय? खरं सांग सोमू, तू ते सगळं विसरलास?"

"छे! आता तो विषय कशाला हवा?" तिची नजर चुकवत हलकेच गालावर चापटी मारत तो म्हणाला.

त्याला छातीशी घट्ट धरत ती उद्गारली, "सोमू, माझा सोमू!" तिच्या डोळ्यांतल्या पाण्यानं त्याचे केस भिजू लागले. त्यानं मान वर करून पाहिलं. ती रडत होती. त्याच्या अंतर्यामी कुठंतरी दडलेला सूक्ष्म कडवटपणा त्या पाण्यानं धुऊन गेला होता. तिच्यावरचं पराकोटीचं प्रेम उफाळून आलं. अक्षरही न बोलता दोघंही एकमेकांच्या सान्निध्यात पूर्णपणे विरघळून गेले. या आधी कधी घडलं नाही आणि यानंतर घडणार नाही अशा अनन्य भावनेनं एकमेकांत मिसळून जाताना त्यांना बाह्यजगाचा पूर्णपणे विसर पडला होता.

तृप्तीच्या अपार शांततेत डुंबत असतानाच तो म्हणाला, “कुणीतरी आलंय वाटतं. बराच वेळ झाला. कुत्री भुंकताहेत.”

“म्हणजे तुझं मन बाहेरच भटकत होतं वाटतं.” तिनं आपली तन्मयता श्रेष्ठ प्रतीची होती हे दाखवत त्याला डिवचलं.

एवढ्यात पुन्हा बाहेरून कुत्री भुंकल्याचा आवाज आला. तिनंही तो ऐकला. पण ती म्हणाली, “ही कुत्री तिखट कानांची आहेत! वाऱ्यानं जमिनीवरचं पान हललं, तरी भुंकत राहतात. काहीतरी निमित्त काढून लांब जाऊ नकोस. एक सेंटिमीटर लांब गेलास, तर मी मारेन बघ.” तिची त्या प्रशांत तृप्ततेतून बाहेर पडायची मुळीच इच्छा नव्हती.

एवढ्यात पुन्हा कुत्र्यांचा आवाज. आधी विश्वासाचा. पाठोपाठ विक्रांतचा. ती उठून बसली. ‘कोण असेल या वेळी?’ महादेवम्माचा नवरा पैसे मागायला...’ “तू इथंच थांब. आले मी.” म्हणत म्हणत गाऊन चढवत सपाता घालून ती बेडरूमबाहेर आली. बेडरूमचा दरवाजा बंद करून तिनं व्हरांड्यातून बाहेर येऊन लाउंजमध्ये येऊन बाहेरचा दरवाजा उघडला.

दारात काकू उभी होती. बऱ्याच वेळापासून उभी असावी अशी उभी होती. शेजारी जमिनीवर सूटकेस आणि एक पिशवी ठेवली होती. चेहरा शांत असला, तरी ‘मला सगळं समजलं आहे.’ हे स्पष्टपणे सांगत होती.

अमृताचा चेहरा काळा ठिक्कर पडला. घशात आवंढा अडकल्यासारखा होऊन काही क्षण तिच्या तोंडून शब्दच फुटेना. स्वत:ला कसंबसं सावरत तिनं विचारलं, “केव्हा आलीस काकू? बेल का वाजवली नाहीस?”

“तू घरात आहेस की कॉलेजला गेलीस याचा विचार करत होते. काय करायचं? काय करणार म्हणा? गावाबाहेरचं घर. तू येईपर्यंत बसून वाट पाहायची असं ठरवत होते. एवढ्यात तू दार उघडलंस.” म्हणत तिनं सूटकेस आणि पिशवी उचलली.

“काही नाही. झोपले होते घटकाभर. आलेच हं कपडे बदलून. तू बैस.” म्हणत तिला व्हरांड्यातच बसवून ती बेडरूममध्ये आली. दार बंद करून कपडे करताना त्याला हलकेच म्हणाली, “काकू आलीये. बराच वेळ झालाय येऊन तिला. तिनं कंपाउंडमधली तुझी स्कूटर पाहिली असणार. हलकट बाई आहे ती! आता अवाक्षरही उच्चारणार नाही. तू लगेच कपडे कर. तुझे बूट इथंच आणून देते. तिला न्हाणीघरात पाठवून तुला खूण करेन, तेव्हा हळूच बाहेर पड. स्कूटर मेनरोडपर्यंत ओढून नेऊन नंतर सुरू कर. आणि हे बघ, रात्री फोन करू नकोस. मीच फोन करेन.”

केस विंचरून ती बेडरूमचं दार लावून बाहेर येऊन म्हणाली, “केव्हा निघालीस गावाकडनं? बसनं आलीस? छे! काय उन्ह आहे! चेहरा बघ कसा लालबुंद झालाय. चल, आधी न्हाणीघरात जाऊन थंड पाण्यानं हात-पाय धुवून घे.”

खरं म्हणजे काकूचा चेहरा प्रवासातून आल्यामुळे मुळीच थकल्यासारखा दिसत नव्हता.

तरी ती अमृतानं म्हटल्याप्रमाणे न्हाणीघरात शिरली. अमृता घाईनं बूट घेऊन बेडरूममध्ये गेली. काकूनं न्हाणीघरात बराच वेळ काढला. त्या प्रत्येक क्षणाबरोबर अमृताला जाणवत होतं, 'तिला सगळं समजलंय. ती मुद्दामच वेळ काढतेय.' पुन्हा कुत्र्यांच्या भुंकण्याचा आणि रस्त्यावर स्कूटर सुरू झाल्याचा आवाज आला तरी काकू बाहेर आली नाही.

अमृता पुन्हा आपल्या बेडरूममध्ये धावली. पलंगावरचं बेडशीट बदलून त्यावर धोब्याकडून आलेलं नवं बेडशीट अंथरून ती पुन्हा खोलीबाहेर आली. त्याच वेळी काकूही उगाच कडीचा आणि दाराचा मोठ्यानं आवाज करत बाहेर आली. तिथंच पायपुसण्यावर पाय पुसत घरभर सगळ्यांना ऐकू जावं अशा आवाजात म्हणाली, "काय उकाडा म्हणून सांगू? त्यात सकलेशपूरच्या बसमध्ये तर अशी खच्चून माणसं भरली होती! मला खिडकीकडेची जागा मिळाली म्हणून म्हणावा तेवढा त्रास झाला नाही बघ!"

'रतीक्रिडेत मग्न झालेला चेहरा न ओळखण्याइतकी ही बया अनभिज्ञ नाही.' चेहऱ्यावरून काहीही न दाखवता "चल, जेवायला वाढते." म्हणत अमृता स्वयंपाकघराकडे वळली. डोक्यातले विचार मात्र सुरूच होते. 'आता ही बया का आली असावी याचा तिला काही केल्या अंदाज येत नव्हता. इस्टेटीची कागदपत्रं सुपूर्द केल्यानंतर दोघीही परस्परांना भेटल्या नव्हत्या. पत्रानंही एकमेकींची खुशाली विचारली नव्हती. बहुतेक भावाचा संसार सावरण्यासाठी वकिली करायला आली असेल ही!"

"मुळीच भूक नाही गं. घासभर दहीभात आणि भांडंभर सार तेवढं दे."

अमृता तिच्याकडे लक्ष देऊन पाहत होती. तीच शहाणपणाच्या मुशीतून काढलेली आकृती! एकही केस पांढरा दिसणार नाही अशा प्रकारे कलप लावलेले काळेभोर चकचकीत केस, रुंद काठाची रेशमी साडी, गळ्यात मोठाल्या सोन्याच्या मण्यांचा बोटभर जाडीचा सोन्याचा सर, कानात हिऱ्याच्या कुड्या, नाकातला मोठा हिरा, प्रत्येक हातात सोन्याच्या सहा-सहा बांगड्या!

जेवताना ती म्हणाली, "तुझ्या धाकट्या भावाचं लग्न करून जबाबदारीतून मोकळं व्हायचं म्हणतेय मी; पण तो म्हणाला, "अम्मा, तुला नाही माझ्यासाठी चांगली मुलगी शोधायला जमणार. एखादी गावंढळ मुलगी माझ्या गळ्यात मारशील. अमृताक्का जी मुलगी पसंत करेल, तिच्याशीच मी लग्न करेन. नाहीतर लग्नच करणार नाही." सात-आठ चांगल्या घरच्या मुली आल्या आहेत. आता तू."

नेहमीचंच शब्दांचं जाळं! तरीही अमृतानं चेहरा प्रयत्नपूर्वक प्रसन्न ठेवला. जेवण झाल्यावर तिनं काकूला तिच्या सामानासह गेस्टरूममध्ये नेत म्हटलं, "प्रवासानं थकली असशील. थोडी विश्रांती घे." अमृतानं मनोमन काकूशी फार मोकळेपणानं वागायचं नाही, असं ठरवून ठेवलं होतं. 'हिला सगळं समजलंय. व्हरांड्यातले बूट आणि सोफ्यावरचे हेल्मेट तिला दिसलं नसेल काय? ही आता तोंड उघडून बोलणार नाही. योग्य संधीची वाट बघत राहील. संधी बघून हेच एखाद्या शस्त्रासारखं वापरेल.' या विचारात गढलेल्या अमृताला आपल्या बेडरूममध्ये झोप लागणं शक्यच नव्हतं.

पाच वाजता ती साडी बदलून बाहेर आली. काकू कंपाउंडमध्ये झाडं बघत होती. आता

कुत्रीही तिच्यावर भुंकत नव्हती. तिला अमृतानं सांगितलं, “मुलांना घेऊन येते.”

“आत्ता शाळा सुटते त्यांची?”

“शाळा दोन वाजता सुटते; पण माझंही काही नक्की नसतं. क्लासेसच्या वेळा वेगवेगळ्या असतात. तोवर त्यांच्या शिक्षिकेच्या घरी असतात मुलं.” म्हणत तिनं कार सुरू केली. तिचं मन विचारात गढून गेलं होतं. ‘मुलांना हिच्या ताब्यात सोडता कामा नये. सत्राशेसाठ मायेचे खेळ दाखवून ती त्यांच्या मनाचा सहज ताबा घेईल. त्यांनाच बोलतं करून घरातली बारीकसारीक माहिती मिळवेल. मुलं बापाच्या कच्छपि लागतील असं ती करेल. सरळ आरोप करावा असं तिच्या वागण्यात काहीही मिळालं नाही, तर ती माझं आणि माझ्या मुलांचं विश्व उधळून निघून जाईल.

‘आता मी काय करू? तिला सरळ निघून जा म्हणून सांगायचं? पण ते जमणार नाही. मुलांना ही असेपर्यंत कुठंतरी पाठवलं तर? पण कुठं पाठवायचं? बेंगळुरूला कॉलेजचं, परीक्षेचं काम आहे म्हणून सांगितलं, तर तीच ‘मी मुलांबरोबर राहते. तू एकटी जाऊन ये’ म्हणून सांगेल.’ काय करावं याचा निर्णय ठरण्याआधीच सुशीलम्मांचं घर आलं. मुलांना घेऊन गाडी घराकडे जात असताना विकासनं उत्सुकतेनं विचारलं, “आजी आपल्या घरी नाही आली?”

“कुठली आजी?”

“कुठली म्हणजे काय? आपली आजी.” एवढं कसं समजत नाही, असं विचारल्यासारखं त्यानं विचारलं.

आता ती चकित झाली. तरी आपलं आश्चर्य दाखवू न देता तिनं स्वत:ला सावरत विचारलं, “तुला काय ठाऊक?”

“राजी म्हणाली, तुमची आजी आमच्या घरी आलीये. तुमच्या घरी नाही आली?”

ही राजी म्हणजे सुशीलम्मांच्या घरापासून पाचव्या घरात राहणाऱ्या राजाराम आणि चंद्रकलेची मुलगी. विकासच्या वयाची. त्याच्याच वर्गात शिकणारी. चंद्रकला आणि लीला एका वर्गातल्या. चंद्रकलाही सकलेशपूरच्या जवळच्या खेड्यातली. सगळंकाही अमृताच्या मनात लख्खकन उमगलं. तिनं सावकाश गाडी चालवत विकासला विचारलं, “केव्हा आली म्हणे आजी?”

“राजीनं आज शाळेत सांगितलं, म्हणून मीपण त्यांच्या घरी गेलो, तर आजीच नव्हती तिथं. उलट राजीची आई म्हणाली, “तुझी आजी आमच्या घरी कशाला येईल? आली तर तुमच्या घरी येईल. राजीच खोटं बोलतेय.” म्हणत तिनं राजीला मारलं. राजी किती रडत होती. मी खोटं बोलत नाही म्हणून.”

“आजी केव्हा आली होती राजीच्या घरी?”

“मला नाही ठाऊक.”

‘काकू आली तेव्हा तिचा चेहरा बस-प्रवासानं थकल्यासारखा मुळीच नव्हता. म्हणजे ती कालच गावात आली असणार.’ विजय काहीही न बोलता बसून होता. ‘हा काही विकाससारखं मोकळेपणानं बोलणार नाही. तिनं त्यांच्याकडे एकदा पाहिलं. नाही. याचा सोक्षमोक्ष लावल्याशिवाय राहणं धोक्याचं आहे. मी सोडणार नाही.’

तोच विकास आपण होऊन म्हणाला, “आजीनं कडबोळी, रव्याचे लाडू आणि चकली आणली होती म्हणे. फार छान झाली होती म्हणून सांगत होती राजी.”

हा आणखी एक पुरावा आहे. काकूनं खाऊ आणल्याचं तिलाही ठाऊक होतं, पण अजून तिनं तो बाहेर काढला नव्हता. तो खाऊ तिनं माझ्याकडे दिला आणि मी तो ‘आजीनं आणलाय’ म्हणून सांगितलं, तरी ते केवळ बुद्धीच्या पातळीवर समजतं. त्याऐवजी दोघांनाही मंडीवर बसवून घेऊन आपल्या पिशवीतला खाऊ त्यांच्यासमोर काढून त्यांच्या तोंडात भरवून त्यांचा पापा घ्यायचा अशी तिची पद्धत होती.

घरी आल्यावर तसंच घडलं. गाडी थांबताच दोघांनाही मिठीत घेऊन “किती दिवसांनी दिसली माझी लेकरं!” म्हणत त्यांना गोंजारत तिनं स्वत: त्या दोघांचेही हात-पाय धुतले आणि दोघांनाही आपल्या मांडीवर बसवून घेऊन पिशवीतल्या लाडू, चकली, कडबोळ्यांबरोबर नारळीपाकही भरवला. लांब राहून पाहत असलेल्या अमृताला ती आपल्या बोलण्या-वागण्यातून “ही माझ्या भावाची मुलं आहेत, तुझ्याकडून नातं जोडायची काही गरज नाहा.” हेच स्पष्टपणे दाखवून देत होती.

त्यानंतर काकूनं मुलांना क्षणभरही दूर केलं नाही. रात्री जेवण झाल्यावरही ती मुलांच्या खोलीत शिरली. त्यांच्या दोन्ही कॉट्स एकमेकाला जोडून ती मध्ये झोपली आणि मुलं दोन्ही बाजूला. सगळं आवरून आत आलेल्या अमृतानं हे पाहिलं आणि ती म्हणाली, “काकू, मुलांना साडेनऊला झोपवायला पाहिजे. तुलाही रात्री न्हाणीघरात जावं लागतं. तू त्याच खोलीत झोप. चल.”

“अं... मी आजीकडे झोपणार...” विजयनं सांगितलं. पाठोपाठ विकासनंही सूर काढला, “मला आजी पायजे.”

यावर काकूही म्हणाली, “असू दे गं. मीही इथंच झोपते यांच्याबरोबर. किती केलं तरी एकीकडे लेकीची मुलं आणि तिकडं पाहिलं, तर भावाची मुलं. रक्त दोन्हीकडून ओढतंय बघ!” तू काहीही केलंस, तरी माझा त्यांच्यावर हक्क आहे असं सुचवत ती म्हणाली.

अंथरुणावर पडलेली अमृता विचारात चूर होऊन गेली होती. ‘काय कमी केलंय मी मुलांना? त्यांचं खाणं-पिणं, जेवणं, अभ्यास, खेळ, कपडा-लत्ता, त्यांना कंटाळा आला तर फिरवून आणते. परवडत नसतानाही कपडे-खेळणी कशाचीही कमतरता भासू देत नाही. तरीही मुलं अशी का वागतात? मी कितीही केलं तरी त्यांचं रक्त खरोखरच तिकडं ओढ घेतंय काय?

‘आपलं जीवन म्हणजे केवळ प्रचंड हार नाहीतर काय आहे? कधीही मला साफल्य म्हणून मिळणारच नाही काय? या मुलांचं तरी काय? मोठी झाल्यावर त्यांच्या जीवनातली माझी गरज

संपेल. नंतर ते माझा पराकोटीचा धिक्कार करणार आहेत. नंतर तिच्याकडेच जाणार आहेत. आताच नाही का तिच्या कुशीत जाऊन झोपले दोघंही? मी जिवंत असले काय किंवा मेले काय! त्यांना काहीही होणार नाही.'

तिनं रिव्हॉल्वर बाहेर काढलं. 'आज बाहेर जायला नको. इथंच... मग तिला पोलिसांना तोंड द्यावं लागेल. छान होईल!' तिनं दाराकडे पाहिलं. 'बोल्ट घातलेला नाही. हेच योग्य आहे. तिचाच संशय येईल.' या विचाराच्या प्रेमात पडून ती कितीतरी वेळ रिव्हॉल्वर हातात घेऊन बसली. अचानक तिची दृष्टी भिंतीवरच्या घड्याळावर गेली. 'अकरा तीस. सोमूच्या फोनची वेळ! पण तो फोन करणार नाही. मी त्याला तसं सांगितलंय ना! मी फोन केला तर? तो वाट बघत असेल. नको. मुलांना कुशीत घेऊन ती झोपली असली, तरी कानात प्राण आणून ती माझ्या हालचालींवर, वागण्या-बोलण्यावर लक्ष ठेवून असेल. काहीही करणं शक्य नाही.' शून्याच्या त्या टोकापर्यंतही जाणं अशक्य होऊन ती रात्रभर हातात भरलेलं रिव्हॉल्वर घेऊन बसून राहिली. रात्रभर तशीच तळमळत राहिली. पहाटे केव्हातरी उठून तिनं रिव्हॉल्वर जागेवर ठेवलं आणि अंथरुणावर येऊन पडली.

तिला सकाळी जाग आली तेव्हा आठ वाजले होते. पुट्टम्मा आणि महादेवम्मा येऊन कामाला लागल्या होत्या. त्यांची काकूशी बऱ्यापैकी सलगी वाढली होती. एव्हाना काकूनं दोन्ही मुलांना अंघोळ घालून नवे कपडे घातले होते. विजय आपल्या मापाची नवी शर्ट-चड्डी घालून रुबाबात उभा होता. विकास नाचत नाचत तिच्याकडे येऊन म्हणाला, "अम्मा, बघ किती मस्त आहे! अप्पांनी पाठवल्यात आमच्यासाठी तीन-तीन शर्ट-चड्ड्या! बूट सैल होतात; पण आणखी दोन महिन्यांनी बरोबर होणार आहेत ते."

एवढ्या अवधीत मुलांच्या मनातली वडलांची आठवण जागी करून तिला भरपूर खतपाणी घातल्याचं जाणवलं. ती घड्याळाकडे पाहत असतानाच विजय म्हणाला, "अम्मा, आज एक दिवस शाळेत नाही जाणार, तू शाळेला फोन कर. तू कॉलेजला जा. आम्ही घरात आजीबरोबर राहू."

"हे नाही चालणार. शाळा नाही चुकवायची." तिच्या नकळत तिचा आवाज कर्कश्श झाल्याचं आणि पाठोपाठ विजयच्या चेहऱ्यावर तिरस्कार उमटल्याचं तिला तीव्रपणे जाणवत असतानाच विकासही थयथय नाचत म्हणाला, "अम्मा, आज शाळा नको."

आजी घरी येऊन मायेमध्ये बुडवून काढताना आपण शिस्तीचा बडगा उगारला, तर मुलं कायमची दुरावतील आणि अधिकच तिच्या कह्यात जातील हे जाणवून तिनं माघार घेतली, "बरं. नका जाऊ."

फोन करण्यासाठी बेडरूममध्ये जातानाही ती विचारमग्न होती. 'या बयेला केवळ मुलंच नव्हे, कामाच्या बायकंबरोबर ठेवून जाणंही अत्यंत धोक्याचं आहे. त्यांच्याशी गप्पा मारत, कॉफी पाजत ही त्यांच्याकडूनही तपशील मिळवायचा प्रयत्न करणार यात शंका नाही; पण एका दिवसाचीही रजा शिल्लक नाही.' दीड महिन्यांपूर्वी रजेवरून कॉलेजमध्ये प्रिन्सिपॉलबाईंबरोबर घडलेलं रामायण तिला आठवलं. मुलांना काहीतरी लालूच दाखवून आपल्याबरोबर घेऊन जाऊन गाडीत बसवून लेक्चर्स संपवून येणं हा एक मार्ग होता; पण

मुलांनी ऐकलं नसतं. त्यांना जबरदस्तीनं नेलं असतं, तरी या बयेला नोकरांबरोबर एवढा वेळ सोडण्यातही काही अर्थ नव्हता. संतापानं खदखदत असताना तिला रिव्हॉल्वर झाडून ठार करावं असं मनात येत असतानाच तिची बोटं नंबर फिरवू लागली. पलीकडून प्रिन्सिपॉलबाईंचा आवाज आला, "हॅलो."

"मी डॉक्टर अमृता बोलतेय. एक अत्यावश्यक काम आलं आहे. मला आज बिनपगारी रजा हवी आहे."

"डॉक्टर अमृता! तुमच्यासारख्यांना नोकरीची आवश्यकता नाही हे ठाऊक आहे. नोकरी नाही म्हणून जगणं अशक्य झालेली अशी पावलोपावली रजा मागत नाहीत. त्यापेक्षा तुम्ही स्वाभिमानानं राजीनामा का भिरकावत नाही?"

"ऑलराइट! राजीनामा लिहून ठेवते. प्यूनला पाठवून द्या."

"तुमचा राजीनामा आणण्यासाठी तुमच्या दारात पाठवायला इथं कॉलेजनं नोकर ठेवलेले नाहीत. पोस्टाच्या पेटीत टाकून द्या. येईल आपोआप."

"ठीकाय. थँक्स!" म्हणत तिनं रिसीव्हर आदळला आणि लगोलग आपल्या लेटरहेडवर राजीनाम्याच्या दोन ओळी खरडून पाकिटात घातला आणि महादेवम्माला हातातली सगळी कामं सोडून पाकीट पोस्टाच्या पेटीत टाकायला लावून नंतर ती स्वस्थ बसली.

तो संपूर्ण दिवस ती अत्यंत जागरूक होती. काकू आणि मुलं एकत्र राहतील असा एकही क्षण येऊ न देण्याची ती खबरदारी बाळगत होती. एकदा काकूनं विचारलं, "का गं? आज कॉलेज नाही? तू जाऊन ये. मी घरचं सगळं बघून घेईन."

"असं कसं? तू कधी नव्हे ती आलीस. तेही एक-दोन दिवसांसाठी. तुला काही इस्टेट सोडून फार दिवस करमणार नाही. मुख्य म्हणजे काही महत्त्वाचं काम असल्याशिवाय तू बाहेरही पडणाऱ्यांपैकी नव्हे! कॉलेजला रजा घेतलीय मी."

काकूला मथितार्थ समजला. तरी तीही अमृताचं बोलणंच पुढं नेत म्हणाली, "अगदी खरंय बाई तुझं! तुझी भावजय, जयरामची बायको. प्रत्येक कामासाठी मी तिला हवीच. स्वत:चं डोकं म्हणून चालवत नाही. लहान-सहान कामंही तशीच ठेवून देते मी नसेल तर. तिला सांगून आलेय उद्या संध्याकाळपर्यंत येईन म्हणून."

"खरंतर मी तुला गाडीनंच पोहोचवून आले असते; पण हे कॉलेज आहे ना! सकाळी आठ वाजता इथून थेट सकलेशपूरची बस आहे. ती सोयीची आहे. नाहीतर पुन्हा इथून हासनला जायचं, तिथं उन्हात वाट पाहत बसायचं, नंतर सकलेशपूरची बस धरायची. त्यात हासनला बसमध्ये अशी माणसं कोंबतात म्हणून सांगू! त्या गर्दीत हाडं धड राहणंही कठीण! चल, स्वयंपाकघरातच बैस. चल, तुला भरलेली वांगी आवडतात ना? आज करेन. काही गोड-धोड करायचं म्हटलं, तरी तू राहायला तयार नाहीस." म्हणत तिला स्वयंपाकघरात घेऊन जाऊन फ्रीजमधली वांगी ती बाहेर काढू लागली.

खेळून आलेली मुलं “आजी, थांब ना आणखी थोडे दिवस.” म्हणून मागं लागली होती. तीही तेवढ्या मायेनं म्हणाली, “आता वेळ नाही रे लेकरांनो! सुट्टी पडली की, जयराममामाला पाठवून देते हं तुम्हाला घेऊन यायला. किती गोड गोड आहात रे! मधाचे बुधलेच माझे!” म्हणत तिनं त्यांच्या गालाचे पापे घेतले.

रात्री मुलांना झोप लागल्यावर ती काहीतरी बोलणार होती, हे ठाऊक असलं तरी ते दाखवून न देता तिनं मुलांना झोपवलं. नंतर काकूला “लवकर झोप आता. उद्या सकाळी लवकर उठून निघायला पाहिजे. रस्त्याला खायला थोडा सांजा करून देईन.” एवढं सांगून ती आपल्या बेडरूममध्ये निघून गेली.

तिचा अंदाज खोटा ठरला नाही. पाच-दहा मिनिटांतच काकूनं तिच्या बेडरूमचा दरवाजा वाजवला. अमृतानं दार उघडून दारात आडवं राहूनच विचारलं, “का गं? झोप नाही आली? मुलांबरोबर झोपलं की लाथा मारून मच्छरदाणी विस्कटतात. चल, मी तुला मच्छरदाणी नीट लावून देते.”

“तसं नव्हे, तुझ्याबरोबर मोकळेपणानं बोलणंच झालं नाही. मुलांपुढे बोलावं की बोलू नये याच विचारात होते.” काकूनं सूतोवाच केलं.

“काय बोलायचं होतं? बोल. त्यात संकोच कसला? चल, तिथं बसून गप्पा मारू या.” म्हणत अमृतानं आपल्या खोलीचा दरवाजा बंद केला आणि मुलांच्या खोलीचा दरवाजाही बंद करून लाउंजमध्ये येऊन बसली.

सुरुवात कशी करायची याचा निश्चय न झाल्यानं गोंधळलेली काकू बोलू लागली. काहीतरी सुरुवात करायची म्हणून, “गावाबाहेर एवढं मोठं घर आणि एवढालं कंपाउंड आहे. एकटी कशी राहतेस कोण जाणे!”

“का?”

“इस्टेटवर राहायची गोष्ट वेगळी आणि इथली गोष्ट वेगळी.”

“दोन कुत्री आहेत. पाल किंवा सरडा कंपाउंडमध्ये शिरला, तरी भुंकून सावध करतात. पलंगाशेजारी भरलेलं रिव्हॉल्वर असतं. मी नेमबाजीचं शास्त्रशुद्ध शिक्षण घेतलं आहे. अनोळखी माणसंना राखणदार म्हणून घरात घेण्याच्या मी अगदी विरुद्ध आहे.” यानंतर या विषयावर चर्चा करायची आवश्यकता नाही असं स्पष्टपणे दाखवून देत ती म्हणाली.

काकूला आणखी अवघडल्यासारखं झालं, पण एवढ्या सहजासहजी हार मानणाऱ्यांपैकी ती नव्हती. काही क्षण तसेच गेले. नंतर ती उठून अमृताच्या शेजारी बसून तिच्या पाठीवरून हात फिरवत, कुरवाळत म्हणाली, “बाळ, स्पष्टच सांगते. तुझ्या आईच्या जागी आहे म्हणून मी सांगते. तुला तरी माझ्याशिवाय आणखी कोण आहे? कोण सांगणार तुला? तुझे वडील जिवंत असते, तर माझ्यावर ही जबाबदारी राहिली नसती. तुझी इस्टेट घशात घालण्यासाठी मी तुला माझ्या भावाला दिली, म्हणून तुझा माझ्यावर राग आहे. माझ्या मनात त्या वेळी काय होतं हे

त्या भगवंताला ठाऊक आहे. आमच्या दुर्दैवानं तेच खरं झालंय आता!"

अमृता काहीही न बोलता तिचं बोलणं ऐकत होती.

"लीलाच्या संसाराची कथा समजली की नाही तुला? तिचा नवरा क्लबमध्ये जातो. दररोज पितो म्हणे! त्याच्या दुकानात काम करणाऱ्या एका पोरीबरोबर फिरतो म्हणे! लीला रडत घरी आली होती, पण आम्ही तरी काय करणार म्हणून सांगणार? हिलाच सांगितलं, "तुझं नशीब तुझ्याबरोबर. तू तुझी जागा सोडून इथं येऊ नकोस. तुझं स्थान त्याच घरात आहे. चार-सहा वर्षं कष्टात काढलीस, मुलं मोठी झाली म्हणजे सगळं ठीक होईल." गेली बिचारी. तुझे काका "मी सांगून येतो. दोन ठेवून देतो." म्हणून आरडाओरडा करत होते. त्यांना हात जोडून आवरेपर्यंत पुरेवाट झाली होती. काहीतरी करायला जाऊन त्यांनी मुलगीच टाकून दिली तर काय करायचं? खरं की नाही?" म्हणत तिनं अमृताकडे लक्ष देऊन पाहिलं.

अमृताच्या मनात लीलाविषयी सहानुभूती निर्माण झाली. काकूच्या बोलण्याची दिशा तिच्या लक्षात आली नाही. काकूनं पदरानं डोळे टिपले. खरोखरच डोळ्यात पाणी आलं होतं. अमृताही तशीच बसून होती.

काकूच पुढं म्हणाली, "जयराम तर मलाच दोष द्यायला लागला. म्हणाला, "तुझंच चुकलं. तिला रंगण्णाला दिली असतीस, तर तो तसा वागला नसता. वागला असता, तरी त्याला चार शब्द सांगता आले असते. अमृता धीराची आहे. तिनं अशा परिस्थितीतून मार्ग काढला असता." पण मी त्याला म्हटलं, "तसं नव्हे. अशा नवऱ्याबरोबर काहीही करता येणार नाही. फार तर सोडून देणं एवढंच हातात राहतं. पण आमच्या घरच्या मुली कुठल्याही परिस्थितीत नवऱ्याला सोडणार नाहीत! जग काय म्हणेल असं वागलं तर? मरताना तिला माझ्या ओटीत घातलंय अक्कानं. स्वत:च्या लेकीचा उधळलेला संसार बघून दु:खी होणं फारसं कठीण नाही. फारशी मोठी गोष्टही नाही. सगळेच ते करतात. माझ्या अमृताला असलं काही भोगावं लागू नये म्हणून तिचं रंगण्णाशी लग्न लावून दिलंय मी! तू माझ्या पोटचा मुलगा. तू तरी तुझ्या आईचं मोठ मन समजून घे." तेव्हा कुठं गप्प बसला तो! त्याचाही तुझ्यावर जीव आहे गं; पण तू धीराची आहेस म्हणून तो तसंच म्हणाला."

एव्हाना अमृताला काकूच्या बोलण्याचा रोख स्पष्टपणे समजला होता. तोच तिच्या पाठीवरून फिरणारा, गोंजारणारा हात! तेच रडून लालभडक झालेले डोळे.

काकू पुन्हा बोलू लागली, "तुझ्या संपत्तीसाठी मी तुझं माझ्या भावाशी लग्न लावून दिलं म्हणून तुझा माझ्यावर राग आहे, पण त्याला कशाला हवी तुझी इस्टेट? जे आहे ते तुझं आणि तुझ्या मुलांचंच आहे. नव्या कॅनॉलवरच्या कामावर आहे तो. गेल्या एका वर्षात पाच लाखांपेक्षा जास्त पैसा मिळवलाय त्यानं! गावाकडे आला होता. म्हणाला, "बघ अक्का, हे एवढं मिळवलंय माझ्या हिमतीवर मी. तुझ्या लेकीला काय हवं ते विचारून ये. हिऱ्यांचा हार? मोत्या-माणकांच्या बांगड्या की सोन्याचा बाजूबंद? आणखी दोन वर्षं कॅनॉलवरच आहे. नंतर कुठं बदली झाली, तरी याच्या निम्मंतरी नक्की मिळवेन. तेवढी माझी धमक निश्चित आहे; पण तुझी लेक माझ्यावर सतत आग पाखडते. मी अशी काय चूक केली होती म्हणून तू तिचं माझ्याशी लग्न लावून दिलंस? एवढं मिळवूनही मी का असं फकिरासारखं एकटं राहायचं? मी

काय सिगारेट ओढतो? व्हिस्की पितो? कसलं व्यसन आहे मला? माझ्या मुलांनाही तिनं का तोडावं माझ्यापासून?" घळाघळा रडला बघ मुलांच्या आठवणीनं. लहानपणी त्याचीही आई गेली. त्याचीही मी आई झाले; तुझीही आई झाले. दोघांनी प्रेमानं एकत्र राहायला काय हरकत आहे? लीलाचा संसार बघून टिपं गाळणं तर नशिबात ठेवलं आहेच." म्हणत काकू काही वेळ कळवळून रडत राहिली.

अमृता कासावीस झाली होती.

काकूनं पदरानं डोळे पुसले. काही क्षण तिची प्रतिक्रिया आजमावल्यानंतर तिच्या दृष्टीत दृष्टी रोखून म्हणाली, "तो तिथं; तू इथं. तुझी कॉलेजमधली नोकरी आहे. ती सोडायची तुझी इच्छा नाही ना? नको सोडू. त्याच्या वरपर्यंत ओळखी आहेत म्हणून सांगत होता. त्याला हवी तिथं बदली करून घेता येईल म्हणे. अगदी मैसूर मिळणार नाही, पण नंजनगूड, श्रीरंगपट्टण, के. आर. नगर, मंडय. गाडीनं तासाभराच्या अंतरावर बदली करून घेता येईल. इथं तू एकटी गावाबाहेर राहणं तरी चंगलं आहे काय? लोक तर हवं ते बोलतात. घराची दुरुस्ती करणारा कुणी आर्किटेक्ट घरी येतो. नवराच इंजिनियर असताना दररोज आर्किटेक्ट कशाला घरी येतो म्हणून विचारतात सगळे. लोकांचं काय? उंदीर दिसला की वाघ वाघ म्हणून ओरडतात. नोकरी करायची म्हटलं की, परीक्षेची कामं आली, त्यासाठी परगावी, अं... बेंगळुरूला जाणं आलं. पण लोकांचं काय? यातूनही ते वेगळंच हवं ते उठवतात. तू कुठल्या वेगळ्याच कामासाठी गेली होतीस म्हणतात. लोकांना हवं ते बोलू दे. मी नाही त्यावर विश्वास ठेवत. रंगण्णा तर बिलकूल विश्वास ठेवत नाही. "माझ्या बायकोवर घाणेरडे आरोप करणाऱ्यांच्या जिभा छाटेन." म्हणतो तो. केवढा विश्वास आहे बायकोवर त्याचा! आपल्या बहिणीची मुलगी वेडं-वाकडं वागणंच शक्य नाही, असं देवाची शपथ घेऊन सांगतो तो. तू घाबरायची आवश्यकता नाही. पण मुलांचं काय? लोक काही समोर बोलत नाहीत. माघारी बोललेलं या वाढणाऱ्या मुलांच्या कानावर आलं, तर त्यांच्या मनात आई म्हणून काय आदर राहील? एवढं सगळं कशासाठी? तो लांब आहे म्हणूनच ना? बदली होऊन तोच इथं आला, तर दररोज हवी ती सुधारणा करून घे घरात. नवं चकचकीत घर होईल हे. बाहेरचा आर्किटेक्ट कशाला हवा? मुलांचंही त्यात कल्याण आहे. आई काही वडलांची जागा घेऊ शकत नाही. मुलांनी नको त्या वयात भलतं-सलतं डोक्यात भरवून घेतलं, तर नंतर घडेल तेही आपल्यालाच भोगावं लागणार ना?"

सांगायचं सांगून झाल्यावर काकू उठून उभी राहिली. अमृता बसूनच होती. तिची मान खाली गेली होती. काही क्षण तसेच गेले. काकू अमृताच्या जवळ आली. तिचं मस्तक आपल्या पोटाशी दोन्ही हातांनी घट्ट धरलं. अमृतानं सोडवून घ्यायचा प्रयत्न केला, तरी न सोडता तसंच घट्ट धरून ती म्हणाली, "तू शिकलेली आहेस. तू शहाणी आहेस. तुझा माझ्यावर राग असला तरी तू माझी लेकच आहेस. मी तुला सोडणार नाही. तुला कुणी काही बोललं, तर जीभ कापून हातात देईन त्याच्या."

बोलताना तिनं आपला उजवा तळहात मस्तकावर घट्ट दाबून ठेवला होता. अभय देत असल्यासारखा! काही क्षण तसेच गेल्यावर ती म्हणाली, "चल, तूही झोप आता. दिवसभर कामं करून थकून गेलीस." म्हणत तिचे दोन्ही गाल कुस्करून ती मुलांच्या खोलीत झोपायला निघून गेली.

लाउंजमध्ये सोफ्यावर एकट्याच बसलेल्या अमृताच्या मेंदूमधली सगळी पोकळी नि:शब्दतेनं भरून गेली होती. कुठलीही संवेदना आतपर्यंत पोहोचेनाशी झाली होती. उठून झोपायला जायचंही तिला सुचलं नाही. कितीतरी वेळानं मेंदूत हालचाल जाणवली तेव्हा तिला प्रकर्षानं वाटलं, 'मरायला एवढी योग्य वेळ आजवर कधीही आली नव्हती.'

आपल्या बेडरूममध्ये ती हातात रिव्हॉल्वर घेऊन बसली तेव्हाही तिच्या मनात परिणामाची काळजी नव्हती. मरण्यापूर्वी कागदावर चार ओळी खरडण्याचीही तिला आवश्यकता भासली नाही. ती उठली. स्वत:च्या नकळत घराचे मागचे-पुढचे दरवाजे, कड्या आणि आडणे घातले आहेत की नाहीत हे बघून ती बेडरूममध्ये शिरली तेव्हा तिला मनात तीव्रपणे जाणवलं, 'हा माझ्या जीवनातला सर्वंत पराभूत क्षण आहे. तिला द्यायला उत्तर नव्हतं म्हणून मी मान खाली घातली. तिनं त्या पराभूत क्षणी मला पोटाशी धरलं.'

हातात रिव्हॉल्वर घेऊन ती बेडरूममधल्या सोफ्यावर बसली होती. तिनं दाराकडं पाहिलं. बोल्ट लावला होता; पण मस्तकावर किंवा तोंडात नेम धरण्यासाठी हात उचलत नव्हता. कितीतरी वेळ ती तशीच बसून होती. हळूहळू डोळे उघडे ठेवणं कष्टाचं होऊ लागलं. नंतर केव्हातरी ती तशाच विमनस्क मन:स्थितीत उशीवर पावलं ठेवून आणि पायांच्या जागी डोकं ठेवून झोपी गेली.

सकाळी काकूनं दारावर थाप मारली तेव्हा कुठं तिला जाग आली. तिनं घाईघाईनंच उपीट केलं. त्यातलंच थोडं मुलांना खाऊ घालेपर्यंत दोघीही कामवाल्या आल्या. मुलांना शाळेत सोडून अमृता तशीच काकूला बसस्टँडवर सोडायला गेली. तिचं बोलणंच बंद झालं होतं. काकूच तिला अधूनमधून सांगत होती, "मुलांकडे लक्ष दे. स्वत:ची प्रकृती नीट सांभाळ. दिवसभराचं कामाचं माणूस ठेव. हवं तर गावाकडून चोवीस तासांसाठी एखादी बाई पाठवून देते."

बसमध्ये काकूला बसवून दिल्यावर "मला कॉलेजला जायला उशीर होतोय. निघते मी." म्हणत ती निघत असतानाच काकू तिच्या कानाशी कुजबुजली, "तू पत्र लिही त्याला. ती ये म्हणून कळवेपर्यंत जाणार नाही म्हणत होता तो."

यावर कुठलीही प्रतिक्रिया न दाखवता ती घाईनं बसमधून बाहेर पडली आणि थेट घरी निघून आली.

त्यानंतर कितीतरी दिवस तिनं आपल्या खोलीतून बाहेर पडणं सोडून दिलं होतं. मुलांना शाळेत पोहोचवण्या-आणण्यापुरती ती घराबाहेर पडत होती एवढंच. इतर वेळी ती मूकपणे आपल्या खोलीत पडून राहत होती. सगळा उत्साह नष्ट होऊन गेला होता. आत्महत्या करायची इच्छाही मरून गेली होती. रिव्हॉल्वरला तिनं स्पर्शही करायचं सोडून दिलं होतं. 'जीवन आणि मरणाच्या स्थितीत फरक असेल, तरच मरणाचं आकर्षण वाटणार! त्यामुळे मरायची इच्छाही होत नव्हती. जगण्यात तर अर्थच राहिला नव्हता. सगळीकडून हार! फक्त हार! जीवन म्हणजे हरलेपणाची निरगाठ होऊन बसली होती. आपल्या हातून आत्महत्याही करायला होत नाही आहे. आपल्या माघारी मुलांचं काय होईल? पण हे मुलांवरचं प्रेम म्हणजे अपात्र प्रेम. मी त्यांच्यावर कितीही जीव तोडून प्रेम केलं, तरी त्यांच्या शरीरातल्या प्रत्येक रक्तवाहिन्यातलं

रक्त त्याच दिशेला वाहातंय. रक्ताचा प्रत्येक बिंदू तिकडेच वळतोय. माझ्या दिशेनं नव्हे. या मुलांसाठी जगायची काहीही गरज नाही. जगले तरी यानंतर इस्टेट वाचवणं शक्य नाही.”

असेच आठेक दिवस गेले. ती याच भावनेत बुडून गेल्यामुळे तिच्या मनात इतर विचारांना थाराच नव्हता. ‘नोकरी सोडल्यानंही एक प्रकारचं ओझं उतरलं.’ एवढं तिला अस्पष्टपणे जाणवत होतं. नाहीतरी शिकवण्यात उत्साह वाटतच नव्हता. केवळ नोकरीला चिकटून राहणं तिला प्रतारणा केल्यासारखं वाटत होतं.

पण एक तारखेला पगार मिळणार नाही, ही वास्तवता जेव्हा सामोरी ठाकली तेव्हा मात्र दोन्ही मुलांना घेऊन विश्वेश्वरच्या कॅनॉलमध्ये उडी मारणं एवढा एकच मार्ग तिला दिसू लागला. ‘ही बया मला राजीनामा द्यायला भाग पाडण्यासाठीच आली होती की काय? असं घडलं, तर मी कुत्रीसारखी तिच्या भावाच्या पायावर पडेन असं तिला वाटलं काय?’

त्याच रात्री दहा वाजता फोन वाजला. त्याचाच फोन. मुलं झोपली होती. तो म्हणाला, “अमू, तुला भेटायचं आहे. दोन गोष्टी बोलायच्या आहेत. काकू आहेत?”

ती काही बोलली नाही. त्यानं पुन्हा विचारलं, “ऐकतेस ना?”

“मला कुणीही भेटायची आवश्यकता नाही. तुम्ही नाही भेटला, तर काय होणारय?”

“वेड लागेल मला. येतोय मी आता.”

ती घाबरली. ‘तो आला, विजयला अचानक जाग आली आणि नंतर त्यानं आजीला सांगितलं तर?’ ती घामेजली आणि म्हणाली, “कृपा करून येऊ नका.”

“काकू आहेत?” त्यानं पुन्हा विचारलं.

“तुम्हाला काय करायचंय त्याच्याशी? तुम्हाला माझ्याशी बोलायचंय ना? घरूनच बोलताय ना? मी आता येते.” म्हणत तिनं फोन जागेवर ठेवला.

तिची गाडी पोहोचली तेव्हा सगळं जयलक्ष्मीपूर गाढ झोपेत होतं. त्याच्या घरातला दिवा तेवढा जळत होता. तिनं दारावरची बेल वाजवण्याआधी त्यानं दरवाजा उघडला. आत एका खुर्चीवर बसत तिनं रूक्ष व्यवहाराच्या स्वरात म्हटलं, “बोला.”

तो तिच्या चेहऱ्याकडे बघत होता. हा शून्य भाव की ही माझ्यापासून दूर गेली आहे? दार बंद करून तो तिच्यापाशी आला. तिचं डोकं आपल्या पोटाशी घट्ट धरत असताना ती स्वत: सोडवून घेत तिरस्कारानं म्हणाली, “आता ती नाटकं पुरे झाली. दोन मुद्यांवर तुम्हाला बोलायचं होतं ना? बोला.”

तो दुखावला. म्हणाला, “एवढा अविश्वास दाखवल्यावर काय बोलायचं?”

“जेव्हा खरा विश्वास असतो तेव्हा भावनांची नाटकं करायची गरज नसते. खोटी नाटकं

करणाऱ्यांची आणि तशीच अपेक्षा करणाऱ्यांची गोष्ट मी सांगत नाही.”

तो निरुत्तर झाला. काही क्षण तिच्याकडे पाहत राहिला. तिची नजर समोरच्या भिंतीवर रोखली होती. तिच्या समोरच्या खुर्चीवर बसून तो म्हणाला, “कॉलेजमध्ये मी फोन केला होता. तू राजीनामा दिल्याचं त्यांनी सांगितलं. का दिलास, हे तू मला सांगितलं नाहीस. देण्याआधी तू मला विचारलंही नाहीस. आता तू काय करशील?” त्याच्या प्रश्नात काळजी भरून राहिली होती.

त्याला तिथंच तोडत ती उत्तरली, “तुमच्या दारात ‘आम्हाला सांभाळा’ म्हणून येणार नाही हे निश्चित!”

तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून तो पुढं म्हणाला, “फक्त पोटा-पाण्यापुरता हा प्रश्न नाही. मन गुंतवायला एखादं क्षेत्र पाहिजे. अजूनही राजीनामा मागं घेता येईल. तू विचार कर. तुझी त्याला तयारी नसेल, तर आणखी एक व्यवहाराची गोष्ट सांगतो. जे सांगतोय ते शांतपणे ऐक. विचार कर. गावाबाहेरचं तुझं घर विकलं, तर जुनं असलं, तरी आठ-दहा लाख निश्चित येतील. ते बँकेत ठेवून गावात एखादं भाड्याचं घर घेऊन राहिलं, तर सुखानं राहणं शक्य आहे. दोन-तीन लाखांपर्यंत एखादं लहान घर विकतही घेता येईल हवं तर. अथवा त्या पैशांनी इस्टेटीवरचं कर्ज फेडलं, तर दर वर्षीचं व्याज वाचेल आणि त्यावर खर्च भागवता येईल.”

तिच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे असंमती दिसत होती. त्याचबरोबर चेहऱ्यावर तिरस्कारही उमटला होता. तिकडे दुर्लक्ष करून तो पुढं म्हणाला, “त्या दिवशी तुझी काकू चोरट्यासारखी आली होती. तू मला चोरट्यासारखं घराबाहेर काढलंस ना, त्याच रात्री मला एक गोष्ट सुचली. त्यांनी तुझ्या इस्टेटीवर केव्हा कर्ज काढलं. तू केव्हा मेजर झालीस? तू मेजर झाल्यानंतर त्यांनी कर्ज काढलंय काय? तसं असेल, तर बँकेनं त्यांना कर्ज कसं दिलं? कितीतरी मुद्दे आहेत यात. तू एखादा वकील शोधून त्याच्या हातात केस सोपवलीस तर काकू, तिची इस्टेट आणि बँक यांच्यावर केस करता येईल. तुझं व्याज भरणं वाचेल. मुद्दल द्यायचाही प्रश्न राहणार नाही. वकील तुला इतर तपशीलही समजावून सांगतील.”

एवढं सांगून तो गप्प बसला. अवघडलेलं मौन खोलीभर पसरलं. काही क्षण तसेच गेले. कुणीही काहीही बोललं नाही. आणखीही काही वेळ तशाच शांततेत गेला. तिनं भिंतीवर खिळलेली दृष्टी य:किंचितही हलवली नव्हती. त्यानं पुन्हा विचारलं, “समजलं का मी काय म्हणतोय ते?”

नागासारखी तिनं सर्रकन मान वळवली आणि फुत्कारत म्हणाली, “माझ्या वडलांनी मैसूरमध्ये आपल्याला हवं तेवढं राहता यावं म्हणून विकत घेतलेलं घर आहे ते! त्यात आठवणींचं केवढं भांडार साठलं आहे, ते किती मोलाचं आहे हे सिमेंट, लोखंड, लाकडांचा हिशेब करत जगणाऱ्या आर्किटेक्टला समजणार नाही! तुमचा दुसरा विचार, इस्टेटीच्या अपहाराच्या संदर्भात केस करायची, काकूला कोर्टात खेचायचं वगैरे. ती माझ्याशी कशीही वागू दे, पण माझी आई वारली तेव्हा तिनंच मला मिठीत घेतलं होतं, कुरवाळलं होतं, माझं तोंड पोटाशी घट्ट धरून ठेवलं होतं. नुकत्याच उन्हातून प्रवास करून आलेल्या काकूचा तो घामाचा वास अजून आठवतो स्पष्टपणे! परवाही तिनं मला कवटाळलं. तोच वास! मध्ये घडलेल्या

सगळ्या घटनांचा विसर पाडणारा तो वास! तुम्हीही मला आता पोटाशी धरलंत तेव्हाही तो वास! सगळी नाटकं आहेत हे तेव्हाच मला स्पष्टपणे समजलं. तुम्हाला तसा घाम नाही. तसा वासच नाही. अशा माझ्या काकूवर केस कर म्हणून सांगायला तुमची जीभ तरी कशी रेटली? किती केलं तरी तुम्ही परकेच. नाहीतर तुम्हाला हे सगळं निश्चित समजलं असतं."

तो पूर्णपणे निरुत्तर झाला. आता बोलायला काही शिल्लकच राहिलं नव्हतं. तो खाली मान घालून बसून राहिला. ती उठून बाहेर गेल्याचं आणि गाडी सुरू केल्याचं समजलं, तरी तो जागेवरून हलला नव्हता.

घरी आल्यावर राजीनामा मागं घ्यायचा विचार कितीतरी वेळ तरळत राहिला. 'एवढ्या अवधीत प्रिन्सिपॉलबाईंनी तो घाईनं वर पाठवला असेल. तरीही प्रयत्न केला तर... नकोच. त्या बयेपुढे उभं राहून क्षमा मागणं... उपासमार झाली तर निदान आत्महत्येचं कारण तरी राहणार नाही.'

त्यानंतरही आठवडा गेला. एक दिवस दुपारीच फोन वाजला. साडेबारा वाजले होते. तिनं निरुत्साहानं फोन उचलला. पलीकडून आवाज आला. "मी बोलतोय."

ती काहीही बोलली नाही. काही क्षण वाट बघून त्यानं विचारलं, "काकू आहेत?"

तरी ती काही बोलली नाही. काही वेळानं तो म्हणाला, "अमू, काकू आहेत की गेल्यात? त्या दिवशीही तू सांगितलं नाहीस. निदान फोन तरी करायचा."

"का? तुमचा काय संबंध?"

"मी येतोय. म्हणून विचारलं."

तिला काय उत्तर द्यावं ते सुचलं नाही. तो पुन्हा म्हणाला, "समजलं ना? येतोय मी."

"तुमची मर्जी." ती निरुत्साहानं म्हणाली.

"काकू असली, तर असू दे. असंच ना?" त्यानं मुद्दाम विचारलं.

"सगळ्या प्रश्नांची उत्तर देत बसायला मी कुणाची बांधील नाही. ज्यांना यायचंय त्यांना येऊ दे."

"पंधरा मिनिटांत येतोच." म्हणत त्यानं रिसीव्हर ठेवून दिला. तो घरी येऊन पोहोचला तेव्हा ती गेटपाशी उभी नव्हती. त्यानं बेल दाबेपर्यंत तिनं दरवाजाही उघडला नाही. तिचं सगळं वागणं संतापापेक्षा निरुत्साहानं भरलं होतं. दार बंद करून तिला जवळ घेत त्यानं विचारलं, "बरं नाही वाटत? फोन का केला नाहीस?"

कुठलीही प्रतिक्रिया न दाखवता ती खाली मान घालून उभी होती. त्यानं विचारलं, "गेल्या त्या?"

“दुसऱ्या दिवशीच पिटाळून लावलं.”

“मग इतके दिवस मला का वाट बघायला लावलीस? रोज रात्री न झोपता तुझ्या फोनची वाट बघता होतो.”

तिनं मान वर करून त्याच्याकडे पाहिलं. तो खरोखरच उतरून गेला होता. गाल, खांदे आणि मानेची हाडं वर आलेली दिसत होती. तिचं मन कणवेनं भरून गेलं. तिला तशीच मिठीत धरून तो तिच्या बेडरूममध्ये गेला. तिला कॉटवर बसवून तो तिच्या पुढ्यात खुर्चीवर बसला. ती मौन होती. तिचा चेहरा आपल्याकडे वळवून त्यानं तिच्या ओठांवर प्रेमानं आपले ओठ ठेवले. बाहुलीला चुंबन द्यावं असा त्याला अनुभव आला. अंतर्यामी तो तीव्र अपमानित झाला. ती आपल्याला अशी दूर लोटत असताना इथं राहण्यापेक्षा निघून जावंसं त्याला वाटू लागलं, पण उठून जायची शक्ती त्याच्या अंगी नव्हती. त्याच्या मनानं त्याला ताकीद दिली, ‘घाई करता कामा नये. तिनं मी परका असल्याचं दाखवलं, तरी मी तिच्या जवळचाच आहे हे मी तिला अनुभवाला आणून दिलं पाहिजे.’ त्यानं पायातले बूट काढले. मोजे तसेच ठेवून तो कॉटवर आडवा झाला. ती खिडकीबाहेर पाहत बसून राहिली होती. ‘खूपच उतरून गेलीय ही. रंगही पांढुरका फिका झालाय.’

दोघं एकमेकांशी अक्षरही बोलले नाहीत. मध्येच ती एकाएकी दचकली. चेहरा भयभीत होऊन घाम तरारला होता. त्यानं आश्चर्यानं विचारलं, “काय झालं?”

“कुत्र्यांचा भुंकल्याचा आवाज नाही ऐकू आला?”

त्यानं लक्ष देऊन ऐकलं आणि म्हणाला, “नाही.”

“स्कूटर कुठे आहे?”

“पोर्चच्या सावलीत.”

ती उठून खोलीबाहेर निघाली. बेडरूमचा दरवाजा बंद करून व्हरांड्यात येऊन तिनं खिडकीतून घराबाहेर पाहिलं. पुढचा दरवाजा उघडून गेटपर्यंत जाऊन तिनं कुणी आलं नाही याची खात्री करून घेतली. ती पुन्हा बेडरूममध्ये आली तेव्हा तिचा चेहरा आपल्यावर अन्याय लादल्यासारखा दिसत होता. तरी स्वत:ला आवरायचा प्रयत्न करीत ती म्हणाली, “माझी संपूर्ण बेअब्रू करून मला रस्त्यावर खेचल्याशिवाय तुमचं समाधान होणार नाही काय? स्कूटर आणखी कुठंतरी आडोशाला उभी करता आली नसती का तुम्हाला? गॅरेजमध्ये ठेवता आली असती.”

त्या दिवशीची फजिती आठवून तोही उठत म्हणाला, “सॉरी! गॅरेजची चावी दे. ठेवून येतो.”

“आता एवढ्याशा वेळासाठी आता कुठं ठेवणार? राहू द्या घराबाहेरच.”

ती आपल्याला लवकर जायची सूचना करत असल्याचं त्याच्या लक्षात आलं. तो म्हणाला, “हे काय अमू? कुणाला घाबरायचं? का घाबरायचं? तुझ्या काकू तुला काही बोलल्या काय?

नीट सांग ना मला. मीही खूप विचार केलाय. विजय-विकास माझी मुलं. आपण लग्न करून सुखानं राहू या. ही अशी भीती, चोरटेपणा बाळगून राहायची-जगायची काहीही गरज नाही."

ती सापासारखी सर्रकन त्याच्याकडे वळली. तिच्या पापण्या अविचल होत्या. चेहऱ्यावर अविश्वास दिसत होता.

"लग्न?" पदराआडचं मंगळसूत्र बाहेर काढून त्याच्यासमोर धरत ती म्हणाली, "मी पवित्र राहिले नाही. वेगळ्या पुरुषाशी संबंध ठेवून मी पतित झाले आहे. याचं पावित्र्य मी नष्ट केलं आहे. तुम्ही माझ्याशी लग्न करणार?"

हे सहन करणं त्याच्या शक्तीपलीकडचं होतं. तो व्यथित होऊन म्हणाला, "मी तुला अपवित्र केलं, पतित केलं. तुझ्या मंगळसूत्राचं पावित्र्य नष्ट केलं असंच तुला म्हणायचंय ना?"

"तसं कुठं मी म्हटलं? मी फक्त वस्तुस्थिती सांगितली एवढंच. तुमची गोष्ट वेगळी! तुम्ही अनुभवी! हा काही तुमचा पहिला अनुभव नाही. मीही तुमच्या त्या मुंबईच्या मैत्रिणीसारखी आहे असं तुम्हाला वाटतंय. मग तुमच्या मनात गिल्टी कॉन्शस निर्माण व्हायचा प्रश्नच कुठून आला?"

"तो आता तूच निर्माण करतेस."

"म्हणजे आतापर्यंत तो नव्हता हे तुम्ही कबूल करता तर!" एखाद्या वाद-विवादात विजय मिळवल्याच्या स्वरात ती म्हणाली.

यात आपलं काय चुकलं हे त्याला कळेना. तीच पुढं म्हणाली, "ही दोन मुलांची आई आहे, हिला स्पर्श करू नये, हिला भ्रष्ट करू नये असं तुमच्या मनात यायला नको होतं काय? जे घडलं त्यात मी पूर्णपणे निरपराधी आहे असं माझं म्हणणं नाही. त्यासाठी माझ्या मनात गिल्टीकॉन्शस आहे. तुमचा यात कमी वाटा असेल, पण तेवढा तरी तुम्हाला गिल्टीकॉन्शस हवा की नाही? तो नाही म्हटल्यावर तुमच्यात आणि जनावरात काय फरक आहे?"

'पाप किंवा पापप्रज्ञा वगैरे मनात आणून ही स्वत: तळमळते आणि मीही तसंच तळमळावं अशी ती अपेक्षाही करते.' आता तिला स्पष्ट उत्तर द्यायलाच हवं असं ठरवून तो म्हणाला, "प्रेम असेल तिथं गिल्टीकॉन्शस नसतो."

"म्हणजे माझं तुमच्यावर प्रेम नाही, हेच तुम्हाला म्हणायचंय ना? खरंय ते. माझं तुमच्यावर प्रेम नाही. मोह होता. आता तोही राहिलेला नाही. मी खरं बोलतेय. तुम्ही मात्र खोटारडे आहात. तुमचं माझ्यावर खरं प्रेम नाही." अंतिम सत्याचा उच्चार करत असल्यासारखी ती म्हणाली.

तो संतापला, "नॉन्सेन्स! तुझं माझ्यावर नसलं तर नसू दे. माझं तुझ्यावर प्रेम आहे!"

तिरस्कारानं हसत तिनं विचारलं, "त्याला पुरावा काय आहे?"

“मारुतीसारखी छाती फाडून दाखवली, तर तूच आहेस तिथं. उठताना, बसताना, फिरताना, तळमळत असताना माझी काय अवस्था झालीये... स्वत:च्या तोंडानं सांगण्यात अर्थ नाही. तू ते समजून घ्यायला पाहिजेस. तसा प्रयत्न करायला पाहिजेस. मला तुझ्याइतकं जवळचं आणखी कुणीही नाही. तुझी शपथ घेऊन सांगतो.”

तिचा विश्वास बसला नाही. ती कुत्सितपणे हसत म्हणाली, “व्वा! माझ्यावरच्या प्रेमाला माझी शपथ! तुमच्या शहाणपणाचं कौतुक करावं तेवढं थोडं आहे. शपथ खोटी असेल, तर जे व्हायचं ते माझंच होईल! व्वा!”

“तुझी नको, तर देवाची शपथ घेऊन सांगतो.” तो अगतिकपणे बडबडला.

“देवाच्या अस्तित्वावरचा तुमचा अविश्वास! विश्वास नसलेल्या देवाची शपथ घ्यायला निघालात म्हणजे तुम्ही जाणीवपूर्वक खोटं बोलताय. हे पाहा, हा खोटेपणा सोडा. हा तुमचा केवळ हट्ट आहे. हट्ट सोडून तुम्ही सत्य जाणून घ्या. ते मान्य करा. तुम्ही तुम्हाला जाणून घ्या. दुसरी एखादी मुलगी शोधून लग्न करा आणि सुखानं राहा. रविवारची वर्तमानपत्रं पाहिलीत, तर तुम्हाला हवी तशी बायको निश्चित मिळेल. गुडबाय! यानंतर कृपा करून तुम्ही इथं येऊ नका. मला मुलांना आणायला जायचंय.” म्हणत ती गॅरेज, गाडी आणि घराच्या चाव्या घेऊन उठून उभी राहिली.

त्यानं घड्याळात पाहिलं. सव्वादोन. ‘मला घराबाहेर काढायचा तिनं निश्चय केलाय. मुलांना आणायची अजून वेळ झालेली नाही.’ यानंतरही तिच्याशी वाद घालून आपल्या प्रेमाची ग्वाही देणं त्याला बेशरमपणाचं वाटलं. ती खिडकीबाहेर पाहत उभी होती. बूट चढवून, हेल्मेट घेऊन तो दारापर्यंत आला. ती तशीच उभी होती. बाहेर येऊन त्यानं स्कूटरचं इंजिन सुरू केलं. कुत्री भुंकू लागली. एकाएकी त्यानं इंजिन बंद करून स्कूटर स्टँडवर लावली. तरातरा घरात शिरला. तो बेडरूममध्ये शिरला तेव्हाही ती खिडकीबाहेर पाहत उभी होती.

हेल्मेट कॉटवर फेकून त्यानं तिच्या दंडावर संतापानं मारलं. तिचा दंड धरून तिला खस्सकन आपल्याकडे वळवलं. तिच्या नजरेत संताप खदखदत होता.

“माझ्याबरोबर तुला हवे तसे खेळ खेळता येतील असं वाटलं काय?” त्यानं पुन्हा हात उगारला.

“खेळ तुम्ही खेळताय. मी नव्हे.” ती किंचाळली.

“देवाची शपथ घेऊन सांगितलं तरी उपहास करतेस तू!” म्हणत त्यानं पुन्हा मारण्यासाठी हात उगारला.

पुढच्या क्षणी त्याला कल्पनाही करता येणार नाही एवढ्या वेगात तिनं थोबाडीत मारण्यासाठी हात उगारला. आता स्वत:चा बचाव हे त्याचं आद्यकर्तव्य झालं. त्यानं तिचे दोन्ही हात घट्ट धरून ठेवले; पण तिनं ते सोडवून घेतले आणि ती त्याच्या पाठ, छाती, दंड, गाल काहीही न पाहता मारत राहिली. तिच्यावर संपूर्ण कब्जा घेण्याच्या प्रयत्नात त्यानं तिला घट्ट

मिठीत धरलं. तिनं त्याच्या डाव्या मनगटावर दात रुतवले. आता मात्र निरुपाय होऊन त्यानं तिच्या डाव्या पोटरीवर बुटाच्या पायानं लाथ मारली. ती काही क्षण तिरमिरली. स्वत:ला सावरत कॉटजवळच्या सपाता उचलत त्याच्यावर धावून जात, मारत किंचाळली, "बुटानं लाथ मारतोस? लाथ मारतोस?"

एव्हाना त्याला स्वत:च्या हातून घडलेल्या चुकीची पूर्ण कल्पना आली होती. 'सुरू केलेली स्कूटर बंद करून आत येऊन मी मारामारी सुरू केली. आतासुद्धा शरीराच्या बळानं तिला नामोहरम करणं आणि कॉटवर आदळणं कठीण नाही; पण त्यामुळे काय होणार?' स्वत:ला तिच्या संतापाच्या आधीन करून तो तसाच मार खात उभा राहिला.

मारून दमल्यावर ती धापा टाकत उभी राहिली. तो शरमून गेला होता. तो म्हणाला, "सॉरी! मी संतापानं बेभान झालो होतो. यानंतर मी या दाराचा उंबरा कधीही ओलांडणार नाही."

हातात हेल्मेट घेत तो त्वरेनं तिथून निघून गेला.

काय घडलं ते नेमकेपणानं उमजून घ्यायला त्याला तीन दिवस लागले. 'तिनं आपल्यावर हात उगारायची ही काही पहिली वेळ नव्हे; पण त्या प्रत्येक वेळी तिला स्वत:च्या मनावर आवर घालता न आल्यामुळे तिने हात उगारला होता. त्या वेळी मी संपूर्ण भानावर राहून तिच्याकडून केवळ शारीरिक मार खाल्ला होता. त्यामुळे प्रत्येक वेळी नैतिक सरशी माझी झाली होती; पण या वेळी मी माझी बुद्धी संतापाच्या हाती दिली. तिनं त्यावर त्याच पद्धतीनं प्रतिक्रिया दाखवली एवढंच! तिथंही मी मध्येच हरलो. शारीरिकदृष्ट्या जिंकणं कठीण नव्हतं. त्या वेळीही हे सुचलं होतं; पण हा पाशवी विचार मनात आला याचीच शरम मला निष्क्रिय करून गेली. नंतर मीच स्वत: शिक्षेसठी तिच्या हाती सोपवलं.'

दोन दिवस गेल्यावर मनात येऊ लागलं, 'मैसूर सोडून मुंबईला का निघून जाऊ नये? इथं असं काय आहे ज्यासाठी इथं राहावं? ऑफिस विकून कर्ज फेडता येईल. उरलेले पैसे घेऊन मुंबईला निघून जायचं. कुठंतरी काम, कुठंतरी राहायची मठी, दिवसभर गुरासारखं मरमरेस्तोवर राबून-थकून जायचं. तरीही तीच जागा उत्तम आहे!' मैसूरचं मोकळं आकाश, शांत रस्ते, कुक्करहळ्ळीचा तलाव, चामुंडी टेकडी... त्याला कशातच रस वाटेना. 'कशाला राहायचं या गावात? ललितमहाल, चामुंडी टेकडी तर माझ्या नशिबात नाही. मग काय राहिलं या मैसूरमध्ये?"

रात्री अंथरुणावर पडल्या पडल्या त्याला झोप लागत होती. अपरात्री दोन-अडीच वाजता जाग येत होती. नंतर मात्र काही केल्या झोप येत नव्हती. मनात केवळ तिचीच आठवण भरली होती असंही नव्हे. 'ती शेवटची भेट वगळता मी नीटच वागत आलोय. माझा एवढा पराकोटीचा तिरस्कार करणाऱ्या या बयेच्या नादानं मी का एवढं विव्हल होऊन जावं?' मनात इतरही कितीतरी निरर्थक संदर्भ तरळून जात. तरी झोप मात्र लागत नव्हती.

एक दिवस सकाळीच मनात आलं, 'एका वेड्या बाईबरोबर असे अनुभव आले म्हणून मी का हे गाव सोडून जायचं? हे गाव काय तिच्यामुळे उभं आहे? मध्ये काही दिवस जाऊ दिले की, आपोआपच तिची आठवण धूसर होऊन कायमची पुसून जाईल. त्या वेळीही मैसूर असंच

असेल.'

हे समाधान वरचेवर मनात घोळवत राहिलं तरी झोप उडून गेली होती. या समाधानाच्या मुळाशीही तीच होती, या विचारानं तो आणखी विद्ध होऊन गेला होता. 'तिनं तर स्पष्ट शब्दात माझ्यावर प्रेम नाही म्हणून सांगितलं आहे. तरीही हे मन का तिच्याकडेच लोचटासारखं जातं? किती हीन प्रकारे हिणवलं तिनं मला! तिच्या विचित्र हिंसेपासून स्वत:चं रक्षण करणं मला का जमत नाही?'

'दररोज झोपताना अगदी कमी प्रमाणात झोपेची गोळी घेतली, तर झोपेची समस्या सुटू शकेल. थोडे दिवस आणि थोड्या प्रमाणात गोळी घ्यायची. गाढ झोप लागायला लागली की, नंतर गोळी सोडून द्यायची. मुंबईसारख्या महानगरीत अनेकांना अशा गोळीची सवय असते. नाहीतर घोटभर व्हिस्की... पण ती चव मुळातच आवडली नाही. यापैकी कुठलाही मार्ग पत्करायचा म्हणजे हार मानायची!'

डॉक्टरांना भेटून यावर काहीतरी मार्ग काढायचं त्यानं ठरवलं. 'पण ते तरी काय सांगणार? गोळी घ्या म्हणूनच सांगणार. त्यापेक्षा आपण आपल्या मनाचा अधिक अलिप्तपणे विचार करून यावर मार्ग शोधायला पाहिजे.'

एकदा रात्री मध्येच जाग आल्यावर त्याच्या मनात आलं, 'स्त्रीला प्रेम महत्त्वाचं की मुलं? मुलांसाठी कुठल्याही टोकाचा त्याग करायची तिची तयारी असते. प्रेमाचाही! तिला काकूनं फसवलं. नवऱ्यानंही फसवणूक केली; पण तरीही तो काही अगदीच टाकावू, नालायक माणूस नाही. हिच्या पैशांवर शिकला असला, तरी इंजिनियर झाला आहे. दोन मुलं... मी त्यांच्याशी प्रेमानं वागलो, तरी ती मला पित्याच्या जागी मान्य करतील काय? उद्या त्यांना तिकडचीच ओढ जाणवणार.

'हा सगळा विचार करूनच तिनं दूर राहायचा निर्णय घेतला असला पाहिजे. आपणही आपलं मन अधिक कडवट करून घेण्यापेक्षा तिच्याच दृष्टीनं विचार करायचा विवेकीपणा दाखवायला पाहिजे. नाहीतरी खऱ्या प्रेमाचं त्याग हेच रूप आहे ना? यातून तिचं आयुष्य सुरळीत जाणार असेल, तर मी तिच्या मार्गातून का दूर होऊ नये?'

या उदात्त भावनेनं मन भरून टाकल्यावर त्यालाही खूप बरं वाटलं. 'मग मुंबईलाच का जाऊ नये? तिला नीट कळवून निघून जावं, हो... आत्ताच!' पण रिसीव्हर उचलून नंबर फिरवताना मनात आलं, 'नको. हे सांगायच्या निमित्तानं पुन्हा संबंध वाढायला नकोत. तिच्यासाठी दहा हजार खर्च केले. आता फोन नको म्हटलं तरी पैसे परत मिळणार नाहीत. तिला फोन करायची इच्छा असती, तर तिनं फोन केला असता. ती एका निर्णयापर्यंत पोहोचली असताना मी लोचटपणे वागलो, तर तिलाही मनस्तापच! घरात जाऊन तिला मारलं. तेही जाऊ द. 'यानंतर कधीही या घराचा उंबरा ओलांडणार नाही' असं म्हणायला नको होतं. त्या वाक्यामुळेच तिनं कदाचित फोन केला नसेल. आता फोन करून 'मी हे वाक्य रागाच्या भरात बोललो. त्यामागं दुसरा कुठलाही अर्थ नाही.' एवढं सांगून रिसीव्हर ठेवून दिला तर? पण त्यावर ती विखारी लागटपणे काही बोलणार नाही कशावरून?' संतापाच्या भरात भाषेचा सगळा लवचीकपणा वापरून नामोहरम करायची तिची पद्धत त्याला आठवली आणि तो

मुकाट्यानं पडून राहिला.

एकदा मध्यरात्री जाग आल्यावर एकाएकी त्याच्या मनाच्या तळातून प्रश्न उमटला, 'ही घरात असेल की टेकडीवरच्या दरीच्या टोकाशी मृत्यूच्या छायेत आहे?' त्याचा हात अभावितपणे मच्छरदाणीबाहेरचा फोन उचलून नंबर फिरवू लागला. पलीकडे रिंग वाजू लागली. आता ती रिसीव्हर उचलेल, या क्षणी उचलेल या विचारानं उत्सुकतेनं तो रिंगचा आवाज ऐकत होता. टेकडीवर 'जाऊन तिनं स्वत:वर गोळी झाडून...' दु:खानं त्याच्या घशाशी आवंढा दाटला. एवढ्यात कुणीतरी रिसीव्हर उचलल्याचं जाणवलं. तो उत्सुकतेनं म्हणाला, "हॅलो... हॅलो..."

"कोण आहे साहेब?" पुरुषी आवाज. कामवाल्या बाईच्या नवऱ्याचा आवाज.

त्यानं स्वत:ला सावरलं आणि विचारलं, "मॅडम आहेत काय?"

"गावाला गेल्यात. आपण कोण?"

"केव्हा गेल्यात?" स्वत:ची ओळख न देता त्यानं विचारलं.

"त्यांचं काय, जात-येत असतातच."

"केव्हा येणार आहेत?"

"या वेळी तीन-चार दिवसांनी येईन म्हणाल्यात."

"बरं. मी नंतर फोन करेन पुन्हा." म्हणत त्यानं रिसीव्हर जागेवर ठेवून दिला.

त्याच्या मनात एक गोष्ट स्पष्ट झाली. 'काकूचा प्रभाव! नवरा-बायको जवळ येत आहेत. त्या दिवशी ती जाब विचारत होती, 'विवाहित बाई... दोन मुलांची आई... स्पर्श करू नये... तिचं मन चंचल करू नये एवढा विवेक तुम्ही बाळगायला नको होता का?' त्याचीही हीच पार्श्वभूमी असणार हे निश्चित! आता तिनं स्वत:च्या जीवनाचा मार्ग शोधला आहे. त्याच पाठोपाठ आपण तिरस्कृत झाल्याची भावना आली तरी त्यानं ती दडपायचा प्रयत्न केला. मागं कितीतरी वेळा तिनं सांगितलं होतं, 'काकू आणि नवऱ्यानं केलेल्या फसवणुकीनंतर मनात मरून जायची प्रवृत्ती जन्मली आणि तुझ्या स्नेहानं ती जास्त प्रबळ झाली.' आता कदाचित त्याचं प्रमाणही कमी झालं असेल. यात चूक केवळ माझीच आहे काय? त्या वेळी माझ्यापेक्षा तीच अधिक उत्सुक नव्हती काय?'

पहाटे पहाटे पुन्हा त्याचा डोळा लागला. नंतर साडेसात वाजता जाग आली. सकाळची आन्हिकं आणि हॉटेलमध्ये नाश्ता घेऊन तो ऑफिसमध्ये पोहोचला तेव्हा नीळकंठप्पांनी निरोप दिला, "मॅडम जलजांनी फोन केला होता. तुम्हाला आल्या आल्या त्यांनी फोन करायला सांगितलं आहे. तुम्हाला अर्जंट भेटायचंय म्हणत होत्या."

जलजानं फोन का केला हे त्याला ठाऊक होतं. अमेरिकेतल्या डॉक्टर राममूर्तींच्या

हॉस्पिटलचं काम सावकाश चाललं होतं. कॉंट्रॅक्टरनं आपलं काम पूर्ण केलं होतं. सगळ्या इमारतीचं वजन खांबावर येणार होतं. त्याच्या पायाची खोली आणि त्यावर येणारं इमारतीचं ओझं यांचा हिशेब करून लोखंडाचं प्रमाण सांगितल्याशिवाय काम पुढं कसं जाणार? त्या आधी मातीची परीक्षा होणंही अत्यावश्यक होतं. ते सगळं कामच दोन महिन्यांनी मागं पडलं होतं. डॉक्टरांनी दोन वेळा अमेरिकेतून फोन केला तेव्हा तो ऑफिसमध्ये नव्हता. त्याला दोन वेळा फोन करायला त्यांना सात वेळा प्रयत्न करावे लागले. त्यांनी त्याला कलेक्ट-कॉल करून कामाचा रिपोर्ट द्यायला सांगितलं होतं. 'चूक माझीच आहे. ही नीळकंठप्पांच्या हातातली कामं नव्हेत. मी स्वत: साइटवर जाऊन यायला पाहिजे. पण मन कामावर एकाग्र व्हायला तयारच नव्हतं.' प्रेमप्रकरणामुळे व्यवसाय नष्ट होऊन जातो हे त्यालाही ठाऊक होतं. पण... तोही तेच करत होता. राजशेखर शेट्टींचं कामही त्यामुळेच हातून गेलं होतं.

आता फक्त जलजाला फोन करायचा एवढाच मुद्दा नव्हता. क्षमा मागून यानंतर ताबडतोब कामाला सुरुवात करतो असं सांगून त्याप्रमाणे वागायला हवं होतं. नाहीतर परिस्थिती आणखी हाताबाहेर गेली असती, हे त्याला स्पष्टपणे दिसत होतं. एवढ्यात फोनची घंटी वाजली. जलजाचाच फोन होता. तो म्हणाला, "मीच तुम्हाला फोन करणार होतो. एवढ्यात तुमचा फोन आला."

"तुमच्याशी थोडं बोलायचं होतं. दहा मिनिटांचं काम आहे. केव्हा येऊ?"

"तुम्हाला का उगाच फेरा? मीच येतो ना!"

"तसं नको. मी कॉलेजमधून बोलत्येय. आत्ता तुम्हाला वेळ आहे का?"

"या. जरूर या." म्हणत त्यानं रिसीव्हर ठेवला. जलजाला त्याच्याविषयी आदर होता आणि तिच्या घराचं काम केल्यापासून तिचा त्याच्यावरचा विश्वासही वाढला होता, हे त्याला ठाऊक होतं. ती समोर येऊन बसली, तरी तिला कुठून सुरुवात करायची हे समजेना. तिची अडचण जाणून तोच म्हणाला, "मला माझ्या चुकीची जाणीव आहे. तुम्ही संकोच न करता मोकळेपणानं बोला."

तिनं पर्समधून एक विदेशी पोस्टाचं पाकीट काढलं. डॉक्टरांचं पत्र असल्याचं त्याच्या लक्षात आलं. पाकिटातले तीन-चार कागद बाहेर काढून त्यातला वरचा कागद स्वत:कडे ठेवत उरलेले कागद देत ती म्हणाली, "डॉक्टर राममूर्तींचं पत्र."

तो पत्र वाचू लागला...

> 'तू एवढी शिफारस केलीस, पण मला सोमशेखरांचं आश्चर्य वाटतं. पण त्याबरोबर पाच कोटींचा प्रश्न असल्यामुळे मला रागही आला आहे. हा सोमशेखर प्रामाणिक असेलही, पण आळशी दिसतो. माझ्यासमोर कामाविषयी एवढी आस्था दाखवून मी इथं आल्यावर असं वागणं योग्य आहे काय? ही फसवणूक नव्हे काय? केवळ खोटं बोलणं किंवा पैसा खाणं म्हणजे अप्रामाणिकपणा नव्हे, कबूल केलेली जबाबदारी न पेलणं हाही

अप्रामाणिकपणाच! या देशातली कल्पना तशीच आहे. त्याच्या बेजबाबदारपणामुळे सगळ्या वस्तूंच्या किमती वाढत गेल्या. त्यात इंडियात तर त्या वेड्यासारख्या वाढतात. तर होणारं नुकसान कोण सहन करणार?

तू शिफारस केलीस म्हणून मी थैट मैसूरला आलो. त्या आधी मी बेंगळुरूच्या एका आर्किटेक्टशी संपर्क साधला होता. तुझ्यावर दोषारोप करायचा माझा हेतू नाही. तिथं येऊन त्याच्याशी भेटल्या-बोलल्यावर मलाही त्याच्याविषयी विश्वास वाटला. त्यामुळे त्यानं चार टक्के मागितले असताना मी सहा देऊ केले. तू फोनवर म्हणालीस, तशा काही भावनिक समस्याही असतील; पण तो त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. तो त्यानं आपल्या मित्रांशी बोलून सोडवावा. इथं होणारं नुकसान हा गिऱ्हाइकाचा प्रश्न आहे.

तू स्वत: त्याची भेट घेऊन त्याच्याशी निर्वाणीची चर्चा कर. जर त्याला नीट काम करायची इच्छा नसेल, तर त्याच्याकडून काम काढून घेऊन मला फोन कर. मी स्वत: येऊन बेंगळुरूच्या आर्किटेक्टकडे सगळी जबाबदारी सोपवेन. अर्थात पुन्हा तिथं येण्याचा खर्च, प्रवासाचे वाया जाणारे दिवस, इथं होणारं व्यवसायाचं नुकसान... तुला कदाचित मी फारच व्यवहारी आहे असं वाटत असेल, पण यात नीतीचाही प्रश्न आहेच...'

त्यानंतरचं पत्र त्यांच्या कौटुंबिक तपशिलाचं होतं. पत्राची घडी घालून सोमशेखरनं ते तिच्यापुढे ठेवलं. त्याची मान खाली गेली होती. जलजा त्याच्यापुढे प्रश्नार्थक मुद्रेनं बसून राहिली होती. तो संकोचून गेला होता. या पत्रावर बोलणं किती अडचणीचं वाटत होतं, हे त्यालाही समजत होतं.

"मला दोन दिवस वेळ द्याल काय? दोन दिवसांत मी तुम्हाला माझ्याकडून ही जबाबदारी पेलली जाईल की नाही ते निश्चित सांगेन."

ती आता थोडी मोकळी होऊन म्हणाली, "म्हणजे काय? तुम्ही बाकी सगळी तयारी केली आहेच. वेळोवेळी तो तपशील कॉंट्रॅक्टरला देणं एवढंच काम आहे. राममूर्तींनी तुमच्याविषयी चांगलंही लिहिलंय पत्रात."

"तो प्रश्न नाही... कामात रस वाटणं..." तो अडखळला.

"त्या पत्रातच यासंबंधी एक सूचना दिली आहे. तुम्हीही परके नाही म्हणून सांगते. एखाद्या मित्राशी मनमोकळं बोलून काहीतरी मार्ग निघू शकतो. नंतर पुन्हा कामामध्ये रस निर्माण होऊ शकेल."

त्यानं मान वर केली नाही. जलजा त्याची हितचिंतक होती, या विषयी त्याच्या मनात संशय नव्हता. म्हणूनच तो संकोचून गेला होता. अखेर तो म्हणाला, "परवा रविवार आहे. त्या दिवशी तुमचं कॉलेज नसेल. नऊ वाजता न चुकता मी तुमच्या घरी येईन. तोपर्यंत मला वेळ द्या."

ती उठली. तोही तिच्याबरोबर जिना उतरून तिला निरोप देऊन आला.

नंतरही ऑफिसमध्ये फारसं काम नव्हतं. शेट्टींचं काम हातातून गेल्यानंतर त्यानं नवं काम स्वीकारलं नव्हतं. त्याच्या मनात येत होतं, 'आताशा आपण ऑफिसमध्ये अगदी कमी वेळ येत असतो. गिऱ्हाइकं आली असतील. चार-सहा वेळा येऊनही मी न भेटल्यामुळे दुसरीकडे गेली असतील. माझ्या हाताखालच्या लोकांनीच त्यांना दुसरीकडे पाठवलं असेल. कदाचित किरकोळ कामं करून स्वत:ही पैसे मिळवत असतील. व्यवसायात संधी मिळताच हे घडणार. अशा वेळी पूर्णपणे त्यांना दोषी ठरवता येत नाही.'

थोड्याच वेळात ऑफिसमध्ये निष्क्रियपणे बसून राहायचा त्याला कंटाळा आला. नीळकंठप्पांना सांगून तो तिथून बाहेर पडला. पायऱ्या उतरून खाली आल्यावर त्याला कुठं जायचं ते समजेना. कुठंतरी गावाबाहेर एखाद्या झाडाखाली थंड सावलीत का बसू नये? स्कूटरमध्ये केव्हा पेट्रोल भरलंय ते आठवून पेट्रोल पंपावर पेट्रोल भरून त्यानं स्कूटर वृंदावन गार्डनकडे वळवली. 'दिवसा इथला निवान्त एकान्त, झाडं, सावल्या, पाणी....' त्याला नुसत्या कल्पनेनंही बरं वाटलं. हॉटेलपाशी स्कूटर उभी करून तो काही वेळ प्रचंड वेगानं उसळणारं पाणी पाहत राहिला. त्याला त्याचं विलक्षण आकर्षण वाटू लागलं. कितीही पट्टीचा पोहणारा असला, तरी क्षणार्धात त्याचं प्रेत भिरकावून देणारा यमवेगाचा प्रवाह! भयानक! तरीही आकर्षक! शिवाय प्रत्येक सूक्ष्म थेंब फोडून सात रंग उधळणारं इंद्रधनुषय! कितीतरी वेळ तो तिथं उभा होता. चढलेल्या उन्हामुळे सूक्ष्म मस्तकशूळ उठल्यावर तो हॉटेलपाशी आला. तिथं घासभर दहीभात खाऊन तिथल्या एका शांत लतागृहाखाली दगडी बाकावर आडवा झाला. देह आणि मन थंडावल्यासारखं झालं. तो जलजानं सांगितलेल्या उपायावर विचार करू लागला.

त्याला पुन्हा तीव्रपणे आठवलं, 'मैसूरला येऊन एवढे दिवस झाले, पण आपण एकही मित्र मिळवू शकलो नाही. ही भेटली नसती, तर कुणाशी मैत्री झाली असती की काय कोण जाणे! प्रेमात बुडालेल्याला दुसरा मित्र नसतो, असं कुणीतरी म्हटल्याचं आठवलं. मन-बुद्धी-सर्वस्वच प्रेमात बुडाल्यावर वेगळा स्नेही कुठून मिळणार? अशा वेळी पूर्वापार चालत आलेला स्नेहही राहत नाही. प्रेम ही एकाच वेळी सगळंकाही खेचून घेणारी शक्ती आहे.

'काहीही असो. यानंतर आपल्याला एखादा मित्र हवा. आजच संध्याकाळी जलजाच्या घरी जाऊन आपल्या आणि अमृताच्या नात्याविषयी सगळं सांगून मन मोकळं करायला पाहिजे. जलजा मला विद्यार्थी असल्यापासून ओळखते. मध्यंतरी संबंध तुटला, नंतरही फारसा स्नेह वाढला नाही. तरी आमच्या गुरूंची मुलगी.' शिवाय त्याच्या मनात आलं, 'एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीला नीट समजून घेऊ शकते. पुरुषाच्या दृष्टीनं स्त्री हे कायमचंच कोडं आहे.

'जलजाला सगळं ठाऊक असणार. नाहीतर तिनं हे का सुचवलं असतं? मैसूरमध्ये आणखीही काही जणांना हे ठाऊक असेल. ऑफिसच्या अलंकरणाच्या निमित्तानं ती स्वत: पुढाकार घेऊन वावरली होती. मग मी जलजाशी या विषयावर बोललो म्हणून काय बिघडलं?'

पण पाठोपाठ वाटलं, 'तरीही मी स्वत: ही गोष्ट इतरांना, त्यातही तिच्याबरोबर एकत्र काम केलेल्या व्यक्तीपुढे सांगणं योग्य आहे काय? मुंबईमधल्या त्या संबंधाविषयी मी कुठं बोललो नव्हतो. तो स्नेह तुटून गेल्यानंतरही बोललो नव्हतो. अमृतालाही ते सांगितल्याशिवाय पुढचे

संबंध वाढवायला नकोत म्हणून हे सांगितलं. तरीही तिचं नाव, गाव, पत्ता वगैरे तपशील सांगितला नाही. अमृताची संमती न घेता मग या संबंधाविषयी जलजाला का सांगायचं? या रविवारपर्यंत काहीतरी ठरवायला पाहिजे तिला.' त्यात फार विचार करायचाही प्रश्न नव्हता म्हणा. 'हे काम पूर्ण केलं, तर तीन लाख रुपये मिळतील. वर्षा-सव्वावर्षाच्या आत एक नव्या प्रकारची इमारत बांधल्याचा आनंद देणारं काम. त्यानंतर नवी इमारत बंधणारे पत्ता शोधत येतील माझा. आता अमेरिकेत असलेले आणि मैसूर-बेंगळुरूला स्थायिक होणारेही राममूर्तींनी सुचवल्यावरून माझ्याकडे येतील. दर वर्षी आठ-दहा लाख सहज मिळतील. हे काम केलं नाही, तर त्याचाही याच वेगानं प्रसार होईल. नवी कामं मिळणं कठीण होईल. व्यवसायात फार मोठा फटका बसेल. उगाच कसलीतरी कामं करून पोट भरायची पाळी येईल. समाधान देणारी कामं हाती येणार नाहीत.

'पण जास्तीची कामं स्वीकारून एवढा पैसा मिळवून मला काय करायचंय? आहे ते गेलं म्हणून तरी काय होणार आहे? जीवनातच हरल्यानंतर व्यवसायात हरणार नाही असं म्हणणं म्हणजे मूर्ख हट्टच!'

संध्याकाळपर्यंत तो तसाच पडून होता. मन थोडं शांत झालं होतं, तरी निर्णयात काहीही फरक झाला नव्हता. 'अजून उद्याचा दिवस आहे.' म्हणत तो उठला. संध्याकाळची दिव्याची आरास बघायला येणाऱ्यांची गर्दी वाढू लागली तसा तो निघाला. कॉफी न घेता त्यानं स्कूटर सुरू केली.

तो हरला होता, हे त्याला समजत असलं, तरी असं का व्हावं हे त्याला नेमकं समजत नव्हतं. 'एका स्त्रीनं झिडकारलं म्हणून संपूर्ण जीवनच हरल्यासारखं व्हावं?'

रात्रीही नेहमीप्रमाणे लवकर झोप लागून त्याला मध्यरात्री जाग आली. त्यानं घड्याळात पाहिलं. बारा वाजले होते. नकळत बोटं तिचा नंबर फिरवू लागली. पाठोपाठ आठवलं, 'ती गावात नाही.' रिसीव्हर जागेवर ठेवून तो झोपला. झोप येणार नाही हे ठाऊक असल्यामुळे त्यानं तसा प्रयत्नही केला नाही.

कबूल केल्याप्रमाणे रविवारी सकाळी नऊ वाजता त्यानं जलजाला फोन केला, "तुम्ही राममूर्तींना नवा आर्किटेक्ट ठरवून द्या. त्यांना त्यासाठी एक फेरा पडेल. मी आतापर्यंत केलेले सगळे प्लॅन्स त्यांना देईन. नगरपालिकेचं लायसेन्सचंही काम झालंय. त्याचा मी आजपर्यंत एक रुपयाही घेतलेला नाही. त्यांना या कामाचे पैसे वळते करायला सांगा म्हणजे हा फेरा त्यांच्या अंगावर पडणार नाही. खरोखरच मला काम करायची इच्छा नाही. ते इथं आल्यावर त्यांना ज्या पद्धतीनं कागद करून हवा असेल, तसा मी देईन."

"पण मला काय म्हणायचंय...."

"सॉरी. मला खरोखरच कामात रस नाही. नंतर सवडीनं केव्हातरी भेटेन तुम्हाला मी." म्हणून त्यानं बोलणं थांबवलं.

हे स्पष्टपणे सांगितल्यावर त्यानं सुटकेचा नि:श्वास सोडला. त्याच वेळी अंतर्मनात खोलवर

एक प्रकारची निरर्थकताही जाणवत होती. 'काम करण्यात आस्था नाही. काहीही न करता जगण्यात तरी काय अर्थ आहे?' अंघोळ-दाढी या रोजच्या आन्हिकांतला रसही निघून गेला होता. बाहेर जाऊन नाश्ता-पाणी करायचं. जाऊ नंतर म्हणत त्यानं बराच वेळ काढला. दोन-अडीच वाजल्यानंतर गळल्यासारखं वाटून तो जेवणासाठी बाहेर पडला. पुन्हा वृंदावन गार्डनला जावंसं वाटलं. पाठोपाठ आठवलं, 'रविवार म्हटल्यावर दुपारपासूनच तिकडे माणसांचे लोंढे वाहायला सुरुवात झाली असेल. मग कुठं जायचं?' विचार करून निर्णय घेणंही त्याला नकोसं वाटलं. तो घरीच पडून राहिला. त्याला थोडी झोप लागली. पाच वाजता उठून पायीच कुक्करहळ्ळी तलावापर्यंत जाऊन, तिथल्या बाकावर दोन तास बसून, येताना जेवण करून तो रिक्षानं घरी आला. 'माझ्या मनाला विश्रांतीची गरज असावी म्हणून कामातला रस नष्ट झाला असावा.'

पुन्हा डुलकी लागत असतानाच तो फोनच्या आवाजानं दचकून जागा झाला. 'तिचा फोन!' त्यानं रिसीव्हर उचलला, पण त्या क्षणी संपर्क तुटला. तो निराश झाला. रॉंग नंबर असावा. 'छे:! काय वैताग आहे. आणखी थोडा वेळ झोप लागली असती.' टेलिफोन खात्याला शिव्यांची लाखोली वाहात तो अंथरुणावर पडून राहिला. मन विश्रांती मागत होतं. 'जीवनातलाच रस नष्ट झाल्यावर कामात रस कुठून राहणार?'

एकाएकी त्याला तीव्रपणे जाणवलं, 'हा रॉंग नंबर नव्हता. तिचाच फोन होता. तिनं नंबर फिरवला आणि मी रिसीव्हर उचलण्याआधी मन पालटल्यामुळे पुन्हा ठेवून दिलाय.' तो ताडकन उठून बसला. दिवा लावून त्यानं तिचा नंबर फिरवला. एन्गेज्ड. पुन्हा फिरवला तरी एन्गेज्ड टोन ऐकू येत राहिला. 'या रात्री ही कुणाला फोन करणार आहे?'

तो घाईनं उठला. शर्ट-पँट चढवून, घराला कुलूप लावून स्कूटर सुरू केली. एकीकडे मनात आलं, 'घरात तिचा नवरा असेल तर? किंवा कुणी गावाहून आलं असेल तर? अशा अपरात्री मी तिथं जाऊन... छे:! यातलं काहीही खरं नाही. ती हातात रिव्हॉल्वर घेऊन बसली आहे किंवा एव्हाना गाडी घेऊन टेकडीवरच्या त्या दरीच्या तोंडाशीही गेली असेल.' त्यानं स्कूटरचा वेग वाढवला. तिच्या घरापाशी वेग कमी करून पाहिलं. तिथं कुठलीही हालचाल दिसली नाही. तसाच वेग वाढवून तो टेकडीकडं निघाला. स्कूटरचा तो वेग धोक्याचा होता हे समजत असलं, तरी आणखी काही अनाहूत घडण्याआधी पोहोचलं पाहिजे या विचारानं त्यानं वेग कमी केला नाही. पहिलं वळण... दुसरं वळण... रस्त्याबरोबर स्कूटरही वेगानं वर चढत होती. लंबवर तिच्या गाडीचा मागचा लाल दिवा दिसू लागला. त्यानं पुन्हा वेग... 'छे:! या वाहनाच्या वेगाची हीच मर्यादा. तिलाही स्कूटरचा उजेड दिसला असेल. आवाजही ऐकू आला असेल. मीच आलोय हेही तिनं ओळखलं असेल.' लाल दिवे मोठे होऊ लागले. तिची विटक्या रंगाची जुनी गाडी स्पष्ट दिसू लागली. तोच नंबर. आत स्टेअरिंगपाशी ती बसली होती, हे अंधारातही त्याला जाणवलं. तो तिच्या शेजारच्या दारापाशी थांबून म्हणाला, "फोन का कट केलास? रिसीव्हर का काढून ठेवलास?"

तिनं मान वळवली नाही हे अंधारातही त्याच्या लक्षात आलं. त्यानं खिडकीतून हात घालून तिचं डोकं आपल्याकडे वळवत पुन्हा तोच प्रश्न विचारला, "का कट केलास? उत्तर दे."

"तू वेड्यासारखी धाव घ्यावीस म्हणून! सांग, तू का इथं आलास?" तिनंही चढ्या

आवाजात विचारलं. त्यानं काही म्हणायच्या आत तीच म्हणाली, “मी कुणालाही फोन केला नव्हता. तुमचीच कुणी गर्ल फ्रेंड असेल. तिकडं जायचं सोडून इथं का आलात मला छळायला?”

“सांगतो का आलो ते; पण ही काही निवान्त बोलत बसायची जागा नव्हे. चल, तुझ्या किंवा माझ्या घरी जाऊ या. मग सगळं सांगेन.” तो शांतपणे म्हणाला.

“मी येणार नाही. इथंच काय बोलायचं ते बोला.” स्वत:ला त्याच्या पकडीतून सोडवून घेत ती म्हणाली.

“ही या वेळी गप्पा मारायची जागा नव्हे.”

“या जागी जे करायचं ते करून घेईन मी.”

“तेच टाळण्यासाठी आलोय मी.”

“नतद्रष्ट! पापी माझं दुर्दैव! मी काहीही करायला गेले की, हा आडवा पडतोय.” ती बेभान होऊन बडबडू लागली. त्यानं तिला अडवलं नाही. ती थोडी शांत होईपर्यंत तो तसाच उभा होता. नंतर तो तिला ठामपणे म्हणाला, “गाडी वळव आणि थेट माझ्या घरी ये. मी पुढं जातो.”

“माझं घर! तुझं घर! का? माझं घर तुझं नाही?” ती भडकून म्हणाली.

“घरात मुलं आहेत. बोलायला मोकळेपणा मिळत नाही म्हणून मी तसं म्हणालो.”

“तेवढंच कारण असेल, तर जयलक्ष्मीपूरचं घर आणि ललितमहाल रस्त्यावरचं घर म्हणायचंस. माझं घर-तुझं घर असं एवढ्यातच दोन वेळा म्हणालास. चांगलं आठवतंय मला.”

“सॉरी, जयलक्ष्मीपूरच्या घरी चल.”

“मुलांना घाबरायची काही गरज नाही.” म्हणत तिनं गाडी सुरू केली. गाडी वळवून घेईपर्यंत तो तिथंच उभा होता. नंतर तो तिच्या गाडीमागून निघाला. गॅरेजचं दार उघडून गाडी आत ठेवताना ती म्हणाली, “स्कूटर आत ठेव. आपलं बोलणं संपेपर्यंत उजाडेल. त्यानंतर झोप काढ तू.”

आत गेल्यावर तिनं त्याला लुंगी दिली. मुलांना जाग आली तर समजावं म्हणून तिनं त्यांच्या खोलीच्या दाराची कडी अर्धवट सारून ठेवली. गेस्टरूममधल्या वेताच्या सोफ्यावर त्याच्या शेजारी बसत त्याचा हात हातात घेत ती हलक्या आवाजात म्हणाली, “अगदी पहिल्यांदाच तुला एक गोष्ट सांगून मोकळी होते. क्षमा मागण्यासाठी नव्हे. केलेली चूक पुन्हा करणार नाही, याची खात्री नसेल, तर त्या क्षमा मागण्याला काय अर्थ आहे. माझ्या तसल्या बोलण्याला काहीच अर्थ नाही. त्या दिवशी काय झालं हे तू निघून गेल्यावर माझ्या लक्षात आलं. मी तुझं मनगट चावलं. वेदना सहन न झाल्यामुळे तू स्वत:ला सोडवून घेण्यासाठी

माझ्या पोटरीवर लाथ मारलीस. त्या वेळी तुझ्या पायात बूट होते एवढंच! पण त्या मन:स्थितीत मला हा फरक कुठून समजणार? मी तुला चपलेनं मारलं. एकूण तेरा वेळा मारलं. कितीही वाईट मन:स्थितीत असतानाही माझी स्मरणशक्ती मात्र तीव्र असते. तू त्या दिवशी काय चुकलास सांग बरं?"

"संतापाच्या भरात मी तुझ्यावर हात उगारायला नको होता." तो पश्चात्तापानं म्हणाला.

"एकदा मारायला सुरुवात केल्यावर तू निम्म्यावर का थांबलास? मी काही मेले नसते तेवढ्यानं. तेवढी मी नशीबवान नाही. स्वत:ची हत्या करणं हेच नशिबात आहे माझ्या! ते जाऊ दे. तू मध्येच का थांबलास मारायचा?"

त्यानं काहीच उत्तर दिलं नाही.

तीच उत्तर देत म्हणाली, "कारण तो तुझा मार्ग नव्हता. त्यामुळे तू हरणं स्वाभाविकच होतं. मी जेवढ्या सहजपणे तशी वागू शकते तसं माझ्या सोन्याला नाही जमणार!" म्हणत तिनं त्याची गुंतवलेली बोटं घट्ट धरली. त्यानं तिला जवळ ओढून घेतलं. दोघांही कितीतरी वेळ मौनपणे बसून राहिले.

गेले कित्येक दिवस छळत असलेला "जीवनात काय अर्थ आहे?" हा प्रश्न त्याच्या मनातून अदृश्य झाला होता. तिच्या जीवन-प्रवाहाशी एकरूप होत असल्याची भावना दृढ करत त्यानं विचारलं, "मी गेल्यावर तू काय केलंस?"

"तू गेल्यावर मी काय केलं?" तिनं स्वत:लाच विचारलं आणि अंतर्मुख होऊन सांगू लागली, "तू यायच्या आधी काय झालं होतं तेच तुला मी सांगितलं नाही. ती पार्श्वभूमी ठाऊक नसेल, तर मी नंतर काय केलं हे कसं तुला समजणार? पण थांब. तू जेवलास? अलीकडे तू दिवसातून तीन-तीन वेळा सकस जेवण घेतोस असं दिसतंय!" त्याच्या गळ्याजवळ वर आलेल्या हाडांवरून बोट फिरवत तिनं विचारलं.

त्यानंही हसत विचारलं, "आणि तू? दिवसातून सहा वेळा जेवतेस वाटतं!"

ती प्रसन्नपणे म्हणाली, "थांब खायला काहीतरी घेऊन येते." थोड्या वेळात ती एका ट्रेमध्ये दहा-बारा बिस्किटं, सोललेलं संत्र, सफरचंदाच्या फोडी, दोन ग्लास बोर्नव्हिटा आणि पाण्याचे ग्लास घेऊन बाहेर आली. त्यानं लाउंजमधलं टिपॉय आत आणून ठेवलं. पुन्हा त्याच्या शेजारी बसत दोन बिस्किटं आणि सफरचंदाच्या फोडी त्याला खाऊ घातल्यावर ती सगळी हकिकत सविस्तरपणे सांगू लागली. ट्रेमधलं सगळं खाऊन होईपर्यंत मुलांचं मन कलुषित करायचा काकूचा डाव, त्यासाठी राजीनामा देऊन घरी कसं राहावं लागलं, दुसऱ्या दिवशी कसं काकूला पळवून लावलं, त्याआधी काकू आदल्या रात्री आपल्याशी काय बोलली हे सगळं तिनं सांगितलं.

तो म्हणाला, "प्रिन्सिपॉलबाई बोलल्या म्हणून तू राजीनामा द्यायला नको होतास. आणखी दोन दिवस मेडिकल लीव्हची चिठ्ठी दिली असतीस, तरी चाललं असतं. घाई केलीस तू. पगार

हा काही एकच महत्त्वाचा मुद्दा नाही. तुझं मन गुंतून राहायला ती एक जागा होती ना! मागंही हेच सांगितलं होतं मी तुला.”

“मन गुंतवायला कॉलेजच का हवं? तुझ्यातच ते गुंतलेलं राहू दे म्हणून तो पाश तोडला मी.” ती एकाएकी प्रसन्न होऊन म्हणाली, “दिवसाचे चार तास मी कॉलेजमध्ये गेले, तर तेवढीच सुटका होईल असा तुझा विचार आहे ना? खरं सांगू? पूर्णपणे लक्ष देऊन वर्गात शिकवणं मला शक्य नव्हतं. कनिष्ठ दर्जाचं काम करून पूर्ण पगार घेणं मला पटण्यासारखं नव्हतं. तुला काय वाटलं? त्या बयेला निरुत्तर करण्याइतका शहाणपणा नाही म्हणून मी राजीनामा दिला?”

हे त्यालाही पटलं. कारण त्याचाही तोच अनुभव होता. तरीही त्यानं राममूर्तींचं काम हातातून गेल्याचं तिला सांगितलं नाही. त्यानं पुढं विचारलं, “मग काय झालं?”

“काकू निघून गेल्यावर बधिर होऊन मी नुसती बसून राहिले होते. तुलाही फोन केला नाही. पूर्णपणे तिच्या प्रभावाखाली मी गेले होते. एकीकडे सगळं समजत असतानाच नाही त्या गोष्टीवर विश्वास ठेवायला लावणारी ही अवस्था! तू येऊन गेलास. तुला मी कितीतरी प्रकारच्या नरकयातना दिल्या आहेत सोमू! त्यातलं एक महापातक! मला क्षमा करशील? तू क्षमा केली नाहीस, तर मला पुढं बोलणं अशक्य होईल.” त्याचा चेहरा तिनं ओंजळीत घेतला आणि म्हणाली, “त्या दिवशी दुपारी तू भुकेजून आला होतास. मी तुझ्याशी भांडण काढणं हे नेहमीचंच आहे, पण त्या दिवशी मी तुला जेवू न घालता उपाशीपोटी पिटाळून लावलं. तू मला त्यासाठी क्षमा करशील, पण देव कधीही क्षमा करणार नाही.”

तिला अडवत तो म्हणाला, “आपल्यामध्ये क्षमा, अपराध वगैरे शब्द येता कामा नयेत. पुढं काय झालं?”

“क्षमा नाही मागत मी. पण तुला ‘माझं बाळ’ म्हणायचा हक्क मात्र गमावलाय मी. भांडलं, मारलं, रागावलं तरी भुकेल्या पोटी तुला बाहेर काढलं मी! तुला कशी ‘माझ्या सोन्या...’, ‘माझं बाळ’ म्हणू मी?” म्हणून ती हुंदके देऊन रडू लागली. तो मुकाट्यानं तिचा अश्रूंनी चिंब होणारा चेहरा पाहत राहिला. तिचं समाधान कुठल्या शब्दात करावं हे त्याला समजत नव्हतं. तिचा आवेग कमी झाल्यावर त्यानं विचारलं, “नंतर काय झालं?”

“त्यानंतर...” ती पुन्हा आठवून सांगू लागली, “सगळा राग तुझ्यावर काढल्यानंतर कितीतरी वेळानं माझा मेंदू काम करू लागला. काकू किती खोटारडी आहे, हे मलाही ठाऊकच होतं. ती बोलली त्यातला शब्दन्शब्द तपासून पाहायचं मी ठरवलं. तिनं सांगितलं होतं, तिची मुलगी लीला सासरी सुखी नाही. तिचा नवरा बाहेरख्याली आहे वगैरे. हे सांगून आपण माझं लग्न आपल्या भावाशी लावून माझं कल्याणच कसं केलंय हे ती माझ्या मनावर ठसवू पाहत होती. मी लीलाची मैत्रीण - चंद्रकलेच्या घरी - विकासची मैत्रीण राजीच्या घरी गेले. मला बघताच ती घाबरीघुबरी झाली. तिच्या तोंडून शब्दच फुटेना. मीच सावकाश गप्पा मारायला सुरुवात केली. तिच्यावर कुठलाही दोषारोष न करता बोलण्याच्या ओघात लीलाचा विषय काढला आणि सहजच चौकशी केली, “कशी आहे ती? तिच्या नवऱ्याचा व्यापार कसा म्हणतो?” बोलायचा विषय मिळाल्यामुळे खूपच मोकळेपणानं ती ‘लीला कशी नशीबवान

आहे' हे सांगू लागली. यंदा नवऱ्यानं तिच्यासाठी कसा किमती हिऱ्यांचा नेकलेस केलाय, दर सुट्टीला नवरा-बायको कसे हिल स्टेशनवर हवापालटासाठी जातात, अधूनमधून नवरा-बायको सासुरवाडीला जाऊन काकूलाही भेटून येतात, महिन्यापूर्वी दोघं काश्मीरला गेले होते वगैरे सांगत त्याच उत्साहात तिनं आपल्याला पाठवून दिलेला तिथला दोघांचा फोटोही आणून दाखवला. फोटोमध्ये दोघांच्या चेहऱ्यावर आनंद-उल्हास-प्रेम ओसंडत होतं. म्हणजे काकूच्या बोलण्याचा आधारस्तंभच खोटेपणावर आधारला होता!

"काकू त्या दिवशी घरी येण्याआधी तिच्या घरी जाऊन आली होती या विषयी मला शंकाच नव्हती. चंद्रकलेनंच आपल्या दोघांविषयी तिच्याकडे चुगली केली असावी. विजय-विकास चंद्रकलेच्या राजीबरोबर खेळायला त्यांच्या घरी जातात ना, त्या वेळी मुलांना बोलतं करून त्यांच्या नकळत तिनं माहिती जमवली असावी. बेंगळुरूला जाताना मी मुलांना सुशीलम्मांच्या घरी ठेवलं होतं. परीक्षेच्या कामाचं निमित्त सांगितलं होतं. हिनं कॉलेजमध्ये फोन करून मी ओ. डी. घेतली आहे की सी.एल. याची चौकशी केली असेल. नंतर तुझ्या ऑफिसमध्ये फोन करून खात्री करून घेतली असेल. चंद्रकला हे सगळं करू शकेल अशीच आहे. मी मुलांना खोदून विचारलं तेव्हा यातलं सगळं खरं निघालं. ती मुलांना अधूनमधून 'अम्मा काय करते?', 'तिचं कॉलेज केव्हा संपतं?', 'तुमचे अंकल केव्हा घरी येतात?' वगैरे चौकशी करत होती. बेंगळुरूला गेलो होतो तेव्हाही विचारत होती.

"मला बेंगळुरूला जाण्याआधी तिनं पाहिलं नव्हतं. तसं दररोज सुशीलम्मा पाहायच्या. लक्ष देऊन पाहिलं, तर माझ्यातला फरक त्यांना समजणं अशक्य नव्हतं. त्या चंद्रकलेपाशी काही बोलल्या असतील काय? कोण जाणे? माझ्या समजुतीप्रमाणे तरी सुशीलम्मा त्यातल्या नाहीत. तरीही खात्री कोण देणार? काही का असेना, काकू संपूर्ण तयारीनिशी आली होती हे नक्की. माझ्यावर कुठलाही सरळ आरोप न करता, तरीही आपल्याला सगळं तपशीलवार ठाऊक आहे हे दाखवून, तुझ्या नवऱ्याला यातलं काहीही सांगणार नाही, असा एकीकडे विश्वास दाखवून... व्वा! त्या दोनच दिवसांत मुलांना आपल्याकडे वळवण्यातही ती यशस्वी झाली आहे, हेही मला विद्ध करत होतं. हिच्याशी सतत डावपेच आखतच सावधपणे राहायला पाहिजे काय? की तिला एकदम कायमची दूर करायची? दूर करायची असेल, तर त्यावर मार्ग कुठला? विचार करकरून मेंदू शिणून गेला. अखेर ठरवलं, हिनं माझी फसवणूक करायला सुरुवात केली, तिथंच वार करणं आवश्यक आहे. फक्त दूर करायचा प्रश्न नाही. कापून टाकायचा निर्णय घेतला. नंतर मी काय केलं असेल सांग बघू?."

समोरच्या ट्रेमधलं सगळं संत्र सोलत ती पुढं म्हणाली, "घरात अशी सढळ हातानं फळं आणण्यासारखी समृद्धी माझ्या घरी कधी होती? आता ती आली आहे. कशी आली असेल सांग."

त्याला काही सुचलं नाही. ती मुलाच्या उत्साहानं पुन्हा म्हणाली, "प्रयत्न कर. तुला आणखी थोडा वेळ देते."

तो विचार करत म्हणाला, "मैत्रिणीच्या वडलांना भेटून तू काकूवर केस घातलीस काय?"

"सोमू! किती हुशार आहेस तू? तू मला सल्ला दिलास तेव्हा किती संतापले होते मी

तुझ्यावर! नंतर एक दिवस तेच मला योग्य वाटलं. वीरप्पगौडांनीही अजून केस करता येईल म्हणून सांगितलं होतं. दोन्ही मुलांना सोबत घेऊन मी गाडी घेऊन सकलेशपूरवरून त्यांच्या जेनुकल इस्टेटवर गेले. श्वेता आता अमेरिकेत असते. तिचा नवरा तिथं डॉक्टर आहे. ती त्यांची एकुलती एक मुलगी. मला बघताच त्यांना लेक भेटावी एवढा आनंद झाला. त्यांच्या प्रकृतीची चौकशी, श्वेताची हालहवाल वगैरे बोलून झाल्यावर मी त्यांना माझ्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध कोर्टात जायचा निर्धार बोलून दाखवला आणि विनंती केली, "मला कोर्ट-कचेरीची काहीही माहिती नाही. तुम्ही मला मार्गदर्शन करा." सगळं ऐकून त्यांनी सांगितलं, "हासनमध्ये आमच्या सकलेशपूरचे मळली वेंकटेशय्या नावाचे फार मोठे नावाजलेले वकील आहेत. वकील म्हणजे नुसता वाघ आहे वाघ! फी जास्त असते त्यांची; पण विरोधी पार्टीच्या उष्ट्या-खरकट्याच्या मोहात न पडणारा माणूस! समोर कोट रुपये ठेवून मोहात पाडायचं म्हटलं, तरी डाव्या पायातल्या बुटानं ठोकरून जाईल अशी त्याची नियत!" त्यांच्याकडे घेऊन जातो. त्यांच्याबरोबर मी एकटीच गाडीनं हासनला गेले. वकील भेटले. त्यांनी सांगितलं, "आणखी थोडा उशीर झाला असता, तर वेळ टळून गेली असती. आता केस दाखल करता येईल. मात्र मी सांगेन ती सगळी कागदपत्रं मला मिळवून द्यावी लागतील." सोबत त्यांनी आपला एक असिस्टंट दिला. सकलेशपूरच्या रजिस्ट्रार ऑफिसमधून तिनं मुलांच्या नावानं घेतलेल्या इस्टेटींच्या नकाशांच्या प्रती मिळवण्यात तीन दिवस गेले. हासनच्या वल्लभ व्यंकटरमण शेट्टींच्या दुकानात सोन्याच्या खरेदीची चौकशी करायला गेले. सुरुवातीला त्यांनी "कुठला व्यवहार, मला ठाऊक नाही." म्हणून उडवून लावायचा प्रयत्न केला. पण "हे पाहा, कोर्टाचं काम आहे. उद्या कोर्टात मळली वेंकटेशय्यांना तोंड द्यावं लागेल." असं वीरप्पगौडांनी सांगिल्यावर मात्र त्यांनी मुकाट्यानं हवं ते सहकार्य दिलं. "सगूर इस्टेटच्या जयलक्ष्ममांनी एकंदरीत आठ शेर सोनं घेतलंय." म्हणून प्रत्येक वेळच्या खरेदीचा तपशीलही दिला. लीलाच्या लग्नाच्या वेळचा तपशील मलाही ठाऊक होता. त्याचा उपयोग उलटतपासणीत करून घेता येईल, असं वकील म्हणाले. नंतर त्यांनी सांगितलं, "आता तुम्ही गावी जायला हरकत नाही. मी संबंधित पार्टीला नोटीस पाठवून देतो." एकूण पाच दिवस मी वीरप्पगौडांच्याच घरी होते. मुलं श्वेताच्या आईसोबत, मंगळम्मांबरोबर राहायची. नंतर मुलांबरोबर इस्टेटवरही जाऊन आले. मनात आलं, 'मैसूरमध्ये तरी आता काय ठेवलंय? इस्टेटवरच का राहू नये?' असं का मनात आलं समजलं?"

तो काहीच बोलला नाही.

"हे बघ. मनाची विचित्र स्थिती असताना मी कशीही वागले, तुझ्यावर हात उगारला तरी त्यात काही अर्थ नसतो; पण तू अविचारीपणे वागणारा- बोलणारा माणूस नव्हेस. बोलल्यानंतर तू विसरणारही नाहीस. 'या घराचा उंबरा ओलांडणार नाही' असं सांगून निघून गेल्यावर पुन्हा तुझ्याशी बोलायचं धैर्य माझ्यामध्ये कुठून येणार? मी नोकरी तर सोडलीच होती. तू पुन्हा दारात येणार नाहीस म्हणून निघून गेला होतास. मग मैसूरमध्ये का राहायचं? इस्टेटवर राहिल्यावर खर्च तरी आटोक्यात आणता येईल, वेळही जाईल असं वाटलं. पण तरीही मला मैसूर सोडणं शक्य झालं नाही. का ठाऊक आहे?"

"का?"

"ही तुझी मस्ती हं! सगळं ठाऊक असून माझ्या तोंडून स्वत:चं कौतुक ऐकायचंय ना?

सांगते. आज ना उद्या कधीतरी तू परत येशीलच याचा विश्वास वाटून मी इथंच राहिले. हे गावच सोडून गेले असते, तर तुझी भेट होण्याची शक्यताच नष्ट झाली असती ना! दररोज तुला फोन करायची दुर्दम्य आशा मनात निर्माण होत होती; पण तू काय करशील याची भीतीही वाटत होती. त्यामुळे उचललेला रिसीव्हर मी पुन्हा जागेवर ठेवत होते. आज घरी आल्या आल्या राखणीसाठी ठेवलेल्या नोकरानं मध्यरात्री एक फोन आल्याचं सांगितलं. फोन तुझा होता, या विषयी मनात शंका नव्हतीच; पण मी गावाहून आले तीच मुळी शून्य भावनेत घेरली जाऊन.

"या खेपेला जाताना मी गाडी नेली नव्हती. एकटीनं ड्राइव्ह करायचाही कंटाळा येतो. येताना मनात शून्य भावना भरून गेली होती आणि पाठोपाठ मरण्याची दुर्दम्य इच्छा! समोरून येणारा ट्रक किंवा बस दिसली की, त्यावर आदळून चूर होऊन जावंसं वाटत होतं. दुपारभर त्याच भावनेत होते. यापूर्वी संध्याकाळी ही भावना मनात भरायला सुरुवात होई. आज तर ट्रिगर ओढून सगळं संपवायचं निश्चित ठरलं होतं. त्या आधी एकदा तुझा आवाज ऐकायची आशा मनात निर्माण झाली. मध्यरात्री तू फोन केल्याचं नोकरानं सांगितलं नसतं तर? पण त्यानं सांगितल्यामुळे तुझा नंबर फिरवायचं धैर्य मनात निर्माण झालं. म्हणून मी सांगते ते ऐक, मी तुला घरातून हाकललं, मारलं, तुझा-माझा संबंध नाही म्हटलं, तरी तू मला 'जा' म्हणता कामा नये. समजलं? मला अतिशय भीती वाटते त्याची!"

त्याचं मन भरून आलं. तिचा हात घट्ट धरत तो म्हणाला, "कधीही म्हणणार नाही."

"म्हणजे तोंडानं म्हणणार नाही. मनात ठेवून वागेन असंच म्हणायचंय ना तुला?"

"हा वाकडा अर्थ लावायचं सोडून दे बघू! या वेळी एकटी का गेली होतीस?"

"प्रत्येक वेळी मुलांना का प्रवासाचा त्रास द्यायचा? म्हणून सुशीलम्मांच्या घरी ठेवून गेले होते. आणखी एक तुला सांगायचं राहिलं. वीरप्पगौडांच्या पत्नी मंगळम्मा इतक्या प्रेमळ आणि लाघवी आहेत म्हणून सांगू! नाटकीपणाचा कणभरही लवलेश नाही. मुलांना त्यांच्यासोबत ठेवून मी वीरप्पगौडांबरोबर कामासाठी फिरत होते. त्यामुळे मंगळज्जीशी मुलांचं चांगलंच सूत जमलं. एकदा विकासनं त्यांना विचारलं, "अम्मा दररोज सकलेशपूरला का जाते?" विजयही तिथंच असताना त्यांनी सांगितलं, "तुमच्या आजीनं तुम्हा दोघांना खूप फसवलंय. तुमच्या इस्टेटमधले पैसे खाल्लेत. ते वसूल करण्यासाठी तुमची अम्मा धावपळ करतेय." विजयचा आजीवर पराकोटीचा जीव. त्याचा त्यावर विश्वास बसला नाही. नंतर त्यानं मलाही विचारलं. मी तरी खोटं कशाला सांगू? मीही 'होय' म्हटलं. आजी चंद्रकला आंटीच्या घरी आली, पण आपल्याला मात्र तिनं सांगितलं नव्हतं याचीही आठवण करून दिली. मुलांपुढे असं बोलणं हीनपणाचं आहे हे समजत असूनही माझा नाइलाज झाला. या वेळी जाताना मुलांना सुशीलम्मांकडे सोडून सांगितलं, "तुम्ही चंद्रकला आंटीच्या घरी जाऊ नका. ती तुम्हाला अम्मा कुठं गेली, का गेली म्हणून विचारते. तुम्ही सांगितलं तर आपलं आणखी नुकसान होईल." तसंच सुशीलम्मांनाही सांगितलं, "मुलं तिच्या घरी जाणार नाहीत याकडे लक्ष असू द्या." "

"ते ठीक झालं. केसचं पुढं काय झालं? त्यांना नोटीस पोहोचली? त्यांनी उत्तर काय दिलं?"

“सांगते. आमचे वकील एकदम तयारीचे आहेत हं! आवश्यक असलेले सगळे कागद हातात पडल्याशिवाय केस उभी करायची नाही आणि त्यातला तपशील कुठूनही बाहेर जाता कामा नये असा त्यांचा नियम. चार दिवसांत त्यांच्या असिस्टंटचा फोन आला म्हणून पुन्हा जावं लागलं. फोनवरच त्यानं सांगितलं होतं, “तुमकूरला जावं लागेल. त्या तयारीनंच या.” मुलांना सोडून एकटीनंच बसनं हासनला गेले. काकूनं आपल्या भावासाठी तुमकूरच्या इंजिनियरिंग कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतली होती ना! त्याचा तपशील मिळवायचा होता. “कारकुनाच्या हातावर काहीतरी ठेवून माहिती काढण्याच्या बाबतीत शिवरामय्या तयार आहेत. पण वरच्यांशी बोलायचा प्रश्न आला, तर असू दे म्हणून तुम्ही या.” असं सांगून वकीलसाहेबांनी मला पाठवलं. डोनेशनच्या वेळी २० हजारांचा डी. डी. सकलेशपूरच्या बँकेतून काढला होता. त्यानंतर प्रवेश फी एक हजार तीनशे रुपये वगैरे वगैरे. त्यांच्या पावत्यांचे नंबर शोधून काढले. रंगनाथ राहत असलेल्या होस्टेलजवळच्या बँकेत त्याच्या नावाचं खातं आहे का ते पाहिलं. तसं खातं होतं आणि त्यात वेळोवेळी सकलेशपूरच्या खात्यातून पैसे पाठवल्याच्याही नोंदी सापडल्या. नंतर पुन्हा हासनवरून सकलेशपूरला आलो. तिथल्या बँकेत जाऊन पाहिलं तेव्हा काकूच्या खात्यातले पैसे पाठवण्यात आल्याचं दिसून आलं. माझ्या इस्टेटीची आर्थिक उलाढालही ती त्या खात्यातूनच करत होती. त्या खात्याच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंतच्या नोंदी नजरेखालून घातल्यावर तिनं विकत घेतलेल्या इस्टेटीशी सरळ संबंध दाखवून देता येईल अशा कितीतरी नोंदी शिवरामय्यांच्या सराईत नजरेनं टिपल्या. सगळ्या नोंदी घेऊन आम्ही हासनला मोठ्या वकिलांकडे आलो.

“बँकेचं सगळं रेकॉर्ड बारीक तपासल्यानंतर त्यांनी सांगितलं, “आता तुम्ही केवळ काकू आणि तिच्या मुलांवर दावा न लावता बँकेवरही दावा लावा. तुम्ही इस्टेटीच्या वारस असताना त्यांनी तुमच्या काकूला एवढ्या मोठ्या रकमेची कर्जं दिलीच कशी? तुम्ही सज्ञान झाल्यानंतरही यातला एक व्यवहार झाला आहे. इथं बँक-मॅनेजरनं पैसे खाल्ले आहेत. त्याशिवाय हे शक्य नाही. या क्षणापासून तुम्ही बँकेचं व्याज देणं बंद करा. आतापर्यंत तुम्ही दिलेले पैसेही व्याजासह ओकायला लावतो. यानंतर तुमचं काम झालं. मी बोलवेन तेव्हा तुम्ही फक्त हजर राहायचं. या दोन्ही इस्टेटी तुमच्या झाल्या आहेत असं खुशाल समजायला हरकत नाही. कोर्टाची कामं वेळ घेतील; पण तोपर्यंत दोन्ही इस्टेटींचा व्यवहार कोर्टानं नेमलेला मॅनेजर पाहील. त्यांनी इस्टेटवर राहता कामा नये. निकाल लागेपर्यंत त्यांना प्रत्येक कुटुंबाला दरमहा अमुक इतके रुपये देण्यात येतील. त्यांना बँकेचा व्यवहार करता येऊ नये म्हणून आणखी एक दावा दाखल करतो. या इस्टेटी त्यांच्या नावावर विकत घेतलेल्या असल्या, तरी त्यांचा फायदा आपल्याला मिळायला हवा. ते कागदपत्र आपल्याकडे हवे हा आपला वाद. तुमची केस काय आहे ते तुम्हाला समजावं म्हणून सांगतो. इथं सही करून जा.” असं सांगून त्यांनी आणखी एकीकडेही सही घेतली.

“मी निघाले तेव्हा त्यांनी मला बोलावून सांगितलं, “या केससाठी तुम्ही पैसा खर्च करत आहात आणि मी बुद्धी, अनुभव. जिंकलो, तर तुम्हाला तीस-चाळीस लाख रुपये मिळतील आणि मला समाधान! आपण जिंकलो किंवा हरलो तरी तुम्ही माझी फी द्यालच; तरीही तुम्हाला एक गोष्ट सांगून ठेवतो. अशा घरगुती खटल्यांमध्ये केस दाखल झाल्यानंतर प्रतिवादी तुम्हाला घाबरवतील, पाया पडतील, मध्यस्थांकडून दडपण आणतील. देवा-भुताच्या आणि स्वप्नांच्या गोष्टी सांगतील, शपथा-आणा मध्ये आणतील. त्याला तुम्ही बळी पडता कामा नये.

मध्येच खटला थांबवून तुम्ही 'आम्हाला परस्परांशी भांडायचं नाही. खटला मागं घ्यायचाय' म्हणू लागलात, तर तुमच्यासाठी एवढी तयारी केलेल्या वकिलाचं स्थान काय राहिलं? एकदा केस केल्यावर जिल्हाकोर्ट, हायकोर्ट, सुप्रीमकोर्ट मध्येच कुठंही न सोडता टोकापर्यंत न्यायला पाहिजे. तुम्हाला उदारपणाच दाखवायचा असेल, तर नंतर एक दानपत्र करून मोकळे व्हा. तोपर्यंत मात्र मन डळमळीत होऊन चालणार नाही. मळली वेंकटेशय्या म्हणजे तुमच्या इशाऱ्यानुसार धावणारा आणि शिटी मारल्यावर थांबणारा शिकारीचा कुत्रा नव्हे! हवं तर अजूनही नीट विचार करा." बँकेतल्या नोंदी पाहिल्यामुळे मीही तिच्यावर संतापले होते. मी तत्काळ सांगितलं, "एकदा शब्द दिला म्हणजे दिला. सुप्रीम कोर्टपर्यंत जावं लागलं तरी बेहत्तर! जिंकल्याशिवाय मध्ये मी सोडणार नाही." तू मळली वेंकटेशय्यांना पाहायला हवंस सोमू! वाघासारखा माणूस! प्रतिस्पर्ध्याचा पूर्ण जीव जाईपर्यंत पकड ढिली करणार नाही. आपण मध्ये 'मारू नका' म्हटलं तर तो पंजा आपल्यावर उगारल्याशिवाय राहणार नाही. बाहेर येऊन माझ्याबरोबर एवढी धावपळ करणाऱ्या शिवरामय्यांना हजार रुपये बक्षिसी दिली आणि हॉटेलमध्ये येऊन निवान्त झोपले. नाहीतरी यानंतर वकिलांनी बँकेचे व्याज भरायचं बंद करा म्हणूनच सांगितलं होतं ना! वर्षाकाठी साडेतीन लाख रुपये हातात राहतील. त्यामुळे काळजीचं कारण नव्हतं. जाग आली तेव्हा साडेतीन वाजले होते. एकंदरीत साडेचार तास झोप झाली होती. जाग आली तेव्हा शून्य भावनेच्या काठावर होते. आठच्या बसनं यायला निघाले. प्रवासात त्या शून्य भावाचं कारणही स्पष्ट झालं. मी खरं सांगितल्यावर तू गैरसमज करून घेणार नाहीस ना? मोकळेपणानं बोलले तर हलकं वाटेल."

"काहीही मनात ठेवू नकोस. सांग."

"तुला वाईट वाटेल..."

"नाही वाटणार."

"ऐकायच्या आधीच कसं सांगतोस हे? वाईट वाटलं तरी सहन करेन म्हणून सांग." तिचा स्वर तीव्र झाला.

"कितीही वाईट वाटलं तरी सहन करेन; पण तू मनात काही ठेवू नकोस. सांग." त्यानं मृदूपणे आग्रह केला.

"माझ्या पैशांवर... तेही चोरून... शिकून रंगनाथ पुढे आला. त्यामुळे माझ्या इस्टेटीवर फक्त काकूचा डोळा होता आणि त्याचा नव्हता असं म्हणता येणार नाही. दोघांही एकाच रक्ताचे. नंतरही बहिणीचं ऐकून त्यानं माझ्यावर मूल लादलं. तरीही तो माझा नवरा. त्यानं माझ्या गळ्यात मंगळसूत्र बांधलंय. त्याच्यापासून मला दोन मुलं झाली आहेत. त्याच्या मुलांवर माझा जीव आहे. अशा वेळी त्याच्याविरुद्ध उभं राहायचं... त्याच्या शिक्षणाचा, खाण्या-पिण्याचा हिशेब घेऊन कोर्टात जायचं, त्याला पिंजऱ्यात उभं करायचं, त्याला मळली वेंकटेशय्यांच्या पंज्यात द्यायचं... असली कसली बाई मी? या विचारांपाठोपाठ मला त्याच्याविषयी सहानुभूती... नव्हे, मी याच्यावर आताही प्रेम करते असं वाटू लागलं. नरसीपूरला बस उभी राहिल्यावर माघारी वकिलांना भेटून केस मागं घ्यावी असं वाटू लागलं. खरं सांग सोमू, तुला वाईट वाटलं नाही?'

नाही म्हणून सांगितलं, तरी सत्य तिच्या नजरेतून सुटणार नाही हे जाणवून तो ते न नाकारता म्हणाला, “तरीही मला तुझ्या सूक्ष्म भावनेचं कौतुक वाटतं.”

ती संतापून म्हणाली, “प्रश्नाकडे दुर्लक्ष करू नकोस! याचा अर्थ तुझं माझ्यावर प्रेम नाही असा होतो. खरं सांग, तुझ्या मनात मत्सर निर्माण झाला की नाही.”

“होय.” म्हणताना तो संकोचून गेला होता.

“एवढं संकोचायला काय झालं? खरंतर तू म्हणायला पाहिजेस, “माझं तुझ्यावर प्रेम आहे. तू आणखी कुणावर प्रेम करत असशील तर कापून काढतो!” काही का असेना, महान गांभीर्याचा त्याग करून मत्सर वाटतो एवढं कबूल केलंस ना! तूर्त एवढंच पुरे.” म्हणत तिनं त्याच्या गळ्याभोवती हात वेढून त्याच्या ओठांचं चुंबन घेतलं. त्यानंही तिला प्रतिसाद दिला आणि तिथं मत्सरासारखी क्षुद्र गोष्ट शिल्लकच राहिली नाही.

ती पुढं सांगू लागली, “पण मी बसमधून उतरले नाही. ते शक्य झालं नाही. बस सुरू झाली आणि काहीही करू न शकणारी म्हणून मन स्वत:ची निर्भर्त्सना करू लागलं. शून्य अधिकच गहिरं होऊ लागलं. भरधाव वेगानं धावणारी ही बस एखाद्या पुलावरून कोसळली आणि मी जागेवरच ठार झाले तर किती छान होईल असं वाटू लागलं. रस्त्याच्या कडेला मोठा वृक्ष दिसला की त्यावर बस आदळावी, मैसूर येण्याआधी कावेरीवरचा मोठा पूल आला तेव्हा तर बस नदीच्या पात्रात कोसळून जलसमाधी घडेल या उत्सुकतेनं मन भरून गेलं; पण यातलं काहीही घडलं नाही. आता ते आठवलं की, इतकी शरम वाटते म्हणून सांगू! माझ्या एकटीच्या इच्छेपोटी मी बसमधल्या इतर पन्नास जिवांच्या मरणाचीही अप्रत्यक्ष अपेक्षा करत होते ना? शून्य अधिकच भिरभिरत खोल जात होतं. रात्री मुलांना जेवायला घालून झोपवतानाही हा माझा शेवटचा दिवस असंच वाटत राहिलं. तू फोन केला नसतास, नोकरानं ते मला सांगितलं नसतं, तू पुढचा विचार करून धावला नसतास तर...” तिनं हातातल्या घड्याळात पाहिलं. “सगळं संपून आता पाच तास होऊन गेले असते. या पाच तासांत जीव, प्रेत किंवा जे काही असेल ते किती दूर गेलं असतं कोण जाणे?”

तीच पुढं म्हणाली, “तुला या प्रश्नात काही अर्थ वाटत नाही हे मला ठाऊक आहे. मी तुला पदोपदी परोपरीनं छळलं आहे. तरी तुझा या हीन स्त्रीवर एवढा का लोभ? का धावत येऊन मला वाचवलंस? मला त्याचा आनंद झाला नाही असं नव्हे, पण तुझ्यामुळे माझं मरण दूर जातं म्हणून मला तुझा किती प्रचंड संताप येतो ठाऊक आहे? पण तुझं माझ्यावर का एवढं प्रेम आहे? सांग.” तिनं लहान मुलीसारखा आग्रह धरला.

तो स्वत:तच गढून गेला होता. त्या क्षणी तिचं समाधान होईल असं उत्तर त्याला सुचलं नाही. तो म्हणाला, “काहीही सांगितलं तरी तू तिरस्कारच करणार. त्याला विरोध करणार. म्हणून मी काहीच सांगणार नाही.”

“हे काय रे! सांग ना! शपथ आहे तुला. मी तिरस्कार करेन, विरोध करेन, अविश्वास दाखवेन; पण तुझ्या तोंडून “तुझ्यावाचून जगणं शक्य नाही. तू माझा प्राण आहेस.” हे ऐकताना काय वाटतं म्हणून सांगू! वाटतं, आता जगायला हरकत नाही. मेल्यानंतर खोटं

असलं, तरी एवढं गोड बोलणं कुठून ऐकायला मिळणार?" ती म्हणाली. त्याच्या जिवाचा तडफडाट आणि संताप झाला होता आणि तो तो आवरायचा प्रयत्न करत होता हेही तिच्या लक्षात आलं.

बाहेर कावळे ओरडू लागले. "झोप आता. तू झोपल्यावर नीट मच्छरदाणी बंद करून, खिडकी ओढून जाईन मी." म्हणत ती उठली.

'त्या दिवशी 'हा तिचाच फोन होता' असं अंत:प्रेरणेनं जाणवून टेकडीवर धावल्यानंतर त्याला आपल्या जीवनाला काहीतरी अर्थ आहे असं वाटू लागलं. तिच्या मनात निर्माण होणारं मृत्यूचं आकर्षण नष्ट करण्यात माझा हातभार लागला, तरी ते माझ्या जीवनातलं मोठं यश ठरेल. नाहीतर हरल्याची भावना मनाला पूर्णपणे व्यापेल. त्या अर्थी आपल्या जीवनातला आनंद आणि ऱ्हास पूर्णपणे तिच्यावर अवलंबून आहे, हे त्याला स्पष्टपणे उमजलं होतं. तिला समजून घेणं याव्यतिरिक्त आपल्या जीवनाला कुठलंच प्रयोजन नाही हे स्पष्ट झालं; पण तिच्या मनात जीवन-प्रेम कसं निर्माण करायचं? कधी ती इतकी प्रसन्न असते की, तिच्या मायेनं वागण्यावर सगळा जीव ओवाळून टाकावा. मध्येच ती इतकी कठोर होऊन जाते की, मला दुखावण्यासाठी नव्या नव्या पद्धती शोधून काढते.'

एक दिवस ती त्याला गंभीरपणे म्हणाली, "सोमू, मनात जेव्हा शून्य भाव भरून जातो तेव्हा या संपूर्ण जगात मी तुझ्याइतका आणखी कुणाचाही तिरस्कार करत नाही."

त्याला आश्चर्य वाटलं. 'आपल्याइतकं ती आणखी कुणावरच रागावत नाही, हे त्यालाही समजत होतं, पण तिरस्कार?' तिनं पाठोपाठ त्याचं कारणही सांगितलं, "तू नसतास, तर ट्रिगर ओढून मरून जाणं सोपं झालं असतं. सगळं संपून एव्हाना दीड-दोन वर्षं झाली असती. मरायची उत्कट स्थिती जवळ येत असतानाच तुझी आठवण येते आणि वाटतं, मी मेले तर तुला कोण? तुला सांगितल्याशिवाय मरू नये, तुझा निरोप घेणं अत्यावश्यक आहे असं वाटू लागतं. मग मरणाच्या दिशेनं एक पाऊलही टाकणं मला अशक्य होऊन जातं. त्या वेळी तुझ्याविषयीचा तिरस्कार एवढ्या टोकाला पोहोचतो! वाटतं, तुझ्यावर गोळी झाडली, तर मला मरायचं स्वातंत्र्य मिळेल. मला सांग, तू घरी का फोन घेतलास? त्यामुळे फोन करून तुझा निरोप घ्यायचा मोहही टाळता येत नाही. फोन केला की, तू त्याची तार माझ्या हृदयाला वेढून खेचत राहतोस."

तिचं मन त्याला अधिक स्पष्टपणे समजलं. तो तिच्या विद्ध चेहऱ्याकडे अनुकंपेनं पाहत राहिला. ती पुढं म्हणाली, "शून्य भाव किती सामर्थ्यानिशी चाल करून येतो म्हणून सांगू! जो कुणी मध्ये येईल त्याला नष्ट करायची उत्कट भावना, परमाणुबॉंबचा स्फोट होतो तसं! त्या मन:स्थितीत मी कदाचित तुझ्यावरही रिव्हॉल्वर उडवेन. कितीतरी वेळा हा विचार मनात येऊन गेला आहे. पिल्ला, माझं मन स्थिर असताना तुला स्पष्टपणे सांगतेय. ऐक. मी तशा मन:स्थितीत असताना तू माझ्यासमोर येऊ नकोस. माझ्या हातून काय घडेल ते मलाच सांगता येणार नाही."

त्याचं अंत:करण भरून आलं. आपण तिच्या आणि मृत्यूमध्ये असलेली अभेद्य शक्ती आहोत या विचारानं त्याला स्वत:चा अभिमान वाटला. त्यानं तिला विचारलं, "तरीही 'मी

तुझ्यावर प्रेम करत नाही. तो तुझा भ्रम आहे' म्हणतेस?"

पाठोपाठ आणखी एक विचार मनात आला. हा विचार काही पहिल्यांदा त्याच्या मनात येत होता असंही नव्हे. तो म्हणाला, "अमू, तू एखाद्या मानसोपचारतज्ज्ञाची का अपॉइंटमेंट घेऊ नयेस? इथं मी त्याची चौकशी करतो. इथं नको असेल, तर बेंगळुरूमधला तज्ज्ञ पाहू या."

तिच्या चेहऱ्यावर असमाधान उमटलं. तिची नजर त्याच्या चेहऱ्यावर रोखली. त्या नजरेतलं तेज लोप पावलं आणि ती आपल्यापासून शेकडो मैल दूर गेल्याचा त्याला अनुभव आला. तरीही तो म्हणाला, "का? काय हरकत आहे? जसा शरीराला आजार होऊ शकतो तसा मनाला...."

त्याला मध्येच तोडत ती म्हणाली, "माझा दुर्दैवी सहवास पुरे झालाय म्हणून तू माझं ओझं मानसोपचारतज्ज्ञावर सोपवून मोकळा व्हायचा विचार करतोयस ना?"

अशा बोलण्याची सवय असल्यामुळे तो न चिडता म्हणाला, "आपल्यापेक्षा त्यांना मनाचं स्वरूप आणि आजार ठाऊक असतात ना!"

"त्यांच्यापेक्षा मला ठाऊक आहे. मला आणखीही ठाऊक आहे. तू भेकड आहेस, कातडी बचावू आहेस, प्रेमाचं नाटक करणारा आहेस. ज्या दिवशी तुझ्या मनात माझ्याविषयी निर्विवाद प्रेम निर्माण होईल, त्या दिवशी मी चांगली होईन. तुला काय वाटलं, मी कुणाही मानसोपचारतज्ज्ञाला भेटलेच नसेन?"

"काय म्हणाले ते?"

"म्हणाले, तुझ्याशी प्रेमाचं नाटक करणाऱ्या त्या कपटी माणसाला मनाबाहेर काढलंस, तर सगळं नीट होईल. पुन्हा कधी मानसोपचारतज्ज्ञाचं नाव काढू नकोस. समजलं?" क्षमा केल्याप्रमाणे तिनं शेवटचं वाक्य उच्चारलं.

मुलं घरात नसताना तो दररोज साडेबाराला तिच्या घरी येऊन संध्याकाळी चार-साडेचार वाजेपर्यंत तिथंच राहत होता. आठवड्यातल्या पाच-सहा दिवसांपैकी एखादा दिवस ती प्रसन्न असली, तरी तो स्वत:चं सुदैव समजत होता. कुठल्या क्षणी कुठल्या शब्दामुळे ती बिथरेल आणि जीवघेणे आरोप करेल हे त्याला सांगता येणंही अशक्य होतं.

जेवण झाल्यावर ती टेबल आवरत असताना तो तिथं उभा राहिला की म्हणे, "मेस्त्र्यासारखी माझ्या कामावर नजर ठेवतोस. लाज वाटत नाही?" म्हणून तो तिच्या कामात तिला मदत करू लागला की म्हणे, "ही कामं करायची नाटकं करून मला प्रभावित करायचा प्रयत्न चाललाय काय?" तो काहीही बोलला नाही तरी म्हणे, "मौनं संमती लक्षणम्।" यावरही तो बोलला नाही तरी म्हणे, "एवढा तिरस्कार कशासाठी? उत्तर द्यायचीही लायकी नाही हेच दाखवून देता ना?"

एकदा त्याला खरोखरच उत्तर सुचलं नाही तेव्हा तो म्हणाला, "कितीतरी वेळा मला उत्तर सुचत नाही. तू समजतेस तेवढा मी शहाणा नाही."

“शहाणा असतो, तर तुझ्या तावडीत का सापडलो असतो असंच म्हणायचं ना तुला?”

एकदा तिचा तिरका सूर लागला की, तो तिथून बाहेर पडेपर्यंत वेडंवाकडं, टोचून बोलणं सुरूच असे. तिथून बाहेर पडल्यानंतर त्याला मनस्ताप व्हायला सुरुवात होई. तिचं मन मानसिक द्वंद्वामध्ये सापडून तळमळत असल्यामुळे ती जे काही बोलेल ते मनाला लावून घेता कामा नये असं तोही स्वत:ला पदोपदी बजावत असला, तरी त्याच्या मनात वेदना साचत होती. नंतर हार्डिंग्ज सर्कलच्या बागेत किंवा तलावाकाठच्या बाकावर बसून तो स्वत:च्या मनाचं समाधान करत होता. बहुतेक वेळा रात्री साडेअकरा वाजता तिला फोन करे. एखाद्या दिवशी ती छान मूडमध्ये भरपूर गप्पा, चेष्टा-मस्करी करत होती, पण तिचा हा मूड अल्पजीवी असे. तिच्या संतापाला संयमानं तोंड दिलं की ती म्हणे, “मी एवढी बोलतेय त्याचं तुला काहीच नाही? एवढीच त्याची किंमत?” एखाद्या दिवशी फोन उचलताच “रोज मरणार, मरणार म्हणते. अजून मेली की जिवंत आहे हे बघायला फोन केलास ना?” अशी सुरुवात होई. त्यानंतर ती रिसीव्हर ठेवेपर्यंत असंच जीवन-रस शोषून घेणारं बोलणं ऐकावं लागे. आपण बोलणं थांबवलं, तर तो तिरस्कार समजून शून्य भाव भरून राहण्याची भीती. मध्ये आपोआप लाइन तुटली, तरी पुन्हा त्यानंच फोन करायला पाहिजे. नाहीतर ती फोन करून “पीडा टळू दे म्हणून तुम्हीच फोन ठेवलात ना? खरं सांगा. तुम्ही मानता त्या देवाची शपथ घेऊन सांगा.” म्हणून आग्रह धरी.

अशा प्रकारे दररोज रात्री दोन-अडीच वाजेपर्यंत फोनवरचं संभाषण संपत नसे. त्यानंतर अंथरुणावर पडलं की, त्याला झोप येत नसे. झोप लागलीच, तर एखादा हिंस्र पशू आपल्या मनाच्या भिंती अणकुचीदार नखांनी ओरखडत असल्यासारख्या वेदना जाणवत. त्यातच झोप लागली की, झोपेतही वेदना, दु:ख, व्याकूळता मनात व्यापलेली राही. सकाळी जाग आल्यावर थकलेपण, निरुत्साह, जांभया!

एक दिवस सकाळी तो दहा वाजता ऑफिसमध्ये पोहोचला तेव्हा ‘शाह अँड शेखर’ कंपनीच्या छापील पत्त्याचं पाकीट त्याची वाट पाहत होतं. कितीतरी दिवसांनी मित्राचं पत्र बघून त्याचं मन मृदू होऊन गेलं. गेल्या कितीतरी दिवसांत त्यानेही त्याला काही लिहिलं नव्हतं हे त्याला आठवलं. प्रेमात बुडाल्यावर इतर बंध आपोआप गळून पडतात हे वाक्य आठवलं. ‘त्यात आपलं अमूवरचं प्रेम तर पराकोटीचं उत्कट आहे!’ या विचारातच त्यानं पाकीट फोडलं.

नवीननं आपल्या अत्यंत मुलायम भाषेत ते पत्र लिहिलं होतं. नवसारीच्या फॅक्टरीच्या कामाविषयी लिहिलं होतं. आणखी एका टेक्स्टाइल मिलचं आणि मुंबईमधल्या दोन बहुमजली इमारतींचं काम सुरू केल्याचं लिहिलं होतं. ‘तू इथं असतास, तर आणखीही कामं घेणं सहज शक्य आहे.’ असं मनापासून लिहिलं होतं. शेवटच्या पॅराग्राफमध्ये लिहिलं होतं.

> ‘दीड वर्षापूर्वी तू ऑफिससाठी पैसे घेतले होतेस. इंदूच्या माहेरी काहीतरी आर्थिक अडचण उपस्थित झाली आहे. तिची त्यांना मदत करायची इच्छा आहे, पण या संदर्भात तुला विचारून अडचणीत टाकू नये अशी तिची इच्छा आहे. कारण तुझी तशी परिस्थिती असती, तर तू पैसे निश्चित परत केले असतेस असं तिचं म्हणणं. दिगंत तुझी खूप आठवण काढतो. शेखरअंकल का आले नाही म्हणून विचारत असतो.’

हा मजकूर वाचताना सोमशेखर आतल्या आत कोलमडून गेला. 'हे कर्ज... असा कसा याचा विसर पडला? कदाचित मित्राचेच पैसे आहेत आणि त्यावर व्याजही देणारच आहोत या सुप्त विचारांमुळे ते मागं पडलं असावं. त्यात आता ही अकस्मात उद्भवलेली इंदूबेनच्या माहेरची अडचण! अर्थात हे तरी खरं आहे की नवीननं ते रचून लिहिलं असेल?' अर्धा तास मनात हेच विचार घोळत राहिले. त्यानंतर सगळं स्पष्ट होत गेलं. तो काही नवीनला अलीकडेच ओळखत नव्हता. मैत्रीमध्ये उत्तम मित्र आणि व्यवसायात पक्का व्यवहारी असा नवीन शहा. दोन्हीचा कधीही एकमेकांशी गोंधळ न करता दोन्हीही सफाईनं संभाळणारा. मैत्री म्हटल्यावर त्यानं रातोरात पैसे पाठवले. एवढ्या अवधीत मी संपूर्ण व्याज आणि मुद्दलातला तिसरा भाग पेडायला हवा होता. ते अशक्यही नव्हतं. नवीननंही माझ्याबरोबर काम केलंय त्यामुळे हे त्यालाही चांगलं ठाऊक आहे. पाठोपाठ आणखीही लक्षात आलं. 'हे पहिलं स्मरणपत्र आहे. तूच इंदूबेनला पैसे दे' म्हणून कळवायचं? त्याला विचाराची शरम वाटली.

बारा वाजायला दहा मिनिटं कमी होती. तो अमृताच्या घरी जायला निघाला. नंजुंडेगौडाला सरकारी नोकरी मिळाल्यामुळे तो नोकरी सोडून निघून गेला होता. काहीही काम नसलं, तरी नीळकंठप्पा मात्र नियमित येत होते.

त्या दिवशी अमृता मरगळलेल्या मन:स्थितीत होती. अशा वेळी ती संतापत नव्हती आणि फारशी बोलतही नव्हती. ती मुकाट्यानं जेवायला वाढत होती. दोघंही न बोलता जेवत होते. अशा वेळी तिला एकान्त हवासा असे. मग तो गेस्टरूममध्ये आणि ती बेडरूममध्ये; पण म्हणून तो तिथून निघूनही जाता कामा नये. तिची लहर फिरली तर ती स्वत: त्याच्याशी बोलत असे. त्या वेळी त्यानंही तेवढाच प्रतिसाद द्यायचा. यात काही कमी झालं तर "बेशरम, लोचट, कुत्री आपण होऊन येते म्हणून अवहेलना करतोस?' आणि जास्त झालं तर "जवळ आलो म्हणजे केवळ पशुवृत्तीनंच आलो असं समजता काय?" हे दोन्ही टाळण्यासाठी मनावर कितीही दडपण असलं, तरी तिची मन:स्थिती पटकन जाणून घेऊन त्याप्रमाणे वागणं शक्य झालं पाहिजे अशा कर्तव्यभावनेनं तो झोपलेला असे.

त्या दिवशी दुपारी गेस्टरूममध्ये झोपला असता मनात नवीनचं पत्रच घोळत होतं. पुढचा वायदा करून पत्र लिहिणं त्याला कमीपणाचं वाटलं. 'तो आपल्या व्यवसायात वर वर चाललाय आणि मी मात्र कोसळून गेलो आहे! यात गावाचा काही भाग असेलही, पण मैसूरमध्ये मिळालेली उत्तम संधी तरी मी कुठं पकडली? नवीननं अवधी दिला, तर व्यवसायात पैसे मिळवायचा रसच नसताना नंतर तरी पैसे कसे फेडायचे? उलट व्याजच वाढत जाणार. आता तरी व्यवसायात गुंतणं शक्य आहे काय? नीळकंठप्पांना पर्सेंटेज देण्याच्या बोलीवर गिऱ्हाइकं मिळवायला सांगणं शक्य आहे. डॉक्टर राममूर्तींच्या कामाचं काय झालं त्याचीही चौकशी करता येईल.'

चार वाजता ती घर, गॅरेज, गाडीच्या चाव्या घेऊन मुलांना आणण्यासाठी बाहेर पडली. ती चाहूल लागताच तोही लगेच तिथून बाहेर पडला. ती अजूनही त्याच मन:स्थितीत असल्यामुळे काही बोलली नाही. त्याच्या मनानं ताकीद दिली, 'आज रात्री सावध राहायला पाहिजे.' ती अशा मन:स्थितीत असताना तिच्याबरोबर कसं बोलायचं हा प्रश्नही अधिक कठीण होऊन जाई. रात्री त्यानं फोन केला तेव्हा "ही मेली तर पीडा टळेल असं तुम्हाला सतत वाटतं. पण माझ्यापुढे नाटक करता. का असे दोन मुखवटे घालून जगता?" अशीच सुरुवात केली.

त्यानंतर तिला पुन:पुन्हा तेच तेच तपशिलानं सांगून शांत करण्यासाठी दीड तास बोलत राहावं लागलं. तिची जांभई ऐकल्यावर "आता तू झोप. उद्या दुपारी मी येणार आहे तेव्हा बोलू." म्हटल्यावर तिनं रिसीव्हर जागेवर ठेवला.

मच्छरदाणीत शिरताना त्याच्या मनात एक विचार आला. साडेतीन वाजेपर्यंत तो विचार पक्का होत गेला. 'नाहीतरी आता मी व्यवसाय करतच नाही. ऑफिसची जागा विकून नवीनचं कर्ज पेडता येईल आणि उरलेले पैसे बँकेत ठेवले तर दोन वेळच्या जेवणाचीही सोय होईल.' या निर्णयावर पोहोचताच त्याला मस्तकावरचं ओझं उतरल्यासारखं झालं. 'नीळकंठप्पांनीही आजवर आपल्याला मनापासून साथ केली आहे. त्यांनाही नुसतंच वाऱ्यावर सोडता येणार नाही. वीस हजार रुपये देऊन दुसरीकडे नोकरी बघायला सांगावं लागेल.' या विचारापाठोपाठ चार-सहा जांभया देऊन त्याला झोप आली.

सकाळी जाग आली तेव्हा तो पूर्ण शून्य भावनेत घेरला गेला होता. 'व्यवसाय सोडून जगू पाहणारा मीही भेकडच म्हणायचा.' प्रातर्विधी आटोपल्यावर बाहेर जायचा उत्साह मनात राहिला नव्हता. 'व्यवसाय सोडायचा म्हणजे जगण्याचं गुरुत्वाकर्षणाचं केंद्रच नष्ट झाल्यासारखं आहे' हे त्याला प्रकर्षानं जाणवलं; 'पण नाहीतर आता दीड-दोन लाख रुपये कसे उभे करायचे? या गावात कुणी मित्र नाही... तिच्यामुळे! व्यवसायात मी या पातळीला येऊन पोहोचलो तोही तिच्यामुळेच! त्या वेळी नवीनकडून पैसे घेऊन तिला दिले. ती घाई झाली काय? तिचा स्वभाव मला पूर्णपणे परिचित होताच. तिच्याबरोबर पैशाचा व्यवहार नको असा मनानं निर्धार केला. कधीकधी दररोज दुपारी तिच्या घरी आपण फुकट जेवतोय असंही त्याच्या मनात येऊन जाई; पण तो त्याला थारा देत नसे. दहीभात खाताना खडे लागावेत तसा हा विचार सतत येत राहील, तर माझं कसलं प्रेम म्हणायचं?' तो विचारमग्न झाला. 'हे नवीनचं पत्र तिला दाखवावं की दाखवू नये? ती पैशाची काहीतरी व्यवस्था करू शकेल. नाहीतरी आता बँकेचं व्याजही भरावं लागणार नाही आहे. वर्षाकाठी तीन-साडेतीन लाख रुपये तिच्या हाती मिळतील. काय करावं?'

बराच वेळ उलटसुलट विचार केल्यानंतर त्याच्या मनानं तिच्याकडून पैसे घ्यायला नकार दिला. त्यामागची कारणमीमांसा मात्र नीट सुचली नाही.

त्यानं घड्याळात पाहिलं. बारा दहा झाले होते. त्यानं तिचा नंबर फिरवला. आपण कुठून बोलतोय हे न सांगता त्यानं सांगितलं, "अमू, एक अर्जंट काम आहे. तू वाट बघू नकोस. चारच्या आत काम झालं तर मी घरी येतो. नाहीतर वाट बघू नकोस. गिऱ्हाइकाबरोबरच खाऊन घेईन. ठेवू?" म्हणत तिला बोलू न देता त्यानं रिसीव्हर ठेवून दिला.

स्कूटरवरून हॉटेलवर जाऊन जेवताना मनात येत होतं, 'आता ऑफिसची जागा विकण्याऐवजी गहाण टाकून पैसे उभे करता येतील. बँकही तसे पैसे देईल; पण नंतर ते फेडायचे कसे? सगळे आपापल्या व्यवसायात जीव तोडून राबत असताना मी दिवसातले चार-चार तास तिच्या घरी काढतो. माघारी येतो तेव्हाही तिच्या बोलण्या-वागण्यानं इतका दुखावलेला असतो की, काम करायची शक्तीच राहिलेली नसते. रात्री शांत झोप नसते. तिच्याशी पूर्णपणे संबंध तोडला, तरच व्यवसाय करणं शक्य आहे.' हे त्याला स्पष्टपणे दिसू लागलं. जेवण करून हात धुताना मनात येत होतं, 'हे संबंध पूर्णपणे तोडले तर काय होईल?

सुधारणा होण्यासारखा तिचा मनोरोग दिसत नाही. माझ्यामुळे ती न मरता जिवंत राहिली आहे हे खरं! यानंतरही ती मरणार नाही याची काळजी घेत राहिलं तरी त्याचं काय? त्यानंतर काय?'

उच्च प्रतीचं प्रेम पूर्णपणे निष्काम असलं पाहिजे या विषयी त्याच्या मनात संशय नसला, तरी हा केवळ सिद्धपुरुषांना साध्य होणारा आदर्श आहे, हेही त्याला समजत होतं. 'कुठल्याही प्रकारे एकत्र आलेल्या स्त्री-पुरुषांना नंतरही एकत्र राहायचं असेल, तर कुठल्या ना कुठल्या व्यवहाराचा विचार करावाच लागतो. प्रेमाचं पर्यवसान लग्नात होणं म्हणजे प्रेम एका विशिष्ट व्यवहारात बसवणं. तिच्याशी आतापर्यंत लग्नाचा विषय मी काढला नाही. काढला तरी तिच्यासारख्या मनोरुग्णाशी एकसुरात जगणं शक्य आहे काय? आधी ती बरी व्हायला पाहिजे. एकदा बरी झाल्यावर तिला कदाचति माझी आवश्यकताच राहणार नाही.'

आवश्यकताच राहणार नाही या विचारापाशी येताच तो बधिर होऊन गेला. 'तिच्या जीवनात माझं काही स्थानच राहिलं नाही, तर माझ्या जीवनाचं प्रयोजन काय?' त्यानं आपली स्कूटर वृंदावन गार्डनच्या रस्त्यावर वेगानं सोडली. त्याच लताकुंजाखालच्या दगडी बाकावर झोपल्यावर ही भावना अधिक स्पष्ट झाली. 'व्यवसायात लक्ष घातलं, वर्षाकाठी चार-पाच लाख मिळवले... नवीन नाही म्हटलं तरी दहा-पंधरा लाख सहज मिळवतोय. मीही मुंबईमध्ये राहून राबलो असतो तर ते मलाही अशक्य नव्हतं, पण मुळातच ती माझी प्रवृत्ती नाही. म्हणून मुंबई सोडून मी मैसूरला आलो आणि हिच्यात गुंतून गेलो. इतका गुंतून गेलो की, त्या निमित्तानं जीवनाचा अर्थ जाणून घ्यायची संधी मिळाली.' कितीही बाजूंनी विचार केला, तरी त्याचं मन एकाच निष्कर्षावर येत होतं, तिच्याशिवाय जीवनाला अर्थ नाही. दिव्यांची आरास सुरू झाल्यावर तोही त्यामध्ये फिरत राहिला. काकडी आणि पॉपकॉर्न खात क्रमानं सात रंग बदलणाऱ्या कारंजापाशी काही वेळ उभा राहिला. मनात मात्र येतं होतं, 'या जगात कित्येक हजार आर्किटेक्ट पडले आहेत. मी हा व्यवसाय केला नाही, तर कुठलीही इमारत उभी राहायची थांबणार नाही.'

तरीही दुसऱ्या दिवशी सकाळी ब्रोकरच्या ऑफिसमध्ये जाताना तो पराकोटीचा दुखावला होता. 'या गावात मी पराजित झालो.' ही भावना त्याच्या अंतर्मनाला व्यापून राहिली होती. इमारतींची व्रिकी करून देणाऱ्या ब्रोकरची व्यवसायातून ओळख होती. "माझ्या ऑफिसची जागा मला विकायची आहे. एखादं गिऱ्हाईक पाहा." असं सांगताना त्याला कुणीतरी आपलं व्यक्तिमत्त्व आतून कापून काढत आहे असं वाटत राहिलं.

त्या दिवशी सकाळी दहाच्या सुमारास अमृता गाडी पुसत उभी होती. आत पुट्टम्मा स्वयंपाक करत होती. महादेवम्मा घरामागच्या दगडावर कपडे धुवत होती. दोन्ही कुत्र्यांच्या साखळ्या सोडल्यामुळे ती तिच्या भोवताली घुटमळत होती. त्याच वेळी गेटपाशी वाहन थांबल्याचा आवाज ऐकू आला आणि दोन्ही कुत्री तिकडे धावली. गेटपाशी एक गाडी उभी होती. गाडीत काकू आणि तिचा गोतावळा भरला होता. थोरला जयराम गाडी चालवत होता. काकूचा तिच्या बरोबरीचा हा मुलगा. त्याच्या शेजारी काका, त्यांच्या शेजारी धाकटा मुलगा कृष्णमूर्ती, मागच्या सीटवर काकू, जयरामची बायको मीनाक्षी, तिचा पाच वर्षांचा मुलगा आणि तीन वर्षांची मुलगी.

‘म्हणजे वकिलांची नोटीस पोहोचलेली दिसते!’ अमृताला आता आपण नेमका काय पवित्रा घ्यावा ते कळेना. वकिलांनी सांगतिलेलं आठवलं. ती पुढं होऊन म्हणाली, “या. थांबा. आधी कुत्र्यांना बंधते.” कुत्र्यांना त्यांच्या जागी बांधताना आठवलं, “हे पाहा, अशा केसेसमध्ये नोटीस हाती पडताच सगळा नातेवाइकांचा गोतावळा घेऊन येतील. देव, वचन, शब्द, न्याय, अन्याय, नातं, रक्त वगैरे प्रवचन सुरू करून तुमचं डोकं फिरवतील. त्या वेळी तुम्ही डोकं गरम होऊ देता कामा नये. न्याय-अन्यायाच्या चर्चेतही पडायचं नाही. नाहीतर ते तुम्हाला तुमच्या शब्दांत अडकवतील. तुम्ही फक्त ‘जे कायदेशीर आहे ते होऊ दे’ एवढंच म्हणायचं. सावध राहा.”

ती कुत्र्यांना बांधून येईपर्यंत सगळे गाडीतून उतरले होते; पण गेट उघडून आत आले नव्हते. तिनंच काहीही झालं नाही असं दाखवत स्वागत केलं, “या, या. काका, किट्टण्णा, कसा आहेस?” सगळ्यांना तिनं लाउंजवरच्या सोफ्यावर बसवलं. बायकांनाही तिनं आत बोलावलं नाही. काकूलाही नेहमीप्रमाणे आत शिरून सलगी दाखवत प्रेमाचं नाटक करणं अशक्य झाल्याचं तिच्या लक्षात आलं होतं. तीच पुढं म्हणाली, “उठल्या उठल्या निघाला असाल. उपीट करायला सांगते. आधी कॉफी घेणार काय?”

“आम्ही ज्या कामासाठी आलो आहोत ते झाल्याशिवाय आम्ही या घरी भांडंभर पाणीही घेणार नाही.” जयराम ताडकन म्हणाला.

“असं का रे म्हणतोस? माहेरवाशिणीच्या घरी येऊन खाणार नाही, पिणार नाही म्हणू नये. तिच्याही पदरात मोत्यासारखी दोन मुलं आहेत. त्यांचं कल्याण व्हायला नको का? व्यवहार वेगळा आणि प्रेम-वात्सल्य वेगळं!” काकूनं आपल्या मुलावर आगपाखड केली.

अमृता सावध झाली. काकूचा डाव लक्षात येऊन ती तिथंच सोडत म्हणाली, “कुणी माझ्या घरचं अन्न खाल्लं, तरच माझ्या मुलांचं कल्याण होईल यावर माझा विश्वास नाही. तुम्हाला जे बोलायचंय ते बोला. माझ्याकडून काहीही बोलण्यासारखं राहिलेलं नाही. वकिलांनी ते नोटिशीत लिहिलं आहेच. आणखी काही सांगायचंय, ते ते कोर्टात सांगतील. तुम्हाला जे म्हणायचं आहे त्यासाठी तुम्हीही वकील द्या. निकाल लावण्यासाठी कोर्ट आहेच. आपण गुण्यागोविंदानंच राहू या.”

“कायद्यावर बोट ठेवतेस? सुप्रीय कोर्टापर्यंत जावं लागलं तरी हरणारा मर्द नाही मी! आमच्याकडेही मुद्दे आहेत.” जयराम म्हणाला.

“पुढच्या कोर्टात जायचा हक्क कोण काढून घेणार तुमचा? पण खालच्या कोर्टात हरणार हेच कबूल करतोस ना?” नकळत तिचाही आवाज भांडल्यासारखा होऊ लागला.

“तुझ्या मळली वेंकटेशय्यांचे दात घशात जातील, असा बेंगळुरूहून वकील आणायची माझी ताकद आहे! समजलीस?” जयराम ओरडत उभा राहिला. आता तो आपल्यावर हात उगारणार असं तिला वाटलं; पण काकूनं त्याला आवरलं आणि पुन्हा जागेवर बसवलं. आता अमृतानं आपला मोहरा काकूकडे वळवला, “काय काकू, चंद्रकला कशी आहे? तिच्याकडे जाऊन नंतरच इथे आलात ना?”

काकू अवाक झाली. या अनपेक्षित हल्ल्यापुढे तिला काही सुचेना. जयराम पुन्हा उसळून म्हणाला, “गप्प राहणार नाही मी. कोर्टात भांडेन.”

पाठोपाठ गद्धेपंचविशीतला कृष्णमूर्ती म्हणाला, “घरंदाज बायकांनी नवऱ्याचं बोलणं ऐकायला पाहिजे. जाराचं ऐकून माहेरावर दरोडा घालायला निघाली, पण तुझा जार आहे-नाही ते लुटून तुझ्या हाती करवंटी दिल्याशिवाय राहणार नाही. लक्षात ठेव.”

आता काकू त्याच्याकडे धावली. त्याच्या पाठीत धपाटा मारत म्हणाली, “लहान मुलगा तू! तुला कशाला पाहिजेत या सगळ्या गोष्टी?”

अमृतेची दृष्टी कृष्णमूर्तीच्या चेहऱ्यावर खिळली होती. जयरामची बायको मीनाक्षी उठून तिच्यापाशी येऊन म्हणाली, “पाहिलात तुमच्या भावांचा स्वभाव? या सगळ्यांमध्ये तुमच्या माहेरी माझी काय अवस्था होत असेल ते तुम्हीच पाहा! तुम्ही त्यांच्याशी अवाक्षर बोलू नका. चला, आपण आत बोलू.”

अमृता भ्रमिष्टासारखी झाली होती. तिनं स्वत:चा हात मीनाक्षीच्या हातून सोडवून घेत निक्षून सांगितलं, “मला कुणाशीही काही बोलायचं नाही. जे व्हायचं ते कोर्टात होईल म्हणून मी आधीही सांगितलंय. आता निघा तुम्ही.” म्हणत ती आत निघून गेली.

कितीतरी वेळ बाहेर त्यांची परस्परांशी कुजबुज चालली होती. काकू आणि मीनाक्षी दोन्ही भावंडांना दोष देत होत्या. काकांनी यात तोंडच उघडलं नव्हतं. ते काही अर्धवट नव्हते. काकूच्या अतिशहाणपणामुळे ते तसे वागतात हे अमृताला ठाऊक होतं. काकू नवऱ्याला आग्रह करत होती, “असे काय शुंभासारखे बसलात? बोला ना काहीतरी.”

“मला काय त्यातलं समजतंय? जयण्णानं कोर्टात भांडणार म्हणून सांगितलं ना! तेच बरोबर आहे!” काका म्हणाले.

अमृता जेवणाच्या टेबलापाशी बसली होती. पाच-दहा मिनिटांनी काकू आणि मीनाक्षी आत आल्या. सूनही सासूच्या हातावर हात मारून तयार आहे, हे अमृताच्या लक्षात आलं होतं. कृष्णमूर्तीच्या तोंडी ‘जार’ वगैरे शब्द काकूनं सांगितल्यावरून आले यात शंका नव्हती. आत आलेल्या काकूला तिनं स्पष्टपणे सांगितलं, “आता आत येऊन विशेष माया दाखवून बोलण्यासारखं काहीच शिल्लक राहिलेलं नाही. मी सगळा विचार करूनच कोर्टात गेले आहे. तुम्हाला जे काही सांगायचंय ते तिथं सांगा.” म्हणत ती आपल्या बेडरूममध्ये जाऊन दार लावून बसली.

कितीतरी वेळानं कुत्री भुंकल्याचा आणि पाठोपाठ गाडी सुरू होऊन निघून गेल्याचा आवाज ऐकू आला.

त्या दिवशी सोमशेखर जेवायला घरी आला नाही. तीन वाजेपर्यंत तिच्या मनात त्याच्याबरोबर असलेल्या संबंधाविषयी तिरस्कार निर्माण झाला होता. हा खरोखर पशु-संबंध असून त्या संदर्भात प्रेमासारख्या कविकल्पनेचा उच्चार करणंही चुकीचं आहे असं तिचं मत

झालं होतं. 'परस्परांना स्पर्श न करता, त्या भावनेनं न डागाळलेला स्नेह असता, तर त्याला शुद्ध प्रेम म्हणता आलं असतं. काहीही झालं तरी मी पतिता आहे, नैतिक शक्ती आणि नैतिक अधिकार गमावलेली मी!' तिला आतून रडू येऊ लागलं. घरात दुसरं कुणीही नसल्यामुळे आवाजाला आवर घालायची आवश्यकता नव्हती. रडण्याचा आवाज घराबाहेर पडून संपूर्ण घराला वेढून टाकत होता, हे जाणवलं तरी ती रडत राहिली. त्या आवेगात तिनं पलंगाच्या कठड्यावर डोकं आपटून स्वत:ला शिक्षाही केली. रडून रडून दमल्यावर रित्या मनानं ती अंथरुणावर पडली असता पुन्हा आवंढा दाटून आला. 'इस्टेटीच्या लोभापोटी कृष्णमूर्ती बोलला असला, तरी त्याचं बोलणं खोटं नाही. काहीही झालं तरी रंगनाथ नवरा आहे. मग याला जार नाही म्हणायचं तर दुसरं काय? स्नेही, प्रेमी वगैरे शब्द आम्ही वापरत असलो, तरी या संबंधाला व्यभिचार हेच नाव आहे ना?' तिला खूप रडू आलं. त्या आवेगापाठोपाठ पराकोटीचा संताप आला. स्वत:चाच संताप! 'मी इतरांना का नावं ठेवावीत? मलाच शिक्षा व्हायला पाहिजे. मी मला शिक्षा करायला पाहिजे. अग्नीच्या साक्षीनं मंगळसूत्र बांधणाऱ्या नवऱ्याशी द्रोह करून त्याच गळ्यात जाराचे बाहुपाश गुंफून घेणारी मी! मला शिक्षा झालीच पाहिजे. केवळ भिंतीवर किंवा पलंगाच्या कठड्यावर डोकं आपटण्याइतकी साधी शिक्षा नव्हे.' तिला रिव्हॉल्वरची आठवण झाली. हातात रिव्हॉल्वर घेऊन कितीतरी वेळ ती बसून राहिली. स्वत:विषयी तिरस्कार आणखी वाढला. 'किती भेकड मी! ट्रिगर ओढायचा क्षण येत नाही. किती पापी मी!'

मुलांना आणण्यासाठी ती गेली होती तेव्हा विकासला पाहताना तिला आपल्या व्यभिचारातून केलेली भ्रूणहत्या आठवली. त्या क्षणी मोठ्यानं रडावंसं वाटलं, तरी ती मुलांना घरी घेऊन आली, त्यांच्याशी शटल खेळली, जेवू घातलं, त्यांना गोष्टही सांगतिली. स्वत:विषयी तिरस्कार वाटत असताना मनात येत होतं, 'मी का मरत नाही? मुलांसाठी? हे कारण खरं नाही. मी मेले, तरी ते मुलांना व्यवस्थति सांभाळतील, मोठं करतील, शिक्षण देतील. रंगनाथ दुसरं लग्न निश्चितच करेल. मुलांच्या बाजूला उभा राहून तो खटलाही चालवेल. चालवेल की लाच खाऊन मिळणारे पैसे पुरेसे आहेत असं ठरवेल? की मुद्दाम सूड घ्यायला मिळतोय म्हणून कोर्ट-कचेरी खेळेल?'

या विचारात ती असतानाच फोन वाजला. तिनं घड्याळ पाहिलं. पावणेबारा वाजले होते. पलीकडे आवाज ऐकू येण्याआधी ती म्हणाली, "हे पाहा, मी उत्तम आहे. आता मी हिशेब लिहायच्या घाईत आहे. वेळ नाही. उद्यापासून मी फोन केला नाही, तरी तुम्हीही फोन करू नका. मी माझ्या जिवाचं बरं-वाईट करणार नाही, असा शब्द देते." आणि तिनं रिसीव्हर जागेवर ठेवून दिला.

त्याच मूडमध्ये काही वेळ गेल्यावर तिनं लेटरहेडचं पॅड बाहेर काढलं आणि त्यावर लिहू लागली.

> 'आपल्या संबंधाचं उदात्तीकरण करून आपण त्याला कुठंही भव्य-दिव्य नाव देणं शक्य आहे; पण हा संबंध व्यभिचाराचा आहे हेच वास्तव आहे. हे वास्तव समूळ नष्ट झाल्याशिवाय मला स्वस्थता मिळणं अशक्य आहे. म्हणून तुम्ही कृपा करून माझ्यापासून दूर होऊन माझ्यावर दया दाखवावी ही हात जोडून प्रार्थना. यानंतर मला फोन करून माझ्या भावनेशी खेळू नये. नमस्कार!'

लगेच ते पत्र एका पाकिटात घालून, त्यावर त्याच्या घराचा पत्ता लिहून तिनं पाकीट चिकटवलं आणि रस्त्यापलीकडच्या पोस्टाच्या पेटीत टाकून घरी परतली.

घरी येऊन अंथरुणावर पडल्यावर तिला कृष्णमूर्तीची आठवण आली. संताप आला. 'या पोराचं वय ते काय आणि जीभ लांब करून बोलतो किती? माझं चुकलंच. त्याला त्याच वेळी पायातल्या चपलेनं फोडून काढायला हवं होतं. पाठोपाठ आठवलं, संतापायचं नाही हे आपण आधीच ठरवलं होतं. मारलं नाही ते योग्यच झालं. त्याला यातलं काय कळतंय? काकूनं जे सांगितलं...' तिचा संताप काकूवर फिरला. 'तिचा थोरला मुलगा सुप्रीम कोर्टापर्यंत सोडणार नाही म्हणाला, नाही काय! मीही सोडणार नाही. सुप्रीय कोर्टापर्यंत मीही सोडणार नाही!' तीन वाजता तिला झोप लागली.

दुसऱ्या दिवशी दुपारीही तो आला नाही. 'एवढ्या अवधीत पत्र पोहोचणं अशक्य आहे. तरीही का आला नाही हा? कामाचं दडपण असेल.' असा विचार करत ती जेवली. रात्री बारा वाजता फोन वाजला. सात-आठ वेळा वाजला तरी ती तशीच बसून राहिली. नंतर रिसीव्हर उचलून सांगितलं, "झोपले होते. मी ठीक आहे. थँक्यू!" नंतर पुन्हा फोन वाजला नाही. 'चला, तोही सुटला आणि मीही सुटले. तो बायकांच्या बाबतीत अनुभवी आहे. माझ्याकडून त्याला फारसा आनंद मिळाला नाही. यानंतर दुसऱ्या एखाद्या स्त्रीशी ओळख वाढवून त्याला सुखानं राहता येईल.'

त्यानंतरच्या दुपारीही तो आला नाही; पण त्याचा फोन आला, "आज सकाळी तुझं पत्र पोहोचलं. तुझ्या मनाला त्रास होईल असं काहीही मी करणार नाही. तू मात्र रात्री केव्हाही फोन कर. मी जागाच असेन. दुपारी मात्र कधीही फोन करू नकोस. मी ऑफिसमध्ये नसतो. तू मला एक शब्द दिलास, तर मी तुझं सगळं ऐकेन."

काय म्हणून विचारलं, तर संभाषण वाढेल या भीतीनं तिनं फक्त हुंकार दिला. तो पुढं म्हणाला, "तू आत्महत्या करायची नाहीस. कितीही कष्ट सहन कर. तळमळत राहा, पण जिवंत राहिलं पाहिजे. तेवढं ऐकलंस, तर मी तुझी कुठलीही इच्छा ऐकेन. तू म्हणालीस तर कधीही फोन करणार नाही."

ती काहीही बोलली नाही. त्यानं विचारलं, "ऐकू आलं?" तरीही ती गप्पच राहिली. त्यानं रिसीव्हर ठेवून दिला.

तिला पराकोटीचा राग आला. 'मी मरावं का मरू नये हे ठरवणारा हा कोण? मी मरू नये म्हणून मला शब्दांत अडकवण्याचा याचा काय अधिकार?'

मध्ये आठवडा गेला. हासनला जाऊन यावं आणि केसची काय प्रगती झालीये ते बघून यावंसं तिला वाटलं. खरंतर वकिलांच्या असिस्टंटनं, शिवरामय्यांनी तसं काही असेल तर कळवतो म्हणून सांगितलं होतं. तरीही ती निघाली. 'नाहीतरी आता आपल्याला याशिवाय दुसरं काय काम आहे?' हा खटला जिंकणं एवढंच जीवनातलं अंतिम ध्येय राहिलं होतं. मुलांना सुशीलम्मांच्या घरी ठेवून ती एकटीच हासनला गेली.

“प्रतिवादींनीही वकील नेमला आहे. आपण केलेले सगळे आरोप त्यांनी नाकारले आहेत.” त्यांचं उत्तर तिला दाखवत शिवरामय्यांनी सांगितलं, “त्यांचा वकील मूर्खच दिसतोय! कोर्टात आवाज चढवून गुरगुरतो एवढंच. आपली तयारी आणि पुढची चाल ओळखण्याइतका तो शहाणा नाही. इस्टेटी विकत घेण्यासाठी आमच्या अशिलाला वेगळी आवक होती म्हणून लिहिलंय. एवढी मोठी रक्कम कुठून आली हे कोर्टात दाखवून द्यायची जबाबदारी आपण कशी पूर्ण करणार याचा त्यानं विचार केलेला दिसत नाही. आपला विजय शंभर टक्के आहे.”

तिच्या मनात आलं, ‘मी व्यभिचारिणी काय? मग दाखवतेच आता व्यभिचारिणीची शक्ती!’

“दावा कोर्टात दाखल झालाय. आताचे न्यायाधीशही फार कचकच न करता फटाफट निकाल लावणारे आहेत. कुणी फार वेळकाढूपणा केला तर भडकतात.” वकिलांकडची ही भेट तिला उत्साहाची वाटली.

येता येता ती आपल्या इस्टेटीवर जाऊन मॅनेजरबरोबर इस्टेटीवरून फिरून आली. त्या रात्री तिथं मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी सकाळीच निघून वीरप्पगौडांच्या जेनुकल इस्टेटीवरही गेली. वीरप्पगौडा गावात नव्हते. काही कामासाठी चिकमंगळूरला गेल्याचं समजलं. घरी मंगळम्मा होत्या. त्या तिच्याशी बोलल्या, पण त्यांच्या मनात आपल्याविषयी काहीतरी मळमळ साचली होती, हे तिच्या लक्षात आलं. एखादी गोष्ट मनात दडवणं त्यांना शक्य नव्हतं, हेही तिला काही दिवसंत जाणवलं होतं. तिनं त्यांना स्पष्टच विचारलं, “आंटी, तुमच्या मनात माझ्याविषयी काहीतरी अप्रिय गोष्ट सलते आहे असं मला वाटतं. तुम्ही मोकळेपणानं सांगितलंत तर मी माझं वागणं सुधारेन.”

मंगळम्मांनाही अवघडल्यासारखं झलं. तरीही तिला आपल्या झोपायच्या खोलीत घेऊन जाऊन दार बंद करून त्यांनी विचारलं, “तू कुणालातरी ठेवून घेतलं आहेस म्हणे. खरं?”

निखाऱ्याचा तोबरा बसावा तशी तिची अवस्था झाली. बुद्धीही भ्रमल्यासारखी झाली. स्वत:वर कसाबसा ताबा मिळवत तिनं विचारलं, “हे तुम्हाला कुणी सांगितलं किंवा तुमच्या कानावर येईल असं कुणी केलं सांगू?”

“तुझ्या काकूनं सांगितलं, हे तुझ्यासारख्या हुशार मुलीला सुचल्याशिवाय कसं राहील?” क्षणही न दवडता त्या म्हणाल्या.

“ती स्वत: आली होती?”

“सगळा गोतावळा आला होता. आमच्या गौडांना पाच लाख देतो, तिची समजूत काढा म्हणून सांगत होते. त्यांनीच सकलेशपूरचं रेकॉर्ड पाहिल्याचं त्यांना समजलंय ना! पण आमच्या गौडांनी सांगितलं, “यात माझं काहीही नाही. मी माझ्या सकलेशपूरच्या कामाला निघालो होतो. त्या वेळी ती येऊन माझंही काम आहे, मदत करा म्हणाली. आमच्या लेकीबरोबर एकत्र शिकलेली मुलगी ना! म्हणून मदत केली एवढंच! बाकीचं मला काहीही ठाऊक नाही.” नंतर तुझी काकू मला आत घेऊन गेली आणि असं असं आहे म्हणून

सांगितलं.”

“असं असं म्हणजे?”

“म्हणाली, “तिच्या नवऱ्याला शिकायला पैसे कुठून आले म्हणून विचारतेय? हा काय घरंदाज बायकांनी विचारायचा प्रश्न आहे? यामागचं खरं कारण म्हणजे तिनं एकाला ठेवून घेतलंय. तोच हिच्याकडून सगळं करवून घेतोय. तिला चार गोष्टी सांगून ताळ्यावर आणलं, तर एक संसार वाचवल्याचं पुण्य मिळेल तुम्हाला.”

ती म्हणाली, “कोर्टात केस दाखल केल्यावर हे ती सांगतेय, यावरून आमची काकू कसली आहे ते समजून घ्या म्हणजे झालं!”

“नवऱ्याबरोबर तुला नांदून सात वर्षं झाली?”

“तेही सांगितलं काकूनं? आणि त्यानं मला कसं फसवलं ते नाही सांगितलं? तुम्हाला हे सगळं कसं सांगू मी? श्वेता असती, तर तिच्याशी बोलले असते मोकळेपणानं.”

मंगळम्मांनी तो विषय तिथंच थंबवला.

जेवण करून मैसूरला परतताना ‘आपण व्यभिचारिणी’ या भावनेनं तिच्या डोळ्यांत कढत अश्रू भरत होते. नाही म्हटलं तरी मंगळम्मांच्या पुढ्यात मन अपमानानं भरून गेलं होतं. हा संबंध नसता, तर हा खटला खेळायला अधिक जोश आला असता. मन खिन्न असतानाच गाडी तुफान वेगानं धावत होती.

पुन्हा तिच्या मनावर शून्यभावाच्या उत्कटतेनं कब्जा घेतला. दररोज रात्री हातात रिव्हॉल्वर घेऊन बसणं, अपरात्री टेकडीवर दरीपाशी जाणं हे पुन्हा सुरू झालं; पण प्रत्यक्ष ट्रिगर ओढला जात नव्हता. खटल्याचा निकाल लागेपर्यंत आपल्याला मरायचा अधिकार नाही, हे तिला तीव्रपणे जाणवत राही.

प्रत्येक पावसाळ्याच्या सुरुवातीला छतावर डांबर घालणं आवश्यक होतं. या वेळी त्याला न विचारता आपणच मेस्त्र्याला पकडून हे काम करून घ्यायचं तिनं ठरवलं होतं. मेस्त्र्याचं घर गणेश टॉकीजपाशी होतं, हे तिला ठाऊक होतं. एक दिवस त्याच्या घरी जाऊन त्याला निरोप देऊन माघारी वळताना रस्तादुरुस्तीमुळे तिला डावीकडे वळून लक्ष्मीपूरच्या लहान रस्त्यावरून यावं लागलं. तिथून येताना एका भव्य बांधकामापाशी तिला जलजा दिसली. गाडीचा वेग अगदी कमी असल्यामुळे दोघींनीही एकमेकींना पाहिलं. अमृतानं गाडी थंबवत विचारलं, “हे काय? इकडं कुठं?”

“माहीत नाही? माझ्या कझीनचं हॉस्पिटल हे.” हे म्हणताना जलजाच्या चेहऱ्यावर आश्चर्य उमटलं होतं. अमृतालाही आठवलं. आता कुठं पाया संपवून वरचं काम थोडंफार चाललं होतं. खूप दिवसांनी जलजा भेटल्यामुळे तिनं गाडी आत आणून एका बाजूला उभी केली. बांधकामापाशी नीळकंठप्पाही देखरेख करत होते. तिला पाहताच तेही अभिवादन करून पुढं आले. क्षेमकुशल झाल्यावर तिनं विचारलं, “अजून हे एवढंच काम झालंय? एवढं कसं रेंगाळलं

हे?”

“तुला काहीच ठाऊक नाही अमृता? याची मोठीच कथा झालीये बघ. मधल्यामध्ये माझं बी.पी. मात्र वाढायला लागलंय.” बोलता बोलता ती थबकली. शेजारी उभ्या असलेल्या नीळकंठप्पांना “तुम्ही तिकडं चला बघू. मीही येतेच” म्हणून सांगितलं. त्यांनाही मथितार्थ समजला आणि ते निघून गेले.

“तू एवढ्या दिवसांनी भेटतेस. तुला सांगावं की सांगू नये असा विचार करतेय मी. अगदी शत्रूवरही येऊ नये अशा अवघड प्रसंगात सापडलेय मी. म्हणून मोठी कथा म्हटलं. सॉरी.”

“मला काहीच ठाऊक नाही. आपण असं करू या का? तुम्ही चला. आपण कुठंतरी गाडी थांबवून निवान्त गप्पा मारू या.”

कॉफर्डभवनसमोरच्या एका झाडाखाली गाडी उभी केल्यावर जलजा मोकळेपणानं बोलू लागली. सोमशेखरची भेट आणि सगळं सांगून ती म्हणाली, “त्याला काय झालंय कोण जाणे? ऑफिस बंद करून तीही जागा त्यानं विकून टाकली. मुंबईचं कुठलंसं कर्ज पेडायचं होतं म्हणून. त्यानं नर्सिंग होमचं काम पूर्ण करून दिलं असतं, तर तीन लाख रुपये मिळालेच असते ना? हवं तर त्यांना मी ॲडव्हान्सही देऊ शकले असते. तेवढे अधिकार मला राममूर्तींनी दिले आहेत. एवढ्या प्रामाणिक माणसाला पैसे देताना धोकाही नव्हता; पण त्याला कामातच रस नव्हता. राममूर्ती आले आणि सगळं काम बेंगळुरूच्या आर्किटेक्टकडे सोपवून गेले; पण तो आर्किटेक्ट नीट लक्षच देत नाही. सोमशेखरनं ऑफिस बंद केल्यावर नीळकंठप्पांनाही नोकरी नव्हती. इथं त्यांचं स्वत:चं घर आहे, शिकणारी मुलं आहेत. म्हणून इथंच त्या बेंगळुरूच्या आर्किटेक्टच्या हाताखाली हे काम पाहताहेत. सोमशेखरनं एकाएकी असं केलं. स्वत: तर बरबाद झालाच, आम्हालाही फार मनस्ताप झाला. आमच्या वडलांचा एक चांगला विद्यार्थी हा. त्याच्या आयुष्याचं मातेरं झालेलं पाहून वाईट वाटतं.”

बोलताना जलजा तिच्या चेहऱ्याकडे पाहत होती. अमृताला हे सगळंच नवं होतं. बसलेल्या धक्क्यातून स्वत:ला सावरत ती म्हणाली, “मला यातलं खरंच काही ठाऊक नव्हतं.”

“खरंच?” जलजाचा प्रश्न तिला कुणीतरी भोसकावा तसा वाटला. “मला तरी कसं समजणार? नीळकंठप्पांनी सांगितलं. बरं, तू कशी आहेस? नोकरी केलीच पाहिजे असं काही नाही म्हणा तुझं! आम्हाला मात्र नोकरी केल्याशिवाय गत्यंतर नाही.”

‘मी गाडीतून फिरते, नोकरी नसली तरी गाडीतूनच हिंडते. कॉफीच्या मळ्याची मालकीण आहे म्हणून ही असं म्हणतेय. इस्टेटीच्या इतर कथा, मुद्दल, कर्ज, व्याज आणि आता खटल्याच्या कथा तिला कुठून ठाऊक असणार?’ ती काहीच बोलली नाही.

घरी येताना तिला स्वत:कडूनच तिरस्कृत झाल्यासारखं वाटत होतं. ‘नर्सिंग होमचं काम सुटून त्यानंतर एवढं घडलं म्हणजे ही कमीत कमी सहा-आठ महिन्यांपूर्वीची हकिकत असणार. ऑफिसही विकून दोन-तीन महिने झाले असतील. मी पत्र लिहिलं ती अलीकडची गोष्ट झाली. त्या आधी दररोज घरी येणाऱ्या या महाभागानं या सगळ्यांविषयी एकदाही सांगू नये?’ संताप

आला. पाठोपाठ आठवलं, 'फोनवर शेवटचं बोलणं झालं तेव्हा त्यानं रात्री घरी फोन करायला सांगितलं होतं. दुपारी ऑफिसमध्ये नसतो म्हणून सांगितलं होतं. त्या घटनेला... अं... वीस दिवस झाले.'

घरी गेल्यावरही ती तळमळत होती. 'कामात रस नाही म्हणून तीन लाख देणारं काम निम्म्यावर सोडलं. ऑफिसचीही जागा विकली. माझं कर्ज फेडायला रातोरात मुंबईहून टेलेक्सनं पैसे मागवले यानं! मग मुंबईचा तगादा आल्यावर मला कसं सांगेल? हट्ट, हट्टीपणा, दुसरं काहीही नाही.

'होय. माझ्यावरचं प्रेम हाही त्याचा हट्टीपणाच आहे. कधीही कुठल्यातरी मूडमध्ये त्यानं 'मी तुझ्यावर प्रेम करतो' म्हटलं आणि आता हट्टानं त्याच मुद्याला चिकटून बसलाय. त्याला माझ्याविषयी खरं प्रेम नाही. म्हणून ऑफिस विकताना त्यानं मला एका शब्दानंही विचारलं नाही.' संतापानं ती थरथरत होती. 'आत्ताच्या आत्ता, या क्षणी त्याच्या घरी जाऊन त्याला जाब विचारायला पाहिजे.' पण स्वत: लिहिलेल्या पत्राची आठवण होऊन तिला अडखळल्यासारखं झालं. अंथरुणावर पडल्यावरही झोप न घेता नुसती कूस बदलून, पाय दुमडून, सरळ करून तिनं झोपायचा प्रयत्न केला. मनात आलं, 'त्यानं मला दूर लोटलंच होतं. मी आपणहोऊन असं काहीतरी करायची तो वाटच बघत होता की काय कोण जाणे!'

चारच्या सुमाराला ती एका निष्कर्षापर्यंत येऊन पोहोचली. तिनं गाडी काढली आणि थेट लक्ष्मीपूरच्या नर्सिंग होमच्या बांधकामापाशी घेतली. जलजा नव्हती. इतर कामगार काम करत होते. नीळकंठप्पाही फक्त तांत्रिक कामावरच देखरेख करत होते. तिनं त्यांना विचारलं, "तुमच्याकडे थोडं काम होतं. आता वेळ आहे का? की..."

"मीही काम संपवून निघालोच होतो मॅडम."

"चला" तिनं शेजारच्या सीटचा दरवाजा उघडला; पण त्यांना संकोच वाटला. "मागं बसा." म्हणून तिनं ते दार उघडून दिल्यावर ते आत बसले. जलजाबरोबर गेलेल्या झाडाखालीच गाडी उभी करून तिनं विचारलं, "मी तुम्हाला एक विचारते. काहीही लपवून न ठेवता उत्तर सांगा. तुम्हाला चामुंडेश्वरीची शपथ आहे. मी कुणालाही तुमचं नाव सांगणार नाही."

काहीतरी अंदाज आल्यामुळे त्यांनी काहीच उत्तर दिलं नाही. तिनं पुन्हा आग्रह केला तेव्हा ते म्हणाले, "तुम्हाला ठाऊक नाही असं काय आहे मॅडम?"

ती स्टिअरिंगसमोर बसली होती. वळून त्यांच्याकडे पाहत बोललं, तर ते संकोचानं काहीच बोलणार नाहीत हे ठाऊक असल्यामुळे समोर बघत ती म्हणाली, "तशी तुमची समजूत असेल; पण मला काहीही ठाऊक नाही, ही वस्तुस्थिती आहे. या नर्सिंग होमचं काम का सोडलं? ऑफिस का बंद केलं? केव्हा विकलं? मला सगळं नीट सांगाल?"

आता आश्चर्य करायची पाळी नीळकंठप्पांची होती. तिनं पुन:पुन्हा सांगितल्यावर ते म्हणाले, "तुमच्याबरोबरचा स्नेह वगळता त्यांना जगात कशाविषयी आस्था राहिलेली नाही. कामातही आस्था नाही, अशा समजुतीत मी आजपर्यंत, या क्षणापर्यंत होतो. फक्त मीच नव्हे,

जलजा मॅडम, इतर कितीतरी जण तसंच समजतात. ऑफिसजवळचे इतर बिझनेसमन तेच बोलतात. शेजारपाजारचे म्हणतात, प्रेम माणसाची काय गत करतं, त्याला कुठल्या पातळीवर आणून ठेवतं ते बघा!"

तिनं मान वळवून विचारलं, "आणि तुम्हीही यावर विश्वास ठेवता?"

सुरुवातीचा संकोच दूर झाल्यामुळे त्यांनीही उलट विचारलं, "ते दररोज दुपारी बारा ते चार-पाच वाजेपर्यंत सगळी कामं बाजूला टाकून तुमच्याकडे येत नव्हते? त्यांच्याकडून पगार घेऊन जीवन जगलेल्यांनी या विषयी बोलू नये; पण तुम्ही मात्र यातलं काहीही ठाऊक नाही म्हणता?"

ते आपली निर्भर्त्सना करताहेत असं वाटून तिच्या तोंडून शब्दच फुटेना. तेच पुढं म्हणाले, "मॅडम, खरं सांगतो. या मैसूरमध्ये त्यांच्यासारखं उत्तम काम करणारा माणूसच नाही. साधं तोंडानं अमुक कर म्हणून सांगितलं असतं, तरी मी ड्राफ्टिंग करून दिलं असतं. ही बेंगळुरूची पार्टी म्हणजे बडं प्रकरण आहे. ऑफिस विकून टाकताना त्यांनी मला पंचवीस हजार रुपये देऊन वेगळी नोकरी बघायला सांगितली. मीही ऑफिस विकायच्या आधी त्यांना किती गयावया करून म्हटलं, "असं का करता सर?" ते म्हणाले, "नीट लक्ष देऊन काम करायला जमलं तर करावं. नाहीतर उगाच गिऱ्हाइकांना का त्रास द्यायचा?" त्यांना काम करायची इच्छा असेल, तर पावणे दोन लाख उभे करणं अजिबात कठीण नव्हतं मॅडम. अमेरिकेच्या डॉक्टरांच्या कामाआधी शेट्टींचं कामही असंच सोडलं. नेमकं असं का घडलं असेल, यावर मी आणि नंजुंडेगौडानंही खूप विचार केला तेव्हा."

इतर तपशील विचारायचं तिला सुचलं नाही. त्यांनाही पुढं काय बोलावं ते सुचेना. संध्याकाळ होत आली होती. कुक्करहळ्ळीच्या तलावापलीकडे सूर्य बुडत होता. नीळकंठप्पा पश्चात्तापदग्ध स्वरात म्हणाले, "तुमच्यामुळे त्यांचा नाश झाला असं शेजार-पाजारचे म्हणत असतात. आजपर्यंत मीही तसंच समजत होतो, पण तुम्हाला तर यातलं काहीच ठाऊक नाही. आता सगळं लक्षात आलं माझ्या. ते कदाचित तुमच्यावर प्रेम करत असतील. तुम्ही करत नसाल. असं एकतर्फी प्रेम करून डोकं फिरवून घेणारे काय कमी असतात? त्यात तुमचा काय दोष?"

बेसावध असताना मस्तकावर मारल्यावर तिरीमिरी यावी तसं होऊन ती समोर पाहत बसून राहिली. तेच पुढं म्हणाले, "यानंतर कुणी हा विषय काढला, तर मी सत्य काय आहे ते सांगेन. इतके दिवस मी गप्पच बसत होतो. मला साइटवर जायला पाहिजे. तिथं सायकल लावलीये ना!" म्हणत ते गाडीतून खाली उतरले. मी सोडते म्हणायचंही भान न राहून ती जागीच बसून राहिली.

मेंदूत पाणी भरावं तशी तिची अवस्था झाली होती. सूर्यास्त होऊन अंधार पडला तरी तिला भान नव्हतं. कितीतरी वेळानं टॉर्चचा उजेड गाडीवर पडला आणि जवळ येणाऱ्या बुटाच्या आवाजाबरोबर प्रश्न ऐकू आला, "कुणाची गाडी? टॉर्चच्या उजेडात तिला एकटीला बघून त्यानं विचारलं, "बाई, एकट्याच या वेळी इथं का बसलात?"

स्वत:ला सावरत तिनं उत्तर दिलं, “संध्याकाळी वारं छान होतं म्हणून.”

“घरी जा बाई. अशा एकट्या वेळी-अवेळी फिरू नका.”

तिनं गाडी सुरू केली. जिल्हा कचेरीच्या समोरून लक्ष्मीबाई रस्त्यावरून देवराज रस्त्यानं गाडी घ्यावी लागेल याची तिला आधी कल्पना नव्हती. आता ते आठवलं. पाठोपाठ लक्षात आलं, ‘इथून पुढं गेल्यावर माडीवरची त्याच्या ऑफिसची जागा. मी स्वत: तिथलं सगळं अलंकरण केलं होतं. बोर्डही. आता त्या जागी आणखी कुणाचातरी बोर्ड लागला असेल.’ तिनं गचकन ब्रेक लावला. मागं-पुढं पाहत गाडी वळवली आणि त्याऐवजी रंभाविलास रस्त्यानं गाडी घेतली. आता तिला आठवलं, ‘अजून मुलांना घेऊन जायचंय.’ ती सुशीलम्मांच्या घरी गेली तेव्हा मुलांनी विचारलं, “अम्मा, एवढा का गं उशीर केलास?” तिनं उत्तर दिलं, “कोर्टाचं काम होतं.”

घरी परतताना ती मुलांनी फारशी बोलली नाही. अम्मा दररोज सारखीच नसते, हे मुलांच्याही लक्षात आल्यामुळे त्यांनीही तिला संभाषणात ओढलं नाही.

मुलं झोपल्यानंतर ती दीड तासापेक्षा जास्त वेळ लाउंजच्या सोफ्यावर मान झुकवून बसली होती. त्याच तंद्रीत तिला एक मुद्दा सुचला. ‘त्यानं मुंबईहून कर्ज आणलं असता मी त्याला आग्रहानं पैसे दिले, मी त्याचं ऑफिस सजवलं. होमविधी चालला असता संपूर्ण दिवसभर मी मरणाच्या विचारात भरकटत राहिले. असल्या नतद्रष्ट मनाच्या बाईनं हात घातल्यावर त्या ऑफिसचं भलं होणं कसं शक्य आहे? मी मरेपर्यंत केवळ मीच नव्हे, तोही सुखी होणं शक्य नाही.’ या सगळ्याचा समूळ नाश करायचा मार्ग नव्यानं दिसल्यासारखं तिला झालं.

त्यानंतर तिनं वेळ गमावला नाही. घराला कुलूप लावून, गॅरेज उघडून, गाडी बाहेर काढून गॅरेजचं दार आणि गेट नीट लावून तिनं गाडी गावाबाहेर पळवायला सुरुवात केली. रात्रीचे साडेअकरा वाजले होते. प्राणिसंग्रहालयाचं वळण, हार्डिंग्ज सर्कल, सयाजीराव रस्ता तिनं कन्नमवाडीचा रस्ता धरला. ओंटिकोप्प मागं पडलं, सॅनिटोरियम मागं पडलं, रेल्वेगेट मागं पडलं. अंधार सुरू झाला. आता मागचापुढचा विचार करायचा प्रश्नच नाही. कानात विश्वेश्वरय्या कॅनॉलचा आवाज घुमत होता. ‘फक्त पंधरा मिनिटांत!’ तिनं आणखी वेग वाढवला.

श्रीरंगपट्टणचा रस्ता फुटायच्या जागी नीट अंदाज न आल्यामुळे तिला कर्रर्रकन ब्रेक लावून गाडी थांबवावी लागली. तरी गाडीचं एक चाक रस्त्याच्या डिव्हायडरवर चढलंच. ‘छे:! ब्रेकच लावायला नको होता. या अपघातातच सगळं छान संपून गेलं असतं. पण ही सवय! या जगण्याला तरी सवय याव्यतिरिक्त दुसरं कुठलं कारण आहे? तिनं गाडी पुन्हा सुरू केली. वेगाला तर सीमाच नव्हती. भोवतालची झाडं, शेतं प्रचंड वेगानं मागं धावत होती. ‘आणखी फक्त दीड मैल. तेवढंही नाही.’ तिनं आणखी वेग... एकाएकी आठवण होऊन तिनं गचकन ब्रेक लावला. कर्रर्रकन किंचाळत गाडी उभी राहिली. ‘रात्रीच्या वेळी तिथलं प्रमुख गेट बंद असतं. शिवाय पहाराही असतो. अशा अवेळी कुणालाही आत सोडत नाहीत. त्यात एकट्या बाईला तर शक्यच नाही.’ निराशेच्या भरात ती पराकोटीची संतापली. तिनं अंधारातच सीटवरून डावा हात फिरवला. तिथं रिव्हॉल्वरही नव्हतं. ‘किती पापी आहे मी? समुद्रात उडी

मारली, तरी पाऊलही भिजणार नाही.'

'पण मी हार मानणार नाही. घरी जाईन आणि रिव्हॉल्वरनं मुक्ती मिळवेन.' टेकडीवरची दरीही तिला खुणावू लागली. त्वेषानं ती आणखी वेगानं मैसूरच्या दिशेनं गाडी पळवू लागली. श्रीरंगपट्टणचा फाटा मागं पडला. चढ सुरू झाला आणि मैसूरचे दीपरक्षक उठून उभे राहिले. रेल्वेगेट, सॅनिटोरियम मागं पडलं तेव्हा जयलक्ष्मीपूरच्या त्याच्या घरी जावं असं वाटलं. गाडीचा वेग कमी झाला. तिला स्वत:चाच राग आला. 'आपला सगळा अभिमान बाजूला ठेवून त्याच्याकडे जायचं?' पाठोपाठ आणखी एक विचारही मनात आला, 'देवराज अरस रस्त्यावरल्या ऑफिसवर कुणाचा बोर्ड आहे ते पाहायचं.' या विचारासरशी पाय ब्रेकवर पडला. तिनं स्वत:ला बजावलं, 'खरं काय आहे ते समजून घेऊन मरेन. त्या आधी घाबरून मरणार नाही.' तिनं ब्रेकवरचा पाय काढला. त्या तिच्या तळहाताइतक्या परिचित जागी 'हिरालाल फायनान्स अँड शेअर्स'चा बोर्ड लागला होता. 'मला आधी समजलं असतं, तर काहीही करून मी ही जागा विकत घेऊन ठेवली असती.' ती मनोमन तळमळली. या काल्पनिक उपायावरही तिच्या मनानं उत्तर दिलं, 'पण त्यानं ती कधीही घेतली नसती. माझी दमडी म्हणजे त्याला विष वाटतं!' संताप वाढला. गाडी वळवून ती घरी निघाली. घरी येऊन हातात रिव्हॉल्वर घेताना तिला एकाएकी त्याचं बोलणं आठवलं, 'तू आत्महत्या करायची नाहीस. तू तळमळत राहा, कष्ट सहन कर, पण जीव द्यायचा नाहीस.'

त्यानं स्वत: कबूल केल्याप्रमाणे त्यानंतर त्याने फोनही केला नव्हता. 'जिवंत राहून तळमळत राहा म्हणून सांगणारा हा कोण? मला बाहेरच्या बाहेर ठेवणाऱ्याला हा अधिकार कुणी दिला? आता विचारते त्याला.' म्हणत बेडरूममध्ये जाऊन ती त्याचा नंबर फिरवू लागली. शेवटचे नंबर फिरवताना वाटलं, 'मी का म्हणून फोन करू?'

ती रिव्हॉल्वर घेऊन कॉटवर बसली तेव्हा तिच्या शरीरातलं सगळं चैतन्य नष्ट झालं होतं. तशीच अंथरुणावर पडली तेव्हा तिला झोपेनं घेरलं होतं.

सकाळी कामावर आलेल्या महादेवम्मानं सांगितलं, "अव्वा, गाडी गॅरेजमध्ये नाही ठेवली? बाहेर रस्त्यावरच आहे की!" तिला आठवलं, गाडीची चावीही तिथंच राहिली होती.

मुलांना शाळेत पोहोचवून येताना तिला नीळकंठप्पांचं बोलणं आठवत होतं. 'खरोखरच त्याचं एकतर्फी प्रेम असावं काय?' घरी येऊन अंघोळ करताना आठवलं, 'दररोज दुपारी बारा ते चारपर्यंत इथं थांबायचं. मी देईन तेवढं दु:ख, त्रास सहन करायचा, रात्री पुन्हा फोनवर बोलण्याचा मारा सहन करायचा. खरोखरच, प्रेम नसेल, तर एवढा संयम शक्य आहे काय?' या प्रश्नासरशी तिच्या डोळ्यांसमोर अंधारी आली. स्वत:ला सावरत असतानाच रडू आलं. आवाज बाहेर ऐकू जाऊ नये म्हणून मोठा नळ सुरू ठेवून ती मुक्तपणे रडू लागली. तीन-चार वेळा ती मुक्तपणे रडली. पुन्हा रडली.

चेहरा धुवत असताना तिला मन हलकं झाल्याचा अनुभव आला. अंग पुसून खोलीत येऊन कपडे बदलताना सगळे अडथळे दूर होऊन पुढचा मार्ग स्पष्ट दिसत असल्याचा तिला अनुभव आला. हाती आलेली एक साडी नेसून, केस विंचरून, कपाळावर कुंकवाची टिकली लावून तिनं चाव्या असलेली पर्स उचलली आणि महादेवम्मांना सांगितलं, "मी बाहेर जातेय. तुम्ही जाताना

कुलूप लावून जा.”

डोळे मिटून गाडी चालवली तरी रस्ता चुकणार नाही अशा भावनेनं ती गाडी चालवत होती. तिनं बेल वाजवल्यावर त्यानं दरवाजा उघडला. त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य मावेना. त्यानं तिचं स्वागत केलं, “ये! ये!”

तिनं त्याच्याकडे निरखून पाहिलं. तो कृश झाला होता, पण नेटका होता. दाढी-केस सगळं व्यवस्थित होतं. अंगावरचा बनियन आणि लुंगी शुभ्र होती. दाराशी चपला ठेवून ती त्याच्या खोलीत गेली. कॉटवर एक पुस्तक होतं. वास्तुशिल्पशास्त्रातलं ते अत्याधुनिक पुस्तक होतं. ती कॉटवर बसली. तोही तिच्यापुढे खुर्ची ओढून बसला. त्यानं आस्थेनं विचारलं, “कशी आहेस?”

“दिसत नाही कशी आहे ते?” तिनं हसत विचारलं.

“वजन कमी करायची क्रेझ फार वाढलीय बायकांमध्ये.”

“पुरुषांमध्येही आहे.” तिनं त्याचं बोलणं उलटवलं.

तो हसत म्हणाला, “जशी प्रकृती तसंच पुरुषानं राहिलं पाहिजे ना!”

एवढ्यात स्वयंपाकघरातून कुकरची शिटी ऐकू आली. त्यानं आत जात स्टोव्ह बंद केला. तिनं विचारलं, “केव्हापासून घरी स्वयंपाक करता?”

“महिना झाला.”

पुढं काय बोलावं ते तिला सुचलं नाही. ‘मी त्याला सगळं मनातलं सांगेन, त्यालाही मन मोकळं करायला भाग पाडेन.’ या विश्वासानं ती इथं आली होती, पण इथं आल्यापासून दोघांमध्ये असलेला अत्यंत पारदर्शक काचेचा पडदा तिच्या अनुभवाला येत होता. पलीकडचं सगळं दिसत असलं, तरी स्पर्श करता येत नाही असा अनुभव येत होता. तिचा श्वास कोंडल्यासारखा झाला होता. ही अदृश्य भिंत आता, या क्षणी फोडली, नाही तर ती आणखी प्रबल होत जाईल हे जाणवून ती स्पष्टपणे म्हणाली, “जलजा भेटली होती. नीळकंठप्पाही भेटले होते. त्या दोघांनीही तुम्ही नर्सिंग होमचं काम सोडल्याचं आणि ऑफिस विकून कर्ज फेडल्याचं सांगितलं. मी तुझा विनाश करतेय असं मी मागंही म्हणत होते. मला तू हे सगळं का सांगितलं नाहीस? काम करण्यातला रस गेलाय म्हणून तू सांगितलं असतंस, तर माझं वागणंही सुधारलं असतं.”

“फक्त वागणं सुधारलं असतं! मला ते नको होतं. आताही नको आहे.”

त्याचं बोलणं समजायला तिला थोडा वेळ लागला. त्यानंतरही उत्तर सुचलं नाही. तिनं विचारलं, “केवढ्याला विकलंस ऑफिस? आता पोटापाण्यासाठी काय करतोस?”

“साडेतीन लाख आले. लाखाचा फायदा झाला. मुंबईचं कर्ज पेडलं. पंचवीस हजार

नीळकंठप्पांना दिले. आणखीही किरकोळ देणी संपवली. लाख बँकेत ठेवले आहेत. महिन्याला हजार रुपये येतात. भाडं सहाशे जातं. चारशेमध्ये इतर खर्च भागतो. म्हणून घरी स्वयंपाक करायला सुरुवात केली. इतरही काम नाही. तेवढाच वेळ जातो."

तिचा संताप अनावर झाला, "माझ्या पोटात आगडोंब उसळावा म्हणून ही गरिबी मिरवतोयस ना?"

"तुला कष्ट देण्याचा यात प्रश्नच कुठं आला? माझ्या आर्थिक परिस्थितीत जसं राहिलं पाहिजे तसं राहतोय. भारतातल्या इतर लोकांशी तुलना करता ही गरिबी नव्हेच. काहीही न करता दोन वेळचं जेवण आणि राहायला घर मिळाल्यावर गरिबी कशी म्हणता येईल?"

"मागं तू मित्राकडून टेलेक्सनं पैसे मागवून मला परत केलेस. तरीही विचारते, ऑफिस विकायची वेळ आली तेव्हा मला का सांगितलं नाहीस? मी काहीतरी व्यवस्था केली असती. घर गहाण ठेवता आलं असतं. मला दूर ठेवून नुसतं तोंडानं प्रेम म्हटलं तर त्याला काय अर्थ आहे?"

तो लगेच काही बोलला नाही तरी, या विषयी त्याचं पक्कं ठरलंय हे त्याच्या चेहऱ्यावरून तिला स्पष्ट समजलं. तरीही ती उत्तर वसूल करायच्या आविर्भावात बसून राहिली. तो म्हणाला, "पैसा मागून घेण्यावर माझा विश्वास नाही. कष्ट करून तो मिळवायला पाहिजे. तुझ्यात जगण्याविषयी रस नाही, मग तो माझ्यात कुठून येणार? जगण्यातच रस नसल्यावर कामात कुठून येणार? माझ्या गरिबीचं मूळ इथं आहे. ते नष्ट झाल्याशिवाय मी तुझ्याकडूनच नव्हे, कुणाकडूनही नवा पैसासुद्धा घेणार नाही."

"हे हजार रुपये यायचेही बंद झाले किंवा घरमालकांनी घराचं भाडंच हजार रुपये केलं तर तू काय करशील? तेव्हा तरी तुला कामात रस घ्यावाच लागेल ना?"

"जगायची इच्छा असेल तर! नाहीतर जेवणही नको आणि जगणंही नको म्हणून शांतपणे राहायचं. आता ती कोरडी तत्त्वचर्चा पुरे झाली. चल, माझ्या स्वयंपाकाची चव बघ." म्हणत तो स्वयंपाकघरात गेला. ती उठली नाही. थोड्याच वेळात त्यानं दोन ताटल्यांमध्ये भाजी आणि भात वाढून आणला. कॉटपाशी असलेल्या टिपॉयवर ठेवून पुन्हा आत जाऊन त्यानं साराचं पातेलं, दह्याचा कप आणि प्यायचं पाणी आणून ठेवलं.

हात धुऊन ती जेवू लागली. कढीलिंब-कोथिंबिरीशिवाय केलेलं, बाजारातून आणलेल्या कुठल्याशा मिरपुडीचं रुचिहीन सार भातात घालून जेवताना तिला बोलायलाही सुचलं नाही. भाडं दिल्यानंतर उरलेल्या चारशेमध्ये विजेचं बिल, गॅस, डाळ-तांदूळ, भाजीपाला, दूध, कॉफी, साखर हे घेतल्यावर एखादा कपडा विकत घेणं किती कठीण होतं, हे तिला स्पष्टपणे समजत होतं. तिनं विचारलं, "दोन्ही वेळा स्वयंपाक करतोस?"

"एक वेळ केलं की, तेच रात्रीही पुरतं. जुना फ्रीज आहे ना मुंबईहून आणलेला!"

"सकाळचा नाश्ता?"

“नाश्ता असा काही वेगळा करत नाही. अकरा वाजता जेवूनच घेतो. रात्रीही पुन्हा एकदा जेवतो.”

जेवण झाल्यावर तिनं ताटल्या विसळून ठेवल्या. त्यानं स्वयंपाकाची भांडी हातासरशी घासून विसळून ठेवली. तिनं विचारलं, “भांडी घासायला बाई येत नाही?”

“कशाला? काही गरज नाही. महिन्याला चाळीस-पन्नास रुपये मागतात.” तो सहज म्हणाला.

आता मात्र तिला तिथं बसणं अशक्य झालं. ती उठत म्हणाली, “निघते मी. नंतर फोन करेन.”

“कोर्टाचं काय झालं ते सांगितलं नाहीस तू.”

“ते ऐकून कुणाला काय?”

“काही नाही हे खरं, पण प्रगती झाल्याचं समजलं असतं तर आनंद झाला असता. सांग. तशीच जाऊ नकोस.” त्यानं आग्रह केला.

पण तिला बोलावंसं वाटलं नाही. “नको.” म्हणत चपला घालून ती चालू लागली. तोही शर्ट चढवून जिना उतरून गाडीपर्यंत तिला पोहोचवायला आला.

घरी येईपर्यंत तो आपल्यापासून खूप दूर गेलाय या विषयी तिची खात्री झाली होती. ‘दोघांमधलं अंतर एवढं वाढलंय की, यानंतर जगण्यात काहीच अर्थ नाही.’ कुत्र्यांचं खाणं-पिणं संपवून त्यांना मोकळं सोडून लाउंजमधल्या सोफ्यावर बसून विचार करताना तिला वाटलं, ‘त्याचं बोलणं केवळ निराशा निर्माण करणारं नाही. तो म्हणाला, “तुझ्यात जगण्याची इच्छा नसेल तर ती माझ्यात कुठून येणार? जगायचीच इच्छा नाही, म्हटल्यावर काम करायची इच्छा कुठून येणार?” पण जीवनावरचं प्रेम ही काय इतकी साधी गोष्ट आहे? तुला माझं मन समजलंच नाही सोमू. मरायचं दडपण वाढू लागलं की, मी कशी तळमळते हे तुला ठाऊक असतं, तर तू माझ्यावर हा आरोप केलाच नसतास. तुझं माझ्यावर प्रेम असेल, पण तू मला समजून घेणंच शक्य नाही. नाहीतर तू इतका कठोर झालाच नसतास.’ तिचे डोळे उष्ण पाण्यानं तुडुंब भरले.

आपल्या खोलीत जाता जाता तिनंही ठरवलं, ‘यानंतर फक्त दोन वेळा जेवायचं, फळं-दूध बंद करायचं. त्या दळभद्री सार मसाल्याऐवजी त्याला घरी केलेला सार मसाला, सांबार मसाला, गोडा मसाला द्यायला पाहिजे. पण त्यानं तिरस्कार दाखवला तर?’ तिला भीती... होय, सोमूची भीती वाटली.

कपडे बदलताना तिला आठवत होतं, ‘आज तो दूरच बसला होता. हातालासुद्धा त्यानं स्पर्श केला नाही.’ पाठोपाठ तिला आपलं पत्र आठवलं, ‘आपणच याला व्यभिचार म्हटलं आहे. एवढे दिवस झाले, तरी हा ते पत्र डोक्यात ठेवून वागतोय. हट्टानं! प्रेम असेल तिथं हा हट्टीपणा कशासाठी? म्हणजे त्याच्या मनात आता प्रेम असं काही शिल्लकच नाही म्हणायचं.’

संध्याकाळी मुलांना घरी घेऊन आल्यावरही मन विचार करत होतं, 'प्रेम असेल तिथं कठोरपणा नसतो.' रात्री मुलं झोपल्यावर तिच्या मनात येत होतं, 'माझं पत्र वाचल्यावर त्यानंही शरीरसंबंधाशिवाय प्रेम करायचा निर्धार केला असेल काय? आजवर अनेक वेळा साहित्यात वाचलेलं अशारीर प्रेम! तिचं मन अभिमानानं फुलून गेलं. अशा प्रेमात कुठलाही मनस्ताप व्हायचं कारणच नाही. तोच अधिक विचारी आहे. माझ्यापेक्षा कितीतरी पुढं जाऊन तो विचार करतो.' आता त्याच्याशी फोनवर बोलावंसं वाटलं. त्याच वेळी मनात आलं, 'जेमतेम महिन्याचा खर्च चारशे रुपयांत बसवताना हा फोनचा खर्च कसा करणार आहे? ऑफिस, व्यवसायच बंद केल्यावर त्यानं घरचा फोन... होय, माझ्यासाठी त्यानं घरचा फोन ठेवला आहे! तिचं मन कृतज्ञतेनं भरून गेलं. सोमू... सोमू... मला वाचवून तुला काय मिळणार आहे? त्यालाच विचारायला पाहिजे.' त्याच उत्साहानं तिनं रिसीव्हर उचलला; पण पाठोपाठ भीती वाटली. त्यानं रिसीव्हर उचलला तरी तिला एक अक्षरही बोलता येणार नाही असं वाटलं. 'स्नेहामध्ये शरीरसंबंधाची अपेक्षा करणं ही पाशवी वृत्ती असेल, पण प्रेमामध्ये आतुर झालेलं मन आपल्या प्रिय व्यक्तीकडे जाण्यासाठी तळमळत असताना दूर राहणं हाही क्रूरपणा नाही काय? पक्व होऊ पाहणाऱ्या फळाला फ्रीजमध्ये अतिशीत भागात ठेवून त्यातला रस नष्ट करावा तसंच हे!'

त्यानंतर एक दिवस सकाळी नऊ वाजता कुत्री भुंकू लागली. महादेवम्मानं आत येऊन सांगितलं, "कुणीतरी आलंय."

अमृतानं बाहेर येऊन पाहिलं. मोकळ्या सोडलेल्या कुत्र्यांना घाबरून रंगनाथ गेटबाहेर उभा होता. हातात छोटी लेदर बॅग होती. ती आतल्याआत कासावीस झाली. 'बहिणीनं पाठवलंय. दावा मागं घे म्हणून हा सांगायला आलाय.' दोन्ही कुत्र्यांना जागेवर बांधेपर्यंत तिनं स्वत:ला सावरलं. 'हातात छोटी बॅग आहे. मुक्कामाचा विचार नाही.' अनुमती दिल्याप्रमाणे ती त्याला "चला" म्हणाली. तो गेट उघडून आत आला. बसप्रवासानं त्याचे केस विस्कटले होते. चेहरा घामेजून गेला होता. त्याला लाउंजमधल्या सोफ्यावर बसवून ती आत गेली. तिचं मन अधैर्यानं भरल्यासारखं झालं होतं. 'काय बोलेल? कुठला विषय काढेल? बहिणीनं याला काय काय सांगितलं असेल? तो काहीही बोलला तरी 'मला ठाऊक नाही. जे व्हायचं ते कोर्टात होईल.' एवढंच सांगायचं.' असा निर्धार करून ती बाहेर लाउंजवर आली. ती समोर सोफ्यावर बसल्यावर त्यालाही बोलणं अवघड होतं असल्याचं तिच्या लक्षात आलं. 'काहीही झालं तरी आपण बोलायला सुरुवात करायची नाही.' असा निश्चय करून ती बसून राहिली. अखेर त्यानंच सुरुवात केली, "सकाळी बेंगळुरूहून पहिल्या बसनं निघालो."

तिनं नुसतीच मान डोलावली.

तो गडबडला होता, तरीही धैर्य एकवटून म्हणाला, "ऑफिसच्या कामासाठी बेंगळुरूला आलो होतो."

तिनं पुन्हा मान हलवली. तो पुन्हा अवघडून गेला. अखेर पुन्हा सगळं धैर्य एकवटून तो म्हणाला, "हा सर्वसामान्य बदली होण्याचा सीझन आहे. आमचे साहेबही म्हणाले, तुम्हाला कुठलं गाव पाहिजे ते आत्ताच सांगा. तुला विचारून त्यांना सांगावं म्हणून आलो."

“मला काय विचारायचं त्यात?”

“नाही. मागं मी एकदा मैसूर पाहिजे म्हणालो होतो.”

आपल्या अनुमतीशिवाय मैसूरला यायचं धैर्य नाही, हे तर तो स्पष्टपणे दाखवत होता. तिनंच विचारलं, “हासनच्या कोर्टात खटला चाललाय हे तुम्हाला ठाऊक आहे ना?”

तिची रोखलेली दृष्टी चुकवत तो उत्तरला, “ठाऊक आहे.”

“उद्या तुम्ही माझ्या बहिणीवरचा दावा मागं घे म्हणून कटकट करणार नाही?”

“तो तुझ्या वारसहक्कानं आलेल्या संपत्तीचा प्रश्न आहे. आपल्या मुलांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. मी त्यात लक्ष घालणार नाही; पण तिनं मला आईच्या जागी राहून सांभाळलं आहे. म्हणून माझ्या पगारातले पाचशे रुपये मी तिला देईन. याला तू आक्षेप घेता कामा नये.”

ती अस्वस्थ झाली. तिचे सगळे अंदाज मोडून संभाषण वेगळ्या मार्गावर चालल्याचं लक्षात येऊन ती बावरली. मन ताळ्यावर आणायला आपल्याला काही वेळ हवा हे लक्षात येताच तिनं विचारलं, “थोडं काहीतरी खायला आणू?”

“नको. खाणं झालं.”

“तर मग कॉफी आणते.” म्हणत ती उठून आत गेली. कॉफी घेऊन येताना तिचं मन पूर्णपणे ताब्यात होतं. तो सावकाश कॉफी पीत होता. ती समोरच्या सोफ्यावर बसली होती. कॉफी पिऊन होताच तिनं विचारलं, “तुमच्या बहिणीनं तुम्हाला माझ्याविषयी आणखीही काही सांगितलं असेल. ते जाऊ द्या. आपला शरीरसंबंध येऊन साडेसात वर्षं होऊन गेली आहेत. ही साडेसात वर्षं तुम्ही शुद्ध ब्रह्मचारीच आहात काय?”

तिनं थेट चेहऱ्यावर नजर रोखून विचारलेल्या या अनपेक्षित प्रश्नामुळे तो गडबडून गेला. खोटं सांगितलं, तर ते चेहऱ्यावर लपू शकणार नाही, हे लक्षात येऊन तो उत्तरला, “आजवर काय झालं ते मी तुला विचारणार नाही. तू विचारू नकोस. यानंतर आपण परस्परांशी प्रामाणिक राहिलं की झालं!’

क्षणही न दवडता ती म्हणाली, “मिस्टर रंगनाथ, आपण सरकारी नोकर आहात. बदली होऊन ज्या गावी जाल तिथं चोरटे संबंध ठेवलेत, तर नाव बिघडून जातं. त्यापेक्षा आपण लग्न करावं हे उत्तम! दोन वेळचं अन्न शिजवायचाही प्रश्न मिटेल. त्यासाठी आवश्यक असेल तिथं सही करायला मी तयार आहे. त्यानंतर माझ्या खर्चासाठी तुम्ही एक पैसाही द्यायची गरज नाही.”

संपूर्णपणे पराजित झाल्यासारखं त्यानं तिच्याकडे पाहिलं. तीच पुढे म्हणाली, “तुम्हाला हव्या त्या गावी बदली करून घ्या. माझ्या मुलांना भेटायला येणं, त्यांचं मन माझ्याविरुद्ध भडकावून देणं असली घाणेरडी कामं तुम्ही करणार नाही मला ठाऊक आहे; पण तसं काही करायला आलात, तर मी गप्प बसणार नाही. तुमच्या बहिणीला हे सांगून ठेवा.” म्हणत ती

उठून उभी राहिली. तो एवढा गोंधळून गेला होता की, उठून निघून जाणंही त्याला सुचेना.

ती म्हणाली, “तुम्ही एखाद्या वकिलाला भेटा. माझ्या सहीसाठी आवश्यक ती कागदपत्रं पोस्टानं पाठवून द्या. नमस्कार!” म्हणत ती निघून उठून आपल्या बेडरूममध्ये गेली. नंतर कुत्री भुंकायचा आणि गेट बंद झाल्याचा आवाज ऐकू आला.

अमृताला अनावर रडू आलं. सोफ्यावर बसून ती हुंदके देत होती. ‘आपण योग्य तेच केलं.’ अशी ग्वाही बुद्धी देत असतानाही हुंदके कमी होत नव्हते.

कितीतरी वेळानं बेडरूमचा दरवाजा वाजला. पुट्टम्मा आणि महादेवम्मा कामं आटपून जायला निघाल्या होत्या. त्या गेल्यावर दार बंद करून आत येताच तिला एक विचार सुचला. तिनं रिसीव्हर उचलला, नंबर फिरवल्यावर तिनं विचारलं, “मी. आवाज ओळखलास?”

“नाही!” तो म्हणाला.

“का गर्लफ्रेंडच्या स्वप्नात गुरफटलास का? माझा आवाजही ओळखायला आला नाही? काय करत होतास?”

“आता कुकर लावायला उठत होतो. एवढ्यात तुझा फोन आला.”

“स्कूटर आहे?”

“आहे.”

“नसेल तर मीच स्वत: कार घेऊन येणार होते. तू माझ्यासाठी जुईचा गजरा आणून किती दिवस झाले ठाऊक आहे? आज आणशील? आज... नव्हे... आत्ता!”

काही क्षण तो मौन होता. तिनं वाट पाहिली आणि नंतर म्हणाली, “तेवढंच धरून चाललास, तर तुझ्या-माझ्यात काय फरक राहिला? त्या दिवशी मी आले होते तेव्हा तू माझा हातही धरला नाहीस. माझं चुकलं असं माझ्या तोंडून वदवूनच मला स्पर्श करायचा असा तुझा हट्ट आहे काय? लवकर ये. खूप बोलायचंय तुझ्याशी. मी तरी आणखी कुणाबरोबर बोलणार?”

“आणखी पंधरा मिनिटंत येतो.” त्याच्या आवाजात उत्साह होता.

ती पटकन उठली. ‘त्यानं नाश्ता केला नसेल.’ तिनंही त्या दिवसापासून नाश्ता करायचं सोडून दिलं होतं. फक्त कॉफी तेवढी घेतली होती. मग साडेअकरा वाजता पोटात कसा आगडोंब उसळत होता, याचा तीही अनुभव घेत होती. तिनं तत्परतेनं टेबलावर दोन ताटल्या ठेवल्या. अन्न काढून ठेवलं. पाण्याचा तांब्या आणि भांडी ठेवेपर्यंत बाहेर स्कूटरचा आवाज ऐकू आला. तिनं दरवाजा उघडला. त्यानं दारातूनच विचारलं, “स्कूटर गॅरेजमध्ये ठेवू?” त्याचा चेहरा मृदू होता. खिशातून जुईच्या गजऱ्याचं पुडकं डोकावत होतं.

“बाहेरच असू दे.”

दरवाजा बंद करत त्यानं खिशातला जुईचा गजरा बाहेर काढला. ती त्याच्या छातीला पाठ लावून उभी राहिली. जुई दरवळली आणि तिथला सारा परिसरच त्या सुगंधानं सुकुमार होऊन गेला. शब्दांची गरज नसल्याप्रमाणे दोगंही संगीतातल्या साथीदारांप्रमाणे सहजतेनं परस्परांच्या हातात हात गुंफून निघाले. पोटातल्या भुकेचा दोघांनाही विसर पडला. तिला प्रत्येक क्षणी वाटत राहिलं, ‘ही उत्कट भेट आज झाली नसती, तर या संबंधाला कायमचं व्यभिचाराचं किटाळ राहिलं असतं.’

कितीतरी वेळानं ती त्याचं पोट कुरवाळत म्हणाली, “पोट खपाटीला गेलंय राजा, चल जेवू या.”

“इथंच घेऊन ये!” तो म्हणाला, पण त्यानं बाहूंची पकड सैल केली नाही. पलंगावरच जेवल्यानंतर ताटल्या शेजारच्या टीपॉयवर ठेवत तिनं कोर्टाची सगळी हकिकत सविस्तरपणे सांगतिली. रंगनाथ येऊन गेल्याचंही तपशिलानं सांगितलं. वेळ कसा गेला तेच कळलं नाही. अखेर साडेपाच वाजले तेव्हा ती म्हणाली, “उद्या साडेअकरा वाजता ये. आणखी गप्पा मारायच्या आहेत. थांब. थोडा दहीभात देते. संध्याकाळी कशाला पुन्हा स्वयंपाकाच्या कटकटीत पडतोस?” म्हणत त्याला डब्यात दहिभात देऊन ती मुलांना आणायला तयार झाली.

त्या दिवशी मुलांनाही अम्मा विशेष खुशीत असल्याचं लक्षात आलं. गाडी घराकडे न वळवता तिनं ती ललितमहाल हॉटेलकडे वळवली. मुलांना तिथं बटाटा चिप्स आणि बदामबर्फी खाऊ घालून त्यांच्याबरोबर समोरच्या मोकळ्या मैदानावर ती खेळू लागली. एकदा साडीत पाय अडकून पडली, तरी हार न मानता धावत खेळत राहिली. विकास दोन-तीन वेळा घरी जाऊ या म्हणाला तरी ‘आणखी एक डाव’ म्हणत खेळत राहिली. अखेर उजव्या चपलेचा अंगठा तुटल्यानं सरळ चालणंही कठीण झालं, तेव्हा खेळ थांबवून ती लंगडत गाडीकडे निघाली. विकास लगेच म्हणाला, “अम्मा, हॉटेलमध्ये तू आम्हाला खायला लावलंस. आपण मात्र काही खाल्लं नाहीस. म्हणून तुझी चप्पल तुटली.”

तरीही तिचं मन एकीकडे आतल्या आत कोमेजत होतं. भात उतरवून, सगळ्यांचं जेवण उरकून, मुलांना झोपवेपर्यंत तिला गिळून टाकेल असं शून्य भोवताली भिरभिरत होतं. आत-बाहेर सगळीकडे अंधार! भविष्य नसलेला गाढ अंधार! ‘कुठं जातेय मी? काय करतेय हे? हे कोर्ट, हा व्यवहार, ही इस्टेट, मुलं, त्यातच हा प्रेमसंबंध! यातलं प्रत्येक ओझं मला उचलता येणार नाही एवढं जड आहे. त्यातलं प्रेम तर दोन भाग करून परस्परविरुद्ध दिशांना खेचणारी विचित्र ओढ आहे. नाहीतर त्यामध्ये चेंदामेंदा करणारी शक्ती! मुलं मोठी होईपर्यंत त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव करत राहिलं पाहिजे. तीच मुलं मोठी झाल्यावर ‘आमच्या वडलांशी तू अन्यायानं वागलीस’ म्हणून मला दोष देणार शत्रू होऊन! आत्महत्या. होय. त्यासाठी एवढी चांगली वेळ. एवढा घनदाट काळोख! आज जीव द्यायचा.’ भरधाव गाडीनं टेकडीवर. जीवनातला शेवटचा क्षण... क्षण... दोन-तीन क्षण निरर्थकरीत्या रिते गेले. ती एकदम उठली. न्हाणीघरात जाऊन तिनं हात-पाय धुतले. देवघरात आली. हळदी-कुंकू देवाला वाहिलं. काही चुकलं असेल, तर क्षमा कर म्हणून त्याला हात जोडून विनवलं. ‘शेवटची प्रार्थना कुणासाठी करायची?

मुलांसाठी? रंगनाथ मुलांकडे आणि त्यांच्या शिक्षणाकडे निश्चित लक्ष देईल. नाहीतर त्यांना कुणीतरी पालनकर्ता भेटेल. मुलं मोठी होतील. सोमू? मी मेले की तोही मोकळा होईल. कुठल्यातरी उन्मादाच्या क्षणी उच्चारलेल्या त्या वाक्यापासून त्याचीही सुटका होईल. तो स्वतंत्र होईल. एखादी साधी सालस मुलगी बघून तो... नाही. ते माझं बाळ... माझं लेकरू... विजय-विकासला कुणीतरी पालनकर्ता भेटेल; पण याला मात्र कुणीही नाही. कुणीही नाही. कुणी पालन-पोषण करायला नसेल, तर हे माझं अनाथ लेकरू मरून जाईल. देवा रे! जीवनातल्या या अखेरच्या क्षणी माझी एकच प्रार्थना आहे. तू त्याच्याकडे कृपादृष्टी ठेव.' तिनं डोळे मिटून मनापासून प्रार्थना केली.

आत खोलीत येऊन हातात रिव्हॉल्वर घेताना तिच्या मनात विश्वास निर्माण झाला. चाव्या हातात घेत असतानाच टेलिफोनची घंटा वाजली. आतून संताप उफाळून आला. पाठोपाठ वाटलं. 'मी आज त्याला बोलावलं नसतं, तर त्यानं फोन केला नसता.' स्वत:वर संताप येऊन तिनं फोन न उचलायचं... पण फार वेळ फोन उचलला नसता, तर मुलं उठली असती, नाहीतर तो वेड्यासारखा बेसुमार वेगानं स्कूटर पळवत तिथं आला असता. 'त्यात हे प्राणिसंग्रहालयाजवळचं वळण...'

तिनं रिसीव्हर उचलला, पण काही बोलली नाही.

तोच म्हणाला, "आज तू इस्टेटीविषयी सांगत होतीस ना? त्यावर मला एक मूलभूत विचार सुचलाय. कोर्टाविषयी नव्हे. तुझ्या जीवनाविषयी. म्हणजेच माझ्याही जीवनाविषयी. थांब, मी तिकडंच येतो."

ती काही बोलली नाही.

"ऐकू आलं की नाही?" त्यानं चढ्या आवाजात विचारलं.

"मला झोप येतेय. उद्या बोललं तर नाही का चालणार."

"मलाही झोप येतेय; पण हे सांगितल्याशिवाय मला चालणार नाही. मी येतोय. तेवढ्यात दोन कप मस्त कॉफी करून ठेव." म्हणत त्यानं रिसीव्हर ठेवून दिला. ती हताश होऊन बसून राहिली.

काही वेळातच दूरवर त्याच्या स्कूटरचा आवाज ऐकू आला. या वेळी बाहेर स्कूटर ठेवायला नको म्हणून ती गॅरेजची चावी घेऊनच बाहेर आली. गेटपासचा विक्रांत गुरगुरला. तिच्या सूचनेनुसार स्कूटर गॅरेजमध्ये ठेवून तो आत आला. त्याला जाळून भस्म करावं तसं ती त्याच्याकडे पाहत होती. त्यालाही हे समजलं. त्यानं विचारलं, "एवढा का राग?"

ती काहीच बोलली नाही. तिच्याजवळ जाऊन तिचा अंबाडा मुळासकट घट्ट धरून तिचा चेहरा स्वत:कडे वळवत त्यानं पुन्हा विचारलं, "का एवढा राग?"

तिच्या डोळ्यांतले निखारे धगधगतच राहिले. पकड ढिली न करता तो तिच्या दृष्टीत रोखून पाहत राहिला. बघता-बघता तिचे डोळे तुडुंब भरले. त्यानं तिला तशीच मिठीत घट्ट धरली.

स्वत:ला सावरत ती म्हणाली, “एक मिनिट देवघरात चल. चपला बाहेर ठेव आणि पाय धुवून ये.”

देवघरात गेल्यावर ती म्हणाली, “काही वेळापूर्वी मी देवावर हळद-कुंकू वाहिलं. आजचा माझा या जीवनातला शेवटचा दिवस, शेवटचा क्षण म्हणून! एवढ्या उत्कट स्थितीला या आधी मी कधीही गेले नव्हते. या आधी देवाची अशी प्रार्थना केली नव्हती. हात जोडून देवाची शेवटची प्रार्थना करताना काय वाटलं ठाऊक आहे? रंगनाथ मुलांकडे निश्चित बघेल. माझ्या माघारीही ती निश्चित जगतील. त्यांची काळजी करायची आवश्यकता नाही; पण तुझी काय गत? मी मरून गेले तर तुला कोण आहे? म्हणून मी देवाला प्रार्थना केली, देवा, माझ्या या बाळाची मात्र तूच काळजी घे.”

तो मूक होऊन गेला होता. उभ्या उभ्या त्यानं तिचा हात घट्ट पकडला. तिनं मान वळवून त्याच्याकडे पाहिलं. उजेड परावर्तित व्हावा एवढं पाणी त्याच्या डोळ्यांत साचलं होतं. दोघंही पुन्हा देवाला हात जोडून, देवाच्या पायाशी पडलेलं कुंकू कपाळावर लावून पुन्हा गेस्टरूममध्ये आले. तो तिथल्या वेताच्या सोफ्यावर बसला. मुलांच्या खोलीचा दरवाजा नीट बंद करून ती त्याच्याजवळ बसली. तिनं विचारलं, “सोमू, तुझ्या डोळ्यांत पाणी का आलं?”

“तुझ्या माघारी मला बघणारं कुणीही नाही, हे तुझ्या लक्षात आलं ना? म्हणून.”

काही क्षण मौन गेले. नंतर तो म्हणाला, “यानंतर तू दु:खी होशील. वेदनेनं तळमळशील, शून्य भावनेत घेरून जाशील, पण यानंतर तू आत्महत्या करणार नाहीस अशी माझ्या मनाची खात्री झाली आहे. यानंतर जेव्हा तो क्षण तुला घेरेल, त्या वेळी मला तुझ्याशिवाय कुणी नाही हेही तुला आठवेल.”

“एकदा असं घडलं. यानंतर प्रत्येक वेळी असंच घडेल म्हणून कोण खात्री देणार? माझ्या मनाचा विचित्रपणा तुला कुठं ठाऊक आहे?”

“तुला तरी कुठं तो पूर्णपणे ठाऊक आहे? तुझं माझ्यावर जे प्रेम आहे त्याची खोली तुलाच ठाऊक नाही.”

“मी तुझा किती तिरस्कार करते हे तुला तरी कुठं ठाऊक आहे?”

“ठाऊक आहे. त्या तिरस्कारामागचं कारणही ठाऊक आहे. माझं कसं होईल या काळजीनं तू देवाची प्रार्थना करत असतानाच मला फोन करून इथं यावंसं वाटलं. नाहीतर मी उद्या आलो असतो. याला तू काय म्हणतेस?”

“देवावर विश्वास ठेवायला शीक म्हणते.” त्याच्या दंडावर चूक केलेल्या विद्यार्थ्याला मारावी तशी चापटी मारत ती म्हणाली.

तोही सांगू लागला, “शून्य भावात तू बुडून गेलेली असताना तुझ्याशी वाद घालताना तू माझं तुझ्यावर प्रेम आहे हा मुद्दा प्रत्येक टप्प्यावर खोडून काढत असतेस तेव्हा मी मनोमन काय म्हणतो ठाऊक आहे? “देवा, काय केलं तर हिचा माझ्यावर विश्वास बसेल? निदान तू तरी

तिचा माझ्या प्रेमावर विश्वास बसेल असं कर.” देवाचं अस्तित्व खरं की खोटं ते मला ठाऊक नाही; पण त्याची काहीतरी कल्पना केल्याशिवाय प्रेमाची खरी उत्कटता व्यक्त करणं शक्य नाही की काय कोण जाणे!”

तिचा चेहरा फुलून गेला होता. डोळे पाणावले होते. तिनं ते पुसले नाहीत. मंडीवर त्याचं डोकं ओढत मायेनं म्हणाली, “ये, माझ्या मंडीवर डोकं ठेवून झोप. माझ्या बाळाचे किती लाड करू मी असं झालंय मला.” कितीतरी वेळ ती त्याचे केस कुरवाळत बसली होती.

नंतर तिनं विचारलं, “कोर्टाच्या केसचं काहीतरी म्हणत होतास ना?”

भावनेची अनुपम उत्कटता नष्ट होऊ नये म्हणून तो म्हणाला, “उद्या सांगतो.”

“तोपर्यंत वाट पाहायची म्हणजे मलाही झोप येणार नाही आणि तुलाही येणार नाही.”

तरी तो काही बोलला नाही. तिनंही पुन्हा आग्रह केला नाही. काही वेळानं तो म्हणाला, “नीट बैस. मी झोपूनच सांगतो; पण तुझा चेहरा दिसायला पाहिजे.”

दोघांच्या चेहऱ्यांमध्ये येणारा पदर आणखी चोपून ठेवत ती त्याच्या चेहऱ्याकडे पाहत राहिली. तोही तिच्या चेहऱ्याकडे पाहत सांगू लागला, “तू खटल्याविषयी सांगतेस, मीही त्यावर विचार करत असतो. त्यानंतर विचार करताना माझ्या मनात काय आलं ते सांगतो. आता फक्त मी सांगतोय ते ऐक. नंतर यावर शांतपणानं विचार कर.

“तू त्यांच्यावर दावा घातलास ते योग्यच केलंस. त्या बाईला आणि बँकेला धडा शिकवायलाच पाहिजे. या खटल्याचा निकाल तुझ्या बाजूनं लागेल, याची मला जवळजवळ शंभर टक्के खात्री आहे; पण नंतर ती सगळी इस्टेट घेऊन तू काय करणार आहेस याचा नीट विचार कर. मुलांसाठी? मुलं तरी त्याचं काय करणार आहेत? जाऊ दे. तो फार पुढचा विचार झाला. आजची तुझी स्थिती, तुझं स्थान काय आहे हे तुझ्या लक्षात आलेलं नाही. ते आधी तू जाणून घे.

“या सगळ्या इस्टेटीची तू एक ट्रस्टी आहेस, एक विश्वस्त. तुझ्या पोटी जन्मलेली ही मुलं! जन्माबरोबर त्यांना वारसाहक्कानं त्या इस्टेटीत वाटा आला आहे. ती मुलं योग्य वयाची होईपर्यंत त्या इस्टेटीचं रक्षण करणं हे तुझं कर्तव्यच आहे. तेवढं तू जरूर कर; पण तुझा त्यावर कुठलाही अधिकार नाही हे विसरू नकोस. ‘हे माझं नाही’ असा तुझ्या मनाशी पक्का निर्धार असू दे. कायद्यानं त्यातल्या एक तृतीयांश भागावर तुझा अधिकार आहे ना? तो हवा तर ठेवून घे. काही काळासाठी ठेवून घेतलास, तरी दान करायचा संकल्प करून त्यातून भावनात्मक दृष्टीनं मोकळी हो.

“यानंतर तुझ्या चरितार्थाचा प्रश्न. तुला ठाऊक आहे, तुझ्या माघारी माझं कुणीही नाही. तेवढं मला जीवनात रस निर्माण करायला पुरेसं आहे अमू! पैसा मिळवणं ही अशक्य गोष्ट नाही. त्या दिवशी तुझं लक्ष नव्हतं. दारामागं डुप्लिकेटर, टाइपरायटर, स्केल्स, टेबल, ऑफिसचं सगळं सामान ठेवलं आहे. वीस-तीस हजारांत भाड्याची जागा घेऊन ऑफिस सुरू

करणं सहज शक्य आहे. नीळकंठप्पांना समजलं, तर ते पुन्हा धावत येतील. दहा ठिकाणांहून ते कामंही मिळवून आणतील. महिन्याभराच्या अवधीत दरमहा दहा हजारापर्यंत उत्पन्न येईल अशी व्यवस्था निश्चित करता येईल. वर्षभरात भरपूर कामं मिळतील. तुझ्या निर्वाहाची जबाबदारी माझी! मी मिळवलेल्या पैशाव्यतिरिक्त इस्टेटीमधल्या पैशांचं घासभरही अन्न खाणार नाही, म्हणून तू मनाशी निश्चय कर. मी एकट्यानं राबणं तुला पटत नसेल, तर तू दुसऱ्या कुठल्यातरी कॉलेजमध्ये नोकरी कर. नाहीतर असंही करता येईल... ऑफिसचं सगळं अलंकरण तूच तुझ्या विचारानं केलं होतंस. मुंबईमध्ये त्याचा छोटा सहा महिन्यांचा कोर्स आहे. मी तुला त्यासाठी पाठवून देईन. ऑफिसमध्ये तुझीही स्वतंत्र केबिन ठेवता येईल. मी तर ऑफिसचं नावही ठेवलंय – 'अमृता अँड शेखर आर्किटेक्टस इंटिरियर डेकोरेटर्स!' विजय-विकास आपल्याबरोबर राहतील. इस्टेटचा पैसा त्या दोघांच्या पालन-पोषणावर आणि शिक्षणावर खर्च करू या. सगळा खर्च नीट मंडून ठेवू. आपल्याला मुलं झाली, तर त्यांना आपल्या पैशांनी वाढवू या.

"विजय-विकास योग्य वयाचे झाले की, तू त्यांना समोर बसवून सगळं समजावून सांग. म्हणावं, "मला शक्य होतं आणि अधिकारही होता. तरी मी इस्टेटीमधलं घासभरही अन्न खाल्लं नाही. माझं मी मिळवून खाल्लं आहे. यानंतरही आयुष्यभर अशीच राहीन. तुमच्यासाठी मी इस्टेटीची फक्त देखरेख पाहिली आहे." त्या वेळी त्यांच्या मनात किती उदात्त भावना निर्माण होईल ठाऊक आहे? त्यांच्या मनात आणखी काहीही असलं, तरी तुझा नैतिक दरारा तरी निश्चित वाटेल." एवढं सांगून तो गप्प बसला.

तिचे डोळे त्याच्या चेहऱ्यावर खिळले असले, तरी मन विचारात गढून गेल्याचं तिची दृष्टीच सांगत होती.

तो पुढं म्हणाला, "ऑफिस विकण्याआधी तुला सांगता आलं असतं. तुला समजल्यावर तू पैशांचीही काहीतरी व्यवस्था केली असतीस. मला त्या विषयी कधीच शंका नव्हती; पण रंगनाथ आणि काकूची कथा ऐकल्यावर या घरावर काढलेला पैसा वापरणं मनाला पटण्यासारखं नव्हतं. तू स्वत: मिळवलेला पैसा असता, तर मी निश्चित घेतला असता."

"त्यांनी फसवणूक केली आहे. हे घर, ही इस्टेट माझी आहे. माझ्या आईकडून आलंय ते मला."

"तू आत्ता काहीही बोलू नकोस. मनात ठेव आणि नंतर विचार कर. सावकाश विचार कर. घाई करू नकोस. हवं तर या घरात आपण राहू या; पण हे घर विजय-विकासचं. ते वयात येईपर्यंत आपण हवं तर इथं राहू. हवं तर गावात एखादं भाड्याचं घर घेऊन राहू. कुठंही राहायचं ठरलं, तरी मी तुझ्याबरोबर असेन. कुत्रीही राहू दे. याहून अधिक संरक्षणाच्या साधनांची आवश्यकता नाही. रिव्हॉल्वर लायसन्स माघारी देऊन ते विकून टाक. त्याची आवश्यकता नाही."

तिला काही बोलायचं होतं; पण त्यानं काहीही बोलू नकोस म्हणून खुणेनं सांगितलं. सगळीकडे गाढ मौन पसरलं. दहा-पंधरा मिनिटांनी तो "पाय दुखले?' 'म्हणून उठून बसला. ती अंतर्मुख होऊन गेली होती. त्यानंतरही तो काही बोलला नाही. कारण ती तिथं नव्हतीच.

अर्ध्या तासानं तो म्हणाला, “लुंगी आणून दे. तूही आता झोप जा. साडेतीन वाजले.”

त्यानंतर त्यानं पुन्हा तो विषय काढला नाही. तीही काही बोलली नाही. नेहमीप्रमाणे तो बारा वाजता येत होता आणि संध्याकाळी पाच वाजेपर्यंत तिथं थांबत होता. ती संध्याकाळी त्याला दहीभाताचा डबा भरून देत होती. तिचं बोलणं कमी होऊन गेलं होतं. स्वत:शीच विचार करत बसायची तिची प्रवृत्ती वाढली होती. तोही तिच्या मौनाचा भंग न करता तिच्या अभ्यासिकेत बसून तिनं वाचलेल्या आणि खुणा घालून ठेवलेल्या पुस्तकांचं निरीक्षण करत होता. तिचा संताप अजूनही कमी झाला नव्हता. एकदा रागावली, “त्या खोलीत बसून पुस्तकंच वाचायची असतील, तर इथं का यावं? घरी घेऊन जा हवं तर.” म्हणून तिच्या खोलीत झोपून पुस्तक वाचू लागला तर म्हणाली, “माझी किळस वाटते म्हणून पुस्तकात चेहरा लपवून बसतोस काय?” तिच्या मनात उमटणाऱ्या प्रश्नांना मात्र अंतच नव्हता.

‘याला काय म्हणायचंय? मी एवढी हपापलेली आहे? मी त्यांच्यावर केस केली, हे याला आवडलं नाही काय? तो शेजारी असला तरी त्याला न विचारता आपल्या प्रश्नांची आपणच उत्तरं शोधून काढण्यासाठी ती धडपडत होती. तो तिचा हट्टही होता. पण ‘दावा दाखल केलास, ते चांगलं झालं’ असंही तोच म्हणाला. एवढ्या मोठ्या इस्टेटीच्या मालकिणीशी संबंध ठेवणं हा त्याचा स्वत:चा प्रश्न असेल काय? कदाचित तसंही असेल.’

संध्याकाळी तो आपल्या घरी निघून जात होता. रात्री ती जागीच राहत होती. मृत्यूचं दडपण अधूनमधून येत होतं; पण रिव्हॉल्वरला हात लावणं म्हणजे त्याच्याशी प्रतारणा केल्यासारखं वाटत होतं. मधूनच ‘त्याचं ऐकायला मी काही चाकर नाही.’ म्हणत ती रिव्हॉल्वर हातात घेत होती. एकदा रात्री रिव्हॉल्वर घेऊन ती टेकडीवर दरीकाठी गेलीही होती.

पण त्या दिवसानंतर त्यानं रात्री फोन करायचं सोडून दिलं होतं. त्याच दिवशी सांगितलं होतं, “तुला बोलावंसं वाटलं, तर तू फोन कर. कारण रात्री मी फोन करायचा म्हणजे तू झोपलेली असशील.”

‘माझ्या अंतर्मनाला सूचना द्यायचं याचं तंत्र मला समजत नाही असं याला वाटतं की काय? या विचारासरशी ती मंद हसली.’

टेकडीभोवती शुभ्र चांदणं पसरलं होतं. कुठंही अंधार नव्हता. ‘जीव द्यायचा म्हणजे अंधार काय आणि चांदणं काय?’ तिच्या नकळत तिचं मन इस्टेटीच्या सगळ्या अधिकारातून मुक्त होऊन स्वत: मिळवलेलं खात जगण्याच्या जीवनाचा तपशील रंगवण्यात गढून गेलं होतं. भानावर येताच वाटलं, ‘त्यानं सांगितलं म्हणून मी तसं का जगावं?’

सव्वा-दीड तास टेकडीवर दरीपाशी उभी राहून घरी परतल्यावर त्याला फोन करायची तिला तीव्र इच्छा झाली. ‘त्याच्या ‘अमू’ या हाकेतच किती प्रेम ओसंडतं!’

त्यानं रिसीव्हर उचलताच ती म्हणाली, “काही नाही. उगाच फोन केला. वाचत होतास ना? पण तू का मला फोन केला नाहीस? या वेळी माझं मन कसं असतं, तुला ठाऊक नाही काय? की ‘मरू दे अधाशी बया’ म्हणून निवान्त झोपला होतास?”

“तुझ्या माघारी मी जगणार नाही हे तुला ठाऊक आहे. त्यामुळे तुला जिवाचं बरं-वाईट करून घ्यायला जमणार नाही, याची मला खात्री आहे.”

“म्हणजे मी मेले की, तू आत्महत्या करणार?” तिचा आवाज आतुरतेनं भरला होता.

“तुझी शपथ! रिव्हॉल्वर, दोरी, पाणी, रेल्वे असलं काही निश्चित करणार नाही. ते अत्यंत हीन आहे यावर माझा विश्वास आहे; पण तू नसशील तर माझी जगण्याची इच्छा मरून जाईल. त्यानंतर आपोआप जीवही जाईल.”

“खरं?”

“तुझी शपथ म्हणून सांगितलं ना? एवढं पुरेसं नसेल, तर देवाची शपथ घेऊन सांगतो?”

तिला आतून रडू आलं. तिचे हुंदके ऐकून त्यानं विचारलं, “का रडतेस?”

स्वत:ला सावरून ती म्हणाली, “एका नीच बाईसाठी तू मरायला तयार झालास? तू माझ्यावर का प्रेम करतोस ठाऊक आहे?”

“ठाऊक असतं तर मीही ज्ञानी झालो असतो.”

“म्हणजे? प्रेम ही अज्ञानाची अवस्था आहे?”

“ज्ञानीही प्रेम करतो. जास्त उत्कट प्रेम करतो.”

“हे बघ, विषय बदलू नकोस. माझ्या हातून सुटका करून घेणं एवढंसं सोपं काम नाही.”

या प्रसंगानंतर पाचव्या दिवशी रात्री आठ वाजता फोनची घंटा वाजली. ‘हा त्याचा फोन निश्चित नव्हे.’ तिनं रिसीव्हर उचलला, “हॅलो!”

“मोठ्यानं बोला. ऐकू येत नाही. मी शिवरामय्या बोलतोय.” ओरडून बोलल्याचा आवाज ऐकू आला.

“मी डॉक्टर अमृता बोलतेय. बोला. ऐकू येतंय.” तीही ओरडून म्हणाली.

“कोर्टाचा हुकूम निघालाय. इथला फोन बिघडल्यामुळे गेल्या दोन दिवसांत कळवायला जमलं नाही. खटल्याचा निकाल लागेपर्यंत त्यांना त्या दोन्ही इस्टेटींवर राहता येणार नाही. तिथली घरं म्हणजे इस्टेटींचा एक भाग असल्यामुळे तीही त्यांनी रिकामी करायला पाहिजेत. बँकेची खातीही कोर्टाच्या अधिकारात येताहेत. दोन्ही इस्टेटी एकमेकीला लागून असल्यामुळे देखरेखीसाठी कोर्ट एका मॅनेजरची नेमणूक करेल. आता आपण हिशेबाची सगळी कागदपत्रं बघून कोर्टात सादर करायला हवीत. हिशेबावर चर्चा करायचा अधिकार वादी आणि प्रतिवादी दोघांनाही आहे. इस्टेटींचा खर्च वजा जाता उरलेला फायदा कोर्टाकडे अमानत म्हणून जमा होईल. या केसचा निकाल लागेपर्यंत विवाहित जयरामला दर महा हजार, अविवाहित

कृष्णमूर्तीला पाचशे, त्यांचे आई-वडील नरसिंहमूर्ती आणि जयलक्ष्मम्मा यांना हजार रुपये कोर्ट देईल. त्याबरोबरच डॉक्टर अमृता यांच्या सुगूर इस्टेटच्या दाव्याचा निकाल लागेपर्यंत व्याज भरायची आवश्यकता नाही, असा हुकूम आहे. ऐकू आलं?"

"हो. आलं."

"हा फार महत्त्वाचा हुकूम आहे मॅडम. आपल्या दाव्यात सत्य आहे याची खात्री नसती, तर असा हुकूम दिला नसता. केस आपल्यासारखी होणार याची ही स्पष्ट खूण आहे. हुकूम ऐकून आई-मुलं घामाघूम झाली आहेत! ठेवू फोन? बाकी ठीक आहे ना?"

तिनं "ठीक आहे." म्हणताच त्यांनी रिसीव्हर ठेवल्याचा आवाज ऐकू आला.

ती उत्तेजित झाली होती. 'केसच्या विजयाची ही पहिली चाहूल! माझ्या पैशांतून विकत घेतलेल्या इस्टेटींमधून त्यांना बाहेर पडावं लागेल. सुप्रीम कोर्टाची तयारी होती ना? आता आधी सकलेशपूर किंवा हासनमध्ये एक भाड्याचं घर बघा! बँकेचं व्याज भरायचं थांबलं. वर्षाकाठी ते तीन-चार लाख हाती येतील!'

तिला काय करावं ते सुचेनासं झालं. 'कुणालातरी हे सांगायला पाहिजे. मुलांना... पण मुलं फारच लहान आहेत. त्यांना हे सांगायला नको.' ती तशीच बसून होती. थोड्या वेळानं विकास आत येऊन म्हणाला, "अम्मा भूक लागली."

ती स्वयंपाकघरात जात म्हणाली, "दहा मिनिटं थांबा हं! खीर करते."

विजयनं विचारलं, "का? आज काय आहे?"

"आपली केस चाललीये ना? पहिली पायरी आपण जिंकलो. हे बेदाणे-काजू स्वच्छ करून दे बघू!" तिनं सांगितलं.

साखर-वेलदोडे घातलेली खीर चविष्ट झाली होती. मुलं दोन-दोन वाट्या खीर खाण्यात रंगून गेली; पण ती मात्र खाऊ शकली नाही. 'तो उद्या दुपारी येईल. तोपर्यंत फ्रीजमध्ये ठेवून... उद्यापर्यंत खिरीचा अर्थही थंडगार होऊन जाईल. त्यापेक्षा त्याला आताच बोलावून घेतलं तर? मुलं झोपल्यावर त्याला फोन करून... त्यासाठी मुलांनी का झोपायला पाहिजे? त्यांना आम्हा दोघांची मैत्री अपरिचित नाही. नंतर तरी एकत्र राहायचं आहेच ना? मग मुलांच्या समोरच त्याला का बोलावून घेऊ नये?' पण प्रश्न तेवढाच नव्हता. 'कोर्टाच्या या हुकुमाचं तो कसं स्वागत करेल? तो तर म्हणतो, इस्टेटीच्या संदर्भात पूर्णपणे निरिच्छ राहा. आता खीर खाऊन आनंद व्यक्त करायला तो तयार होईल काय?' ती जेवली, पण खीर मात्र न खाता! खीर खराब होऊ नये म्हणून फ्रीजमध्ये ठेवून दिली. पुन्हा एकदा तिला तीव्रपणे वाटलं, 'माझ्याइतकी दुर्दैवी मीच! आनंद सामोरा आला, तरी तो अनुभवण्याचं भाग्य माझ्या नशिबात नाही.' ओंजळीत चेहरा लपवून ती सोफ्यावर बसून राहिली. गाढ मौन. शून्य भाव. 'कशातच काही अर्थ नाही. जगण्यात अर्थ नाही. फक्त मृत्यूत तेवढा अर्थ आहे.' तिनं रिव्हॉल्वर ठेवलेला ड्रॉवर उघडला. ' 'तुझ्याशिवाय मला कुणी नाही. तू आत्महत्या करणार नाहीस.' छे:! त्याच्या

बोलण्यात काही अर्थ नाही. आता थांबायचं नाही. लवकर सगळं संपवायचं.' कितीतरी वेळ ती रिव्हॉल्वरकडे पाहत राहिली. नंतर डाव्या लाथेनं ड्रॉवर बंद करत पुटपुटली. "मरायचा मला काय हा एकच मार्ग आहे? कपडे वाळत घालायचा दोर, तोही पुरेसा आहे." म्हणत ती सोफ्यावर बसली. 'जुनं घर, उंच सीलिंग!' ती याच विचारात गढून गेली असता फोन वाजला. 'मरायच्या क्षणीही याची कटकट! फोन उचलायचा नाही; पण मग दहा मिनिटांत इथं हजर होईल आणि मुलं जागी होतील.' तिनं संतापानं रिसीव्हर उचलला. तो तिला बोलू न देता म्हणाला, "श्रीकंठांचं 'भारतीय काव्य मीमांसा' वाचत होतो. काय अद्भुत पुस्तक आहे गं! पण यातला काही भाग मात्र समजला नाही. तू मला समजावून सांगायला पाहिजे." त्याचा आवाज उत्साहानं ओसंडत होता.

ती काही बोलली नाही.

"ऐकू आलं ना?" म्हणत संपूर्ण जगात त्या पुस्तकाव्यतिरिक्त दुसरं काहीही महत्त्वाचं नसल्यासारखं तो बोलू लागला.

त्याचं बोलणं मध्येच तोडून तिनं सांगितलं, "मी नोकरी सोडून कितीतरी दिवस झाले. आणखी कुणाकडून तरी समजावून घ्या हवं तर."

"ए बावळट! मला न विचारता नोकरी सोडलीस ना? आता आणखी एकदा तयारी करून मला समजावून सांग. मी येतोय. खुणा करून ठेवलेलं सगळं तुझ्याकडून समजून घ्यायला पाहिजे."

तिला स्वत:पुरतं एकटं राहायचं होतं. त्यामुळे ती म्हणाली, "आता नको. मला सगळं वाचून पाहावं लागेल. आणि... हं... ते आणखी एक सांगायचं म्हणजे..." म्हणत तिनं कोर्टाच्या हुकुमाविषयी आलेल्या फोनचा मजकूर सविस्तरपणे सांगतिला.

"व्वा! हे उत्तम झालं! म्हणजे आपल्या केसमध्ये सत्य आहे असा न्यायाधीशांना विश्वास वाटला म्हणायचा! त्या सगळ्यांना इस्टेटीबाहेर काढणं उत्तमच!"

तिला आश्चर्य वाटलं. 'इस्टेटीत भावनात्मकदृष्ट्या गुंतून राहू नकोस म्हणून मला सांगतो आणि आता आनंद व्यक्त करतो. कधी असा वागतो, कधी तसा. याचं काही कळत नाही.' तिनं विचारलं, "उत्तम कसं म्हणतोस?"

'अन्यायाचा कण कुणालाच पचता कामा नये. तुझा वकील भारी दिसतोय हं! त्याचं अभिनंदन करायला पाहिजे."

त्याचं बोलणं ऐकून तिला समाधान वाटलं. तो पुढं म्हणाला, "यात कुणाचाही मुलाहिजा ठेवू नकोस. मॅनेजर नेमतानाही सावध राहा. नाहीतर ते कुणीतरी आपलाच माणूस तिथं नेमतील."

खिरीविषयी सांगायचं तिच्या मनात आलं; पण या विजयातही आपण अलिप्त राहिल्याचंच त्याला आवडेल असं वाटून ती त्या विषयी काही बोलली नाही.

सकाळी साडेदहाच्या सुमारास कुत्री भुंकू लागली. महादेवम्मानं सांगितलं, “गावाकडचं कुणीतरी आलंय. सुब्बम्मा नाव म्हणे.”

तिला चटकन कोण डोळ्यापुढे आलं नाही. बाहेर येऊन पाहिलं, तर सुब्बक्कय्या होत्या. काकूच्या माहेरची लांबच्या नात्यातली सकेशा विधवा. आई वारल्यानंतर काकू इस्टेटवर राहायला आली तेव्हा तिनं माहेरहून हिला आणलं होतं. नंतर शिक्षणासाठी हासनला घर केलं तेव्हाही या सुब्बक्कय्यानंच आपल्या पोटा-पाण्याचं पाहिलं होतं, हे तिला आठवलं. आताही ती कृष्णमूर्तीचं पोट-पाणी पाहायला त्याच्या अत्तिगानु इस्टेटवर राहत होती, हे तिला ठाऊक होतं. काहीतरी काम घेऊन आली होती हे लक्षात येऊन तिनं तिला आत बोलावलं आणि खुर्चीवर बसवून चौकशी केली, “बसनं आलीस? सकाळी केव्हा गाव सोडलं होतंस?” पाठोपाठ अमृताच्या मनात आलं, ‘हिला इथला पत्ता कसा समजला?’

“आता सकलेशपूरहून नवी थेट बसच सुरू झालीये. न्हाणीघर कुठाय?”

तिला न्हाणीघर दाखवून तिनं लगेच फोन केला, “आज दुपारी येऊ नकोस. मी नंतर फोन करते. गावाकडून एक बाई आली आहे. नुकतीच आलीये. का आलीये ते अजून समजलं नाही.”

“काहीही झालं तरी माघार घेऊ नकोस.” त्यानं सांगितलं.

हात-पाय धुवून आत आलेल्या सुब्बक्कय्याला कॉफी देत ती म्हणाली, “स्वयंपाकच झालाय. लवकर जेवू या. तुझी काय बातमी?” तिनं मुद्दामच त्या कुणाचंही नाव काढलं नाही.

“काय सांगायचं? तुला ठाऊक नाही असं काय आहे?” वरचा एक आणि खालचे दोन दात पडलेलं तोंड उघडून ती हसली.

“मला काय ठाऊक असणार? एवढ्या लांब मुलांची शाळा-शिक्षण म्हणत मी राहत्येय. मला काय ठाऊक असणार?” अमृताही त्याच चालीवर म्हणाली. यावर सुब्बक्कय्या पुन्हा हसली. काकूपेक्षा वयानं पाच-सहा वर्षांनी मोठी असली, तरी तिचे केस मात्र तिच्या अंगाच्या रंगाइतके काळेभोर होते. दोन्ही हातात मोठ्या जाड पाटल्या होत्या. हलक्या आवाजात ती म्हणाली, “नंतर निवान्त बोलू या. कामाच्या बायांना आधी जाऊ दे.”

कामं उरकून दोघीही निघून गेल्यावर अमृतानं दोघींचीही ताटं घेतली. गपागपा सारभात खाऊन झाल्यावर सुब्बक्कय्या बोलू लागली, “शिकारी कुत्र्यासारखा वकील दिलास तू! निकाल लागेपर्यंत उसंत द्यायलाही तयार नाही बघ! आताच इस्टेट आणि राहतं घर रिकामं करायला सांगितलं म्हणे त्यानं! मी तर पहिल्यापासून तुमचं अन्न खाऊन तुमच्या दारात पडून राहिले आहे. तुला एक सांगायला म्हणून आले होते. त्यांना घराबाहेर काढून अशी का देशोधडीला लावतेस बाई? खटल्याचं जे व्हायचं ते होऊ दे; पण घराबाहेर काढून त्यांचा अपमान कशासाठी करायचा?”

हे अमृताच्या अपेक्षेप्रमाणेच होतं. ती म्हणाली, “एवढंसं सांगायला तुम्हाला त्यांनी तिथून

इथपर्यंत धाडलं?"

"त्यांनी कशाला पाठवायला पाहिजे? तुला सांगायचा मला हक्क नाही? मीच आले आपण होऊन."

"हक्क आहे तर! नाही कसा." तिनं मुद्दामच जरा सैल सोडलं.

"एक गोष्ट विसरू नकोस. काही केलं तरी ते तुझे भाऊ आहेत."

"भाऊ म्हणायचे की जन्माचे दावेदार?" तिनं प्रतिप्रश्न केला; पण तिचा आवाज मृदूच होता.

"जसं मानशील तसं!" आता सुब्बक्कय्याचा आवाज बदलला, "तुलाही ठाऊक असेलच म्हणा! किती केलं तरी मी बाहेरचीच. मी काही बोलले, तर चुकीचं होईल. तूच सगळं सूक्ष्मपणे समजून घेऊन वागायला पाहिजेस."

"मला काय ठाऊक आहे असं तुला म्हणायचंय?" अमृतानं आश्चर्यानं विचारलं.

"तर मग मीही त्या विषयी बोलू नये."

"तू सगळं मोकळेपणानं सांग. तुझं नाव कुठंही येणार नाही, हे मी पाहते."

अमृतानं एवढं आश्वासन दिल्यावर ती म्हणाली, "इतरांना तू हवं तर दावेकरी म्हण. पण किट्टण्णा... तुला खरंच काही माहीत नाही?"

कुठेतरी अडखळत असलेल्या अमृताच्या मनात तत्काळ खुलासा झाला. जेव्हा कृष्णमूर्ती तिच्यावर जाराचा आरोप करत होता तेव्हा त्याचा चेहरा बघून मनात अस्पष्टपणे उमटलेला विचार आता स्पष्ट झाला होता. 'त्याचं वडलांच्या चेहऱ्याशी असलेलं पराकोटीचं साम्य! पण काका-पुतण्यामधल्या साम्याला असा वेगळा अर्थ देणं योग्य नव्हे.' हेही तिला समजत होतं. आता तिनं विचारलं, "खरं सुब्बक्कय्या?"

"मी कशाला खोटं सांगू? मला एकटीलाच नव्हे, घरातल्या सगळ्या नोकरमाणसांना हे ठाऊक होतं; पण मालकांविषयी तोंड उघडून कोण काय बोलणार? आणि त्यात काय चुकलं? तुझ्या वडलांना बायको नव्हती. तुझ्यासाठी त्यांनी दुसरं लग्न केलं नाही. तुझ्या काकूला तरी तसल्या नवऱ्याकडून कसलं समाधान मिळणार? लोकांना काहीही म्हणू दे. लोकांना ठाऊक तरी काय आहे म्हणा! मला मात्र यात काही चुकलं असं वाटलं नाही. रंड-मुंड बाई मी! आता हे सगळं मी तुला का सांगितलं? त्या दिवशी किट्टण्णा तुला काहीबाही बोलला म्हणून तू वकिलांना सांगून सगळ्यांना घराबाहेर काढलंस म्हणे. काहीही वेडं-वाकडं बोलला, तरी तो तुझा धाकटा भाऊ आहे. तू मोठी आहेस. विसरून जा. त्यांना घराबाहेर काढू नकोस."

अप्पांचा काकूशी अशा प्रकारचा संबंध असेल, हे तिच्या मनात कधीही डोकावलं नव्हतं, असं मुळीच नव्हतं. सगळ्या लहानपणीच्या आठवणी उकरून या संदर्भात तिनं पुन्हा जुळवून

पाहिल्या होत्या; पण निश्चित पुराव्याशिवाय यावर अधिक विचार करून अप्पांच्या धीरोदात्त चित्रावर चिखल फेकायला तिचं मन तयार नव्हतं; पण आता ती आतल्या आत असहाय होऊन गेली. एकीकडे पोटात ढवळू लागलं. सिंकमध्ये उलटी करावी असं वाटलं, तरी तिनं स्वत:ला आवरलं. कारण या वेळी उलटी झाल्याचं सुब्बक्कय्यानं नव्या कथेच्या स्वरूपात गावभर केलं असतं, याची तिला खात्री होती.

जेवण झाल्यावर तिनं सुब्बक्कय्याला स्वयंपाकघराजवळच्या लहान खोलीत विश्रांती घ्यायला सांगितलं. ती आपल्या बेडरूममध्ये शिरली तेव्हा तिला सगळं असह्य झालं होतं. संसारातल्या किरकोळ गोष्टीसाठी पत्नीच्या माघारी पुरुष असहाय होऊन जातो हे तिला समजत होतं; पण या कारणासाठी अप्पांनी या बयेला घराची यजमानीण करावं याचा तिला तिरस्कार वाटला. काकूऐवजी त्यांनी एखादी कोकणातली कलावंतीण राजरोसपणे ठेवली असती, तरी त्यांच्याविषयी एवढा तिरस्कार वाटला नसता. काकूविषयीचा तिचा तिटकारा पराकोटीला गेला. भावना बधिर होऊन गेल्या, तरी बुद्धीची तीक्ष्णता तशीच होती. 'स्वार्थाशिवाय प्रेम ही इतकी अशक्य गोष्ट आहे?' तिच्या मनात एक विचार आला. हा डावलता कामा नये म्हणून ती तशीच उठली. सुब्बक्कय्यालाही झोप लागली नव्हती. अमृतेनं विचारलं, "झोप नाही लागली?"

"नाही बाई! मला दुपारी झोपायची सवय नाही." ती उठून बसत म्हणाली.

"तर मग कॉफी घेऊ या, चल." म्हणत ती स्वयंपाकघरात आली. कॉफी पिताना अमृतानं विचारलं, "काल रात्री सकलेशपूरला मुक्काम होता?"

प्रश्नाचा रोख लक्षात न आल्यामुळे ती कॉफीचा घोट घेत म्हणाली, "नाही."

"मग पहाटे किट्टण्णानं इस्टेटीहून गाडीनं सकलेशपूरला आणून सोडलं?"

"होय."

"काकूनं तुला इकडं पाठवलं ना?" आता मात्र तिनं स्पष्टच विचारलं. ती चांगलीच गडबडली. अमृतानं तिला सावरायची संधी न देता तिचा हात धरून देवघरात देवापुढे उभं केलं आणि म्हणाली, "आता खरं सांग. देवाला सगळं ठाऊक आहे. मलाही समजतंय."

"काय विचारतेस! जाऊ दे बाई!' सुब्बक्कय्या सावरत म्हणाली, पण उत्तर स्पष्ट होतं.

"किट्टण्णा माझा कोण लागतो हे सांगायला त्यांनी तुला पाठवलंय. तू आपण होऊन असल्या भानगडीत पडणारी बाई नव्हेस, हे मलाही ठाऊक आहे. खरं सांग."

आता मात्र सुब्बक्कय्याचा चेहरा पार उतरून गेला होता. अमृता पुन्हा म्हणला, "देवापुढे उभी आहेस. या नाही, पण पुढच्या जन्मी तरी तुझं सगळं व्यवस्थित व्हायला पाहिजे की नको?"

तिलाही हे सगळं असह्य होऊन ती म्हणाली, "या असल्या विषयात नाक खुपसायचा

शहाणपणा या आधी मी कधी केलाय? तूच सांग! त्यासाठी देवापुढं उभं करून खरं-खोटं करायची काय गरज होती?"

"मग झालं तर!" म्हणत अमृता देवघरातून बाहेर आली. तीही बाहेर आली. सगळ्या परिस्थितीचा ताण सहन करणं सुब्बक्कय्याच्या कुवतीबाहेरचं होतं. ती पुन्हा स्वयंपाकघराशेजारच्या खोलीत जाऊन बसली. जेमतेम दहा मिनिटांतच आपली सामानाची पिशवी घेऊन बाहेर येत अमृताला म्हणाली, "आता निघते मी. मला बसमध्ये बसवून दे. दोन वेळचं अन्न शिजवणारीला कशाला हव्यात थोरा-मोठ्यांच्या घरच्या गोष्टी?" ती मनोमन दुखावली होती.

अमृता तिचं समाधान करत म्हणाली, "एवढं का मनाला लावून घेतेस? आजचा दिवस राहा. सकाळी बसवून देते बसमध्ये."

तीही आपल्या बेडरूममध्ये शिरली तेव्हा तिला सगळ्याचीच किळस आली होती. जगण्याविषयीचीच किळस मनात दाटून घशाशी येत होती. पाच वाजता ती मुलांना घेऊन आली, त्यांच्याशी खेळली, तिनं त्यांच्या शाळेची-मित्रांची चौकशी केली. रात्री मुलं झोपली. सुब्बक्कय्या झोपली.

तिच्या मनात एक विचार आला. हे योग्य नव्हे, असं मनाचा एक कोपरा सांगत असतानाही ती त्या निर्धारापाशी येऊन पोहोचली. अकरा वाजता सोमूशी फोनवर बोलतानाही तिनं आपला निर्धार बोलून दाखवला नाही. फक्त सांगितलं, "उद्या हासनला जाऊन येतेय, बहुतेक रात्री येईन. आल्यावर फोन करते."

रात्री यायला जमलं नाही तर खोळंबा होऊ नये म्हणून तिनं एका पिशवीत मुलांच्या कपड्यांचा सेट भरला. तिला गाढ झोप लागली.

सकाळी तिनं मुलांनाही लवकर उठवलं. अंघोळी उरकल्या. तिनं सुब्बक्कय्याला सांगितलं, "तूही लवकर तयार हो. मी तुला इस्टेटपर्यंत पोहोचवायला येते. माझंही तिथं काम आहे. सुब्बक्कय्यालाच उप्पीट करायला सांगून ते खाऊन सगळे बाहेर पडले. मुलांना आधी सुशीलम्मांच्या घरी सोडलं. त्यांच्या कपड्यांची पिशवीही ठेवली. महादेवम्माच्या घरी जाऊन घराच्या राखणीची व्यवस्था करून तिनं गाडी सकलेशपूरच्या रस्त्याला वळवली. दहा वाजता सकलेशपूरमध्ये दोघींचं खाणं-पिणं उरकून तिनं गाडी आधी जयराम आणि त्याची बायको राहत असलेल्या एलेकानु इस्टेटकडे वळवली.

तिला पाहताच जयराम आश्चर्यचकित झाला. ती त्याला म्हणाली, "जयण्णा, थोडं बोलायचं होतं. तुझी आई आणि किट्टण्णा असतील तर चांगलं. मीनाक्षीलाही येऊ दे. आपण तिकडंच जाऊ या."

हे ऐकताच जयराम एकदम सरळ झाला. नाहीतरी कोर्टाच्या हुकुमामुळे त्याची मस्ती जिरली होतीच. तो स्वत: गाडी चालवायला बसला. मीनाक्षी त्याच्या शेजारी बसली. गाडी चालवताना तो आत्मीयतेनं म्हणाला, "काहीही म्हण अमृताक्का! आपल्या इस्टेटींवर फिरायला

हे जुनं मॉडेलच चांगलं. अलीकडच्या मॉडेल्समध्ये एवढा दणकटपणा कुठं असतो?"

एका गाडीमधून या सगळ्यांना एकत्र आल्याचं बघून काकू आणि कृष्णमूर्ती चकित होऊन गेले होते. कृष्णमूर्तीच्या चेहऱ्यावरची गुर्मी अजून पूर्ण उतरली नव्हती. आपल्याला काहीच ठाऊक नसल्यासारखं दाखवत काकूनं चौकशी केली, "कुठून आलीस गं पुट्टी?"

क्षेमसमाचाराची चौकशी संपता संपता अमृतानं स्पष्टच सांगितलं, "मला तुम्हा चौघांशी बोलायचं आहे म्हणून आले मी. चला, माडीवर बोलू या."

काकू पायऱ्या चढू लागली. पाठोपाठ अमृता. मीनाक्षी, जयराम आणि कृष्णमूर्तीही आले. ही किट्टण्णाची खोली होती. सगळे आत आल्यावर अमृतानं दाराला कडी घातली आणि ती कृष्णमूर्तीच्या शेजारी त्याच्या दंडावर हात ठेवून बसली. जयराम, मीनाक्षी आणि काकू समोरच्या खुर्च्यांवर बसले. अमृता कृष्णमूर्तीकडे वळून म्हणाली, "हे बघ किट्टण्णा, आता माझं बोलणं मुकाट्यानं ऐकायचं. संयम सोडायचा नाही. तसं वचन दिलंस, तरच मी बोलेन. नाहीतर संतापानं थयथयाट करायचा असेल, तर मी बोलणार नाही."

त्याची आई त्याला म्हणाली, "हो म्हण रे! तुझी थोरली बहीण आहे. तुझ्या हितासाठीच काहीतरी सांगायला आली असेल."

अमृता म्हणाली, "त्या दिवशी तू मला जाराच्या गोष्टी सांगायला आला होतास ना! तुला वस्तुस्थिती ठाऊक नाही. त्या वेळी मला तुझा प्रचंड संताप आला होता."

मध्येच जयराम म्हणाला, "त्याचं बोलणं कशाला मनाला लावून घेतेस अमृतक्का? अजून त्याचा पोरकटपणा गेला नाही."

"अजून माझं बोलणं संपलं नाही." तिनं प्राध्यापकी थाटात सगळ्यांना धमकावलं. "त्या दिवशी मला त्याचा राग आला होता; पण कालपासून तो राहिला नाही. कारण कालच मला समजलं, तो माझाच भाऊ आहे. म्हणजे तो काकांपासून झाला नाही. माझ्या वडलांपासून म्हणजे तुमच्या काकांपासून झाला आहे. तुमच्या आईनंच ही वस्तुस्थिती मला अप्रत्यक्षरीत्या सांगितली आहे."

"काय बडबडतेस हलकट, छिनाल!" म्हणत कृष्णमूर्ती उठून उभा राहत म्हणाला.

"किट्टण्णा, मी खोटं बोलत नाही. तुझ्या आईनंच मला तसा निरोप पाठवला होता. मलाही याची थोडी कुणकुण होती. संपूर्ण इस्टेटीचे अधिकार हातात घ्यायचा तो तुमच्या आईचा प्लॅन होता. ती जुनी कथा झाली. यात तुम्हा तिघांचाही प्रत्यक्ष संबंध असल्यामुळे माझ्यापेक्षा ती तुम्हाला ठाऊक असणं आवश्यक आहे म्हणून सांगत्येय मी. मीनाक्षी, तूही या घरची सून म्हणून आली आहेस. तुलाही या घरच्या गोष्टी ठाऊक असाव्यात म्हणून तुलाही चल म्हटलं. आता यानंतर मी काय करणार आहे तेही ऐका. मला तर या इस्टेटीचा पराकोटीचा तिरस्कार निर्माण झाला आहे; पण म्हणून मी खटला मागं घेणार नाही. जयण्णा, सुप्रीम कोर्टापर्यंत तू तर जाणारच आहेस ना? तिथपर्यंत जाऊन मी कणभरही न सोडता सगळं माझ्या नावानं करून

घेईन. नंतर विजय-विकासची जाऊन माझ्या नावावर जी इस्टेट राहील, ती तुम्हा दोघांनाही दान म्हणून देईन; दोघांनाही! मला तुम्ही दोघंही भाऊच. तुम्हाला नको असेल, तर आणखी एखाद्याला दान म्हणून देईन. विजय-विकासनं त्यांच्या इस्टेटीचं काय करावं हा त्यांचा प्रश्न आहे. आता मात्र तुम्हाला कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे इस्टेटी रिकाम्या करून बाहेर पडावंच लागेल. दुसरं लग्न करून सुखानं राहा म्हणून रंगण्णालाही सांगितलंय मी."

तिचं बोलणं संपेपर्यंत काकू, जयराम आणि किट्टण्णाचा चेहरा ती पाहत होती. तिघांच्याही माना खाली गेल्या होत्या. तिघंही खचून गेले होते. मीनाक्षी सासूकडे खाऊ की गिळू या दृष्टीनं पाहत होती.

काही क्षण तसेच गेल्यावर अमृता पुन्हा म्हणाली, "किट्टण्णा माझ्या वडलांपासून जन्मला म्हणून मला त्याची विशेष माया आहे असं मुळीच नाही. दोघंही माझे भाऊच आहात आणि लीला बहीण. माझ्या मनात भेद नाही. निघते काकू!" म्हणून तिनं कडी काढली आणि जिना उतरून खाली आली. दारात सुब्बक्कय्या घाबरून उभी होती. तिला अमृता म्हणाली, "तुला या घरी यानंतर राहणं शक्य नसेल, तर माझ्या घरी ये. थोडे पैसे देईन. त्याच्या व्याजावर कुठंही सुखात राहा. तुझेही साठलेले पैसे असतील ना!"

बाहेरच्या व्हरांड्यात बसलेल्या काकांनी तिला पाहताच उठत विचारलं, "हे काय पुट्टी! एवढ्यात निघालीस? न जेवता?"

त्यांना वाकून नमस्कार करत ती म्हणाली, "अर्जंट काम आहे काका."

अजिबात घाई न करता तिनं निवान्त वेगानं गाडी सुरू केली. उतारावरची दाट हिरवी कॉफीची झुडपं सूर्याच्या उजेडात चमकत होती. मध्ये-मध्ये गाडीचा वेग मंद करून ती भोवताली पाहत होती. मनात येत होतं, 'किती छान आहे हे! या वेळी माझा सोमू बरोबर असायला हवा होता.'

तीनच्या सुमाराला ती सकलेशपूरला पोहोचली. एका हॉटेलमध्ये खाणं, कॉफी आटोपून ती पुढं निघाली. पुन्हा निवान्त गाडी चालवत संध्याकाळी साडेसात वाजता मैसूरला आली. मुलांना जेवायला वाढेपर्यंत साडेनऊ वाजले होते. तिचं मन आतल्या आत चडफडत होतं. कारण मात्र समजत नव्हतं. कितीतरी वेळानं तिला सुचलं. तिनं त्याला फोन केला.

"केव्हा आलीस?" त्यानं विचारलं.

"साडेसात वाजता. तू मुंबईमध्ये एक सहा महिन्यांचा इंटिरिअर डेकोरेशनचा डिप्लोमा कोर्स आहे म्हणत होतास ना? त्यासाठी फी, जेवण-खाण, राहणं मिळून किती खर्च येईल?"

"सहा महिन्यांसाठी एकूण पंधरा-सोळा हजार खर्च होईल."

"हे बघ, आजपासून माझ्याकडे एक नवा पैसाही नाही. माझ्या हातातल्या सोन्याच्या बांगड्याही माझ्या नाहीत. मला तू तेवढे पैसे द्यायला हवेस."

तो क्षणभर स्तब्ध झाला, नंतर म्हणाला, “हेच काम करावं म्हणून कुणी सांगितलं? कुठल्यातरी कॉलेजमध्ये लेक्चररची नोकरी धर. काही झालं तरी तुला त्याचा अनुभव आहे.”

“पण मला तुझ्या ऑफिसमध्येच काम करायला पाहिजे. मी दुसरीकडे कामाला गेले आणि तू दुसरी गर्लफ्रेंड केलीस तर? मी एवढीही सावध नाही असं वाटलं काय तुला?”

तो मोठ्यानं खळखळून हसला.

तीच पुढं म्हणाली, “मुलांना सहा महिने होस्टेलमध्ये ठेवू या. उद्या मी चौकशी करून ठेवते. आणखी एक म्हणजे उद्या येताना मात्र शंभर रुपये घेऊन ये. माझ्याकडे स्वत:साठी खर्च करायला नवा पैसाही नाही. फोन ठेवू? इतकी झोप येतेय! झोपते आता. गुडनाइट!”

तिच्या अनावर जांभईचा आवाज त्याला ऐकू येत होता.